# ईशादिषडुपनिषदाम्

प्रो.

चिंतामण गंगाधर भानु

कृत

# महाराष्ट्र विवरणम्

ॐ

# ईशावास्योपनिषत्

चिंतामण गंगाधर भानु

कृत

महाराष्ट्र विवरणम्

सपादकाचं विवरण ।

# ईशोपनिषत्

## ( अन्वय अर्थ व सरळ विवरण )

### शान्तिपाठाचा मंत्र.

**ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।**
**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥**

॥ ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

**अन्वय व अर्थः—अदः** ( तें ब्रह्म ) **पूर्णं** ( पूर्ण आहे. ) **इदं** ( हें दृश्य, विश्व ) **पूर्णं** ( पूर्ण आहे. ) **पूर्णात् पूर्णं** ( पूर्णापासून पूर्ण ) **उदच्यते** ( उदय पावतें. ) **पूर्णस्य पूर्णं आदाय** ( पूर्णातून पूर्ण काढून घेतलें तर ) **पूर्ण एव अवशिष्यते** ( पूर्ण हेंच अवशेष, शिल्लक, राहतें. )

सारांश, ब्रह्म हें पूर्ण आहे. दृश्य जगही पूर्ण आहे. पूर्ण ब्रह्मापासूनच पूर्ण जगताची उत्पत्ति होते आणि पूर्णातून पूर्ण वजा केलें तर म्हणजे ब्रह्मांतून या दृश्य जगताची वजाबाकी केली तर अवशेष पूर्ण म्हणजे ब्रह्मच राहतें. ज्याला अनंत असें म्हणतात, ज्याला पाश्चात्य लोक Infinity ( अनंत ) म्हणतात, त्या अनंताचे एक दोन धर्म येथें सहज लीलेनें सांगितले आहेत. पूर्णापासून पूर्णाचाच उदय होणें, हा म्हणजे अनंतांत कितीही गोष्टी मिळविल्या तरी बेरीज अनंतच असते, हा एक अनंताचा धर्म झाला. तसेंच, पूर्णातून पूर्ण काढून घेतलें तर बाकी पूर्णच उरतें. या उपदेशानें अनंतांतून अनंत काढून घेतलें; तरी शिलक अनंतच उरतें, हें सांगितलें. हे दोन धर्म या शांत्यात्मक मंत्रानें सांगितले आहेत. अनंताचे कांहीं धर्म अलीकडे समजूं लागले आहेत, हें जसें आधुनिक गणितशास्त्रवेत्त्यांस भूषणास्पद आहे, त्याचप्रमाणें उपनिषत्कालीं अनंताच्या दोन धर्मांचें तरी ज्ञान येथील लोकांस होतें, असें प्रस्तुतचा मंत्र स्पष्ट सांगतो. हें आमच्या पूर्व-पूर्वजांस किती भूषणास्पद आहे बरें. !.

या मंत्रापासून असाही बोध उत्पन्न होतो कीं, या अनंतविश्वांचें निमित्तकारण व उपादानकारण पूर्ण ब्रह्ममात्र आहे आणि ब्रह्मापासून विश्वाची उत्पत्ति होते. तसेंच, विश्व लयाला गेल्यानंतरही ब्रह्मच शिलक राहतें. म्हणजे सृष्टीच्या आधीं ब्रह्म पूर्णत्वानें असतें व सृष्टीचा लय झाल्यानंतरही ब्रह्माचें पूर्णत्व विकृत होत नाहीं. ब्रह्म स्वरूपानें पूर्ण आहे, अविकारी आहे, असें झालें. ब्रह्म हेंच सृष्टीची उत्पत्ति करितें व तिचा लयही तेंच करितें, हा भावार्थ आहे.

हो शांति सार्थ समजून घेऊन या उपनिषदाचे प्रारंभीं म्हणावी, असा संप्रदायसिद्ध नियम आहे. उपनिषद्गत ब्रह्मस्वरूप समजण्यास या शांतीचा पुष्कळच उपयोग होतो.

---

**ईशा वास्यमिदꣳ सर्वं यत्किंच जगत्यां जगत् ॥**
**तेन त्यक्तेन भुञ्जीथा मा गृधः कस्य स्विद्धनम् ॥१॥**

**अन्वय व अर्थः**—**जगत्यां** (या विश्वामध्यें) **यत्किंच जगत्** (जें कांहीं अनित्य अशा स्थावर अथवा जंगम पदार्थांचें सर्वस्व आहे.)—**तें—इदं सर्वं** (हें सर्व) **ईशा वास्यम्** (ईश्वरानें वसण्यास, राहण्यास, योग्य आहे.) **तेन त्यक्तेन भुञ्जीथाः** (तें सर्व पदार्थजात टाकून दिलेल्या स्वरूपानें उपभोग कर.) **कस्य स्विद्धनम् मा गृधः** (कोणाच्याही धनाचा अभिलाष धरूं नकोस.)

सारांश हा आहे कीं या विश्वामध्यें जे अनंत, पण अनित्य स्थावर-जंगम पदार्थ आहेत ते सर्व ईश्वराचें वास्तव्य-स्थान आहेत. ईश्वराच्या आश्रयानें राहणारे हे पदार्थ आहेत. ईश्वराचें मात्र स्वामित्व त्यांच्यावर आहे. ईश्वरेच्छेनें मात्र पदार्थ प्रवृत्ति करितात. सारांश, ते ईश्वराच्या मात्र मालकीचे आहेत, असें ज्ञान प्रत्येक जीवानें करून घेतलें पाहिजे. 'कोणत्याही पदार्थांवर जीवाची सत्ता नाहीं परमेश्वराची मात्र आहे.' हें ज्ञान प्रत्येक जीवास अवश्य आहे. तेव्हां आपण जीवांनीं विषयांचा जो उपभोग घ्यावयाचा तो, ते विषय आपल्या मालकीचे आहेत अशा जाणीवेनें नव्हे तर ते ईश्वराचे पदार्थ आहेत, ईश्वराचें वास्तव्यस्थान आहेत, असा भाव धरून आपण उपभोग घ्यावयाचा आहे. विषयांपासून जें सुख होतें त्या सुखाकरितां विषयांचा उपभोग घ्यावयाचा नाहीं; तर त्याविषयांचे ठिकाणीं ईश्वर आहे अशी भावना धरून मात्र विषयांचें सेवन करावयाचें आहे. येथें सुख-दुःखाचा किंवा आपल्या मालकीचा प्रश्नच नाहीं. हें तत्त्व प्रत्येक मुमुक्षूनें ध्यानांत ठेविलें पाहिजे, अर्थातच 'दुसऱ्या कोणाच्याही धनाचा अपहार करूं नको' हें स्पष्टच झालें. पण हें सांगण्याचें कारण असें आहे कीं, सामान्य लोकांची अशी एक भलती समजूत होण्याचा संभव आहे ती हीः—ज्याप्रमाणें जगांतील पदार्थांवर माझी सत्ता नाहीं, त्याचप्रमाणें इतर कोणाचीही नाहीं. तेव्हां वाटेल त्या वस्तूचा अभिलाष धरण्याला किंवा उपभोग घेण्याला आपल्यास काय प्रत्यवाय आहे? ह्या शंकेचा निरास करण्यासाठीं "कोणाच्याही धनाचा अभिलाष करूं नको" हें वाक्य श्रुतीनें समजूनच घातलें आहे. म्हणजे उपभोगाच्या संबंधानें स्वार्थी भाग मुळींच ठेवावयाचा नाहीं. निरंतर परमेश्वराच्या सर्वव्यापित्वाची व सर्वस्वामित्वाची भावना दृढ करावयाची असा उप-

देश या मंत्रांत आहे, असें मला वाटतें. सर्वत्र ईश्वर आहे, 'मी,' 'माझेपणा,' 'भोग,' विषय, इत्यादि सर्व शुद्ध अज्ञान आहे, हाही उपदेश येथें मिळतो.॥ १॥

---

या उपदेशावरून सामान्यतः अशी भ्रांति उत्पन्न होईल कीं जर आपल्याला उपभोग घ्यावयाचाच नाहीं, तर मग कर्म करण्याचें कारण नाहीं. हा भाव नाहींसा करण्यासाठीं दुसऱ्या मंत्राचा अवतार आहेः—

**कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतꣳ समाः ।**
**एवं त्वयि नान्यथेतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे ॥ २ ॥**

**अन्वय व अर्थः**—**इह** (ह्या विश्वामध्यें) **कर्माणि कुर्वन् एव** (कर्म, श्रुतिविहित कर्म करीत असतांना मात्र) **शतं समाः** (शंभर वर्षें) **जिजीविषेत्** (जगण्याची इच्छा धरावी) **एवं त्वयि नरे कर्म न लिप्यते** (याप्रमाणें विहित कर्म केलेंस तर तुला म्हणजे जीवाला कर्माचा लेप होणार नाहीं. जीवाला कर्माचें बंधन प्राप्त होणार नाहीं.) **इतः अन्यथा न अस्ति** (या शिवाय दुसरा कोणताही कर्मबंधन न होण्याचा मार्ग नाहीं.

सारांश, जोंपर्यंत आपला आयुर्दाय आहे, तोंपर्यंत आपण विहित कर्म अवश्य केलें पाहिजे. तो कर्म करण्याचा प्रकार वरच्या मंत्रांत सांगितलाच आहे. कर्माचि ठिकाणीं अभिमान नाहीं. आणि कर्मफलावर आसक्ति नाहीं अशाच स्वरूपाचें आपलें विहित कर्म असलें पाहिजे. हें असलें कर्म मात्र बद्धक होत नाहीं. इतर सर्व कर्में बद्धक होतात. म्हणजे जीवांस हीं कर्में परतंत्र करितात.

या मंत्रांत पहिल्या मंत्राचाच अनुवाद करून कर्म करणें हेंच जीवाचें कर्तव्य आहे, कर्म न करणें हें नाहीं, असें अधिक सांगितलें आहे. सामान्यतः सुखासाठीं आपण विषयाच्या प्राप्तीची इच्छा करितों. सुखच प्राप्त होणार नसेल, अथवा सुखासाठीं उपभोग घ्यावयाचे नसतील तर विषयांची इच्छा कोणीही करणार नाहीं. हा सर्व-सामान्य लोक-भ्रम आहे, असें श्रुतीस सांगावयाचें आहे. सुखाकरितां जगावयाचें नाहीं, सुखाप्रीत्यर्थ मात्र आपल्या आयुष्याचा विनियोग करावयाचा नाहीं, बाह्य सुख हें जीवाचें किंवा जीवाच्या जीवनाचें अंतिमसाध्य नव्हे, तर कर्म करणें, विहित कर्म करणें, कर्मफलाची इच्छा न धरितां व कर्मफलावरील अभिमान सर्वथा सोडून देऊन श्रुतीनें किंवा शास्त्रानें व समाज-दृष्टीनें विहित झालेलें वैदिक या लौकिक कर्म आपल्यास करावयाचें आहे. सर्व-व्यापी ईश्वराची भावना अंतःकरणामध्यें दृढ ठेवून त्याच्या साक्षित्वानें मात्र मुमुक्षु जीवानें कर्म करावयाचें आहे. विहित कर्म करावयाचें नाहीं, अशी वृत्ति

ठेवावयाची नाहीं. हें अशा स्वरूपाचें कर्म निष्काम असतें. हें कर्म म्हणजे खरें नैष्कर्म्य होय., हें कर्म जीवाला कोणत्याही तऱ्हेनें बद्धक होत नाहीं.

या पुस्तकाच्या वाचकांस हें माहित आहे कीं "माझ्या कर्मांचें फल मला मिळालें पाहिजे, म्हणजे मला सुख होईल." हा प्रत्येक जीवाचा 'पंचवीस अक्षरी' मंत्र आहे. या मंत्राचेंच ध्यान-पठन आपण सर्व जीव करीत असतों, आणि सुखदुःखाचे भागीदार होतों, म्हणजे बद्ध होतों. सुखाच्या आशेनें केलेलें कर्म केव्हांही चांगलें होत नाहीं, हा अनुभव प्रसिद्ध गीता दैवीस्वरानें गाणारा भगवान् श्रीकृष्ण यासच काय, पण सर्व पौरस्त्य आणि पाश्चात्य, प्राचीन आणि अर्वाचीन, विद्वान् आणि अविद्वान् यांस आला आहे. फलाच्या आशेनें केलेल्या कर्मांत कर्त्याचें लक्ष फलाकडे असतें, कर्माकडे नसतें म्हणून कर्म चांगलें होत नाहीं व त्या कर्माचरणानें मनही संस्कृत होत नाहीं. तसेंच, अभिमानानें केलेलें कर्म मनाला नेहमीं दूषित करितें 'माझें कर्म' हें चिंतन नित्य असेल तर मनामध्यें काम क्रोध, लोभ, मत्सर, इत्यादि विकार जागृत राहून ते कर्मकर्त्याच्या शुद्ध मनाला दूषित करितात व त्याच्या सुखदुःखाला कारण होतात. तेव्हां, 'हें कर्म माझें म्हणून मी करीत नाहीं, तर समाजाच्या कल्याणासाठीं, शास्त्रें सांगतात म्हणून, आणि श्रुतीनें विहित केलें आहे एतदर्थ, मीं कर्म केलें पाहिजे. कर्म न करितां स्वस्थ बसलों तर स्वतःचें व समाजाचें स्वास्थ्य मोडेल, अशी निष्काम भावना जीवांची असणें हें श्रुतीला इष्ट आहे. निष्काम कर्म चित्ताची शुद्धि करितें. असें कर्म समाजामध्यें प्रेम उत्पन्न करितें. असें कर्म समाजांत जे राजकीय, आर्थिक किंवा धार्मिक भेदाभेद असतील, उच्चनीचभाव असेल तो नाहींसा करितें. या मंत्रांत सांगितलेलें कर्म, निष्काम कर्म, अखंड चालू राहील, तर तें व्यक्तीचा व समाजाचा उद्धार करितें. जितका निष्काम सत्कर्माचा संग्रह ज्यास्त, तितकें प्रत्येक राष्ट्र जास्त सुसंस्कृत असतें. ॥ २ ॥

---

निष्कामकर्मपुराण संपलें, आतां सकाम कर्माचा परिणाम या मंत्रांत सांगितला आहे.

**असुर्या नाम ते लोका अन्धेन तमसाऽऽवृताः ।**
**ताꣳस्ते प्रेत्याभिगच्छन्ति ये के चाऽऽत्महनो जनाः ॥३॥**

**अन्वय व अर्थः—अन्धेन तमसा आवृताः** (अत्यन्त गाढ अंधकारानें पूर्ण भरलेलीं कोठेंही कसलेंही दर्शन होण्याचा संभव नसणारीं) **ते लोकाः** (तीं भुवनें) **असुर्याः नाम** (असुर्य "अप्रकाशी," प्रकाशशून्य या नांवानें प्रसिद्ध आहेत) **ये केच आत्महनो जनाः** (जे कोणी आत्म्याचा

घात करणारे लोक आहेत.) ते प्रेत्य तान् अभिगच्छन्ति (ते लोक मेल्यावर वरील 'असुर्य' नामक लोकांप्रत जातात.)

सारांश, जे लोक सकाम व साभिमान कर्म करून देहाचें व विषयांचें मात्र चिंतन करितात, आत्म्याचें चिंतन मुळींच करीत नाहींत, ते लोक आत्मघाती होतात, आणि त्यांचा देहपात झाल्यावर ते लोक जेथें पूर्ण अज्ञान आहे, अशा लोकांमध्यें जाऊन अज्ञानामध्यें लोळत पडतात.

याचा भावार्थ स्पष्टच आहे. संसारामध्यें पडलेले जीव आपल्या या क्षणभंगुर देहाचें व विषयांचें मात्र चिंतन करीत असतात. त्यांना असें वाटत असतें कीं, आपल्याला सुख मिळावयाचें तें बाह्य विषयांपासून मात्र मिळेल. असो; विषयांकरितां जीवांची जी तळमळ आहे ती, विषयांपासून सुख मिळतें, या भ्रमानें उत्पन्न झाली आहे. विषयांचें चिंतन, त्यांचें ध्यान, त्यांचा निदिध्यास, त्यासाठीं लागणारी तळमळ, इत्यादि सर्व मनुष्याचें चित्त बिघडवून टाकितात. हे राक्षसी विकार त्याला स्वरूपाचें ज्ञान किंवा आपल्या कर्तव्याचें ज्ञान मुळींच होऊं देत नाहींत. असा स्वरूपाचें अज्ञान असलेला आणि स्वकर्तव्याचें भान नसलेला पुरुष आपल्या जीवाचें मातेरें करितो, आपल्या कुटुंबाचा, समाजाचा, राष्ट्राचा आणि जगताचा घात करितो. या आत्मघाती पुरुषासारखेच पुरुष कुटुंबांत, समाजांत, राष्ट्रांत, किंवा पृथ्वींत जास्त झाले तर त्या कुटुंबाचा, समाजाचा, राष्ट्राचा, सारांश, सर्वांचा ऐहिक व पारमार्थिक घात होतो. हें श्रुतीस सांगावयाचें आहे. गीतेनें अयाज्ञिक कर्म करणाराला "चोर" असें म्हटलें आहे. येथें श्रुति असल्या पुरुषांस आत्म-घाती असें म्हणते. हे पुरुष अथवा पुरुषाधम स्वकर्मानें स्वतःला दुःख देतात, इतकेंच नव्हे, तर हे इतर जीवांसही दुःखी करितात. तेव्हां असलें दुष्ट कर्म करणारे, फलाची इच्छा ठेवून कर्म करणारे, किंवा कर्माचा अभिमान धरून कर्म करणारे लोकांचा निंदा श्रुतीस करावयाची आहे. पहिल्या मंत्रांत शुद्ध ज्ञान काय आहे तें सांगितलें. दुसऱ्या मंत्रांत निर्लेप कर्म करावें, कर्मशून्य असूं नये, म्हणून सांगितलें आणि तिसऱ्या मंत्रांत सकाम आणि साभिमान कर्म करूं नये, असें आत्मघात्यांची निंदा करून सांगितलें. सारांश, स्वतःचा आणि स्वेतरांचा उद्धार करण्याविषयीं इच्छा धारण करणारा मुमुक्षु कसा असावा आणि कसा असूं नये, त्यानें कोणती मनोवृत्ति ठेवावी आणि कोणती ठेवूं नये, हें वरील तीन मंत्रांत सांगितलें आहे. हाच भगवंतास इष्ट असणारा कर्मबोध, अकर्मबोध आणि विकर्मबोध होय.

पुढील दोन मंत्र सर्व-नियामक, सर्व-व्यापी, सर्वश्रेष्ठ आणि सर्वज्ञ जो परमेश्वर त्याचें स्वरूप स्पष्ट सांगतात. ॥ २ ॥

या व पुढील मंत्रांत आत्मस्वरूपाचें लक्षण दिलें आहे:—

**अनेजदेकं मनसो जवीयो नैनद्देवा आप्नुवन्पूर्वमर्षत् ।**
**तद्धावतोऽन्यानत्येति तिष्ठत्तस्मिन्नपो मातरिश्वा दधाति ४**

**अन्वय व अर्थः**—**अनेजत्** (हालचाल न करणारें) **एकं** (एकच एक, ज्याच्याशिवाय दुसरें नाहीं, असें ब्रह्म) **मनसो जवीयः** (मनाहून अत्यंत चपल)—आहे. **देवाः पूर्वं अर्षत् एनत् न आप्नुवन्** (देवांना म्हणजे इंद्रियांना पूर्वी प्राप्त झालेलें हें—आत्मतत्त्व—केव्हांही मिळत नाहीं.) **तत् तिष्ठत् धावतः अन्यान् अत्येति** (एका ठिकाणीं स्थिर राहणारें तें ब्रह्म अति वेगवान् धावणारांच्या पुढें जातें.) **तस्मिन् मातरिश्वा अपः दधाति** (त्यामध्येंच मातरिश्वा, वायु अथवा आईच्या उदरांतून जन्मास येणारा प्रत्येक प्राणी कर्म करित असतो.

**सारांश**, हें अद्वितीय ब्रह्म सर्वगामी असल्यामुळें अत्यंत जलद चालणाऱ्या मनालाही पाठीमागें टाकतें. स्वर्गीतील देव किंवा जीवांच्या इंद्रियांवर स्वामित्व चालविणारे देव, यांना जरी ब्रह्माची सत्ता पहिल्यापासूनच प्राप्त झालेली असते तथापि हें ब्रह्मतत्त्व देवांना किंवा आमच्या ज्ञानेंद्रियांना गोचर होत नाहीं. तें सर्वव्यापी ब्रह्म अतिशय जलद धांवणाऱ्या सामर्थ्यांहून (Forces) वेगवत्तर असतें. या एकरूपी ब्रह्मामध्येंच वायु आदि महाभूतें आणि सर्व जीवजात आपापलीं कर्में करित असतात.

वा मंत्रांत ब्रह्माच्या स्वरूपाचा एकच भाग मुख्यत्वानें सांगितला आहे. तो भाग म्हणजे त्याचें सर्व-व्यापित्व होय. आकाश सर्वव्यापी आहे असें वेदांत-कालीं आमचे पूर्व पूर्वज ऋषी म्हणत असत व आधुनिक पाश्चात्य पंडितही असें म्हणतात कीं आकाशामध्यें (Ether) सर्व विश्व अंतर्बाह्य बुडून राहिलें आहे. असो; या सर्व—गामी आकाशालाही एकरूपानें व एकरसानें व्यापून टाकणारें ब्रह्मतत्त्व आहे. अर्थातच मन आदि परिच्छिन्न (मर्यादित) वस्तु केव्हांही त्याच्याशीं तुलना करावयास योग्य नव्हेत. हीच कथा देवांची, आमच्या इंद्रियांची व सर्व गतिमान् विद्युत् प्रकाश, इत्यादिकांची आहे. वीज व प्रकाश लाख दोन लाख मैल प्रत्येक सेकंदांत प्रवास करितात, असें हल्लींच्या शास्त्रानें ठरलें आहे. या सर्व वस्तूंच्या गति अनंतपट वाढल्या तरी त्यांस ब्रह्माची सर येणार नाहीं. कारण तें एक समयावच्छेदेंकरून (एका वेळींच, एकदम,) सर्व विश्वास व्यापून राहिलें आहे. दुसरा असाही एक विचार आहे. कीं अत्यंत गतिमान् वस्तु स्थिर आहेत असाही भास आपल्यास होत असतो. लहान मुलें काठीला प्रकाशी पदार्थ बांधून तो गरगर फिरवूं लागलीं म्हणजे एक स्थिर

तेजश्चक्र आपल्यास दिसूं लागतें. अतिशय जलद फिरणारा भोंवरा स्थिर आहे असाही भास आपल्यास होतो. तेव्हां अत्यंत गतिमान् वस्तु व अत्यंत स्थिर-वस्तु एकाच कक्षेंत येऊं शकतील. तात्पर्य, ह्या मंत्रांत जो कांहीं विरोधाचा भाग आहे, असें वाटतें तो केवळ आभास आहे. परमेश्वर सर्वव्यापी आहे, म्हणून एकचकाळीं तो सर्वत्र दिसतो. अर्थातच त्याची गति मनोगतीच्या अनंतपट असते. असो, येथें परमेश्वर सर्वव्यापी आहे हें विशेषत्वानें सांगून पहिल्या मंत्रांतील अर्थ स्पष्ट करावयाचा आहे. तसेंच, तो सर्वज्ञ आहे, सर्वसाक्षी आहे, हेंही स्पष्टपणानें सांगण्याचा श्रुतीचा उद्देश आहे. सर्व देवांच्या, मनादि इंद्रियांच्या, व पदार्थांच्या अंतर्यामीं व बाह्य प्रदेशीं हा परमात्मा ओतप्रोत भरलेला असतो. अर्थात् तो सर्वसाक्षी असतो व जीं जीं काय कर्में विश्वसामर्थ्यें जीव करितात. तीं त्याला विदित असतात. तो सर्वसाक्षी आहे, पण त्याला मात्र कोणी संसारी पुरुष किंवा देव स्वरूपानें पाहात नाहीं. ॥ ४ ॥

---

याच अर्थाचें पोषण पुढील मंत्र करीत आहे—

**तदेजति तन्नैजति तद् दूरे तद्वन्तिके ॥**
**तदन्तरस्य सर्वस्य तदु सर्वस्यास्य बाह्यतः ॥ ५ ॥**

**अन्वय व अर्थः—तत् एजति** ( त भय पावतें किंवा हालचाल करितें, **तत् न एजति** ( तें मुळींच भय पावत नाहीं, किंवा हालचालही करीत नाहीं ) **तत् दूरे तत् उ अन्तिके** ( तें अतिशय दूर आहे; पण तें अतिशय जवळही आहे. ) **तत् सर्वस्य अस्य अन्तः** ( तें ह्या सर्वांच्या अतरंगामध्यें आहे. ) **तत् उ अस्य सर्वस्य बाह्यतः** ( पण तें ह्या सर्वांच्या बाहेर आहे.

सारांश, हें भ्याल्यासारखें दिसून स्वतः अत्यंत निर्भय असतें. तें सर्वांपासून अतिशय दूर असूनही तें सर्वांच्या अत्यंत समीप असतें. तें सर्वांच्या अंतःप्रदेशीं व बाह्यप्रदेशीं पूर्ण ओतप्रोत भरलेलें आहे.

या मंत्राचा भावार्थ थोडक्यांत असा आहे कीं, आपल्या इंद्रियांस, मनास, व बुद्धीस किंवा बुद्धिजन्य कल्पनेस परमेश्वर मुळींच गोचर होत नाहीं, म्हणून तो भ्याला अथवा लाजला असें वाटण्याचा संभव आहे. पण तो स्वरूपानें निर्भयच असतो; शिवाय जी जी म्हणून हाल-चाल होते, त्या हालचालीमध्यें हा परमेश्वर सत्तारूपानें [ अस्तित्वरूपानें ] सदैव असतो. म्हणून आपल्यास असेंही म्हणतां येईल कीं, हा स्थिर परमेश्वर सदैव हालचालीचा व्यापार करीत

आहे. वास्तविक तो स्थिरच आहे. पण आपल्यास मात्र हाल-चालीचा भास होतो; तसेंच, परमेश्वरावर ज्यांची श्रद्धा नाहीं, श्रुतिवाक्यांवर ज्यांचा विश्वास नाहीं, त्यांनीं आपल्या स्वतःच्या बुद्धीनें; त्याचा शोध लावण्याविषयीं केवढाही भगीरथ प्रयत्न केला, तरी तो त्यांस सांपडावयाचा नाहीं; इतका तो लांब आहे. पण श्रुतिवाक्यावर ज्यांची ज्ञानपूर्वक निष्ठा आहे, त्यांस तो अत्यंत निकटवर्ती असतो. अशा भक्तांस हा परमेश्वर सर्वत्र अन्तर्बाह्य दिसत असतो; म्हणून त्यांचें कर्म, त्यांचें शील, त्यांची बुद्धि; आणि त्यांचे पुरुषार्थ हे सर्व विश्वोपकारकच होतात. ॥ ५ ॥

---

या ज्ञानी भगवद्भक्तांची किंवा भक्तिपूर्ण विद्वानांची मनःस्थिति पुढील दोन मंत्रांत सांगितली आहे, ती संसारी लोकांच्या अपेक्षेनें पाहिली असतां, मोठी मनोरंजक आहे. संसारी लोकांत परमेश्वर हा म्यालेला, दूर असणारा, आंत किंवा बाहेर कोठें तरी एका ठिकाणीं सांपडणारा आहे, असें वाटत असतें! ही दृष्टि लक्षांत घेऊन पुढील मंत्रांचें व्याख्यान करावयाचें आहे.

**यस्तु सर्वाणि भूतान्यात्मन्येवानुपश्यति ॥**
**सर्वभूतेषु चाऽऽत्मानं ततो न विजुगुप्सते ॥ ६ ॥**

अन्वय व अर्थः—तु (पण) यः सर्वाणि भूतानि आत्मनि एव च आत्मानं सर्वभूतेषु अनुपश्यति (जो सर्व भूतें आत्मस्वरूपामध्यें व आत्मस्वरूप सर्व भूतांमध्यें विचारपूर्वक पहातो) ततः न विजुगुप्सते (म्हणून ज्याला कोणत्याही प्रकारची शंका किंवा द्वेष, किंवा क्रोध, उत्पन्न होत नाहीं)

तसेंच—

**यस्मिन्सर्वाणि भूतान्यात्मैवाभूद्विजानतः ॥**
**तत्र को मोहः कः शोक एकत्वमनुपश्यतः ॥ ७ ॥**

अन्वय व अर्थः—सर्वाणि भूतानि यस्मिन् आत्मा एव अभूत् (आणि सर्व भूतें ज्या ज्ञानी पुरुषामध्यें आत्मस्वरूपच होतात.) विजानतः एकत्वं अनुपश्यतः तत्र कः मोहः कः शोकः (सर्वत्र ज्ञानदृष्टीनें एकत्व पाहणाऱ्या साक्षात्कारी पुरुषाच्या अंतःकरणामध्यें मोह किंवा शोक हे कसे उत्पन्न होणार?)

दोन्ही श्लोकांचा सारांश असा आहे–कीं, ज्ञानानें आणि भक्तीनें ज्याचें दृढ अनुसंधान परमेश्वराच्या ठिकाणीं लागलेलें असतें व ज्याचें कर्म सर्वसंरक्षक परमेश्वराला संतोषित करतें, तो पुरुष 'सर्व भूतें आत्मस्वरूपांत आहेत, सर्व भूतांमध्यें आत्मस्वरूप आहे, सर्वत्रच आनंद आहे, काम-क्रोधाला कोठेंही जागा नाहीं,' असें पाहूं लागतो; आणि ज्याची अशी दृष्टि होते कीं 'सर्वभूतें परमेश्वर स्वरूपानें माझ्यामध्यें आहेत आणि मी परमेश्वर स्वरूपानें सर्वभूतांमध्यें आहें' त्या ज्ञानी व साक्षात्कारी पुरुषाला अर्थातच शोक-मोहादिकांचे कारण उरत नाहीं. या दोन श्लोकांचा भावार्थ अगदीं स्पष्ट आहे. ज्ञानी पुरुषाला सर्वत्र आत्मस्वरूप दिसतें आणि सर्व वस्तू आत्मस्वरूपामध्यें दिसूं लागतात, इतकेंच काय! पण तो सर्वभूतें आत्मभावानें लेखूं लागतो. त्याचा आपपर भाव नाहींसा होतो. अर्थात् अशा पुरुषाच्या हातून केव्हांही श्रुतिनिषिद्ध कर्म व्हावयाचेंच नाहीं. हा ज्ञानी पुरुष परमेश्वर-साक्षित्वानें जी जी उपासना करील, ती जगताचा उद्धार करणारीच असावयाची; तो जें जें कर्म परमेश्वर-साक्षित्वानें करील, तें सदैव जगताचें ऐहिक व पारमार्थिक कल्याण करणारेंच असावयाचें; आणि त्याचें ज्ञानही जगताचें ज्ञान वाढविणारें असतें. असे महापुरुष ज्या राष्ट्रांत अवतीर्ण होतात, ते महापुरुष व तीं राष्ट्रें ऐश्वर्यवंत, शीलवंत, विजयशाली, आणि धर्मपर असतात हें भगवंतानीं गीतेमध्यें सांगितलें आहे ॥ ६ ॥

---

पुढील मंत्र माझ्या समजूतीनें वरील ज्ञानी पुरुषाची शेवटची स्थिति सांगत आहे.

**स पर्यगाच्छुक्रमकायमव्रण-**
**मस्नाविरꣳ शुद्धमपापविद्धम् ॥**
**कविर्मनीषी परिभूः स्वयंभूर्याथा-**
**तथ्यतोऽर्थान्व्यदधाच्छाश्वतीभ्यः समाभ्यः ॥८॥**

**अन्वय व अर्थः**—**सः शाश्वतीभ्यः समाभ्यः याथातथ्यतः अर्थान् व्यदधात्** (मागील दोन मंत्रांत उल्लेखिलेला तो ज्ञानी पुरुष यावज्जीव पुरुषार्थाची यथार्थ सिद्धि करितो. येथें शाश्वतीभ्यः समाभ्यः–'शाश्वत वर्षांपर्यंत'–याचा अर्थ तो ज्ञानी पुरुष मृत्यु लोकांमध्यें जिवंत आहे, तोंपर्यंत-असा केला आहे.) **सः कविः** (तो कवि प्रतिभासंपन्न असणारा व दुसऱ्यास ज्या गोष्टी दिसत नाहींत त्या पाहणारा.) **मनीषी** मनावर सत्ता चालविणारा) **परिभूः** (सर्व विषयांचा पराभव करून

त्यांची निवृत्ति करणारा.) **स्वयंभूः** (स्वतंत्र; आपल्या स्वतः मध्येच रममाण होणारा)–ज्ञानी पुरुष **शुक्रं** (तेजस्वी) **अकायं** (शरीर-शून्य) **अव्रणं** (क्षररहित, अक्षर, अविकार्य) **अस्नाविरं** (स्नायु-शून्य) **शुद्धं** (निर्मळ) **अपापविद्धं** (पापशून्य)–अशा स्वरूपाप्रत **पर्यगात्** (जाऊन पोहचला–जाऊन पोहचतो.)

सारांश, वर दोन मंत्रांमध्ये निर्दिष्ट केलेल्या ज्ञानी पुरुषाची बुद्धि अत्यंत तीव्र व कुशाग्र असते. त्यानें मनोनाश आणि वासनानाश सिद्ध केले असल्यामुळें तो सदैव आत्मसुख घेत असतो; आमरण आपल्या गुण-कर्मांनी मात्र सिद्ध झालेल्या वर्णाश्रमांस विहित, योग्य, आणि इष्ट अशीं कर्में करून ह्या लोकीं चारी पुरुषार्थ यथार्थत्वानें साध्य करून घेतो, आणि शेवटीं असें स्वरूप प्राप्त करून घेतो, कीं जेथें पापाचा स्पर्श नाहीं उपाधींचें नांव नाहीं, जेथें ज्ञान आणि पवित्रता यांचें निरंतर वास्तव्य आहे. हेंच परमेश्वराचें अथवा परब्रह्माचें स्वरूप आहे. अर्थात् हा पुरुष परमेश्वरस्वरूप होतो.

हा सारांश मागें ज्या चार भाष्यांचा अवतार केला आहे त्यांच्याहून अगदीं निराळा आहे. माझी स्वतःची अशी समजूत झाली आहे कीं सहा, सात व आठ हे मंत्र ज्ञानी पुरुषाची ज्ञानमर्यादा, त्याची मनोवृत्ति, त्यानें संपादन केलेली योग्यता, त्यानें केलेलें कर्म, त्याला येथें प्राप्त झालेली स्थितप्रज्ञता आणि देहपातानंतर त्याला प्राप्त होणारें स्वरूप या विषयांचें–सारांश ज्ञानी पुरुषाच्या स्थितीचें–स्वरूप वर्णन करितात. म्हणून आतांच सांगितल्याप्रमाणें मला वाटतें कीं, आठव्या मंत्रासह सहावा व सातवा हे मंत्र ज्ञानी पुरुषाची स्थिति सांगतात. माझ्या समजूतीनें क्रमही वरपासून असाच आला आहे. पहिल्या तीन मंत्रांत ज्ञान, कर्म, अकर्म आणि विकर्म यांचा विचार करून असें ठरविलें आहे कीं, मुमुक्षूनें जन्मभर कर्म केलेंच पाहिजे. मात्र ह्या कर्मांचें कर्तृत्व आपल्याकडे घ्यावयाचें नाहीं. ह्या कर्मांचें फल परमेश्वरालाच समर्पण करावयाचें. नित्य "परमेश्वर सर्वत्र भरला आहे" ही ज्ञानदृष्टि अखंड ठेवून व आपल्यास हें स्वरूप गांठावयाचें आहे, हें ठरवून श्रुतिविहितमात्र कर्म करावयाचें हें ज्ञानी पुरुषाचें निष्काम कर्तव्य आहे. त्यानें हातपाय जोडून स्वस्थ बसावें हें श्रुतीला केव्हांही मान्य नाहीं; आणि मुमुक्षूनें श्रुतिनिषिद्ध कर्म, तसेंच श्रुतिविहित पण स्वार्थी कर्म, केव्हांही करूं नये. हेंही श्रुतीनें सांगितलें आहे. पहिल्या मंत्रांत ज्ञानी पुरुषाचें निवृत्तिपर कर्म म्हणजे श्रुतिमान्य कर्म, दुसऱ्या मंत्रांत कर्म करूनही व्यापारशून्यत्व म्हणजे अकर्म आणि तिसऱ्या मंत्रांत सकाम कर्म म्हणजे विकर्म, असा भगवद्गीत कर्म, अकर्म, आणि विकर्म यांचा अनुवाद श्रीकृष्णाच्या पूर्वी कित्येक शतकें श्रुतीनें प्रसिद्ध केला आहे. असो; ज्ञानी पुरुषाचें कर्म पहिल्या तीन मंत्रांत सांगितलें

आहे. त्यापुढील दोन ५ व ६ हे मंत्र परमेश्वराचें स्वरूप सांगणारे आहेत. ज्ञानी पुरुषानें परमेश्वराचें सर्व-व्यापित्व कसें आकलन करावें हें या मंत्रांत सांगून त्याची निवृत्तिमूलक कर्मपरता पुष्ट व्हावी, हें श्रुतीस इष्ट आहे, असें मला वाटतें. सहा, सात व आठ हे मंत्र ज्ञानी पुरुषाच्या ऐहिक व पारमार्थिक स्थितीचें वर्णन करितात. सारांश, श्रीमत् शंकराचार्यांनीं म्हटल्याप्रमाणें हें उपनिषद् ज्ञानपरच आहे असें मला वाटतें. येथें ब्रह्माची व ज्ञानी पुरुषाची कथा सांगितली आहे. उत्तम ज्ञान झालें असतां ज्ञानी पुरुष निवृत्ति उत्पन्न करणारें कर्म कसें करितो व करवितो, याचें उत्तम वर्णन ह्या उपनिषदांत आहे. सारांश, आधुनिक आर्यांनीं कर्म-शून्यतेचा जो घोष घेतला आहे, तो सर्वांशानें खरा नाहीं, असा श्रुतीचा अभिप्राय मला दिसतो. सारांश, ज्ञानी पुरुषानें कर्म करितांच उपयोगी नाहीं, असा आग्रह कित्येक अद्वैती वेदान्ती करित असतात, त्या आग्रहाचा निरास श्रुतीनें या उपनिषदांत केला आहे. आणि सर्वथा स्वार्थत्याग केलेल्या ज्ञानी पुरुषानें लोक-संग्राहक कर्म निष्कामी कर्तव्य-दृष्टीनें केलें पाहिजे, असें श्रुति कंठरवानें येथें सांगत आहे, हा भाग विसरला गेल्यामुळें व कर्म करणें हें स्वभावतःच अप्रिय असल्यामुळें कर्म न करणें हेंच खरें ज्ञान, हाच खरा, वेदान्त, हेंच खरें सात्त्विक व्रत, असा-माझ्या समजुतीनें अवास्तविक-आग्रह अद्वैती पंडितांत प्रविष्ट झाला. हा अमंगल प्रकार केव्हां झाला हें जरी सांगतां येत नाहीं, तथापि त्याच्या योगानें आमच्या समाजाची एक मोठी हानि झाली, ती मात्र विसरतां येत नाहीं. पहा कीं, "सर्वत्र अद्वैताचें साम्राज्य आहे. आपपरभाव मुळींच नाहीं. शोक मोह असण्याचें कारण नाहीं. सर्वत्र आनंद आहे." इत्यादि प्रकारचें मंगलकारी ज्ञान प्राप्त झाल्यामुळें ज्याची स्वार्थबुद्धि सर्वात्मना नष्ट झाली तो जगत्कल्याण करण्यास सर्वस्वी योग्य असणारा महापुरुष कर्मशून्य झाला, स्वार्थीकर्मांबरोबरच लोक-संग्राहक कर्मांचा त्यानें त्याग केला! 'मी कोणतेंही कर्म करणारच नाहीं' अशा आग्रही मनोवृत्तीचा स्वीकार त्यानें केला, ही केवढी दुर्दैवाची गोष्ट झाली? असो. झाल्या गोष्टी त्या होऊन गेल्या. आतां तरी कर्मांचा त्याग म्हणजे स्वार्थी कर्मांचा त्याग, मर्यादित कल्याण करणाऱ्या कर्मांचा त्याग, एवढाच वरील शब्दाचा अर्थ व्हावा. कर्मत्याग म्हणजे सर्व कर्मांचा सर्वथा त्याग असा अनर्थकारी अर्थ होऊं नये. पूर्ण योग्याचें कर्म शममूलक असतें असें गीताकारांचे यथार्थ म्हणणें आहे. तसेंच स्वतःचा व स्वेतरांचा बंधमोक्ष करणाऱ्या मुमुक्षूंचें असावें. तेव्हां, ज्ञान मिळविण्याची, वेदान्तज्ञान मिळविण्याची, ज्यांना हौस आहे, (यथार्थ ज्ञान-विज्ञान झालें म्हणजे कर्म संपतें, मोक्ष मिळतो. कृतकृत्यता प्राप्त होते व जीव कृतार्थ होतो असा ज्यांचा निश्चय आहे,) त्यांनीं-लोक-संग्रहासाठीं येथें अवतीर्ण झालेले महान् साधुसंत यांनीं, अनाथांचें संरक्षण करणारें कर्म केलें आहे, असें आपल्यास दिसतें म्हणून,-'परमेश्वरही साधूंचें रक्षण करण्यासाठीं

व धर्माची संस्थापना करण्यासाठीं अवतार घेऊन कर्म करित असतो.'—हें सर्व—संमत आहे म्हणून, सत्कर्माचा त्याग केव्हांही करूं नये, अशी माझी त्यांस करद्वय जोडून विनंति आहे. असो. ॥ ८ ॥

---

या पुढील तीन मंत्रांत विद्या व अविद्या यांचें फल काय असतें तें सांगितलें आहे.

**अन्धं तमः प्रविशन्ति येऽविद्यामुपासते ॥**
**ततो भूय इव ते तमो य उ विद्यायाꣳ रताः ॥ ९ ॥**

**अन्वय व अर्थः**—**ये अविद्यां उपासते** (जे लोक अविद्येची मात्र उपासना करितात.)—**ते लोक—अन्धं तमः प्रविशन्ति** (अतिशय गाढ अंधकारामध्यें प्रवेश करितात.) **उ ये विद्यायां रताः** (पण जे विद्येमध्येंच रममाण होतात.) **ते ततः भूयः इव तमः** (ते लोक याच्यापेक्षांही अधिक निबिड अंधकारामध्यें जणुं प्रवेश करितात.)

सारांश, जे अविद्येच्या मात्र पाठीमागें लागले, जे अविद्येचें मात्र आराधन करितात. ते लोक जेथें कोणत्याही प्रकारचा प्रकाश नाहीं, ज्ञान नाहीं, व आनंद नाहीं, अशा लोकांमध्यें हे अविद्योपासक जाऊन पडतात; पण केवळ विद्येमध्येंच रंगून गेलेल्या पंडितंमन्यांची स्थिति याहूनही फारच भयंकर असते. ते लोक कल्पनेलाही अगोचर अशा अज्ञानी अंधकारामध्यें जाऊन पडतात. ॥ ९ ॥

---

**अन्यदेवाहुर्विद्ययाऽन्यदाहुरविद्यया ॥**
**इति शुश्रुम धीराणां ये नस्तद्विचचक्षिरे ॥ १० ॥**

**अन्वय व अर्थः**—**विद्यया अन्यत् एव आहुः** (विद्येच्या मात्र योगानें निराळें—फल मिळतें—असें म्हणतात.) **अविद्यया अन्यत् आहुः** (अविद्येनेंही निराळें—फल मिळतें—असें म्हणतात.) **ये तत् नः विचचक्षिरे** (ज्यांनीं आम्हांस परमार्थ—ज्ञान नीट समजावून दिलें)—**त्या—इति** (त्याप्रमाणें) **धीराणां शुश्रुम** (बुद्धिमान् पुरुषांपासून आम्हीं ऐकलें आहे.)

सारांश, केवळ विद्येचें फल निराळें व स्वतंत्र आहे. केवळ अविद्येचें फलही त्याप्रमाणेंच निराळें आणि स्वतंत्र असतें. ज्या महापुरुषांनीं आम्हांस

ब्रह्मज्ञानाचा स्पष्ट उपदेश केला, त्या बुद्धिमान् गुरुजींनीं आम्हांस विद्या व अविद्या यांचीं फलें निराळीं व स्वतंत्र असतात असें सांगितलें आहे. ॥ १० ॥

---

**विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोभयꣳसह ॥**
**अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते ॥ ११ ॥**

**अन्वय अर्थः—यः विद्यां च अविद्यां च उभयं सह तद् वेद स ह अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्यया अमृतं अश्नुते** ( ज्या पुरुषाला विद्या आणि अविद्या व उभयतांमध्यें संबंध जोडणारें तत्त्वज्ञान त्यांचें ज्ञान झालें, तो अविद्येच्या साहाय्यानें मृत्यूला ओलांडून जातो आणि विद्येनें अमृताचा आस्वाद घेतो. )

याप्रमाणें विद्या आणि अविद्या, यांचा स्वतंत्र विचार करणारे हे तीन मंत्र आहेत. अविद्या म्हणजे काय? असें पाहिलें असतां, 'अविद्या म्हणजे सकाम कर्म' असा अर्थ श्रुतीला मान्य आहे असें दिसतें. बृहदारण्यक, काठक, इत्यादि उपनिषदांत अविद्या हा शब्द आला आहे; आणि तेथें सकाम कर्म, बंध उत्पन्न करणारें कर्म, असाच अर्थ आहे; हें मागील पुढील संदर्भावरून स्पष्ट दिसतें. विद्या या शब्दाचा अर्थ उपासना किंवा ज्ञान असा इतरत्र आढळतो. येथेंही तिसऱ्या मंत्रांत आत्मघाती लोकांस, अन्धन्तम लोकांप्रत जावें लागतें व या मंत्रांत अविद्येच्या उपासकांस अन्धन्तमाची प्राप्ति होते, असें म्हटलें आहे. यावरून अविद्येचे उपासक, तेच आत्मघाती लोक होत असें दिसतें. आत्मस्वरूप न समजणारे, ते आत्मघाती होतात. निवळ सकामकर्माची उपासना करणारे लोक, आत्मस्वरूपाच्या ज्ञानासंबंधानें उदासीन असतात; इतकेंच नव्हे, तर ते आत्मज्ञानाचा तिरस्कारही करितात. अर्थातच तेही आत्मघाती झाले; याप्रमाणें सकामकर्म मात्र करून, आयुष्याचें 'सार्थक्य!' करणाऱ्या लोकांस असुर्यलोकाप्रत किंवा अज्ञानदशेप्रत जाऊन पोंहोचावें लागतें. म्हणजे जेथें ज्ञानाचें नांव नाहीं अशी जडस्थिति त्यांस प्राप्त होते. असुर्यलोकासच 'अनंद' म्हणजे 'आनंदशून्यप्रदेश' असें इतर ठिकाणीं म्हटलें आहे. सारांश, सकामकर्म करणारे लोकांस ज्ञान-शून्य, व आनंदशून्यस्थिति—केवल जडावस्था प्राप्त होते. याचप्रमाणें नुसत्या ज्ञानामध्यें किंवा उपासनेमध्यें मात्र जे रममाण होऊं लागले; ज्यांचें चित्त ज्ञानाच्या किंवा उपासनेच्या आनंदांतच रत होऊन, 'आपणच ज्ञानी, आपणच आनंदी, आपणच कृतकृत्य' असें भान झालें; आणि या मर्यादित, संकुचित अथवा परिच्छिन्न सुखीपणाचा ज्यांस अभिमान प्राप्त झाला; त्या लोकांची स्थिति शुद्ध

अज्ञानी, आत्मघाती अथवा संकामकर्म करणाऱ्या लोकांपेक्षांही ज्यास्त भयंकर होते. उपभोगाकरितां मात्र ज्ञान नाहीं, उपभोगाकरितां मात्र जन्म नाहीं, उपभोगाकरितां मात्र कर्म नाहीं, हें श्रुतीस एककंठानें सांगावयाचें आहे. यावरून एक वेळ सकामकर्माचा उपासकही बरा, असें म्हणावें लागेल! कारण, त्याला प्राप्त होणारी गति ज्ञानानंदशून्यत्वाची अथवा जडपणाची तरी असते. पण विद्येमध्यें म्हणजे ज्ञानामध्यें, अथवा उपासनेमध्यें मात्र ज्यांना सुख वाटूं लागलें, सारांश, ज्ञान असूनही जे बाह्य विषयांपासून सुख होतें, असें मानूं लागले, व ह्या सुखाचा ज्यांस अभिमान उत्पन्न झाला, त्यांची गति फारच भयंकर असते. कारण, त्यांची बाह्यविषयांची जाणीव कायम राहून, बाह्यविषयांचा म्हणजे सुख-दुःखाचा, अथवा संसाराचा त्यांस अनुभव घ्यावा लागतो; व ते अनन्तकालपर्यन्त तळमळतच राहतात.

श्रुतीला इष्ट गोष्ट ही आहे कीं प्रत्येक जीवानें आपलें चित्त आधीं शुद्ध करून घ्यावें. ही चित्तशुद्धि निष्काम कर्मानें व निष्काम उपासनेनें मात्र साध्य आहे. चित्तशुद्धि झाल्यावर ब्रह्मज्ञान संपादून ब्रह्म व्हावें जीवानें कोठेंही, कसलाही, अभिमान धरतां उपयोगी नाहीं. आत्मेतर विषयाचा व आत्म्याचा सुद्धां-अभिमान धरितां उपयोगी नाहीं. हाच जीवाचा महाघातक शत्रु आहे. तसेंच जीवानें भोगदृष्टीनें कोठेंही रममाण होतां उपयोगी नाहीं. सुखोपभोग हाही घातक शत्रु आहे. हा तीचा उपदेश आहे.

हा माझा अर्थ बरोबर असेल तर वरील तीन मंत्रांचा अर्थ माझ्या समजुतीनें असा होतो. अविद्येचे उपासक थोर यातना भोगतात तर विद्येचे भोक्ते घोरतर अनर्थामध्यें सांपडतात. विद्या आणि अविद्या यांचें प्रत्येकीं फल फार निराळें आहे. या दोहींची संगति झाली, विद्या आणि अविद्या या उभयतांचें स्वरूप जीवास समजून त्यांनीं तत्त्वज्ञान अभ्यासिलें, तर अविद्येच्या योगानें म्हणजे सकाम कर्माच्या योगानें प्राप्त होणारा संसार किंवा जड स्थिति यांचे स्वरूपज्ञान जीवाला होऊन तो जीव मृत्युसागर तरून जातो म्हणजे आपल्या सकाम कर्माला निष्कामत्व देऊन चित्तशुद्धि करून घेतो. ही झाल्यावर म्हणजे वासना आणि अभिमान नाहींशी झाल्यावर जीवाच्या हातून जें कर्म होतें तें त्याला बद्धक होत नाहीं, एवढेंच नव्हे, तर तें स्वतःचा व इतरांचा उद्धार करणारें असें होतें. विद्येसह अविद्येची (उपासनाज्ञानासह कर्मज्ञानाची) संगति असली व उभयतांचा संगम तत्त्वज्ञानाचे घरीं झाला म्हणजे कर्मालाही ज्ञानस्वरूप प्राप्त होतें. याप्रमाणें स्वतःच्या विषयसुखाविषयीं, स्वतःच्या ज्ञानाविषयीं, आणि स्वतःच्या जीवित्वाविषयीं उदासीन झालेला निर्मल मनाचा पुरुष तत्त्वज्ञानाचा (आत्मविद्येचा अथवा ब्रह्मविद्येचा) अभ्यास करूं लागला म्हणजे त्याचें अस्तित्व, त्याचें ज्ञान आणि त्याचा आनंद हीं सर्व समाजाच्या, राष्ट्रांच्या व विश्वाच्या

अस्तित्वास, ज्ञानास आणि आनंदास उत्तेजित करितात म्हणूनच येथील अकराव्या मंत्रांत श्रुतीनें सांगितलें आहे कीं विद्येनें, अविद्येच्या स्वरूपज्ञानासह स्थित असणाऱ्या विद्येनें, ( उपासनाज्ञानानें ) जीवाला अमृतत्व प्राप्त होतें. म्हणून मला असें वाटतें कीं निवळ अविद्या किंवा केवळ विद्या या एकेकीच्या ज्ञानाचा बिलकुल उपयोग नाहीं; किंबहुना, हें एकदेशी ज्ञान अनर्थाला मात्र कारण होतें. म्हणून प्रत्येकानें सकाम कर्मज्ञानांतच लिप्त न होतां किंवा नुसत्या ज्ञानांत, चित्तशुद्धि झाल्याशिवाय व ज्ञानाच्या शब्दावडंबरांत गुंतून न पडतां उभयतांचा, ही म्हणजे विद्या व अविद्या यांचा अधिगम करून घ्यावा आणि तत्त्वज्ञानानें उभयतांचा संधि करावा. कर्म-प्रेरक वासना आणि अभिमान यांचा त्याग करून निर्मलचित्त व्हावें, म्हणजे त्याच्या हातून सहज वृत्तीनें परोपकारी कर्म, परोपकारी उपासना तसेंच परोपकारी ज्ञानार्जन आणि कार्यकारी ब्रह्मज्ञान यांचा संगम होऊन स्वतःच्या बरोबरच स्वतःच्या राष्ट्राचा व स्वतःच्या विश्वाचा बंधमोक्ष होण्याचें कार्य हा पुरुष सौकर्यानें करील. ॥ ११ ॥

---

या पुढील तीन मंत्रांत संभूति व असंभूति या द्वयीचा वरील मंत्रत्रयींत केलेल्या विचाराप्रमाणेंच उपदेश आहे.

**अन्धं तमः प्रविशन्ति येऽसंभूतिमुपासते ॥**
**ततो भूय इव ते तमो य उ संभूत्याꣳ रताः ॥ १२ ॥**

**अन्वय व अर्थः—ये असंभूतिं उपासते** ( जे असंभूतीची—जी कधींही उत्पन्नच झाली नाहीं त्या मूलप्रकृतीची म्हणजे अस्तित्वांत असणाऱ्या आदिमायेची—उपासना करितात. )—ते लोक—**अन्धंतमः प्रविशन्ति** ( गाढ अंधकारी प्रदेशामध्यें जाऊन पडतात. ) **उ ये संभूत्यां रताः ते भूयः इव तमः** ( पण जे लोक संभूतीमध्यें मात्र—या उत्पन्न होऊन दृश्य असणाऱ्या सृष्टीमध्यें मात्र—रममाण होतात, ते पूर्वोक्त अंध प्रदेशापेक्षांही जास्त निबिड, अप्रकाशितप्रदेशांत जाऊन पडतात.

सारांश, जे लोक मूळ प्रकृतीची अथवा आदि मायेची उपासना करितात, ते ज्ञानशून्य व आनंदशून्य स्थिति प्राप्त करून घेतात; पण जे या दृश्य सृष्टीमध्यें रममाण होतात, ते वरीलपेक्षांही जास्त भयंकर स्थितीमध्यें जातात. ॥ १२ ॥

**अन्यदेवाहुः संभवादन्यदाहुरसंभवात् ॥**
**इति शुश्रुम धीराणां ये नस्तद्विचचक्षिरे ॥ १३ ॥**

**अन्वय व अर्थः**—**संभवात् अन्यत् एव आहुः** ( संभवाहून निराळेंच आहे असें म्हणतात. ) **असंभवात् अन्यत् आहुः** ( असंभवाहून हीं निराळें आहे असें म्हणतात. ) **ये नः तत् विचचक्षिरे** ( ज्यानीं आम्हांस तत्त्वज्ञान समजून दिलें) **इति धीराणां शुश्रुम** (याप्रमाणें आम्हीं त्या विद्वान् गुरूजींकडून ऐकलें आहे. )

सारांश, मुख्य तत्त्वज्ञान हें दृश्य सृष्टीहून निराळें आहे, तसेंच मूलप्रकृतीच्या ज्ञानाहून किंवा आदिमायेच्या ज्ञानाहूनही निराळें आहे, असें आम्हीं विद्वान् व अधिकारी तत्त्वोपदेशकांकडून ऐकलें आहे. त्यांचा उपदेश हा आहे कीं तत्त्वज्ञान हवें असेल तर तें नुसत्या दृश्य सृष्टीच्या आनंदामध्यें किंवा मूलप्रकृतीच्या उपासनेमध्यें सांपडावयाचें नाहीं. ॥ १३ ॥

---

**संभूतिं च विनाशं च यस्तद्वेदोभयꣳ सह ॥**
**विनाशेन मृत्युं तीर्त्वा संभूत्याऽमृतमश्नुते ॥ १४ ॥**

**अन्वय व अर्थः**—**ये संभूतिं च विनाशं च उभयं सह तत् वेद** ( ज्याला संभूति–सृष्टि–व विनाश–सर्वांचे नाशकारण जी आदिमाया ती–या उभयतांच्या ज्ञानासह तत्त्व–ज्ञान झालें.)–तो–**विनाशेन मृत्युं तीर्त्वा** ( विनाशाच्या, नाशकारणाच्या ज्ञानानें मृत्यूचें अतिक्रमण करून ) **संभूत्या अमृतं अश्नुते** ( सृष्टीच्या ज्ञानानें अमृत स्वरूप होतो. )

सारांश उघड आहे कीं मूल प्रकृतीचें व दृश्य सृष्टीचे ( विराट् स्वरूपाचें ) ज्ञान होऊन ब्रह्मज्ञान झालेला मनुष्य मृत्यूला मारून आपण ब्रह्मस्वरूप होतो.

हे तीन मंत्र ज्ञानासंबंधानें आहेत असें मला वाटतें. केवळ प्रकृतीचीच उपासना केली म्हणजे ह्या दृश्य सृष्टीचें मूळ कारण काय आहे, हें स्वतःच्याच बुद्धीनें शोधित गेलें म्हणजे ब्रह्मस्वरूपाचा शोध लागतो असें होत नाहीं. फार काय ? पण या असल्या अव्यक्ताची उपासना करणाऱ्या श्रुतिबाह्य कल्पनांनीं जीवास महान् संकटें मात्र भोगावीं लागतात. पण जे लोक या दृश्य जगाचाच शोध करीत राहून त्यामध्येंच आपल्यास धन्य मानून घेतात, त्या लोकांची स्थिति जास्तच भयंकर होते. अव्यक्ताचा शोध

करणारे लोक निदान 'आम्हांस कांहीं समजत नाहीं.' अशी भावना धरून विनयशील तरी राहण्याचा संभव आहे; पण 'जें दिसतें आहे; जी सृष्टि आपल्या इंद्रियादिकांस गोचर आहे, तेवढेंच काय तें विश्व आहे; या विश्वाचें ज्ञान आम्हांस झालें. आम्ही धन्य आहों.' असा ज्ञानाचा अभिमान धरून जे लोक उन्मत्त होतात व या दृश्य सृष्टीच्या उपभोगामध्येंच जे रममाण होतात, त्यांची स्थिति अर्थातच अत्यंत भयप्रद असते. आपल्या मानवी बुद्धीच्या कुशाग्रतेवर श्रद्धा ठेवून अव्यक्ताचा शोध कितीही दीर्घ प्रयत्न करून केला तरी, त्याला श्रुतीचें साहाय्य नसेल तर ते शोध व या शोधांपासून निर्माण झालेलें निश्चित ज्ञान हीं नेहमीं मर्यादित म्हणून अनिश्चितच राहणार; पण दृश्य सृष्टीच्या पलीकडे कांहीं नाहीं, अशी समजूत करून घेणारा जीव अभिमानानें घेरून टाकला म्हणजे त्याच्या ज्ञानाची मर्यादा अत्यंतच संकुचित होते. या उन्मत्त लोकांस अव्यक्तोपासकांपेक्षां जास्त अज्ञान असतें आणि शिवाय अभिमानासह अज्ञान मात्र पदरीं पडतें. श्रुतीस असें सांगावयाचें आहे कीं, अव्यक्ताचें ज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान नव्हे, तसेंच व्यक्त सृष्टीचें ज्ञानही ब्रह्मज्ञान नव्हे; तें या उभय ज्ञानांहून अतिशय निराळें आहे. ब्रह्मज्ञान होण्याला श्रुतीचें बल तर अवश्य हवेंच, पण श्रुतिज्ञानाबरोबरच अव्यक्त व व्यक्त सृष्टींचेंही ज्ञान जीवांनीं करून घेतलें पाहिजे.

हा असा बोध आपल्या पूर्वपूर्वजांस होता, म्हणून ऋषिकालांत अव्यक्त सृष्टीसंबंधीं व व्यक्त सृष्टीसंबंधीं अनेक शास्त्रें श्रुतिबलानें त्यांस निर्माण करितां आलीं. त्यांस श्रुतिबलाचें साहाय्य होतें म्हणून 'सृष्टीच्या बाल्यावस्थेमध्येंही' त्यांचें शील अति उत्तम होतें, त्यांचें कर्म परोपकारी असे आणि त्यांचें ज्ञान ब्रह्मस्वरूप उघड करणारें असे.

प्रस्तुत काळीं पाश्चात्य देशांत अव्यक्ताची उपासना करणारे मोठमोठे तपस्वी आहेत, व्यक्त सृष्टीच्या पलीकडे कोणकोणतीं सामर्थ्यें आहेत, यांचा त्यांनीं झपाट्यानें शोध चालविला आहे, हें खरें. ही गोष्ट वरील लोकांस भूषणास्पद आहे यांत शंका नाहीं. तसेंच, दृश्य सृष्टीमध्यें काय काय चमत्कार आहेत त्यांचाही शोध लावणारे पुष्कळ विद्वान् आज भित्तीला विद्यमान आहेत. यांच्याही शोधांनीं जगांतील लोकांची जीवनयात्रा सुखकर होण्याचा संभव आहे. मात्र माझ्या दृष्टीला एक उणीव दिसत आहे. ती ही कीं ब्रह्मज्ञानाचा (श्रुतीचा अनुवाद करणाऱ्या ब्रह्मज्ञान-विज्ञानाचा) जसा तिकडील लोकांस परिचय असणें अवश्य आहे, तसा तो नाहीं, असें मला वाटतें. म्हणून हल्लीं पाश्चात्य देशांत अव्यक्तासंबंधानें व व्यक्तासंबंधानें जें नवीन नवीन ज्ञान प्राप्त होत आहे, या जगांतील विषय-सुखाच्या नवीन कल्पना व नवीन साधनें निर्माण होत आहेत, त्या नवीन शोधांनीं, नवीन कल्पनांनीं आणि नवीन साधनांनीं सुख वाढूनही तृप्ति आणि समाधान यांचें वास्तव्य नाहींसें झालें आहे! सर्वत्र सर्व समाज ऐहिक सुखाच्या व कांहीं अंशीं मात्र पारमार्थिक सुखाच्या पाठीमागें एकसारखा धांवत असल्यामुळें

त्याला स्वरूपाची आणि जीवाच्या अत्यंत इष्टतम पुरुषार्थाची कल्पनाच नाहींशी, निदान विसरलीशी, झाली आहे. सारांश, माझ्या समजुतीनें हा एकदेशी प्रकार आहे. आमच्या इकडे म्हणजे पौरस्त्य राष्ट्रांत उलट प्रकार झाला आहे. म्हणजे तत्त्वज्ञानाचा, ह्या मंत्रांतील संभूति व असंभूतींच्या (अव्यक्त-शोधक आणि व्यक्त-प्रबोधक शास्त्रांच्या) ज्ञानांचा विचार न करणाऱ्या तत्त्वज्ञानाचा मात्र परिपोष झाल्यामुळें आमचें सृष्टिज्ञान-विज्ञान हजार पांचशें वर्षांपाठीमागील काळांतील असल्यासारखें झालें आहे. आमच्या कल्पना, आमची राहणी, आमचें शील, हीं सर्व साधीं भोळीं, कोठेंही फारशी गुंतागुंत नसणारीं अशीं आहेत खरीं; पण जीवनकलहाच्या दारुण संग्रामांत यांचा काय उपयोग होणार? इष्ट परिणाम हा असावा कीं, समाजामध्यें विचाराचा दम पाहिजे; संकटाशीं टक्कर देण्याचें सामर्थ्य पाहिजे; कठिण प्रसंगीं आपलें शील निर्मल ठेवण्याचें धैर्य पाहिजे. सारांश, ज्ञानपोषक, समाजसंरक्षक आणि शील-सुधारक अशा कल्पनांचा व साधनांच्या ज्ञानाचा आमच्या इकडे प्रायः अभाव असल्यामुळें आमची समाज-रचना विस्कळितच आहे असें म्हटलें पाहिजे. शिवाय, पाश्चात्य लोकांस जीं ज्ञानसाधनें व सुखसाधनें उपलब्ध झालीं आहेत तीं आपल्या येथें नाहींत म्हणून असंतुष्टता आणि असमाधान यांचेंही बिऱ्हाड आमच्या येथें आलें आहे! हा परिणाम अव्यक्त आणि व्यक्त शास्त्रांकडे दुर्लक्ष केलें म्हणून झाला असें म्हणण्यास मला हरकत वाटत नाहीं.

याप्रमाणें पाश्चात्य राष्ट्रांत व्यक्ताव्यक्त ज्ञानाचें ग्रंथ प्रामाणिक तत्त्वज्ञानाशिवाय वाढलें, म्हणून तिकडे अतृप्ति व असमाधान आहेत. आणि आमच्याइकडे व्यक्ताव्यक्त शास्त्रांच्या ज्ञानाशिवाय केवळ तत्त्वज्ञानाची "पोपटपंची" झाली म्हणून ज्ञानाचें दारिद्र्य, संपत्तीचें दारिद्र्य व कर्म-दारिद्र्य प्राप्त होऊन असंतोष आणि असमाधान यांचें साम्राज्य झालें आहे. श्रुतीला दोन्हींही प्रकार अनिष्ट आहेत. तिचें आग्रहपूर्वक सांगणें हें आहे कीं, मृत्यूचें अतिक्रमण करून अमरत्व संपादन करावयाचें असेल तर व्यक्तीनें आणि राष्ट्रानें तत्त्वज्ञानाच्या प्रबोधासह विद्या आणि अविद्या (कर्म आणि उपासना) यांचें संपादन केलें पाहिजे आणि ह्याचप्रमाणें तत्त्वज्ञानाच्या प्रबोधासह व्यक्ताव्यक्त शास्त्रांचा अभ्यास केला पाहिजे. याचप्रमाणें श्रद्धा आणि विचार यांचेंही समीकरण योग्य रीतीनें घडवून आणलें पाहिजे. श्रद्धेविरहित असणारा विचार नास्तिकवृत्तीनें असमाधान उत्पन्न करितो, तर विचारशून्य भोळी श्रद्धा, अतृप्ति उत्पन्न करिते. उपासनेनें श्रद्धा वाढते व व्यक्ताव्यक्तांच्या ज्ञानानें विचारबल वाढतें. असो, अशा या दोन जोड्यांचा लाभ सर्वांनीं करून घेतला तर सर्वांचेंच सर्व रीतीनें कल्याण होणार आहे. ॥ १४ ॥

यापुढील सर्व मंत्र प्रार्थनापर आहेत. हेंच प्रार्थनापर मंत्रचतुष्टय बृहदारण्यकाच्या पांचव्या अध्यायांत पंधराव्या ब्राह्मणामध्येंही आहे. या प्रार्थनेंतही श्रद्धा आणि विचार यांचें प्रबल समीकरण दृश्य होतें. हें कसें तें आपण पाहूं.

**हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम् ॥**
**तत्त्वं पूषन्नपावृणु सत्यधर्माय दृष्टये ॥ १५ ॥**

**अन्वय व अर्थ**—**हिरण्मयेन पात्रेण सत्यस्य मुखं अपिहितं** (सुवर्णाच्या पात्रानें सत्यस्वरूपाचें मुख अपिहित म्हणजे आवृत, आच्छादित झालें आहे.) **पूषन्** (हे सर्वपोषक ईश्वरा!) **सत्यधर्माय दृष्टये** (सत्य असा जो धर्म याचें ज्ञान स्पष्ट होण्यासाठीं) **तत् त्वं अपावृणु** (तें मुख तूं उघडें कर, प्रकट कर.)

सारांश, सर्वांचें पोषण करणाऱ्या व सर्व ज्ञान-शास्त्राचें व पुरुषार्थसाधनांचें पोषण करणाऱ्या देवा! सत्याचें स्वरूप हें सुंदर आणि रमणीय अशा असत्यानें (मायेनें, अज्ञानानें.) झांकून टाकिलें आहे. हे देवा! तें झांकण तूं काढून टाक आणि सत्य व धर्म यांचें ज्ञान मला पूर्णतर होईल, असें आपलें सत्स्वरूप तूं प्रकट कर.

या मंत्रांतील प्रार्थना खऱ्या ज्ञानाविषयींची आहे. अज्ञानाचा व अधर्माचा नाश व्हावा आणि ज्ञानाचा व धर्माचा विस्तार व्हावा एतदर्थ ही प्रार्थना आहे. ॥१५॥

---

**पूषन्नेकर्षे यम सूर्य प्राजा-**
**पत्य व्यूह रश्मीन्समूह ।**
**तेजो यत्ते रूपं कल्याणतमं तत्ते**
**पश्यामि योऽसावसौ पुरुषः सोऽहमस्मि ॥ १६ ॥**

**अन्वय व अर्थ**—**पूषन् एकर्षे यम सूर्य प्राजापत्य रश्मीन्व्यूह तेजः समूह** (हे पूषन्! एकर्षे!—सर्वज्ञा! यम!—सर्व नियामक देवा! सूर्य!—सर्व—प्रवर्तक ईश्वरा! प्राजापत्य!—प्रजांचें पालन करणाऱ्या परमेश्वरा!—आपले ज्ञानकिरण व प्रसादकिरण आपण व्यवस्थित करा आणि आपलें तेज एकवट करा.) **यत् ते कल्याणतमं रूपं** (जें आपलें अत्यंत कल्याण करणारें सत्यस्वरूप आहे.) **ते तत् पश्यामि** (तें तुझें स्वरूप मी पाहतों, पाहणार आहें.) **यः असौ पुरुषः सः अहं अस्मि** (जो तो पुरुष आहे तो मी आहें.)

सारांश, हे सर्वपोषक, सर्वज्ञ, सर्वनियामक, सर्वप्रवर्तक आणि सर्व-पालक परमेश्वरा! आपले ज्ञानकिरण आणि प्रसादकिरण अशा रीतीनें व्यवस्थित करा. तसेंच, आपलें तेज अशा रीतीनें एकवट करा कीं, ज्याच्या योगानें आपलें जें अतिमंगल सत्स्वरूप आहे, त्याचें मला यथार्थ दर्शन होईल. माझा असा निश्चय आहे, माझी अशी श्रद्धा आहे कीं, आपण परमात्म-स्वरूपानें माझ्या अंतर्यामी वास्तव्य करीत आहांत. माझें आत्मस्वरूप व आपलें आत्मस्वरूप परमार्थतः एकच आहे. तो अत्यंत दूरचा दिसणारा परमात्मा माझा अत्यंत निकटवर्ती आहे, म्हणजे तोच मी आहें!

येथें अद्वैत सिद्धान्ताचा पूर्ण व स्पष्ट उच्चार आहे, असें मला वाटतें. अज्ञानाचा पडदा नाहींसा झाल्यावर परमेश्वराचें जें सत्स्वरूप, निर्मलचित्त झालेल्या पुरुषास श्रुतिज्ञानानें समजतें व उमजतें, तेंच जीवाचेंही सत्स्वरूप आहे असा त्याचा निश्चय होतो, हें येथें सांगितलें आहे. तसेंच ज्ञान झालें तरी विज्ञान होण्याला परमेश्वरी प्रसादाची आवश्यकता आहे, असें मागील मंत्राप्रमाणें येथेंही सांगितलें आहे. ॥ १६ ॥

---

**वायुरनिलममृतमथेदं भस्मान्तꣳ शरीरम् ॥**
**ॐ क्रतो स्मर कृतꣳ स्मर क्रतो स्मर कृतꣳ स्मर ॥ १७ ॥**

अन्वय व अर्थ—वायुः अनिलं अमृतं (प्राण वायु हा कधींही नाश न पावणारा महावायु आहे.) अथ इदं शरीरं भस्मान्तं (आणि हें शरीर भस्म होऊन जाणारें आहे.) ॐ क्रतो स्मर (हे यज्ञस्वरूपी ॐ परमेश्वरा! असें स्मरण आपल्यास असूं द्या.) कृतं स्मर (मी जें काय केलें आहे त्याचें स्मरण असूं द्या.)—ह्याच शब्दाचा उच्चार पुनः एकदां आदरपूर्वक केला आहे.

सारांश, भक्ताचें म्हणणें असें आहे कीं, प्राणरूप वायु म्हणजे चैतन्य अविनाशी आहे. आणि शरीर म्हणजे दृश्य जगत् विनाशी आहे. म्हणून तो यज्ञस्वरूपी परमेश्वराची प्रार्थना करितो कीं, 'माझें स्मरण आपल्यास असूं द्या आणि मी काय जीं सत्कृत्यें केलीं असतील यांचेंही स्मरण असूं द्या, माझें शरीर व मीं ईश्वरार्पण केलेलें सदसत्कर्म यांचा तर नाश होणारच आहे. पण ज्या ज्ञानानें व चित्तवृत्तीनें अथवा ज्या आत्मिक वृत्तीनें मी वागलों आहें, त्याचें स्मरण ठेवून माझ्यावर अनुग्रह करा आणि माझी आत्मिक वृत्ति जास्त संस्कृत होत जाईल, असें मला दान द्या. ॥ १७ ॥

**अग्ने नय सुपथा राये अस्मान्वि-**
**श्वानि देव वयुनानि विद्वान् ॥**
**युयोध्यस्मज्जुहुराणमेनो**
**भूयिष्ठां ते नमउक्तिं विधेम ॥ १८ ॥**

**अन्वय व अर्थ**—**अग्ने देव विश्वानि वयुनानि विद्वान्** (हे अग्ने, हे प्रकाशस्वरूपी देवा! आमचीं कर्में आणि आमचें ज्ञान, जाणणारा तूं आहेस.) **सुपथा राये अस्मान् नय** (सुखकर मार्गानें आम्हांस सत्स्वरूपाकडे घेऊन जा.) **अस्मत् जुहुराणं एनः युयोधि** (आमची आत्मिक योग्यता कमी करणारें जें पातक आहे, त्याचा नाश कर.) **"ते नमः"—इति—भूयिष्ठां उक्तिं विधेम** ("आपल्याला नमस्कार करितों" असा पुष्कळ वेळ उच्चार मी करीत आहें.)

सारांश, आमच्या पातकांचा नाश करून हे सर्वज्ञ देवा! तूं आम्हांस सन्मार्गानें नेऊन सत्स्वरूप दाखीव; पण अगोदर आमची योग्यता कमी करणारीं जीं काय कर्में आम्हीं केलीं असतील, त्यांचा नाश हे सर्वज्ञ व दयाघन परमेश्वरा! आपण करावा. आम्ही आपल्यास नमस्कार करून वरील प्रार्थना मोठ्या आनंदानें अनेक वेळ करितों. ॥ १८ ॥

---

या मंत्रचतुष्टयांतील प्रार्थना अंतकालच्या समयीं, मुमुक्षूनें केली आहे असें दिसतें. हें दृश्य शरीर आणि दृश्य विश्व हीं सत्स्वरूपाचें आवरण करितात, म्हणून यांचा नाश व्हावा अशी अग्निआदिरूपानें परमेश्वरस्वरूपाची ही प्रार्थना आहे. ही प्रार्थना करतेवेळीं मुमुक्षूस विदित असतें कीं, परलोकास जाण्याचें देवयान आणि पितृयान असे दोन मार्ग आहेत. देवयानानें गेलें असतां सूर्य लोकाची प्राप्ति होऊन पुढें ईश्वरानुग्रह होतो, मुक्ति मिळते आणि जन्ममरण संपतें. आणि पितृयान मार्गानें गेलें असतां पितृलोकाची व चंद्रलोकाची प्राप्ति होते पण जन्ममरण संपत नाहीं; अशी जाणीव मुमूर्षु (मरणाची इच्छा करणाऱ्या) भक्तास आहे. असें 'सुपथा' 'जुहुराणं' इत्यादि शब्दांवरून समजतें. सुपथ म्हणजे चांगला मार्ग, शोभिवंत मार्ग, प्रकाश आहे असा मार्ग होय. देवयान मार्ग हा सुप्रकाशित असतो असा वैदिक सिद्धान्त आहे. यावरून सुपथ म्हणजे देवयानमार्गच अभिप्रेत असावा. तसेंच, 'जुहुराण' या शब्दाचा अर्थ 'चंद्र' असा आहे. चंद्र हा क्षय-वृद्धि पावणारा तेजो-गोल आहे आणि पितृलोकास गेल्यानंतर चंद्रलोकाची प्राप्ति होते, असाही वैदिक सिद्धान्त आहे. तसेंच, निष्काम कर्म करणारा जीव देवयानमार्गानें जातो आणि सकाम

कर्म करणारा जीव पितृयान मार्गानें जातो, असाही सिद्धान्त आहे. 'अठराव्या मंत्रांत 'एनः' हा शब्द 'जुहुराणं' या विशेषणानें अन्वित झाला आहे. योग्यता कमी करणारें पाप असा या दोन शब्दांचा अर्थ होतो. कर्म पुण्यप्रद असो वा पापप्रद असो, तें सकाम असेल तर जीवाची आत्मिक योग्यता कमी करणारें असतें. यावरूनच 'जुहुराणं एनः' हे शब्द पितृयान मार्गाचे दर्शक आहेत, असा स्पष्ट बोध होतो. असो, ही प्रार्थना मरणाऱ्या भक्ताची आहे–आणि 'मला देवयान मार्गानें न्या' असें त्याचें मागणें आहे. सारांश, श्रद्धापूर्वक व विचार-पूर्वक उपासना केली म्हणजे आत्मज्ञानाचा साक्षात्कार होतो, असा आशय आहे. श्रद्धा व विचार यांचें समीकरण असणें सर्वथा उपपन्नच आहे.

या उपनिषदांत तत्त्वज्ञान हा मुख्य विषय आहे, तथापि या विषयाच्या परिपोषासाठीं निष्काम कर्म, सकाम कर्म, हीं कर्में करणाऱ्या पुरुषांची स्थिति, ब्रह्मस्वरूप, निवळ कर्माची, निवळ उपासनेची, तसेंच निवळ अव्यक्त ज्ञानाची व निवळ दृश्य पदार्थविज्ञानाची निंदा, तत्त्वज्ञानाची आवश्यकता आणि परमेश्वरी प्रसादाची तीव्र अपेक्षा इत्यादि गोष्टींचा सिद्धान्तरूपानें विचार करून विषयाची पूर्तता केली आहे.

ह्या उपनिषदाचा भावार्थ मी होतांहोईल तितक्या पूर्वग्रहशून्यत्वानें लिहिला आहे. विश्वज्ञान व अव्यक्तज्ञान वाढवून निष्काम कर्म व उपासना हीं अमर्याद पुष्ट करावयाचीं आणि या उभयतांस तत्त्वज्ञानाचें नियमन लावून सर्वत्र ज्ञान, शांति, सच्छील आणि सत्सुख यांची वृद्धि करणारें ज्ञान मुमुक्षूंस द्यावयाचें, असा 'ईशावास्यादि'* मंत्रांचा अभिप्राय आहे, असें मला दिसतें.

॥ ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

ॐतत्सत्.

---

* 'ईश, केन व कठ हीं उपनिषदें भाष्यभाषान्तरांसह सिद्ध झालीं म्हणजे प्राचीन ग्रीक व अर्वाचीन कँट आदि तत्त्वज्ञांचे विचार देणार आहें. हे विचार समजले म्हणजे उपनिषत्कालीन तत्त्वविचार किती प्रगल्भ व सत्यरूप होते, आहेत व असतील, याचें तारतम्य अधिकारी वाचकांस सहज कळेल.

ॐ

# केनोपनिषत्

चिंतामण गंगाधर भानु

कृत

महाराष्ट्र विवरणम्

विज्ञान झाल्यानंतर अथवा साक्षात्कार झाल्यानंतर ते अमर होतात, हें सांगावयासही नको. अमृतत्व हवें असेल त्या पुरुषानें ह्या लोकांतील जडवस्तूंचा उपभोग-दृष्टीनें सर्वथा त्याग केला पाहिजे; आणि ज्ञान-कर्मेंद्रियांचें पूर्ण ज्ञान करून घेऊन त्यांचा जो नियंता आहे, त्याचेंही ज्ञान-विज्ञान करून घेतलें पाहिजे. हें ज्ञान-विज्ञान झालें म्हणजे मोक्ष मिळतो. ॥ २ ॥

---

## मंत्र तिसरा.

**अन्वय व अर्थ**—**तत्र चक्षुः न गच्छति, वाक् न गच्छति, न मनः** ( तेथें नेत्र जात नाहीं, वाणी जात नाहीं, आणि मनही जात नाहीं ) **न विद्मः यथा एतत् अनुशिष्यात् न विजानीमः** ( आम्हांला ब्रह्म विदित नाहीं व शिष्याला कसें समजून सांगावें, हेंही आम्हांला माहीत नाहीं) **तत् विदितात् अन्यत् एव, अथ अविदितात् अधि** ( तें ज्ञात वस्तूंहून भिन्न आहे आणि अज्ञातवस्तूंहूनही भिन्न आहे; तें सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहे. ) **इति ये नः तत् व्याचचक्षिरे शुश्रुम** ( याप्रमाणें पूर्व-संप्रदाय जाणणाऱ्या ज्या पंडितांनीं आम्हांकरितां स्वस्वरूपाचें विवेचन केलें त्यांपासून आम्हीं ऐकिलें आहे. )

सारांश, या ब्रह्मवस्तूचे ठिकाणीं नेत्र, वाणी, अथवा मन म्हणजे कर्मेंद्रियें, ज्ञानेंद्रियें आणि त्या सर्वांचें नियंत्रण करणारें मन, यांस जातां येत नाहीं. म्हणून ब्रह्मवस्तु काय आहे हें समजत नाहीं, किंवा दुसऱ्यांसही समजून देतां येत नाहीं. ही वस्तु ज्या सर्व ज्ञात आणि ज्ञेय वस्तू आहेत त्यांहून निराळी आहे. तसेंच ज्या अज्ञात आणि अज्ञेय वस्तु आहेत, त्यांहूनही ही वस्तु निराळी आहे. ही वस्तु सर्वश्रेष्ठ आहे. असा पूर्वसंप्रदायानुरूप आमच्या गुरुजींनीं आम्हांस उपदेश केला आहे, असें आचार्य म्हणतात.

या मंत्रांत ब्रह्मवस्तूचें स्वरूप समजणें किती कठिण आहे, नव्हे, किती असाध्य आहे, हें सांगितलें आहे. मागच्या मंत्रांत सर्व इंद्रिय-प्रवर्तक जो परमात्मा आहे म्हणून सांगितलें, तसेंच, जो इंद्रियांचें इंद्रिय, प्राणांचा प्राण व मनाचें मन म्हणून सांगितलें, त्या परमात्म्याचें वर्णन येथें आहे. ही वस्तु किंवा हा परमात्मा नेत्रांस दिसावयाचा नाहीं, वाणीला त्याचा उच्चार करितां यावयाचा नाहीं आणि मनानें त्याचा संकल्पही करितां यावयाचा नाहीं, अशा स्वरूपाचा आहे. सारांश, हा नामरूपांच्या कक्षेबाहेरचा असून त्यांचा नियंता आहे. आणि म्हणूनच मागील मंत्रांत त्याला इंद्रियांचें इंद्रिय, व मनाचें मन म्हणून संबोधिलें आहे. हा बुद्धीलाही अगोचर आहे. सामान्यतः बुद्धीला

मनाच्या सहायानें इंद्रियद्वारा बाह्य विषयांचें ज्ञान होतें. पण येथें सांगितलें आहे कीं, ब्रह्मवस्तूचें स्थान मनाला अगोचर आहे व इंद्रियांसही अगोचर आहे. जी वस्तु इंद्रियांस ग्रहण करितां येत नाहीं; जेथें इंद्रियांची धांव पोहोंचत नाहीं, ती वस्तु मनालाही ग्रहण करितां येत नाहीं. इंद्रियांचा स्वतंत्रतेनें बाह्य-विषयांच्या रूप-रंगाशीं संबंध झाला म्हणजे आपलें मन रूपरंगादि विषयांच्या गुणधर्मांचें ग्रहण करितें. याचप्रमाणें अंतःकरणामध्यें जे सुख दुःखादि विकार उत्पन्न होतात, त्यांचेंही ग्रहण मनाला करितां येतें. पण ज्या सर्वप्रवर्तक ब्रह्मवस्तूचा आपण शोध करीत आहोंत, ती वस्तू रूपरंगादि गुणधर्मांनीं वियुक्त आहे. तसेंच सुखदुःखादि विकारांनींही ती वस्तु वियुक्त आहे. अर्थातच अशा गुणधर्म-वियुक्त आणि विकारशून्य वस्तूचें मनाला ग्रहण करितां येत नाहीं. असो. जी वस्तू मनाला अग्राह्य किंवा अगोचर आहे ती बुद्धीलाही अग्राह्य आणि अगोचर अशीच असणार. समजणें हा धर्म बुद्धीचा आहे, मनानें ग्रहण केलेल्या वस्तूचा बुद्धि निश्चय करिते. तेव्हां मनालाच जें अग्राह्य तें बुद्धीला समजत नाहीं, हें उघड आहे. याप्रमाणें ही ब्रह्मवस्तु इंद्रियांस मनास व बुद्धीस अगोचर आहे, असें ठरलें.

अशा जीवाच्या सर्व ज्ञानसाधनास अग्राह्य असणाऱ्या वस्तूचा उपदेश करितां येणें अशक्य आहे असें जे मंत्रांत सांगितलें आहे तें सर्वथा युक्तच आहे. जी गोष्ट आपणा स्वतःस समजली नाहीं किंवा समजणें शक्य नाहीं त्या वस्तूचा उपदेश दुसऱ्याला करितां यावयाचा नाहीं, हें सांगण्याचीही आवश्यकता नाहीं. याप्रमाणें ब्रह्मवस्तु समजून घेणें व समजून देणें ह्या गोष्टी अशक्य आहेत, असें श्रुतीनें ठरविलें आहे.

अनादि कालापासून वेदाची अशी वास्तविक संप्रदाय-परंपरा रूढ होत आली आहे कीं, ही ब्रह्मवस्तु ज्ञात व्हावयाची नाहीं व ती वस्तु कधींहि ज्ञेय असावयाची नाहीं. हा मुख्य सिद्धान्त आहे. त्याचप्रमाणें ही वस्तु अज्ञात व अज्ञेय वस्तूंहून भिन्न आहे; ज्ञात व अज्ञात, ज्ञेय व अज्ञेय वस्तूंचें नियंत्रण करणारी ही वस्तु आहे, ब्रह्मवस्तु ज्ञाताज्ञात वस्तूंहून भिन्न असून त्यांचे नियंत्रण करणारी आहे, हाही सिद्धान्त अनादिकालापासून वेदानें स्वीकृत केला आहे. आणि तो यथार्थही आहे. या सिद्धान्ताची यथार्थता उपसंहाराचे वेळीं स्पष्ट करून दाखविण्याचा मी प्रयत्न करीन. येथें इतकेंच सांगून ठेवावयाचें आहे कीं, ही वस्तु ज्ञेय नाहीं व अज्ञेयही नाहीं, ज्ञात नाहीं व अज्ञातही नाहीं. या प्रमाणें 'इंद्रियांस कोण प्रवृत्त करितो?' असा प्रश्न पहिल्या मंत्रांत उत्थापित केला आहे त्याला दुसऱ्या व तिसऱ्या मंत्रांनीं असें उत्तर दिलें आहें कीं, परमात्म्याच्या सत्तेनें सर्व इंद्रियें आपआपले व्यापार करण्यास प्रवृत्त होतात. तसेंच हा परमात्मा जीवास जीं ज्ञानसाधनें प्राप्त झालीं आहेत त्यांस व त्यांच्या द्वारां गोचर होण्यासारखा नाहीं. याला रंगरूप नाहीं म्हणून तो इंद्रि-

यांस दिसत नाहीं. याला विकार उत्पन्न होत नाहींत म्हणून तो इंद्रिय–संग्राहक जें मन त्यालाही गोचर होत नाहीं. मनासह इंद्रियांस जें अंतर्बाह्य विषयांचें स्वरूप समजतें त्याचा संग्रह करणाऱ्या बुद्धीसही हा गोचर नाहीं. सारांश, नामरूपातीत स्वरूपाचा हा परमात्मा आहे असें श्रुतीनें सांगितलें. तो सर्व इंद्रियांस अगोचर आहे, हेंही सांगितलें आणि तात्पर्य असें प्रतिपादितें कीं, ही परब्रह्मवस्तु इंद्रियांस सर्वथा अज्ञेय आहे, पण ती ज्ञेयही आहे असें येथें सुचवून ठेविलें आहे. पण याचा विचार आपण दुसऱ्या खंडांतील पहिल्या चार मंत्रांची मीमांसा करितांना स्पष्ट करूं. येथें श्रुतीनें केवल परंपरागत सिद्धान्त सांगितला कीं, ब्रह्मवस्तु ज्ञाताज्ञात नाहीं, व ज्ञेयाज्ञेयही नाहीं. ॥ ३ ॥

---

## मंत्र ४ ते ८.

अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणेंच आहेत.—

आतांपर्यंत इंद्रियांस प्रवृत्त करणारा परमात्मा इंद्रियांस अगोचर आहे व मनोबुद्धीस अगोचर आहे असें सांगितलें. आतां या मंत्राष्टकांत असें सांगावयाचें आहे कीं, त्याला नियमित करणारी इंद्रियादि कोणतीही उपाधि नाहीं, त्याला बोलण्यासाठीं वाणी नको असते, विचार करण्यासाठीं मन नको असतें, पाहण्यासाठीं किंवा ऐकण्यासाठीं त्याला नेत्रकर्णांची आवश्यकता नाहीं, जिवंत राहावें एतदर्थ त्याला प्राणवायूचाही आश्रय करावा लागत नाहीं. सारांश, जीवाला विषय-बोध किंवा स्वरूप–बोध होण्यासाठीं ज्या इंद्रियांची अपेक्षा अवश्य असते ती अपेक्षा परमात्म्याला नाहीं. पण हाच परमात्मा वाणी, मन, नेत्र, कर्ण, प्राण इत्यादि सर्व ज्ञानकर्मेंद्रियांस स्वस्वव्यापार करण्यास प्रवृत्त करितो. जिव्हा नसून बोलणारा व जिव्हेचे व्यापार नियमित करणारा, मनाची अपेक्षा न ठेवितां विचार करणारा व मनास नियमित करणारा, याचप्रमाणें नेत्रकर्णादि इंद्रियांची आवश्यकता न ठेवितां त्या त्या इंद्रियांचे व्यापार करून त्यावर स्वामित्व गाजविणारा असा सर्वउपाधिविवर्जित म्हणजे निरुपाधिक असून सर्व व्यापार निजसत्तेनें करणारा हा परमात्मा आहे.

येथें ब्रह्मवस्तूच्या वर्णनाचें कार्य श्रुतीनें संपूर्ण केलें आहे. हें वर्णन कांहीं अस्तिवाचक व कांहींसें निषेधवाची आहे. कोणत्याही गुणधर्माची उपाधि ब्रह्माला नसून तें ज्ञेय नाहीं, असें निषेधमुखानें सांगितलें. तसेंच, तो सर्व-प्रवर्तक, सर्वव्यापी, सर्वज्ञ आणि सर्वथा अनाज्ञात आहे, असें अस्तिवाचक पद्धतीनें सांगितलें. सारांश, तो निर्गुण असून सर्वसाक्षी आहे असें त्याचें स्वरूप ठरविलें.

येथें पहिल्या खंडाची समाप्ति होते. या खंडांत मनासह इंद्रियांचा व प्राणांचा प्रवर्तक कोण असा प्रश्न उत्पन्न केला आहे आणि या प्रश्न करणाराचा

मनोगतच असा दिसत आहे कीं, त्याला अचेतनाकडून देहव्यापार चालणार नाहीं, असा उपदेश पूर्वीच झाला आहे. जडाला स्वतःप्रवृत्ति नाहीं हा त्याचा निश्चय झालेला आहे, तसेंच इंद्रियेंहीं स्वतंत्र नसून तीं केवल इष्टव्यापारास अनुकूल अशीं आहेत, असाही त्याचा निश्चय झालेला आहे. जगामध्यें प्रवृत्ति तर दिसत आहे आणि ती प्रवृत्ति–निदान आपली देहप्रवृत्ति तरी–कांहीं एक इष्ट हेतु सिद्ध करण्यासाठीं व्यापृत होत असते, असा आपला अनुभव आहे. तेव्हां सहजच प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, जडदेह किंवा साधनमात्र असणारीं इंद्रियें हीं जर इष्ट हेतु घडवून आणित नाहींत, यांना जर इष्ट हेतु साध्य करण्याचें सामर्थ्य नाहीं, चेतनाशिवाय इष्ट प्रवृत्ति होणें शक्य नाहीं, तर या देहाचा आणि इंद्रियांचा, तसाच मन आणि प्राण यांचा प्रवर्तक कोण असावा ?

हा प्रवर्तक चैतन्ययुक्त असला पाहिजे, हें प्रश्न करणाराच्या मनानें घेतलें आहे. तेव्हां एक जीवात्मा तरी देहेंद्रिय-प्रवर्तक असावा किंवा दुसरा कोणी चैतन्यशील प्रवर्तक असावा असा संशय येईल. पण त्यानेंच आपल्या मनानें या संशयी प्रश्नाचें उत्तर दिलें आहे कीं, जीवात्मा प्रवर्तक असणें शक्य नाहीं. तेव्हां हा प्रवर्तक कोण आणि त्याचें लक्षण काय हें समजावें, म्हणून या केनोपनिषदाची प्रवृत्ति झाली आहे.

पुढील दोन ते आठ मंत्रांमध्यें या दोन्ही प्रश्नांचीं उत्तरें दिलीं आहेत. त्यांवरून हें स्पष्ट होतें कीं, हा चैतन्य स्वरूपी प्रवर्तक सर्व इंद्रियांस प्रकाशित करणारा आहे. व त्यांस आपआपले व्यापार करण्याची प्रेरणा करणारा आहे. हा एक असून एकस्वरूपी आहे. हा सर्व इंद्रियांचा स्वामी असून स्वतंत्र आहे. हें त्याचें स्वरूप आपल्या इंद्रियांस, प्राणांस, किंवा मनास समजण्यासारखें नाहीं; कारण उघड आहे कीं, इंद्रियांस सर्वदा प्रवृत्त करणारा, त्यांचें नियमन करून त्यांचीं स्वरूपें जाणणारा, जो सर्वज्ञ देवाधिदेव त्याचें स्वरूप त्याच्याच तंत्रानें चालणाऱ्या व त्याच्याशिवाय हालचाल करण्याचें सामर्थ्य नसणाऱ्या बिचाऱ्या इंद्रियांस समजणें शक्यच नाहीं. कौरव सैन्यांतील महाप्रसिद्ध धनुर्धराग्रणी जो अंगराजा कर्ण त्यानें एकदां सर्वांस आधार देणाऱ्या पृथ्वीवर उभें राहून पृथ्वी उचलण्याचा प्रयत्न केला आणि फसला. आपण आपल्या स्वतःच्या खांद्यावर उडी मारून बसणें हें केव्हांही संभवनीय नाहीं; त्याचप्रमाणें परमात्म्याच्या सत्तेनें निर्माण होऊन व्यापार करणाऱ्या इंद्रियांसही आपल्या प्रवर्तकाचें स्वरूप केव्हांही कळणार नाहीं. याप्रमाणें परमात्मा हा नेत्रांस अगोचर आहे; मनाला अग्राह्य आहे, बुद्धीचा रिघाव तेथें होत नाहीं, वाणीला मौन धरावें लागतें व प्राण स्तब्ध होतात. सारांश, कोणत्याही इंद्रियांस तेथें जाण्याचें सामर्थ्य नाहीं, असें त्याचें स्वरूप आहे. हें स्वरूप ज्या महापुरुषाला सद्गुरूच्या कृपेनें आणि

वेद–वेदांताच्या सहायानें समजलें, तो महात्मा लिंगदेहाच्या म्हणजे इंद्रियांच्या वासनेच्या पलीकडे जाऊन परमेश्वर–स्वरूपीं लीन होतो आणि शेवटीं मुक्त होतो. आतां त्याचें लक्षण श्रुतीनें कसें सांगितलें तें पाहूं या. या लक्षणांचा विचार चार ते आठ मंत्रांत केला आहे; श्रुति म्हणते कीं याला वाणी प्रकट करूं शकत नाहीं. याचा मनाला विचार करतां येत नाहीं, किंवा विचार करण्यासाठीं याला मनाची अपेक्षा नसते. पाहण्याकरितां याला नेत्रांचें सहाय घ्यावें लागत नाहीं. श्रवण करण्यासाठीं याला कर्णांची आवश्यकता नाहीं. जिवंत राहण्यासाठीं याला प्राणाची गरज नाहीं. असा हा सर्व इंद्रिय–विरहित आणि सर्व इंद्रियातीत आहे. तो इंद्रियशून्य आहे म्हणून निरुपाधिक म्हणजे स्वतंत्र म्हणजे केवल स्वरूपाचा आहे. तो डोळ्यास दिसत नाहीं म्हणजे त्याला रूपरंग नाहीं. तो मनाला अगोचर आहे म्हणजे तो विचाराच्या पलीकडचा आहे, इत्यादि चिन्हांवरून जीवदृष्टीनें तरी तो निर्गुण आहे असें ठरतें. असें असूनही तो सर्व नेत्रकर्णादि इंद्रियांचा, वाणीचा, मनाचा, व प्राणाचा चालक आहे! यावरून तो सर्वप्रवर्तक आहे असेंही ठरतें. तेव्हां श्रुतीनें उत्पन्न केलेल्या प्रश्नाला पहिल्या खंडानें हें उत्तर दिलें कीं, त्या स्वरूपाचें लक्षण निर्गुणात्मक आहे, अधिकारी जीवास मात्र तो 'आहे' या स्वरूपानें, ज्ञानाच्या स्वरूपानें आणि आनंदाच्या स्वरूपानें प्रकट होतो. अर्थात् तो सच्चिदानंद स्वरूपाचा आहे असें सिद्ध होतें. तात्पर्य इंद्रियांचा प्रवर्तक कोण? याला उत्तर सच्चिदानंदरूपी निर्गुण परमात्मा म्हणजे परब्रह्म हें आहे. याप्रमाणें निर्माण केलेल्या प्रश्नाचें उत्तर श्रुतीनें दिलें. हा पहिल्या खंडाचा इत्यर्थ आहे.

---

## खण्ड २ रा.

### मंत्र पहिला.

अन्वय व अर्थ—यत् अस्य ब्रह्मणः रूपं त्वं वेत्थ इति नूनं अपि त्वं मन्यसे (या ब्रह्माचें स्वरूप अल्प रीतीनें तरी आपल्यास उत्तम समजलें आहे, असें जर तुला खरोखरच वाटत असेल) यत् अस्य देवेषु (आणि देवांस जें स्वरूप प्रकट झालें आहे,–तें आपल्यास समजलें असें तुला वाटत असेल–) अथ नु ते विदितं मीमांस्यं एव मन्ये (तर तुला जें समजलें असें वाटत आहे, त्याची मीमांसा करावयास पाहिजे असें मला वाटतें.)

सारांश, प्रवचन करणारे आचार्य साधकाला या मंत्रानें पुढील उपदेश करून शुद्धीवर आणीत आहेत. मागें पहिल्या खंडांत ब्रह्मस्वरूपाची आणि त्याच्या लक्षणाची मीमांसा झाली. या मीमांसेवरून साधकाला असें वाटलें असेल कीं मला ब्रह्मस्वरूपाचें सर्व-निदान थोडेंसें तरी-उत्तम म्हणजे पूर्ण ज्ञान झालें आहे. देवांस किंवा साधुसंतांस या स्वरूपाचा निश्चित रीतीनें जो बोध झाला असेल तितका बोध जरी आपणास झाला नाहीं, तथापि ब्रह्मस्वरूपासंबंधानें व तल्लक्षणसंबंधानें आपणास जें कांहीं अल्प स्वल्प ज्ञान झालें आहे तें पूर्ण आणि निश्चित आहे. हा अर्थातच साधकाचा भ्रम आहे. कारण बुद्धीला ब्रह्मस्वरूप ग्रहण करण्याचें अथवा त्याचें लक्षण समजून घेण्याचें सामर्थ्य नाहीं, असें स्पष्ट सांगितलें असतांही, थोडें कां होईना, पण आपल्यास ब्रह्मस्वरूप लक्षणासह निश्चित रीतीनें समजलें, अशी साधकाची कल्पना होणें हें केव्हांही बरोबर नाहीं. ही कल्पना म्हणजे शुद्ध भ्रम आहे, हा साधकाचा भ्रम नाहींसा करावा आणि देहादिकांचे उपाधींमध्यें राहणाऱ्या जीवाला उपाधि-स्थितींत ब्रह्माचें ज्ञान-विज्ञान होणें शक्य नाहीं, हें समजून सांगावें आणि जें काय ज्ञान होणें शक्य आहे, तें कोणत्या स्वरूपाचें असतें हें समजून द्यावें, एतदर्थ या खंडाची योजना आहे. आणि त्यांतील पहिला मंत्र आतांच सांगितल्याप्रमाणें साधकाला जो भ्रम होतो तो स्पष्ट करून सांगतों, आणि अद्यापिही ब्रह्मस्वरूपाचा पुष्कळसा ऊहापोह ( भवति न भवति ) व्हावयास पाहिजे, असें सुचवितो. सारांश, ब्रह्मविचार पहिल्या खंडांत पूर्ण झाला नाहीं, निदान श्रुतीनें पूर्णत्वानें म्हणून जो विचार केला, त्यावरून साधकाचा निश्चय न होतां भलतेंच ज्ञान त्यांस उत्पन्न झालें, तें घालविण्यासाठीं दुसऱ्या खंडाचा आणि दुसरे खंडांतील पहिल्या मंत्राचा अवतार आहे. अद्यापि पुष्कळसा विचार कर्तव्य आहे, हा पहिल्या मंत्राचा इत्यर्थ आहे.

---

## मंत्र दुसरा.

**अन्वय व अर्थ**—**सुवेद इति अहं न मन्ये** ( मला निश्चित ज्ञान झालें आहे, असें केव्हांही वाटत नाहीं ) **नो न वेद इति नो वेद इति च** ( मला समजलें नाहीं असेंही वाटत नाहीं आणि समजलें असेंही वाटत नाहीं ) **नः यः तत् वेद तत् नो वेद** ( आमच्यापैकीं ज्यास मी ब्रह्मज्ञ झालों असें वाटतें, त्याला कांहीं समजलें नाहीं ) **नो न वेद इति वेद च** ( आणि मला कांहीं समजलें नाहीं अथवा समजणें शक्य नाहीं, असें ज्ञान ज्याला झालें तो पूर्णज्ञानी आहे. )

सारांश, आचार्य म्हणतात मला निश्चित ज्ञान झालें, असें वाटत नाहीं व कांहीं समजलें नाहीं, असेंही वाटत नाहीं. ज्याला समजलें असें वाटतें त्याला कांहीं समजत नाहीं. आणि समजणें शक्य नाहीं म्हणून ब्रह्मस्वरूप आपल्यास समजलें नाहीं, असें ज्याला समजतें तो ज्ञानी असतो.

येथें आचार्यांनीं आपल्या ज्ञानाचें स्वरूप सांगितलें आहे. आचार्यांस ठाऊक आहे कीं, ब्रह्माचें स्वरूप सर्वथा अपरिच्छिन्न ( उपाधिशून्य ) असतें. ब्रह्मस्वरूपाला कोणत्याही प्रकारची उपाधि नाहीं. तें स्वरूप देशानें मर्यादित होत नाहीं, कालानें मर्यादित होत नाहीं आणि परिस्थितीनेंही मर्यादित होत नाहीं. त्याला गुणधर्म नसतात. येथें अधिभौतिक, अधिदैविक आणि अध्यात्मिक उपाधींचाही प्रवेश होत नसतो. फार काय सांगावें ? ब्रह्मस्वरूप हें जीवांच्या परिच्छिन्न बुद्धीचा विषयसुद्धां होत नाहीं.

' ब्रह्म समजणें ' म्हणजे ब्रह्मानें जीवाच्या बुद्धीचा विषय होणें होय. बुद्धीचा विषय होणें, बुद्धीला गोचर होणें, म्हणजे परिच्छिन्न होणें अथवा मर्यादित होणें होय. ही मर्यादा ब्रह्माचे ठिकाणीं होणें किंवा असणें केव्हांही शक्य नाहीं. म्हणून ब्रह्म समजलें असें म्हणणें हा निवळ भ्रम आहे. सर्वव्यापी आकाशाला आपण एखाद्या मांड्यांत म्हणजे घटांत अथवा मठांत कोंडून ठेविलें, हें म्हणणें जसें शुद्ध वेडेपणाचें आहे, तसेंच, बुद्धीच्या कक्षेंत ब्रह्माला आणिलें असें म्हणणें हेंही अज्ञानाचें दर्शक आहे. तेव्हां ब्रह्मसंबंधानें कांहींच समजणें शक्य नाहीं कीं काय, अशीही एक शंका येण्याचा संभव आहे, तिचा निरास करून या मंत्रांत आचार्य असा उपदेश करितात कीं, ब्रह्मसंबंधानें कांहीं समजत नाहीं, असेंही नाहीं व समजतें असेंही नाहीं. म्हणजे असें: ब्रह्म ही वस्तु अज्ञेय आहे, ती आपल्या बुद्धीला केव्हांही समजावयाची नाहीं, असा ज्याचा निश्चय होतो व तें ब्रह्म निर्गुण आहे आणि शुद्धचित्त झालेल्या जीवास सच्चिदानंद स्वरूपानें भासणार आहे असें ज्यास ज्ञान होतें, तो ब्रह्मस्वरूपाचा परोक्षज्ञानी होय. परंतु मला ब्रह्माचें स्वरूप पूर्ण समजलें, असा ज्याचा समज झाला आहे त्याला ब्रह्मस्वरूपाचे संबंधानें कांहींएक समजलें नसतें; इतकेंच नव्हे तर या स्वरूपाच्या संबंधानें त्याच्या विलक्षण आणि अवास्तव कल्पना झालेल्या असतात. या कल्पनांचा निषेध या मंत्रांत केला आहे. मागें अनेकवेळ सांगितलेंच आहे कीं, अपरिच्छिन्न ब्रह्माचें स्वरूप परिच्छिन्न बुद्धीच्या कक्षेंत येणें केव्हांही शक्य नाहीं. बुद्धीला तें नेहमीं अज्ञेयच राहील. सारांश, ब्रह्मसंबंधी ज्ञान आपल्यास झालें आहे, असें वाटणें हें शुद्ध अज्ञान आहे आणि ब्रह्मवस्तु अज्ञेय आहे असें निश्चित ज्ञान होणें हें खरें ज्ञान आहे. हा अर्थ स्पष्ट करण्यासाठीं मंत्रामध्यें म्हटलें आहे कीं, ' ज्याला मी ब्रह्मज्ञ आहें असें वाटतें तो ब्रह्मज्ञानशून्य आहे, आणि मी ब्रह्मसंबंधानें अज्ञ आहें असें निश्चयानें समजतो, तो पूर्ण परोक्ष ज्ञानी आहे. सारांश, तुला ब्रह्म समजलें काय ? याला उत्तर ' मला तें समजलें नाहीं आणि

समजलें आहे,' असें आहे. समजलें नाहीं याचा अर्थ ब्रह्म अज्ञेय आहे आणि समजलें याचा अर्थ तें अज्ञेय आहे असें समजणें होय. ज्यांना गणित शास्त्राचा थोडा तरी परिचय आहे त्यांना अनंत शब्दाचा अर्थ विचारल्यास ते असेंच उत्तर देतील. अनंत ही संख्या मांडा, असें त्यांस सांगितलें असतां ती मांडतां येणें शक्य नाहीं, असेंच ते गणितशास्त्री म्हणतील. अनंताविषयीं तुम्हांस काय समजलें आहे असें विचारिलें असतां अनंताचें स्वरूप-वर्णन करणें अशक्य, ही गोष्ट आम्हांस समजली आहे असें ते म्हणतील. हीच तऱ्हा भूमितीतील 'बिंदु' या शब्दाची व अर्थाची आहे. 'काल' व 'आकाश' या शब्दांची व अर्थाची हीच गति आहे. याचप्रमाणें जीवात्मा म्हणजे काय ? असें विचारल्यास त्याचें लक्षण व त्याचें स्वरूप कोणासही स्पष्ट रीतीनें सांगतां यावयाचें नाहीं. ही जर अनंत, बिंदु, काल, आकाश, जीवात्मा इत्यादि आपल्यास नित्य परिचयांत असणाऱ्या वस्तूंची गोष्ट आहे, तर ह्या गोष्टीपेक्षां अनंतपटीनें बुद्धीस अग्राह्य असणाऱ्या ब्रह्म शब्दाचें व अर्थाचें स्वरूप—लक्षण समजणें आणि समजावून देणें ह्या गोष्टी अनंत पटीनें अशक्य आहेत हें कोणासही सहज समजणार आहे व हाच या मंत्राचा इत्यर्थ आहे. ॥ २ ॥

---

## मंत्र तिसरा.

अन्वय व अर्थ—यस्य अमतं तस्य मतं ( ज्या पंडिताला ब्रह्मवस्तु अज्ञेय आहे असें समजलें, तो खरा विचारी पुरुष होय ) यस्य मतं सः न वेद ( परंतु माझ्या मनाच्या कक्षेंत ब्रह्मवस्तु आली, असें ज्यास वाटतें तो पुरुष अविद्वान् असतो. ) विजानतां अविज्ञातं ( आम्हांस विशेष स्वरूप समजलें, असा अभिमान धरणाऱ्या पुरुषांस तें समजलेलें नसतें ) अविजानतां विज्ञातं ( आपल्यास ब्रह्मस्वरूपाचें विशेष ज्ञान मुळींच झालें नाहीं, असा ज्यांच्या बुद्धीनें क्षीणवृत्तिपूर्वक निश्चय केला, त्यांस ब्रह्मस्वरूपाचें सामान्य ज्ञान झालेलें असतें. )

सारांश, मागच्या मंत्रांत सांगितलेल्या सिद्धान्ताचा पुनः येथें अनुवाद केला हें स्पष्ट आहे.

मागच्या मंत्रांत आचार्यांनीं आपल्या स्वतःचा व आपल्यास परिचित असलेल्या मंडळीचा अनुभव सांगितला आहे. या अनुभवाला प्रस्तुतच्या मंत्रांत सर्वगामी स्वरूप दिलें आहे. पहिला मंत्र स्वानुभवाचा आहे, तर दुसरा मंत्र सिद्धान्तरूप आहे. म्हणजे एका पुरुषास जो अनुभव येतो तोच अनुभव सर्व विचारी पुरुषांस आला पाहिजे, असा या प्रस्तुतच्या मंत्राचा अभिप्राय आहे.

कारण येथें व्यक्तिविषयक रागद्वेषाचें कांहीं कारण नसल्यामुळें जो व्यक्तीला अनुभव येतो, तोच सर्वगामी असतो. तेव्हां आचार्यांनीं सांगितलेला अनुभव व्यक्तिनिष्ठ नव्हे, व्यक्तीच्या आग्रहानें किंवा दुराग्रहानें उत्पन्न झालेला तो अनुभव नव्हे, असें स्पष्ट दाखविण्यासाठीं या मंत्राची सिद्धान्तपर योजना श्रुतीनें केली आहे. या मंत्रांतील सिद्धान्त मागच्या मंत्राचा अनुवाद करितो आणि व्यक्तीच्या अनुभवाला सिद्धान्ताचें स्वरूप देतो, असें समजलें म्हणजे दुसऱ्या व तिसऱ्या मंत्रांची संगति नीट जुळते आणि पुनरुक्ति झाली आहे कीं काय, अशी शंका येण्याचा संभव असतो त्याचा निरास होतो. या मंत्राचें जास्त विवरण करण्याचें कारण नाहीं. कां कीं पाठीमागच्या मंत्रांत सांगितलेला अर्थ येथें सामान्यरूपानें म्हणजे सिद्धान्तरूपानें सांगितला आहे.

ह्या उपनिषदाचें काळजीपूर्वक अध्ययन करणाऱ्या विचारी पुरुषांच्या सोयी साठीं एकच सिद्धान्त अनुभवरूपानें सांगून पुनः श्रुतिमाउलीनें त्याच सिद्धान्ताचें सामान्यरूपानें प्रणयन केलें आहे. हेतु हा आहे कीं, वारंवार एकच गोष्ट निरनिराळ्या स्वरूपानें सांगितली म्हणजे ती जिज्ञासूंच्या मनावर उत्तम रीतीनें ठसून राहतें. आपला सामान्य अनुभव असा असतो कीं, एखादी गोष्ट आपण प्रथम ऐकली तर तिचें स्वरूप त्यावेळीं जसें कळतें, त्यापेक्षां दुसऱ्या वेळीं ज्यास्त स्पष्ट रीतीनें आपल्यास त्या गोष्टीचा उलगडा होतो. आणखी अशी ही एक गोष्ट लक्षांत ठेवावयाची कीं, जीवाला आपल्या बुद्धीचें वैभव फार मोठें आहे असें वाटत असतें. 'बुद्धीस ग्रहण करितां येण्यासारखी वस्तु नाहीं, अशी वस्तुच नाहीं' हा सामान्य पुरुषाचा सामान्य ग्रह असतो. दुसरा असा एक समज असतो कीं, जी गोष्ट बुद्धीला समजत नाहीं ती गोष्ट अस्तित्वांतच नसते! हे दोन्ही ग्रह किंवा हे दोन्हीं दुराग्रह विध्वस्त करावे, हा दुसऱ्या आणि तिसऱ्या मंत्राचा हेतु आहे. जीवाच्या बुद्धीस न समजणाऱ्या अशा पुष्कळ वस्तु आहेत, निदान ब्रह्मवस्तु तरी तशी आहे, आणि ती वास्तव स्वरूपानें अस्तित्वांत आहे, हें येथें विशेष स्पष्टपणानें सांगावयाचें आहे. असो. या मंत्राचा भावार्थ मागच्या मंत्रांत स्पष्ट झाला आहे तरी पुनः एकवार सांगतों. सर्वप्रवर्तक ब्रह्मवस्तूचें स्वरूप अज्ञेय आहे, तिचें विशेष स्वरूप आणि विशेष लक्षणें यांचें पूर्ण ज्ञान होणें शक्य नाहीं, असें ज्या विचारी पुरुषास ज्ञान-विज्ञान झालें, तो विचारी पुरुष खरा ज्ञाता आहे. ह्याच्या उलट ज्याचा समज असतो, ब्रह्मवस्तु ही बुद्धीच्या कक्षेला वश होते असें ज्याला ज्ञान होतें, सारांश ब्रह्मवस्तु ज्ञेय आहे असें ज्यास वाटतें किंवा असें अज्ञान ज्यास असतें, तो विचारी पुरुष नव्हे व ज्ञाताही नव्हे. याप्रमाणें आचार्यांनीं साधकाच्या आत्मकल्याणासाठीं परमात्म वस्तूच्या स्वरूपाची मीमांसा दोन मंत्रांत विस्तारानें केली आहे. ॥ ३ ॥

## मंत्र चवथा.

**अन्वय व अर्थ—प्रतिबोधविदितं मतं हि अमृतत्वं विन्दते** ( प्रतिबोधामुळें विदित झालेलें स्वरूप निश्चित समजलें म्हणजे अमृतत्वाचा सहजच लाभ होतो ) **आत्मना वीर्यं विन्दते** ( आत्मज्ञान झालें असतां उत्तम प्रकारचें तेजोबल प्राप्त होतें ) **विद्यया अमृतं विन्दते** ( विद्येच्या सामर्थ्यानें अमृतत्व म्हणजे मोक्ष मिळतो ).

सारांश, प्रत्येक बोधाच्या वेळीं म्हणजे जीवास जें प्रत्येक ज्ञान होतें त्यावेळीं जें तत्त्व नित्य विद्यमान असतें, तें पूर्णत्वानें समजलें म्हणजे अमृतत्व अथवा मोक्ष सहजच प्राप्त होतो. आत्मज्ञानाच्या सामर्थ्यानें विलक्षण तेजोबल प्राप्त होतें आणि आत्मविद्येच्या योगानें मोक्ष मिळतो.

या मंत्रांत आत्मज्ञानाचा उदय करून घेण्याचें रहस्य व फल हीं सांगितलीं आहेत. हें रहस्य जिज्ञासूंनीं अवश्य समजून घ्यावें. 'प्रतिबोधविदित' म्हणजे प्रत्येक विषयज्ञान होते वेळीं जें ज्ञान नित्य असतें तें होय. त्याचें ज्ञान तें ब्रह्मज्ञान होय. ज्ञान होत असतां जें प्रतिकार्य होतें, तो प्रतिबोध होय. आपल्यास विषयाचें ज्ञान होत असतां त्याच वेळीं अशी एक गूढ भावना स्पष्ट होत असते कीं, या सर्व बाह्य ज्ञानांचा कोणीतरी एक नित्य विद्यमान असणारा, एक निर्विकार साक्षी आहे. याचप्रमाणें मनाला किंवा अंतःकरणाला ज्या गोष्टी स्पष्ट दिसत असतात त्यांचाही तोच साक्षी असतो. अशी भावना विचारी पुरुषास होत असते. आणखी, सुषुप्तीमध्यें ( आपल्यास गाढ निद्रा लागली असतां ) मनासह आपलीं सर्व इंद्रियें स्तब्ध म्हणजे व्यापारशून्य झालेलीं असतात, हा अनुभव सर्वांस आहेच. तथापि या सुषुप्तस्थितींतही जीवास एकप्रकारचें निरामय सुख प्राप्त होत असतें, असें झोपेंतून जागें झाल्यावर आपल्यास स्मरणरूपानें कळतें. 'मी सुखानें निद्रा करित होतों, निद्रेमध्यें मला उत्तम प्रकारचें सुख प्राप्त होत होतें, असा निद्रेतून उठलेल्या प्रत्येक जीवाचा स्मरणगामी—अनुभव असतो. पूर्वज्ञान झालें असल्याशिवाय स्मरण असत नाहीं. पाहिलेल्या किंवा प्रत्यक्ष झालेल्या वस्तूंचें मात्र स्मरण होतें. जागें झाल्यावर सुखाचें स्मरण होतें, तें सुख कोणी तरी अनुभविलें असलें पाहिजे. पण आपलीं ज्ञानेंद्रियें तर लीन होतीं. तेव्हां म्हणजे सर्व इंद्रियें व त्यांचे विषय लीन झाले असतांही एक, नित्य, साक्षित्वानें असणारें तत्त्व आहे अशी निश्चित भावना होते. ह्या भावनेचें स्फुरण होणें म्हणजे प्रत्येक बोधाच्या वेळीं एकच स्वरूपानें जागृत असणाऱ्या साक्षीचा अनुभव येणें होय. हा मंत्रांतील 'प्रतिबोध—विदित' या समस्त पदाचा अर्थ आहे.

याप्रमाणें प्रत्येक बोधाच्या वेळीं विद्यमान असणारें जें तत्त्व आहे, तें जीवास स्वसंवेद्यरूपानें समजलें म्हणजे अमृतत्व प्राप्त होतें. वेदान्तकाळीं असा समज प्रचलित होता कीं, आपण किंवा आपली बुद्धिवृत्ति ज्ञेयार्थी म्हणजे जाणावयाच्या वस्तूशीं एकाकार झाल्याशिवाय आपल्यास त्या वस्तूचें ज्ञान होत नाहीं. समजणें म्हणजे ज्ञेयाकार होणें होय. या मानसशास्त्राचे सिद्धांतप्रमाणें बोधाचा साक्षी समजणें म्हणजे आपण साक्षीरूप होणें, असें होतें. म्हणून प्रत्येक बोधाचा एकाकार साक्षी समजला म्हणजे बुद्धिवृत्तिही साक्षिरूप झाली, असें होतें. साक्षी अमर आहे म्हणून त्याच्या जाणणाऱ्यासही अमरत्व प्राप्त होतें. सारांश, ब्रह्मज्ञान झालें म्हणजे जीव ब्रह्म होतो. हाच सिद्धांत अर्वाचीन काळीं मान्य होत चालला आहे.

तसेंच, या आत्मज्ञान झालेल्या पुरुषाचें तेज अद्वितीय असतें. त्या पुरुषाला कसलीही भीति अथवा शोक असत नाहीं. कारण भीतीचीं व शोकाचीं कारणें नष्ट होतात. यासाठीं मंत्रांत असा उपदेश केला आहे कीं, आत्मरूप झाल्यावर उत्कृष्ट वीर्य मिळतें आणि ब्रह्मज्ञानाच्या योगानें अमरत्व प्राप्त होतें.

याच मंत्राचे मागील दोन मंत्रांत ब्रह्मरूप समजावयाचें नाहीं, असें म्हटलें आहे. त्याचा अर्थ जीवाचे बुद्धीस ब्रह्मरूप आकलन करण्याचें सामर्थ्य नाहीं, असा आहे. येथें जीव ब्रह्मरूपच होतो, ज्ञानरूप होतो. बुद्धीच्या पलीकडे असणाऱ्या आत्म्याला ब्रह्मस्वरूप प्राप्त होतें, म्हणून त्याला तें समजतें, असें म्हटलें आहे. असो; 'समजतें' हें पद सुद्धां मोठ्या कष्टानेंच वापरावयाचें आहे. पण उपाय काय ? अद्वैताचा अर्थ सांगावयास लागलें म्हणजे द्वैताची भाषा उपयोजावी लागते. असो; ब्रह्म समजण्याला ब्रह्मरूप होणें हाच एक मार्ग आहे. याप्रमाणें या मंत्रांत ब्रह्मरूप समजण्याचा जो एकच गूढ मार्ग आहे तो स्पष्टपणें सांगितला आहे ॥ ४ ॥

---

## मंत्र पांचवा.

**अन्वय व अर्थ**—इह चेत् अदेवीत् ( येथें जर पूर्ण ज्ञान झालें ) अथ सत्यं अस्ति ( तर सत्स्वरूपाचा लाभ होतो ) न चेत् इह अवेदीत् ( पण आत्मस्वरूपाचें येथें ज्ञान झालें नाहीं ) महती विनष्टिः ( तर अतिशय मोठा घात होतो ) भूतेषु भूतेषु विचित्य* धीरा अस्मात् लोकात् प्रेत्य अमृताः भवन्ति ( शाहाणे पुरुष असतात ते प्रत्येक भूता-

---

* कोठें कोठें विचिंत्य असाही पाठ आहे.

मध्यें जें आत्मतत्त्व आहे त्याचा शोध लाविताते आणि या दृश्य संसाराच्या पलीकडे असणारें अमरत्व प्राप्त करून घेतात ).

सारांश, या जन्मीं पूर्ण तत्त्वज्ञान झालें तर अति उत्तम फल मिळतें म्हणजे जीव ब्रह्मरूप अथवा सद्रूप होतो. पण जर हें ज्ञान आपण संपादन केलें नाहीं, तर आपल्यास अत्यंत कष्ट भोगावे लागतात. या साठीं जे शाहाणे लोक आहेत ते प्रत्येक पदार्थाचे ठिकाणीं जें अंतर्बाह्य आत्मतत्त्व आहे त्याचें ज्ञान करून घेतात आणि या कष्टमय संसारसागराचा त्याग करून अमर होतात. अथवा ते ब्रह्मरूप होतात.

चवथ्या मंत्रांत आत्मज्ञानाचें फल सांगितलें आहे, त्याचाच अनुवाद ह्या पांचव्या मंत्रांत करून ज्यास असें सांगितलें आहे कीं, ज्या लोकांस आत्मज्ञानाचा लाभ होणार नाहीं, ते लोक जन्ममरणाच्या तापत्रयामध्यें म्हणजे संसारामध्यें घुटमळून अधोगतीस जातात. त्यांचा सर्वथा नाश होतो. म्हणजे अनंत जन्म पर्यंत त्यांस कष्ट सोसावे लागतात. तेव्हां हें कष्टप्रद जीवित आपल्यास नको असेल, तर जीवानें प्रत्येक वस्तूच्या आंत बाहेर जें आत्मतत्व ओतप्रोत भरलें आहे, त्याचा शोध श्रुतिमार्गानें व गुरूचें साहाय्य घेऊन लावावा आणि श्रुतीनें सांगितलेल्या साधनांचा म्हणजे श्रवण-मननादि साधनांचा अवलंब करून आत्मरूप व्हावें. असें केलें तर जन्मास आल्याचें सार्थक्य होणार आहे. सारांश, कृतकृत्य होण्याला आत्मज्ञानाची अत्यंत आवश्यकता आहे. जे लोक हें आत्मज्ञान यथाविधि संपादन करितात, ते लोक शाहणे होत असें सांगण्याचा श्रुतीचा आशय आहे. ॥ ५ ॥

येथें दुसरें खंड समाप्त झालें. या खंडांत ब्रह्मस्वरूपाचें लक्षण काय आणि ब्रह्मस्वरूपाची प्राप्ति कशी करून घ्यावी, या दोन गोष्टी मुख्यत्वानें सांगितल्या आहेत. पहिल्या मंत्रांत केवल परोक्ष ज्ञान झालें असतां आत्मज्ञान पूर्ण झालें, असा कित्येक लोकांचा समज होतो तो निवळ भ्रम आहे शुद्ध भ्रांति आहे, असें सांगितलें आहे. पुढें दुसऱ्या आणि तिसऱ्या मंत्रांत ब्रह्मज्ञान झालेल्या पुरुषास काय समजलेलें असतें त्याचें निदर्शन केलें आहे आणि स्पष्ट सांगितलें आहे कीं जीवाच्या परिच्छिन्न बुद्धीला अपरिच्छिन्न ब्रह्माचें केव्हांही ज्ञान-विज्ञान होणें शक्य नाहीं. 'माझ्या बुद्धीला ब्रह्मज्ञान होणें शक्य नाहीं, ब्रह्म अज्ञेय आहे' असें ब्रह्माचें परोक्ष ज्ञान झालेल्या पुरुषास समजतें. सारांश, जोंपर्यंत जीवाला अहंकार, बुद्धि, मन, इंद्रियें आणि देह इतक्या उपाधि बद्ध करित असतात, जोंपर्यंत 'मी कर्ता आहें' 'मी भोक्ता आहें' असा अभिमान आणि 'विषयांपासूनच मला सुखप्राप्ति होणार आहे' अशी वासना, ह्या दोन्ही गोष्टी जिवंत आहेत आणि 'बुद्धीच्या व मनादि इंद्रियांच्या साहाय्यानेंच जें काय मला ज्ञान व्हावयाचें तें होणार आहे' अशी वृत्ति

जोंपर्यंत कायम आहे, तोंपर्यंत उपाधिग्रस्त अज्ञानी जीवाला ब्रह्मज्ञान होण्याचा केव्हांही संभव नाहीं. पण. जेव्हां 'आपल्यास विषयाचें ज्ञान होतें, जेव्हां सुखदुःखादि विकार होतात, तेव्हां म्हणजे या ज्ञानाचे व विकाराचे वेळीं कर्तृत्व-भोक्तृत्वशून्य असा एक नित्यसाक्षी निरंतर आहे व तो आत्मरूप आहे अशी स्वसंवेद्य (आपण स्वतःच आपल्यास प्रकट करणारी) आणि एकरसात्मक भावना प्रत्यक्ष होते; ही समजली म्हणजे आपलें कार्य झालें. सारांश, जेव्हां आपल्यास आत्मरूपाचा साक्षात्कार होतो, तेव्हां आपण ब्रह्मरूप होतों आणि ब्रह्माचें ज्ञान-विज्ञान पूर्ण होतें. ब्रह्म आहे व तें प्रत्यक्ष आपणच आहों असें ज्ञान-विज्ञान झालें म्हणजे अपरोक्ष ज्ञान होऊन जीव मुक्त होतो. हा मुख्य अर्थ पांचव्या मंत्रांत सांगितला आहे. आणि सहावे मंत्रांत या ज्ञानाचीं फलश्रुति सांगून पांचव्या मंत्रांत सांगितलेल्या फलाला दुजोरा दिला आहे. याप्रमाणें ब्रह्मज्ञानाचें स्वरूप आणि त्याच्या प्राप्तीचें स्वरूप व प्राप्तीचें फल या गोष्टी सांगून दुसरें खंड समाप्त केलें आहे.

पहिल्या खंडांत परोक्ष ज्ञान सांगितलें. आणि दुसऱ्या खंडांत अपरोक्ष ज्ञान सांगितलें. ब्रह्मविद्येची परिसमाप्ति येथें झाली.

---

## खण्ड तिसरा.

मागील दोन खंडांत जो अर्थ सांगितला, त्याचें स्पष्टीकरण या खंडांत एक आख्यायिका सांगून केलें आहे.

### मंत्र पहिला.

अन्वय व अर्थ—**ब्रह्म ह देवेभ्यः विजिग्ये** (एकदां असें झालें कीं, देवांचें साहाय्य करून ब्रह्मानें असुरांचा पराभव केला) **ह तस्य ब्रह्मणः विजये देवाः अमहीयन्त** (त्या ब्रह्माच्या योगानें विजयप्राप्ति झाली म्हणून देवांचें ऐश्वर्य अतिशय वाढलें) **ते ऐक्षन्त** (त्यांस वाटलें कीं,) **अस्माकं एव अयं विजयः** (हा विजय आम्हींच आपल्या सामर्थ्यानें मिळविला) **अस्माकं एव अयं महिमा इति** (आणि हा आमचाच सर्व महिमा आहे).

सारांश स्पष्टच आहे. ॥ १ ॥

एकदां देव-दानवांचें युद्ध झालें त्यांत देवांचें साहाय्य ब्रह्मानें केलें म्हणून देवांस जयप्राप्ति झाली. चांगल्या गुणाचा प्रसार व्हावा सद्धर्माचा उत्कर्ष व्हावा म्हणून देवांचा पक्ष ब्रह्मानें स्वीकृत केला होता. असो; पण ब्रह्माच्या साहा-

ह्याचा सर्व भाग विसरून जाऊन देवांस अभिमान झाला कीं, आपल्यास जो विजय मिळाला तो आपल्या सामर्थ्याचें व आपल्या मोठेपणाचें मात्र फल आहे ॥ १ ॥

---

## मंत्र दुसरा

**अन्वय व अर्थ**—**तत् ह एषां विजज्ञौ** ( सर्वज्ञ ब्रह्माला देवांस झालेल्या अभिमानाची वार्ता तत्काल समजली )—म्हणून—देवांस प्रत्यक्ष होईल अशा ठिकाणीं—**तेभ्यः ह प्रादुर्बभूव** ( ब्रह्म तेथें प्रकट झालें ) **किं इदं यक्षं इति तत् न व्यजानन्त** ( पण ही प्रकट झालेली तेजस्वी वस्तु काय आहे हें देवांस समजलें नाहीं ).

सारांश स्पष्टच आहे ॥ २ ॥

दैवी संपत्तीच्या प्रभावानें अलंकृत असणाऱ्या देवांस अज्ञानाचा ताप होऊं नये म्हणून ब्रह्म तात्काल तेथें प्रकट झालें. हेतु हा होता कीं, देवांचा अभिमान व देवांचें अज्ञान हीं तावडतोब नाहींशीं करावीं. असो; तें ब्रह्म अशा स्वरूपामध्यें प्रत्यक्ष झालें कीं, ती तेजस्वी वस्तु काय आहे हें देवांस समजेना. देवांमध्यें एक गोष्ट चांगली होती ती ही कीं, त्यांची चौकस बुद्धि अथवा जिज्ञासा अद्याप पर्यंत जागृत होती. ॥ २ ॥

---

## मंत्र तिसरा.

**अन्वय व अर्थ**—**ते अग्निं अब्रुवन्** ( ते देव अग्नीस म्हणाले ) **जातवेद किं एतत् यक्षं इति एतत् विजानीहि** ( सर्वज्ञ जातवेदा ! अग्ने ! ही चमत्कारिक तेजस्वी वस्तु काय आह हें समजून घे ) **तथा इति** ( अग्नि म्हणाला बरें आहे, ह्या वस्तूचा शोध करून मी येतों ).

सारांश उघड आहे. अग्नि हा सर्वज्ञ आहे, त्याला सर्व कांहीं समजतें, असा देवांस भरंवसा होता म्हणून त्यांनीं पहिल्या प्रथम अग्नीला ही कामगिरी सांगितली. ॥ ३ ॥

---

## मंत्र चवथा.

**अन्वय व अर्थ**—**तत् अभ्यद्रवत्** ( तो अग्नि, ती अग्निदेवता यक्षाकडे म्हणजे त्या तेजस्वी वस्तूकडे धांवत धांवत गेली ) **कः असि इति**

तं अभ्यवदत् ( यक्षानें अग्नीस विचारिलें कीं, तूं कोण आहेस ) अहं अग्निः अस्मि वा इति जातवेदाः अहं अस्मि वा इति अब्रवीत् ( अग्नि म्हणाला: मला अग्नि असें म्हणतात किंवा जातवेद हेंही माझें दुसरें नांव आहे ).

अग्नि यक्षाकडे धांवत धांवत गेला; पण तेथें गेल्यावर त्याचें तें विलक्षण तेज आणि स्वरूप पाहून अग्नि घाबरला. आणि आपल्यास काय विचारावयाचें होतें तें विसरून जाऊन स्तब्ध उभा राहिला. तेव्हां यक्षानेंच त्याचें नांव गांव विचारिलें. अग्नीनें आपलें नांव सांगितलें व ढालानें असेंही सांगितलें कीं, मी सर्वज्ञ आहें ॥ ४ ॥

---

## मंत्र पांचवा.

अन्वय व अर्थ—तस्मिन् त्वयि किं वीर्यं इति ( तेव्हां यक्षानें त्याला पुनः प्रश्न केला कीं, तुझें सामर्थ्य काय आहे. ) अपि यत् इदं पृथिव्यां सर्वं दहेयं इति ( अग्नि म्हणाला या पृथ्वीमध्यें म्हणजे विश्वामध्यें ज्या काय वस्तु आहेत, त्या सर्वच्या सर्व जाळून टाकण्याचें मला सामर्थ्य आहे. )

या अग्नीच्या भाषणावरूनच त्याला केवढा गर्व झाला होता, आपल्या ज्ञानाचा व सामर्थ्याचा त्याला केवढा अभिमान झाला होता हें स्पष्ट दिसतें. ॥५॥

---

## मंत्र सहावा.

अन्वय व अर्थ—तस्मै तृणं निदधौ ( त्याच्यापुढें ब्रह्मानें एक गवताची काडी ठेविली )—आणि एतत् दह इति ( हें जाळून टाक असें यक्षानें अग्नीस सांगितलें ) तत् उपप्रेयाय ( तो त्या काडीजवळ गेला. )—पण—सर्वजवेन तत् दग्धुं न शशाक ( त्यानें आपल्या सर्व सामर्थ्याचा उपयोग केला तरी त्याला तें दग्ध करितां आलें नाहीं. )—तेव्हां—सः ततः एव निववृते ( तो तसाच तेथून तडक निघून परत देवांच्या मंडळींत गेला. ) यत् एतत् यक्षं इति एतत् विज्ञातुं न अशकं ( आणि म्हणाला हा विलक्षण यक्ष कोण आहे, हें मला समजून घेतां आलें नाहीं.

यावरून अग्निदेवतेला सुद्धां स्वतःच सामर्थ्य किती अल्प आहे, याची कल्पना सहज होतें. ॥ ६ ॥

## मंत्र सातवा.

**अन्वय व अर्थ**—अथ वायुं अब्रुवन् वायो किं एतत् यक्षं इति एतत् विजानीहि ( नंतर देवांनीं वायूस पाचारण करून त्याला त्या यक्षाचें स्वरूप समजून घेऊन येण्यास सांगितलें. ॥ ७ ॥

---

## मंत्र आठवा.

**अन्वय व अर्थ**—तत् अभ्यद्रवत् ( तो अति त्वरेनें यक्ष होता त्या ठिकाणाकडे गेला. ) कः असि इति तं अभ्यवदत् अहं वायुः वा अस्मि इति अहं मातरिश्वा वा अस्मि इति अब्रवीत् ( यक्षानें वायूचें नांव विचारलें तेव्हां त्यानें आपलें नांव सांगून 'मला मातरिश्वा म्हणतात' असेंही वर्तमान तो आपणच सांगता झाला. ॥ ८ ॥

---

## मंत्र नववा.

**अन्वय व अर्थ**—तस्मिन् त्वयि किं वीर्यं इति ( तुझें सामर्थ्य काय आहे असें वायूस विचारिलें, तेव्हां ) यत् इदं पृथिव्यां सर्वं अपि इदं आददीय* ( तेव्हां वायु म्हणाला पृथ्वीमध्यें म्हणजे ( विश्वामध्यें ) जें काय आहे त्या सर्वांचें मी ग्रहण करूं शकतों. ) ॥ ९ ॥

---

## मंत्र दहावा.

**अन्वय व अर्थ**—तस्मै तृणं निदधौ ( यक्षानें त्याच्यापुढें तीच गवताची काडी ठेविली. ) एतत् आदत्स्व इति ( ही काडी तूं उचल असें यक्ष म्हणाला. ) तत् उपप्रेयाय सर्वजवेन तत् आदातुं न शशाक ( त्या काडीजवळ वायु गेला आणि आपलें सर्व बल खर्च करून ती काडी उचलण्याचा प्रयत्न त्यानें केला, पण व्यर्थ ! ) स ततः एव निववृते यत् एतत् यक्षं इति विज्ञातुं न अशकं ( तो अग्नीप्रमाणेंच हिरमुसला होऊन परत गेला आणि देवांस म्हणाला कीं, तेथें जाऊन मला कांहीं एक समजलें नाहीं. )

---

* कोठें कोठें 'आददीयं' असा पाठ आढळतो.

अग्नीची व वायूची एकच अवस्था झाली. म्हणजे स्वतःच्या सामर्थ्यानें अग्नीला गवताची एक काडी जाळतां आली नाहीं किंवा वायूला तीच काडी उचलतां आली नाहीं. या एका गोष्टीवरूनच जीव केवळ्याही मोठ्या योग्यतेचा असला तथापि ब्रह्माच्या किंवा ईश्वराच्या अनुग्रहाशिवाय स्वसामर्थ्यानें त्याला कांहींएक करितां येत नाहीं हें स्पष्ट झालें. मग आपल्या इंद्रियांची, मनाची अथवा प्राणाची वार्ता कशाला पुसावी ? अर्थातच जीवाला कर्तृत्वाचा अभिमान असतो तो व्यर्थ आहे, हें सिद्ध झालें. याप्रमाणें जोंपर्यंत अभिमानवृत्ति कायम आहे, तोंपर्यंत जीवास स्वरूपाचें ज्ञान व्हावयाचें नाहीं हेंही ठरलें. मातरिश्वा हें नांव पूर्वी अग्नीचें होतें असें दिसतें. स्वर्गातून पृथ्वीवर अग्नि आणिला तो यानेंच; तथापि वेदाच्या उत्तर कालांत मातरिश्वा हें नांव वायूला मिळालें. या पदाचें निर्वचन शंकराचार्यांनीं आपल्या भाष्यांत केलें आहे, तें वाचकांनीं पाहिलेंच असेल.

---

## मंत्र अकरावा.

अन्वय व अर्थ—अथ इंद्रं अब्रवन् मघवन् किं एतत यक्षं इति एतत् विजानीहि ( नंतर देवांनीं इंद्रास यक्षस्वरूप समजून घेण्याची विनंति केली.) तथा इति तत् अभ्यद्रवत् तस्मात् तिरोदधे (बरें आहे असें म्हणून इंद्र त्वरेनें तिकडे गेला, तों यक्ष अंतर्धान पावला, गुप्त झाला !)

यावरून श्रुतीचा अभिप्राय असें दाखविण्याचा दिसतो कीं; इंद्राला अतिशय गर्व झाला होता म्हणून ब्रह्माला इंद्राबरोबर बोलावें असें सुद्धां वाटलें नाहीं. अर्थातच इंद्रास वाईट वाटलें, त्यानें आपल्या गर्वाचा त्याग केला, आणि यक्षस्वरूप समजेतोंपर्यंत येथेंच चिंतन करित रहावयाचें, अग्निवायूंप्रमाणें परत जावयाचें नाहीं, असा विचारी व दृढ निश्चयी इंद्रानें संकल्प केला. ॥ ११ ॥

---

## मंत्र बारावा.

अन्वय व अर्थ—तस्मिन् एव आकाशे बहु शोभमानां हैमवतीं उमां स्त्रियं आजगाम ( जेथें यक्ष गुप्त झाला होता त्याच आकाशामध्यें एक अतिलावण्यवती व सुवर्णालंकारभूषित अशी उमा नांवाची स्त्री प्रकट झाली. ) सः तां किं एतत् यक्षं इति उवाच ह ( इंद्रानें त्या स्त्रीला बहुमानपूर्वक विचारलें कीं, ही जी तेजस्वी वस्तु येथें गुप्त झाली, ती कोण ? )

ही उमा नामक स्त्री म्हणजे हिमालयाची कन्या आणि शंकरपत्नी उमा होय. उमा म्हणजे मूर्तिमंत ब्रह्मविद्या आहे. इंद्राचा निश्चय पाहून ब्रह्मविद्येनें त्याला प्रत्यक्ष दर्शन दिलें व त्यानेंही ब्रह्मस्वरूपाविषयीं पृच्छा केली, हें जसें व्हावें तसेंच झालें. ॥ १२ ॥

येथें तिसरा खंड समाप्त झाला. या खंडांत स्पष्ट सांगितलें आहे कीं, आपल्या स्वतःच्या बलावर कोणतीही गोष्ट करण्याचें जीवाला किंवा जीवदेवांच्या इंद्रियांस सामर्थ्य नाहीं. अर्थातच कर्तृत्वाचा अभिमान येथें व्यर्थ होतो. इतकेंच नाहीं तर तो आपल्या परम कल्याणाच्या आडही येतो. तेव्हां कितीही ज्ञान झालें, आपलें केवढेंही मोठें सामर्थ्य असलें, तसेंच जगामध्यें आपली कोणत्याही तऱ्हेची श्रेष्ठता अथवा मानमान्यता असली, तथापि सर्वज्ञ अग्नीच्या, सामर्थ्यशील वायूच्या, श्रेष्ठ आणि देवमान्य इंद्राच्या उदाहरणांवरून आपण जीवांनीं हा बोध घ्यावयास हवा कीं, आपणास देहाचा अभिमान किंवा विषयांची वासना यांचा यत्किंचित् जरी स्पर्श झाला, तरी आपल्यास स्वरूपज्ञान होत नाहीं, आपण कृतार्थही होत नाहीं आणि भयशोकात्मक जो संसार त्यांतून पार पडत नाहीं. वरील गोष्टींतील देवांस ब्रह्मस्वरूप दिसूनही त्यांचें त्यांस अपरोक्ष ज्ञान झालें नाहीं! त्याचें कारण अभिमानाची जागृति हें होय.

येथें ब्रह्म यक्षरूपानें अवतीर्ण झालें व अग्नि-वायूंशीं त्यानें संवाद केला, इत्यादि गोष्टी विलक्षणशा वाटतील; तथापि लहान-थोरांस ब्रह्मस्वरूपाचा महिमा काय आहे, हें लक्षांत यावें म्हणून अरूप असणाऱ्या ब्रह्मास श्रुतीनें सरूप केलें आहे आणि वाणीच्या आश्रयाची अपेक्षा नसणाऱ्या ब्रह्माकडून अग्नि-वायूंशीं संवाद करविला आहे. हा अर्थवाद आहे. याचें खरें तात्पर्य हें आहे कीं, प्रत्येक वस्तूमध्यें ब्रह्म ओतप्रोत भरलें असतांही आपल्या उपाधींच्या अडचणीमुळें तें स्वरूप आपल्यास समजत नाहीं; पण जीवांच्या दृष्टीनें विचार केला म्हणजे ब्रह्माला जीवांच्या कल्याणासाठीं सरूप व्हावें लागतें. चित्त शुद्ध होण्याला जशी कर्मांची आवश्यकता असते, त्याप्रमाणें उपासनेचीही असते. साकार स्वरूपाव्यतिरिक्त उपासनेचा उदय होत नाहीं. म्हणून श्रुतीनें येथें यक्षस्वरूपाचा अवतार केला आहे.

---

# खंड चवथा.

## मंत्र पहिला.

अन्वय व अर्थ—ब्रह्म इति सा उवाच ह ( उमा देवी म्हणाली, तें ब्रह्म होतें. ) ब्रह्मणः विजये वै एतत् महीयध्वं इति ( आणि ब्रह्माच्या साहाय्यानें तुम्हां देवांस विजय मिळाला म्हणून तुमचें ऐश्वर्य वाढलें आहे. हा

महिमा खरोखर ब्रह्माचाच आहे.) **ततः ब्रह्म इति विदाञ्चकार** (नंतर इंद्राला कळलें कीं, तें ब्रह्म होतें.)

गुरुमुखानें ऐकिल्याशिवाय ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान-विज्ञान होत नाहीं, असें या मंत्राचें स्पष्ट सांगणें आहे. ॥ १ ॥

---

## मंत्र दुसरा.

**अन्वय व अर्थ—यत् अग्निः वायुः इंद्रः ते हि एनत् नेदिष्ठं पस्पर्शुः** (ज्या अर्थी अग्नि, वायु, इंद्र ह्या देवांस ह्या ब्रह्माचा अत्यंत निकट संबंध झाला.) **ते हि एनत् ब्रह्म इति प्रथमः विदाञ्चकार** (आणि ज्याअर्थी ह्या देवांस ब्रह्माचें प्रथम ज्ञान झालें) **तस्मात् वै एते देवाः अन्यान् देवान् अतितरां इव** (त्याअर्थी हे देव इतर देवांपेक्षां श्रेष्ठ होत असेंच ठरलें म्हणावयाचें!) व ह्या मंत्रांत अग्नि, वायु आणि इंद्र हे देव इतर देवांपेक्षां श्रेष्ठ कां, याचें कारण सांगितलें आहे. त्यांनां ब्रह्म अतिशय जवळ जाऊन पहावयास सांपडलें आणि 'हें ब्रह्म आहे' असें ज्ञान त्यांस प्रथम झालें म्हणून त्यांस श्रेष्ठत्व आलें.)

'विदाञ्चकार' हें एकवचनी रूप आहे. वास्तविक येथें अनेकवचन पाहिजे होतें. तसेंच मंत्रामध्यें 'प्रथमः' हें पद क्रियाविशेषणासारखें आहे, असें अर्थाच्या दृष्टीनें दिसतें. व्याकरणाच्या दृष्टीनें मात्र तें सविभक्तिक विशेषण आहे, अव्यय नाहीं, असें दिसेल. तसेंच इव या पदाचाही नीटसा अर्थ लागत नाहीं. अर्थात् हे सर्व आर्ष प्रयोग आहेत म्हणून तरी निर्वाह केला पाहिजे किंवा इव या शब्दाला अर्थ नाहीं आणि प्रथमः हें पद इंद्राचा उल्लेख करण्याकरितां घातलें असलें पाहिजे, असें तरी समजलें पाहिजे. या दुसऱ्या पक्षांतही व्याकरणाचा घोटाळा राहतोच. सारांश, या मंत्रांत प्रयोगदृष्टीनें व्याकरणाच्या बऱ्याच अडचणी आर्षयोजनेनें उत्पन्न झाल्या आहेत. ॥ २ ॥

---

## मंत्र तिसरा.

**अन्वय व अर्थ—तस्मात् वै इंद्रः अन्यान् देवान् अतितरां इव हि सः एतत् नेदिष्ठं पस्पर्श सः हि एनत् ब्रह्म इति प्रथमः विदाञ्चकार** (त्याच कारणासाठीं म्हणजे अत्यंत निकटसंबंध होऊन प्रथम इंद्राला ब्रह्मज्ञान झालें म्हणून तो इतर देवांपेक्षां श्रेष्ठ झाला. याही मंत्रांत पूर्वीच्या

दोन अडचणी आहेतच. प्रथमः या पदानें इंद्राचा बोध होतो, म्हणून विदाञ्चकार या एकवचनी क्रियापदाचा अन्वय बरोबर लागतो. इव या पदाच्या अर्थाची अडचण मात्र दूर होत नाहीं. असो.)

सारांश, हा आहे कीं, अग्नि व वायु यांच्यापेक्षां इंद्र श्रेष्ठ आहे असें ठरलें. कारण त्याला उमेकडून म्हणजे प्रत्यक्ष ब्रह्मविद्येकडून ब्रह्मज्ञान प्रथम झालें. अर्थातच तो सर्व देवांच्यापेक्षां-अग्निवायूंपेक्षां-श्रेष्ठ म्हणून सर्वश्रेष्ठ झाला. ॥३॥

---

## मंत्र चवथा.

अन्वय व अर्थ—**तस्य एषः आदेशः** ( त्याचा म्हणजे प्रत्यक्ष दर्शन देऊन एकदम गुप्त झालेल्या ब्रह्माचा उपदेश पुढील उपमेनें सिद्ध होतो. ) **यत् एतत् विद्युतः व्यद्युतत् आ इति** ( जें हें विजांच्या प्रकाशाप्रमाणें एकदम प्रकाशित झालें. ) **न्यमीमिषत् आ इति** ( आणि ज डोळ्याची पापणी लवते न लवते त्याप्रमाणें प्रत्यक्ष दर्शन देऊन गुप्त झालें. ) **इति अधिदैवतम्** ( याप्रमाणें हा देवांच्या दृष्टीनें उपदेश झाला.)

सारांश, ब्रह्म कसें दिसलें हें सांगण्यासाठीं दोन दैवी उपमांचा आधार घेऊन सांगितलें आहे कीं हजारों विद्युत्-तेजाच्या प्रकाशाप्रमाणें व तेजस्वी नेत्रांच्या उघड-झांपीप्रमाणें ब्रह्माचा आविर्भाव व तिरोभाव झाला. ब्रह्म प्रकट झालें व गुप्तही झालें. येथें ' उपमा अलंकार ' आहे.

ज्याप्रमाणें वीज ही प्रत्यक्ष दिसल्याबरोबर यच्चयावत् सर्व पदार्थांस प्रकाशित करते, त्याप्रमाणें अथवा, विद्युत्-प्रकाशाच्या अनंतपट तेजापेक्षां जास्त तेजानें ब्रह्म प्रकाशित होऊन त्यानें सर्व विश्व तेजःसमुद्रामध्यें बुडवून टाकिलें. अर्थातच हा दिव्य प्रकाश होता. नंतर ब्रह्माचें दर्शन जवळ जाऊन घ्यावें, असा इंद्रानें विचार केल्याबरोबर तें विलक्षण दिव्य तेज एका क्षणाच्या सहस्रांशाच्या अवधींत लुप्त झालें. डोळ्याची उघड, झांप होण्यास जो वेळ लागतो, त्याच्या किती तरी कमी वेळांत हें तेज एकदम नाहींसें झालें! येथें तेजाची उपमा घेतली आहे, म्हणून या ब्रह्मवर्णनाला अधिदैवत असें नांव दिलें आहे. देवांस दर्शन झालें म्हणूनही हें नांव दिलें, असेंही म्हणणें शोभेल.

मुख्य तात्पर्य हें आहे कीं, येथें ब्रह्माचें सामर्थ्य किती आहे, हें दाखवावयाचें आहे. तें सर्वज्ञ असूनही जीवाच्या नेत्रांस तें कसें अगोचर असतें, हे येथें दाखविलें आहे. असो; तेजोरूपानें तरी ब्रह्माची उपासना करावी, यासाठीं ब्रह्माचें वर्णन आपणास प्रत्यक्ष होणाऱ्या विजेच्या तेजोरूपानें केलें आहे. ॥४॥

## मंत्र पांचवा.

**अन्वय व अर्थ**—**अथ अध्यात्मं** ( आतां यानंतर अध्यात्म दृष्टीनें ब्रह्मोपासना कशी करावी हें सांगतात. ) **यत् एतत् मनः गच्छति इव** ( आपलें मन याच्याकडे जणुं कांहीं जातच असतें ) **अनेन च एतत् उपस्मरति** ( हें मन याचें नित्य स्मरण करतें ) **अभीक्ष्णं संकल्पः** ( संकल्प वारंवार करितें. )

सारांश, उपासकानें आपलें मन ब्रह्माकडेच जणुं कांहीं जात आहे, ब्रह्माचें स्मरण नित्य करित आहे आणि ब्रह्मस्वरूपाचा निश्चय-निदान संकल्प तरी वारंवार करित आहे, अशी वृत्ति ठेवावी.

आपलें मन ब्रह्माकडे लागलें आहे, आपल्यास त्याचें वारंवार स्मरण होत आहे आणि आपली बुद्धिवृत्तिही तदाकार होत आहे; सारांश, मनोरूप ब्रह्म आहे अशी उपासना करावी. ही मनोरूप उपासना सांगितली म्हणून या उपासनेला अध्यात्मउपासना म्हटलें आहे. या मंत्रांत 'उत्प्रेक्षा' अलंकार आहे. ॥५॥

---

## मंत्र सहावा.

**अन्वय व अर्थ**—**तत् ह तद्वनं नाम** ( त्या ब्रह्माचें तद्वन हें नांव आहे. तद्वन याचा अर्थ तें सर्वव्यापी असून सर्व जीवांनीं उपास्य आहे, असा केला आहे. ) **तद्वनं इति उपासितव्यं** ( तद्वन या नांवाचा जप करून ब्रह्माची उपासना करावी. ) **यः एतत् एवं वेद** ( ज्या पुरुषाला ब्रह्माची तद्वन या नांवानें ओळख झाली व या नामाच्या जपानें ती उपासना सिद्ध झाली. ) **सः** ( तो खरा उपासक होय. ) **एनं सर्वाणि भूतानि अभिसंवाञ्छन्ति** ( या पुरुषाची संगति करावी, याचा अनुग्रह संपादन करावा, असें सर्व भूतांस वाटतें. )

सारांश, सर्वत्र ब्रह्म पसरलें आहे आणि सर्व स्वरूपांमध्यें तेंच उपास्य आहे, असा निश्चय करून जो पुरुष ब्रह्मनामाचा अखंड जप करितो आणि आपली नामोपासना सिद्ध करितो, तो पुरुष सर्ववंद्य होऊन त्याचा अनुग्रह आपल्यावर असावा, अशी लोक इच्छा करितात.

हा नामोपासनेचा प्रकार होय. ही उपासना करणारा पुरुष शांत आणि सर्वकल्याणकर्ता असतो, म्हणून लोक त्याच्या संगतीस राहण्याची इच्छा करितात. तसेंच या नामोपासकावर भक्तवत्सल परमेश्वराचा अनुग्रह झाला

आहे, असें पाहून जीवांस परमेश्वराच्या वात्सल्याची ओळख पटते आणि तेही या पुरुषाच्या संगतीनें परमेश्वरभक्ति करावयास लागतात. ॥ ६ ॥

याप्रमाणें चवथ्या, पांचव्या व सहाव्या मंत्रांत परमेश्वराची अथवा सगुण ब्रह्माची उपासना कशी करावी हें सांगितलें आहे. प्रथम तेजोरूपानें, नंतर मनोरूपानें आणि सहावे मंत्रांत नामरूपानें उपासना करावी, हें सांगितलें. अर्थातच ज्या पुरुषांची चित्तशुद्धि झाली नाहीं व म्हणून ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान होण्याचा ज्यांस अधिकार प्राप्त झाला नाहीं, तथापि ब्रह्मस्वरूप समजावें आणि मुक्त व्हावें असें ज्या पुरुषांस वाटतें, त्यांचें चित्त शुद्ध होण्यासाठीं व त्यांस ब्रह्मज्ञानाचा अधिकार प्राप्त व्हावा एतदर्थ, या तीन मंत्रांत तीन निरनिराळ्या उपासना सांगितल्या आहेत. यांचा स्वीकार करून जीवानें आपलें चित्त शुद्ध करून घ्यावें आणि मोक्ष मिळविण्याचें जें ज्ञानसाधन तें स्वीकारण्याचा अधिकार आपल्यास प्राप्त होईल, अशी प्रत्येक मुमुक्षूनें व्यवस्था करावी. हें या मंत्राचें तात्पर्य आहे. या खंडांतील पहिल्या व दुसऱ्या मंत्रांत ब्रह्माचें परोक्ष व अपरोक्ष ज्ञान झालें असतां श्रेष्ठपणा कसा प्राप्त होतो, हें प्रत्यक्ष उदाहरणें देऊन सांगितलें आहे. तसेंच साक्षात्कार होईपर्यंत सगुणस्वरूपाची उपासना करावी हें येथें विहित केलें आहे.

---

## मंत्र सातवा.

अन्वय व अर्थ—भोः उपनिषदं ब्रूहि (आचार्य महाराज! मला उपनिषदाचा उपदेश करा.) ते उपनिषत् उक्ता (तुला उपनिषदाचा उपदेश आम्ही आधींच केला आहे.) ते ब्राह्मीम् उपनिषदं अब्रूम इति (आम्हीं तुला ब्राह्मी उपनिषदाचा, ब्रह्मस्वरूप प्रतिपादन करणाऱ्या उपनिषदाचा उपदेश मागेंच केला आहे.)

सारांश, उपासनेचा चाललेला विचार ऐकून साधकानें आचार्यास प्रार्थना केली कीं, मला आपण ब्रह्मस्वरूपाचें प्रतिपादन करावें. तेव्हां आचार्यांनीं त्यास सांगितलें कीं, पहिल्या व दुसऱ्या खंडामध्यें केवल ब्रह्मस्वरूपाचें संपूर्ण प्रतिपादन आम्हीं केलेंच आहे, आतां त्यासंबंधानें नवीन असें कांहीं सांगावयाचें राहिलें नाहीं. उपासनेचा प्रकार जो तुला सांगितला व देव-दानवांच्या युद्धाची कथा सांगितली, ती तुझ्या निमित्तानें मंद अधिकारी लोकांसही उपदेश व्हावा यासाठीं सांगितली आहे. आतां एकच गोष्ट सांगावयाची राहिली आहे, ती सांगून आम्हीं आपलें प्रवचन संपवितों. ॥ ७ ॥

## मंत्र आठवा.

**अन्वय व अर्थ—तस्यै तपः दमः कर्म इति प्रतिष्ठा** ( या ब्रह्मज्ञानाचें स्थापन तप, दम आणि कर्म यांच्यावर होत असतें.) **वेदाः सर्वांगानि** ( सर्व वेद हे ब्रह्मज्ञानाचीं निरनिराळीं अंगें आहेत. ) **सत्यं आयतनं** ( आणि सत्य हें ब्रह्मविद्येचें वसतिस्थान आहे. )

सारांश, ब्रह्मविद्येचा प्रासाद उभारण्यासाठीं तिला तप, दम ( इंद्रियनिग्रह ) आणि कर्म ( वेदविहित विधिनिषेधात्मक नित्य नैमित्तिक कर्में ) यांचा आधार द्यावा लागतो. तप, दम आणि कर्म हीं योग्य रीतीनें सिद्ध झाल्याशिवाय ब्रह्मविद्येची इमारत उभी करितां येत नाहीं. ब्रह्मविद्येचे अवयव म्हणजे सर्व वेद होत. आणि सत्य हें तिचें राहण्याचें घर आहे.

या मंत्रांत ब्रह्मविद्येला आरंभ करण्याचे पूर्वी काय काय गोष्टी केल्या पाहिजेत तें सांगितलें आहे. सुखदुःखें समाधानानें सहन करण्याचें सामर्थ्य असणें, मन व इंद्रियें आपल्या सर्वथा स्वाधीन करून घेणें आणि विहित उपासनेसह नित्यनैमित्तिक कर्में निष्काम आणि निरभिमान बुद्धीनें करणें, सारांश, चित्ताची शुद्धि उत्तम प्रकारानें करणें, ही गोष्ट सिद्ध झाल्याशिवाय ब्रह्मज्ञान-विज्ञान व्हावयाचें नाहीं. चित्तशुद्धि हा ब्रह्म-विद्येचा पाया आहे. पाया ठीक नसेल तर वरील इमारत उभी करितां येत नाहीं, किंवा इमारत तयार झाली तरी ती फार वेळ टिकत नाहीं; त्याप्रमाणें ज्या पुरुषाचें अंतःकरण शुद्ध झालें नाहीं, त्याला ब्रह्मज्ञान व्हावयाचें नाहीं आणि यथाकथंचित् झालेंच तर विपरीत ज्ञान मात्र होईल. म्हणून प्रथम मुमुक्षूनें चित्तशुद्धि करून घेतली पाहिजे. दुसरी गोष्ट ध्यानांत ठेवावयाची ती ही आहे कीं, ब्रह्मज्ञान होतें तें श्रुतीन प्रतिपादन केलेल्या ज्ञानमार्गानें मात्र होतें. येथें शुद्ध मानवी तर्काचें कांहीं एक चालावयाचें नाहीं. ब्रह्मज्ञान होण्याला श्रुतीनें सांगितलेलें ज्ञान हें काय तें एक साधन आहे. श्रुतिबाह्यज्ञानाचा मात्र स्वीकार केला असतां ब्रह्मज्ञान केव्हाही व्हावयाचें नाहीं, आणि तिसरी गोष्ट ध्यानांत ठेवावयाची ती ही कीं, आपलें चिंतन नेहमीं सद्रूप असेल तर—आपली वाणी सद्रूप असेल आणि आपलें आचरण सद्रूप असेल तर—ही विद्या आपल्याजवळ चिरकाल वास्तव्य करील. याप्रमाणें ब्रह्मविद्येला चित्तशुद्धीची, श्रुतिज्ञानाची आणि सत्यज्ञान, सत्यधर्मी व सत्य आचार, यांची अपेक्षा आहे. ॥ ८ ॥

## मंत्र नववा.

**अन्वय व अर्थ—यः वै एतां एवं वेद** ( ज्या पुरुषाला याप्रमाणें ब्रह्मविद्येचें ज्ञान झालें–तो–) **पाप्मानं अपहत्य** ( आपल्या सर्व पापी वृत्तींच्या कारणांचा नाश करून ) **अनंते ज्येये स्वर्गे लोके प्रतितिष्ठति** ( अनंत आणि अतिश्रेष्ठ अशा सुखरूप भुवनामध्यें चिरकाल राहतो. )

सारांश, स्पष्टच आहे. ज्याला या उपनिषदांत सांगितल्याप्रमाणें ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान झालें आहे, आणि त्याच्या साधनांचें परिपूर्ण ज्ञान झालें आहे, तो पुरुष आपल्या कर्तृत्वभोक्तृत्वरूपी अज्ञानाचा विध्वंस करून असें स्थान पावतो कीं, जें अनंत आहे, 'शुद्ध आहे', सर्वश्रेष्ठ आहे, आणि सुखरूप आहे. सारांश तो ब्रह्मरूप होऊन मुक्त होतो. ॥ ९ ॥

याप्रमाणें चवथ्या खंडांत सगुण ब्रह्माचें उपमा दृष्टीनें स्वरूप वर्णन, उपासनेचे मार्ग आणि ब्रह्मविद्येचीं मुख्य साधनें, यांचा निर्देश झाला आहे. पहिल्या खंडांत ब्रह्मविद्येचें परोक्षतः रूपवर्णन केलें. दुसरे खंडांत अपरोक्ष ज्ञानाचें संकीर्तन केलें. तिसरे खंडांत एक आख्यायिका सांगून चित्तशुद्धि झाली नसेल तर ब्रह्मज्ञान होण्यास प्रत्यवाय उत्पन्न होतो, असें सांगून चवथ्या खंडांत स्वरूपज्ञानाचा उपदेश केला व ब्रह्मविद्येच्या मुख्य साधनांचा निर्देश केला. याप्रमाणें या उपनिषदाचें विवरण संपलें. इतर गोष्टींचा विचार करावयाचा तो उपसंहाराचे वेळीं करूं असें सांगून हें प्रकरण येथेंच आटोपितों.

येथें संपादकाचें विवरण समाप्त झालें.

ॐ

# कठोपनिषत्

चिंतामण गंगाधर भानु

कृत

महाराष्ट्र विवरणम्

# काठकोपनिषत् ।

## ( संपादकाचें विवरण. )

## अध्याय पहिला.

### वल्ली पहिली.

#### श्रीगणेशाय नमः

कठोपनिषदाच्या पहिल्या वल्लींत ब्रह्मविचाराच्या पूर्व-तयारीचें वर्णन आहे. विषय, अधिकार, संबंध इत्यादि अनुबंधचतुष्टयाचा विचार करून मुमुक्षु अधिकारी कसा असावा, याचें खासें वर्णन या वल्लींत आहे. अन्वय व अर्थ यांचाही फारसा घोंटाळा नाहीं. सामान्यतः अन्वयार्थ सरळच आहेत. म्हणून पदें निराळीं न करितां एकदम अर्थासह अन्वय देण्याचा संकल्प केला आहे. जेथें कांहीं भानगडीचा प्रकार दिसेल, तेथें स्पष्ट अन्वय व अर्थ द्यावयाचे आहेतच. इतकी प्रस्तावना करून मी आपल्या विवरणाला आरंभ करितों.

### मंत्र पहिला.

**अर्थासह अन्वय—उशन् ह वाजश्रवसः सर्ववेदसं वै ददौ** ( वाजश्रवस नांवाच्या एका ऋषीनें 'विश्वजित्' नामक यज्ञ केला. या यज्ञांत आपली सर्व संपत्ति दान करावी, असा विधि आहे. उत्तम फलप्राप्ति व्हावी, या हेतूनें वाजश्रवस हा यज्ञ करिता झाला. ) **तस्य नचिकेता नाम पुत्रः आस ह** ( वाजश्रवसाला नचिकेता या नांवाचा पुत्र होता. )

या मंत्रांत 'ह' 'वै' इत्यादि अव्ययें आहेत, त्यावरून असा बोध करून द्यावयाचा कीं वाजश्रवस व नचिकेता हे इतिहास-प्रसिद्ध पुरुष होते. शिवाय पूर्ववृत्त सांगावयाचें असलें म्हणजे वेदकालीं या अव्ययांची योजना करीत असत. आपल्यास कांहीं फल प्राप्त करून द्यावयाचें असेल तर फलानुसार शास्त्रोक्त यज्ञयाग करून त्या त्या देवतेची आराधना करावी व तिला प्रसन्न करून घ्यावें, हा पूर्वकालीन संप्रदाय ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. ॥ १ ॥

## मंत्र दुसरा.

**अर्थासह अन्वय—दक्षिणासु नीयमानासु कुमारं सन्तं तं श्रद्धा आविवेश ह** ( यज्ञांतील ऋत्विज् यज्ञीय दक्षिणा नेत आहेत, तें पाहून कुमारवयस्क नचिकेत्याच्या मनांत श्रद्धा उत्पन्न झाली ) **सः अमन्यत** ( तो विचार करूं लागला ).

यज्ञामध्यें आपल्या बापानें ज्या दक्षिणारूपी गाई दिल्या, त्या पाहून नचिकेत्याच्या मनांत विपरीत विचार उत्पन्न झाला. नचिकेता लहान होता, तरी त्याचे विचार पोक्त होते. जी आपण दक्षिणा म्हणून देतों ती चांगली व उपयुक्त असावी, असें शास्त्र आहे. या निरावाध शास्त्रनियमाचें चिंतापूर्वक स्मरण होणें ही आस्तिक बुद्धि किंवा श्रद्धा होय. ॥ २ ॥

---

## मंत्र तिसरा.

**अर्थासह अन्वय—पीतोदकाः, जग्धतृणाः, दुग्धदोहाः, निरिंद्रियाः ताः ददत्, सः ते अनन्दाः नाम लोकाः, तान् गच्छति** ( जो पुरुष उदक प्यालेल्या, तृण भक्षिलेल्या, दूध काढलेल्या व इंद्रियगलित झालेल्या गाईचें दान करितो, तो यजमान ' अनंद ' नांवाच्या लोकांप्रत जातो. )

नचिकेत्यानें पाहिलें कीं आपल्या बापानें ज्या गाईचें दान केलें आहे, त्या गाई अत्यंत वृद्ध झालेल्या आहेत, त्यांना खाण्यापिण्याचें, दूध देण्याचें किंवा प्रजोत्पादनाचें सामर्थ्य नाहीं, इतक्या त्या म्हाताऱ्या झाल्या आहेत. सारांश, दान देण्याला त्या धेनु अत्यंत निरुपयोगी आहेत, असें जेव्हां ह्या पोक्त विचारी बालकानें पाहिलें, तेव्हां त्याला शास्त्रनियमाचें स्मरण झालें. ' निरुपयोगी वस्तूंचें दान करणाऱ्या यजमानाला सुखशून्य लोकांत जाऊन रहावें लागतें ' ह्या शास्त्रोक्त दंडाची त्याला आठवण होऊन वाईट वाटलें. आपल्या बापाची गति दुःसह—दुःखात्मक—होणार, असें पाहून कोणत्या पितृभक्त पुत्राला दुःख होणार नाहीं ? किंवा कोणता पितृवत्सल पुत्र आपल्या वडिलांवर आले प्रसंगाचा प्रतीकार करण्यासाठीं प्रयत्न करणार नाहीं ? नचिकेता सत्पुत्र होता, तेव्हां त्याच्या मनांत वरील विचार आले व पितृ—संकट निवारण करण्याचा संकल्पही त्यानें केला. हे विचार व हा संकल्प, ही वर सांगितलेली श्रद्धा होय. ॥ ३ ॥

---

## मंत्र चवथा.

**अर्थासह अन्वय—सः पितरं उवाच ह "तत! कस्मै मां दास्यसि" इति द्वितीयं तृतीयं तं उवाच ह। "मृत्यवे त्वां ददामि" इति** (असा विचार व संकल्प करून नचिकेता बापाजवळ गेला आणि त्याला म्हणाला ताता! माझें दान तुम्ही कोणत्या ऋत्विजाला करणार? हा प्रश्न त्यानें दोनदां, तीनदां, विचारला. तेव्हां तो म्हणाला: 'तुझें दान मी मृत्यूला करणार आहें!"

'आपण सच्छील आहों' असा दृढविश्वास असणाऱ्या नचिकेत्यानें आस्तिक-बुद्धीनें असा संकल्प केला होता कीं आपलें स्वतःचें दान करून घेऊन तरी बापाचा यज्ञ यथासांग करावा. सारांश, पितृयज्ञाची सांगता व्हावी, म्हणून नचिकेत्यानें आपलें स्वातंत्र्यही समर्पण करण्याचा निश्चय केला. तो बापाकडे गेला आणि विचारिता झाला कीं 'बाबा! माझें दान कसें व कोणास करणार आहां?' हेतु हा कीं कोणा तरी ऋत्विजाला आपलें समर्पण करून बापानें स्वयज्ञाची पूर्तता करावी. पण बापाला हा नचिकेत्याचा भाविक हेतु समजला नाहीं. 'पोर कांहीं तरी बडबडत आहे' असें वाजश्रवसाला वाटून त्यानें तिकडे दुर्लक्ष्य केलें. पण दोनदां तीनदां जेव्हां तोच तोच प्रश्न मुलानें केला, तेव्हां संतापून जाऊन तो क्रोधभरांत म्हणाला कीं 'मी तुला मृत्यूला देणार आहें!' मुलानें फार त्रास दिला म्हणजे जसा सामान्य बाप 'जा, मर कारट्या!' म्हणतो, त्याप्रमाणें वाजश्रवसानें हे वरील कठोर उद्गार काढले. ॥४॥

---

## मंत्र पांचवा.

**अर्थासह अन्वय—बहूनां प्रथमः एमि, बहूनां मध्यमः एमि** (मी पुष्कळांपैकीं पहिला आहें व पुष्कळांपैकीं मध्यम आहें.) **यमस्य किंस्वित् कर्तव्यं यत् अद्य मया करिष्यति** (—पण—यमाचें असें कोणतें कार्य आहे कीं जें माझें साहाय्य घेऊन यमधर्मराज पूर्ण करणार आहे?)

बापाचें हें कठोर भाषण ऐकून नचिकेता म्हणाला: 'आपण मला दक्षिणा म्हणून यमाला देत आहांत, हें ठीक आहे. आजपर्यंत अनेक यजमानांनीं अनेक प्रकारची दक्षिणा दिली आहे. पण जिवंत पुरुषाची दक्षिणा देणें व घेणें हा पहिलाच प्रसंग आहे व ह्या दृष्टीनें हें दान पहिल्या म्हणजे उत्तम प्रतीचें आहे. तसेंच, आंचें जपर्यंत पुष्कळ दानें दिलीं घेतलीं व यापुढेंही पुष्कळ दानें दिलीं घेतलीं, तरीहि. तेव्हां माझी दक्षिणा (दक्षिणारूपानें माझें दान) मध्यें पडते. हें

सर्व नीट आहे, पण मला हें समजत नाहीं कीं अशी दक्षिणा घेऊन यमाला कोणता लाभ होणार आहे ? उपयोगीं पडावें म्हणून सामान्यतः लोक दान देतात व घेतात. पण माझें दान घेऊन यमाला काय उपयोग होणार ? दुसऱ्या कोणा ऋत्विजाला मला देऊन टाकिलें असतेंत, तर त्या ऋत्विजाला माझा कांहींतरी उपयोग झाला असता. पण मृत्यूला माझा कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं. तथापि मला देऊन टाकणार त्याअर्थीं मी यमाकडे जाण्याला सिद्ध आहें. याचा असाही अर्थ करावा कीं, पुत्रानें आपल्या ठिकाणीं विचार करून ठरविले कीं गुणानें व आचरणानें मी पहिल्या प्रतीचा आहें. निदान मध्यमप्रतीचा तरी आहें. याप्रमाणें मी कोणाच्याही पदरीं पडलों तरी माझा त्याला उपयोगच होईल. पण यमाला देऊन टाकलें तर माझा त्याला काय उपयोग होणार व पित्याचा यज्ञ तरी या दानानें कसा सांग होणार ? ॥ ५ ॥

---

## मंत्र सहावा.

**अन्वय—यथा पूर्वे अनुपश्य, तथा अपरे प्रतिपश्य** ( पूर्वीच्या लोकांनीं काय केलें, तें विचार करून पहा; तसेंच, प्रस्तुतचे लोक कसे वागतात, हें ध्यानांत आणा ) **मर्त्यः सस्यं इव पच्यते, पुनः सस्यं इव आजायते** ( जो म्हणून मर्त्य प्राणी आहे तो तृण किंवा तृण-धान्य, यांच्याप्रमाणें पिकून जातो व पुनः त्यांच्याप्रमाणेंच जन्माला येतो ).

नचिकेता पुढें म्हणालाः मी यमाकडे जाणार म्हणजे मरणार. पण यांत काय आहे ? हा मर्त्य देह वृद्ध झाला म्हणजे तो गवतासारखा पिकून गळावयाचा व पुनः वेळ आली म्हणजे जिवंत व्हावयाचा. तेव्हां देहाची काळजी करण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं. जीवानें संभाळावयाचें, तें आपलें शील होय. शील अमर आहे. पूर्वीचे लोकांनीं आपलें शील उत्तम ठेविलें, म्हणून ते अद्यापि कीर्तिरूपानें जिवंत आहेत व ज्यांनीं शीलाची काळजी घेतली नाहीं ते पापी लोक केव्हां नाहींसे झाले, हें प्रत्यक्ष काळालासुद्धां ठाऊक नाहीं. सारांश, माझा देह गेला म्हणून भिण्याचें कारण नाहीं. बाबा ! तुम्हीं आपलें शील सुरेख ठेविलेंत म्हणजे सत्यवक्तृत्वासाठीं तुमची व पित्राज्ञा पाळली म्हणून माझी योग्यता उत्तम वाढेल. आपण उभयतांही सत्त्वाला जागलों, म्हणन देहाला न मिळणारें अजरामरत्व आपणांस मिळेल. देह हा केव्हांतरी काळाच्या मुखांत जावयाचा, मग त्याचें संरक्षण करण्यासाठीं आपलें शील मलीन करण्यांत व आपल्यास सहज मिळणाऱ्या अजरामरत्वाचा नाश करण्यांत [illegible] नाहीं व मुत्सद्दित्व नाहीं.

हा पोक्त व शास्त्रीय पुत्रबोध ऐकून, पश्चात्तप पित्याचें बरेंच समाधान झालें व वाजश्रवसानें पुत्रास यमाकडे जाण्याची अनुज्ञा दिली. नचिकेता यमसदनीं गेला, तो स्थूलशरीरानें गेला, किंवा लिंगदेहानें गेला, अथवा कारणशरीरानें गेला, हें समजण्याला श्रुतीमध्यें प्रत्यक्ष असें कांहींच साधन नाहीं. सातव्या मंत्रावरून 'तो स्थूलशरीरासह गेला' असें दिसतें व दहाव्या मंत्रावरून तो 'कारण-शरीरासह मात्र गेला असावा' असें वाटतें. आतां हें मात्र खरें आहे कीं यमाचें आमंत्रण येण्यापूर्वीच तो कोणत्या तरी देहानें यमसदनीं गेला म्हणून त्याची तेथें 'अतिथि'-रूपानें संभावना झाली. असो; तो गेला, तेव्हां यमराज प्रवासाला गेले होते. तीन दिवसांनीं ते परत आले, तेव्हां 'आपल्या घरीं एक अतिथि येऊन तो तीन रात्र उपोषित राहिला आहे' असें त्यांस कळलें. पुढील दोन मंत्र अतिथिसत्कारासंबंधाचे आहेत.

---

## मंत्र सातवा व आठवा.

**अर्थासह अन्वय**—**ब्राह्मणः अतिथिः वैश्वानरः गृहान् प्रविशति** (ब्राह्मण अतिथि आला असतां प्रत्यक्ष अग्निच आला आहे असें समजावें) **तस्य एतां शांतिं कुर्वन्ति, वैवस्वत! उदकं हर** (या अतिथिरूपी अग्नीची शांति अर्घ्यपाद्यादि देऊन करितात, म्हणून हे सूर्यपुत्र यमराज! या अतिथीला अर्घ्यपाद्यादि देऊन पूजा करा) **यस्य गृहे ब्राह्मणः अनश्नन् वसति तस्य अल्पमेधसः पुरुषस्य आशाप्रतीक्षे, संगतं, सूनृतां च इष्टापूर्तं, सर्वान् पुत्रपशून् च एतत् वृङ्क्ते** (ज्याच्या घरीं ब्राह्मण अतिथि आला असतां त्याला उपाशीं राहावें लागतें, त्या मंदबुद्धि किंवा दुर्दैवी पुरुषाच्या आशा, प्रतीक्षा, त्याची सत्संगति, सुंदर वाणी, इष्टापूर्त सर्व पुत्र व पशु, यांचा नाश, त्या अतिथीच्या अनादरानें होतो).

हा व पुढील मंत्र अतिथिसंबंधाचे आहेत, हें वर सांगितलेंच आहे. बहुधा या मंत्रांतील विधीचा व विधीच्या अकरणाप्रीत्यर्थ होणाऱ्या दंडाचा उच्चार यमभार्येनें किंवा यमाच्या बहुश्रुत व स्वाभिनिष्ठ अमात्यांनीं केला असावा. असो; वेदकाळीं (फार प्राचीनकाळीं) अतिथिसत्काराचें फार मोठें माहात्म्य होतें. विराट्स्वरूपाच्या मुखापासून 'इंद्राची, अग्नीची व ब्राह्मणवर्णाची उत्पत्ति झाली' असें पुरुषसूक्तांत सांगितलें आहे. तेव्हां ब्राह्मण अतिथि हा अग्निच होय, ही समजूत ठीकच आहे. अग्नि प्रकट झाला असतां त्याला शांत करणें हें योग्य आहे. ब्राह्मणाला शांत करावयाचें तें त्याचा आदरसत्कार करून होय. अग्नीची वेळेवर शांति केली नाहीं, तर तो जसा घरादाराची राखरांगोळी करून टाकितो त्याप्रमाणें घरीं

आलेल्या अतिथीचा आदरसत्कार केला नाहीं तर तो ब्राह्मण संतप्त होऊन यजमानाच्या आशा, त्याचे संकल्प, त्याला घडलेली सज्जनसंगति, त्याची मधुरवाणी, त्यानें केलेलीं नित्यनैमित्तिक व पावक कर्में आणि त्याचे पशु पुत्र इत्यादिकांचा नाश करितो. सारांश, अतिथीचा योग्य सत्कार करणें हें प्रत्येक गृहस्थाचें कर्तव्य होतें. हें कर्तव्य केलें नाहीं, तर ब्राह्मणाच्या शापानें सर्व घरादाराचें वाटोळें होणार, अशी पूर्वीच्या लोकांस भीति असे. ॥ ९ ॥

---

## मंत्र नववा.

अर्थासह अन्वय—**ब्रह्मन्**! अतिथिः **नमस्यः** (हे द्विजा! तूं अतिथि आहेस व म्हणन नमस्काराला योग्य आहेस, वंद्य आहेस.) **ब्रह्मन्! ते नमः अस्तु** (हे ब्राह्मणा! मी तुला नमस्कार करितों!) **मे स्वस्ति अस्तु** (माझें कल्याण व्हावें असा मला आशीर्वाद दे—) **मे गृहे तिस्रो रात्रीः अनश्नन् यत् अवात्सीः तस्मात् त्रीन् वरान् प्रति वृणीष्व** (माझ्या घरीं तुला ज्या अर्थी तीन उपोषणें पडलीं, त्या अर्थी माझ्यापासून तूं स्वतःसाठीं तीन वर मागून घे).

पूर्वकालीं अतिथि (न कळवितां आलेला पाहुणा) वंद्य व पूज्य असे. संतुष्ट अतिथि आशीर्वाद देत व तेणेंकरून आपलें कल्याण होतें, असा तत्कालीन लोकांचा समज असे. हा समज अद्यापीही कमीअधिक प्रमाणानें जिवंत आहे. स्मृतिग्रंथांतही अतिथींचें मोठें माहात्म्य वर्णिलें आहे. प्रवासाच्या सोई फारशा नसणाऱ्या प्राचीनकाळीं अज्ञाती विद्वान् ब्राह्मणांचा समाचार तत्कालीन लोक मोठ्या भक्तीनें व अनुकंपेनें घेत; हें तत्कालीन परिस्थितीस योग्यच होतें. असो; यमधर्माच्या घरीं तीन दिवस नाचिकेता उपोषित राहिला. अर्थात् हें मोठें पातक घडलें. त्याच्या प्रतीकारार्थ यमानें नाचिकेत्याला तीन वर देऊं केले.

---

## मंत्र दहावा.

अर्थासह अन्वय—**मृत्यो**! **यथा गौतमः शांतसंकल्पः, सुमनाः, मा अभि वीतमन्युः स्यात्, त्वत्प्रसृष्ट मा प्रतीतः अभिवदेत्, एतत् त्रयाणां प्रथमं वरं वृणे** (हे यमराज! ज्या रीतीनें माझा पिता जो गौतम त्याची काळजी शांत होईल, तो प्रसन्न मनाचा असेल, माझ्यावर झालेला त्याचा क्रोध नाहींसा होईल आणि आपली आज्ञा घेऊन मी

परत गेलों म्हणजे मला ओळखून माझ्यावर पूर्वीप्रमाणें प्रेम करील, असा तीन वरांपैकीं पहिला वर मी मागून घेतों ).

वाचकांस सांगावयास नकोच आहे कीं नचिकेत्यानें पहिला वर मागितला तो आपल्या वडिलांचा क्रोध नाहींसा होऊन आपला पिता प्रसन्न मनाचा होईल, असा मागितला. यावरून नचिकेता सत्पुत्र होता, असें स्पष्ट दिसतें. यमासारख्या सर्वशक्तिमंत देवानें वाटेल तो वर मागण्याची अनुज्ञा दिली असतां केवल निःस्वार्थबुद्धीनें पित्याचा क्रोध नष्ट व्हावा आणि आपल्यास त्यानें पुनरपि पूर्वप्रेमानें वागवावें, असा वर मागणें हें खऱ्या पितृनिष्ठेचें लक्षण आहे. नचिकेत्यानें पितृयज्ञाच्या सांगतेसंबंधानें वाहिलेली काळजी लक्ष्यांत घेतली किंवा वर मागतांना पितृप्रसन्नतेला जें प्राथम्य किंवा प्राधान्य दिलें, हें सर्व पितृनिष्ठेचें व परंपरेनें चित्तशुद्धीचें एक लक्षण आहे. असा सुलक्षणी पुरुष प्रत्यक्ष परमेश्वरालाही प्रसन्न करील; मग यमधर्माला सुप्रसन्न करील यांत कांहींच आश्चर्य नाहीं.॥ १०॥

---

## मंत्र अकरावा.

या मंत्राचा अन्वयार्थ स्पष्ट व सरळ आहे. पहिल्या वरानें जें नचिकेत्यानें मागून घेतलें, तें यमराजांनीं सर्वच्या सर्व दिलें इतकेंच नव्हे, तर नचिकेत्यानें आपल्या मागण्यांत ' आपण स्वरूपानें वडिलाच्या घरीं दर्शनाचा लाभ घेऊं ' असें अमळशा अप्रत्यक्ष रीतीनें सुचविलें होतें, तें येथें, या श्लोकांत यमधर्मानें प्रत्यक्ष करून दाखविलें आहे. यावरून असें स्पष्ट होतें कीं यमाच्या घरीं नचिकेता गेला होता, तो स्वरूपानें गेला होता आणि मृत्यूच्या प्रासादांत जाऊनही नचिकेता स्वरूपानें पुनः आपल्या वडिलांच्या घरीं जाणार होता. हा मुद्दा लक्ष्यांत ठेवणें अगत्याचें आहे. अद्वैत-विद्वेषी भाष्यकारांनीं ' नचिकेता मरून म्हणजे मर्त्य देह टाकून स्वर्गाला गेला ' असा अर्थ करून आपआपल्या द्वैत कल्पना सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. ॥ ११ ॥

---

## मंत्र बारावा व तेरावा.

**अर्थासह अन्वय—स्वर्गे लोके किंचन भयं न अस्ति, तत्र त्वं न, न जरया बिभेतिः उभे अशनायापिपासे तीर्त्वा शोकातिगः स्वर्गलोके मोदते** ( स्वर्गलोकीं रोगादिकांचें किंवा दुसरें कसलेंही भय नाहीं. तेथें यमराज ! आपली सत्ता नाहीं; तेथें वृद्धपणांतील अंगवैकल्यादि व गात्रशैथिल्यादि दोषांपासून भीति बाळगण्याचें कारण असत

नाहीं. तसेंच; क्षुधा व तृष्ण यांपासून होणारा जो ताप, त्याचेंही अतिक्रमण स्वर्गलोकांत करितां येतें. अर्थातच स्वर्गस्थ जीव यात्रप्रमाणें शोकमुक्त होऊन तेथें आनंदानें आपली जीवयात्रा कंठित असतो ). **मृत्यो सः त्वं स्वर्ग्यं अग्निं अध्येषि; श्रद्दधानाय मह्यं प्रब्रूहि; स्वर्गलोकाः अमृतत्वं भजन्ते । एतत् द्वितीयेन वरेण वृणे** ( हे मृत्युराज ! आपण सर्वज्ञ आहांत म्हणून आपल्यास मी आतांच वर्णिलेल्या स्वर्गाचें साधन असणाऱ्या अग्नीचें यथार्थ ज्ञान आहे, यांत शंका नाहीं. भगवन् ! मी श्रद्धालु आहें; मला आपण निःशंकमनानें या स्वर्गदायी अग्नीचें स्वरूप समजून द्या. कारण या अग्निस्वरूपज्ञानानें प्राप्त होणारा जो स्वर्गलोक आहे, त्यांत राहणारे भाग्यवंत जीव अमरत्वाचा उपभोग घेतात. भगवन् ! आपल्या आज्ञेनुसार हा माझा दुसरा वर मी मागत आहें ).

या दोन मंत्रांत नचिकेत्यानें दुसरा वर मागितला आहे. तसेंच, या मंत्रांत स्वर्गलोकाचें सलक्षण वर्णन आहे. स्वर्गाचें लक्षण म्हणजे अजरत्व, अमरत्व, क्षुधातृष्णाशून्यत्व, भीतिशून्यत्व, आनंददायित्व इत्यादि चिन्हें होत. तेराव्या मंत्रांत उपदेश कोणी करावा व तो कोणाला करावा, या प्रश्नांच्या उत्तराची दिशा स्पष्ट दाखविली आहे. ज्या विषयाचा उपदेश करावयाचा आहे किंवा पाठ द्यावयाचा आहे, तो विषय अध्यापकास पूर्णतः अवगत असला पाहिजे आणि गुरूवर व विषयावर ज्याची पूर्ण निष्ठा आहे, असा शिष्य असावा लागतो. हें गुरुशिष्यांचें लक्षण उत्तमोत्तम नाहीं असें कोण म्हणेल ? असो; योग्य शिष्यानें अधिकारसंपन्न गुरूजवळ अमरत्व देणाऱ्या ज्ञानाची भिक्षा मागितली, हें ठीकच झालें. पहिल्या वरानें शुद्ध ऐहिक पण उच्चतर सुख मागून घेऊन दुसऱ्या वरानें त्याहीपेक्षां श्रेष्ठ असणाऱ्या स्वर्गसुखाचा लाभ मागितला. हें मागतांना मुद्दां नचिकेत्यानें भोगसुख न मागतां जरामरणराहित्य व शुद्धसुखत्व यांचा मात्र उल्लेख केला आहे. यावरून भोग्यविषयांचा अथवा विषयभोगांचा नचिकेत्याला विराग उत्पन्न झाला होता, हें स्पष्ट होतें. दुसरी अशी गोष्ट ध्यानांत ठेवावयाची कीं, चित्ताची शुद्धि होऊन तें निर्मल होण्याला जी उपासना अवश्य आहे, ती उपासना नचिकेत्यानें मागितली आहे. 'मला अमरत्व दे' हें नचिकेत्याचें मागणें नाहीं, तर 'अमरत्व प्राप्त होण्याला जें साधन अवश्य आहे, त्याचें ज्ञान–दान मला कर' हें नचिकेत्याचें पुरुष योग्य म्हणजे मर्दानी मागणें आहे, फलप्राप्ति न मागतां फलप्राप्तीचें साधन साध्य करण्याची योग्यता मागणें हा खरा पुरुषार्थ आहे, हें नचिकेत्यासारख्या कुमाराला अवगत असावें, हें महदाश्चर्य होय. ॥ १२ ॥ १३ ॥

## मंत्र चवदावा.

सार्थ अन्वय—नचिकेतः! स्वर्ग्यं अग्निं प्रजानन् ते प्रब्रवीमि; तत् उ मे निबोध; अनन्तलोकाप्तिं अथो प्रतिष्ठां त्वं विद्धि; एतत् गुहायां निहितं त्वं विद्धि–) हे नचिकेत! तूं म्हटल्याप्रमाणें मला या स्वर्गद अग्नीचें उत्कृष्ट ज्ञान आहे. आतां मी काय सांगतों, तें सावध मनानें ऐक. ही अग्निविद्या म्हणजे अनंत लोकाच्या प्राप्तीचें साधन आहे. इतकेंच नव्हे, तर अनंतत्व प्राप्त झालें असतां त्याला चिरस्थायित्व येणें, अनंतत्वाची निरंतर प्रतिष्ठापना होणें हें कार्य या अग्निविद्येच्या ज्ञानानें सिद्ध होतें. बाबा! हें ज्ञान आजपर्यंत अत्यंत गुप्तस्थितींत राहिलेलें आहे. पण तुला आतां तें मी प्रकट करित आहें.)

हाही वर यमाला संमत असाच होता व तो देण्याचें त्यानें तत्काल अभिवचन दिलें ही! उपासना पूर्णत्वानें सिद्ध झाली असतां उपास्य देवतेचें चिरंतन सान्निध्य उपासकाला प्राप्त होतें, हाही न्याय यमधर्मानें सहजगत्या प्रकट केला आहे. तसेंच नचिकेत्याच्या कालापर्यंत तरी मूर्ति–उपासनेचें माहात्म्य फारसें नव्हतें, असा एक नाजुक श्लेष उत्पन्न होतो. पण याचा विचार पुढें एखादा वेळीं करूं. 'प्रजानन्' हें नाचिकेत्याचें विशेषण करून 'ज्ञाता जो तूं, तो तूं हें समजून घे' असा ही अर्थ करावा. या अर्थांत 'यम स्वतःच आपली प्रौढी मिरवितो' असा दोष उत्पन्न होत नाहीं. ॥ १४ ॥

---

## मंत्र पंधरावा.

सार्थ अन्वय—तं लोकादिं अग्निं तस्मै–यमः–उवाच; याः यावतीः, यथा वा इष्टकाः–इति अपि–; तत् स च अपि यथोक्तं प्रत्यवदत् अथ अस्य तुष्टः मृत्युः पुनः एव आह. (नंतर यमधर्मानें नचिकेत्याला त्या लोकजनक व लोकप्रतिष्ठापक अग्नीचें स्वरूप सांगितलें. तसेंच अग्निचयन करितांना स्थंडिलासाठीं विटा कसल्या असाव्या, किती असाव्या, त्यांची रचना कशी करावी हें समग्र ज्ञान यमानें नचिकेत्याला सांगितलें. शिष्यही अशा कुशाग्र बुद्धीचा होता कीं गुरूजींनीं एकदां संथा दिल्याबरोबर नचिकेत्यानें सर्व पाठ संथेनुसार म्हणून दाखविला. तेव्हां यमधर्माला अत्यंत आनंद झाला व तो प्रसन्नमनानें नचिकेत्याला म्हणाला– (काय म्हणाला तें पुढील मंत्रांत सांगितलें आहे.)

या मंत्रांत अग्निविद्येचा पाठ साग्र व समग्र कसा दिला व शिष्यानें कसा स्वीकृत केला, याचें वर्णन आहे. हें वर्णन प्रत्यक्ष श्रुतीनें केलें आहे व वर्णनांत हा अग्नि सर्व लोकांचें आदिस्थान व सर्व लोकांचा प्रतिष्ठापक आहे, असें सहजगत्या सांगितलें आहे. याच प्रमाणें सच्छिष्य भेटला असतां सद्गुरु कसे प्रसन्न होतात, याचें ही वर्णन ओघानें आलें आहे. असो; नाचिकेत अग्नीची उपासना याचवेळीं प्रकट झाली असें या आख्यायिकेवरून दिसतें. ॥ १५ ॥

---

## मंत्र सोळावा.

या मंत्राचा अन्वयार्थ स्पष्ट व सरळ आहे. प्रसन्न झालेल्या यमधर्मानें नाचिकेत्याला आपण होऊन एक जास्त वर दिला, तो हा कीं जो अग्नि नाचिकेत्याच्या निमित्तानें प्रथम प्रकट झाला, त्याला नाचिकेताग्नि असें नांव यमानें दिलें. सारांश, या अग्नीचा जातकरणविधि यमानें केला व नामकरणविधि ही त्यानेंच केला. इतका कथाभाग या मंत्रांत आहे. याचवेळीं यमानें नचिकेत्याला एक सुवर्णमाला अर्पण केली. ही माला काय सुवर्णाची होती किंवा या अग्निविद्येनें नाचिकेत्याला अनेक कल्पांत अनेक दिव्य जन्ममृत्यूची माला प्राप्त होणार होती, हें सांगतां येणें स्वल्प नाहीं. तथापि पाठीमागील व पुढील संबंध पाहिले असतां असें दिसतें कीं ही सुवर्णाची माला दिली. याचाच अर्थ अग्निसाधनानें सामान्यजीवांचीं जन्ममरणें संपून दैवी जन्ममृत्यूंचा 'ससेमिरा' नाचिकेत्याच्या मागें लागणार होता! ऐहिक जन्माची यात्रा शंभर वर्षांत सामान्यतः संपते. पण दैवी जन्मयात्रा एक कल्पपर्यंत असते. आयुष्याची लांबी वाढली व भोगांची रुंदी वाढली, हें खरें; पण अग्निविद्येनें जन्ममृत्यु चुकले, असें मात्र होत नाहीं. ॥ १६ ॥

---

## मंत्र सतरावा.

**सार्थ अन्वय—त्रिणाचिकेतः त्रिभिः संधिं एत्य त्रिकर्मकृत् जन्ममृत्यू तरति** (तीन वेळ अग्नीची उपासना करून ज्यानें त्रिणाचिकेत ही पदवी प्राप्त करून घेतली, त्याचा तीन वस्तूंशीं संबंध येऊन तो तीन कर्मांचा कर्ता होतो आणि त्याला जन्ममृत्यूचें अतिक्रमण करितां येतें.) **ब्रह्मजज्ञं देवं ईड्यं विदित्वा इमां शांतिं अत्यन्तं एति** (—आणि—त्याला जर ब्रह्मजज्ञ, ब्रह्मज्ञ, तेजस्वी व पूज्य अग्नीचें ज्ञान-विज्ञान झालें तर त्या ज्ञानी पुरुषाला अत्यंत सुख देणारी शांति प्राप्त होते.)

या मंत्रांत कांहीं शब्द बरेच कठिण आहेत. त्रिणाचिकेत म्हणजे तीनवेळ 'नाचिकेत' यज्ञ करणारा पुरुष होय, हें ठीक आहे; पण 'तीन वेळ' यामध्यें काय रहस्य असावें? शिवाय, तीन वस्तूंशीं संबंध येणार त्या तीन वस्तु कोणत्या? तीन कर्में कोणतीं? व या कर्माचरणानें जन्ममृत्यु टळतो कसा? या तीन प्रश्नांचा उलगडा स्पष्टसा होत नाहीं. तसेंच, उत्तरार्धांत सांगितलें आहे कीं एका विशिष्ट गुणांनीं अन्वित झालेल्या देवाचें ज्ञान झालें असतां उत्तम प्रकारची शांति प्राप्त होते, हाही एक चमत्कारच आहे. 'अविद्येनें जन्ममृत्यूचें अतिक्रमण करून विद्येनें अमरत्व प्राप्त करून घेतां येतें' असें ईशोपनिषदांत सांगितलें आहे, हें खरें आहे; पण तेथें विद्या व अविद्या या उभयतांचा संग्रह जो तत्त्वज्ञानाच्या द्वारानें करितो, त्याला अविद्येनें जन्ममृत्यु टाळितां येतात व विद्येनें अमरत्व मिळवितां येतें, असें स्पष्ट म्हटलें आहे. तत्त्वज्ञान, शास्त्रज्ञान आणि कर्मज्ञान, अशा तीन वस्तूंचा संग्रह तेथें सांगितला आहे. त्या तीन वस्तु तर येथें इष्ट नव्हेत ना? तत्त्वज्ञान, वेदशास्त्रज्ञान आणि कर्मशास्त्रज्ञान, या वस्तूंशीं संबंध प्राप्त करून घेऊन हा त्रिकर्मकारी याज्ञिक सर्वप्रकाशक ब्रह्मा व स्तुत्य देव, यांचें ज्ञान संपादितो व शांतीचा परमलाभ करून घेतो, असा अर्थ कराव तर 'अद्यापि ब्रह्मविद्येचा उपदेश व्हावयाचा आहे, तत्त्वज्ञान सांगावयाचें आहे. त्याच्या आधींच या मंत्रांतील सिद्धान्त यमराज करतील, हें संभवनीय दिसत नाहीं. तेव्हां असेंच म्हणावें लागतें कीं श्रीमच्छंकराचार्यांनीं जो अर्थ दिला आहे, तो किंवा तसलाच कांहीं तरी अर्थ करून समाधान करून घेतलें पाहिजे. नाचिकेत अग्नीची विद्या ज्ञात करून घेऊन ती अधीत ठेवावयाची व विहित कर्म करावयाचें, असें ज्या पुरुषाचें व्रत आहे, त्याला त्रिणाचिकेत असें म्हणावें, असा आचार्यांचा अर्थ आहे. मातृपितृ-आचार्य या तीन किंवा श्रौत, स्मार्त व आचार अथवा शिष्टाचार या तीन, किंवा प्रत्यक्ष, अनुमान व शाब्द या तीन वस्तूंशीं संबंध ठेवणें म्हणजे 'त्रिभिः संधिं एत्य' या पदांचा अर्थ करणें होय, असें आचार्य म्हणतात. खरेंच आहे कर्म करण्याला प्रमाण कोणतें म्हणून मानावयाचें? माता-पितरादि सांगतील तें, का श्रुतिस्मृतींत विहित केलें आहे तें किंवा प्रत्यक्षादि प्रमाणांनीं आपल्यास पटेल तें प्रमाण मानावयाचें?' आचार्य सांगतातः माता-पितरादि प्रत्यक्ष सांगतात तें, शास्त्रादि ग्रंथांवरून प्राप्त होतें तें व आपल्या शुद्ध व भाविक चौकस बुद्धीला मान्य होतें तें, या तिन्हींपैकीं कोणतेंही घेतलें, तरी कार्यसिद्धि होते. सर्वच साधनें एकत्र झालीं तर फार उत्तम! सारांश, या तीन प्रमाणशास्त्रांत विरोध नसून नाचिकेत अग्नीची तीन प्रकारानें उपासना झाली आणि ईज्य (यज्ञ) अध्ययन-दान किंवा यज्ञ-दान-तप या श्रीकृष्णोक्त पावक कर्मांचें आचरण झालें म्हणजे जन्ममृत्यु

टाळितां येतात. तात्पर्य नित्य, नैमित्तिक आणि पावक कर्मांचें अनुष्ठान आपले कडून अखंड चालू राहिलें म्हणजे जन्ममृत्यूचें भय नष्ट होतें.

आतां वर ज्याप्रमाणें 'त्रिणाचिकेत' 'त्रिभिः संधिं' 'त्रिकर्मकृत्' या पदांचा स्पष्ट अर्थ समजणें शक्य नाहीं, असें म्हटलें, त्याप्रमाणें 'ब्रह्मजज्ञ' या अवघड शब्दाची व्यवस्था आहे. ब्रह्मापासून जन्म पावलेला व ब्रह्म जाणणारा, असा तो ब्रह्मजज्ञ होय. हा पूर्णज्ञानी होय. पण हा 'ब्रह्मजज्ञ, देव, ईड्य' असा कोण कीं ज्याचें ज्ञान झालें असतां अखंड शांति मिळावयाची आहे. भगवान् शंकराचार्यांनीं 'ब्रह्मजज्ञादि विशेषणें विराट्-स्वरूपाचें वर्णन करितात,' असें म्हटलें आहे व 'ब्रह्मजज्ञ' या पदावरून तो तसा अर्थ असावा असें वाटतें ही. तथापि मनाचा निश्चय होत नाहीं. भगवान् शंकराचार्य म्हणतात, त्याप्रमाणें विराट्स्वरूप ध्यावयाचें किंवा इतर अवतारी आचार्य म्हणतात त्याप्रमाणें प्रत्यक्ष ब्रह्मस्वरूप ध्यावयाचें याचा कांहींच निश्चय होत नाहीं. आतां नचिकेत्याला जो स्वर्ग हवा आहे, त्यांत अजरामरत्वादि सर्व भीति शोकापहारी गुणांची वसति असून तेथें आनंदाचें साम्राज्य असावें असें नाचिकेत्याचें म्हणणें आहे. या श्लोकांत जन्ममृत्यूचें अतिक्रमण व आत्यंतिक शांतीची प्राप्ति हे दोन गुण सांगितले आहेत. तेव्हां त्याला जो स्वर्ग हवा आहे, तो मिळवून देणारा अग्नि प्राप्त झाला व यमानें ह्या अग्निपूजेचें महत्त्व सांगितलें, असा या श्लोकाचा तात्पर्यार्थ होतो. पण मागें म्हटल्याप्रमाणें हा 'स्वर्ग' म्हणजे मोक्षलोक नव्हे. ब्रह्मज्ञान झाल्यावेरीज 'मोक्ष' नाहीं, हें सर्व श्रुतिस्मृतींचें अखंड सांगणें आहे. ब्रह्मज्ञानाचा उपदेश अद्यापि व्हावयाचा आहे. तिसऱ्या वरानें नाचिकेता 'आत्मज्ञान, ब्रह्मज्ञान, प्रेत झाल्यानंतर जीवाचा अंतर्यामी आत्मा असतो त्याचें ज्ञान' मागणार आहे. सारांश, आत्मज्ञानानें मिळणारा मोक्ष म्हणजे दुसऱ्या वरानें मागितलेला स्वर्ग नव्हे. अग्निपूजेनें (अग्न्युपासनेनें) व अग्निज्ञानविज्ञानानें अत्यंत श्रेष्ठ म्हणजे वैराज लोकाची प्राप्ति होईल, मोक्षलोकाची प्राप्ति होणार नाहीं, असें दिसतें. म्हणून मला वाटतें कीं 'ब्रह्मजज्ञादि विशेषणें विराट्-स्वरूपपर लावावीं म्हणजे शास्त्राला कोणत्याही तऱ्हेचा विरोध प्राप्त होत नाहीं.' शिवाय, ज्ञानकर्मांचा समुच्चयही होऊं शकेल. वैराज लोकांत मात्र येथें कर्मकर्तृत्व आणि देवज्ञातृत्व यांचा समुच्चय आहे. म्हणून या प्रकरणांतील स्वर्ग म्हणजे मोक्ष लोक नव्हे, असें मला वाटतें. ॥ १७ ॥

---

## मंत्र अठरावा.

या मंत्रांत अन्वयाची किंवा शब्दार्थांची मानगड नाहीं. 'ह्या तीन गोष्टी समजून घेऊन जो विद्वान् त्रिणाचिकेत नाचिकेताग्नीची उपासना करितो, तो जिवंत असतांनांच जन्ममृत्यूचा पराभव करून शोकशून्य होतो आणि स्वर्गं

लोकीं आनंदांत वास्तव्य करितो ' हा मंत्राचा अर्थ आहे. पण प्रश्न असा आहे कीं ' ह्या तीन गोष्टी समजून घेऊन ' या पदसमूहांतील ' तीन गोष्टी, कोणत्या ? तीन संधि, तीन कर्मे व त्रिस्वरूपी देवांसंबंधी ज्ञान, या तीन गोष्टी किंवा भगवान् शंकराचार्य म्हणतात त्याप्रमाणें ' विटा कसल्या, किती व कशा ' या तीन गोष्टी अथवा भगवान् श्रीरामानुजाचार्य म्हणतात तशा ' परमेश्वर, जीव व जगत् ' ह्या तीन गोष्टी ? बरें, हें ज्ञान करून घेतल्यावर नचिकेत अग्नीची उपासना विहित केलीच आहे. तेव्हां ज्ञानकर्मांचा समुच्चय झाला. हा समुच्चय भगवान् श्रीरामानुजांस इष्ट आहे, म्हणन त्यांनीं विहित केलेल्या तीन गोष्टी घ्याव्या तर मुख्य अडचण ही पडते कीं मुख्य ज्ञानाचा उपदेश अद्यापि व्हावयाचा आहे, शिवाचें व जीवाचें रूप कसें असतें, उभयतांमध्यें समवेषम्याचा भाग किती असतो इत्यादि ज्ञान नचिकेत्याला झालें नाहीं, तींच परमेश्वरादिकांचें ज्ञान असें ' तीन गोष्टी समजन ' या पदार्थांचा अर्थ करवत नाहीं. भगवान् श्रीरामानुजाचार्य म्हणतात कीं हा उपदेश पंधराव्या मंत्रांत झाला आहे. पण तसें दिसत नाहीं. तेथें लोकांच्या आदि असणाऱ्या अग्नीचें स्वरूप व याज्ञिकाची माहिती, इत्यादि सामान्य गोष्टींचा मात्र अंतर्भाव होतो, म्हणून त्यांनीं सांगितलेल्या तीन गोष्टी घेतां येत नाहींत. भगवान् शंकराचार्यांचें वैराजस्वरूप घेतलें तरी एक अडचण उत्पन्न होतेच. ' जन्ममृत्यु नष्ट होणें, शोकशून्य असणें, शुद्ध आनंदत्व प्राप्त होणें ' या गोष्टी नियतकाळिक वैराज लोकांत कशा असणार ? जेथें ' काळवेळ नाहीं ' अशा अर्थाचीं पदें मंत्रांत आहेत म्हणून मोक्षलोक असा अर्थ करावा तर मोक्षास अवश्य असणाऱ्या ब्रह्मज्ञानाचा उपदेश झाला नाहीं, इतकेंच नव्हे, तर नचिकेत्यानें याचा उल्लेखही अद्याप केला नाहीं व ' नापृष्टः कस्यचिद्ब्रूयात् ( विचारल्याशिवाय सांगूं नये ) ' हा न्याय मनांत ठेवून यमधर्म आत्मज्ञानपर व्याख्यानही देणार नाहीं. भगवान् शंकराचा अर्थ ( वैराजलोक ) असा घ्यावा तर मंत्रांतील विशेषणें स्थलातीत व कालातीत आहेत असें दिसतें. तेव्हां मला असें दिसतें कीं, समाधानकारक निर्णय करून घेण्याची एकच तोड आहे, ती ही: नचिकेत्यानें जरामरणशून्य असून आनंद होणारा स्वर्ग मागितला व नचिकेत्याला आत्मज्ञान झालें नाहीं, म्हणून त्यानें मोक्षलोक मागणें शक्य नाहीं, असा निश्चय करून यमधर्मानें आत्मज्ञानविरहित पण शास्त्रज्ञान व कर्मज्ञान असणाऱ्या पुरुषाला जो श्रेष्ठलोक प्राप्त होणें शक्य आहे, त्या वैराज लोकांचें ( उपासनेनें व स्वरूपज्ञानानें प्राप्त होणाऱ्या वैराजाचें ) ज्ञान नचिकेत्याला देऊन त्याला त्या ज्ञानाचें महत्त्व काय आहे व फलश्रुति काय आहे, हे यमधर्म सतराव्या व अठराव्या मंत्रांत सांगत आहे. सारांश, प्रलयकालपर्यंत आधिभौतिकादि तापत्रयाचा उपसर्ग नसावा, असें नचिकेत्यानें साधनज्ञानरहित मागणें मागितलें आणि यमधर्मानें त्याला अप्रसिद्ध अग्नीच्या उपासनेचें समग्र ज्ञान देऊन व [illegible]

सांगून पुढें या ज्ञानविज्ञानाची फलश्रुतीसह महती सांगितली; तात्पर्य नचिकेत्यानें मागितलें तें त्याचा अधिकार पाहून यमधर्मानें त्याला दिलें, इतकाच अर्थ येथें झाला, असें समजलें पाहिजे. उपद्रवी उपाधि नष्ट होऊन जीवाला जी शांति मिळावयाची व अग्निज्ञानविज्ञान झालें असतां जो आनंद व्हावयाचा, ती शांति व तो आनंद देणारा स्वर्गलोक ज्या अग्निज्ञानानें व अग्नि-उपासनेनें प्राप्त होणार, तें अग्निज्ञान व तदुपासनाविधि यांचा उपदेश यमधर्मानें केला व ज्ञान-फल सांगितलें. असा पर्याय करणें म्हणजे शंकराचार्यांचा अर्थ घेणें प्रशस्त दिसतें. भगवान् रामानुजाचार्यांचे पट्टशिष्य श्रीरंगस्वामी यांनी याच विषयावर विस्तृत ऊहापोहासह प्रचंड व्याख्यान करून 'स्वर्ग' म्हणजे 'मोक्ष लोक' हा अर्थ ठरविण्याचा प्रयत्न केला आहे व त्यांच्या शास्त्रप्रणालिकेला अनुसरून त्यांचा अर्थ बरोबर आहे ही. पण प्रश्न इतकाच आहे कीं निर्विषय अभेदानंद ज्ञानकर्मांच्या समुच्चयानें प्राप्त होईल कीं नाहीं? भेदवादी श्री रामानुजांस हा अभेदानंद शक्य कोटींत आहे, असें वाटत नाहीं व म्हणून त्यांस हा आनंद इष्ट नाहीं ही. अर्थात् जीवशिवांमधील तात्त्विक साम्यवैषम्याचें ज्ञान होऊन उपासनेची पराकाष्ठा झाली, ज्ञानकर्मांचा समुच्चय होऊन एकतानता उत्पन्न झाली, म्हणजे निरुपद्रवी उपाधीं मध्यें राहणाऱ्या मुक्त जीवाला पराकाष्ठेचा आनंद होतो, तो आनंद या मंत्रांत वर्णिला आहे; असें श्रीरंगाचार्यांचें म्हणणें आहे व तें ठीकही आहे. पण निर्विषय अभेदानंद ज्याला हवा आहे व म्हणून तो शक्य आहे, असें ज्या विरक्त विद्वानाला वाटतें, त्याला भेदानंदाच्या पलीकडे अभेदानंदाकडे जाण्याची उत्कट इच्छा होऊन तो ज्ञानाच्या पाठीमागें अवश्य लागेल. त्याला या मंत्रांतील 'मोक्षाची (आनंदाची) फारशी महती वाटणार नाहीं. म्हणून तो 'हा आनंद श्रेष्ठ प्रतीचा आहे' असें म्हणेल तरी पण 'आनंदरूप' होणारी जी स्थिति ती ही नव्हे, असें वाटून तो पुढें जाण्याचा प्रयत्न करील. नचिकेत्यानें तिसऱ्या वराच्या मागण्यांत हाच प्रकार केला आहे. असो; या अनिश्चित मंत्रासंबंधानें मला इतकेंच म्हणावयाचें कीं अद्वैत-विरोधी विद्वान् 'दुसऱ्या वरानें नचिकेता मोक्ष मागता झाला' असें म्हणतात व अद्वैतवादी विद्वान् या द्वितीय वरासंबंधानें असें म्हणतात कीं 'जीवस्थिति विद्यमान असून उत्पन्न होणाऱ्या आनंदातिशयाचें निवासस्थान म्हणजे उत्तम स्वर्गलोक नचिकेत्यानें मागितला.' सुखानुभवासंबंधें उभयतांचें म्हणणें एकच आहे. ज्याला अद्वैतविरोधी मोक्ष लोक म्हणतात, त्यालाच अद्वैती 'वैराज लोक' म्हणतात. हाच शेवट असें श्रीरामानुजादि आचार्य सांगतात व ह्याच्या पलीकडे मोक्षलोक आहे, असें श्रीशंकरादि म्हणतात. श्रुतिस्मृतींचा आश्रय उभयवादी आपल्या आपल्या परीनें घेत असतात आणि व्यावहारिक फल फलदृष्टीनें एकच असतें. म्हणजे मोक्ष लोकांत किंवा वैकुंठांत जें सुख मिळतें असें भेदवादी मानितात, तेंच सुख 'वैराजलोकांत' अद्वैत-ज्ञानी भक्तांस

मिळतें. पण या लोकाला अद्वैतविरोधी 'मोक्षलोक' म्हणतो व सुखसमाधानानें राहतो. अद्वैत्याला येथें समाधानप्राप्ति होत नाहीं, म्हणून श्रुतिस्मृतींस अनुसरून तो भेदविनाशक ज्ञानाचें संपादन करितो आणि असा लोक प्राप्त करून घेतो कीं जेथें तो सुखरूप होतो. हा विशेष जिज्ञासूंनीं लक्ष्यांत ठेविला, तर वादविवादाचें बंड मोडून सर्वत्र एकवाक्यता आहे, असें त्यांचे ध्यानांत येईल. केवल सुख किंवा केवल ज्ञान म्हणजे काय? सुखी व ज्ञानी होणें यांत कैवल्य आहे किंवा सुखरूप व ज्ञानरूप होण्यांत आहे, या प्रश्नाच्या निर्णयावर वेदांतांचें अंतिम ध्येय अवलंबून असतें, हें समजलें म्हणजे वादप्रवादाची तीक्ष्णता व सक्षमता कमी होईलसें मला वाटतें, म्हणून हा प्रपंच केला आहे. ॥ १८ ॥

---

## मंत्र एकोणिसावा.

वा ही मंत्राच्या अन्वयार्थांत काठिण्य नाहीं. दुसऱ्या वरानें ज्या स्वर्गद अग्नीची नाचिकेत्यानें मागणी केली होती, ता अग्नि अथवा ती सांगोपांग अग्निविद्या यमानें नाचिकेत्याला देऊन म्हटलें कीं हा अग्नि तुझ्या नावानें प्रकट व प्रसिद्ध होईल. आतां राहिलेला तिसरा वर मागून घे.' ॥ १९ ॥

---

येथें ऐतिहासिक भाग संपला. आतां येथून ब्रह्मज्ञानाच्या मीमांसेची कथा सुरू होते. नाचिकेत्यानें तिसरा वर मागितला तो हाः—

## मंत्र विसावा.

अन्वय व अर्थ—'अयं अस्ति' इति एके, 'अयं नास्ति इति च एके, या इयं प्रेते मनुष्ये विचिकित्सा अस्ति (मनुष्यानें किंवा जीवानें पांचभौतिक देहाचा त्याग केल्यावर, तो प्रेत झाल्यावर, हा जीव किंवा आत्मा पाठीमागें असतो असें कित्येक म्हणतात व 'हा असत नाहीं' असें दुसरे लोक म्हणतात. सारांश आमच्या लोकांत देहव्यतिरिक्त जीव (आत्मा) असतो कीं नाहीं, या संबंधानें ऐकमत्य नाहीं, नानाप्रकारचीं मतें प्रचलित आहेत.) त्वया अनुशिष्टः अहं एतत् विद्यां (आपल्याकडून खरें ज्ञान संपादून वरील प्रश्नाचें तात्त्विक उत्तर काय आहे, हें समजून घेण्याची माझी इच्छा आहे) वराणां एषः वरः तृतीयः (आपण जे मला तीन वर देऊं केले आहेत, त्यांतील हा तिसरा वर होय.)

सारांश, देहव्यतिरिक्त आत्मा असतो किंवा नाहीं, ह्या सार्वजनिक संशयाचें निराकरण नचिकेत्यास करून घ्यावयाचें आहे.

या मंत्रांत अति महत्त्वाचा प्रश्न नचिकेत्यानें उत्थापित केला आहे. देह म्हणजे आत्मा, किंवा आत्मा हा देहाचा एक धर्म आहे, इत्यादि परम नास्तिक अथवा भौतिक वाद्यांपासून तो आत्मा ही वस्तु पंचभूतांच्या किंवा बुद्धि मन-इंद्रियादिकांच्या व अहंकाराच्या पलीकडील आहे व ती मात्र कायती खरी वस्तु आहे, असें म्हणणाऱ्या अद्वैतवाद्यापर्यंत हजारों मतांचें उत्थापन झालें आहे, होत आहे व होईल. श्रुतिस्मृतिकालीं हा वाद होता, तसाच दृष्ट व दृश्य प्रमाणांवर मात्र अवलंबून असणाऱ्या हल्लींच्या विसाव्या शतकांत आहे व हाच वाद पुढें अंतकालपर्यंत कमीजास्ती जोरानें चालेल. सर्वांचें समाधान होईल असा या वादाचा निकाल करणें, सर्वतोपरि कठिण आहे. सर्वज्ञ परमेश्वराला किंवा सर्वज्ञ श्रुतीला मात्र ही गोष्ट साध्य आहे. श्रुतीनें या उपनिषदांत निर्णयात्मक उत्तर देऊन प्रश्नाचें प्रश्नत्व काढून टाकिलें आहे, हें खरें; पण श्रुतीचें बोलणें खरें आहे, असा श्रुतीवर एकनिष्ठ विश्वास हवा आणि विश्वास असला तरी श्रुतीची मीमांसा समजून घेऊन ती व्यावहारिक प्रमाणांच्या साह्यानें अजमावून घेण्याचें सामर्थ्य हवें. सारांश, वैराग्यविवेकसहित ज्ञान, श्रुत्यर्थ कसा करावयाचा याची माहिती, चित्तशुद्धिपूर्वक मोक्षाची उत्कट इच्छा व श्रुतीवर दृढविश्वास, इतक्या गोष्टी असतील, तर ज्ञानाच्या योग्यतेप्रमाणें आत्मज्ञानविज्ञान प्राप्त होईल. श्रुतीचेबोल ऐकणाराच्या योग्यतेनुसार फलद्रूप होतील म्हणजे ज्ञान देतील; ह्या विधानाच्या सत्यतेसंबंधानें शंका येण्याचें कारण नाहीं. 'सूर्य अस्ताला जात आहे' या एकाच वाक्याच्या श्रवणानें चोराला चौर्यकर्मसंधि प्राप्त झाली, म्हणून आनंद झाला, कामुकाला प्रियाविरहाचें दुःसह दुःख झालें आणि श्रांत झालेल्या पुरुषाला 'विश्रांतीचा समय आला' म्हणून समाधान झालें! एकच जलधारा गायमुखांतून, तोटींतून किंवा अन्यद्वारानें बाहेर आली, तर तिचीं तीन भिन्नस्वरूपें होतात; एकच पुरुषाला 'बाबा, काका, दादा, मामा, आजोबा,' इत्यादि नांवांनीं हांक मारितां येते; एक प्रेमाचा शब्द प्रियेला सुख देतो तर तिच्या सवतीला तीव्र वेदना उत्पन्न करितो; इत्यादि अनेक उदाहरणें देऊन असें सिद्ध करितां येतें कीं, श्रुतीचें सत्य बोलांचा परिणाम भिन्नप्रकृतीच्या जीवांवर भिन्न प्रकारचा होतो. तात्पर्य, श्रुतीचा निकाल प्रकट करावा, अशी नचिकेत्याची प्रार्थना आहे. वादाचा निर्णय यमप्रवचनानें झाला आहे. तथापि भिन्न प्रकृतीचे लोक भिन्न अर्थ करून वादाचें जीवित्व कायम ठेवितात आणि संशयाला जागा उत्पन्न होते. म्हणून वर मी म्हटलें आहे कीं हा प्रत्यक्षादि प्रमाणांस अगोचर असणारा प्रश्न नेहमीं वादग्रस्त स्थितींतच राहील. ॥ २० ॥

यमानें प्रत्युत्तर दिलें:—

## मंत्र एकविसावा.

**अन्वय व अर्थ**—अत्र देवैः अपि पुरा विचिकित्सितम् (देवांमध्येंही, जीवापेक्षां अनेक शतपट ज्ञान असणाऱ्या देवांमध्येंही—या प्रश्नासंबंधानें पूर्वी वादप्रतिवाद चालू होता.) न सुज्ञेयं (ह्या प्रश्नाचें निर्णायक उत्तर योग्य रीतीनें समजणें शक्य नाहीं) हि (कारण) एषः धर्मः अणुः (हा धर्म, हें ज्ञान, अत्यंत सूक्ष्म आहे)—म्हणून अन्यं वरं नचिकेतः! वृणीष्व (दुसरा कोणताही वर मागून घे) मा मा उपरोत्सीः (माझा असा उपरोध करून मला देतां येणार नाहीं किंवा तुला घेण्याचें सामर्थ्य नाहीं, असें मागून माझा कोंडमारा करूं नको) मा एनं अतिसृज (या वराच्या ऋणांतून मला मुक्त कर).

सारांश, आत्मवस्तूचें अस्तित्वज्ञान उपदेशिण्याला यमाची सिद्धता प्रथम नव्हती; म्हणून 'दुसरा कांहीं तरी वर मागून मला ऋणमुक्त कर,' असें यमाचें काकुळतीचें बोलणें आहे. ॥ २१ ॥

---

पण नचिकेत्याला ही यमप्रार्थना अर्थातच संमत झाली नाहीं. तो म्हणालाः—

## मंत्र बाविसावा.

अन्वय व अर्थ—देवैः किल अत्र अपि विचिकित्सितं (प्रत्यक्ष देवांससुद्धां मी विचारलेल्या प्रश्नासंबंधानें खरोखर संशय होता) मृत्यो! यत् न सुज्ञेयं त्वं च आत्थ (तसेंच, यांतील रहस्य सहज समजण्यासारखें नाहीं, असें हे मृत्यो! आपण जर स्वतः म्हणतां)—म्हणून—वक्ता च अस्य त्वादृक् अन्यः न लभ्यः (ज्या प्रश्नासंबंधानें पूर्ण ज्ञान आहे व समजून देण्याचें सामर्थ्य आहे, त्या प्रश्नाचें प्रवचन करणारा आपल्यासारखा दुसरा कोण मिळणार? अर्थात् कोणी नाहीं.)—शिवाय, एतस्य तुल्यः वरः कः चित् अन्यः न (ह्या वराप्रमाणें परलक्षकल्याणकारी दुसरा वरही नाहीं.)—म्हणून हाच वर मला आपण कृपा करून द्यावा.

या मंत्रावरून नचिकेत्याला आत्मस्वरूपज्ञानासंबंधानें किती उत्कट आस्था उत्पन्न झाली होती, हें स्पष्ट समजतें. जो प्रश्न देवांसही उलगडितां आला नाहीं व जो समजून देणें व घेणें अत्यंत कठिण गोष्ट आहे, तो प्रश्न बाजूस ठेवून

दुसरा वर मागावा, असें यमानें सांगितलें, तरी नाचिकेता आपल्या निश्चयापासून ढळला नाहीं. यावरून शमदमतितिक्षादि सद्गुणषट्क त्याला करतलामलकवत् झालें होतें, असें दिसतें. विवेक व वैराग्य पाठीमागील व ह्या वरांत स्पष्टच प्रकट होतात. यावरून नाचिकेता हा आत्मज्ञानाचा अधिकारी होता, हें उघड आहे. पहिला वर ऐहिक संसारांतील सात्त्विक समाधानसंबंधें; दुसरा वर आध्यात्मिकादि तापत्रयाच्या निवारणार्थ सिद्ध असलेल्या साधनांसंबंधानें आणि तिसरा वर आत्मस्वरूप-जिज्ञासेच्या संबंधानें; असे तीन वर आहेत. सामान्यतः क्रममुक्तीचा हाच मार्ग आहे. कर्म, उपासना आणि ज्ञान हीं तीन मुख्य साधनें आहेत. कर्मानें बहिरंगशुद्धि, उपासनेनें अंतरंगशुद्धि व एकाग्रता प्राप्त होऊन आत्मज्ञान संपादण्याची योग्यता प्राप्त होते. नंतर सद्गुरुद्वारा ज्ञानप्राप्ति होण्याचा संभव उत्पन्न होऊन आत्मज्ञान मिळतें आणि मनन-चिंतनानें त्या ज्ञानाला दार्ढ्य ( दृढता ) येऊन जीव मुक्त होतो. असा हा क्रम आहे व याच क्रमाचा अंगीकार श्रुतीनें येथें उल्लेखिला आहे. ॥ २२ ॥

---

## मंत्र तेवीस, चोवीस, पंचवीस.

पुढील तीन मंत्रांत नाचिकेत्याला पारखण्यासाठीं यमानें दैवी व मानवी भोग, भोगण्याचें सामर्थ्य व आयुष्य, सत्ता, दीर्घायुषी पुत्रपौत्रादि संतति, विस्तीर्ण संपत्ति, पृथ्वीपतित्व, फार तर काय पण प्रत्यक्ष कामदेवालाही लालसा उत्पन्न करतील असे विचित्र व रमणीय दिव्यभोग इत्यादि देऊं केले, त्यांचें वर्णन आहे. या वर्णनांत ज्या वस्तूंचा निर्देश केला आहे त्यांत संपत्ति, सत्ता, यश, आयुष्य, कामिनी इत्यादि वस्तु जीवाला मोह घालून परमार्थापासून भ्रष्ट करितात, त्यांचा निर्देश आहे, हें विसरूं नये. दुसऱ्या वराचें दान केल्यावर यमराज ह्या परमार्थभंजक विषयशास्त्रांचा नाचिकेत्यावर भडिमार करित आहे. हें ध्यानांत ठेविल्यास दुसऱ्या वरानेंच मोक्षलोक देणारें ब्रह्मज्ञान नाचिकेत्यानें मागितलें व यमधर्मानें दिलें, असें कित्येक आचार्य म्हणतात, तें ठीक नाहीं, हें स्पष्ट होतें. ब्रह्मज्ञान झाल्यावरही मनुष्य कदाचित् बिघडेल, नाहीं असें नाहीं; पण ब्रह्मज्ञानाचा म्हणजे ब्रह्माचे स्वरूपज्ञानाचा मुख्य विषय जर पुढें विशद होणार आहे, तर आधीं तें ज्ञान देऊन पुनः नाचिकेत्याची परीक्षा यमानें पाहणें, हें युक्तीला व शास्त्राला पसंत पडणें शक्य नाहीं. शरद् म्हणजे वर्ष होय. शरद् काय किंवा वर्ष काय, दोन्ही शब्द ऋतुवाचक असून ते रूढीनें संवत्सरवाचक झाले आहेत. असो; यम शेवटीं म्हणाला: 'मला मरणसंबंधी मात्र प्रश्न विचारूं नको.' ॥ २३ ॥ २४ ॥ २५ ॥

---

## भोगांचें अनित्यत्व व मारकत्व.

### मंत्र सव्वीस, सत्तावीस, अट्ठावीस व एकुणतीस.

**मर्त्यस्य अन्तक ! श्वोभावाः यत् एतत् सर्वेंद्रियाणां तेजः जरयन्ति** (हे मर्त्यवस्तूंचा अंत करणाऱ्या यमराजा ! ज्या ज्या वस्तु आपण मला देऊं केल्या आहेत, त्या त्या सर्व इंद्रियांच्या तेजाचें हरण करणाऱ्या असून स्वतःही क्षणभंगुर आहेत. हे भोग स्वतः नश्वर असून भोगणाऱ्याचें सामर्थ्य क्षीण करितात.) **अपिच सर्वं जीवितं अल्पं एव** (तसेंच मर्त्य जीवाचें आयुष्य कितीही जरी वाढलें, तरी तें अनंतकालाच्या दृष्टीनें अल्पच आहे.) **तव एव वाहाः, तव नृत्यगीते** (हे सर्व मला देऊं केलेले अश्व व नृत्यगीत, हेही भोग त्यांच द्यावयाचे आहेत; म्हणजे ते भोगही नश्वर आहेत. म्हणून मला ते नकोत. या सर्व वस्तु आपण आपल्या जवळच ठेवा.) ॥ २६ ॥

---

**मनुष्यः वित्तेन न तर्पणीयः** (संपत्तीनें मनुष्याचें समाधान झालें आहे, असें होतच नाहीं.) **त्वा अद्राक्ष्म चेत् वित्तं लप्स्यामहे** (तुझें कृपादर्शन झालें म्हणजे आम्हांला संपत्तीला काय कमी आहे ? मिळेल वाटेल तेवढी), **जीविष्यामः यावत् त्वं ईशिष्यसि** (जावत्कालपर्यंत आपण या अधिकारावर आहां, तावत्कालपर्यंतचें दीर्घायुष्यही आम्हांस मिळेल.)–पण समाधान देणारी जो संपत्ति माझ्या स्वाधीन नाहीं किंवा जें दीर्घायुष्य माझ्याशिवाय दुसऱ्याच्याच हातांत आहे, त्या संपत्तीनें व त्या दीर्घायुष्यानें माझें समाधान व्हावयाचें नाहीं. म्हणून–मे **वरणीयः वरः तु स एव** (मला मागावयाची जी वस्तु आहे, ती तिसऱ्या वरानें मागितलेलीच वस्तु होय.)

सारांश, औपाधिक वस्तूंची नचिकेत्याला मुळींच लालसा नाहीं. ॥ २७ ॥

---

**जीर्यन् कथःस्थः मर्त्यः अजीर्यतां अमृतानां उपेत्य प्रजानन् च वर्णरतिप्रमोदान् अभिध्यायन् कः अतिदीर्घे जीविते रमेत** (प्रतिक्षणीं क्षीण होत जाणारा पृथ्वीलोकावरील मर्त्य मनुष्य यदाकदाचित् अजर

आणि अमर वस्तूंच्या सन्निध प्राप्त झाला व त्याला अजरत्व व अमरत्व यांचें उत्तम ज्ञान असलें तर, व सुवर्ण, सुप्रीति व विषयानंद देणाऱ्या वस्तूंचे गुणधर्मांचा तरतमभाव त्यानें उत्तम प्रकारें जाणला असेल तर, कोणता ज्ञानी पुरुष अजरामर वस्तूंचा त्याग करून जरामरणयुक्त अशा अल्पकालिक वस्तूंच्या उपभोगांत रममाण होईल? अर्थात् कोणी नाहीं. ॥२८॥

---

**मृत्यो ! यस्मिन इदं विचिकित्सन्ति, सांपराये महति यत् तत् नः ब्रूहि** (ज्याच्या संबंधानें सर्वत्र वादप्रतिवाद चालला आहे, परलोकीं मोठ्या महत्त्वाची जी वस्तु आहे, तिचें ज्ञान मला—नाचिकेतास—करून द्यावें. हे मृत्युराज ! येवढी कृपा करावी.) **यः अयं वरः गूढं प्रविष्टः** (हा जो वर आहे, तो महा गहन प्रदेशांत शिरला आहे.) **तस्मात् अन्यं नचिकेता न वृणीते** (त्याच्या शिवाय नचिकेता दुसरा वरच मागत नाहीं. ॥ २९ ॥

याप्रमाणें या चार श्लोकांत नचिकेत्यानें भोग्यवस्तूंचें क्षणभंगुरत्व व विनाशकत्व, जीविताचें अल्पत्व व संपत्तीचें समाधानशून्यत्व, इत्यादिकांची उत्तम फोड करून शिवाय विवेकाचाही असा भाग दाखविला आहे कीं, ज्या योगें नित्यानित्यवस्तुविवेचनाचें सामर्थ्य वैराग्याबरोबरच नचिकेत्यास प्राप्त झालें होतें असें विशद होतें. नचिकेत्यानें अनित्याचा त्याग करून नित्याचा स्वीकार करावयाचा असा दृढ संकल्प केला आहे. साधनसंपत्तीच्या साहाय्यानें धैर्य स्वीकार करून तो स्तब्ध झाला. पुढें श्रुति सांगते कीं, आत्मज्ञानाव्यतिरिक्त नचिकेत्याला कोणत्याही पदार्थांची अपेक्षा राहिली नाहीं. ॥ २९ ॥

या पहिल्या अध्यायाच्या पहिल्या वल्लींत साधनचतुष्टयाच्या दृष्टीनें ऐतिहासिक कथाभाग आला आहे. मुख्य विषयाला दुसऱ्या वल्लीपासून आरंभ व्हावयाचा आहे.

पहिली वल्ली समाप्त.

---

## दुसरी वल्ली.

नचिकेत्याची अशी कसून परीक्षा घेतल्यावर तो आत्मज्ञानासंबंधें दृढमनस्क आहे, असें समजल्यावर यमराजाला आनंद झाला. तो म्हणाला:—

### मुमुक्षूचा व बुभुक्षूचा मार्ग.

### मंत्र पहिला.

**अन्वय व अर्थ—अन्यत् श्रेयः उत अन्यत् एव प्रेयः** (श्रेय ही वस्तु निराळी व प्रेय ही वस्तु निराळी असते) **उभे नानार्थे पुरुषं सिनीतः** (उभयतांचे अर्थ म्हणजे पुरुषार्थ भिन्नस्वरूपाचे असतात व उभयतांही पुरुषाला बद्ध करितात.) **तयोः श्रेयः आददानस्य साधुः भवति, उ यः प्रेयः वृणीते अर्थात् हीयते** (ह्यांपैकीं श्रेयाचा—मुक्त करणाऱ्या मार्गाचा—जो स्वीकार करितो, त्याचें कल्याण होतें; पण ज्याला प्रेयोमार्गाची—ऐहिक सुखाची—आवड उत्पन्न होते, तो बिचारा स्वत्या पुरुषार्थापासून भ्रष्ट होतो.)

जीवाला मुक्त करणारा व बद्ध करणारा, असे दोन निरनिराळे मार्ग आहेत. मुक्त करणाऱ्या मार्गाला श्रेयोमार्ग व संसारांत बद्ध करणाऱ्या मार्गाला प्रेयोमार्ग असें म्हणतात. असो; मोक्षाकडे ओढणारा मार्ग मोक्षद ज्ञान देतो व मोक्षद कर्म करण्याची प्रेरणा उत्पन्न करितो व संसारांत ओढणारा प्रेयोमार्ग अशा प्रेरणांनीं जीवास जखडून टाकितो कीं, त्यानें संसारावांचून इकडे तिकडे हालूंच नये. आतां या दोन मार्गांपैकीं जो जीव श्रेयाचा स्वीकार करितो, तो आपला पुरुषार्थ साध्य करून घेतो; पण जो बिचारा प्रेयोमार्ग अंगीकृत करितो, तो पुरुषार्थापासून सर्वथा भ्रष्ट होतो. सारांश, प्रत्येक जीवापुढें प्रत्येक क्षणीं दोन प्रेरक हात जोडून उभे असतात. कोणत्या प्रेरकाचा स्वीकार करावयाचा, हें ठरविण्याचें स्वातंत्र्य पुरुषाला आहे. पण एकदां त्यानें कोणत्या तरी एका मार्गाचा स्वीकार केला म्हणजे तो स्वीकार तत्कालापुरता तरी वज्रलेप होतो. यमधर्मद्वारा श्रुति म्हणते कीं श्रेयोमार्ग पुरुषार्थसाधक व प्रेयोमार्ग पुरुषार्थमारक आहे. प्रेयोमार्गानें जाणाराला मुक्तीचें नगर सांपडावयाचें नाहीं व श्रेयोमार्गीच्या पांथाचें अकल्याण केव्हांही व्हावयाचें नाहीं. ॥ १ ॥

स्वतंत्र जीव दुःखाचा मार्ग कां व कसा स्वीकारतात, त्याचें उत्तर हा मंत्र देतोः—

## मंत्र दुसरा.

**अन्वय व अर्थ—श्रेयः च प्रेयः च मनुष्यं एतः** ( या विश्वांत चमत्कार असा आहे कीं श्रेय व प्रेय ह्या वस्तु मनुष्याला अधिगत होतात, त्या मिश्र स्वरूपानें होतात. श्रेयांत प्रेय व प्रेयांत श्रेय मिसळलेलें असतें.) **तौ संपरीत्य धीरः विविनक्ति** ( पण बुद्धिमान् पुरुषाला तारतम्यज्ञान असतें, म्हणून तो श्रेयः—प्रेयांतील श्रेय स्वीकार्य व प्रय त्याज्य, असें समजतो. ) **हि धीरः श्रेयः प्रेयसः अभिवृणीते** ( कारण धीर म्हणजे बुद्धिमान् पुरुष असतो, तो प्रेयापासून श्रेय निवडून काढून श्रेयाचा अंगीकार करितो ) **मन्दः योगक्षेमात् प्रेयः वृणीते** ( मंदबुद्धीचा पुरुष योगक्षेमाच्या आशेनें प्रेयाचा स्वीकार करितो. )

सारांश, पूर्वमंत्रांत सांगितलें आहे त्याचाच अनुवाद येथें करून पुनः श्रेयः—प्रेयमार्गांचा स्वीकार करण्याला प्रवर्तक प्रेरक कोण असतात, त्यांचा निर्देश स्पष्टतः केला आहे. अर्थ करतांना सांगितल्याप्रमाणें या जगांत श्रेय व प्रेय ह्या दोन्ही वस्तु मिसळलेल्या आढळतात. जेथें एक तेथेंच दुसरीही वस्तु असते. पण विवेकशील पुरुषाजवळ नित्यानित्यविवेकाचें उत्तम शस्त्र असल्यामुळें तो प्रत्येक क्षणीं त्या तीक्ष्ण शस्त्रानें श्रेयाची व प्रेयाची निवडानिवड करून प्रेयाचा, ( तात्कालिक सुख देणाऱ्या सर्व ऐहिक व स्वर्गीय भोगांचा ) त्याग करून येथें व परत्र खरें सुखसमाधान देणाऱ्या श्रेयाचा स्वीकार करितो. मंदमति पुरुषाला हा विवेक करण्याचें सामर्थ्य नसतें. तो आपला योगक्षेम चालत आहे व भोगविषय मिळून त्यांचें संरक्षण होत आहे, असें पाहून अधीरपणानें प्रेयाचा स्वीकार करितो—आणि फसतो. याप्रमाणें विवेक हा शाहण्या माणसाचा प्रवर्तक आहे आणि विषयवासना ही विवेकशून्य पुरुषाला प्रवृत्त करिते. हे दोन भिन्नस्वरूपी प्रवर्तक भिन्न पुरुषार्थांचे साधक होतात हें तात्पर्य आहे. विवेकानुसार जीवाचें स्वातंत्र्य कमीजास्त असतें. ॥ २ ॥

---

## मंत्र तिसरा.

**अन्वय व अर्थ—नचिकेतः! प्रियान् प्रियरूपान् च कामान् अभिध्यायन् स त्वं अत्यस्राक्षीः** ( हे नचिकेत! दिसण्यांत मधुर व रत्युत्पादक भोग मीं तुला देऊं केले असतांही त्वां उत्तम तऱ्हेचा विवेक

केला आणि त्यांचा सर्वथा त्याग केला.) **एतां वित्तमयीं सृङ्कां न अवाप्तः** (ही संपत्तीची समृद्धि करणारी शृंखला प्राप्त झाली असूनही त्वां तिचा तिटकारा केला.!) **बहवः मनुष्याः यस्यां मज्जन्ति** (पुष्कळ पुरुष ज्या ह्या भोगांच्या साखळीचा स्वीकार करून तिच्यामध्यें अथवा तिच्या पायीं बुडून जातात, त्या अधोगतीस नेणाऱ्या साखळीचा तूं स्वीकार केला नाहींस.) यावरून तूं खरा विवेकी आहेस, असा माझा निश्चय झाला आहे.

मागच्या मंत्रांत बुद्धिमान् व बुद्धिमंद लोकांचें वर्णन आहे, त्यांतील बुद्धिमानांचें वर्णन नचिकेत्याला कसें हुबेहुब लागू पडतें, त्याचें चित्र या मंत्रांत सांगून यमधर्मानें नचिकेत्याची पाठ थोपटली आहे, आणि आत्मज्ञानाला तो योग्य अधिकारी आहे, असें सुचविलें आहे. ॥ ३ ॥

---

चवथ्या मंत्रांतही पुनः हाच विषय आहे.—

## विद्या व अविद्या.

### मंत्र चवथा.

**अन्वय व अर्थ—या अविद्या या च विद्या इति ज्ञाता, दूरं एते विपरीते विषूची** (जिला अविद्या किंवा प्रेयोमार्ग असें म्हणतात व जिला विद्या अथवा श्रेयोमार्ग असें म्हणतात, त्या विद्या व अविद्या परस्परांहून अत्यंत विलक्षण व अत्यंत भिन्नमार्गगामी आहेत.) **त्वा बहवः कामाः न अलोलुपन्त इति त्वां नचिकेतसं विद्याभीप्सिनं मन्ये** (तुझ्या बुद्धीला अनेक भोगविषय भ्रष्ट करावयास समर्थ झाले नाहींत, म्हणून तूं खरोखर विद्यादेवीचा एकनिष्ठ भक्त आहेस, अशी माझी खात्री झाली आहे.)

या मंत्रांत मागीलच विषय आले, म्हणजे नचिकेत्याची स्तुति पुनःपुनः यमधर्म करीत आहे, हा भाग आहे. येथें विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी जी गोष्ट आहे, ती विद्या व अविद्या या दोहोंमधील विशेष ही होय. परमार्थ साधणारी विद्या आणि संसारपाशांत अडकविणारी अविद्या यांच्या स्वरूपांत कोणत्याही प्रकारचें साम्य नाहीं, इतकेंच नव्हे, तर या दोन वस्तु भिन्न-मार्ग-गामी व भिन्न अर्थ साध्य करणाऱ्या म्हणजे सर्वथा परस्परविरोधी अशा आहेत. दुःखाची आत्यंतिक निवृत्ति करून सुखाची आवाति करून देते, ती

विद्या व सुखलेश दाखवून दुःख-समुद्रांत लोटणारी ती अविद्या, असा उभयतां-मध्यें विरोध आहे. ॥ ४ ॥

---

पुढील मंत्रांत मंदबुद्धीच्या पुरुषाचें वर्णन आहे.—

## संसारी जीवाचें उन्मत्तत्व.

## मंत्र पांचवा व सहावा.

**अन्वय व अर्थ—अविद्यायां अंतरे वर्तमानाः, स्वयंधीराः, पंडितंमन्यमानाः दंद्रम्यमाणाः मूढाः परियंति, अंधेन एव नीयमानाः अंधाः इव** ( अविद्येच्या म्हणजे अज्ञानाच्या अंतर्गत—अंधकारांत—राहून पुनः आपण शाहणे व विद्वान् आहों असें मानणारे, जन्ममरणाच्या चक्रांत सदैव फेऱ्या घालीत राहणारे, मूर्ख लोक 'यावच्चंद्रदिवाकरौ' भटकत राहतात. इतकेंच नव्हे, तर अंधळ्यानें अंधळ्यांच्या माळकेला वाट दाखविण्याचा पत्करा घेतला म्हणजे सर्वांचाच घात होतो, त्याप्रमाण अविद्येच्या पावलावर पाऊल ठेवून पुनः आपण ज्ञानी आहों, असें समजणाऱ्या अंध पुरुषांची अविद्याबाई मार्गदर्शक असल्यामुळें या मूर्खांचा घात होतो. ) ॥ ५ ॥

---

**बालं, प्रमाद्यन्तं, वित्तमोहेन मूढं सांपरायः न प्रतिभाति** ( मूर्ख अज्ञानी—उन्मत्त झालेल्या व संपत्तीच्या मोह-मदिरेनें झिंगून अनावर झालेल्या मूढाला परलोकसाधन करण्याचा मार्ग दिसतच नाहीं. ) **अयं लोकः, परः न अस्ति इति मानी मे पुनः पुनः वशं आपद्यते** ( हाच काय तो भोगलोक आहे, दुसरा लोकच नाहीं, असें अभिमानानें मानणारा पुरुष वरचेवर वरचेवर माझ्या म्हणजे यमाच्या तडाक्यांत सांपडतो. सारांश, जन्म-मरणाच्या फेऱ्यांत सांपडल्यामुळें ह्या असल्या पुरुषाला अनंत यातना होतात. ) ॥ ६ ॥

मंत्रद्वयांत आत्मघाती लोकांचें वर्णन केलें आहे. अविद्येच्या राज्यांत सदैव राहून श्रुतिस्मृत्यादि प्रमाणांचा स्वीकार न करणारे, अनुभवाच्या जोरावर सर्व गोष्टींचा उलगडा होतो असें म्हणणारे, बुद्धिनिश्चय न करितां पाहतील त्या विषयांच्या मागें सैरावैरा धांवणारे, मूर्ख, उन्मत्त, संपत्तीच्या ऐश्वर्यानें

धुंद झालेले, 'यत्दृष्टं तत्सत्यं ( दिसतें तितकें मात्र खरें आहे )' असें म्हणणारे, परलोकाचा अथवा त्याच्या साधनांचा विचार न करणारे लोक म्हणजे अविद्यावश लोक होत. सारांश, भोगविषयांचा मात्र विचार करून त्यांतच रममाण होण्याची इच्छा धरून त्याचीं साधनें शोधून काढणारे लोक अविद्येचे दास होत. तात्पर्य, अविद्या व तज्जन्य दुसऱ्या दोषांचा त्याग करावा, हा सर्व जनांस उपदेश व्हावा व नचिकेत्यानें हा त्याग केला म्हणून त्याला धन्यवाद द्यावा, असा ह्यर्थी या मंत्रद्वयाचा उपयोग करावा. ॥ ५ ॥ ६ ॥

---

सातव्या मंत्रांत आत्मज्ञानाचें प्रवचन, त्याचा प्रवाचक आणि त्याचा श्रोता या वस्तु किती दुर्लभ आहेत याचें वर्णन आहे.—

## आत्मस्वरूपाचें ज्ञानकाठिन्य.

## मंत्र सातवा.

**अन्वय व अर्थ—बहुभिः श्रवणाय अपि यः न लभ्यः** ( पुष्कळ लोकांस ज्या आत्मस्वरूपाचें प्रवचन ऐकावयासही मिळत नाहीं.) **शृण्वन्तः अपि यं बहवः न विद्युः** ( अनेक लोकांनीं आत्मश्रवण केलें तरी त्यांतील बहुतेक सर्वांस आत्मस्वरूप समजत नाहीं.) **वक्ता आश्चर्यः** ( आत्मवस्तूचें प्रवचन यथार्थ करणारा वक्ता प्राप्त होणें ही अद्भुत वस्तु आहे ) **अस्य लब्धा कुशलः** ( आत्मवस्तूचें यथास्वरूप संपादन करणारा पुरुष महाकुशल असावा लागतो )—**अपि—कुशलानुशिष्टः अस्य ज्ञाता आश्चर्यः** ( कुशल आचार्यांनीं उपदेश केलेला व हें आत्मज्ञान संपादन झालेला शिष्य सांपडणें ही तर अद्भुतांतील अद्भुत वस्तु आहे. )

मागें आत्मज्ञानविन्मुख संसाऱ्यांचें मूर्खत्व प्रतिपादिलें. या मंत्रांत आत्मज्ञानाचें श्रवण होणें, तें समजणें, यथाशास्त्र व तत्त्वदर्शी आचार्यांचा लाभ होणें, कुशल शिष्य मिळणें आणि कुशल आचार्य व कुशल शिष्य यांचा प्रीतिसंगम होऊन आत्मस्वरूपाचें विशद ज्ञान शिष्याला होणें या गोष्टी केवळ 'न भूतो न भविष्यति' या स्वरूपाच्या म्हणजे अद्भुत आहेत, असें स्पष्टपणानें सांगितलें आहे. प्रथमतः आत्मप्रवचन अनेक संसारी जीवांस ऐकावयालाही सांपडत नाहीं; कोणाच्या भाग्योदयानें सांपडलेंच तर या श्रोत्यांपैकीं बहुतेकांस तें समजत नाहीं. म्हणून जगतांमध्यें आत्मज्ञानी लोक फार दुर्मिळ असतात. कारण उघड आहे कीं, यथाशास्त्र आत्मश्रवण करून व त्याचें मननचिंतन करून तत्त्वदर्शी झालेला पुरुष म्हणजे आचार्य फारच क्वचित् सांपडतो. पुनः आचार्याची गांठ पडली, तरी त्यांचे बोल यथार्थ समजून निजज्ञानाचा बोध करून

घेणारे शिष्य लाखांत एकदोन मिळाले, तर मिळावयाचे ! एवंच दुर्मिळ आचार्यांची व दुर्मिळतर शिष्याशी गांठ पडून यथार्थ आत्मचर्चा व्हावी व तिचे पर्यवसान आत्मज्ञ शिष्यामध्यें व्हावें, हा योग सगळ्या मन्वंतरांत पांचचार वेळ आला, तर महद्भाग्य होय. एवंच हा विषय, ह्या विषयाचा प्रकाशक, आणि ह्या विषयाचा ग्राहक हा त्रिवेणीसंगम होणें, प्रायः दुर्लभच होय; असा निष्कर्ष आहे. ॥ ७ ॥

---

## मंत्र आठवा.

**अन्वय व अर्थ—बहुधा चिंत्यमानः एषः अवरेण नरेण प्रोक्तः सुज्ञानाय न** ( या आत्मस्वरूपाचें चिंतन हजारों लोकांनीं हजारों प्रकारांनीं केलें आहे. कोठेंच एकमत स्वानुभवानें व शास्त्रद्वारा ठरलेलें नाहीं, म्हणून याचा उपदेश जर सामान्य मनुष्याकडून करून घेतला, तर तो उपदेश यथार्थ ज्ञान उत्पन्न करण्यामध्यें फलद्रूप होत नाहीं. ) **अनन्यप्रोक्ते अत्र गतिः न अस्ति** ( या स्वरूपाचें एकनिष्ठ चिंतन करणाऱ्या गुरूचा उपदेश न घेतां आपणच हें स्वरूप स्वबुद्धीच्या जोरावर समजून घेऊं, असें म्हटलें तर येथें स्वतःच्या बुद्धीची गति चालत नाहीं. ) **हि अणप्रमाणात् अणीयान्** ( कारण हा आत्मा अणु म्हणून जें काय प्रमाण आहे, त्याच्याहूनही लहान आहे )—म्हणून—**अतर्क्य** ( तर्कानें याचें स्वरूप समजावयाचें नाहीं. तें बुद्धीस अगोचर म्हणून अतर्क्य आहे. )

या मंत्रांत कुशल आचार्यद्वाराच कां उपदेश करून घेतला पाहिजे, याचीं कारणें सांगितलीं आहेत. पहाः मोठमोठ्या पंडितांमध्येंही आत्मस्वरूपासंबंधानें एकमत झालेलें नाहीं. तेव्हां अर्थातच अगदीं सामान्य मनुष्याकडून जर आपण आत्मोपदेश करून घेतला, तर तो पुरुषार्थसाधक होत नाहीं. सारांश, ज्याला साक्षात्कारपूर्वक श्रुतिगत आत्मरूपाचें ज्ञान अवगत झालें आहे व बुद्धीचा ठाम निश्चय झाला आहे, त्या आचार्यानें उपदेश केला तर तो फलद्रूप होऊन आपलें कार्य होईल ! असा स्वानुभवी आचार्य नसेल तर,—आत्मस्वरूपासंबंधानें निश्चित सिद्धांत काय आहे, हें त्याचें त्यासच ठाऊक नसेल तर,—तो शिष्याला काय उपदेश करणार ? किंवा त्या उपदेशाचा उपयोग तरी काय होणार ? बरें ! आपला आपणच उपदेश करून घ्यावा असा बेत केला तरी उपयोग होत नाहीं. कारण आत्मस्वरूप अत्यंत सूक्ष्म आहे ज्या कोणत्या लहान वस्तूची कल्पना आपल्यास करितां येईल, त्याहूनही ती वस्तु ( आत्मरूप ) लहान आहे. अर्थात् आत्मा हा बुद्धीला व तर्काला अगोचर आहे. कल्पनानिर्मित वस्तूहूनही जें स्वरूप सूक्ष्म असणार तें कल्पनातीत किंवा

तर्कागोचर असावयाचें, यांत कांहीं आश्चर्यच नाहीं. तात्पर्य, जी स्वरूप-कल्पना तर्कागोचर आहे, ती आपल्या स्वतःच्या बुद्धीच्या मात्र जोरावर आपल्यास कशी प्राप्त करून घेतां येणार? याप्रमाणें सामान्य आचार्य उपयोगी नाहीं, किंवा आपली बुद्धि कितीही कुशाग्र असली तरी तीही उपयोगी नाहीं. म्हणून ज्याला शास्त्रज्ञानपूर्वक साक्षात्काररूपी विज्ञान झालें आहे व निश्चय ठरला आहे, तोच उपदेश करण्याच्या उपयोगी आहे. 'आश्चर्यो वक्ता' '(यथार्थवक्ता हें एक आश्चर्य आहे)' इत्यादि सातव्या मंत्रांत म्हटलें आहे, तें यथायोग्य आहे, हें या मंत्रांवरून स्पष्ट होतें. ॥ ८ ॥

---

नवव्या मंत्रांत 'आश्चर्यो लब्धा (आत्मरूपाचें) श्रवण करून घेणारा पुरुष सांपडणें हेंही आश्चर्य होय)' असें म्हटलें, त्याचें स्पष्टीकरण केलें आहे.

## मंत्र नववा.

**अन्वय व अर्थ—एषा मतिः तर्केण न आपनेया** (ही ब्रह्मबुद्धि तर्कानें भ्रष्ट होत नाहीं किंवा नवीन उत्पन्नही होत नाहीं.) **अन्येन एव प्रोक्ता सुज्ञानाय श्रेष्ठ** (हे प्रियकर नचिकेत! ही ब्रह्मबुद्धि आचार्याचे द्वारानें किंवा श्रुतीच्या द्वारानें मात्र उत्पन्न होते व ती उत्तम ज्ञानाचा लाभ करून देते.) **यां त्वं आपः** (ही जी बुद्धि तुला प्राप्त झाली आहे ती ब्रह्मबुद्धीच होय) **बत त्वं सत्यधृतिः असि** (तूं खरोखर उत्तम धैर्याचा आहेस ही आनंदाची गोष्ट आहे.) **नचिकेतः नः त्वादृक् प्रष्टा भयात्** (हे नचिकेत! तुझ्यासारखा प्रश्न करणारा आम्हांस मिळावा.)

या मंत्रांत स्वयंभू तर्काच्या सहायानें ब्रह्मबुद्धि उत्पन्न होत नाहीं व श्रुतिद्वारा उत्पन्न झाली असेल तर ती नाहींशी होत नाहीं किंवा अपभ्रष्टही होत नाहीं असें सांगितलें आहे. स्वतःच्या तर्कानें जीवाला ब्रह्मबुद्धि केव्हांही व्हावयाची नाहीं. कारण ही बुद्धि तर्काला अगोचर आहे. ही बुद्धि प्राप्त करून घेण्यासाठीं सद्गुरूची सेवा व श्रुतीचें श्रवण मनन हीं अखंड हवीं. तथापि आश्चर्य हें आहे कीं, तुला ही बुद्धि प्राप्त झाली. यावरून तुझी सत्यनिष्ठा अलौकिक आहे असें स्पष्ट होतें. मला असें वाटतें कीं, असे तुझ्यासारखे सत्यनिष्ठावंत शिष्य वारंवार मिळावे. सारांश, जी बुद्धि तर्काच्या स्वयंभूपणानें कोणालाही मिळत नाहीं ती बुद्धि नचिकेत्याला प्राप्त झाली असें पाहून यमाला आनंद झाला. ॥ ९ ॥

---

## मंत्र दहावा.

अन्वय व अर्थ—श्वोभावाः अनित्यं इति अहं जानामि (संपत्तींचा व ऐश्वर्याचा केवढाही निधि असला तरी तो अनित्य असतो हें मला ठाऊक आहे.) अध्रुवैः तत् ध्रुवम् न प्राप्यते (अनित्य कर्माच्या सहायानें नित्य जें परमात्मपद तें केव्हांही मिळत नाहीं.) ततः मया नाचिकेतः अग्निः चितः अनित्यैः द्रव्यैः नित्यं प्राप्तवान् अस्मि (असें जाणूनही मी नाचिकेत अग्नीची आराधना अनित्य द्रव्यांनीं केली आणि ह्या यमधर्माच्या अधिकाराला प्राप्त झालों. प्रलयकालपर्यंत हें माझें ऐश्वर्य नित्य राहणार आहे.)

कर्मानें केवढेंही जरी ऐश्वर्य मिळालें, तरी कर्म अनित्य असतें म्हणून कर्म-प्राप्त ऐश्वर्य अनित्यच असतें. यमधर्मानें नाचिकेत अग्नीचें आराधन केलें तेव्हां त्याला सापेक्षिक नित्यत्व मात्र प्राप्त झालें. खरें नित्यत्व प्राप्त झालें नाहीं. सारांश, फलभोगाच्या आशेनें व अनित्य देहाच्या अभिमानानें कोणतेंही कर्म केलें, अग्नि आदि देव-देवतांची उपासना केली तरी फलप्राप्ति जी होते ती अनित्य असते. कर्मानें मोठेपणा मिळेल; ऐश्वर्य वाढेल, हें खरें; पण हा मोठे-पणा व हें ऐश्वर्य केव्हांही नित्य असणार नाहींत. हें येथें स्पष्टपणानें समजन घ्यावयाचें आहे. ॥ १० ॥

---

## नाचिकेताचें वैराग्य.

## मंत्र अकरावा.

अन्वय व अर्थ—कामस्य आप्तिं जगतः प्रतिष्ठां क्रतोः आनंत्यम् अभयस्य पारं स्तोममहत्, उरुगायं, प्रतिष्ठां दृष्ट्वा धृत्या अत्यस्राक्षीः नाचिकेतः धीरः (हे नाचिकेत! तूं अत्यंत धीर म्हणजे दृढ बुद्धीचा आहेस म्हणून सर्व भोगविषयांची प्राप्ति करून देणारें, विश्वांतील सर्व जगताचा आधार असणारें, यज्ञयागादिकांचें पर्यवसान करणारें, अभयाची मर्यादा असणारें, सर्व ऐश्वर्यानें मंडित झालेलें सर्वस्तुत्य आणि सर्वप्रसिद्ध असें माझ हें सर्व-ऐश्वर्यसंपन्न यमस्थान प्रत्यक्ष पाहूनहि तूं निर्लोभी राहिलास तुला मोह उत्पन्न झाला नाहीं, हें उघड आहे. तुझें अभंग धैर्य ऐश्वर्य-मोहाला वश झालें नाहीं; अथवा तूं या संपत्ति—मोहाला वश झाला नाहींस; यावरून तुझें धैर्य अलौकिक आणि तुझी ब्रह्मबुद्धि दृढनिश्चयाची आहे

यमस्थानाचें ऐश्वर्य केवढें आहे याचें दिग्दर्शन या मंत्रांत प्रसंगानें केलें आहे. नाचिकेत अग्नीची आराधना केली असतां कोणत्या ऐश्वर्याचा लाभ होतो, कोणतें अदृष्ट उत्पन्न होतें, हें या मंत्रावरून समजतें. पण येथें यमाचें ऐश्वर्य सांगण्याचा मुद्दा नाहीं. नाचिकेत्यानें कोणकोणत्या गोष्टींचा त्याग केला हें समजून घ्यावयाचें आहे. ब्रह्मजिज्ञासु पुरुषाला कोणत्या प्रतीचें कडकडीत वैराग्य लागत असतें, त्याची कल्पना या मंत्रावरून होते. असो. नाचिकेत्याची स्तुति यमधर्मानें केली ती सर्वथा वास्तविक आहे यांत शंका नाहीं. मोहक वस्तूंचा प्रत्यक्ष प्रादुर्भाव झाला असतां, त्या मिळण्याचा संभव असतां, त्यांचा ज्ञानपूर्वक त्याग करणें याला विलक्षण धैर्य आणि परमपुरुषार्थाच्या संबंधाची अभंग निष्ठा यांचें साहचर्य अवश्य असावें लागतें. ॥ ११ ॥

---

## आत्म्याचें अगोचरत्व.

### मंत्र बारावा.

**अन्वय व अर्थ—तं दुर्दर्शं, गूढं अनुप्रविष्टं, गुहाहितं गह्वरेष्ठं पुराणं देवं अध्यात्मयोगाधिगमेन मत्वा धीरः हर्षशोकौ जहाति** ( प्रत्यक्ष दिसण्यास अत्यंत कठिण, मोठ्या गुह्य स्थानीं असलेला, हृदयाकाशांत राहणारा, गूढाहून गूढ असा जो सनातन परमात्मा आहे, त्याचें ज्ञान अध्यात्मयोगाच्या संपादनानें विद्वान् पुरुष करून घेतो आणि हर्षशोकांचा त्याग करितो. )

परमेश्वरी स्वरूप समजण किती कठिण आहे हें या मंत्रावरून समजतें. हें स्वरूप इंद्रियांस सर्वथा अगोचर आहे. तें अशा ठिकाणीं असतें कीं, जेथें जाण्याचें सामर्थ्य इंद्रियांस नाहीं. तें जीवाच्या हृदयांमध्यें वास्तव्य करितें. त्याचें ज्ञान करून घेण्यासाठीं अनेक संकटांतून पार पडण्याचें सामर्थ्य व ज्ञान हवें असतें. ही परमेश्वरी वस्तु सनातन आहे. असो. या वस्तूची प्राप्ति करून घेण्याला एकच साधन आहे. तें साधन म्हणजे अध्यात्मयोगाची प्राप्ति हें होय. सर्व विषय-भोगांचा संन्यास करून ब्रह्मचिंतनामध्यें चित्ताचें समाधान करणें हें मुख्य व एकच साधन आहे. अर्थातच असल्या या ज्ञान-समाधींत विषयापासून उत्पन्न होणाऱ्या सुख-दुःखांचा नाश होतो. विषयांच्या संचयानें किंवा अपचयानें ( कमी होण्यानें ) ज्याला चित्तभंगाची बाधा होत नाहीं, तोच धीर पुरुष होय.

नाचिकेत धैर्यवान् व ब्रह्मजिज्ञासु कोणत्या प्रतीचा होता हें या मंत्रांत 'धीर' पदाचें लक्षण करून सांगितलें आहे. कडकडित वैराग्यानें जीव सिद्ध झाला,

दृढ निश्चयाचें पाठबळ त्यास मिळालें, ब्रह्मज्ञानाची उत्कट इच्छा तीव्रतेनें जागृत झाली, म्हणजे पुरुष अनेक संकटांनीं ज्ञान-विज्ञान होणाऱ्या ब्रह्मतत्त्वाचें एकाग्रचित्तानें चिंतन करितो, त्याला धीर पुरुष असें ह्मणावें. नाचिकेता याच योग्यतेचा होता म्हणून त्याला ११ व्या मंत्रांत सांगितलेल्या ऐश्वर्याचें महत्त्व वाटलें नाहीं, हें उघड होतें. त्यानें आपली एक-दृष्टि कायम ठेविली. म्हणून त्याला ब्रह्मज्ञान होण्याची उत्तमोत्तम संधि मिळाली. ॥ १२ ॥

---

## मंत्र तेरावा.

**अन्वय व अर्थ—एतत् श्रुत्वा, संपरिगृह्य, प्रवृह्य; एतं धर्म्यं, अणुं आप्य, सः मर्त्यः हि मोदनीयं लब्ध्वा मोदते** (हें ब्रह्मस्वरूप समजून घेऊन, त्याचें चिंतन व मनन करून, त्याला सर्व अनित्य वस्तूंपासून पृथक् करून आणि या अतिसूक्ष्म व धर्मात्मक स्वरूपाला प्राप्त करून घेऊन तो धीर मर्त्य—मानव, जीव, मरणास वश असणारा प्राणी—अत्यंत आनंद देणारी वस्तू प्राप्त करून घेतो, व स्वतः आनंदरूप होतो.) **नचिकेतसं मन्ये** (नचिकेत हा प्रत्यक्ष होणारें जें ब्रह्मस्वरूप-सदन त्याप्रत प्राप्त झाला आहे असें मला वाटतें.)

या मंत्राचें तात्पर्य इतकेंच आहे कीं, मर्त्य म्हणून समजल्या जाणाऱ्या जीवानें ब्रह्मस्वरूपाचें श्रवण केलें, त्याचें यथार्थ मनन करून तें आपलेसें केलें. सर्व बाह्य विषयांपासून त्यास विभक्त करून त्या अतिसूक्ष्म धर्मरूपी स्वरूपाची प्राप्ति करून घेतली, तर त्याला आनंदाचा कंद मिळाला असें होतें. तो स्वतः आनंदरूप होतो. यमधर्म म्हणतो कीं, नाचिकेत ! तुला आतां ब्रह्मज्ञान काय तें समजलें व त्याचें साधन प्राप्त होऊन तूं ब्रह्मरूप झाला आहेस असें मला वाटतें. तुला आतां साधनसंबंधानें समजावयाचें असें कांहीं राहिलें नाहीं. तूं ब्रह्मस्वरूपाचें निवासस्थान झाला आहेस. तूं धन्य आहेस. किंवा असाहि अर्थ होईल कीं, ब्रह्मस्वरूपाचा प्रासाद तुला आतां मोकळा झाला आहे. तूं आंत शीर आणि ब्रह्मप्राप्ति करून घे. ॥ १३ ॥

---

### ब्रह्मविषयक प्रश्न.

## मंत्र चवदावा.

**अन्वय व अर्थ—धर्मात् अन्यत्र, अधर्मात् अन्यत्र, अस्मात् कृता-कृतात् अन्यत्र च भूतात् भव्यात् च अन्यत्र यत् पश्यसि तत् वद**

(धर्माहून भिन्न, अधर्माहून भिन्न ह्या आपण निर्माण केलेल्या वस्तूंहून भिन्न, व निसर्गानें उत्पन्न केलेल्या वस्तूंहून भिन्न, तसेंच भूतकालीन वस्तूंहून भिन्न, आणि भविष्यकालीन वस्तूंहून भिन्न, असें जें ब्रह्म, तें तुला ठाऊक आहे. तें तूं मला सांग.)

या मंत्रांत नचिकेत्यानें यमधर्माला जो प्रश्न केला त्याचा अवतार आहे. मागील ११।१२ व १३ मंत्रांत परमेश्वराच्या स्वरूपाचें वर्णन केलें आहे. त्यांत तें स्वरूप सर्व दृश्य पदार्थांहून भिन्न आहे, इंद्रियादिकांस अगोचर आहे, सनातन आहे, अध्यात्मयोगानें मात्र त्याची प्राप्ति होते, त्याचें स्वरूप अति-सूक्ष्म आहे, तर्कादिकांस तें अगोचर आहे, इत्यादि सांगितलें आहे. त्या-वरून नचिकेत्याचा हा प्रश्न उत्पन्न झाला आहे. या प्रश्नांत परमेश्वरी स्वरूप कसें असेंल व तें साध्य कसें होईल असें विचारिलें आहे. ब्रह्मस्वरूप कोणत्या प्रकारचें नाहीं, हें नचिकेत्यास समजलें आहे. पण तें कोणत्या प्रकारचें आहे हें समजलेलें नाहीं. प्रश्न असा आहे.—धर्माहून (म्हणजे जो आपला पुरुषार्थ आहे तो सिद्ध करणाऱ्या शास्त्रोक्त अंतर्बाह्य साधनांहून) निराळा, अधर्माहून (म्हणजे शास्त्रांनीं न सांगितलेल्या व्यावहारिक नियमांहून निराळा) तसेंच मनुष्यकृत पदार्थांहून निराळा, व निसर्गनिर्मित वस्तुस्थितीहून निराळा, आणि भूतभविष्यवर्तमानकालांहून निराळा, असा जो परमात्मा तुला ठाऊक आहे तो मला सांग; अशी नचिकेत्याची विनंति आहे. याप्रमाणें विधिनिषेधात्मक शास्त्र आणि व्यवहार यांच्यायोगानें जें स्वरूप सिद्ध होत नाहीं, वस्तुस्थिति सांगणाऱ्या शास्त्रांनीं किंवा कल्पनाकृत कलांनीं ज्याचें स्वरूप प्रकट करितां येत नाहीं, व जें कालस्थलातीत आहे, तें स्वरूप यमधर्माला विदित होतें. ह्या स्वरूपाचें आविष्करण करण्याविषयीं नचिकेत्यानें यमधर्माला विनंति केली आहे. सारांश, निर्गुण व निरुपाधिक ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान सांगण्या-विषयींची प्रार्थना आहे. ॥ १४ ॥

---

## ॐकारमाहात्म्य.

### मंत्र पंधरावा.

अन्वय व अर्थ—सर्वे वेदाः यत् पदं आमनन्ति, सर्वाणि तपांसि च यत् वदन्ति, यत् इच्छन्तः ब्रह्मचर्यं चरन्ति तत् पदं ते संग्रहेण ब्रवीमि, एतत् ॐ इति (सर्व वेद ज्या पदाचें वर्णन करितात, सर्व तपस्वी पुरुषार्थप्राप्तीसाठीं ज्याचें चिंतन करित असतात, ज्याच्या

प्राप्तीची इच्छा करणारे लोक ब्रह्मचर्याचें अनुष्ठान करितात, तें पद मी तुला थोडक्यांत सांगतों. ॐ हें तें पद होय. )

या मंत्रांत प्रथमतः ब्रह्मस्वरूपाचें माहात्म्य सांगून नंतर त्या स्वरूपाचें प्रतीक सांगितलें आहे. सर्व वेद ब्रह्मस्वरूपाचें, सकल पुरुषार्थाच्या अंतिम स्वरूपाचें वर्णन करण्यांत समर्पित झाले आहेत. सर्व तपस्वी अनेक प्रकारची तपःश्चर्या करिता असतां याच स्वरूपाच्या प्राप्तीची प्रार्थना करित असतात, आणि सर्व ब्रह्मचारी व्रतनिष्ठ राहतात, त्याचें अंतिम साध्य परब्रह्मप्राप्ति हेंच आहे. सारांश, सर्व ज्ञानाचें, सर्व तपश्चर्येचें आणि सर्व व्रतनिष्ठेचें ध्येय व साध्य एकच वस्तु आहे, ती वस्तु म्हणजे ब्रह्मस्वरूप होय. या स्वरूपाचें अति संक्षिप्त वर्णन म्हणजे ॐकार हें होय. ॐकार हा ब्रह्मवाचक शब्द आहे. व ब्रह्माचें प्रतीकही ॐकारच आहे. सारांश, ज्याला ब्रह्मस्वरूप प्राप्त करून घ्यावयाचें आहे, विचार, उच्चार आणि आचार यांचें पर्यवसान जें ब्रह्म तें साध्य करून घ्यावयाचें आहे, त्यानें प्रथमतः ॐकाराचा जप व ॐकाराचें ध्यान करावयास लागावें. साकार व निराकार स्वरूपाचें ज्ञान होण्याला ॐकारोपासना हें उत्तम साधन आहे. ॥ १५ ॥

---

## मंत्र सोळावा.

**अन्वय व अर्थ**—हि ( कारण ) एतत् एव अक्षरं ब्रह्म, हि एतत् एव अक्षरं परं (हा ॐकार हें अक्षरब्रह्म आहे. हेंच अक्षर अतिश्रेष्ठ आहे) हि एतत् एव अक्षरं ज्ञात्वा यः यत् इच्छति तत् तस्य (कारण ह्या अक्षराचें मात्र ज्ञान करून घेतल्यावर ज्याला जें हवें असतें, तें त्याला मिळतें. )

या मंत्रांत ॐकाराचें माहात्म्य सांगितलें आहे. हें अक्षर ( ज्याचा केव्हांही क्षय होत नाहीं किंवा वृद्धि होत नाहीं. त्याला अक्षर असें म्हणावें ) साकार ब्रह्माचें वाचक व निर्गुण आणि निराकार ब्रह्माचें प्रतीक आहे. उच्चार केला असतां ज्या वस्तूंचें स्मरण होतें त्या वस्तूंचें तें उच्चारलेलें अक्षर प्रतीक असतें. असो. या ॐकाराचें पूर्ण ज्ञान झालें असतां सात्विक जीवांचे सर्व ज्ञानपर मनोरथ सिद्ध होतात. ॥ १६ ॥

---

## मंत्र सतरावा.

**अन्वय व अर्थ**—एतत् श्रेष्ठं आलंबनं, एतत् पर आलंबनं ( हें सर्वश्रेष्ठ आणि सर्वांतीत असें उत्तम आलंबन म्हणजे उत्तम आधार आहे. )

**एतत् आलंबनं ज्ञात्वा ब्रह्मलोके महीयते** ( हा श्रेष्ठ आधार ज्याला पूर्णपणें ज्ञात होऊन हस्तगत होतो, तो पुरुष ब्रह्मलोकांत पूज्यता पावतो.)

याही मंत्रांत ॐकारचें माहात्म्य सांगितलें आहे. ॐकार हें साधन अतिश्रेष्ठ म्हणजे सर्व शिष्ट लोकांनीं स्तुति केलेलें अथवा त्यांस मान्य असणारें साधन आहे. तसेंच, हें साधन परावर ब्रह्माचें ( निराकार आणि साकार ब्रह्माचें ) संपादन करून देतें. ह्या आलंबनाचें म्हणजे ॐकाराचें पूर्ण ज्ञान-विज्ञान झालें असतां सर्वत्र हा ॐकारज्ञ पुरुष वंदनीय आणि पूज्य होतो. ॥ १७ ॥

---

## आत्मस्वरूप ( जीवब्रह्माभेद ).

### मंत्र अठरावा.

**अन्वय व अर्थ—अयं विपश्चित् न जायते वा न म्रियते** ( हा ज्ञानी पुरुष केव्हांही जन्मास येत नाहीं, किंवा मरण पावत नाहीं. )—**अयं कुतश्चित् कश्चित् न बभूव** ( हा कोणापासूनही उत्पन्न झाला नाहीं, किंवा कशाचाही हा परिणाम नाहीं.) **अयं अजः नित्यः शाश्वतः पुराणः** ( हा अजन्मा नित्य, शाश्वत—स्वरूपांत राहणारा—आणि सनातन आहे. ) **हन्यमाने शरीरे न हन्यते.** ( शरीराचा विनाश झाला असतांही याचा विनाश होत नाहीं.

या मंत्रापासून ब्रह्मस्वरूपाच्या वर्णनाला आरंभ झाला आहे. श्रुतिदृष्टीनें तरी आत्मा (जीव) आणि परमात्मा यांत भेदभाव नाहीं असें मला दिसत आहे. सारांश, आत्मा आणि परमात्मा हे उभयतां एकच असून ऊभयतांसही ब्रह्म या नांवानें संबोधितां येतें. असो; हा आत्मा ( किंवा परमात्मा ) जन्ममरण-शून्य आहे. याची उत्पत्तीच झाली नाहीं म्हणून हा दुसऱ्या कोणत्या तरी वस्तूपासून उत्पन्न झाला असें सांगावयाचें कारणच नाहीं. अर्थात् हा अजन्मा म्हणजे ( अनादि ) आहे. हा नित्य आहे हें सांगावयास नको. तसेंच हा शाश्वत आणि पुराण आहे याचा अर्थ हाच कीं, त्याचा केव्हांही अपक्षय होत नाहीं व त्याला केव्हांही वृद्धीचा संस्कार होत नाहीं. म्हणजे तो सर्वविकारशून्य आहे. तो नित्य असूनही क्षीण न होणारा आणि जुना असूनही सदैव नव्या-सारखा दिसणारा आहे. आपल्या या पांचभौतिक शरीराचा नाश झाला असतांही त्याचा केव्हांही नाश होत नाहीं. सारांश, तो अनाद्यनंत अविकार्य आणि अविकारी आहे. बाहेरील उपाधींचा याला केव्हांही स्पर्श होत नाहीं. अर्थातच उपाधिदोषांनींही हा लिप्त होत नाहीं. ॥ १८ ॥

## मंत्र एकोणिसावा.

अन्वय व अर्थ—हन्ता हन्तुं मन्यते चेत्, हतः हतं मन्यते चेत्, तौ उभौ न विजानीतः, अयं न हन्ति न हन्यते (या आत्म्याला मी ठार मारीन असें जर मारणाराला वाटत असेल, आणि 'मला मारिलें म्हणून मी मरतों' असें कोणाला वाटत असेल तर त्या दोघांनाही कांहीं एक समजत नाहीं. हा आत्मा कोणाला मारित नाहीं, किंवा कोणाकडून मारलाही जात नाहीं. )

या मंत्रांत सामान्य लोकांस जो मोह असतो त्याचें निराकरण केलें आहे. सामान्यतः जीवांस असें अज्ञान असतें कीं, देह आणि आत्मा एकच आहेत. देह पडला म्हणजे आत्मा मेला असें कित्येकांस वाटतें. म्हणून देहाचा नाश करणाऱ्याला ते आत्मघाती असें म्हणतात. आणि देहनाश झाला असतां आत्मा मेला असें समजतात. हें म्हणणें आणि समजणें हीं दोन्ही भ्रांतीचीं कार्यें आहेत. आत्मा अजन्मा आणि अमर आहे. तो नित्य, शाश्वत आणि ' पुराण ' आहे, हें परमार्थज्ञान सामान्य लोकांस नसतें म्हणून त्यांना वरील भ्रांति होते. ह्या भ्रांतीचा निरास शरीराचें उदाहरण घेऊन येथें स्पष्ट केला आहे. शरीरादिद्वारा झालेलीं कर्में, ( शरीर, इंद्रियें, मन, बुद्धि, आणि अहंकार यांनीं केलेलीं कर्में ) व शरीरादिकांस होणारे विकार ( केलेल्या कर्मांचे परिणाम ) याचा व आत्म्याचा कांहींएक संबंध नाहीं. म्हणजे आत्मा हा सर्वथा निरुपाधिक आहे, म्हणून आत्म्याच्या संबंधानें शोक-मोहादि उत्पन्न होण्याचें कारण नाहीं. याचप्रमाणें आत्म्याला शोक-मोहादि विकार होण्याचें कारण नाहीं. ॥ १९ ॥

---

## मंत्र विसावा.

अन्वय व अर्थ—अस्य जन्तोः गुहायां निहितः आत्मा अणोः अणीयान्, महतः महीयान् ( या जीवांचा—सर्व भूतमात्रांचा—आत्मा त्यांच्या हृदयगुहेमध्यें वास्तव्य करितो. हा आत्मा अति—सूक्ष्म वस्तूंहून अतिसूक्ष्म आहे व अतिशय मोठ्या पदार्थांहून अतिशय मोठा आहे. ) धातुप्रसादात् वीतशोकः अक्रतुः तं आत्मनः महिमानं पश्यति (मन, बुद्धि आदि धातूंचें—शरीर व मन यांची घटना करणाऱ्या पदार्थांचें—एकच स्वरूप झालें, सर्व धातु शांत, समरस झाल्या म्हणजे ज्ञानी पुरुष विषय—लोभापासून परावृत्त होतो, आणि शोक—मोह—शून्य होतो. नंतर

त्याला ज्ञानानें मात्र साध्य होणारें आत्मस्वरूप व त्याचा महिमा हीं दृग्गोचर होतात, म्हणजे त्याला समजतात. )

या मंत्रांत आत्मस्वरूपाचें वर्णन करून तें स्वरूप पाहण्याचा खरा अधिकारी कोण याचें निदर्शन केलें आहे. परमात्मा हा सर्व चराचराचा नियामक असल्यामुळें तो सूक्ष्माहून सूक्ष्म आणि मोठ्याहून मोठा असा आहे. पदार्थमात्राच्या अंतर्यामी राहून तो त्यांचें नियमन करितो, असें मंत्रांत स्पष्ट म्हटलें आहे. या स्वरूपाचें ज्ञान होण्याला इंद्रियदमन, मनोविजय, वासनानाश आणि अहंकारविनाश हीं मुख्य साधनें आहेत. या साधनांनीं चित्त प्रसन्न होतें म्हणजे शुद्ध होतें. अर्थातच ही चित्तशुद्धि झाली आणि वैराग्य बाणलें म्हणजे श्रवण-मननादिकांनीं साध्य होणारें परोक्षज्ञान होऊन आत्मस्वरूपाचा महिमा समजतो. आणि शेवटीं निदिध्यासनानें स्वरूपसाक्षात्कार होऊन अज्ञान आपल्या शोक-मोहादि अपत्यांसह निघून जाऊन नाहींसें होतें. अर्थात् अज, नित्य, शाश्वत आणि पुराण असें जें आत्मरूप त्याचा साक्षात्कार होतो. ॥ २० ॥

---

## मंत्र एकविसावा.

**अन्वय व अर्थ—आसीनः दूरं व्रजति, शयानः सर्वतः याति** ( हा आत्मा बसलेला असतांही दूर जातो व निजलेला असतांही सर्व ठिकाणीं हिंडत असतो. ) **तं मदामदं देवं मदन्यः कः ज्ञातुं अर्हति** ( हर्ष-खेद-पूर्ण असा जो विरुद्ध धर्मी दिव्य परमात्मा आहे, त्याला माझ्याशिवाय दुसरा कोण जाणूं शकेल. )

येथें आत्मस्वरूपाचे विरुद्ध धर्म सांगून परमार्थतः तो एकच स्वरूपी आहे, असें सिद्ध केलें आहे. एका ठिकाणीं बसून लांब लांब जाणारा आणि शयनावर आरूढ होऊन सर्वत्र पर्यटण करणारा, तसेंच हर्षयुक्त होऊन हर्षशून्य असणारा, हा परमात्मा आहे; असें सांगण्याचा हेतु सामान्य जीवांचे परमार्थतः भिन्न भाव प्रकट करावे हा आहे. तो सर्वव्यापी आहे म्हणून तो एके ठिकाणीं राहूनही सर्वत्र दृग्गोचर होतो. त्याला हर्ष होतो व हर्ष होत नाहीं, असें सांगावयाचें म्हणजे तो परमार्थतः अविकारी आहे असें सिद्ध करावयाचें आहे. दिसणारे विकार परमार्थस्वरूपांत असत नाहींत, हें आपल्यास समजून घ्यावयाचें आहे. असें ज्ञान करून घेण्याला एक आपला सूक्ष्म आत्मा मात्र समर्थ आहे. परमात्म्याचें ज्ञान एक आत्मज्ञानानें मात्र होईल. केवल बुद्धीनें, केवल मनानें व केवल इंद्रियांनीं हें ज्ञान व्हावयाचें नाहीं. ॥ २१ ॥

---

## मंत्र बाविसावा.

अन्वय व अर्थ—अनवस्थेषु शरीरेषु अशरीरं अवस्थितं महान्तं विभुं आत्मानं मत्वा धीरः न शोचति ( नश्वर शरीरांमध्यें अशरीरत्वानें नित्य राहणारा हा सर्वश्रेष्ठ व सर्वव्यापी आत्मा समजून घेतला असतां विद्वान् पुरुषाला शोक-मोह उत्पन्न होत नाहींत. )

या मंत्रांत आत्मा हा सर्वश्रेष्ठ आहे, सर्वव्यापी आहे, असें सांगून तो सर्व शरीरी पदार्थांमध्यें नित्यत्वानें राहतो असा सिद्धान्त केला आहे. शरीर म्हटलें म्हणजे तें नश्वर किंवा क्षणभंगुर असावयाचें. शरीराला विकार होत असतांही हा अविकारी राहतो. १८ व १९ मंत्रांत सांगितल्याप्रमाणें या अजरामर, सर्वश्रेष्ठ आणि सर्वव्यापी परमेश्वरी स्वरूपाचा अथवा आत्मस्वरूपाचा अनुवाद करून येथें पुनः असा उपदेश केला कीं, ज्ञानी पुरुषाला आत्मतत्त्वाचें ज्ञान-विज्ञान झालें असतां व त्याचा निदिध्यास दृढ झाला असतां नश्वर, विकारी, आणि विकार्य शरीर-मनादिकांच्या संबंधानें कोणत्याही प्रकारचा खेद होत नाहीं. ॥ २२ ॥

---

## आत्मस्वरूपाचें योगसाधन.

## मंत्र तेविसावा.

अन्वय व अर्थ—अयं आत्मा प्रवचनेन न, मेधया न, बहुना श्रुतेन न लभ्यः ( हें आत्मस्वरूपाचें ज्ञान व त्याची प्राप्ति प्रवचनानें होत नाहीं, बुद्धिकुशलतेनें मिळत नाहीं किंवा पुष्कळ अध्ययनानेंही संपादितां येत नाहीं.) एषः यं एव वृणुते तेन लभ्यः, तस्य एषः आत्मा स्वाम् तनूम् विवृणुते ( हा ज्या भक्तावर अत्यंत प्रेम करून त्याचा स्वीकार करितो, त्याला मात्र परमात्मरूप प्राप्त होतें. हा आत्मा नित्य-भक्ताला मात्र आपलें स्वरूप स्पष्ट करून दाखवितो. )

येथें असें स्पष्ट प्रतिपादिलें आहे कीं, पुष्कळ आत्मचर्चा केली किंवा बुद्धि-वैभव वाढविलें किंवा पुष्कळ पाठपाठांतर केलें, तरी आत्मज्ञानाचा लाभ होत नाहीं. पण ज्या एकनिष्ठ उपासकानें दृढ निदिध्यास केलेला असतो, त्याला मात्र आत्मस्वरूपाचें खरें दर्शन आत्मद्वाराच होतें. तात्पर्य, बाह्य साधनांनीं आत्मप्राप्ति होत नाहीं. दृढ अभ्यासानें आपलें चित्त आत्ममय झालें म्हणजे आत्मसाक्षात्कार होऊन आपल्याला आत्मस्वरूपाचें खरें ह्रद्गत कळतें. तेव्हां आत्मज्ञानाचा खरा

उपाय म्हणजे श्रवण, मनन, निदिध्यास हा होय. नुसत्या विद्वत्तेच्या, कल्पनेच्या किंवा अभ्यासाच्या सहायानें ही प्राप्ति व्हावयाची नाहीं. आत्मस्वरूपाचा प्रसाद होतो. तेव्हां मात्र आत्म-साक्षात्कार होतो. ॥ २३ ॥

## मंत्र चोविसावा.

**अन्वय व अर्थ—दुश्चरितात् न अविरतः, न अशान्तः, न असमाहितः, न अशान्तमानसः, वा अपि प्रज्ञानेन एनं आप्नुयात्** ( पण जो दुराचरणापासून परावृत्त झाला नाहीं, ज्यानें इंद्रियांचें दमन केलें नाहीं, ज्याच्या चित्ताच्या एकाग्रतेला दृढता प्राप्त झाली नाहीं, व ज्याचें मन शांत झालें नाहीं, अथवा विषयवासना नष्ट न झाल्यामुळें चित्तैकाग्र्यता नाहींशी झाली नाहीं, त्या पुरुषानें वाटेल तितकें अध्ययन केलेलें असो; त्याला ब्रह्मस्वरूप किंवा आत्मस्वरूप समजावयाचें नाहीं. ).

भक्ति नसेल तर आत्मस्वरूपाचें ज्ञान होत नाहीं, असें २३ व्या मंत्रांत विधान केलें आणि येथें ज्याचें चित्त शुद्ध झालें नाहीं, त्याला ब्रह्मज्ञान किंवा ब्रह्मप्राप्ति होत नाहीं असें स्पष्ट केलें. ज्ञानाचा संचय केवढाही मोठा झालेला असला तरी जोंपर्यंत दुराचरण करण्याची वृत्ति निरस्त झाली नाहीं, जोंपर्यंत इंद्रियांचें विषय-भ्रमण संपलें नाहीं, जोंपर्यंत बुद्धीची एकतानता झालेली नाहीं, व जोंपर्यंत वासना आपल्या कारणासह नाहींशी झाली नाहीं, तोंपर्यंत आत्मस्वरूपाचें ज्ञान व्हावयाचें नाहीं. सारांश, आपली बहिर्मुख दृष्टि अंतर्मुख झाल्याशिवाय आणि ती अंतर्मुख दृष्टि भक्तीनें आत्मस्वरूपाकडे लावून ज्ञानप्राप्ति करून घेतल्याशिवाय त्या स्वरूपाचें ज्ञान विज्ञान होणें शक्य नाहीं असें या दोन मंत्रांचें तात्पर्य आहे. ॥ २४ ॥

## मंत्र पंचविसावा.

**अन्वय व अर्थ—यस्य ब्रह्म च क्षत्रं च उभे ओदनः भवतः, यस्य मृत्युः उपसेचनं** ( ब्राह्मण आणि क्षत्रिय हे उभयतांही ज्या परमात्म्याचे भक्षणाचे पदार्थ होतात, मृत्यु हा ज्याचें लवण—भंजन आहे ) **यत्र सः कः इत्था वेद** ( एवंगुण विशिष्ट ब्रह्मस्वरूप कोठें असतें याचें ज्ञान कोणा प्राकृत पुरुषांस संपादन करितां येईल ? )

या मंत्रांत विशेष अर्थ सांगितला आहे. ब्राह्मण म्हणजे ज्ञान-संपादन करणारे लोक आणि क्षत्रिय म्हणजे पराक्रम करणारे लोक होत. हे उभयतां सर्व

जीवांचे प्रतिनिधि होत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. जगांमध्यें ज्ञान-संपादन करणें आणि पराक्रमाचीं कार्यें करणें हे दोन व्यवहार मात्र चाललेले दिसतात. अर्थात् 'ब्रह्मक्षत्र' या पदांनीं सर्व मनुष्यजातीचा उल्लेख होतो. आतां परमेश्वराचें स्वरूप समजून घेतलें असतां प्रत्ययास असें येतें कीं; ज्ञान आणि कर्म हीं दोन्ही त्या स्वरूपाचा उदय झाला असतां मावळून जातात. तात्पर्य, ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान-विज्ञान हें विषयज्ञानाला आणि विषयकर्माला गिळून टाकणारें आहे. म्हणून श्रुतीनें परमेश्वराला ब्रह्म-क्षत्रियांचें मारक केलें आहे. तसेंच सर्वसंहारकर्ता मृत्यु हा या परब्रह्माच्या दाढेलाही पुरत नाहीं. मृत्यु म्हणजे परमेश्वराचें एक तोंडीं लावणेंच होय. असा ब्रह्म-क्षत्रियांचा म्हणजे ज्ञान आणि कर्माचा अस्त करणारा, व मृत्यूचा नाश करणारा जो परमात्मा तो कोठें वास्तव्य करितो, याचें ज्ञान सामान्य पुरुषांस व्हावयाचें नाहीं. धर्माची व्यवस्था ज्ञानपूर्वक करणें आणि सर्व प्रजांचें संरक्षण करणें, हीं अनुक्रमें ब्राह्मणांचीं व क्षत्रियांचीं कर्तव्यकर्में आहेत. मृत्यूचें काम सर्वसंहार करावा हें आहे. पण ज्ञानातीत, कर्मातीत जो शाश्वत आत्मा तो या सर्वांस गिळून टाकून आपण स्वरूपानें जशाच्या तसाच राहतो. त्याचें ज्ञान बहुश्रुतमात्र ब्राह्मणांस व्हावयाचें नाहीं किंवा पराक्रम मात्र करणाऱ्या क्षत्रियांस व्हावयाचें नाहीं. 'तसेंच सर्व विश्व नश्वर आहे' असें म्हणणाऱ्या भौतिक शास्त्र्यालाही परमात्मज्ञान व्हावयाचें नाहीं. हें ज्ञान होण्याला २४ व्या मंत्रांत सांगितलेली चित्तशुद्धि आणि २३ व्या मंत्रांत सांगितलेली ज्ञान-उपासना या साधनांसह ब्रह्मस्वरूपाचा निदिध्यास करणाऱ्या विद्वानाला मात्र ब्रह्मज्ञान होतें, हें तात्पर्य आहे. ॥ २५ ॥

दुसरी वल्ली समाप्त.

---

## वल्ली तिसरी.

### जीवेशांचें ऐक्य.

### मंत्र पहिला.

**अन्वय व अर्थ—लोके सुकृतस्य ऋतं पिबंतौ, परमे परार्ध्ये गुहां विष्टौ, छायातपौ ब्रह्मविदः, पञ्चाग्नयः च ये त्रिणाचिकेताः वदन्ति** ( या जगतांमध्यें किंवा आपआपल्या शरीरांमध्यें आपण केलेल्या पुण्यात्मक कर्मांचे फलाचा उपभोग घेणारे, अत्यंत गूढ अशा हृदय—गुहेमध्यें

प्रवेश करून राहणारे व छाया आणि प्रकाश यांच्या परस्परविरोधी स्वभावाप्रमाणें स्वभाव असणारे जीव आणि आत्मा आहेत; असें ब्रह्मवेत्ते व त्याचप्रमाणें पञ्चाग्निसाधक व नाचिकेत–अग्नि–होत्री म्हणत असतात.)

आपण केलेल्या कर्मांचें फल आपल्या ह्या किंवा इतर लोकीं, व ह्या जन्मीं किंवा जन्मांतरीं भोगावें लागत असतें. येथें किंवा अन्यत्र जीवानें केलेल्या कर्मांचें फल त्यानें भोगलेंच पाहिजे. जीव हा कर्मफलाचा उपभोग घेतो आणि आत्मा त्याचा साक्षी असतो. उभयतांसही कर्मफलाचा संबंध येतो; म्हणून त्यांना कर्मफलरूपी अमृत पिणारे असें विशेषण दिलें आहे. या दोघांचेंही वास्तव्य एकाच ठिकाणीं म्हणजे हृदयाकाशांत असतें. हें वसतिस्थान अत्यंत गहन आहे म्हणून इंद्रियास अगोचरही आहे. असें असूनही म्हणजे हें उभयतां एकच कर्म–फलामृतार्शी संबंध ठेवणारे व एक गृहीं वास्तव्य करणारे असूनही छाया आणि प्रकाश यांप्रमाणें विरोधिधर्मात्मक आहेत. छाया आणि प्रकाश एकत्र असतात हें कोणासही सांगावयास नको. या संबंधानें ब्रह्मवेत्त्या पुरुषांत आणि तपस्वी व दीक्षित यांत एकवाक्यता आहे. सर्वांचें म्हणणें हें आहे कीं, जीव आणि आत्मा (सोपाधिक आणि निरुपाधिक आत्मा, (अज्ञानाचें पटल ज्याच्यावर पडलें आहे तो आत्मा व ज्ञानी आत्मा हे उभयतांही) एकत्र राहतात. आणि अज्ञानाचा उच्छेद झाला म्हणजे ते दोघेही अभिन्न म्हणजे भेदशून्य होतात. 'ब्रह्मवित्' याचा अर्थ वेदवेत्ते वैदिक असा केल्यासही सरळ अर्थ होतो. ॥ १ ॥

---

## मंत्र दुसरा.

अन्वय व अर्थ—यः ईजानानाम् सेतुः, यत् अक्षरं परं ब्रह्म, तितीर्षतां अभयं पारं नाचिकेतं शकेमहि (जो यज्ञ करणाऱ्या निष्काम याज्ञिकांचा सेतु आहे, जें अक्षर असून अतिश्रेष्ठ ब्रह्म आहे, जें संसार–समुद्रांतून तरून जाऊं इच्छिणाऱ्या मुमुक्षूंचें भीतिशून्य असें पलीकडचें तीर आहे, तें परब्रह्म नाचिकेत–अग्नीची ज्ञानपूर्वक निष्काम उपासना केली असतां समजून घेतां येतें.)

या मंत्रांत जीवाला ब्रह्मस्वरूप हवें असेल तर त्यानें प्रथम निष्काम उपासना केली पाहिजे असें सांगितलें आहे. नाचिकेत–अग्नीची निष्काम उपासना ज्ञानपूर्वक केली असतां हिच्या साह्यानें याज्ञिक लोक ज्ञानोत्पत्तीनंतर संसारसागराबरून पलीकडे जातात. म्हणजे नाचिकेत–अग्नि–उपासना हा एक उत्तम प्रकारचा सेतु (पूल) होतो; आणि पुढें ज्ञानी जीवांस अत्यंत श्रेष्ठ व अविनाशी

परब्रह्म आहे, त्याप्रत ज्ञानमार्ग नेऊन पोंचवितो. या निष्काम यज्ञाच्या सहायानें तरून जाऊं इच्छिणारे मुमुक्षूंस कोणत्याही प्रकारची भीति प्राप्त न होतां ते 'पैलतीरास' जातात. सारांश, जीवानें ब्रह्मस्वरूप प्राप्त करून घेण्याची इच्छा केली तर त्या प्राप्तीला नाचिकेत–अग्नीची निष्काम उपासना हें एक उत्तम साधन आहे. ॥ २ ॥

---

## मंत्र तिसरा व चवथा.

अन्वय व अर्थ—आत्मानं रथिनं विद्धि, तु शरीरं रथं एव, तु बुद्धिं सारथिं विद्धि, च मनः प्रग्रहं एव (आत्मा म्हणजे जीवात्मा हा रथी–रथस्वामी–आहे. पण शरीर हा त्याचा रथ आहे. तसेंच बुद्धि ही या रथाचें सारथ्य करिते आणि मन हें सारथ्याच्या हातांत असणारी रशना–दोरी–आहे.) ॥ ३ ॥

इंद्रियाणि हयान् आहुः विषयान् तेषु गोचरान् 'आत्मेंद्रिय–मनोयुक्तं भोक्ता' इति मनीषिणः आहुः (इंद्रियें हीं या रथाचे घोडे आहेत, विषय हे त्या घोड्यांस प्राप्त होणारे मार्ग आहेत. आणि इंद्रियें व मन यांनीं युक्त असणारा आत्मा हा भोक्ता आहे, असें विद्वान् लोक म्हणतात.) ॥ ४ ॥

या तिसऱ्या आणि चवथ्या मंत्रांत श्रुतीनें एक अति सुंदर रूपक केलें आहे. या रूपकांत शरीर हा रथ, आत्मा हा त्या रथाचा स्वामी, बुद्धि हा आत्म्याचा सारथि, मन हें त्या बुद्धीच्या हातांत असणारी रशना, इंद्रियें हीं त्या रथास ओढणारे अश्व आणि शब्द–स्पर्शादि विषय हे रथवाहक अश्वांचे मार्ग होत, अशी कल्पना केली आहे. आणि शेवटीं सांगितलें आहे कीं, इंद्रिय–मनांनीं युक्त असणारा आत्मा हा भोक्ता आहे. या रूपकावरून प्रथम हें स्पष्ट दिसतें कीं, ज्ञान करून देणाऱ्या बुद्धीचा विरह झाला असतां आत्म्याला भोक्तृत्व प्राप्त होतें. ज्ञानाच्या अभावीं आत्मा म्हणजे जीवात्मा हा विषयांमध्यें मात्र घोंटाळून राहतो व त्याला भोक्तृत्व प्राप्त होतें; त्याचें स्वातंत्र्य नाहींसें होतें. दुसरी गोष्ट या रूपकावरून स्पष्ट होते ती ही कीं, परमार्थतः (वास्तविक रीतीनें पाहिलें असतां) आत्म्याचा शरीर, बुद्धि, मन, इंद्रियें आणि विषय यांच्याशीं अर्थाअर्थीं कांहीं संबंध नाहीं. आत्मा निराळा, आणि शरीरादि इतर सर्व उपकरणें निराळीं व विरुद्धधर्मी आहेत. या उपकारणांहून आत्मा निराळा आहे, अशें ज्ञान ज्याला होतें तो खरा आत्मज्ञ होय. आत्मज्ञान्याच्या आत्म्याचें जीवित्वही येथें संपतें. आणि तिसरी गोष्ट ही ध्यानांत ठेवावयाची आहे कीं, संस्कृत बुद्धीचें सहाय

घेऊन आत्मा (जीवात्मा) ज्ञानी झाला असेल, तर त्याचें कर्तृत्व आणि भोक्तृत्व या उपाधिनिर्मित वस्तु नाहींशा होतात. ॥ ३ व ४ ॥

---

पुढील पांच ते नऊ मंत्रांत मागें आतांच सांगितलेल्या बुद्धिसारथ्याचें ज्यास्त स्पष्टीकरण केलें आहे.

## मंत्र पांच ते नऊ.

अन्वय व अर्थ—अयुक्तेन मनसा यः तु सदा अविज्ञानवान् भवति, तस्य अवश्यानि इंद्रियाणि सारथेः दुष्टाश्वाः इव ( पण युक्त न झालेल्या मनानें जो सदैव अविज्ञानवान् असतो—सूक्त कोणतें व असूक्त कोणतें याचा निर्णय करणारी विवेकबुद्धि ज्याच्या जवळ नसते—त्याचीं इंद्रियें स्वैर वर्तनाचीं असतात. सारथ्याचे घोडे निवळलेले नसले—अव-खळ असले, म्हणजे जसा दुष्ट परिणाम होतो तसा परिणाम विवेकबुद्धि नसणाऱ्या जीवाचीं इंद्रियें उत्पन्न करितात. ) ॥ ५ ॥

तु युक्तेन मनसा यः सदा विज्ञानवान् भवति तस्य इंद्रियाणि सारथेः सदश्वाः इव वश्यानि ( पण युक्त असलेल्या मनानें—विवेकी बुद्धीच्या स्वाधीन असणाऱ्या मनानें—जो नेहमीं विज्ञानी असतो—चांगलें कोणतें व वाईट कोणतें याचें तारतम्य समजून घेऊन जो सदैव आत्म-संयमी असतो—त्याचीं इंद्रियें सारथ्याच्या स्वाधीन असणाऱ्या चांगल्या घोड्यांप्रमाणें ज्ञानी पुरुषाच्या स्वाधीन असतात.) ॥ ६ ॥

यः तु अमनस्कः अविज्ञानवान्, सदा अशुचिः सः तत्पदं न आप्नोति च संसारं अधिगच्छति ( पुनः, जो पुरुष अमनस्क असता—ज्याचें मन स्वाधीन नसतें—जो अविवेकी असून सदैव अमंगल वस्तूंचा व कर्मांचा विचार करितो, तो आत्मपदाला केव्हांही जाऊन पोहोंचत नाहीं. त्याचा पुरुषार्थ केव्हां ही सिद्ध होत नाहीं. तो बिचारा संसारांत मात्र जाऊन पडतो. ) ॥ ७ ॥

यः तु समनस्कः, विज्ञानवान्, सदा शुचिः भवति सः तु यस्मात् भूयः न जायते तत् पदं आप्नोति ( पण मनोजय केल्यामुळें जो ज्ञान-विज्ञानी झाला जो नित्य मंगल विचार व शास्त्रोक्त कर्म करणारा असतो—

तो अशा पदाला जाऊन पोंहचतो कीं, जेथून त्याला पुनः परत यावें लागत नाहीं. सारांश, तो मुक्त होतो. ॥ ८ ॥

**यः तु विज्ञान-सारथिः, मनः-प्रग्रहवान् नरः सः अध्वनः पारं विष्णोः तत् परमं पदं आप्नोति** ( ज्या जीवात्म्याचें सारथ्य विवेकी बुद्धि करिते व जो मनोरूपी रशना आपल्या स्वाधीन ठेवितो तो पुरुष या संसारमार्गाच्या पलीकडे सुखरूप जातो. हेंच विष्णूचें श्रेष्ठपद आहे. ॥९॥

याप्रमाणें ५ ते नऊ मंत्रांत इंद्रियें स्वाधीन नसलीं असतां मन बुद्धीशीं युक्त झालेलें नसतें व इंद्रियांच्या स्वाधीन जीवाला रहावें लागतें. सदैव संसारी पुरुषाचे विचार अमंगल व त्याचीं कर्में शास्त्रनिषिद्ध असतात, असें सांगितलें आणि बुद्धीशीं मन युक्त झालें असतां, म्हणजे विवेकी बुद्धीच्या तंत्रानें मन चालविलें असतां इंद्रियें कितीही बलवत्तर असलीं तरी तीं सारथ्याच्या स्वाधीन असतात आणि मनही सदैव सद्वस्तूचा विचार करितें. तें नित्य शास्त्रशुद्धकर्मांचें आचरण करितें. विवेकी बुद्धीचें सहाय नसेल तर जीव संसारांत पडतो आणि सहाय असेल तर तो मुक्त होतो, हा विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे. नवव्या मंत्रांत मनोविजयी आणि विवेकसंपन्न पुरुष संसारमार्गाच्या पार जाऊन विष्णुपद प्राप्त करून घेतो असें सांगितलें आहे. तात्पर्य हें आहे कीं, नित्यानित्यविवेक, विषयवैराग्य, इंद्रियदमन हीं साधनें संपादन केलीं असतां मात्र आत्मयात्रा फलद्रूप होते. बुद्धीचें सहाय अवश्य हवें, कारण ती मनाचें नियमन करणारी आहे. मनोविजयही अवश्य आहे, कारण त्याच्या तंत्रानें इंद्रियें चालतात. सारांश, आत्म्याच्या स्वाधीन विवेक, विवेकाच्या स्वाधीन मन, आणि मनाच्या स्वाधीन इंद्रियें अशी परंपरा आहे. इंद्रियांस स्वैर सोडलें, तीं मनाच्या ताब्यांत नसलीं म्हणजे अवखळ घोड्यांप्रमाणें तीं जीवाचा शरीररूपी रथ भलत्या मार्गाला घेऊन जातात. तसेंच मन बुद्धितंत्रानें न वागतां इंद्रियतंत्रानें चालूं लागेल तरीही अनर्थ उत्पन्न होतात. शेवटीं बुद्धीलाही ज्ञानवश झालें पाहिजे. तसें न होतां ती असंस्कृत मनाच्याच स्वाधीन झाली म्हणजे ही अनर्थपरंपरा उत्पन्न होते. या प्रमाणें आत्मा, विवेकबुद्धि, मन आणि इंद्रिय यांच्या श्रेष्ठत्वाची परंपरा जीवानें ध्यानांत ठेविली पाहिजे. आत्मा सर्वश्रेष्ठ आहे व इंद्रियें सर्वकनिष्ठ आहेत, हें त्यानें केव्हांही विसरतां उपयोगाचें नाहीं. हें तत्त्व समजण्याला श्रुतीनें उपयोजिलेलें रूपक अत्यंत समर्पक आहे. सारथ्यापेक्षां यजमान श्रेष्ठ, रशनेपेक्षां सारथि श्रेष्ठ, अश्वापेक्षां रसना श्रेष्ठ, आणि रथापेक्षां अश्व श्रेष्ठ, हें कोष्टक प्रत्येक लहान थोर पुरुषाला समजण्यासारखें आहे. शिवाय रथ हा मोक्षमार्गाला नेण्याचें अत्यंत कनिष्ठ साधन आहे, साध्य नव्हे, हें ही या रूपकांवरून चांगलें समजतें. ॥ ५ ते ९ ॥

आतांच सांगितलेल्या श्रेष्ठ परंपरेचें वर्णन १० व्या व ११ व्या मंत्रांत स्पष्ट केलें आहे.—

## मंत्र दहावा व अकरावा.

**अन्वय व अर्थ—हि अर्थाः, इंद्रियेभ्यः पराः मनः अर्थेभ्यः च परं, बुद्धिः तु मनसः परा, महान् आत्मा बुद्धेः परः** (कारण, विषय हे इंद्रियांहून श्रेष्ठ आहेत आणि मन अर्थांहून श्रेष्ठ आहे; बुद्धि मनापेक्षां श्रेष्ठ आहे आणि महान् आत्मा बुद्धीपेक्षां श्रेष्ठ आहे. ॥ १० ॥

**अव्यक्तं महतः परं, पुरुषः अव्यक्तात् परः, किञ्चित् पुरुषात् न परं, सा परा काष्ठा सा परा गतिः** ( अव्यक्त हें महान् आत्म्यापेक्षां श्रेष्ठ आहे आणि पुरुष हा अव्यक्तापेक्षां श्रेष्ठ आहे. पुरुषापेक्षां कोणतीही गोष्ट श्रेष्ठ नाहीं. तीच शेवटची मर्यादा, तीच शेवटची स्थिति आहे. ॥ ११ ॥

मागील पांच मंत्रांत जी श्रेष्ठत्वाची परंपरा सुचविली ती या दोन मंत्रांत स्पष्ट केली आहे. प्रथम अर्थ ( म्हणजे शब्द, स्पर्श, रूपादि विषय ) हे इंद्रियांहून श्रेष्ठ आहेत असें सांगितलें आहे. विषय ग्रहण करण्याचें काम मात्र इंद्रियांचें आहे, विषय नसतील तर नेत्रकर्णादि इंद्रियें कर्मशून्य होतात; म्हणन इंद्रियांपेक्षां अर्थ श्रेष्ठ आहेत असें श्रुतींचें सांगणें आहे. असो; विषयांहून मन श्रेष्ठ आहे कारण विषय नसले तरी मनाला आपल्या स्वतःच्या कल्पनेनें विषय निर्माण करितां येऊन त्यांचें चिंतन करितां येतें म्हणून मनाला दिलेलें श्रेष्ठत्व योग्य आहे. बुद्धि मनापेक्षां श्रेष्ठ आहे; कारण बुद्धीचें कर्म नेहमीं प्रमाणशुद्ध असतें. महान् आत्मा म्हणजे मोठा आत्मा—विश्वात्मा—हिरण्यगर्भ हा बुद्धीपेक्षां श्रेष्ठ आहे हें सिद्ध करावयास नको. विश्वात्म्यापेक्षां अव्यक्त—व्यक्त झालेल्या सृष्टीचें उपादान कारण—मूल प्रकृति—श्रेष्ठ आहे. कारण या मूल प्रकृतीपासून हिरण्यगर्भाची उत्पत्ति परमेश्वरानें केली आहे. असो; या मूल प्रकृतीपेक्षां पुरुष म्हणजे सर्वांस पूर्णत्व देणारा परमात्मा हा श्रेष्ठ आहे. याच्याहून श्रेष्ठ कोणी नाहीं; हीच शेवटची मर्यादा आणि शेवटची स्थिति होय. ही जी श्रेष्ठ—परंपरा सांगितली आहे त्यांत सूक्ष्मत्वाच्या दृष्टीनेंही श्रेष्ठत्वाची योग्यता प्राप्त झालेली दिसते. श्रेष्ठत्व या शब्दांत व्यापकत्व, सूक्ष्मत्व आणि नियामकत्व या तीन गोष्टींचा अंतर्भाव होत असतो. श्रेष्ठ वस्तु ज्यास्त व्यापक कशी असते याचें आतांच दिग्दर्शन केलें आहे. सूक्ष्मत्व आणि नियामकत्व यांचें विवेचन श्रुति १२ व्या व १३ व्या मंत्रांत करणार आहे. ॥ १० ॥ ११ ॥

आत्मदर्शनयोग.

## मंत्र बारावा.

**अर्थासह अन्वय—एषः सर्वेषु भूतेषु गूढः आत्मा न प्रकाशते** (हा सर्व भूतांमध्यें गूढ असलेला आत्मा सामान्य लोकांस दिसत नाहीं.) **तु अग्र्यया सूक्ष्मया बुद्धया सूक्ष्मदर्शिभिः दृश्यते** (पण अत्यंतसूक्ष्म अशा आपल्या कुशाग्रबुद्धीनें सूक्ष्म पाहणाऱ्या पंडितांस हा आत्मा दिसतो.) १२

हा आपला सर्वव्यापक आत्मा भूतमात्राचे अंतर्यामी राहत असल्यामुळें तो सामान्य लोकांस दिसत नाहीं. मागें १० व ११ मंत्रांत श्रेष्ठत्वपरंपरा ठरविली. ती सूक्ष्मत्व, व्यापकत्व आणि नियामकत्व या तीन गोष्टींनीं ठरविली आहे, हें विसरतां कामा नये. आत्मा हा सर्वव्यापी व सर्वांनियामक असून अत्यंत सूक्ष्म आहे. म्हणून तो सामान्य लोकांस दिसत नाहीं. पण ज्यांनीं आपल्या विवेकानें व विचारानें सूक्ष्मवस्तु पाहण्याचा अभ्यास केला आहे आणि कुशाग्र बुद्धीला आत्मरूप प्रत्यक्ष पाहतां येतें, या म्हणण्यानें आत्म्याच्या अस्तित्वाविषयींचा जो संशय त्याचा निरास झाला. आत्मा आहे पण तो बुद्धिमान् पुरुषांस मात्र दिसतो, अशी वस्तुस्थिति आहे. ॥ १२ ॥

---

## मंत्र तेरावा.

**अर्थासह अन्वय—प्राज्ञः मनसी** (सि) **वाक् यच्छेत्, तत् ज्ञाने आत्मनि यच्छेत्, महति आत्मनि ज्ञानं नियच्छेत्, तत् शान्ते आत्मनि यच्छेत्** (प्राज्ञ म्हणजे शहाणा असणारा पुरुष, त्यानें आपल्या मनामध्यें वाणीचा उपसंहार करावा. मनाचा उपसंहार आपल्या ज्ञानरूप बुद्धीमध्यें करावा. प्रकाशात्मक बुद्धीचा उपसंहार महद आत्म्यामध्यें म्हणजे हिरण्यगर्भामध्यें करावा आणि हिरण्यगर्भाचा लय शांत अशा मुख्य आत्म्यामध्यें करावा.

याप्रमाणें कनिष्ठ वस्तूला वरिष्ठ वस्तूमध्यें घालून जीवानें आपली उन्नति करून घ्यावयाची आहे. वाणीचा लय म्हणजे सर्व इंद्रियांचा लय मनामध्यें करावयाचा आहे. मनाच्या तंत्रानें इंद्रियांस चालवावयाचें हा मानसिक उन्नतीच्या क्रमाचा पहिला ओनामा आहे. आपलें चंचल मन विवेक करणाऱ्या बुद्धीमध्यें, ही बुद्धि हिरण्यगर्भाच्या म्हणजे विश्वात्म्याच्या सर्वप्रकाशक बुद्धीच्या तंत्रानें चालावयाची आहे. ज्याला Cosmic soul असें म्हणतात तो हिरण्यगर्भ हा स्वतंत्र बुद्धीचें मूर्तिमंत स्वरूप आहे. असो; शेवटीं हिरण्यगर्भाचा लय सर्वा-

वभासक, सर्वसाक्षी, सर्वनियामक, आणि अत्यंत शांत अशा आत्मस्वरूपामध्यें करावयाचा आहे.

याप्रमाणें आत्मस्वरूपाची जाणीव आणि सत्ता इंद्रियांपर्यंत स्थापित झाली म्हणजे योगाभ्यासाचें कर्म पूर्ण होतें. ॥ १३ ॥

---

## मंत्र चवदावा.

**अन्वय व अर्थ—उत्तिष्ठत, जाग्रत, वरान् प्राप्य निबोधत** (उठा, जागे व्हा, आणि श्रेष्ठ पुरुषांची संगति संपादून ज्ञानाचा मार्ग समजून घ्या.) **क्षुरस्य निशिता धारा दुरत्यया** (सहाणेवर लागलेल्या क्षुऱ्याची—चाकु किंवा सुरीची—धार अतिशय कठिण असते. तिच्यावरून चालत जाणें किंवा हात फिरविणें अशक्य आहे.) **कवयः वदन्ति 'तत् पथः दुर्ग'** (शहाणे लोक असें म्हणतात कीं, आत्मस्वरूपाकडे जाण्याचा मार्ग धारेवर चालण्याच्या मार्गासारखा अत्यंत कठिण आहे.)

धार लाविलेल्या शस्त्रावरून चालत जाणें हें जसें सामान्यतः कठीण आहे, त्याप्रमाणें आत्मक्रमणाचा मार्ग अतिशय कठीण आहे. ह्या मार्गानें जावयाचें असतां कोणकोणते प्रयोग केले पाहिजेत, हें तेराव्या मंत्रांत सांगितलें आहे. इंद्रियांचा निरोध करून तीं मनस्तंत्रानें चालविणें, चंचल मनाला बुद्धीच्या ताब्यांत ठेवणें, बुद्धीचें स्वार्थत्व काढून घेऊन तिला हिरण्यगर्भाच्या म्हणजे निःस्वार्थी बुद्धीच्या आधीन करणें, इत्यादि गोष्टी अत्यंत कठीण आहेत हें कोणासही सांगावयास नको. म्हणून या मंत्रांत श्रुतीनें सांगितलें आहे कीं, विषय-निद्रेतून जागे व्हा, उठा, म्हणजे शास्त्रोक्त कर्म करावयास लागा आणि तत्त्वदर्शी गुरूला शरण जाऊन त्याच्यापासून आत्मज्ञान करून घ्या. ह्या उपदेशाचें जीवांनीं आदरपूर्वक ग्रहण केलें असतां आत्मज्ञानसंपादनाचें काठिण्य (कठिणपणा) हळु हळू कमी होत जाईल. हा वेदमार्ग आहे. यानेंच पुरुषार्थ साध्य होणार आहे म्हणून श्रुतिमाता मोठ्या कळकळीनें सर्व जीवांस आत्मज्ञानाचा लाभ संपादन करण्याविषयीं उपदेश करीत आहे. ॥ १४ ॥

---

## मंत्र पंधरावा.

**अन्वय व अर्थ—यत् अशब्दं, अस्पर्शं, अरूपं, तथा अरसं च अगंधवत्, अव्ययं, नित्यं, अनाद्यनंतम् महतः परं, ध्रुवं; तत् निचाय्य मृत्युमुखात् प्रमुच्यते** (हें आत्मरूप शब्दाला, स्पर्शाला, रसाला, रूपाला,

व गंधाला अगोचर असून तें अव्यय नित्य, अनाद्यनंत, हिरण्यगर्भाहून श्रेष्ठ आणि अत्यंत ध्रुव आहे. ह्या स्वरूपाचा निश्चय केला असतां मृत्यु-मुखांतून आपल्यास मुक्त होतां येतें. )

या मंत्रांत दोन गोष्टी सांगितल्या आहेत पहिली गोष्ट ही आहे कीं, आत्मस्वरूपाचें ज्ञान होणें किती कठीण आहे, हें मुमुक्षूंस समजावें. ही गोष्ट सर्व इंद्रियांना अगोचर आहे, मनाला जी समजत नाहीं व हिरण्य-गर्भाच्या बुद्धीच्याही पलीकडे आहे. तसेंच ही अक्षर असून नित्य कूटस्थ स्वरूपानें राहते, ही वस्तु ज्ञानी गुरूंशिवाय समजणें अत्यंत कठीण आहे. शिवाय तिचें साधनही सुसाध्य नाहीं. आत्मस्वरूप संपादन करण्याला अत्यंत तीक्ष्ण ( कडकडीत ) वैराग्य हवें असतें, त्याप्रमाणें आत्मा-रामाचें ज्ञान होणें व ज्ञानाप्रमाणें आचरण होणें, या गोष्टी अत्यंत कठिण आहेत हें स्पष्ट आहे. जातां जातां श्रुतीनें आत्मस्वरूपाचें लक्षणही येथें दिलें आहे; हें समजून घेण्याचा प्रत्येक जिज्ञासूनें प्रयत्न करावा. दुसरी गोष्ट येथें स्पष्ट दिसते, ती ही कीं, आत्मस्वरूपाचें यथार्थ ज्ञान होऊन जीवाचा निश्चय झाला म्हणजे त्याला मृत्यूची ( अज्ञान, वासना, स्वार्थी कर्म, इत्यादि जन्म-मृत्यु देणाऱ्या गोष्टींची ) भीति उरत नाहीं.

सारांश, ज्ञानी पुरुष मृत्यूच्या पाशांतून आपल्याला मुक्त करून घेतो, अथवा तो सर्वथा मुक्त होतो. ॥ १५ ॥

---

## मंत्र सोळावा व सतरावा.

**अन्वय व अर्थ—मृत्युप्रोक्तं नाचिकेतं सनातनं उपाख्यानं उक्त्वा श्रुत्वा च मेधावी ब्रह्मलोके महीयते** (यमधर्मानें सांगितलेलें हें नचिकेत्याचें सनातन उपाख्यान वाणीकडून वदविणारा व कर्णद्वारा ऐकणारा विवेकी पुरुष ब्रह्मलोकामध्यें पूज्य होतो. ) ॥ १६ ॥

**यः प्रयतः ब्रह्मसंसदि श्राद्धकाले वा इमं परमं गुह्यं श्रावयेत् तत् आनंत्याय कल्पते** (ब्रह्मवेत्त्याच्या सभेंत किंवा श्राद्धकालीं जो कोणी श्रद्धायुक्त ज्ञानी या अतिश्रेष्ठ व गुह्य उपनिषदाचें श्रवण करील, तो ह्या श्रवण-पठण-साधनानें अनंत वस्तूच्या संपादनाला योग्य होईल. ॥ १७ ॥

या दोन मंत्रांत या उपनिषद्-श्रवण-पठणाची महती वर्णन केली आहे. हें उपनिषद् मृत्यूनें सांगितलें व नचिकेत्यानें ऐकलें. या उपनिषदांत सांगितलेलें ज्ञान, व नचिकेत्याची कथा ह्या दोन्ही गोष्टी सनातन आहेत. उपनिषदांत

सांगितलेलें ज्ञान काल-स्थलादि उपाधिशून्य आहे हें सर्वविश्रुत आहे. पण श्रुतीला हें व्यास्त सांगावयाचें आहे कीं, नचिकेत्याची कथा हीसुद्धां कालातीत आहे. असो. ही कथा व हें ज्ञान ऐकणाऱ्या पुरुषाला ब्रह्मज्ञान होतें आणि तो सर्वत्र पूज्य होतो, ही फलश्रुति आहे. तसेंच, ब्रह्मवेत्त्यांच्या सभेमध्यें आत्मस्वरूपाची चर्चा केली असतां व श्राद्धकालीं या उपनिषदांचें श्रवण-पठण केलें असतां ती चर्चा व तें श्रवण-पठण अनंत वस्तूचें म्हणजे आत्मज्ञानाचें फल उत्पन्न करिते.

तात्पर्य, ज्ञानमार्गाच्या श्रवण-पठणाची महति फार मोठी आहे. ज्ञानमार्ग हा परम गुह्य आहे. याचें दर्शन सामान्य लोकांस न करितां विवेकी मुमुक्षूंस मात्र करावें, असा श्रुतीचा अभिप्राय आहे. 'गुह्यं' 'ब्रह्मसभा' 'श्राद्धकाल' इत्यादि पदांवरून हें स्पष्ट निदर्शनास येतें कीं, ज्ञानमार्गाचा उपदेश अधिकारी पुरुषांस मात्र करावा. ॥ १७ ॥

अध्याय पहिला समाप्त.

---

# अध्याय दुसरा.

## वल्ली पहिली.

### आत्म्याची इंद्रियगोचरता.

### मंत्र पहिला.

अन्वय व अर्थ—स्वयंभूः खानि पराञ्चि व्यतृणत्, तस्मात् पराक् पश्यति न अंतरात्मन्, कश्चित् धीरः अमृतत्वं इच्छन् आवृत्तचक्षुः प्रत्यगात्मानं ऐक्षत् (विधात्यानें—ब्रह्मदेवानें—आमचीं इंद्रियें बहिर्मुख—बाहेर बघणारीं—केलीं आहेत. म्हणून जीव सामान्यतः बहिर्मुख असतो, अंतर्मुख असत नाहीं. पण एखादा धीर पुरुष मात्र अमृतत्व—अमर आत्मरूप-मिळविण्याच्या इच्छेनें नेत्रादि इंद्रियांचा निरोध करून प्रत्यगात्म्याचें दर्शन—घेतो.)

सामान्यतः जीव विषयलोलुप कां असतात याचें कारण श्रुतीनें या मंत्रांत दिलें आहे. परमेश्वरानें आपलीं इंद्रियें अशीं केलीं आहेत कीं, त्यांनीं बाह्य वस्तूंचें ज्ञान, व बाह्य वस्तूंचा उपभोग घेण्याची लालसा धरावी. याप्रमाणें आपलीं इंद्रियें बहिर्मुख असतात म्हणून आपण सर्व जीव अंतर्यामी आत्म-

स्वरूपाचा विचार न करितां बाह्य–विषयांला भुलून जातों आणि फसतों. आतां कित्येक दृढनिश्चयाचे विवेकी पुरुष केव्हां केव्हां अवतीर्ण होतात; ते मात्र आत्मस्वरूपाच्या प्राप्तीसाठीं इंद्रिय–निग्रह करून प्रत्यगात्म्याचें स्वरूप विचार–दृष्टीनें पाहतात. पण असे धन्य पुरुष फारच थोडे असतात. सामान्य गोष्ट म्हणजे जीवांनीं विषयांच्या उपभोगासाठीं त्यांचें ज्ञान करून घ्यावें आणि जन्म–मरणाच्या यातायातींत म्हणजे संसारांत शिरावें. ही सामान्यतः विद्यमान असणारी वस्तुस्थिति आहे. ॥ १ ॥

---

## मंत्र दुसरा.

**अन्वय व अर्थ**—**बालाः पराचः कामान् अनुयन्ति, ते मृत्योः विततस्य पाशं यन्ति** (जे अज्ञानी पुरुष बाह्य–विषयाच्या पाठीमागें वासनेच्या प्रेरणेनें लागतात ते मृत्यूच्या सर्वगामी पाशांत आयतेच जाऊन पडतात.) **अथ धीराः ध्रुवं अमृतत्वं विदित्वा अध्रुवेषु इह न प्रार्थयन्ते** (पण जे दृढनिश्चयाचे विद्वान् पुरुष आहेत त्यांना कटस्थ आत्मस्वरूपाचें ज्ञान झालेलें असतें म्हणून ते या संसारांतील नश्वर वस्तूंमध्यें अभिलाष ठेवीत नाहींत. किंवा त्यांच्या प्राप्तीसाठीं प्रयत्नही करीत नाहींत.)

विषयांचा अभिलाष आणि मृत्यु यांचें साहचर्य या मंत्रांत स्पष्टपणें सांगितलें आहे. आत्मबाह्य विषयांची आराधना वासनात्मक पुरुषानें केली असतां मृत्यूची आराधना केली असें होतें. अर्थात् हें कृत्य अज्ञानीपणाचें आहे. पण ज्या पुरुषाला आपण स्वतः आत्मरूप असून ब्रह्महीं आहों असें ज्ञान झालें असतें, ते लोक या नश्वर संसारांतील दुःखद गोष्टींचा अभिलाष करित नाहींत, किंवा त्यांच्या प्राप्तीसाठीं खटपटही करीत नाहींत. ॥ २ ॥

---

## आत्मरूपाची एकरसता.

## मंत्र तिसरा.

**सार्थ अन्वय**—**येन एतेन एव रूपं, रसं, गंधं, शब्दान्, स्पर्शान्, च मैथुनान् विजानाति एतत् वै तत्, किं अत्र परिशिष्यते** (ज्या ह्या आत्मसाह्यानें रूप, रस, गंध, शब्द, स्पर्श, रतिसुख हे विषय कळतात, तेंच हें आत्मस्वरूप होय. असा कोणता विषय आहे कीं, जो आत्म्याला समजत नाहीं.

आपल्याला विषयांचें ज्ञान होतें तें केवल इंद्रियांच्या सामर्थ्यानें होत नाहीं. आत्मा नसेल तर कोणत्याही अंतर्विषयाचें किंवा बाह्य विषयाचें ज्ञान आपल्यास होणार नाहीं. आपल्यास नेहेमींचा अनुभव आहे कीं, बुद्धि आणि मन यांनीं 'विश्रांतीची रजा' घेतली, आपण निद्राकुल झालों, म्हणजे इंद्रियें जाग्यावर असतांही आपल्याला बाह्य विषयांचें ज्ञान होत नाहीं. बुद्धि आणि मन यांच्या अभावीं जर विषयज्ञान होणें अशक्य आहे तर ज्याच्या प्रेरणेनें बुद्धि आणि मन हीं स्वकर्म करण्यास प्रवृत्त होतात तो आत्मा नसेल, तर आपलीं इंद्रियें विषय-ज्ञानास मुकतील. सारांश, आत्मा आहे म्हणून इंद्रियांना विषय-गोचरता प्राप्त होते.

तात्पर्य आत्मसहायानें इंद्रियें स्वकर्म करूं शकतात. असा कोणताही विषय नाहीं कीं, जो आत्म्याला समजणार नाहीं. या वाक्यानें अंतर्विषयांचा म्हणजे सुख-दुःखाचा, बुद्धिविषयांचा व मनोविषयांचा अंतर्भाव होतो. एवंच आपलें सर्व अंतर्बाह्य ज्ञान आत्म्याच्या अस्तित्वानें सिद्ध होतें. ज्याच्या अस्तित्वानें विषयज्ञान होतें, तो आत्मा होय, हें तत्त्व येथें सांगितलें आहे. ॥ ३ ॥

---

## मंत्र चौथा.

**सार्थ अन्वय—स्वप्नांतं जागरितान्तं च उभौ येन अनुपश्यति** (स्वप्नाचा शेवट व जागतीचा शेवट ज्याच्या अस्तित्वानें आपल्यास दिसतात)—त्या—**महान्तं आत्मानं विभुं मत्वा धीरः न शोचति** (महान् आत्मा 'विभु आहे,' असें जाणून विद्वान् पुरुष शोकशून्य होतो).

मनबुद्धि विश्रांति घ्यावयास लागणार व त्यांच्या विश्रांतीची वेळ संपणार, त्यावेळीं हीं दोन्हीं ज्ञान-साधनें कर्मशून्य असतांही आपल्या स्वप्नाची अखेर व जाग्रतीचा प्रारंभ ह्यांचें ज्ञान होतें, कशानें? आपल्या आत्म्याच्या अस्तित्वानें. हें आत्मास्तित्वज्ञान झालें म्हणजे तो आत्मा विकारशून्य व सर्वव्यापी आहे, असें विज्ञान होतें. अर्थात् ज्ञानी पुरुषाचे शोक-मोह संपतात. आत्मा मरत नाहीं, हें त्यांस पूर्णपणें समजतें. ॥ ४ ॥

---

## मंत्र पांच ते नऊ.

**अन्वय व अर्थ—यः इमं मध्वदं जीवं अंतिकात् आत्मानं, भूत-भव्यस्य ईशानं, वेद, ततः न विजुगुप्सते, तत् एतत् वै** (ह्या कर्म-फलाचा उपभोग घेणाऱ्या जीवाच्या अत्यंत निकट राहणारा व कालत्रयाचा

स्वामी आत्मा ह्याचें ज्ञान करून घेतो तो ज्ञानानंतर भीतीला अथवा लज्जेला ज्याच्या ज्ञानामुळें वश होत नाहीं तें आत्मतत्त्व होय.) ॥ ५ ॥

**तपसः पूर्वं जातं यः अद्भ्यः पूर्वं अजायत यः भूतेभिः गुहां प्रविश्य तिष्ठन्तं व्यपश्यत् तत् एतत् वै** ( जो तेजाच्या पूर्वी व जलाच्या पूर्वी हिरण्यगर्भरूपानें उत्पन्न झाला व सर्व भूतांसह वर्तमान जीवांच्या अंतःकरणामध्यें प्रवेश करून राहिलेला आहे, तो—त्याचें अधिष्ठान—ब्रह्मरूप आहे ) ॥ ६ ॥

**या अदितिः देवतामयी प्राणेन संभवति, या भूतेभिः गुहां प्रविश्य तिष्ठंतीं व्यजायत तत् एतत् वै** ( जी अदिति देवतांचें अंतर्याम नियंत्रित करिते, जी प्राणांसह उत्पन्न झाली आहे, आणि गुहेमध्यें प्रवेश करून भूतांसह उत्पन्न झाली आहे ती ( तिचें अधिष्ठान ) ब्रह्म आहे. ॥ ७ ॥

**गर्भिणीभिः सुभृतः गर्भः इव अरण्योः निहितः जातवेदः, दिवे दिवे जागृवद्भिः हविष्मद्भिः मनुष्येभिः अग्निः इड्यः, तत् एतत् वै** ( गरोदर स्त्रिया गर्भाचें ज्याप्रमाणें काळजीनें धारण करितात त्याप्रमाणें दोन अरणींनीं उत्तम रीतीनें धारण केलेला जातवेद—अग्नि व जागृत राहून आहुति देणाऱ्या मनुष्यांनीं प्रत्यहीं स्तुति केलेला अग्नि हा ब्रह्मरूप आहे. ॥ ८ ॥

**यतः च सूर्यः उदेति यत्र च अस्तं गच्छति, तं सर्वे देवाः अर्पिताः, तत् उ कश्चन न अत्येति, तत् एतत् वै** ( जेथून सूर्य उदय पावतो आणि जेथें अस्ताला जातो त्याला सर्व देव अर्पित झालेले असतात, त्याचें कोणीही अतिक्रमण करण्याला समर्थ नाहीं. तेंच हें ब्रह्म होय. ॥ ९ ॥

याप्रमाणें ५ ते ९ मंत्रांत ब्रह्म हें जीवाचें नियमन करणारें व कालत्रयाचें स्वामी असणारें आत्मतत्त्व असून तें सर्व भूतांसह हिरण्यगर्भास उत्पन्न करणारें आहे. तसेंच तें प्राणरूप अदितीचें निवासस्थान आहे, याज्ञिकांच्या अग्नीचें तें उत्पत्तिस्थान आहे व सूर्यचंद्रादि तेजोगोल तेथूनच उत्पन्न होऊन तेथेंच लयाला जातात. असें हें ब्रह्मस्वरूप सांगितलें आहे म्हणजे कर्मफलाचा उपभोग घेणारा जीव सर्व जीवांस एकवट करणारा हिरण्यगर्भ, सर्व चराचरांस प्राणासह आश्रयस्थान असणारी प्रकृति ( अव्यक्त ), याज्ञिकांनीं उत्तम रीतीनें पालन-पोषण केलेला आणि स्तुति केलेला अग्नि, व सर्व तेजोगोलाचें आदिस्थान असणारा सूर्य, हीं सर्व एकरस ब्रह्माचीं निरनिराळीं स्वरूपें असून या सर्वांचें नियमन

करणारें एकच ब्रह्मस्वरूप आहे असा सिद्धांत येथें निरनिराळ्या योग्यतेच्या आत्मिक अधिकाऱ्यासाठीं सांगितला आहे, जीवाचें अंतर्यामि, हिरण्यगर्भ, अव्यक्त, अग्नि आणि सूर्य यांचें उत्पत्तिस्थान हीं सर्व एकच आहेत परमात्म्याचीं हीं स्वरूपें आहेत, असें निरनिराळ्या अधिकाऱ्यांस समजावें एतदर्थ श्रुतीनें हा प्रपंच केला आहे. हिरण्यगर्भ आणि प्रकृति (अव्यक्त) हीं दोन्ही म्हणजे सांख्यांची पुरुष आणि प्रकृति (हीं सर्व चराचरांसह 'गुहेमध्यें प्रवेश करून राहणारीं) म्हणजे गुह्यस्थानीं वास्तव्य करणारा जो परमात्मा त्याचें स्वरूपांत राहणारीं आहेत. हे परमात्म्याच्या स्वरूपाचे दृश्य दोन प्रकार आहेत, असें समजून घ्यावयाचें आहे. याचप्रमाणें अग्निसूर्यादि प्रकाशक देव (सामर्थ्यें) हेही ब्रह्माचीं दृश्य स्वरूपें आहेत, या सर्वांचें उत्पत्तिस्थान आणि लयस्थान ब्रह्म आहे हेंही कळून घ्यावयाचें आहे. त्रिकाल-स्वामी व सर्वांची उत्पत्ति करून सर्वांचें निवासस्थान व लयस्थान असणारा परमात्मा सर्ववंद्य व सर्वनियामक आहे हें मुमुक्षूनें ध्यानांत ठेवावयाचें आहे. असो. अशाप्रकारें सर्वज्ञ, सर्वसाक्षी, जीवांतर्यामी, कालनियंता, पुरुषप्रकृतींचा अधिष्ठाता व नियामक आणि विश्वांचें उत्पत्तिलयस्थान हा परमात्मा आहे, असें ५ तें ९ मंत्रात सांगितलें आहे.

---

## मंत्र दहावा.

**सार्थ अन्वय—यत् एव इह तत् अमुत्र, यत् अमुत्र तत् अनु इह** (जें अधिष्ठान येथें दृश्यरूपानें दिसतें, तेंच ब्रह्मलोकीं आहे व जें ब्रह्मलोकीं आहे, तेंच येथें दृश्य स्वरूपानें भासत असतें) **यः इह नाना इव पश्यति सः मृत्योः मृत्युं आप्नोति** (पण—जो येथें—दृश्य व अदृश्य स्वरूपांत—भिन्न स्वरूप पाहतो, तो मृत्यूपासून मृत्यूकडे म्हणजे जन्ममरणाच्या चक्रांत सांपडतो).

या मंत्रांत हें दिसणारें विश्व आणि त्याचें अधिष्ठान असणारें अदृश्य आत्मस्वरूप हीं परमार्थतः एकरूप आहेत, असा पांच ते नऊ मंत्रांचा तात्पर्यार्थ संग्रहरूपानें सांगितला आहे. इंद्रियांस गोचर असणाऱ्या चराचर विश्वाचें अधिष्ठान हेंच इंद्रियांस अगोचर असणारें ब्रह्म आहे, हें रहस्य मुमुक्षूनीं समजून घ्यावें. जीवदृष्टीला जेथें समूर्त, साकार असें विविधरूपी विश्व दिसतें, तें परमार्थी आत्मदृष्टीला अमूर्त, निराकार असें एकरस ब्रह्म प्रत्ययास येतें; हें रहस्य समजलें असतां जीवाची जन्ममरण स्थिति संपते. पण येथें ज्याला भेदभाव दिसतो, दृश्य विश्व निराळें आणि सर्वांतर्यामी ब्रह्म निराळें, असें जो पाहतो तो भवचक्रामध्यें सांपडून दुःखभोगी होतो. ॥ १० ॥

## मंत्र अकरावा.

**अन्वय व अर्थ—इह किञ्चन नाना न अस्ति—इति—मनसा एव इदं आप्तव्यं** (येथें म्हणजे ब्रह्मस्वरूपांत रतिमात्रही भेद नाहीं; हें तत्त्व—शुद्ध झालेल्या मनानें समजून घ्यावयाचें आहे. हें ज्याला समजणार नाहीं आणि जो भेददर्शी राहिला तो भवचक्रांत सांपडतो).

इंद्रियांस नित्य भेदच दिसावयाचा. म्हणून इंद्रियद्वारानें मात्र अभेदज्ञान होणें अशक्य आहे. अद्वैत—ज्ञानाला श्रवण, मनन आणि निदिध्यास या मानसिक कार्यांची आवश्यकता आहे. विद्वान् गुरूंकडून श्रुतिश्रवण केलें, त्याचें एकनिष्ठ मनानें चिंतन आणि ध्यान केलें म्हणजे अभेदज्ञान होतें. ॥ ११ ॥

---

## मंत्र बारावा व तेरावा.

**अन्वय व अर्थ—मध्ये आत्मनि अंगुष्ठमात्रः पुरुषः तिष्ठति** (हृदयाच्या मध्यें एक आंगठ्याच्या आकाराचा पुरुष असतो. हाच त्रिकालाचा स्वामी आहे. याचें ज्ञान झालें असतां सर्वप्रकारची भीति, लज्जा इत्यादि नाहींशीं होतात. हेंच तें ब्रह्मस्वरूप होय. जीवाचें स्वरूप अंगठ्या येवढें आहे असा वैदिक सिद्धांत आहे. जीव हृदयांत राहतो, असें श्रुति सांगते. जीवाचा अंतर्यामी परमात्मा हाही अर्थात् तेथेंच राहून कालत्रयाचें नियमन करितो. ब्रह्मतेज हेंच होय. दुसऱ्या अर्धाचा अर्थ मागें आलाच आहे ॥ १२ ॥

**ज्योतिः इव अधूमकः अंगुष्ठमात्रः पुरुषः भूतभव्यस्य ईशानः सः एव अद्य सः उ श्वः तत् एतत् वै** (स्वच्छ व धूमशून्य ज्योतीच्या प्रकाशासारखा हा अंगठ्याच्या आकाराचा पुरुष स्वच्छ आणि निर्मल आहे. हा कालत्रयाचा स्वामी असून जसा आज असतो, तसाच उद्यांही असणारा आहे. तात्पर्य, याचें स्वरूप नित्य आहे ॥ १३ ॥

या दोन्ही मंत्रांत परमात्मा हा जीवाच्या अंतर्यामी राहून त्रिकालाचें नियमन करितो, तो उपाधिशून्य असून नित्य स्वरूपाचा असतो, अंगठ्याच्या आकाराचा असूनही कालाचें नियमन आपल्या नित्य स्वरूपानें करून तो स्वतः अविकारी राहतो असें सांगितलें. सारांश, परमात्मा हा जीव—नियंता, कालस्वामी, निरुपाधिक, अविकारी, आणि नित्य अशा स्वरूपाचा आहे. हें ज्ञान ज्याला होतें तो भीतिशून्य पुरुष मुक्त होतो. येथें 'अंगठ्याच्या आकाराचा'

हीं पदें केवल जीवस्वरूपाचें नियमन करणारा परमात्मा आहे, हें दाखविण्याकरितां उपयोजिलीं आहेत. ॥ १२ ॥ १३ ॥

---

## मंत्र चवदावा.

**अन्वय व अर्थ—यथा दुर्गे वृष्टं उदकं पर्वतेषु विधावति एवं पृथक् धर्मान् पश्यन् तान् एव अनुविधावति** ( ज्याप्रमाणें दुर्गम पर्वतावरील पर्जन्यवृष्टीचें जल अनेक पर्वतांच्या दऱ्यांमध्यें निरनिराळें होऊन धांवत जातें, त्याप्रमाणें एकाच परमात्म्याचें अनेक धर्मात्मक ज्ञान करून घेणारा अज्ञानी पुरुष त्या त्या एकांशी धर्मांचें भेददृष्टीनें अवलोकन करितो आणि फसतो ).

येथें अज्ञानी पुरुष परमात्मस्वरूपाच्या एकांशी धर्मांचें अवलोकन करून ते धर्म निरनिराळे आहेत असें समजतात व आपल्यास कळलेला एकधर्म (गुण) हा मात्र परमात्म्याचें रूप–सर्वस्व होय, असें अज्ञानानें अर्धवट ज्ञान करून घेऊन फसतात. परब्रह्माचें एकच स्वरूप असतांही त्याला अनेक विद्वान् लोक अनेक दृष्टीनें पाहतात आणि अनेक व परस्परविरोधी धर्मपंथ उत्पन्न करून भांडत बसतात, हें केवल शुद्ध अज्ञान आहे. हिमालयाच्या अत्युच्च शिखरावर झालेली पर्जन्यवृष्टि कोणासही दिसत नाहीं. तसेंच इंद्रियागोचर आत्मस्वरूप कोणासही स्वतःच्या बुद्धीनें दिसणें शक्य नाहीं. तथापि त्याच अत्युच्च पर्वत–शिखरावर वृष्ट झालेल्या जलाचे निरनिराळे भाग होऊन एका प्रवाहाला गंगानदी, दुसऱ्याला यमुना, तिसऱ्याला सिंधु, चवथ्याला ब्रह्मपुत्रा इत्यादि अनेक नामें निर्माण होऊन गंगा मोठी किंवा यमुना मोठी, सिंधु चांगली किंवा ब्रह्मपुत्रा चांगली, इत्यादि प्रकारचे एकाच जलाविषयींचे वाद निरनिराळ्या प्रदेशांतून निरनिराळ्या प्रवाहरूपाविषयीं उत्पन्न होतात. दिसणारा एकाकी गंगाप्रवाह हा जसें मूळचें जल नव्हे त्याचप्रमाणें दृश्य विश्वांतील चराचर विश्व व त्यांतील भिन्न भिन्न पदार्थ हे व्यक्तिशः परमात्मस्वरूप नव्हेत हें समजून घेणें अगत्याचें आहे.

सारांश, उपाधिग्रस्त झालेलें व सोपाधिक दृष्टीनें पाहिलेलें आत्मस्वरूप हें खरें आत्मस्वरूप नव्हे. अशुद्ध जल मिळविलें असतां उत्पन्न होणारें जल जसें अशुद्ध असतें, त्याप्रमाणें एकांशानें दिसणारें आत्मरूप इंद्रियांनीं व इंद्रियवश्य असणाऱ्या मनोबुद्धींनीं पाहिलें असतां उत्पन्न होणारें ज्ञान अशुद्ध आणि संसारास उत्पन्न करणारें असतें. ॥ १४ ॥

---

## मंत्र पंधरावा.

**अन्वय व अर्थ—यथा शुद्धे आसिक्तं शुद्धं उदकं तादृक् एव भवति एवं विजानतः मुनेः आत्मा भवति** (ज्याप्रमाणें शुद्ध उदकांत मिळविलेलें शुद्ध जल शुद्धस्वरूपी मात्र होतें, त्याप्रमाणें ज्ञान झालेल्या शुद्ध-चित्ति पुरुषानें श्रुतिप्रतिपाद्य आत्मस्वरूप चिंतिलें, ध्यानस्थ केलें, म्हणजे त्या पुरुषाला उत्पन्न होणारें ज्ञान शुद्ध आणि यथार्थ होतें. हा पुरुष ब्रह्मज्ञ होऊन ब्रह्मरूप होतो.)

येथें शुद्धचित्ताच्या मुमुक्षूनें श्रुतिरहस्य यथार्थ दृष्टीनें समजून घेतलें म्हणजे त्याचा आत्मा ब्रह्मरूप होतो. जीवोपाधि नष्ट होऊन ब्रह्मज्ञान झालें म्हणजे तो जीव ब्रह्मरूप होतो, हा सिद्धांत या मंत्रांत दिलेल्या दृष्टांतानें स्पष्ट झाला आहे. तेव्हां याच्यावर विशेष चर्चा करण्याचें कारण दिसत नाहीं.

याप्रमाणें दुसऱ्या अध्यायाच्या पहिल्या वल्लींत अज्ञानी पुरुषाला आत्मज्ञान कां होत नाहीं, हें सांगून आत्मस्वरूपाचा विचार सर्वांस समजेल व पटेल अशा रीतीनें केला आहे. म्हणून या उपनिषदाचा हा भाग फार महत्त्वाचा आहे. ॥१५॥

पहिली वल्ली समाप्त.

---

# दुसरी वल्ली.

## सर्वस्वामी आत्म्याचें निरुपाधिकत्व.

## मंत्र पहिला.

**अन्वय व अर्थ—अवक्रचेतसः अजस्य पुरं एकादशद्वारं** ('अवक्र म्हणजे सरळ आहे, अविकार्य आहे, 'चेतसः' म्हणजे ज्ञानस्वरूप ज्याचें असा अज म्हणजे अजन्मा जो आत्मा त्याची नगरी—देहनामक पुर—अकरा दरवाज्यांनीं मंडित झालेली आहे. या नगरीचा स्वामी आत्मराजा आहे.) **अनुष्ठाय न शोचति** (अशा स्वरूपाचें ध्यान करणारा ज्ञानी पुरुष शोक-विरहित होतो.) **विमुक्तः च विमुच्यते** (व हा ज्ञानी पुरुष या लोकींच सर्व संसारपाशांतून मुक्त—जीवन्मुक्त होतो—आणि देहपात झाल्या-वर सर्वथा मुक्त होतो; म्हणजे जन्ममरणाचे चक्रांतून सुटतो). ॥ १ ॥

आत्म्याच्या संबंधानें मात्र या मंत्रांत विचार आहे. देह म्हणजे नगर किंवा पुर आहे. या पुराचा स्वामी आत्माराम असून तो या देहेन्द्रियांहून विलक्षण आहे. देहाच्या उन्नत-अवनत विषयभोगांवर आत्म्याचें आत्मत्व अवलंबून नाहीं. देह, इंद्रियें, मन, बुद्धि, अहंकार, प्राण इत्यादि सर्व या आत्माराम नामक राजाचीं उपकरणें मात्र आहेत. तो स्वतः ज्ञानरूप व अजन्मा आहे. देहादि ज्ञानशून्य असून जन्म-मरण पावणारीं (विनाशी) आहेत. तात्पर्य हा आत्मा देहेंद्रियांहून सर्वतोपरि विलक्षण आहे, तथापि त्यांचा नियंता व साक्षी आहे. असें ज्याला पक्कें ज्ञान झालें, तो आपलें आत्मरूप अविकारी व ज्ञानमय असें जाणून देहादिकांच्या वृद्धिक्षयासंबंधानें किंवा भोगांच्या कमी-जास्तीपणामुळें हर्ष-शोक पावत नाहीं, इतकेंच नव्हे, तर ह्या लोकींच तो ज्ञानी मुमुक्षु ज्ञान-विज्ञानसंपन्न होऊन जीवन्मुक्त होतो व हा येथील देह सुटला म्हणजे परमात्म-स्वरूपाशीं तादात्म्य पावून मुक्त होतो. ॥ १ ॥

---

'तर मग हा आत्मा एका शरीरापुरताच आहे!' अशी शंका कोणास येईल. तिचें निवारण या पुढील मंत्रांत करून तो परमात्मा सर्वव्यापी व सर्व नियामक आहे, असें श्रुति प्रतिपादित आहे.

## मंत्र दुसरा.

**अन्वय व अर्थ—हंसः शुचिषत्, वसुः अंतरिक्षसत्, होता वेदिषत्, अतिथिः दुरोणसत्, नृषत्, वरसत्, ऋतसत्, व्योमसत्, अब्जाः, गोजाः, ऋतजाः अद्रिजाः, ऋतं बृहत्** (हा आत्माराम आकाशांतील प्रकाशवंत वस्तूंमध्यें स्वयंप्रकाश व स्वातंत्र्यानें परिभ्रमण करणारा सूर्य, अंतरिक्षांतील वस्तूंमध्यें सुगंधवाहक व मलनिवारक वायु, पृथ्वीवर असणाऱ्या यज्ञमंडपाच्या वेदीवर—उच्च स्थानावर—मुख्यत्वानें वावरणारा होता. [मंत्रप्रपाठक व देवतांचें आवाहन करणारा ऋत्विज्] अतिथींमध्यें द्रोणामध्यें असणाऱ्या वस्तूंचा स्वामी—सोमराजा—, मनुष्यलोकीं स्वर्गांत अंतरिक्षांत व यज्ञलोकांत मुख्यत्वानें राहणारा, जल-स्थल-नग-खग-मृगांमध्यें राहून त्यांचें नियमन करणारा आणि सर्वांचा नियामक असूनही नित्य स्वस्वरूपी (सत्स्वरूपी) सर्व-व्यापी आत्मा आहे)

सारांश हा सर्व विभूति-श्रेष्ठ आहे. हा सर्वव्यापी, सर्वनियामक असून स्वतः एकरूपी आहे. तें रूप म्हणजे सत्स्वरूप होय. ऋत म्हणजे अढळ सत्यरूप. हें या परमात्म्याचें रूप सर्वांहून मोठें, सर्वांहून लहान, सर्वव्यापी आणि सर्व-

नियामक आहे. एवंच सर्व विश्व हें या आत्मारामाचें दृश्य नगर आणि त्या ह्या दृश्य विश्वाचा स्वामी आत्मा आहे. फार काय सांगावें ? हें सर्व दृश्य विश्व व विश्वगत पदार्थही परमार्थतः हाच आत्माराम आहे. ॥ ३ ॥

## मंत्र तिसरा.

**अन्वय व अर्थ**—हा आत्मा—**प्राणं ऊर्ध्वं उन्नयति, अपानं प्रत्यक् अस्यति** ( प्राणवायूला वर खेंचतो व अपानवायूला खालीं रेटतो ) **सर्वे देवाः मध्ये वामनं आसीनं उपासते** ( सर्व इंद्रियाभिमानी देवदेवता या वामनस्वरूपी आत्मारामाची सेवा करितात. )

आपल्या देहपुरींत वायूच्या ज्या लीला आहेत, त्या सर्व प्राणांचाही प्राण जो आत्माराम त्याच्या सत्तेनें होतात. आपले श्वासोच्छ्वास व इतर सर्व गति आत्मरामतंत्र आहेत. हा हृदयपुंडरीकामध्यें—हृदयकमलामध्यें—राहतो, म्हणून याला ' वामनं मध्ये आसीनम् ( शरीराच्या मध्यभागीं वामनरूपानें, अतिसूक्ष्म पण अतिसुंदर स्वरूपानें राहणारा ) असें म्हटलें. सर्व इंद्रियांचीं व इंद्रियाभिमानी देवदेवतांचीं कर्मे केवल या आत्मारामाच्या पूजनाप्रीत्यर्थ होतात व तीं या आत्म्याच्या सत्तेनें होतात; हें या मंत्राचें तात्पर्य आहे. सारांश, सर्व कर्ता—करविता तो आहे. त्याच्या सत्तेशिवाय झाडाचें पानसुद्धां हालत नाहीं. ॥३॥

## मंत्र चवथा.

**अन्वय व अर्थ**—**अस्य देहिनः शरीरस्थस्य विस्रंसमानस्य** ( ह्या देहवंत व शरीरांत राहणाऱ्याच्या शरीराचा पात होत चालला असतां ) **व—देहात् विमुच्यमानस्य** ( देहापासून मोकळा होण्याची वेळ आली असतां ) **अत्र किं परिशिष्यते** ( या देहाचें काय शिल्लक उरतें ? )—जें काय शिलक उरतें, देहांत राहणाऱ्याचा देह सुटला म्हणजे जी काय बाकी राहते,—**तत् एतत् वै** ( तेंच हें ब्रह्म होय ).

' प्रेत झाल्यावर मागें कांहीं शिल्लक उरतें कीं नाहीं ? ' या नचिकेत्याच्या प्रकृत प्रश्नाला हें साक्षात् उत्तर आहे. नगराधिताची नगरी ओस पडली असतां नगराधिप मागें राहतो, त्याप्रमाणें देहनियंत्याचा देह गलित झाला किंवा सुटला तरी तो देहाधिप आत्मा मागें राहतो. आपलें स्थूलशरीर संपलें, सूक्ष्म देह अस्तंगत झाला किंवा कारणदेहाचा व महाकारणदेहाचा विनाश झाला तरी या सर्वांचा चालक नष्ट होत नाहीं. हा जो नष्ट होत नाहीं, तोच परमात्मा होय. ॥ ४ ॥

## मंत्र पांचवा.

**अन्वय व अर्थ—न प्राणेन, न अपानेन कश्चन मर्त्यः जीवति** ( कोणताही मर्त्य जगतो, तो प्राणाच्या किंवा अपानाच्या कार्यक्षमतेनें जगतो असें नाहीं.) **तु यस्मिन् एतौ उपाश्रितौ** ( पण ज्याच्या आश्रयानें प्राणापान राहतात व ज्याच्या सत्तेनें व ज्याच्या प्रीत्यर्थ आपआपलीं नियत कर्में करितात ) **इतरेण जीवन्ति** ( त्या वामनरूपी आत्म्याच्या सत्तेनें प्राणी जगतात म्हणजे मर्त्यांचें शरीरधारण व शरीरत्याग हीं सर्व कार्यें आत्मारामाच्या सत्तेनें होत असतात ).

तात्पर्य प्राणापानांच्या कर्तृशक्तीवर शरीरी प्राणी शरीरकार्यें करितात, असें नाहीं. या प्राणापानांचा जो नियंता आत्मा, तो शरीरांतर्यामी राहून प्राणापानादिकांस स्वकार्यें करण्याचें सामर्थ्य देतो, त्याच्या सत्तेनें प्राण्याचे शरीर–संयोग–वियोगादि होतात. प्राण किंवा अपान हा जीवकारण नव्हे. हीं त्या आत्मारामाच्या हातांतील बाहुलीं आहेत. म्हणन प्राणापानांचा संयोग–वियोग झाला तरी मुख्य आत्मारामाचें कांहीं एक बिघडत नाहीं. ॥ ५ ॥

---

## मंत्र सहावा.

**अन्वय व अर्थ—हन्त! इदं सनातनं गुह्यं ब्रह्म ते प्रवक्ष्यामि** ( नचिकेत ! आतां तुला गुह्य–अत्यंत गोपनीय–असें जें सनातन ब्रह्म त्याचें स्वरूप सांगतों ) **यथा च मरणं प्राप्य आत्मा भवति–हे–गौतम!** ( आणि गौतमा ! मरण प्राप्त झाल्यावर आत्म्याची–जीवात्म्याची–स्थिति काय होते, तीही तुला सांगतों ).

आतां सातव्या मंत्रांत अज्ञानी जीवाचा शरीरत्याग झाला असतां, त्या जीवाची पुढें काय गति होते, हें सांगतील व आठव्या मंत्रापासून शेवटच्या मंत्रापर्यंत आत्मस्वरूपाचें विवरण करतील. याप्रमाणें या सहाव्या मंत्रांतील दोन्ही मुद्यांचीं उत्तरें सात ते पंधरा मंत्रांत येणार आहेत. ॥ ६ ॥

---

### मृत जीवांची व्यवस्था.

## मंत्र सातवा.

**अन्वय व अर्थ—यथाकर्म यथाश्रुतं अन्ये देहिनः शरीरत्वाय योनिं प्रपद्यन्ते, अन्ये स्थाणुं अनुसंयन्ति** ( जसें ज्याचें कर्म असेल, जसें

ज्यानें ज्ञान संपादन केलें असेल, तसा प्राणी शरीरधारणासाठीं चेतनशील शरीरांत प्रवेश करून जन्माला येतो; किंवा अचर म्हणजे जडवस्तूचें स्वरूपही त्याला प्राप्त होतें).

नचिकेत्याच्या प्रश्नाला हें उत्तर मिळालें. तें पूर्ण अज्ञानी व अर्धवट ज्ञानी लोकांच्या संबंधानें आहे. शरीर संपलें तरी शरीरी संपत नाहीं, हें मागें चवथ्या मंत्रांत ठरविलें. आतां जीव–शरीर प्राप्त व्हावें, असें ज्याचें कर्म व ज्ञान असेल त्याला कोणत्या तरी एका नियमित योनीमध्यें जन्म घ्यावा लागतो. पण सर्वत्र जर अज्ञान असेल व कसलेंही सत्कर्म झालें नसेल, तर तो शरीरी जड–शरीरांत म्हणजे दगड, माती इत्यादि वस्तूच्या पोटीं जाऊन जड होतो. कर्माचा नियम म्हणतात, तो हा होय. हाच कर्मविपाक. अज्ञानी जीव नाहींसा होत नाहीं, तर तो भोगानें कर्मक्षय होईपर्यंत चेतनसृष्टींत किंवा अचेतन सृष्टींत कालक्षेप करीत असतो. ॥ ७ ॥

---

## आत्म्याची एकरसता.

### मंत्र आठ ते पंधरा.

**अन्वय व अर्थ—कामंकामं निर्मिमाणः यः एषः पुरुषः सुप्तेषु जागर्ति, तत् एव शुक्रं, तत् ब्रह्म, तत् एव अमृतं उच्यते; तस्मिन् सर्वे लोकाः श्रिताः, तत् उ कश्चन न अत्येति** (प्रत्येकाच्या वासनाकर्मानुसार व स्वतःच्या पूर्ण स्वातंत्र्यानें चराचर सृष्टि निर्माण करणारा जो हा परम पुरुष, तो सर्व सृष्टि निद्रावश झाली असतां, सदैव जागृत असतो. किंवा जीवास स्वप्नें पडत असतात, तीं तो आत्मा जागा राहून उत्पन्न करितो बाकीचा अर्थ सर्वश्रुतच आहे).

हा नित्य जागृत असणारा पुरुषच सर्वप्रकाश व सर्वशुद्ध आहे; तोच ब्रह्म होय. अमृतत्व तें हेंच. ह्या परमात्म्याच्या सत्तेला व आश्रयाला सर्व लोक वश झालेले असतात. याच्या सत्तेचा भंग करण्याला किंवा तिचें अतिक्रमण करण्याला कोणीही समर्थ नाहीं. सारांश, सर्वकारण, सर्वज्ञ जो एकरूप आत्माराम आहे, तोच उपाधिशून्य, सर्वव्यापी, अनाद्यनंत, सर्वाधार आणि सर्वनियामक आहे. ॥ ८ ॥

---

**यथा भुवनं प्रविष्टः एकः अग्निः रूपं रूपं प्रतिरूपः बभूव, तथा एकः सर्वान्तरात्मा रूपं रूपं प्रतिरूपः बभूव** (जसा भुवनांत प्रविष्ट

झालेला एकच अग्नि आपल्या संगतिस्थानाच्या आकारासारखे निरनिराळे आकार धारण करितो, त्याप्रमाणें सर्व भूतांच्या अंतर्यामीं एकस्वरूपानें असणारा आत्माराम उपाधींच्या स्वभावानुसार अनेक-अनंत-स्वरूपें धारण करितो).

सारांश, आत्माराम एकच आहे. उपाधींमुळें तो अनंत स्वरूपांचा होऊन हें विश्व नटतो. ॥ ९ ॥

---

दहाव्या मंत्रांत अग्निस्थानीं वायूच्या दृष्टांताची योजना आहे. तात्पर्य एकच आहे कीं एकस्वरूपी आत्मा उपाध्यनुसार अनंतरूपें घेतो. ॥ १० ॥

---

**सर्वलोकस्य चक्षुः सूर्यः यथा चाक्षुषैः बाह्यदोषैः न लिप्यते, तथा एकः सर्वभूतांतरात्मा लोकदुःखेन न लिप्यते; बाह्यः** ( सर्व लोकांच्या चक्षुरिंद्रियावर अनुग्रह करून त्याला पाहण्याचें सामर्थ्य देणारा व म्हणून सर्व लोकांचा व विराट् पुरुषाचा चक्षु असणारा जो सूर्य, तो जसा आमच्या डोळ्यांच्या बाह्य दोषांनीं लिप्त होत नाहीं, तो दोषांतून अलिप्त असतो, त्याप्रमाणें सर्व भूतांच्या अंतर्यामीं राहणारा आत्मा लोकांच्या शारीरिक वा मानसिक दुःखांनीं केव्हांही विकृत होत नाहीं. कारण तो बाह्य म्हणजे देहादिविलक्षण आहे. ) ॥ ११ ॥

---

**एकः वशी, सर्वभूतांतरात्मा, यः एकं रूपं बहुधा करोति; तं आत्मस्थं ये धीराः अनुपश्यंति तेषां शाश्वतं सुखं; न इतरेषां** ( याप्रमाणें एक, अद्वितीय; स्वतंत्र, सर्वस्वामी; सर्व भूतांचा नियामक व हृदयांत राहणारा; आपण एकरूप असतांही जो आपणच अनेकरूपें नटतो, त्या आत्मस्थ आत्मारामाचें ज्या पुरुषांस ध्यानदर्शन होतें, त्या महाभागांस मात्र शाश्वतसुखाची प्राप्ति होते. अविकृत सुख त्यांस मात्र मिळतें. हें सुख इतरांच्या भागधेयांत-कर्मांत किंवा नशीबांत-लिहिलेलें नाहीं. सारांश चिरंतन सुख हवें असेल तर ह्या एक स्वतंत्र अंतर्यामीचें अखंड ध्यान विहितमार्गानें करावें ). ॥ १२ ॥

(अ) **नित्यानां नित्यः, चेतनानां एकः चेतनः यः एकः बहूना कामान् विदधाति** (जो सर्व नित्य आणि अनित्यांचा एकच नित्य आधार आहे, जो सर्व चेतनांचें एक चैतन्य आहे, आणि जो एकाकी असूनही अनंत लोकांच्या अनंत वासना त्यांच्या त्यांच्या कर्मानुसार लीलेनें फलप्रद करितो)—त्या आत्मस्थ आत्मारामाचें ध्यान—भजन अखंड करणारा महात्मा नित्य व शुद्ध सुखाचा नित्य अनुभव घेतो. ॥ १३ ॥

---

**तत् अनिर्देश्यं परमं सुखं एतत् इति मन्यंते** (तें शाश्वत व पूर्णसुख इंद्रियादिकांस तर सर्वथा अगोचर आहे; तथापि ज्ञानी लोकांस हें श्रेष्ठ सुख प्रत्यक्ष असतें व ह्या सुखाचा लाभ त्यांस सदैव होतो)—**नचिकेत** विचारतोः—**नु कथं तत् विजानीयां** (तर मग हें सुख मला समजेल काय? कसें तें समजेल बरें?) **किं उ भाति वा विभाति** (ह्या ब्रह्मावर म्हणजे सुखस्वरूपावर कशाचा प्रकाश पडतो? कोणाच्या प्रकाशानें हें विस्पष्ट दिसतें? ॥ १४ ॥

---

यमधर्माचें उत्तरः—**तत्र सूर्यः न भाति, न चंद्रतारकं, न इमाः विद्युतः कुतः अयं अग्निः** (तेथें सूर्यप्रकाश, चंद्रप्रकाश, तारकाप्रकाश, स्वर्गस्थ तेजःप्रकाश किंवा विजेचा प्रकाश व अंतरिक्षतेजःप्रकाशही पोहोंचत नाहीं. मग आपल्या येथील भूलोकस्थ अग्नीचा प्रकाश या आत्मस्वरूपावर कसा पडणार?) **सर्वं तं भांतं एव अनुभाति** (ह्या व इतर सर्व वस्तु आत्मप्रकाशाच्या सामर्थ्यानें प्रकाशतात.) **तस्य भासा सर्वं इदं विभाति** (त्या आत्मप्रकाशानें ह्या सर्व वस्तु प्रकाशित होतात.)

सारांश, त्याच्यावर प्रकाश पाडण्यास कोणीही समर्थ नाहीं. श्रुतिश्रवण, भक्तिपूर्वक चिंतन आणि निदिध्यास हीं साध्य होतील, तेव्हां आत्मप्रसाद होऊन आत्मसाक्षात्कार होतो. ॥ १५ ॥

याप्रमाणें आत्मारामाचें स्वरूप या मंत्रांत स्पष्ट वर्णिलें आहे. याच्या संबंधें आधुनिक दृष्टीनें विचार करणें तो उपसंहारांत करीन.

दुसरी वल्ली समाप्त.

---

# तिसरी वल्ली.

## आत्मसत्ता व त्याचें ईशत्व.

### मंत्र पहिला.

**अन्वय व अर्थ—एषः अश्वत्थः ऊर्ध्वमूलः अवाक्शाखः** ( हा अश्वत्थ वृक्ष ऊर्ध्वमूल आहे—याचें मूल वर आहे—याच्या शाखा खालीं आहेत आणि हा वृक्ष सनातन आहे. ) **तत् एव शुक्रं तत ब्रह्म** इत्यादि मंत्रभागाचा अर्थ दुसऱ्या वल्लीच्या आठव्या मंत्रांत केला आहे. तात्पर्य ब्रह्म हें निरुपाधिक, अमृत, सर्वाधार आणि सर्वश्रेष्ठ आहे. ॥ १ ॥

येथें मंत्राच्या पहिल्या पंक्तींत अश्वत्थरूपानें संसारवृक्षाचें वर्णन केलें आहे असें बहुतेक सर्व भाष्यकार म्हणतात. या संसाराचा उगम वर ( ब्रह्मामध्यें, इंद्रियांस अगोचर असणाऱ्या ब्रह्मांमध्यें ) असून त्याच्या शाखा खालीं म्हणजे दृश्य विश्वामध्यें आहेत व हा वृक्ष सनातन आहे म्हणजे नदीच्या प्रवाहासारखा अजरामर आहे असें म्हणण्याचा बहुतेक सर्व भाष्यकारांचा संप्रदाय आहे. गीतेमध्येंही पंधराव्या अध्यायांतील पहिले दोन तीन श्लोक अश्वत्थरूपानें संसारवृक्षाचें स्पष्टपणानें वर्णन करितात. हें वर्णन समर्पकही आहे. कारण आपला संसार ( दृश्यविश्व ) प्रत्येकक्षणीं रूपांतर पावतो तरी त्याचा नाश व्यवहारांत केव्हांही होत नाहीं. तसेंच याचें स्वरूप विलक्षण आहे. वृक्षाचें मूळ खालीं असतें व शाखा वर असतात, पण याचें मूळ वर आणि शाखा खालीं आहेत. ब्रह्म हें याचें उत्पत्तिस्थान आणि प्रपंच या त्याच्या शाखा होत. 'अश्वत्थ' या शब्दाचा यौगिक अर्थही 'दुसऱ्या दिवशीं न राहणारा, नश्वर' असा आहे. याप्रमाणें ह्या मंत्राच्या पहिल्या पंक्तींत संसारवृक्षाचें वर्णन आहे असा संप्रदाय, श्रुतिस्मृति आणि शब्दशास्त्र यांचा निर्णय आहे. तथापि मी भीत भीत असें म्हणण्याचें नम्रपणानें धाष्टर्य करितों कीं, या मंत्रांतील पहिल्या पंक्तीचा अर्थ ब्रह्मपर करावा. कारण पुढील पंक्तींत ब्रह्मवर्णन 'तें' या समीपतादर्शक सर्वनामानें प्रारंभित झालें आहे. शिवाय, येथें संसाराचें वर्णन करण्याचें कारणही स्पष्ट नाहीं. असो; हा कूटस्थ सनातन परमात्मा सर्वकारण असून 'ऊर्ध्व' म्हणजे अगोचर आहे आणि दृश्य प्रपंचरूपानें यानेंच आपल्या शाखा व्यावहारिक विश्वांत पसरलेल्या आहेत. कोणत्याही रीतीनें अर्थ केला तरी वर्णन परमात्म्याचें आहे हें विसरतां उपयोगी नाहीं. ॥ १ ॥

## मंत्र दुसरा.

**अन्वय व अर्थ—इदं जगत्–तत्–प्राणे एजति** (हें सर्व उत्पन्न झालेलें विश्व–प्राणाच्या (ब्रह्माच्या) सत्तेनें स्वव्यापार करितें) **महत् भयं वज्रं उद्यतं** (हा प्राण म्हणजे अत्यंत भयंकर वस्तु आहे. सज्ज केलेल्या वज्रानें जसें भय उत्पन्न होतें तसेंच या प्राणप्रेरक ब्रह्माचें सर्व चराचरांस भय वाटतें) **ये एतत् विदुः ते अमृताः भवन्ति** (ज्या ज्ञानी मुमुक्षूंस हें सर्वकारण ब्रह्म ज्ञात होतें ते विद्वान् लोक अमर (मुक्त) होतात.)

या दृश्य विश्वाची उत्पत्ति सर्वप्रेरक जो परमात्मा त्यापासून होते. विश्वव्यापारही त्याच्याच सत्तेनें होतात. त्याची सत्ता शासन करणारी आहे म्हणून भयोत्पादकही आहे. अशा सर्वकारण, सर्वप्रेरक आणि निग्रहानुग्रह करणाऱ्या (शिक्षा आणि वक्षीस देणाऱ्या) परमेश्वराचें स्वरूप ज्यांस समजतें ते अमर होतात. २

---

## मंत्र तिसरा.

**अन्वय व अर्थ—अस्य भयात् अग्निः तपति, भयात् सूर्यः तपति, भयात् इंद्रः च वायुः च, पंचमः मृत्युः धावति** (या परमात्म्याच्या भीतीनें अग्नि हा दहनकर्म करितो, सूर्य याच्या भयानें प्रकाशन कर्म करितो, इंद्र, वायु आणि मृत्यु हेही आपलीं नियत कर्मे याच्या भयानें करितात).

सारांश, हे पांचही देव परमात्मभयानें आपआपलीं कामें व्यवस्थित रीतीनें करितात. हे देव स्वर्ग, अंतरिक्ष आणि भूलोक यांतील अथवा त्रैलोक्यांतील आहेत हें विसरूं नये. ॥ ३ ॥

---

### मर्त्यलोकाचें महत्त्व.

## मंत्र चवथा.

**अन्वय व अर्थ—शरीरस्य विस्रसः प्राक् इह बोद्धुं अशकत् चेत्** (शरीराचा क्षय होण्यापूर्वी या लोकीं–कर्मलोकांमध्यें–ब्रह्मस्वरूप समजेल तर अति उत्तम गोष्ट होईल. जीवानें या मानवलोकीं म्हणजे कर्मलोकांत ब्रह्मज्ञान समजून घेण्याचा यशस्वी प्रयत्न करावा.) **ततः सर्गेषु लोकेषु शरीरत्वाय कल्पते** (या लोकीं ज्ञान झालें नाहीं तर जन्ममरणात्मक भुवनांमध्यें अज्ञानी पुरुषांस शरीराची संगति धरावी लागते.)

या मृत्युलोकांत मात्र ब्रह्माचें यथार्थ ज्ञान होणें शक्य आहे. देह, इंद्रियें इत्यादि सर्व उपकरणें घड घाकट असतांना ब्रह्मज्ञान करून घेणें हें अगत्याचें काम आहे. येथेंच यथार्थ ज्ञान होतें. मृत्युलोकही कर्मकर्त्या पुरुषाचें आश्रयस्थान आहे. इतर लोक भोगाचीं मात्र वसतिस्थानें आहेत; पण भूलोकीं मात्र जीवाला मुक्त किंवा बद्ध होण्याचें ज्ञान संपादितां येतें. अन्य लोकीं ज्ञानसंपादनाची, तसेंच चित्तशुद्ध करणारें कर्म करण्याची संधि मिळत नाहीं. म्हणून या लोकींच ज्ञान संपादन करावें असा श्रुतीचा हितकर उपदेश आहे. ॥ ४ ॥

---

## मंत्र पांचवा.

**अन्वय व अर्थ—यथा आदर्शे तथा आत्मनि, यथा स्वप्ने तथा पितृलोके, यथा अप्सु तथा गन्धर्वलोके परि ददृशे इव, छायातपयोः इव ब्रह्मलोके** (आदर्शांत—स्वच्छ आरशांमध्यें—जसें स्वच्छरूप दिसतें तसें आपल्या इहलोकींच्या शुद्ध बुद्धीमध्यें यथार्थ रूप दिसतें, तथापि तें आरशांतील म्हणजे सोपाधिक रूप होय. स्वप्नामधील पदार्थ-दर्शनाप्रमाणें पितृलोकीं अस्पष्ट दर्शन होतें. जलस्थ प्रतिबिंबाप्रमाणें गन्धर्व-लोकीं वस्तूंचे ज्ञान असतें आणि छाया व प्रकाश यांचें ज्ञान जसें स्पष्ट होतें तसें ब्रह्मलोकांत वस्तूंचें ज्ञान यथार्थ होतें.)

सारांश, ब्रह्मस्वरूपाचें यथार्थ ज्ञान होण्याला या कर्मभूमींत प्राप्त झालेली जीवाची बुद्धि शुद्ध होईल तर जशी कांहींशी संधि मिळते तशी इतरत्र कोठें मिळत नाहीं. पितृलोकांत जा, तेथें स्वप्नगत पदार्थाप्रमाणें अस्पष्ट ज्ञान मात्र व्हावयाचें. गंधर्व लोकींची तीच स्थिति. ब्रह्मलोकांत यथार्थ ज्ञान होईल हें खरें पण ब्रह्मलोकाला जावयाचें कसें? अज्ञान आहे तोंपर्यंत ब्रह्मलोक साध्य होणें शक्य नाहीं. म्हणून या लोकींच ब्रह्मज्ञान संपादण्याचा दृढ प्रयत्न करणें हें शक्य आणि सर्वप्रकारें इष्ट आहे. ॥ ५ ॥

---

## मंत्र सहावा.

**अन्वय व अर्थ—पृथक् उत्पद्यमानानां इन्द्रियाणां यत् पृथक् भावं उदयास्तमयौ च मत्वा धीरः न शोचति** (निरनिराळ्या महा-भूतांपासून उत्पन्न होणाऱ्या इंद्रियांचे निरनिराळे स्वभाव व उत्पत्ति-विनाश या विषयींचा निश्चय करणारा विद्वान् पुरुष शोकमोहशून्य होतो.)

आपलीं सर्व ज्ञानेंद्रियें पंचमहाभूतांपासून निर्माण झालेलीं आहेत. त्यांचे स्वभाव निरनिराळे व आत्म–विलक्षण आहेत; आणि हीं इंद्रियें उत्पन्न होतात, नष्ट होतात, पण आत्मा नष्ट होत नाहीं; इत्यादि ज्ञान ज्या पुरुषाला होतें तो पुरुष शोकपार होतो.

इंद्रियें उत्पन्न होतात, नष्ट होतात. त्यांचे विकार निरनिराळे असतात; आणि तीं पंचमहाभूतांपासून निर्माण होतात. [ इंद्रियज्ञान, हें विकार, उत्पत्ति, प्रलय पावणारें आणि जडापासून उत्पन्न झालेलें असतें. ] असें ज्ञान ज्या विद्वानाला होतें, मी इंद्रियें नव्हे; कारण मी विकार नाहीं, जन्ममरणात्मक नाहीं; आणि जडकारणांपासन उत्पन्न झालेला नाहीं; पण या सर्वांचा मी द्रष्टा आहें, असें ज्ञान ज्याला होतें तो शोकमोहाचें व तत्कारणांचे अतिक्रमण करितो, हें ठीकच आहे. ॥ ६ ॥

---

## मंत्र सातवा व आठवा.

**अन्वय व अर्थ—इंद्रियेभ्यः मनः परं, मनसः सत्त्वं उत्तमं, सत्वात् महान् आत्मा अधि, महतः अव्यक्तं उत्तमं, तु अव्यक्तात् पुरुषः परः** ( इंद्रियांहून मन श्रेष्ठ, मनाहून बुद्धि, बुद्धीपेक्षां महान् आत्मा (हिरण्यगर्भ) श्रेष्ठ, त्याच्यापेक्षां अव्यक्त–प्रकृति–उत्तम, आणि अव्यक्तापेक्षां पुरुष –परमात्मा–श्रेष्ठ असतो. ) **व्यापक अलिंगः एव च** ( हा पुरुषोत्तम सर्वव्यापी आणि गुणधर्मशून्य आहे. ) **यं ज्ञात्वा जंतुः मुच्यते अमृतत्वं च गच्छति** ( या परम पुरुषाचें ज्ञान झालें असतां जीवाला मुक्ति मिळून तो अमृतत्व संपादन करितो. ) ॥ ७ व ८ ॥

या दोन मंत्रांत इंद्रियांपासून परमात्म्यापर्यंत कोणती वस्तु श्रेष्ठ–कनिष्ठ आहे हें सांगणारी श्रेष्ठत्वपरंपरा अवतीर्ण केली आहे. जीवानें इंद्रियादिकांचें स्वरूप, त्यांचें विकारित्व, त्यांचे उदयास्त इत्यादि गुणधर्म पाहून शेवटीं सर्वव्यापी आणि निर्गुण व निरुपाधिक परमात्म्याचें ज्ञान करून घ्यावें. हें ज्ञान मुक्तिदायक आहे. केव्हां ? मी स्वतःही सर्वव्यापी, निर्गुण, निरुपाधिक, अजन्मा, अनंत आणि ज्ञानरूप आहें, असें ज्ञान दृढ होईल तेव्हांच हा ज्ञानी पुरुष मुक्त होतो. ७–८

---

## मंत्र नववा.

**अन्वय व अर्थ—अस्य रूपं सन्दृशे न तिष्ठति एनं कश्चन चक्षुषा न पश्यति** ( त्या परमात्म्याचें स्वरूप केव्हांही दर्शनाचा विषय होत नाहीं

किंवा याला कोणीही नेत्रांनीं पाहूं शकत नाहीं.) **मनीषा हृदा मनसा अभिक्लृप्तः** (हा मनादिकांवर सत्ता चालविणाऱ्या बुद्धियुक्त मनानें मात्र, ध्यानरूपानें मात्र, प्रकाशित व्हावयाचा असतो) **ये एतत् विदुः ते अमृताः भवन्ति** (असें ज्ञान ज्यांस होतें ते अमर होतात.)

या विश्वांत इंद्रियांस गोचर होणारा असा कोणताही विषय नाहीं कीं, जो याच्या स्वरूपासारखा असेल. तात्पर्य हा कोणत्याही इंद्रियांचा दर्शनविषय नाहीं. तसेंच याला इंद्रियानें पाहणारा कोणताही जीव समर्थ नाहीं. हा परमात्मा केवल संकल्पादिशून्य, व ज्ञानैकनिष्ठ बुद्धीला मात्र ध्यानगोचर आहे. म्हणजे निर्विषय झालेल्या बुद्धीला ध्यानमार्गानें मात्र आकलितां येतो. गुरुमुखानें श्रुतिश्रवण झालें, भक्तिपूर्वक या श्रवणाचें अभिचिंतन केलें म्हणजे ध्यानामध्यें (समाधीमध्यें) आत्मस्वरूप प्रकाशित होतें. या प्रकाशाचा साक्षात्कार जीवाला अमृतत्व देतो हें सांगावयास नको. सारांश, विश्व-विलक्षण असून, विश्व-नियंत्रण करणाऱ्या सच्चिदानंद परमात्म्याचें ज्ञान अपौरुषेय श्रुतिश्रवणचिंतनानें मात्र अधिकारी पुरुषांस व्हावयाचें आहे, असें समजावें. ॥ ९ ॥

---

## मंत्र दहावा.

**अन्वय व अर्थ—यदा पञ्च ज्ञानानि मनसा सह अवतिष्ठन्ते च बुद्धिः न विचेष्टति, तां परमां गतिं आहुः** (ज्यावेळीं पंच ज्ञानेंद्रियें मनासह स्वविषयांपासून पराङ्मुख होतात—जेव्हां आपलीं इंद्रियें व मन हीं शब्दादि विषयांपासून निवृत्त होतात—आणि बुद्धि स्थिर होते, तेव्हां जी स्थिति असते, ती सर्वश्रेष्ठ आहे असें म्हणतात.

तात्पर्य, इंद्रियें, मन आणि बुद्धि हीं प्रत्येकीं व सर्वशः आपआपल्या विषयांचा त्याग करून स्थिर झालीं, म्हणजे जी समाधिस्थिति प्राप्त होते, ती सर्वोत्तम आहे, असें ज्ञानी लोक म्हणतात; कारण आत्मरूप प्रकाशित करण्याचें सामर्थ्य या विषयशून्यसमाधीला मात्र आहे. आत्मज्ञानासाठीं समाधीचा अवलंब केला पाहिजे, हें सिद्ध झालें. ॥ १० ॥

---

## मंत्र अकरावा.

**अन्वय व अर्थ—तां स्थिरां इंद्रियधारणां योगं इति मन्यन्ते** (त्या स्थिर आणि निश्चल इंद्रियनिग्रहाला योग असें म्हणतात.) **तदा अप्रमत्तः भवति** (इंद्रियनिग्रह व्यवस्थित रीतीनें झाला म्हणजे मुमुक्षु जीव

अप्रमत्त ( प्रमादशून्य होतो. ) हि प्रभवाप्ययौ योगः ( कारण योग म्हणज उत्पत्ति आणि विनाश हे विकार उत्पन्न करणारा असतो ). ॥११॥

इंद्रियांची स्वतंत्रता नाहींशी करून त्यांस विषयविन्मुख करावयाचें हा खरा योग आहे. हा योग साध्य झाला म्हणजे मुमुक्षूच्या हातून प्रमाद अथवा चुकी होतच नाहीं. इंद्रियें स्तब्ध झाल्यावर व वासना निवाल्यावर चुकी होण्याचा संभव असत नाहीं. योगाचें लक्षण असें आहे कीं, त्यानें ब्रह्मप्राप्तीच्या उपायांची उत्पत्ति करून अपायांचा नाश करावा. सारांश, सर्व इंद्रियें स्तब्ध करून त्यांस अंतर्मुख करावयाचें, ही उपायाची उत्पत्ति करणें, व इंद्रियांस विषयोन्मुख होण्याची प्रवृत्ति असते, तिचा नाश करावयाचा, व असा अपायांचा विनाश करणें, हें योगाचें काम आहे. तात्पर्य, इंद्रियें स्थिर झालीं म्हणजे योगसिद्धि प्राप्त होते. ॥ ११ ॥

---

## मंत्र बारावा.

अन्वय व अर्थ—वाचा एव न, मनसा न, चक्षुषा न, प्राप्तुं शक्यः ( परमात्म्याची प्राप्ति वाणीनें, मनानें, व नेत्रादि इंद्रियांनीं होणें शक्य नाहीं. ) अस्ति इति ब्रुवतः अन्यत्र तत् कथं उपलभ्यते ( आत्मा आहे असा निश्चय असलेल्या मुमुक्षूशिवाय इतर पुरुषाला इतर साधनांनीं आत्मप्राप्ति कशी होणार ? होणार नाहीं. ) ॥ १२ ॥

आपल्या ज्ञानेंद्रियांनीं, कर्मेंद्रियांनीं, किंवा मनानें आत्मप्राप्ति होणें शक्य नाहीं. कारण आत्मा हा ज्ञानाचा विषय नाहीं, किंवा मनुष्याच्या प्रयत्नानें उत्पन्न होणारा पदार्थही नाहीं. 'तो आहे,' अशी बळकट श्रद्धा बाळगणाऱ्या पुरुषाला मात्र तो उपलब्ध होऊं शकतो. ज्या पुरुषाला ही श्रद्धा नाहीं त्याला इंद्रियांच्या सहायानें किंवा इंद्रियवश असणाऱ्या मनाच्या सहायानें आत्मप्राप्ति केव्हांही होणार नाहीं. आत्मप्राप्तीचा उपाय म्हटला म्हणजे त्याच्या अस्तित्वाची दृढ श्रद्धा व इंद्रिय मनांचा अंतर्मुख प्रवाह हाच एक आहे. याला दुसरा उपाय नाहीं आणि आत्मा आहे अशी श्रद्धा नसणाराला तो कोणत्याही मानवी उपायानें प्राप्त व्हावयाचा नाहीं. ॥ १२ ॥

---

## मंत्र तेरावा.

अन्वय व अर्थ—उभयोः तत्त्वभावेन 'अस्ति इति' एव उपलब्धव्यः ( म्हणून उभयतांच्या तात्त्विक रहस्याचा विचार करून तो आहे,

अशी श्रद्धा दृढ धरून आत्मप्राप्ति करून घ्यावी.) 'अस्ति इति' एव उपलब्धस्य तत्त्वभावः प्रसीदति) आत्मश्रद्धेनें त्याच्या अस्तित्वाची भावना दृढ झाली, त्या पुरुषाचें आत्मज्ञान अपरोक्ष—साक्षात्कृत—होतें.)

ज्या योगी मुमुक्षूनें दृश्य विश्व, आणि अदृश्य ब्रह्म या उभयतांचाही पूर्ण विचार करून त्यांचें एक-रसात्मक रहस्य समजून घेतलें आहे त्याला (आत्म्याच्या अस्तित्वाची दृढ कल्पना असणाऱ्या पुरुषाला) आत्मप्राप्ति होणें शक्य असतें व होतें. अशा पुरुषाचें ज्ञान विज्ञानरूपी होतें म्हणजे त्याला आत्म—साक्षात्कार होतो. ॥ १३ ॥

---

## मंत्र चवदावा.

**अन्वय व अर्थ—यदा ये कामाः अस्य हृदि श्रिताः सर्वे प्रमुच्यन्ते, अथ मर्त्यः अमृतः भवति, अत्र ब्रह्म समश्नुते** (जीवाच्या हृदयांत जे काम—वासना—असतात, ते जेव्हां सर्व त्यक्त होतात तेव्हां मर्त्य जीवही अमृत होतो आणि या लोकीं त्याला ब्रह्मप्राप्ति होते.)

आपल्या अंतःकरणांत ज्या विषयवासना असतात त्यांचा सर्वथा आपण त्याग केला म्हणजे मर्त्य (मरण-वश) असणारे आपण अमृत (अजरामर) होतों. विषयवासना नाहींशी झाली आणि अज्ञान नाहींसें झालें म्हणजे जन्ममरणास वश असणारा जीव मृत्युसत्तेच्या पलीकडे जातो, तो अमर होतो. अज्ञानासह वासनांचा क्षय पूर्ण झाला म्हणजे ह्या मृत्युलोकीं सुद्धां ज्ञानरूपी ब्रह्म प्रकाशित होतें. आपल्या बुद्धीवर अज्ञानकृत वासनारूपी कृष्णमेघाचें जें आवरण उत्पन्न झालेलें असतें तें नष्ट झालें, अज्ञानरूपी राहु निघून गेला, म्हणजे स्वयंप्रकाश आत्मसूर्य स्वतेजानें प्रकट होतो; हें ज्यास्त स्पष्ट करून सांगण्याचें कारण नाहीं. ॥ १४ ॥

---

## मंत्र पंधरावा.

**अन्वय अर्थ—यदा हृदयस्य ग्रन्थयः इह प्रभिद्यन्ते अथ मर्त्यः अमृतः भवति, एतत् हि अनुशासनम्** (ज्या वेळीं आपल्या हृदयाच्या सर्व ग्रंथी फुटून जातात, विस्कळित होतात, आणि नाहींशा होतात, ह्या जन्मींच त्यांचा निरास होतो, त्यावेळीं मर्त्य जीवही अमर होतो; हा सर्व वेदवेदांताचा उपदेश आहे.)

सारांश, हृदयांत वास्तव्य करणारें अज्ञान आणि त्यानें उत्पन्न केलेलें मिथ्या ज्ञान व वासना यांचा त्या लोकांच समूल विनाश झाला, यानीं उत्पन्न केलेली जाळीं उकलून काढून नाहींशी करून टाकली म्हणजे मरण–बद्ध असणारा जीव मरणाला पाठीमागें टाकून आत्मरूप प्राप्त करून घेतो. हा वैदिक तत्त्वज्ञानाचा मुख्य सिद्धांत आहे. याप्रमाणें अज्ञान व तज्जन्य वासना या मुक्तीच्या आड असणाऱ्या वस्तु आहेत. यांचा नाश करणें हें प्रत्येक जीवाचें कर्तव्य आहे.॥ १५॥

## मंत्र सोळावा.

**अन्वय व अर्थ—शतं च एका हृदयस्य नाड्यः** (अंतःकरणांत १०१ नाड्या आहेत.) **तासां एका मूर्धानं अभिनिःसृता** (त्याच्यापैकीं एक नाडी मूर्ध्याला–मस्तकाला–भेदून बाहेर निघते) **तया ऊर्ध्वं आयन् अमृतत्वं एति** (तिच्या सहायानें ऊर्ध्व जाणारा मुमुक्षु अमृतत्वाला जाऊन पोहोंचतो.) **अन्याः विष्वक् उत्क्रमणे** (**भवन्ति** दुसऱ्या नाड्या जन्ममरणाची स्थिति उत्पन्न करणाऱ्या असतात म्हणून ह्या अन्य नाड्यांच्या द्वारा बाहेर जाणारा जीव जन्ममरणाच्या चक्रांत सांपडतो,)

आपल्या शरीरभर १०१ नाड्यांचें जाळें पसरलेलें आहे. यांचा उगम हृदयांत असून त्या निरनिराळ्या द्वारांनीं बाहेर पडतात, त्यापैकीं जी नाडी मस्तकभेद करून बाहेर जाते तिला सुषुम्ना असें म्हणतात. ही ब्रह्मरंध्रांतून बाहेर जाते. हिच्या मार्गानें जीव शरीराच्या बाहेर पडला असतां तो अमर होतो, असा वैदिक सिद्धांत आहे. इतर नाडींच्या द्वारें जीव बाहेर पडला तर तो जन्ममरणाच्या अधीन होतो.

## मंत्र सतरावा.

**अन्वय व अर्थ—सदा जनानां हृदये सन्निविष्टः पुरुषः अंतरात्मा अंगुष्ठमात्रः** (जीवाच्या हृदयांत प्रवेश करून तेथें सदैव राहणारा पुरुष म्हणजे अंतरात्मा होय. हा मनुष्याच्या अंगठ्यायेवढा आहे.) **मुञ्जात् इषिकां इव धैर्येण तं स्वात् शरीरात् प्रवृहेत्** (मुंज नामक तृणांतून तृणदंड कौशल्यानें बाहेर काढितात त्याप्रमाणें आत्मारामाला स्वशरीरापासून धैर्यानें व कौशल्यानें वेगळा करून बाहेर काढावा.) **तं शुक्रं अमृतं विद्यात्** (हा आत्माराम स्वच्छ–निरुपाधिक व अमृत–अविकारी–आहे. आत्माराम उपाधिशून्य आणि निर्विकारी आहे.)

तात्पर्य, आपल्या हृदयांत राहणाऱ्या अंगुष्ठाकाराच्या आत्मारामाला आपल्या शरीरापासून वेगळा करावा. हा अंतरात्मा शरीरास पूर्णत्व देणारा आहे, म्हणून त्याला पुरुष असें म्हणतात. शरीरापासून आत्मारामाला वेगळा करण्याला धैर्य आणि कौशल्य अथवा ज्ञान आणि वैराग्य अवश्य आहेत. आपला प्रत्यगात्मा शुद्ध आणि एकरस आहे हें मागें आपण ठरविलें आहे. ॥ १७ ॥

---

## मंत्र अठरावा.

**अन्वय व अर्थ—मृत्युप्रोक्तां एतां विद्यां योगविधिं च कृत्स्नं लब्ध्वा अथ नचिकेताः ब्रह्मप्राप्तः, विरजः, विमृत्युः अभूत्** (याप्रमाणें मृत्यूनें सांगितलेली ही विद्या व सर्व योगविधि प्राप्त करून घेतल्यानंतर नाचिकेत ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान–विज्ञान प्राप्त करून घेता झाला. तो निर्मल म्हणजे अज्ञानशून्य आणि वासनाशून्य होऊन विमृत्यु म्हणजे अमर अथवा मुक्त झाला.) **एवं वित् अन्यः अपि ब्रह्म एव** (जो कोणी अन्य नचिकेत्यासारखें ज्ञान करून घेईल तोही अध्यात्मप्राप्ति करून घेईल.) ॥ १८ ॥

या मंत्रांत फलश्रुति सांगितली आहे. सतराव्या मंत्रांत ब्रह्मोपदेश संपून या शेवटच्या मंत्रांत ज्ञानविज्ञान झालेल्या नाचिकेत्याला ब्रह्मप्राप्ति झाली हें फल सांगितलें आहे. या उपनिषदांत सांगितलेली विद्या व सकल योगविधि समजन घेऊन जो मुमुक्षु या विद्येचें ध्यान–भजन शुद्ध चित्तानें करील त्यालाही ब्रह्मज्ञान विज्ञान होऊन निरुपाधिक मुक्ति मिळेल, असें श्रुतीनें आपल्या अधिकारी वाणीनें सांगितलें आहे. या विवरणांत ज्या प्रश्नांचा विशेष विचार झाला नाहीं त्याचा विशेष विचार उपसंहारांत करूं असें सांगून शान्तिपाठपूर्वक हें विवेचन येथें संपवितों. ॥ १८ ॥

शान्तिः शान्तिः शान्तिः

**कठोपनिषद् समाप्त.**

ॐ

# प्रश्नोपनिषत्

चिंतामण गंगाधर भानु
कृत

महाराष्ट्र विवरणम्

# प्रश्नोपनिषत्.

## संपादकाचें विवरण.

ॐ तत्सद्ब्रह्मणे नमः

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः ।
भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवाꣳसस्तनूभिः ।
व्यशेम देवहितं यदायुः ॥

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।

अन्वय व अर्थ—देवाः कर्णेभिः भद्रं शृणुयाम ( हे देवहो, आम्हांला आमच्या कानांनीं मंगलशब्द ऐकूं द्या ) यजत्राः अक्षभिः भद्रं पश्येम ( हे याज्ञिकहो, आम्हांला डोळ्यांनीं मंगल बघूं द्या ) स्थिरैः अङ्गैः तनूभिः तुष्टुवांसः ( आमच्या स्थिर अवयवाच्या शरीरांनीं आम्हीं स्तुति करणारे आहों. ) यत् आयुः देवहितं व्यशेम ( जोंपर्यंत आम्हांस आयुष्य आहे तोंपर्यंत आम्हीं देवहितच करीत राहूं. )

सारांश आपल्या हातून सर्वदा मंगल गोष्टी होऊं देण्याविषयीं परमेश्वराची प्रार्थना या शान्तिपाठांत केली आहे.

शान्तिः शान्तिः शान्तिः

---

### मंत्र पहिला.

ॐ सुकेशा च भारद्वाजः शैव्यश्च सत्यकामः सौर्यायणी च गार्ग्यः कौसल्यश्चाऽऽश्वलायनो भार्गवो वैदर्भिः कबन्धी कात्यायनस्ते हैते ब्रह्मपरा ब्रह्मनिष्ठाः परं ब्रह्मान्वेषमाणा एष ह वै तत्सर्वं

**वक्ष्यतीति ते ह समित्पाणयो भगवन्तं पिप्पलाद-मुपसन्नाः ॥ १ ॥**

**अन्वय व अर्थ—भारद्वाजः सुकेशा च शैब्यः सत्यकामः च सौर्यायणी गार्ग्यः च आश्वलायनः कौसल्यः च वैदर्भिः भार्गवः च कात्यायनः कबन्धी ह एते ब्रह्मपराः ब्रह्मनिष्ठाः परं ब्रह्म अन्वेषमाणाः समित्पाणयः भगवन्तं पिप्पलादं—उपसन्नाः** (भरद्वाज कुलांतील सुकेशा, शिबीचा पुत्र सत्यकाम, सूर्याचा नातू गार्ग्यनामक सौर्यायणी, अश्वलाच्या कुलांतील कौसल्य, विदर्भ देशांतील भार्गव, आणि कात्यायन कुलांतील कबंधी हे सर्व सहाजण वेदपरायण आणि वेदनिष्ठ ब्राह्मण होते. आपल्यास परब्रह्माचें स्वरूप समजावें अशी इच्छा धरून ते त्या परब्रह्माचा शोध करीत हिंडत होते. नंतर ते हातांत समिधा घेऊन सुप्रसिद्ध पिप्पलाद नांवाच्या आचार्याकडे आले). **एषः ह वै तत्सर्वं वक्ष्यति इति** (कारण परब्रह्माचें सत्स्वरूप पिप्पलाचार्य मुनि सांगण्यास समर्थ आणि उत्सुक आहेत असें त्यांस समजलें होतें.) ॥ १ ॥

सुकेशादि सहा विद्यार्थ्यांनीं वेदाचें यथासांग आणि यथाविधि अध्ययन केलें होतें. अध्ययन संपूर्ण झाल्यावर त्यांस अशी इच्छा झाली कीं, आपण परब्रह्माचें स्वरूप समजून घ्यावें. नंतर ते सर्वजण सुप्रसिद्ध व ब्रह्मनिष्ठ पिप्पलादाचार्यांस शरण गेले आणि त्यांनीं ब्रह्मज्ञानाविषयींची आपली इच्छा प्रकट केली. जातांना ते हातांत समिधा घेऊन गेले होते. समिधा घेऊन जाणें हें एक उपलक्षण आहे. देवतांचें, गुरूचें अथवा राजाचें दर्शन रिक्त हस्तानें घेऊं नये, कांहींतरी घेऊन जावें, असा पूर्वकालीन संप्रदाय असे. मंत्रांत सांगितलेली मंडळी दरिद्री होती म्हणून त्यानीं भेट म्हणून समिधा आणिल्या होत्या. समिधांचा उपयोग यज्ञकर्मांत होत असे, तसेंच दंतधावन करण्यामधेंही त्यांचा उपयोग करीत असत. समिधा घेऊन जाणें हें वैराग्यचिन्हही आहे. असो; ज्या कुलांत किंवा ज्या गोत्रांत पुरुष उत्पन्न झाला असेल त्या कुलाच्या नावांसह पुरुषाच्या नांवाचा पूर्वीही उल्लेख होत असे. हल्लीं गोत्रनाम मागें पडून आडनांव उत्पन्न झालें आहे. हें आडनांव गांवावरून, हुद्यावरून किंवा एखाद्या विशेष गुणावरून ठरत असतें, हें सुप्रसिद्ध आहे.

वेदाध्ययन सांगोपांग झाल्यावर उपनिषदांचा (ब्रह्मविद्येचा) अभ्यास करावयाचा ही पूर्व पद्धति होती. ॥ १ ॥

## मंत्र दुसरा.

**तान्ह स ऋषिरुवाच भूय एव तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया संवत्सरं संवत्स्यथ यथाकामं प्रश्नान्पृच्छत यदि विज्ञास्यामः सर्वं ह वो वक्ष्याम इति॥२॥**

**अन्वय व अर्थ**—सः ऋषिः तान् उवाच ह ( पिप्पलाद ऋषि या विद्यार्थ्यांस म्हणाले, ) भूयः एव तपसा, ब्रह्मचर्येण, श्रद्धया, संवत्सरं संवत्स्यथ, यथाकामं प्रश्नान् पृच्छत; यदि विज्ञास्यामः सर्वं वः वक्ष्यामः इति ह ( पुनः तुम्ही श्रद्धापूर्वक एक वर्षपर्यंत ब्रह्मचारी व्रतांत राहून तपश्चर्या करित रहा. नंतर तुमच्या इच्छेप्रमाणें तुम्हीं मला प्रश्न विचारा आणि मला जें काय ठाऊक आहे तें सर्व त्यावेळीं मी तुम्हांस सांगेन.) ॥ २ ॥

वेदांचें सांगोपांग अध्ययन झाल्यावर ब्रह्मज्ञ गुरूला शरण जावें, त्याची सेवा करावी, त्यांच्या आज्ञेप्रमाणें कांहीं काल एक-निष्ठ ब्रह्मचर्यामध्यें घालवावा, तपश्चर्या करावी, आणि सदैव आस्तिक्य बुद्धि असावी, हे नियम पूर्व कालीं शिष्यांस पाळावे लागत असत. विद्यार्थ्याला वेदाविषयीं पूर्ण श्रद्धा, कडकडित ब्रह्मचर्य, एकनिष्ठेनें विचार करण्याचें सामर्थ्य व शीतोष्णादि सहन करण्याचें बल, इत्यादि गुण पूर्व कालीं जसे अवश्य होते तसे आज मितीलाही आहेत. ज्या शास्त्राचा आपण अभ्यास करणार व जें शास्त्र समजून घेणार त्याविषयीं आपली आदर बुद्धि प्रखर असली पाहिजे. अभ्यास करतांना विचार करण्याचें सामर्थ्य वृद्धिंगत होत जाण्याइतकें देहाचें संरक्षण करावयाचें, अशा प्रकारचे नियम विद्यार्थ्यांनें अवश्य पाळले पाहिजेत. हेंच ब्रह्मचर्य व्रत होय. पूर्वी ब्रह्मचर्याचे नियम किती कडक असत, याचा प्रत्यय भारत भागवतादिकांच्या परिशीलनानें सहज येणार आहे. असो. पिप्पलाद मुनींनीं विद्यार्थ्यांची जिज्ञासा किती उत्कट आहे हें पाहण्यासाठीं त्यांस तपश्चर्या करावयास सांगितलें आणि शेवटीं विनयानें असें म्हटलें कीं, मला जें काय येत असेल त्याप्रमाणें मी तुमच्या सर्व प्रश्नाचीं उत्तरें देईन. हा शुद्ध विनय आहे. असो; विद्येनें मनुष्य विनीत अथवा मर्यादशील होतो, असा पूर्वीचा व हल्लींचा अनुभव आहे. ॥ २ ॥

---

## मंत्र तिसरा.

**अथ कबन्धी कात्यायन उपेत्य पप्रच्छ ।**
**भगवन्कुतो ह वा इमाः प्रजाः प्रजायन्त इति ॥३॥**

**अन्वय व अर्थ—अथ कात्यायनः कबन्धी उपेत्य पप्रच्छ** ( नंतर—एकवर्ष झाल्यानंतर—कबन्धी कात्यायन आचार्यांच्या जवळ जाऊन नम्रपणानें विचारता झाला ) **भगवन् कुतः ह वै इमाः प्रजाः प्रजायन्ते इति** ( भगवन्, या सर्व प्रजा कोठून व कशा उत्पन्न होतात, हें मला समजत नाहीं. कृपा करून आपण या प्रश्नाचें उत्तर सांगावें. ) ॥ ३ ॥

कबंधीचा प्रश्न परब्रह्मासंबंधी नाहीं, हें वाचकांस सहज समजण्यासारखें आहे. वेदविहित कर्मानें व सामान्यतः दृश्य सृष्टीच्या ज्ञानानें काय फल प्राप्त होतें हें कबंधीला प्रमुखत्वानें विचारावयाचें आहे. सारांश अपरविद्या ( कमी श्रेष्ठ असणारी विद्या ) व तद्विहित कर्म यांचें फल काय होतें, हें कबंधीस विचारून घ्यावयाचें आहे. हें विचारण्याचा इत्यर्थ इतकाच आहे कीं पराविद्येला ( ब्रह्मविद्येला ) अवश्य असणारें जें वैराग्य तें अपरविद्येच्या ज्ञानानें अथवा तद्विहित कर्मानें किंवा या उभयतांच्या समुच्चयानें प्राप्त व्हावें. अपरविद्या व तद्विहित कर्म हीं उभयतांही सांग संपादन केलीं तरच दृश्य सृष्टीची विफलता पूर्णत्वानें समजून येते आणि व्यवहारांतील ज्ञानाविषयीं, त्याच्या स्थैर्याविषयीं व व्यवहाराच्या सुखदुःखाविषयीं विराग उत्पन्न होऊन सच्चिदानंदप्राप्तीविषयीं उत्कट अनुराग प्राप्त होतो.

याप्रमाणें वेदाचें अध्ययन, व्यावहारिक शास्त्रांचें अध्ययन, कर्म फलाचें ज्ञान, उपासना, इत्यादि गोष्टी संपादित झाल्या तरच जीवाला ब्रह्मविद्येचा अधिकार प्राप्त होतो. हा पूर्वीचा नियम ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. दृश्यसृष्टीचा ज्ञानपूर्वक अनुभव घेऊन तिच्याविषयीं उत्कट वैराग्य प्राप्त झाल्याशिवाय ब्रह्मविद्येमध्यें प्रवेश करणें हें अनर्थमूलक आहे, असा पूर्वकालीन समज होता. असो; कबंधीचा प्रश्न वैराग्य उत्पन्न करण्याविषयींचा आहे, इतकें ध्यानांत राहिलें म्हणजे काम झालें. ॥ ३ ॥

---

## मंत्र चवथा.

**तस्मै स होवाच प्रजाकामो वै प्रजापतिः स तपोऽतप्यत । स तपस्तप्त्वा स मिथुनमुत्पादयते । रयिं च प्राणं चेत्येतौ मे बहुधा प्रजाः करिष्यत इति ॥ ४ ॥**

**अन्वय व अर्थ—तस्मै सः उवाच ह** ( पिप्पलाद मुनींनीं कबंधीला उत्तर दिलें तें असें—) **प्रजापतिः वै प्रजाकामः; सः तपः अतप्यत; सः**

तपः तप्त्वा; सः मिथुनं उत्पादयते; रयिं च प्राणं च इति; एतौ मे बहुधा प्रजाः करिष्यतः इति ( प्रजा उत्पन्न करावी अशी एकदां हिरण्यगर्भ नामक प्रजापतीला इच्छा उत्पन्न झाली. त्यानें पुष्कळ तप केलें; म्हणजे कार्यकारणांचा समग्र विचार केला. हा विचार केल्यानंतर त्यानें एक मिथुन उत्पन्न केलें. तें मिथुन म्हणजे रयि–अन्न–आणि प्राण हें होय. हें मिथुन उत्पन्न करण्यांत त्याचा हेतु असा होता कीं यांच्या द्वारानें अनेक प्रकारची प्रजा उत्पन्न होईल. )

कबंधीच्या प्रश्नास पिप्पलादांनीं हें उत्तर दिलें आहेः प्रजापति म्हणजे सर्व जीवांचा आत्मा होय, त्यांचें संरक्षण करणाराही हाच आहे. म्हणून याला चराचराचा पति असें म्हणतात. या प्रजापतीनें, हिरण्यगर्भानें, पूर्व कल्पांतील कार्य–कारणांचा विचार केला आणि अन्न व प्राण असें एक मिथुन उत्पन्न केलें. अन्न म्हणजे उपभोग्य पदार्थ होत. आपल्यास जी जड सृष्टि दिसते तिचा अंतर्भाव अन्नांत होतो. ही सृष्टि उपभोग्य आहे. इच्यामध्यें स्वतःचें कर्तृत्व अथवा कर्तृत्वाचा आभासही नाहीं. पण प्राण हा चरात्मक ( जीवात्मक ) असून तो जड सृष्टीचा उपभोक्ता असतो. हा कर्तृत्ववान् आहे. निदान आपण कर्ते आहोंत असा आभास तरी त्याला आहे. याप्रमाणें उपभोग्य वस्तु आणि उपभोक्ता, कार्य करण्याचें उपादान कारण आणि कर्म–कर्ता अथवा कार्याचें निमित्त कारण, अशी ही द्वयी उत्पन्न झाली. अलीकडच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे प्रजापतीनें प्रथमतः Matter आणि Force हीं दोन मूलद्रव्यें उत्पन्न केलीं. या दोहोंच्या साहाय्यानें ही अनेकविध सृष्टि उत्पन्न झाली आहे. ॥ ४ ॥

---

## मंत्र पांचवा.

**आदित्यो ह वै प्राणो रयिरेव चन्द्रमा रयिर्वा**
**एतत्सर्वं यन्मूर्तं चामूर्तं च तस्मान्मूर्तिरेव रयिः ॥५॥**

अन्वय व अर्थ—आदित्यः ह वै प्राणः, चन्द्रमाः रयिः एव, ( आदित्य हा प्राण आहे आणि चन्द्र हा रयि म्हणजे अन्न आहे. ) एतत् सर्वं–यत् मूर्तं च अमूर्तं च–रयिः वै ( जें कांहीं मूर्त आणि अमूर्त आहे तें सर्व रयि आहे. ) तस्मात् मूर्तिः रयिः एव ( म्हणून जी जी म्हणून मूर्त वस्तू आहे ती सर्व रयीमध्यें अंतर्भूत होते. )

मागच्या मंत्रांत सांगितल्याप्रमाणें प्राण आणि रयि यांची उत्पत्ति झाली म्हणजे प्रथमतः सूर्य आणि चंद्र यांची उत्पत्ति प्रजापतीनें केली. सूर्य हा प्राणाचा

निधि आहे. सूर्यापासून सर्व सामर्थ्यांची उत्पत्ति होते. चंद्र हा रयीचा म्हणजे अन्नाचा प्रतिनिधि आहे. चंद्र म्हणजे सोम आणि सोम हें द्रव्य अन्नाचें संग्राहक आहे, असा वेदकालीन समज होता. सूर्यचंद्रांची उत्पत्तिकथा सांगितल्यावर पिप्पलाद मुनींनीं सर्व सिद्धांतांचा संग्रह करणारें एक विधान केलें आहे. तें असें: या विश्वांत जी जी म्हणून मूर्त किंवा अमूर्त वस्तु दिसते किंवा भासते, इंद्रियगोचर होते, किंवा कल्पनागोचर होते, ती ती प्रत्येक वस्तु अन्नरूपीच आहे. उत्पन्न झालेली अशी कोणतीही मूर्त किंवा अमूर्त वस्तू नाहीं कीं, जिचा भोक्ता या विश्वांत विद्यमान असत नाहीं. वायूसारख्या अमूर्त वस्तूचे ही भोक्ते हिरण्यगर्भानें निर्माण केले आहेत. सारांश सर्व उत्पन्न झालेल्या वस्तु उपभोग्य आहेत. अर्थात् ज्या मूर्त वस्तु आहेत त्या सर्व उपभोग्य आहेत हें सांगावयास नकोच आहे.

या मंत्रावरून असें स्पष्ट होतें कीं जड आणि साकार वस्तु ह्या तर उपभोग्य आहेतच; पण आकार नसणाऱ्या वस्तु सुद्धां उपभोग्य आहेत. सारांश सर्व उत्पन्न झालेल्या अथवा प्रजापतीनें उत्पन्न केलेल्या वस्तु उपभोग्य आहेत. म्हणजे परतंत्र आहेत अथवा नश्वर आहेत. हें समजलें असतां जीवाची प्रवृत्ति या उपभोग्य वस्तूकडे न होतां केवळ चिद्घन जो स्वतंत्र आत्माराम त्याकडे मात्र व्हावी.

सूर्य हा सर्व सामर्थ्याचें आदिस्थान आहे, ही गोष्ट आधुनिक-शास्त्र-सिद्धांतांनीं ही सिद्ध झाली आहे. गवताच्या कार्डीतील चलनवलनापासून तो मोठमोठ्या भूकंपासारख्या प्रसंगापर्यंतच्या अथवा ग्रहादिकांच्या परिभ्रमणापर्यंतच्या सर्व गति सूर्यापासून उत्पन्न होतात. उष्णता, शब्द, प्रकाश, चुंबकत्व ( Heat, Sound, Light, Magnetism ) इत्यादि सर्व गतींचा उत्पादक एक सूर्य मात्र आहे ही कल्पना वेदकालीन शास्त्र्यांप्रमाणें अलीकडील आधुनिक शास्त्र्यांसही मान्य झाली आहे. याचप्रमाणें चंद्र हा परतंत्र व परप्रकाश्य असून जड आहे; या वेदकालीन सिद्धांताला अलीकडील शास्त्रांनीही दुजोरा दिला आहे. म्हणून मंत्रामध्यें सूर्याला प्राणाचें प्रतिनिधित्व आणि चंद्राला अन्नाचें प्रतिनिधित्व दिलें आहे. प्राण आणि अन्न मिळून जें मिथुन होतें तें सर्वदां एकत्र अथवा सहचारी असतें. प्राणाशिवाय अन्न विद्यमान असणें शक्य नाहीं. व अन्नाशिवाय प्राणालाही दुसरी कोणती गति नाहीं. म्हणून अन्न व प्राण यांस मिथुन ( मेहूण ) ही संज्ञा प्राप्त झाली आहे. तसेंच सापेक्ष दृष्टीनें पाहतां प्रत्येक वस्तु अन्नांत अंतर्भूत होते. व निरपेक्ष दृष्टीनें पाहिलें असतां मूर्त वस्तुही अन्नमयच असते. ॥ ५ ॥

## मंत्र सहावा.

**अथाऽऽदित्य उदयन्यत्प्राचीं दिशं प्रविशति तेन प्राच्यान्प्राणान्रश्मिषु संनिधत्ते । यदक्षिणां यत्प्रतीचीं यदुदीचीं यदधो यदूर्ध्वं यदन्तरा दिशो यत्सर्वं प्रकाशयति तेन सर्वान्प्राणान्रश्मिषु संनिधत्ते ॥ ६ ॥**

अन्वय व अर्थ—अथ आदित्यः उदयन् प्राचीं दिशं प्रविशति ( आदित्य म्हणजे सूर्य उगवल्यानंतर पूर्व दिशेमध्यें प्रवेश करितो. ) तेन रश्मिषु प्राच्यान् प्राणान् संनिधत्ते ( आणि आपल्या उगवण्यानें आपल्या तेजोयुक्त किरणांत पूर्वेकडील प्राणांस अंतर्भूत करितो. ) यत् दक्षिणाम्, यत् प्रतीचीं, यत् उदीचीं, यत् अधः, यत् ऊर्ध्वं, यत् अंतरा दिशः यत् सर्वं प्रकाशयति, तेन रश्मिषु सर्वान् प्राणान् संनिधत्ते ( आणि दक्षिण, पश्चिम, उत्तर, अधोदिशा, ऊर्ध्वदिशा, अवांतरदिशा आणि बाकीच्या सर्व वस्तु ज्या पद्धतीनें तो प्रकाशित करितो त्याच पद्धतीनें आपल्या सर्व–व्यापी व सर्व–प्रकाशक किरणांमध्यें सर्व प्राणांस अंतर्भूत करून स्वस्वरूपी करितो. )

मागच्या मंत्रांत यच्चयावत् सर्व मूर्त आणि अमूर्त वस्तु अन्नरूप असून सर्वात्मक आहेत आणि त्यांचा स्वामी प्रजापति आहे असें सांगितलें आहे. ह्या मंत्रांत प्रजापतीच्या अपेक्षेनें सर्व प्राण ही सर्वात्मक आहेत, सर्वत्र प्राणद्रव्य ओतप्रोत भरलें आहे, सर्व चैतन्यमय आहे, असें सांगावयाचें आहे. सर्व प्राणांस प्रकाशित करणारा सूर्य उगवला म्हणजे दाही दिशा व तत्रस्थ प्राण प्रकाशित होतात. सर्व वस्तूंस त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें चैतन्य प्राप्त होतें. कांहीं दगडासारख्या वस्तु वाहेरून वाढणाऱ्या, वृक्षासारख्या आंतून वाढणाऱ्या वस्तु पशुपक्ष्यादि चलन वलन करणारे प्राणी, मन, बुद्धि, आणि इच्छा असणारे ह्या लोकींचे मनुष्यप्राणी ह्या सर्वांमध्यें जी चेतना आणि जें चैतन्य प्रकट होतें तें सर्व सूर्याच्या प्रसादामुळें होय. असा कोणताही मूर्त अथवा अमूर्त पदार्थ नाहीं कीं, जो सूर्याच्या प्रकाशानें व सूर्यगत चैतन्यानें प्रकाशित होत नाहीं, स्वस्थितींत राहत नाहीं आणि चैतन्ययुक्त असत नाहीं. यावरून हें स्पष्ट होईल कीं या दृश्य विश्वामध्यें सर्वत्र रयि म्हणजे अन्न म्हणजे भोग्य वस्तु ( Matter )असून तेथेंच प्राण, म्हणजे चेतना, म्हणजे उपभोक्ता, ( Force ) विद्यमान असतो. सर्व वस्तु अन्नमय आहेत व त्याच वस्तु प्राणमयही आहेत. प्रो. हक्सले यांनीं आपल्या जगन्मान्य ग्रंथांत प्राणाचें अस्तित्व अनुमानिलें आहे व आर्यस्थानां-

तील प्रो. बोस यांनीं जडवस्तुही विश्रांतीची इच्छा करितात, असें सप्रमाण सिद्ध केलें आहे. ह्या गोष्टी तज्ज्ञांस विदित आहेत. या सिद्धांताचा मूळ आदर्श प्रश्नोपनिषदांत सांपडतो, असें आपल्यास ज्ञात झालें तर आपल्यास केवढा सकौतुक आनंद व अभिमान होईल बरें ? ॥ ६ ॥

---

## मंत्र सातवा.

**स एष वैश्वानरो विश्वरूपः प्राणोऽग्निरुदयते । तदेतदृचाऽभ्युक्तम् ॥ ७ ॥**

अन्वय व अर्थ—सः एषः वैश्वानरः विश्वरूपः प्राणः अग्निः उदयते ( तो हा वैश्वानर—सर्वांचा आत्मा,—विश्वरूपाचा आत्मा, जो प्राण तो अग्नि उदय पावतो. ) तत् एतत् ऋचा अभ्युक्तम् ( आम्हीं सांगितलेलें हें तत्त्व ऋग्वेदांतील एका मंत्रानें उत्तमोत्तम वर्णिलें आहे. ) ॥ ७ ॥

तो हा सूर्यरूपी प्राण म्हणजे सर्व जीवांचा आत्मा आहे. त्याप्रमाणेंच तो प्राण सर्व प्रपंचात्मक आहे. जीवमात्रांचें चैतन्य आणि जड वस्तूंमध्यें दृश्य होणारी चेतना हीं सर्व अग्निरूप अथवा सूर्यरूप आहेत. मागच्या मंत्रांत प्राणाचें जें सर्वात्मकत्व सांगितलें त्याचाच अनुवाद या मंत्रांत करून जीवांचें चैतन्य व जडांत दृश्य होणारी चेतना ही प्राणात्मक अथवा सूर्यात्मक आहे असें स्पष्ट करून सांगितलें आहे. हें या सहा आणि सात मंत्रांत प्रकट झालेलें प्राणतत्त्व सर्वनियामक व सर्ववंद्य जो सूर्य तदात्मक आहे असें पुढील ऋग्वेदोक्त मंत्रानें समर्थित केलें आहे. ॥ ७ ॥

---

## मंत्र आठवा.

**विश्वरूपं हरिणं जातवेदसं परायणं ज्योतिरेकं तपन्तम् । सहस्ररश्मिः शतधा वर्तमानः प्राणः प्रजानामुदयत्येष सूर्यः ॥ ८ ॥**

अन्वय व अर्थ—विश्वरूपं, हरिणं, जातवेदसं, परायणं, ज्योतिः एकं तपन्तम् ( हें सर्वरूपी, प्रकाशवंत, सर्वज्ञ, सर्वाधार, तेजोद्रव्य अद्वितीय असून सर्वांस उष्णता देणारें आहे. ) सहस्ररश्मिः शतधा वर्तमानः प्रजानाम् प्राणः, एषः सूर्यः उदयति ( हजारों किरण असणारा व

हजारों स्वरूपानें असणारा, तसेंच सर्व प्रजांचा प्राण असणारा जो हा सूर्य हा आतां उगवत आहे.) ॥ ८ ॥

या ऋग्वेदोक्त मंत्रांत सूर्यस्वरूपाचें उत्कृष्ट वर्णन आहे. सूर्य हा एकच एक असून तो सर्वप्रकाशक, सर्वज्ञ, सर्वाधार, स्वयंप्रकाश आणि सर्वांस उष्णता देणारा असा आहे. त्याला अनंत किरण आहेत. वस्तुस्वरूपानुरूप तो अनेक स्वरूपें धारण करितो व करवितो. आणि हा सूर्य सर्व प्रजांचे प्राणांचा संग्राहक आहे. या मंत्रांरून असें स्पष्ट होतें कीं, प्राणरूपी तत्त्व एकच असून तें पदार्थांची गति व स्थिति नियमित करितें. तें स्वयंप्रकाश आणि सर्वप्रकाशक आहे. पदार्थांच्या गतिस्थितीचें तें कारण असून प्राण्यांचें बुद्धिवैभव वृद्धिंगत करणारें हेंच तत्त्व आहे. जीवांचा प्राण म्हणजे सूर्यच होय. उपाधींनीं त्याचें स्वरूप भिन्न होतें. म्हणून विश्वांत अनंत प्राणी व अनंत वस्तु आहेत असें आपल्यास दिसतें, इतकेंच! सारांश, सर्व वस्तु प्राणद्रव्यानें ओतप्रोत भरलेल्या आहेत. ॥ ८ ॥

---

## मंत्र नववा.

**संवत्सरो वै प्रजापतिस्तस्यायने दक्षिणं चोत्तरं च । तद्ये ह वै तदिष्टापूर्ते कृतमित्युपासते । ते चान्द्रमसमेव लोकमभिजयन्ते । त एव पुनरावर्तन्ते तस्मादेत ऋषयः प्रजाकामा दक्षिणं प्रतिपद्यन्ते । एष ह वै रयिर्यः पितृयाणः ॥ ९ ॥**

अन्वय व अर्थ—**संवत्सरः वै प्रजापतिः** ( संवत्सर—वर्ष—हा प्रजापतीचें स्वरूप आहे. ) **तस्य दक्षिणं च उत्तरं च अयने** ( त्याचीं दक्षिण आणि उत्तर अशीं दोन अयनें आहेत.) **तत् ये ह वै तत् इष्टापूर्ते 'कृतं' इति उपासते, ते चांद्रमसं एव लोकं अभिजयन्ते** (जे कोणी इष्टापूर्त करून व तीं कृत्यें आपलीं आहेत अशी भावना करून त्यांची उपासना करितात ते कर्माभिमानी लोक चंद्रलोकाला जातात.) **ते एव पुनः आवर्तन्ते** ( त्या ह्या चंद्रलोकांत गेलेल्या पुरुषांनाच पुनः परत यावें लागतें.) **तस्मात् एते ऋषयः प्रजाकामाः दक्षिणं प्रतिपद्यन्ते** ( म्हणून हे ऋषि प्रजा उत्पन्न करण्याची इच्छा करितात. आणि दक्षिण दिशेचा जो स्वामी चंद्र त्याच्या लोकांस जातात. ) **एष ह वै रयिः यः पितृयाणः** ( हा जो पितृयाण मार्ग आहे तो अन्नरूप आहे. ) ॥ ९ ॥

चौथ्यापासून आठव्या मंत्रासुद्धां सर्व मंत्रांत प्रजापतीचें स्वरूप वर्णन करून त्यानें प्राण आणि अन्न यांचें एक मिथुन उत्पन्न केलें, सर्व पदार्थ अन्नमय व प्राणमय करून आपण त्यांचा स्वामी झाला. सर्व पदार्थ अन्नरूप व तेच प्राणरूप होतील, असें करून आपण त्यांचा नियामक झाला असें सांगितलें, या मंत्रांत संवत्सर (एक वर्षाच्या कालाला संवत्सर म्हणतात) हें प्रजापतीचें स्वरूप आहे, असें ठरवून संवत्सराचें स्वरूप, त्याचे विभाग आणि या विभागांतील एकाचें म्हणजे दक्षिणायनाचें वर्णन केलें आहे. प्रजापति हाच कालाचा उत्पादक आहे म्हणून संवत्सरालाही प्रजापतित्व प्राप्त झालें आहे. संवत्सर हा प्रजापतीप्रमाणेंच एक मिथुन उत्पन्न करितो. आणि तें मिथुन प्राणान्नात्मक आहे म्हणून संवत्सराला प्रजापति हें नांव उत्तम शोभतें. दक्षिणायन आणि उत्तरायण हें संवत्सरानें उत्पन्न केलेलें प्राणान्नात्मक मिथुन होय. सूर्य दक्षिणदिशेनें प्रवास करूं लागला म्हणजे दक्षिणायनास सुरवात होते. सूर्याचा प्रवास सहा महिनेपर्यंत दक्षिणदिशेनें चालतो म्हणून या कालाला दक्षिणायन म्हणतात. या महिन्यांत जे कोणी लोक इष्टापूर्तादि कर्में करून दक्षिणायनाची उपासना—फलप्राप्तीची इच्छा करून—करितात. ते लोक चंद्रलोकास जातात. चंद्राला क्षयवृद्धि आहे, ही गोष्ट सर्वप्रसिद्ध आहे. शिवाय चन्द्र म्हणजे अन्न अथवा उपभोग्य वस्तु असते, असें आपण आतांच समजून घेतलें आहे. अर्थात् जे लोक फलभोगाच्या आशेनें इष्टापूर्तादि कर्में करितात, त्या लोकांस भोगप्राप्ति करून देणारा लोक अधिगत होतो. आणि भोग देणारें पुण्यकर्म संपल्याबरोबर या लोकांस मृत्युलोकीं परत यावें लागतें. तात्पर्य, जे लोक भोगप्राप्तीची—धनपुत्र—दारादिकांची—इच्छा करून इष्टापूर्तादि भोगदायी कर्में करितात, ते लोक अन्नद्रव्याचा प्रतिनिधि जो चंद्र त्याच्या लोकांत जाऊन कृतकर्माच्या फलाचा उपभोग घेतात. आणि कर्मफल संपलें म्हणजे पुनः मृत्युलोकीं परत येतात. चंद्रलोकीं नेणारा जो मार्ग त्याला पितृयाण असें म्हणतात. फलाच्या इच्छेनें अग्निहोत्र चालविणें, तप करणें सत्य बोलणें वेदविहित दान धर्म करणें, आतिथ्य वैश्वदेवादि वेदोक्त कर्में करणें, याला इष्ट असें म्हणतात. वापी कूप तडाग देवालयें धर्मशाळा बांधणें व अन्नछत्रें घालणें या कृत्यास पूर्त असें म्हणतात. हीं इष्टपूर्तादि कर्में फलाच्या आशेनें व कर्तृत्वाच्या अभिमानानें केली म्हणजे पितृलोकाची प्राप्ति होते. हाच चंद्र लोक होय. अन्नरूपानें येथें आपल्या पुण्याचा व्यय होतो म्हणून पितृयाणाला (चंद्रलोकाला) अन्न लोक असें म्हणतात. ॥ ९ ॥

---

## मंत्र दहावा.

**अथोत्तरेण तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया विद्ययाऽऽत्मानमन्विष्याऽऽदित्यमभिजयन्ते । एतद्वै प्राणानामायतनमेतदमृतमभयमेतत्परायणमेतस्मान्न पुनरावर्तन्त इत्येष निरोधस्तदेष श्लोकः ॥ १० ॥**

अन्वय व अर्थ—**अथ उत्तरेण तपसा, ब्रह्मचर्येण, श्रद्धया, विद्यया, आत्मानं अन्विष्य आदित्यं अभिजयन्ते** ( आतां कांहीं श्रेष्ठ लोक वासनाशून्य तप, ब्रह्मचर्य, आस्तिक्य बुद्धि, गुरुविद्या यांच्या साह्यानें स्वस्वरूपाचें ज्ञान करून घेऊन उतरमार्गानें—उत्तरायणांत सूर्याची उपासना करून त्याची प्राप्ति करून घेतात. ) **एतत् वै प्राणानाम् आयतनं, एतत् अमृतं, अभयम्, एतत् परायणं** ( आदित्य हा प्राणांचें आदिपीठ आहे. हा अमरत्व व अभयत्व देणारा आहे. सूर्य हा सर्वांचा आधार व सर्वांची शेवटची गति आहे. **एतस्मात् पुनः न आवर्तन्ते** ( येथें गेलेल्या प्राण्यास पुनः परत यावें लागत नाहीं. ) **इति एषः निरोधः** ( याप्रमाणें असा हा नियमित करणारा नियम आहे. ) **तत् एषः श्लोकः** ( हें सांगण्यासाठीं पुढील मंत्रांची योजना आहे.) ॥ १० ॥

या मंत्रांत संवत्सररूपी प्रजापतीचा प्राणांश जो उत्तरायण मार्ग त्याचें उपासनफल सांगितलें आहे. येथील उपास्य देवता सूर्य म्हणजे प्राण आहे. जे कोणी ज्ञानी लोक इंद्रियजय करून तपश्चर्या करितात, ब्रह्मचर्याचे नियम पाळितात श्रद्धावंत असतात, प्रजापति स्वरूपाचें ज्ञान करून घेतात आणि आपणच प्रजापतिस्वरूप आहोंत असें जाणतात, ते लोक ज्ञानाच्या आणि कर्माच्या समुच्चयानें प्राणरूपी व उत्तरमार्गगामी आदित्याची उपासना करून सूर्यलोकाची प्राप्ति करून घेतात. मार्गे सांगितलेंच आहे कीं, सूर्य हा प्राण्यांच्या प्राणांचा मूळ आधार आहे. त्याची उपासना केली असतां जीवांच्या प्राणाला अमरत्व येतें आणि तो भीतिशून्य होतो. येथें चंद्रलोकांतील क्षय-वृद्धीची भीति असण्याचें कारण नाहीं. पूर्वोक्त ज्ञानी व कर्मी लोकांस सूर्यप्राप्ति होणें हाच त्यांचा पुरुषार्थ आहे. सूर्य लोकांत गेलें म्हणजे जीवाला कल्पपर्यंत पुनः परत यावें लागत नाहीं. हा नियम निराबाध आहे. कर्म-फलाच्या इच्छेनें वेदोक्त कर्म करणारे गृहस्थ चंद्र लोकाला जातात; पण त्यांस पुनः परत येण्याची भीति असते. पण प्राणोपासना ज्ञानपूर्वक करणारे ऋषि सूर्य लोकांत जातात आणि कल्पाच्या अंतापर्यंत तेथील सुखाचा उपभोग घेत राहतात. हा पूर्वोक्त नियम होय. संवत्सराचें स्वरूप पुढील मंत्रांत स्पष्ट केलें आहे ॥ १० ॥

## मंत्र अकरावा.

**पञ्चपादं पितरं द्वादशाकृतिं दिव आहुः परे अर्धे पुरीषिणम् । अथेमे अन्य उ परे विचक्षणं सप्तचक्रे षडर आहुरर्पितमिति ॥ ११ ॥**

**अन्वय व अर्थ—पञ्चपादं, पितरं, द्वादशाकृतिं, दिवः परे अर्धे पुरीषिणम्, आहुः** ( या संवत्सराला पांच चरण अथवा पांच ऋतु असतात. हा सर्वसंरक्षक असून याला बारा अवयव आहेत. हा अंतरिक्ष लोकाच्या पलीकडे असन याला ' पर्जन्य—वर्षक ' असें नांव आहे. ) **अथ अन्ये इमे परे उ विचक्षणं सप्तचक्रे, षडरे अर्पितं इति आहुः** ( पण दुसरे कोणी ज्योतिषी असें म्हणतात कीं हा महासाक्षी असून याच्या रथाला सात चक्रें आणि सहा अरा असतात. ) ॥ ११ ॥

या मंत्रांत संवत्सराचें स्वरूप दोन प्रकारांनीं सांगितलें आहे. पहिल्या स्वरूपांत असें म्हटलें आहे. संवत्सराला अथवा संवत्सरात्मक सूर्याला पांच पाय असतात. पूर्वकालीं एका संवत्सरांत पांच मात्र ऋतु असतात अशी कल्पना होती. हा सूर्य किंवा संवत्सर सर्वांचें जनन व संरक्षण करितो म्हणून याला 'पिता' असें म्हटलें. याला बारा अवयव आहेत हे अवयव म्हणजे वर्षाचे बारा महिने होत. सूर्य हा भुवर्लोकाच्या पलिकडे असणाऱ्या स्वर्ग लोकांत राहातो आणि स्वतः जलमय असन सर्वांचें जीवन जें उदक त्याचा वर्षाव करून सर्वांचें प्राणरक्षण करितो. हें एक स्वरूपवर्णन झालें. आतां दुसऱ्या प्रकारच्या स्वरूपवर्णनांत सूर्य किंवा संवत्सर हा सर्वसाक्षी व महाज्ञानी असून तो सात चाकाच्या व सहा अरा असणाऱ्या रथांत बसलेला आहे, असें वर्णन केलेलें आहे. पहिल्या स्वरूपप्रकारांत तो स्थिर आहे आणि दुसऱ्या प्रकारांत तो परिवर्तन करणारा म्हणजे हिंडणारा आहे असें दिसतें. मला वाटतें कीं पहिलें वर्णन प्राणात्मक सूर्याचें आहे आणि दुसरें वर्णन अन्नात्मक चंद्राचें आहे. दुसऱ्या वर्णनांत सूर्याच्या रथाला सात चाकें आहेत असें म्हटलें आहे, तें सूर्याच्या किरणांत सात प्रकारचे भिन्न रंग प्रकट होतात, किंवा आठवड्याचें सात वार असतात, किंवा सूर्याच्या रथाला सात तोंडाचा घोडा असतो अशी कल्पना आहे, त्याचें दर्शक असावें. चाकाला अरा सहा आहेत असें म्हटलें आहे, त्याचा अर्थ वर्षाचे सहा ऋतु होत, असा असावा. चक्र आणि अरा यांच्या निर्देशानें चक्र फिरत आहे असा भास होतो. तसा भास पंचपाद ( पांच चरण ) या पदानें होत नाहीं. पुरीषिणम् ( उदक असणारा ) हें पद असें सुचवितें कीं, सूर्यकिरण समुद्रजलाचें आकर्षण करून त्याची वृष्टि पुनः पृथ्वीवर करितात. ही

अलीकडील कल्पना वेदकालींही मान्य झालेली होती. असो; या दृष्टीनें पाहिलें असतां प्रजापतिरूपी संवत्सर हा जगताचें सूर्यरूपानें निमित्त कारण आणि चंद्ररूपानें उपादान कारण आहे असें ठरतेंसें दिसतें. ॥ ११ ॥

---

## मंत्र बारावा.

**मासो वै प्रजापतिस्तस्य कृष्णपक्ष एव रयिः शुक्लः प्राणस्तस्मादेत ऋषयः शुक्ल इष्टं कुर्वन्तीतर इतरस्मिन् ॥ १२ ॥**

**अन्वय व अर्थ**—मासः वै प्रजापतिः ( महिना हाही प्रजापतीचें स्वरूप आहे ) तस्य कृष्णपक्षः एव रयिः शुक्लः प्राणः ( त्यांतील कृष्णपक्ष हा अन्नरूप आहे व शुक्लपक्ष हा प्राणरूप आहे. ) तस्मात् एते ऋषयः शुक्ले इष्टं कुर्वंति ( म्हणून हे ऋषि शुद्ध पक्षांतच यज्ञयाग करितात. ) इतरे इतरस्मिन् ( आणि दुसरे लोक कृष्णपक्षांत यागादि कर्में करितात. ) ॥ १२ ॥

या मंत्राचा भावार्थ असा आहे. संवत्सराप्रमाणेंच महिना हा प्रजापतिरूप आहे. प्रत्येक महिन्यांत शुद्ध व वद्य असे दोन पक्ष असतात. शुद्धपक्ष हा प्राणाचा निर्देश करितो आणि कृष्णपक्ष अन्नाचा करितो. म्हणून महिन्याला 'प्रजापति' असें श्रुतीनें म्हटलें. आतां मंत्राचा असा अभिप्राय आहे कीं, प्राणस्वरूप जाणणाऱ्या ऋषींनीं केव्हांही यज्ञयाग केले तथापि त्यांचे ते याग शुक्ल पक्षांत केल्यासारखे होतात. विद्वान् ऋषींनीं केलेलीं प्राणोपासक कर्में केव्हांही केलीं तरी त्यांना शुक्ल पक्षांत केलेल्या कर्मांचें फल प्राप्त होतें. म्हणजे त्यांस अमरत्व व अभयत्व मिळून सूर्य लोकीं राहण्यास सांपडतें, हें फल होय. या लोकांस प्राणाचें स्वरूप उत्तम समजलेलें असून ते सर्वत्र प्राणरूप पहात असतात; पण ज्यांना प्राणस्वरूप समजलें नाहीं म्हणून प्राणोपासना साध्य नाहीं, त्या लोकांनीं कसलीही वेदोक्त कर्में कोणत्याही कालीं केलीं तथापि त्यांना कृष्णपक्षांत केलेल्या कर्मांचें फल प्राप्त होतें. म्हणजे ते अन्नरूपी लोक चंद्रलोकास जातात आणि पुनः पुनः जन्म-मरणाच्या चक्रांत सांपडतात ॥ १२ ॥

---

## मंत्र तेरावा.

**अहोरात्रो वै प्रजापतिस्तस्याहरेव प्राणो रात्रिरेव रयिः प्राणं वा एते प्रस्कन्दन्ति ये दिवा रत्या संयुज्यन्ते ब्रह्मचर्यमेव तद्यद्रात्रौ रत्या संयुज्यन्ते ॥ १३ ॥**

अन्वय व अर्थ—अहोरात्रः वै प्रजापतिः ( अहोरात्र हा प्रजापतिरूप आहे. ) तस्य अहः एव प्राणः, रात्रिः एव रयिः ( त्यांतील अहर् म्हणजे प्राण—क्षितिजावर सूर्य असण्याचा काल—हा प्राण आणि रात्र हें अन्न होय ) ये दिवा रत्या संयुज्यन्ते एते प्राणं वै प्रस्कंदंति ( जे लोक दिवसा स्त्रीसंगम करितात ते आपल्या प्राणाला शुष्क करितात. म्हणजे आपला स्वघात करितात. ) ये रात्रौ रत्या संयुज्यन्ते तत् ब्रह्मचर्य एव ( रात्रीचा स्त्रीसंगम हें एक प्रकारचें ब्रह्मचर्यच आहे. ) ॥ १३ ॥

या मंत्रांत कालाचा शेवटचा विभाग जो अहोरात्र त्याला ही प्रजापति असें म्हटलें आहे. अहोरात्राला दोन पाखीं आहेत. त्यांतील दिवसाचें पाखें प्राणरूप आहे आणि रात्रीचें पाखें अन्नरूप आहे. श्रुतिमालेला जीवांच्या संरक्षणाविषयींची कळकळ अत्यंत म्हणन तिनें सर्व जीवांस असा कल्याणकारक उपदेश केला आहे कीं, प्रजोत्पादनासाठीं स्त्रीसंग करावयाचा असेल तर तो रात्रीं करावा म्हणजे ब्रह्मचारित्वाचें फल प्राप्त होतें. अथवा जीवाच्या प्राणरूपी सामर्थ्याचा अपव्यय होत नाहीं. पण ह्या उपदेशाचें अतिक्रमण करून जर दिवसा स्त्रीसंग केला तर आपला प्राणच बाहेर टाकण्याचें पातक आपल्या माथीं येतें. प्रस्तुत विषयाशीं या उपदेशाचा फारसा साक्षात् संबंध नाहीं. हें खरें, तथापि पुरुषाचें वीर्य हें प्राणरूप आहे आणि प्राणरूप वीर्याचें स्खलन प्राणरूप असणाऱ्या दिवसाच्या भागांत करूं नये, प्राणहानि करूं नये, हा उपदेश जीवकल्याणकारी म्हणून परंपरेनें प्रस्तुत विषयास अनुलक्षूनच आहे. ॥ १३ ॥

---

## मंत्र चवदावा.

**अन्नं वै प्रजापतिस्ततो ह वै तद्रेतस्तस्मादिमाः प्रजाः प्रजायन्त इति ॥ १४ ॥**

**अन्वय व अर्थ—अन्नं वै प्रजापतिः ततः ह वै तत् रेतः ( खरोखर अन्न हा प्रजापति आहे. तेथून तें प्राणात्मक रेत उत्पन्न होतें. )**

तस्मात् इमाः प्रजाः प्रजायन्ते (या रेतापासून ह्या प्रजा उत्पन्न होतात.) ॥ १४ ॥

या मंत्रांत कैबंधी कात्यायनाच्या प्रश्नाला साक्षात् उत्तर दिलें आहे. मागील मंत्रांत सांगितल्याप्रमाणें संवत्सर, मास, अहोरात्र, हीं प्रजापतीचीं स्वरूपें आहेत. कारण यांत प्राण आणि अन्न यांचें मिथुन सदैव दृष्टीस पडतें असें सांगितलें आहे. ह्याच क्रमानें पुढें गेलें असतां प्रजापति हा अन्नरूप होतो असें श्रुतीचें सांगणें आहे. या अन्नापासून प्राणात्मक रेत उत्पन्न होतें. पुरुषाचें रेत आणि स्त्रीचें (रयिरूपी मातेचें) शोणित या मिथुनापासून ह्या सर्व प्रजा उत्पन्न होतात. सर्व सामर्थ्यें उत्पन्न करणारा सूर्य आणि अन्नरूपी चंद्र, प्राणात्मक उत्तरायण, आणि अन्नात्मक दक्षिणायन, प्राणात्मक शुक्ल पक्ष आणि अन्नात्मक कृष्ण पक्ष, प्राणरूपी दिवस आणि अन्नरूपी रात्र, प्राणरूपी रेत आणि अन्नरूपी शोणित या मिथुनापासून विश्वाचीं, सांसारिक गतिस्थित्यात्मक व्यवहाराचीं, प्रजोत्पादनाचीं कार्यें होतात. प्रजा कशा उत्पन्न होतात ? याला हें उत्तर आहे कीं, प्राण व अन्न, हें मिथुन प्रजाकामी हिरण्यगर्भानें तप करून आपण स्वतः आपल्या स्वरूपापासून यथापूर्व उत्पन्न केलें. त्यापासून पुढें काल, स्थल, सृष्टिव्यवहार, पर्जन्य, उष्णता, अन्न, रेत आणि शोणित ह्या सात वस्तु उत्पन्न होऊन त्यांच्यापासून प्रजोत्पादनाचें कार्य होतें. या प्रमाणें हिरण्यगर्भ हा विश्वाचें निमित्त कारण आणि उपादान कारण आहे, असा श्रुतीचा अभिप्राय आहे. ह्या मंत्राचा सूक्ष्म विचार केला असेंही सिद्ध होतें कीं व्यवहारकालीं सृष्टिही अनादि आहे. केव्हां हिरण्यगर्भाच्या शास्त्रोक्त इच्छेनें ती प्रकट होते आणि केव्हां ती तिरोभूत (अदृश्य) होते. सृष्टि अदृश्य होणें, हिरण्यगर्भात लीन होणें, हा सृष्टीचा प्रलय होय. योग्य वेळ आली म्हणजे ती प्रकट होते. आविर्भूत होते किंवा दृश्य होते. हें आविर्भवन म्हणजे सृष्टीचा जन्म होय. ही व्यवहारस्थितीतील गोष्ट झाली. व्यवहार कालीं आपण केव्हांही विचार करावयास लागलों तरी अन्न आणि प्राण (Matter) व (Force) काल, स्थल इत्यादि गोष्टी आपल्यास गृहीत धराव्या लागतात. यांच्या शिवाय विचार करणें अशक्य आहे. ह्या गृहीत कराव्या लागणाऱ्या गोष्टी श्रुतीवरून आपल्यास समजतात. विचारास अगोचर असणाऱ्या गोष्टी श्रुति मात्र आपल्यास सांगते, म्हणून श्रुतीला अपौरुषेयत्व प्राप्त होतें. असो; येथें इतकाच विचार पुरे. ॥ १४ ॥

## मंत्र पंधरावा.

**तद्ये ह वै तत्प्रजापतिव्रतं चरन्ति ते मिथुनमुत्पादयन्ते । तेषामेवैष ब्रह्मलोको येषां तपो ब्रह्मचर्यं येषु सत्यं प्रतिष्ठितम् ॥ १५ ॥**

**अन्वय व अर्थ**—तत् ये ह वै तत् प्रजापतिव्रतं चरन्ति ते मिथुनं उत्पादयन्ते ( असें आहे म्हणून जे गृहस्थ प्रजापतीचें व्रत नैष्ठिक बुद्धीनें पाळितात, ते मिथुन म्हणजे कन्यापुत्र उत्पन्न करितात. ) येषां तपः ब्रह्मचर्यं येषु सत्यं प्रतिष्ठितम् तेषां एव एषः ब्रह्मलोकः (जे लोक तपश्चर्या करितात, ब्रह्मचर्य व्रत पाळितात आणि जे सत्याची कांस केव्हांही सोडीत नाहींत त्यांना हा ब्रह्मलोक प्राप्त होतो. ) ॥ १५ ॥

सारांश, प्रजापतीचें व्रत जे लोक एकनिष्ठेनें चालवितात ते प्रजा उत्पन्न करण्याच्या कामीं प्रजापतीला साहाय्यकारी होतात; पण जे लोक यज्ञ याग, ऋतुकालीं भार्यागमन आणि सत्यशील ह्यांचा स्वीकार करितात, हीं व्रतें चालवितात, त्यांना ह्या जवळ असणाऱ्या ब्रह्मलोकाची म्हणजे पितृलोकाची अथवा चंद्रलोकाची प्राप्ति होते. तसेंच हे लोक सकाम कर्म करणारे असल्यामुळें जन्ममरणाच्या चक्रांत सांपडतात आणि व्यवहार अबाधित रीतीनें चालू राहातो. ॥ १५ ॥

## मंत्र सोळावा.

**तेषामसौ विरजो ब्रह्मलोको न येषु जिह्ममनृतं न माया चेति ॥ १६ ॥**

**अन्वय व अर्थ**—येषु न जिह्मम्, न अनृतं, च न माया तेषां असौ विरजः ब्रह्मलोकः ( पण ज्या लोकामध्यें कपटवृत्ति नसते, अनृत भाषण नसतें. आणि दांभिकपणा नसतो त्या लोकांस मात्र तो निरज—निर्मळ—ब्रह्मलोक प्राप्त होतो. ) ॥ १६ ॥

संसारामध्यें आपल्यास अनेक प्रकारचे व केव्हां केव्हां तर परस्पर विरोधी व्यवहार करावे लागत असल्यामुळें आपल्यास रागद्वेषादिकांचा, व कुटिल वर्तनाचा आश्रय घ्यावा लागतो, हें सर्वप्रसिद्ध आहे. हा प्रसंग ज्या असंसारी लोकांस केव्हांही येत नाहीं, जे विरक्त असतात व म्हणून ज्यांस केव्हांही असत्य भाषणाचा प्रसंग प्राप्त होत नाहीं. आणि ज्यांना केव्हांही कपटाचरण करावें

लागत नाहीं, अशा संन्यासी लोकांनीं प्रजापतीचें (तपश्चर्या करण्याचें) मात्र व्रत चालविलें तर त्यांस निर्मल अशा ब्रह्मलोकाची, हिरण्यगर्भरूपाची, स्थिति प्राप्त होते. हे लोक ज्ञानी असतात आणि वेदोक्त कर्मही करितात. यांचें कर्म स्वोपकारक व परोपकारक असतें व यांचें ज्ञानही वरिष्ठ प्रकारचें असतें. प्रजापतिव्रताचें यथोक्त पालन केलें असतां पंधराव्या व सोळाव्या मंत्रांत सांगितलेलीं फलें प्राप्त होतात. ॥ १६ ॥

पहिला प्रश्न समाप्त.

---

## प्रश्न दुसरा.

### मंत्र पहिला.

**अथ हैनं भार्गवो वैदर्भिः पप्रच्छ । भगवन्कत्येव देवाः प्रजां विधारयन्ते कतर एतत्प्रकाशयन्ते कः पुनरेषां वरिष्ठ इति ॥ १ ॥**

अन्वय व अर्थ—अथ ह एनं भार्गवः वैदर्भिः पप्रच्छ (नंतर विदर्भदेशस्थ भार्गवानें मुनींस विचारिलें.) भगवन्, कति एव देवाः प्रजां विधारयन्ते (हे भगवन्, कोणते देव येथील प्रजांचें धारण करितात?) कतरे एतत् प्रकाशयन्ते (कोणते देव यांचें प्रकाशन करितात?) कः पुनः एषां वरिष्ठः (या सर्वांमध्यें श्रेष्ठ देव कोणता?) इति (याप्रमाणें भार्गवानें प्रश्न विचारिला) ॥ १ ॥

प्रश्नाचा भावार्थ स्पष्ट आहे. प्रजांचें आश्रयस्थान कोणतें आहे, त्यांस प्रकाश कोणीकडून मिळतो आणि संधारक व प्रकाशक देवतांपैकीं श्रेष्ठ देवता कोणती? हें या प्रश्नांत विचारिलें आहे. या पुढील प्रश्नांचा विषय प्राणाची उपासना हा आहे. दुसऱ्या प्रश्नातील रहस्य हें आहे कीं त्यांत प्राणाचें श्रेष्ठत्व उपभोगत्व व प्रजापतित्व इत्यादि गुणांचा निर्धार व्हावा. तिसऱ्या प्रश्नांत प्राणोपासनेचा विधि सांगितला आहे. ॥ १ ॥

---

### मंत्र दुसरा.

**तस्मै स होवाचाऽऽकाशो ह वा एष देवो वायुरग्निरापः पृथिवी वाङ्मनश्चक्षुः श्रोत्रं च । ते प्रकाश्याभिवदन्ति वयमेतद्बाणमवष्टभ्य विधारयामः २**

अन्वय व अर्थ—तस्मै सः उवाच ह ( भार्गवाला पिप्पलादाचार्यांनीं उत्तर दिलें.) आकाशः वै एषः देवः, वायुः अग्निः, आपः, पृथिवी, वाक्, मनः, चक्षुः, श्रोत्रं, च ह (आकाश, वायु, अग्नि, जल, पृथिवी, वाणी, मन, नेत्र आणि कर्ण हे मुख्य देव आहेत. ) प्रकाश्य ते अभिवदन्ति ( हे देव आपले गुणधर्म प्रकाशित करून म्हणतात ) वयं एतत् बाणं अवष्टभ्य विधारयामः ( आम्ही या बाणाला—शरीराला—स्थिर करून त्याला आश्रय देतों. ) ॥ २ ॥

या मंत्रांत पूर्वीच्या प्रश्नाला एक प्रकारचें उत्तर आहे. आकाशादि पंचमहाभूतें हीं शरीराचा आरंभ करणारीं पंचमहाभूतें आहेत. वाणी, मन, नेत्र आणि कर्ण इत्यादि कर्मेंद्रियें व ज्ञानेंद्रियें हीं शरीराचीं उपकरणें आहेत. या सर्वांस देव ही संज्ञा मंत्रांत दिली आहे. याचें कारण तीं पंचमहाभूतें आणि उपकरणें संकल्पपूर्वक बोलण्यास समर्थ झालीं आहेत, असें श्रुतीनें कल्पिलें आहे किंवा तिनें त्यांवरील अधिष्ठात्या देवतांचा उल्लेख केला आहे, हें होय. यांपैकीं प्रत्येकानें आपापले गुणधर्म प्रकट केल्यानंतर प्रत्येकास असें वाटूं लागलें कीं या शरीराचें उपादान कारण, निमित्त कारण व स्थिति कारण आपणच आहों. याप्रमाणें परस्परांत स्पर्धा लागून प्रत्येक जण म्हणूं लागला कीं, 'सर्वांत मी श्रेष्ठ आहें.' असो; पंचमहाभूतांपैकीं व दशेंद्रियांपैकीं प्रत्येकाची एकेक अधिष्ठात्री देवता आहे असा पूर्वकालीन समज होता. व तो अद्यापिही नष्ट झाला नाहीं व होणें शक्य नाहीं. ॥ २ ॥

---

## मंत्र तिसरा.

**तान्वरिष्ठः प्राण उवाच । मा मोहमापद्यथाऽहमेवैतत्पञ्चधाऽऽत्मानं प्रविभज्यैतद्बाणमवष्टभ्य विधारयामीति । तेऽश्रद्दधाना बभूवुः ॥ ३ ॥**

अन्वय व अर्थ—तान् वरिष्ठः प्राणः उवाच (त्या सर्वांत सर्वश्रेष्ठ जो प्राण तो त्यांस म्हणूं लागला.) मा मोहम् आपद्यथ ( तुम्हीं सर्वजण असे मोहांत पडूं नका. ) अहं एव एतत् पंचधा आत्मानं प्रविभज्य, एतत् बाणं अवष्टभ्य विधारयामि इति ( मीच आपणा स्वतःला पंचस्वरूपी करून—मी स्वतः पंचस्वरूपांचा होऊन—या शरीराला आधार होतों, त्याचे सर्व अवयव एकत्र ठेवितों आणि या शरीररूपी बाणाचें संरक्षण करितों. )

ते अश्रद्दधाना बभूवुः ( त्या सर्व पंचमहाभूतांस व इंद्रियांस हें प्राणाचें भाषण खेर वाटलें नाहीं. ॥ ३ ॥

या मंत्रांत प्राणाचें म्हणणें सांगितलें आहे. मुख्य प्राण एकच असून तो स्थानानुसार पंचस्वरूपाचा होतो. आपल्या जीवांच्या शरीराचे अनेक भाग विस्कळूं न देतां एकत्र ठेवून सर्व शरीराचें संरक्षण करणारा व त्याचा मुख्य आधार असणारा हा प्राणवायु आहे. पण ही गोष्ट कर्मेंद्रियांस, ज्ञानेंद्रियांस व पंचमहाभूतांस केव्हां केव्हां संमत असत नाहीं. प्राणाचें सामर्थ्य काय आहे, हें ठाऊक नसल्यामुळें पूर्वी व आधुनिक काळींहीं सारांश, नेहमीं प्राणाच्या संबंधानें पुष्कळ वादविवाद होतात. ह्या वादांचें दिग्दर्शन या मंत्रांत झालें आहे. ॥ ३ ॥

---

## मंत्र चवथा.

**सोऽभिमानादूर्ध्वमुत्क्रमत इव तस्मिन्नुत्क्रामत्यथेतरे सर्व एवोत्क्रामन्ते तस्मिँश्च प्रतिष्ठमाने सर्व एव प्रातिष्ठन्ते । तद्यथा मक्षिका मधुकरराजानमुत्क्रामन्तं सर्वा एवोत्क्रामन्ते तस्मिँश्च प्रतिष्ठमाने सर्वा एव प्रातिष्ठन्त एवं वाङ्मनश्चक्षुः श्रोत्रं च ते प्रीताः प्राणं स्तुन्वन्ति ॥ ४ ॥**

अन्वय व अर्थः—सः अभिमानात् ऊर्ध्वं उत्क्रमते इव तस्मिन् उत्क्रामति अथ इतरे सर्वे एव उत्क्रामन्ते तस्मिन् च प्रतिष्ठमाने सर्वे एव प्रातिष्ठन्ते ( नंतर तो अभिमानी प्राणवायु हा देह सोडून क्रोधानें जणूं कांहीं वरच्या दिशेकडे बघूं लागला. तेव्हां त्या ऊर्ध्व दिशेस जाणाऱ्या प्राणाच्या मागून बाकीचीं सर्व महाभूतें व इंद्रियें त्याच दिशेकडे धांवून जाऊं लागलीं व तो शरीरामध्यें प्रतिष्ठित झालेला असला म्हणजे सर्वहीं प्रतिष्ठित झालीं. ) तत् यथा मक्षिकाः मधुकरराजानं उत्क्रामन्तं सर्वाः एव उत्क्रामन्ते, तस्मिन् च प्रतिष्ठमाने सर्वाः एव प्रातिष्ठन्ते ( ज्याप्रमाणें मधुकरांचा राजा ऊर्ध्व दिशेस जाऊं लागला म्हणजे सर्व मक्षिका राजामागून त्याच दिशेनें जातात व तो एकाद्या ठिकाणीं स्थिर झाला असला म्हणजे त्याच्या मागून सर्व स्थिर होतात. ) एवं वाक मनः चक्षुः श्रोत्रं च। ते प्रीताः प्राणं स्तुन्वन्ति ( याप्रमाणें वाणी, मन,

नेत्र आणि कर्ण यांची स्थिति झाली. नंतर ते सर्व प्रसन्न होऊन प्राणाची स्तुति करूं लागले. ) ॥ ४ ॥

या मंत्रांत प्राण हा सर्वश्रेष्ठ कसा याचें स्पष्टीकरण केलें आहे. कारणाचें लक्षण असें देतात कीं, एक वस्तु नाहींशी झाली असतां त्याच वेळीं दुसरी वस्तु नाहींशी होते व पहिली वस्तु स्थिर झाली असतां दुसरी वस्तु स्थिर होते, तेव्हां पहिली वस्तु दुसऱ्या वस्तूचें कारण आहे. व ती दुसऱ्या वस्तूहून श्रेष्ठ आहे असें समजावें. या न्यायानें प्राण हा शरीरांतील पंचमहाभूतांचें व इंद्रियांचें कारण असून तो त्यांच्यापेक्षां श्रेष्ठ आहे, असें ठरतें. अर्थातच तोच शरीराचा आश्रय, प्रकाशक आणि संरक्षक आहे. मधुकर राजाच्या गमनागमनावर ज्याप्रमाणें मधमाशांचें गमनागमन अवलंबून असतें, त्याप्रमाणेंच गुणधर्मानें प्रकाशित होणाऱ्या वाणी, मन, नेत्र, कर्ण, प्रमुख कर्मेंद्रियांचा व ज्ञानेंद्रियांचा प्राण हा आश्रय आहे, असें ठरतें. असा प्राणाच्या श्रेष्ठत्वाचा अनुभव आल्यानंतर प्रसन्न होऊन सर्वजणांनीं प्राणाची स्तुति करण्यास आरंभ केला. ॥४॥

---

## मंत्र पांचवा.

**एषोऽग्निस्तपत्येष सूर्य एष पर्जन्यो मघवानेष वायुरेष पृथिवी रयिर्देवः सदसच्चामृतं च यत् ॥ ५ ॥**

अन्वय व अर्थ—एषः अग्निः तपति, एषः सूर्यः, एषः पर्जन्यः मघवान्, एषः वायुः, एषः पृथिवी, रयिर्देवः,—सत् असत्, अमृतं च यत् ( हा उष्णता देणारा अग्नि, प्रकाश देणारा सूर्य, वर्षणारा पर्जन्य, अथवा इंद्र, वाहणारा वायु, सर्वांस आधार देणारी पृथ्वी, आह्लादित करणारा चन्द्रमा, तसेंच मूर्त किंवा अमूर्त जे सर्व कांहीं आहेत व जें अमृत आहे तें सर्व हा प्राणच होय. ॥ ५ ॥

प्राणाची सर्वांनीं स्तुति केली. ते म्हणाले—या विश्वांत जीं जीं कांहीं पालनपोषण करणारीं सामर्थ्यें आहेत तीं सर्व प्राणस्वरूपी आहेत. या विश्वांत जीवांस व देवांस उपयोगी पडून त्यांची जीवनयात्रा ठीक चालविणाऱ्या ज्या शक्ति आहेत त्या सर्व प्राणरूप आहेत. ॥ ५ ॥

## मंत्र सहावा.

**अरा इव रथनाभौ प्राणे सर्वं प्रतिष्ठितम्। ऋचो यजूँषि सामानि यज्ञः क्षत्रं ब्रह्म च ॥ ६ ॥**

अन्वय व अर्थ—रथनाभौ अराः इव सर्वं प्राणे प्रतिष्ठितं; ऋचः, यजूँषि, सामानि, यज्ञः क्षत्रं ब्रह्म च (रथाच्या तुंबामध्यें चक्राच्या अरा आश्रय घेऊन राहतात, त्याप्रमाणें सर्व सामर्थ्यें प्राणाचा आश्रय घेऊन राहिलीं आहेत. ऋग्वेदादि तिन्ही वेद, वेदांच्या मंत्रांनीं साध्य होणारा यज्ञ, मंत्रांच्या साहाय्यानें यज्ञ साध्य करणारे ब्राह्मण आणि यज्ञ करणारे क्षत्रिय यजमान हे सर्व प्राणाच्या आश्रयानें राहतात.) ॥ ६ ॥

प्राणाच्या आश्रयानें विश्वाचीं सर्व सामर्थ्यें राहतात; इतकेंच नव्हे तर ऋग्वेदादि तिन्ही वेद, यज्ञयागादि वेदविहित कर्में आणि ब्राह्मणक्षत्रियादि यज्ञकर्ते हे सर्वही प्राणाश्रयानें राहून प्राणानुगामी असतात. सारांश, या विश्वांतील प्रत्येक सामर्थ्य, प्रत्येक कर्म, प्रत्येक कर्मसाधन आणि प्रत्येक कर्मकर्ता प्राणावलंबी आहे. अर्थातच सर्व जड वस्तूंचा आधार, स्थितिकर्ता आणि विनाशक प्राण आहे, हा श्रुतीचा अभिप्राय आहे. ॥ ६ ॥

---

## मंत्र सातवा.

**प्रजापतिश्चरसि गर्भे त्वमेव प्रतिजायसे। तुभ्यं प्राण प्रजास्त्विमा बलिं हरन्ति यः प्राणैः प्रतितिष्ठसि ॥ ७ ॥**

अन्वय व अर्थ—प्रजापतिः-त्वं एव-गर्भे चरसि, त्वं एव प्रतिजायसे. प्राण! तुभ्यं इमाः प्रजाः बलिं हरन्ति (प्रजापतिही तूंच आहेस, गर्भामध्यें संचार तूंच करितोस, तूंच मातापितरांपासून त्यांच्या स्वरूपासारखा जन्म घेतोस, हे प्राणराजा! या सर्व प्रजा तुलाच उपायनें आणतात.) यः प्राणैः प्रतितिष्ठसि (तूंच प्राणापानादि प्राणांसह शरीरामध्यें स्थिर होतोस.) ॥ ७ ॥

प्राण हा सर्व प्रजांचें उत्पत्ति कारण आहे. तोच गर्भामध्यें वास्तव्य करतो, पुत्ररूपानें मातापितरांची प्रतिकृति तोच होतो. सर्व यच्चयावत् वस्तु त्याचीच सेवा करितात आणि तोच प्राण अनेकरूपानें शरीरांमध्यें संचार करून राहतो. एवंच प्राण हा सर्वाधार, सर्वरूप व सर्वसेव्य, असा आहे. ॥ ७ ॥

---

## मंत्र आठवा.

**देवानामसि वह्नितमः पितृणां प्रथमा स्वधा।**
**ऋषीणां चरितं सत्यमथर्वाङ्गिरसामसि ॥ ८ ॥**

**अन्वय व अर्थ**—**देवानां वह्नितमः असि** ( हे प्राण, देवांस हविर्भाग पोहोंचविणारा तूं सर्वश्रेष्ठ अग्नि आहेस. ) **पितृणां प्रथमा स्वधा** ( पितरांस जे पिंड अर्पित होतात, त्यांतील सर्वश्रेष्ठ पिंड तूं आहेस ) **अथर्वाङ्गिरसां ऋषीणां सत्यं चरितं असि** ( अथर्व—अंगिरसादि ऋषींचें सत्यशील वर्तन तूंच आहेस ) ॥ ८ ॥

देवांस व पितरांस त्यांचे त्यांचे हविर्भाग पोंचविणारा अग्निरूप प्राण सर्वश्रेष्ठ आहे. याचप्रमाणें ऋषींचें तर्पण करून जीव त्यांना जें आपलें सद्वर्तन अर्पण करितात, तें ही प्राणाच्याच द्वारानें त्यांस पोहोंचलें जातें. देवांस अर्पण करितांना 'स्वाहा' या पदाचा उच्चार करितात. स्वधा या पदानें पितरांचें तर्पण होतें. हें सर्व वैदिक वाचकांस विदितच आहे. सारांश, प्राण हा पृथ्वीतील प्राण्यांचें संरक्षण करितो असें नाहीं तर तो देव, ऋषि आणि पितर यांचें ही जीवन पोहोंचविण्याचें कारण असतो. ॥ ८ ॥

---

## मंत्र नववा.

**इन्द्रस्त्वं प्राण तेजसा रुद्रोऽसि परिरक्षिता। त्वमन्तरिक्षे चरसि सूर्यस्त्वं ज्योतिषां पतिः ॥ ९ ॥**

**अन्वय व अर्थ**—**प्राण, त्वं तेजसा इंद्रः, परिरक्षिता रुद्रः असि, ज्योतिषां पतिः सूर्यः त्वं अन्तरिक्षे चरसि** ( हे प्राण तूं स्वतेजानें देवादिकांचा इंद्र आहेस, संरक्षण करणारा रुद्र आहेस आणि अंतरिक्षामध्यें भ्रमण करणाऱ्या तेजोगोलांचा पति म्हणजे स्वामीही तूंच आहेस. ) किंवा **त्वं सूर्यः अन्तरिक्षे चरसि, त्वं ज्योतिषां पतिः** ( तूं सूर्यरूपानें अंतरिक्षांत भ्रमण करितोस आणि तूंच तेजोगोलांचा स्वामी चंद्र आहेस. ) असाही अन्वयार्थ करावा ॥ ९ ॥

प्राण हा वीर्यानें इंद्र, संहार—सामर्थ्यानें व संरक्षण—सामर्थ्यानें रुद्र आणि तेजोगोलकांचा अधिपति सूर्य इत्यादि निरनिराळ्या स्वरूपांनीं इंद्र, रुद्र, आणि सूर्य होतो. सारांश, तो वीर्यशाली, संहारकर्ता, संरक्षक आणि सर्वप्रकाशक आहे. म्हणून त्याच्या अनंत गुणांनीं त्याला अनंत देवांचीं स्वरूपें प्राप्त होतात. ॥ ९ ॥

---

## मंत्र दहावा.

**यदा त्वमभिवर्षस्यथेमाः प्राणते प्रजाः। आनन्द-रूपास्तिष्ठन्ति कामायान्नं भविष्यतीति ॥ १० ॥**

**अन्वय व अर्थ**—यदा त्वं अभिवर्षसि, अथ इमाः प्रजाः प्राणते, कामाय अन्नं भविष्यति इति आनन्दरूपाः तिष्ठन्ति ( हे प्राण, जेव्हां तूं पर्जन्यरूपानें वृष्टि करितोस तेव्हां मात्र ह्या सर्व प्रजा जिवंत राहूं शकतात. आणि आपल्यास आतां हवें तितकें अन्न मिळेल असा त्यांचा निश्चय होऊन त्या आनंदरूप होतात. ) ॥ १० ॥

येथें प्राण हाच पर्जन्य असून तो वर्षित झाला म्हणजे सर्व प्रजांचें प्राण-रक्षण होतें व त्यांस पोटभर अन्न मिळून त्या आनंदरूप होतात असें सांगितलें आहे. ॥ १० ॥

---

## मंत्र अकरावा.

**व्रात्यस्त्वं प्राणैकऋषिरत्ता विश्वस्य सत्पतिः । वयमाद्यस्य दातारः पिता त्वं मातरिश्व नः ॥ ११ ॥**

**अन्वय व अर्थ**—प्राण त्वं व्रात्यः, एकऋषिः, अत्ता, विश्वस्य सत्पतिः ( हे प्राण तूं व्रात्यही आहेस, तूं एकऋषि नामक अग्नि असून सर्व हवींचा भोक्ता आहेस आणि विश्वांतील सर्व वस्तूंचा तूं स्वामी आहेस.) वयं आद्यस्य दातारः (आम्ही केवळ तुला हविर्भाग अर्पण करणारे आहों.) मातरिश्व त्वं नः पिता (हे वायो, तूं आमचा सर्वांचा पिता आहेस.)॥ ११॥

ज्याला वैदिक संस्कार होत नाहींत त्याला व्रात्य असें म्हणतात. प्राणाची उत्पत्ति प्रथमच झाली असल्यामुळें व तो स्वतःसिद्ध असल्यामुळें त्याच्या संबंधानें जातकादि संस्कारविधि अशक्यच होतात. तसेंच प्राण हा सर्वद्रष्टा आहे म्हणून त्याला एकर्षि हें नांव दिलें. सर्व वस्तूंचें पालनपोषण तो करितो म्हणून त्याला सत्पति असें म्हटलें. वाणी मन इत्यादि त्यालाच खाद्य अर्पण करित असतात म्हणून तो सर्वेसेव्य आहे; आणि प्राण हा सर्वव्यापी असून सर्वांचें पोषण करणारा आहे म्हणून त्याला पिता असें म्हटलें आहे. ॥ ११ ॥

---

## मंत्र बारावा.

**या ते तनूर्वाचि प्रतिष्ठिता या श्रोत्रे या च चक्षुषि। या च मनसि संतता शिवां तां कुरु मोत्क्रमीः ॥ १२ ॥**

अन्वय व अर्थ—या ते तनूः वाचि प्रतिष्ठिता, या श्रोत्रे, या च चक्षुषि, या च मनसि संतता, तां शिवां कुरु, मा उत्क्रमीः ( वाणीच्या ठिकाणीं जें तुझें स्वरूप प्रकट होतें, तसेंच कर्ण आणि नेत्र यांच्या ठिकाणीं जें तुझें रूप प्रकाशित होतें, मनाचे ठिकाणीं जी तुझी व्याप्ति असते ती प्रत्येकी मंगलरूप होईल असें कर. आणि या देहापासून तूं दूर जाऊं नकोस ॥ १२ ॥

वाणीची वर्णनशक्ति, कर्णांची श्रवणशक्ति, नेत्रांची दर्शनशक्ति आणि मनाची संकल्प-विकल्पात्मक शक्ति, ह्या सर्व शक्ति मुख्य प्राणाच्या निरनिराळ्या प्रतिकृति आहेत. वाणी आदि सर्व कर्मेंद्रियें आणि ज्ञानेंद्रियें प्राणाची प्रार्थना करितात. हेतु हा कीं आपापल्या इंद्रियांचें सामर्थ्य नित्य मंगलप्रद असावें म्हणून प्राणानें ह्या शरीरांस सोडून जाऊं नये.

मंत्र चारपासून मंत्र अकरापर्यंत प्राणाची स्वरूप-स्तुति आहे. बाराव्या व तेराव्या मंत्रांत इंद्रियांनीं प्राणाची प्रार्थना करून वर मागितला आहे. या स्तुतीवरून व वर-प्रार्थनेवरून प्राणाचें श्रेष्ठत्व व इंद्रियांचें गौणत्व, प्राणाचें स्वातंत्र्य व इंद्रियादिकांचें पारतंत्र्य इत्यादि स्पष्ट होतात. ॥ १२ ॥

---

## मंत्र तेरावा.

**प्राणस्येदं वशे सर्वं त्रिदिवे यत्प्रतिष्ठितम्। मातेव पुत्रान्रक्षस्व श्रीश्च प्रज्ञां च विधेहि न इति ॥ १३ ॥**

अन्वय व अर्थ—यत् त्रिदिवे प्रतिष्ठितं इदं सर्वं प्राणस्य वशे ( जें सर्व कांहीं त्रैलोक्यांत स्थापित झालें आहे, तें हें सर्व प्राणाच्या स्वाधीन आहे. ) माता इव पुत्रान् रक्षस्व, नः श्रीः च विधेहि ( हे प्राण, माता जशी पुत्राचें संरक्षण करिते तसें तूं आमचें संरक्षण कर आणि आम्हांस संपत्ति आणि बुद्धि यांचें दान कर ) इति ( याप्रमाणें इंद्रियांनीं प्राणाची स्तुति केली ) ॥ १३ ॥

या मंत्रांत सारांशरूपानें प्राणाच्या श्रेष्ठत्वाचें वर्णन करून त्रैलोक्यांतील सर्व वस्तूंचा तो स्वामी आहे असें म्हटलें आणि 'आईप्रमाणें आम्हांस जतन कर आणि बापाप्रमाणें आम्हांला श्रीमंत आणि बुद्धिमान् कर' अशी प्राणाची प्रार्थना केली आहे. ॥ १३ ॥

---

या उपनिषदांतील दुसरा प्रश्न प्राणाचें स्वरूप व सामर्थ्य वर्णन करितो. श्रुति म्हणते कीं प्राण हाच शरीराचें विधारण करणारा, इंद्रियांस स्वकर्म करण्याचें व विषयप्रकाशन करण्याचें सामर्थ्य देणारा व सर्व भौतिक व स्वर्गस्थ देवतांस नियमित करणारा आहे. त्याची सत्ता असेल तर मात्र शरीर व इंद्रियें आपआपलीं कामें करूं शकतात व तो अदृश्य झाला म्हणजे शरीर कुजतें व इंद्रियें प्राणाबरोबर सहगमन करितात. तो अग्निप्रमुख देवता आहे म्हणजे सर्व देवदेवता हीं त्याचीं स्वरूपें आहेत. तो ज्ञानाचें व कर्माचें अधिष्ठान आहे. जीवांचा उत्पादक तो, जीवस्वरूप तो आणि आनुवंशिक व्रत चालविणाराही तोच आहे. प्राण हा सर्वपति असून त्याच्यासाठीं सर्व इंद्रियें कर्म करित असतात. देव, पितर व ऋषी यांचे हविर्भाग प्राणाच्या द्वारानें देवादिकांस मिळतात. तो ओजानें इंद्र, पालकत्वानें रुद्र, तेजानें सूर्य, पर्जन्यदानानें वरुण, अन्नोत्पत्तीनें चंद्र असून सर्वांचा आदि, सर्वांचा द्रष्टा, सर्वांचा पालक व सर्वांचा नियामक आहे. तो असला म्हणजे सर्वांचें सौभाग्य अखंड असतें. तो सर्वस्वामी, बुद्धिदाता, समृद्धिपोषक आणि मातेप्रमाणें दयाघन आहे.

हें प्राणस्वरूप यथार्थ नाहीं, असें कोण म्हणेल? हें प्राणस्वरूप वेदकालीं जसें दिसलें तसेंच आधुनिककालींही दृश्य होतें. प्राण ही वस्तु विश्वव्यापी आहे, असें आधुनिक पंडित म्हणतात. प्राण म्हणजे चेतनाशक्ति Force असा अर्थ केला म्हणजे श्रुतिबोधित प्राणस्वरूप यथार्थ आहे, असें प्रत्येकास म्हणावें लागेल.

दुसरा प्रश्न समाप्त.

## प्रश्न तिसरा.

### मंत्र पहिला.

**अथ हैनं कौसल्यश्चाऽऽश्वलायनः पप्रच्छ । भगवन्कुत एष प्राणो जायते कथमायात्यस्मिञ्शरीर आत्मानं वा प्रविभज्य कथं प्रातिष्ठते केनोत्क्रमते कथं बाह्यमभिधत्ते कथमध्यात्ममिति ॥ १ ॥**

अन्वय व अर्थ—अथ ह एनं आश्वलायनः कौसल्यः पप्रच्छ (नंतर कौसल्यनामक अश्वलायनशिष्य पुढें झाला व त्यानें पिप्पलादमुनींस प्रश्न

केला.) (१) भगवन् कुतः एषः प्राणः जायते? (२) कथं अस्मिन् शरीरे आयाति? (३) आत्मानं वा प्रविभज्य कथं प्रातिष्ठते? (४) केन उत्क्रमते? (५) कथं बाह्यं अभिधत्ते? (६) कथं अध्यात्मं? इति (भगवन् (१) हा प्राण कोठून उत्पन्न होतो? (२) ह्या शरीरांत तो कसा येतो? (३) आपल्या स्वतःचे भाग व प्रतिभाग करून तो कसा स्थित होतो? (४) तो कोणत्या मार्गानें बाहेर जातो? (५) तो अधिभूत आणि अधिदैवत यांचें धारण कसें करितो? आणि (६) अध्यात्माचें धारण कसें करितो? हें मला कृपा करून सांगावें.) ॥१॥

या प्रश्नांत प्राणाची उत्पत्ति त्याचा जीव-शरीराशीं संयोग, त्याचे निरनिराळे विभाग, बाहेर जाण्याचा त्याचा मार्ग, आणि त्याचें अधिभूत, अधिदैवत व अध्यात्मरूप यांचा विचार करावयाचा आहे. ॥ १ ॥

---

## मंत्र दुसरा.

**तस्मै स होवाचातिप्रश्नान्पृच्छसि ब्रह्मिष्ठोऽसीति तस्मात्तेऽहं ब्रवीमि ॥ २ ॥**

अन्वय व अर्थ—तस्मै सः उवाच ह (कौसल्याला आचार्यांनीं प्रत्युत्तर दिलें.)—ते म्हणाले—अति-प्रश्नान् पृच्छसि (तूं फार मोठे गहन प्रश्न विचारिले आहेस.)—तथापि—ब्रह्मिष्ठः असि इति तस्मात् ते अहं ब्रवीमि (तूं ब्रह्मनिष्ठ आहेस म्हणून तुला या प्रश्नांचीं उत्तरें मी देतों.) ॥ २ ॥

या मंत्राचा भावार्थ इतकाच आहे कीं कौसल्यकृत प्रश्न अत्यंत गहन आहेत, म्हणून याची मीमांसा ब्रह्म जाणूं इच्छिणाऱ्या नैष्ठिक पुरुषानें मात्र करावी. ॥२॥

---

## मंत्र तिसरा.

**आत्मन एष प्राणो जायते । यथैषा पुरुषे छायैतस्मिन्नेतदाततं मनोकृतेनाऽऽयात्यस्मिञ्शरीरे ॥ ३ ॥**

अन्वय व अर्थ—एषः प्राणः आत्मनः जायते (हा प्राण—पूर्वी वर्णन केलें तो मुख्य प्राण—आत्मस्वरूपापासून उत्पन्न होतो) यथा

**पुरुषे एषा छाया, एतस्मिन् एतत् आततं** (ज्याप्रमाणें पुरुषाबरोबर छाया असते, त्याप्रमाणें या आत्म्यामध्यें हा प्राण समर्पित झालेला असतो) **अस्मिन् शरीरे मनोकृतेन आयाति** (—हा प्राण मनानें केलेल्या संकल्पादिकांपासून उत्पन्न झालेल्या कर्मानें या शरीरांत प्रवेश करितो.—) ॥ ३ ॥

या मंत्रांत प्राण कसा उत्पन्न होतो व तो या शरीरांत कोणत्या मार्गानें येतो या पहिल्या दोन प्रश्नांचीं उत्तरें दिलीं आहेत. प्राणाची उत्पत्ति आत्मस्वरूपापासून होते. ती कशी म्हणशील, तर पुरुषाची छाया जशी पुरुषापासून उत्पन्न होते तसा प्राण आत्म्यापासून उत्पन्न होतो. दिवसा उन्हांत चाललों असतां आपली छाया पडते तशीच प्राणाची उत्पत्ति आत्म्यापासून आहे. किंवा प्रत्येक पुरुषाच्या शरीराभोंवतीं एक अदृश्य छायापुरुष असतो, तो योगी लोकांस मात्र प्रत्यक्ष असतो. पहिली छाया घ्या किंवा दुसरा छायापुरुष घ्या; दोन्हीही अमूर्त आणि असद् वस्तू आहेत. तात्पर्य, प्राणही आत्मस्वरूपासारखी खरी वस्तू नव्हे. सूर्याच्या व शरीराच्या उपाधींनीं छाया उत्पन्न होते, व तीं उपाधींच्या अभावीं नसते. म्हणून ती छाया वस्तुरूप नसते. हीच कथा प्राणाची आहे. म्हणजे प्राण हा सोपाधिक आत्म्यापासून उत्पन्न होतो व तो वस्तुतः सद्रूपी नसतो. शरीराची सावली पडली असतां शरीराच्या प्रमाणांत जसें न्यूनाधिक्य होत नाहीं, तें जसेंच्या तसेंच असतें, सावली मात्र येते जाते, त्याप्रमाणें प्राण उत्पन्न झाला म्हणून आत्मस्वरूपांत कोणताही विकार उत्पन्न होत नाहीं. प्राण येतो जातो, पण आत्मस्वरूपानें जसाच्या तसाच असतो. अर्थात् हें पहिल्या प्रश्नाचें उत्तर आहे. आतां दुसऱ्या प्रश्नासंबंधानें इतकेंच म्हणावयाचें कीं जड शरीरामध्यें या असद्वस्तूचा प्रवेश होतो, तो मनानें संकल्प केल्यामुळें जें कर्म उत्पन्न होतें त्या कर्माच्या द्वारानें जीव-शरीरांत प्राणाचा प्रवेश होतो. याप्रमाणें छायारूपी प्राणाची उत्पत्ति आणि संकल्पकृत कर्माच्या द्वारानें त्याचा शरीरांत प्रवेश. या दोन गोष्टी ठरल्या.

मंत्रांतील मनोकृत हें पद आर्ष आहे 'मनस्कृतेन' हा शुद्ध प्रयोग होईल. ३.

---

## मंत्र चौथा.

**यथा सम्राडेवाधिकृतान्विनियुङ्क्ते । एतान्ग्रामानेतान्ग्रामानधितिष्ठस्वेत्येवमेवैष प्राण इतरान्प्राणान्पृथक्पृथगेव संनिधत्ते ॥ ४ ॥**

अन्वय व अर्थ—यथा सम्राट् एव अधिकृतान् विनियुङ्क्ते 'एतान् ग्रामान् एतान् ग्रामान् अधितिष्ठस्व' इति (ज्याप्रमाणें कोणी चक्रवर्ती

राजा अधिकाऱ्यांची नेमणूक करितो आणि 'ह्या ग्रामावर तुम्ही सत्ता चालवा, ह्यावर तुम्ही सत्ता चालवा' अशी आज्ञा करितो ) **एवं एषः प्राणः इतरान् प्राणान् पृथक् पृथक् एव संनिधत्ते** ( त्याप्रमाणें हा मुख्य प्राण इतर नेत्रादि प्राणांस निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळे अधिकार मात्र देऊन नेमितो ) ॥ ४ ॥

मुख्य प्राण हा सर्व इतर प्राणांचा अधिपति आहे. हे इतर प्राण कोणते हें पुढील चार पांच मंत्रांत स्पष्ट होईल. चक्रवर्ती राजाच्या आज्ञेनें त्याचे कित्येक अधिकारी निरनिराळ्या ग्रामांचा कार्यभाग ( कारभार ) करितात, त्याप्रमाणें प्राणांचा अधिपति जो मुख्य प्राण तो निरनिराळ्या प्राणांस निरनिराळीं कामें सांगून त्या सर्वांवर देखरेख करीत असतो. सारांश, शरीराची सर्व गतिस्थिति व चलनवलन मुख्य प्राणाच्या तंत्रानें चाललेलीं असतात हें आतांच्या मंत्रावरून स्पष्ट होत आहे. ॥ ४ ॥

---

## मंत्र पांचवा.

**पायूपस्थेऽपानं चक्षुःश्रोत्रे मुखनासिकाभ्यां प्राणः स्वयं प्रातिष्ठते मध्ये तु समानः । एष ह्येतद्धुतमन्नं समं नयति तस्मादेताः सप्तार्चिषो भवन्ति ॥ ५ ॥**

**अन्वय व अर्थ**—**पायूपस्थे अपानं, चक्षुःश्रोत्रे प्राणः मुखनासिकाभ्यां स्वयं प्रातिष्ठते** ( पायु आणि उपस्थ यांच्यामध्यें अपान वायूची स्थापना होते. मुखांतून आणि नासिकेंतून आंत बाहेर येणारा प्राण नेत्र आणि कर्ण यांचे ठिकाणीं आपण स्वतः राहतो. ) **मध्ये तु समानः** ( प्राण आणि अपान यांच्यामध्यें समान वायु राहतो. ) **एषः तु एतत् हुतं अन्नं समं नयति** ( हा समान वायु खाल्लेलें अन्न समस्थितीला नेतो म्हणून त्याला समानवायु म्हणतात. ) **तस्मात् एताः सप्तार्चिषः भवन्ति** ( तेथून ह्या सात ज्वाला उत्पन्न होतात. ) ॥ ५ ॥

या मंत्रांत प्राण, अपान आणि समान ह्या तीन प्राणविभागांचा विचार केला आहे. अपानवायु हा मलद्वाराचे ठिकाणीं राहून मल-विसर्जनादि कामें करितो. स्वतः प्राणवायु हा मुखनासिकांच्या द्वारानें आंत बाहेर येऊन जाऊन नेत्र आणि कर्ण यांचे ठिकाणी राहातो. समान वायु हा प्राण आणि अपान यांच्या मध्यें राहून जीवानें स्वीकृत केलेल्या अन्नपानादिकांस एकरस करितो. याप्रमाणें दोन डोळे,

दोन कान, दोन नासिकाद्वारें प्राण आणि मुख ह्या सात ज्वाला उत्पन्न होतात. हृदयांत जो जठराग्नि आहे, त्याच्या जणूं कांहीं ह्या सात ज्वालाच होत. तात्पर्य, हृदयांत तयार झालेल्या अन्नरसरूपी जीवनानें आपलीं दर्शन श्रवणादि इंद्रियें स्वस्वकार्य करण्यास समर्थ होतात. याप्रमाणें मुख्य प्राणाच्या तीन विभागांचीं स्थानें व त्यांचीं कर्में सांगितलीं. ॥ ५ ॥

## मंत्र सहावा.

**हृदि ह्येष आत्मा। अत्रैतदेकशतं नाडीनां तासां शतं शतमेकैकस्यां द्वासप्ततिर्द्वासप्ततिः प्रतिशाखानाडीसहस्राणि भवन्त्यासु व्यानश्चरति ॥ ६ ॥**

**अन्वय व अर्थ**—हृदि हि एषः आत्मा ( आपला आत्मा हृदयाकाशाचे ठिकाणीं राहतो. ) अत्र नाडीनां एतत् एकशतं ( येथें मुख्य नाडींचें एक शतक व एक आहे. म्हणजे एकशेंएक नाड्या आहेत. ) तासां शतं शतं ( त्या प्रत्येक नाडीच्या शंभर शंभर शाखानाड्या आहेत. ) एकैकस्यां द्वासप्ततिः द्वासप्ततिः प्रतिशाखानाडीसहस्राणि भवन्ति ( एकेका शाखानाडीच्या बहात्तर हजार प्रतिशाखानाड्या असतात, ) आसु व्यानः चरति ( यांच्या मधून व्यानवायु संचार करीत असतो. ) ॥ ६ ॥

ह्या मंत्रांत जीवाच्या शरीरांत असणाऱ्या नाड्यांची संख्या दिली आहे. ती अशी—

| | |
|---|---|
| १०१ | प्रधान नाड्या |
| १०१०० | शाखा नाड्या |
| ७२७२०००० | प्रतिशाखा नाड्या |
| ७२७२१०२०१ | |

या प्रमाणें मनुष्याच्या शरीरांत बहात्तर कोटी बहात्तर लक्ष दहा हजार दोनशें एक नाड्या आहेत. या नाड्यांतून ज्या वायूचा संचार होतो, त्याला व्यानवायु म्हणतात. मुख्य प्राणाचा हा एक विभाग आहे. शरीराच्या सर्व भागांस रक्त पाहोंचविणें आणि मलीन झालेलें रक्त पुनः हृदयांत शुद्धीकरणार्थ आणणें हें या वायूचें काम आहे.

हा वायु सर्व-व्यापक आहे म्हणून याला व्यान म्हणतात. रक्तविभाजन करण्याच्या कामाप्रमाणेंच या वायूकडे सर्व वीर्यशाली कर्में घडवून आणण्याची व्यवस्था सोंपविली आहे. ॥ ६ ॥

## मंत्र सातवा.

**अथैकयोर्ध्व उदानः पुण्येन पुण्यं लोकं नयति पापेन पापमुभाभ्यामेव मनुष्यलोकम् ॥ ७ ॥**

**अन्वय व अर्थ—अथ एकया ऊर्ध्वः उदानः** ( आतां एका ऊर्ध्वगामी नाडीच्या द्वारानें कर्म करणारा जो वायु आहे त्याला उदान वायु म्हणतात. ) **पुण्येन पुण्यलोकं, पापेन पापं उभाभ्यां एव मनुष्यलोकं नयति** ( हा वायु जीवानें पुण्यकर्म केलें असतां स्वर्गादि देवलोकास नेतो, पापकर्म केलें असतां नरकलोकांस नेतो आणि पापपुण्य समान असतां, जीवाला मनुष्यलोकांस नेतो. ) ॥ ७ ॥

मागच्या मंत्रांत प्रधान नाड्या एकमेंएक आहेत म्हणून सांगितलें त्यांतील एक नाडी ऊर्ध्व—गामिनी आहे. इला सुषुम्ना नाडी असें म्हणतात. जीवाच्या सत्कर्म दुष्कर्मानुसार ही नाडी जीवाला स्वर्ग, नरक अथवा मनुष्य लोक प्राप्त करून देते. या नाडींतून संचार करणारा वायु पायाच्या तळव्यापासून डोक्यापर्यंत आपली सत्ता चालवितो. ज्या स्थानांतून उदान वायु बाहेर गेल्याबरोबर मनुष्य गतप्राण होतो, त्या स्थानावरून तो स्वर्गलोकीं गेला किंवा दुसऱ्या कोठें गेला हें चाणाक्ष पुरुषांस कळतें, असा समज आहे. उदान वायु हा प्राणाचा पांचवा भाग होय. सुषुम्ना नाडी हें त्याचें स्थान आहे. या प्रमाणें प्राण—विभागांचें वर्णन होऊन प्राण कोणत्या द्वारानें बाहेर जातो यांचेंही संकीर्तन झालें. आतां यापुढें अधिभूत, अधिदैवत इत्यादिकांचें वर्णन यावयाचें आहे. ॥ ७ ॥

---

## मंत्र आठवा.

**आदित्यो ह वै बाह्यः प्राणः उदयत्येष ह्येनं चाक्षुषं प्राणमनुगृह्णानः । पृथिव्यां या देवता सैषा पुरुषस्यापानमवष्टभ्यान्तरा यदाकाशः स समानो वायुर्व्यानः ॥ ८ ॥**

**अन्वय व अर्थ—आदित्यः ह वै बाह्यः प्राणः** ( आदित्य अथवा सूर्य हा बाह्य प्राण आहे. ) **एनं चाक्षुषं अनुगृह्णानः हि एषः उदयति** ( डोळ्यांतील प्राणावर अनुग्रह करीत होत्साता हा सूर्य उगवतो. ) **पृथिव्यां या देवता सा एषा पुरुषस्य अपानं अवष्टभ्य** ( पृथ्वीची जी

अधिष्ठात्री देवता आहे. ती पुरुषाच्या अपान-वृत्तीवर आपली सत्ता चालवून अपानावर अनुग्रह करिते ) यत् अन्तरा आकाशः सः समानः ( सूर्य आणि पृथ्वी यांच्यामध्यें जी आकाश देवता आहे. तेथें राहणारा वायु समान वायूवर अनुग्रह करितो. ) वायुः व्यानः ( आणि सामान्य वायु व्यानावर अनुग्रह करितो. ) ॥ ८ ॥

येथें आधिदैविक व आधिभौतिक देवता प्राणाच्या निरनिराळ्या भागांवर ( अध्यात्मावर कसा अनुग्रह करितात हें व प्राणाचें अधिदैवतादिस्वरूप सांगितलें आहे. सूर्य हा डोळ्यांवर अनुग्रह करून जीवाला दर्शनसामर्थ्य देतो. पृथ्वी ही देवता अपान वायूवर अनुग्रह करून जीवांस खालीं पडूं न देतां त्याचें शरीरसंरक्षण करिते. समान वायूची अनुग्राहक आकाशदेवता आणि व्यानाची वायुदेवता आहे. तात्पर्य, सूर्यादि देवता प्राणरूप आहेत, हें मागें सांगितलें आहे. या मंत्रांत जीवाच्या देहांत व इंद्रियांत जो अध्यात्मप्राण असतो, त्याच्यावर विश्वप्राणाच्या देवता कसा अनुग्रह करितात हें सांगितलें. विश्वप्राण हे देहस्थप्राणाचीं कशीं स्वरूपें आहेत, हें या मंत्रावरून समजतें आणि प्राणरूपी तत्त्व सर्वव्यापी व एकरस आहे, असा निश्चय होतो. प्राण स्वरूपतः एकच आहे, उपाधींच्या भिन्नतेमुळें तो निराळा वाटतो, हें तत्त्व लक्ष्यांत ठेवणें अत्यंत अवश्य आहे. ॥ ८ ॥

---

## मंत्र नववा.

**तेजो ह वा उदानस्तस्मादुपशान्ततेजाः। पुनर्भवमिंद्रियैर्मनसि संपद्यमानैः ॥ ९ ॥**

अन्वय व अर्थ—तेजः ह वै उदानः ( सामान्य जें तेज आहे तें उदान वायूवर अनुग्रह करितें. ) तस्मात् उपशान्ततेजाः मनसि संपद्यमानैः इंद्रियैः पुनर्भवं ( म्हणून ज्या जीवांचें तेज नाहींसें झालें आहे, तो आसन्नमरण पुरुष मनामध्यें लीन झालेल्या इंद्रियांसह पुनः जन्म घेतो. ) ॥ ॥९॥

मागील मंत्रांत बाह्य अनुग्राहकांचें वर्णन झालें व तेथेंच अध्यात्मावरील अनुग्रहाचेंही वर्णन झालें. उदान वायूवर सामान्य तेजाचा अनुग्रह होतो. मुख्य प्राण वायु हा सूर्य, अग्नि इत्यादि देवतांवर अनुग्रह करून त्यांचें धारण करितो. आणि प्राणापानादिकांवर अनुग्रह करून त्यांच्या द्वारानें ते ज्या शरीराचे ग्राहक असतात त्यावर ही अनुग्रह करितो. म्हणजे मुख्यप्राण हा अनेक प्राणापानादि स्वरूपें धारण करून त्यांच्या योगानें त्या शरीराची व शरीरभागांची धारणा करितो. अर्थात्च भौतिक जें शरीर त्याच्यावर मुख्यप्राणाचा अनुग्रह होतो.

तसेंच प्राण हाच नेत्र आहे, वाणी आहे, इत्यादि श्रुति आहे म्हणून नेत्र कर्णादि इंद्रियें हीं प्राणरूपच होत. नेत्र-श्रवणादि इंद्रियांस जीं रूपशब्दादि ज्ञानें होतात, तीं मुख्य प्राणाच्या अनुग्रहानेंच होतात. एवंच सूर्यादि देवता प्राणरूप, चक्षु श्रवणादिकांचीं शारीरिक स्थानेंही प्राणरूप आणि रूप शब्दादि जे विशेष अध्यात्म संस्कार होतात तेही प्राणरूपच आहेत. सारांश, सर्वांवर प्राणाचा अनुग्रह आहे. अधिभूत, अधिदेव आणि अध्यात्मस्वरूपानें सर्वांवर मुख्य प्राणाचा अनुग्रह आहे. हा प्राणाचा अनुग्रह जोंपर्यंत असतो तोंपर्यंत जीव जिवंत राहतो. पण ज्यावेळीं हा अनुग्रह नाहींसा होतो, उदानाकर तेजाचा अनुग्रह होत नाहीं, तेव्हां जीव मरणासन्न होतो असें या मंत्रांत सांगितलें. ज्या जीवाच्या मनाचे संकल्प विकल्प संपले नाहींत त्याची वाणी, नेत्र, कर्ण इत्यादि इंद्रियें मनामध्यें प्रवेश करितात. आणि हा असा बनलेला लिंगदेह दुसऱ्या शरीरांत प्रवेश करितो. हा मंत्र वाचतांना गीतेंतील १५ व्या अध्यायाची आठवण कोणास होणार नाहीं? यावरून असें ठरतें कीं जोंपर्यंत वासना आणि संकल्प जिवंत आहेत, जों पर्यंत अज्ञान संपत नाहीं तोंपर्यंत जीवाची जन्म-मरण यात्राही संपत नाहीं. तथापि मुख्य गोष्टही लक्षांत ठेवावयाची कीं, प्राणाचा अनुग्रह नाहींसा झाला म्हणजे जीवाचें आयुष्य-सूत्र त्रुटित होतें. ॥ ९ ॥

---

## मंत्र दहावा.

**यच्चित्तस्तेनैष प्राणमायाति प्राणस्तेजसा युक्तः।**
**सहाऽऽत्मना यथासंकल्पितं लोकं नयति ॥ १० ॥**

**अन्वय व अर्थ**—यच्चितः तेन एषः प्राणः ( मनुष्याचे जे संकल्प असतील त्यांच्यासह हा प्राण मुख्य प्राणामध्यें प्रवेश करितो. ) तेजसा युक्तः-प्राणः-आत्मना सह यथा संकल्पितं लोकं नयति ( नंतर तेजानें युक्त झालेला प्राण आपल्या स्वामीसह अशा लोकाला जातो कीं जेथें जाणें ल्या स्वामीला इष्ट असतें. ) ॥ १० ॥

या मंत्रांत असें सांगितलें आहे कीं, मनुष्य मरणासन्न झाला म्हणजे त्याचा उदानवायु त्याच्या वासनांसह मुख्य प्राणांत प्रवेश करितो. नंतर हा प्राण भोगाची वासना असणाऱ्या जीवासह शरीर सोडून बाहेर जातो. पुढें हा प्राण वायु आपल्या स्वामींस ( जीवांस ) इष्ट असणाऱ्या म्हणजे पापपुण्यानुसार सिद्ध झालेल्या वासनांच्या अनुरोधानें निश्चित झालेल्या लोकीं घेऊन जातो. ॥ १० ॥

---

## मंत्र अकरावा.

**य एवं विद्वान्प्राणं वेद। न हास्य प्रजा हीयतेऽमृतो भवति तदेषः श्लोकः ॥ ११ ॥**

अन्वय व अर्थ—यः विद्वान् प्राणं एवं वेद, न ह अस्य प्रजा हीयते; अमृतः भवति ( ज्या विद्वान् पुरुषाला प्राणाचें हें श्रुत्युक्त स्वरूप समजलें त्याची प्रजा केव्हांही नाहींशी होत नाहीं. तसेंच तो पुरुष अमर होतो ) तत् एषः श्लोकः ( हा सिद्धांत समर्थन करणारा पुढील श्लोक आहे. ) ॥ ११ ॥

या मंत्रांत प्राणाचें ज्ञान असणाऱ्या पुरुषाचें ऐहिक कल्याण होतें. म्हणजे त्याचा वंशच्छेद होत नाहीं. त्याला पारमार्थिक फलही प्राप्त होतें. म्हणजे तो पुरुष प्राणरूप होऊन अमर होतो. सारांश, त्याला ऐहिक व पारमार्थिक सुखाचा लाभ होतो. प्राणाचें स्वरूप समजन घेऊन जें कुल प्रजापतिव्रताचें अनुष्ठान करितें, त्याचा वंशवृक्ष अखंड राहतो व ह्या ज्ञानी कुलांतील विद्वान पुरुष कल्पपर्यंत सूर्यलोकीं अमर होऊन राहतात. ही फलश्रुति होय. ॥ ११ ॥

---

## मंत्र बारावा.

**उत्पत्तिमायतिं स्थानं विभुत्वं चैव पञ्चधा। अध्यात्मं चैव प्राणस्य विज्ञायामृतमश्नुते विज्ञायामृतमश्नुत इति ॥ १२ ॥**

अन्वय व अर्थ—प्राणस्य उत्पत्तिं, आयतिं, स्थानं, विभुत्वं च पञ्चधा एव, अध्यात्मं च एव विज्ञाय अमृतं अश्नुते, विज्ञाय अमृतं अश्नुते इति ( प्राणाची उत्पत्ति, त्यांचें आगमन, त्याचीं स्थानें, त्याचें स्वामित्व, त्याचे पांच विभाग आणि त्याचें आध्यात्मिक, आधिदैविक व आधिभौतिक स्वरूप समजलें असतां जीवाला प्राणरूपी अमरत्व प्राप्त होतें. )॥१२॥

वरील १० मंत्रांत कौसल्यास जीं उत्तरें दिलीं व अकराव्या मंत्रांत जी फल श्रुति सांगितली त्यांचाच अनुवाद या मंत्रांत केला आहे. ॥ १२ ॥

**येथें तिसरा प्रश्न समाप्त झाला.**

या प्रश्नांत प्राणाच्या गमनागमनाचे उपप्रश्न उत्पन्न करून त्याचें पूर्ण स्वरूप उद्घाटित केलें आहे.

## प्रश्न चवथा.

### मंत्र पहिला.

**अथ हैनं सौर्यायणी गार्ग्यः पप्रच्छ ॥**

अन्वय व अर्थ—अथ सौर्यायणी गार्ग्यः एनं पप्रच्छ ह ( नंतर सूर्य कुलोत्पन्न गार्ग्यानें—गर्गगोत्रोत्पन्न पुरुषानें पिप्पलादमुनींस विचारिलें.)

**भगवन्नेतस्मिन्पुरुषे कानि स्वपन्ति कान्यस्मिञ्जाग्रति कतर एष देवः स्वप्नान्पश्यति कस्यैतत्सुखं भवति कस्मिन्नु सर्वे संप्रतिष्ठिता भवन्तीति ॥ १ ॥**

अन्वय व अर्थ—( १ ) भगवन् एतस्मिन् पुरुषे कानि स्वपन्ति ( २ ) अस्मिन् कानि जाग्रति, ( ३ ) कतरः एषः देवः स्वप्नान् पश्यति, (४) कस्य एतत् सुखं भवति, (५) नु कस्मिन् सर्वे संप्रतिष्ठिताः भवन्ति इति १ भगवन्, ह्या पुरुषामध्यें कोण झोंपी जातात, २ कोण जागृत राहतात, ३ कोणता देव स्वप्नें पाहतो, ४ कोणाला सुख प्राप्त होतें आणि ५ कोणच्या ठिकाणीं हे सर्व प्रतिष्ठित होतात ? या प्रश्नांचीं उत्तरें मला द्यावीं. ) ॥ १ ॥

येथें पांच प्रश्न विचारिले आहेत. (१) पुरुषाला स्वप्न पडत असतां किंवा तो निद्रेंत असतां त्याचीं कोणतीं इंद्रियें झोंपी जातात, २ कोणतीं जागृत असतात ( ३ ) स्वप्नाचा द्रष्टा कोण ? ( ४ ) निद्रेमध्यें जें सुख उत्पन्न होतें, त्याचा भोक्ता कोण ? ( ५ ) आणि गाढ निद्रा लागली असतां हीं सर्व इंद्रियें कोठें जाऊन लीन होतात, असे हे पांच प्रश्न आहेत. वाचकांच्या ध्यानांत येईलच कीं, प्रश्नोपनिषदांतिल पहिल्या तीन प्रश्नांत चराचरात्मक जागृतीच्या व्यवहाराचा विचार झाला आहे. चौथा प्रश्न हा व्यवहाराच्या पलीकडचा आहे. येथें जागृत स्थिति संपून स्वप्नस्थिति व निद्रास्थिति यांस आरंभ झाला. आपलीं कर्मेंद्रियें व ज्ञानेंद्रियें स्तब्ध झालीं असतांही स्वप्नामध्यें व्यवहार चालतोसा दिसतो, तेव्हां आपल्यास प्राप्त झालेल्या उपकरणांत कोणतीं इंद्रियें झोंपी जातात, कोणतीं जागृत असतात, स्वप्नाला पाहतो कोण ? गाढनिद्रेमध्यें सुख कोणाला होतें ? इत्यादि प्रश्न जागृत जीवाचे अथवा व्यवहारी जीवाचे संबंधानें नव्हेत; इंद्रियें स्वकर्मनिवृत्त झालीं असतांही आपण स्वप्नें पाहतों व व्यापार करितों असें भान असतें. तेव्हां सहजच प्रश्न उत्पन्न होतो कीं, स्वप्नस्थितींत जागें तरी कोण असतें ? स्वप्नें पाहणारा कोण ? आणि निद्राकालीं मनबुद्धि निर्व्यापार असूनही सुखाचा अनु-

भव येतो तो कोणाला ? या प्रश्न–परंपरेवरून असें दिसतें कीं गार्ग्याचा अभिप्राय इंद्रियातीत असणाऱ्या कोणा एकाचें स्वरूप काय आहे हें समजावें. जागृति, स्वप्न, आणि सुषुप्ति यांच्या पलीकडे असून नेत्र कर्णादि व बुद्धिमनादि ज्ञानोपकरणें व कर्मसाधनें नसणारा असा जो कोणी एक आहे, त्याचें स्वरूप समजन घ्यावें. अर्थात् हा प्रश्न आत्मविषयक आहे. अर्थातच येथें व्यावहारिक शास्त्राची मात्रा चालत नाहीं. कारण व्यवहारशास्त्रें भौतिक असोत, अथवा मानासिक असोत, वा सामाजिक अथवा नैतिक असोत, त्यांचे सिद्धांत व त्यांचे निमय सांगतां येण्यासारख्या अनुभवावरून व परंपरेवरून सिद्ध झालेले असतात. पण जागृत स्थिति संपून निद्रास्थिति किंवा मृत्युस्थिति प्राप्त झाली, म्हणजे येथें वाच्य अनुभवाचें राज्य संपतें. अनुभवजन्य अथवा परंपराप्राप्त शास्त्रांचें येथें कांहीं चालत नाहीं. शब्दांनीं किंवा इतर दृश्य चिन्हांनीं जेथील गोष्टी समजत नाहींत, तेथें बिचारीं शास्त्रें काय करणार ? म्हणून हे निद्रास्थितींतील अनुभव व त्याची मीमांसा सुघटित करण्यास श्रुतीची (अपौरुषेय ग्रंथांची) आवश्यकता आहे. शंकराचार्यांनीं म्हटल्याप्रमाणें येथून पुढें आतां पराविद्येला आरंभ झाला आहे; म्हणून हा विषय आत्मपर आहे. याचें दिग्दर्शन एक श्रुति मात्र करूं शकते. ॥ १ ॥

---

## मंत्र दुसरा.

**तस्मै स होवाच । यथा गार्ग्य मरीचयोऽर्कस्यास्तं गच्छतः सर्वा एतस्मिंस्तेजोमण्डल एकीभवन्ति । ताः पुनः पुनरुदयतः प्रचरन्त्येवं ह वै तत्सर्वं परे देवे मनस्येकीभवति । तेन तर्ह्येष पुरुषो न शृणोति न पश्यति न जिघ्रति न रसयते न स्पृशते नाभिवदते नाऽऽदत्ते नाऽऽनन्दयते न विसृजते नेयायते स्वपितीत्याचक्षते ॥ २ ॥**

अन्वय व अर्थ––तस्म स ह उवाच ( गार्ग्याला पिप्पलाद मुनींनीं उत्तर दिलें ) गार्ग्य ! अस्तं गच्छतः अर्कस्य सर्वाः मरीचयः यथा एतस्मिन् तेजोमंडले एकीभवन्ति, पुनः पुनः उदयतः प्रचरन्ति ( गार्ग्य-शिष्य ! अस्ताला जाणाऱ्या सूर्याचे सर्व किरण ह्या तेजोमंडलामध्यें सामावून जाऊन एकरूपी होतात आणि पुनः पुनः सूर्योदय झाला असतां हे किरण सर्वत्र संचार करितात. ) एवं ह वै परे देवे मनसि तत् सर्वं एकीभवति ( त्या प्रमाणें इंद्रियांच्या पलीकडे असणारें व

इंद्रियांस प्रकाशित करणारें जें मन त्यामध्यें हीं सर्व इंद्रियादि उपकरणें लीन होतात. ) **तेन तर्हि एषः पुरुषः न शृणोति, न पश्यति, न जिघ्रति न रसयते, न स्पृशते, न, विसृजते, न ईयायते, स्वपिति इति आचक्षते** ( म्हणून हा पुरुष ऐकत नाहीं, पाहत नाहीं, याला वास येत नाहीं, रसज्ञान होत नाहीं, हा स्पर्श करीत नाहीं, बोलत नाहीं, कांहीं देत घेत नाहीं, त्याला आनंद होत नाहीं, तो जात येत नाहीं. अशी स्थिति असली म्हणजे तो निजलेला असें म्हणतात. ॥ २ ॥

या मंत्रांत असें सांगितलें आहे कीं निद्राकालीं आपलीं सर्व ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें मनामध्यें प्रवेश करून लीन होतात. हीं सर्व इंद्रियें मनाच्या तंत्रानें स्वस्वव्यापार करितात; त्यावेळीं पुरुष जागा असतो. पण तो ज्यावेळीं झोंपी जातो, त्यावेळीं हीं सर्व ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें व्यापारविन्मख होऊन मनामध्यें शिरून एकरूप (मनोरूप) होतात. अर्थातच या वेळीं निद्रागत पुरुषाला बाह्य विषयांचें ज्ञान होणाऱ्या पण स्तब्ध झालेल्या इंद्रियांच्या द्वारें कोणत्याही विषयाचें ज्ञान होत नाहीं. तसेंच त्यांचीं सर्व कर्मेंद्रियेंही स्तब्ध असतात. यालाच निद्रा असें म्हणतात. मनाच्या तंत्रानें सर्व इंद्रियें आपापलीं कर्में करितात किंवा विषय प्रकाशितात हा श्रुतीचा सिद्धांत आधुनिक मानसिक सिद्धांताची पूर्ण पूर्वकृति आहे. केवळ इंद्रियें विषयग्रहणाला किंवा विषयाचें ज्ञान करून घेण्याला समर्थ नाहींत, मनाचें साहाय्य असल्याशिवाय इंद्रियांना विषयज्ञान होत नाहीं किंवा विषय देतां घेतां येत नाहीं, हा सिद्धांत सर्वमान्य आहे. मंत्रांत मनाला देव ( विषय-प्रकाशक ) असें म्हटलें आहे, तें सर्वथा योग्य आहे. त्याच्याच तंत्रानें सर्व इंद्रियें स्वकर्म करितात आणि झोंपेच्या कालींही मनांतच लीन होतात. सारांश, सूर्य उदित झाला म्हणजे त्यापासून निघणारे किरण सर्व विषय प्रकाशित करितात आणि तो अस्ताला गेला म्हणजे ते सर्व किरण सूर्यबिंबांत प्रविष्ट होतात. लीनकालीं किरणांस विषयप्रकाशनाचें सामर्थ्य असत नाहीं. हा प्रकार आपण नित्य पाहतों. असाच इंद्रियांचा व मनाचा संबंध आहे. सारांश, निद्राकालीं ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें झोंपी जातात. हें गार्ग्याच्या पहिल्या प्रश्नाचें उत्तर आहे. इंद्रियें मनोरूप होतात, ही गोष्ट ध्यानांत ठेवावी. मनस्तंत्रानें चालणारीं इंद्रियें केव्हां केव्हां मन जाग्यावर नसलें तरी आपापलीं कामें करितात, असा क्वचित् प्रसंगीं अनुभव येतो. पण इंद्रियें मनोरूप झालीं म्हणजे विषयदर्शनाचें त्यांचें काम निःशेष संपतें. हा आर्यसिद्धांताचा विषय-विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे. ॥ २ ॥

## मंत्र तिसरा.

**प्राणाग्नय एवैतस्मिन्पुरे जाग्रति। गार्हपत्यो ह वा एषोऽपानो व्यानोऽन्वाहार्यपचनो यद्गार्हपत्यात्प्रणीयते प्रणयनादाहवनीयः प्राणः ॥ ३ ॥**

**अन्वय व अर्थ**—**एतस्मिन् पुरे प्राणाग्नयः एव जाग्रति** ( ह्या शरीर-नगरींत पंचप्राणरूप अग्नि–अग्निरूप पंचप्राण–हे मात्र जागृत असतात. ) **एषः अपानः गार्हपत्यः ह वै** ( पंचप्राणांतील अपान हा गार्हपत्य अग्नि आहे. ) **व्यानः अन्वाहार्यपचनः** ( व्यान हा अन्वाहार्यपचन अथवा दक्षिणाग्नि आहे. ) **यत् गार्हपत्यात् प्रणीयते, प्रणयनात् प्राणः आहवनीयः** ( जो गार्हपत्य अग्नीपासून घेतला जातो तो आहवनीय अग्नि म्हणजे प्राण होय, ) ॥ ३ ॥

वैदिकधर्म ठाऊक असणाऱ्या वाचकांस हें सांगावयास नकोच कीं, अग्नि-होत्रामध्यें विशेष प्रकारचीं तीन कुंडें असतात. त्यांस प्रत्येकीं गार्हपत्य, दक्षिण आणि आहवनीय अशीं नांवें आहेत. गार्हपत्य अग्नि हा प्रत्येक गृहस्थानें ठेवला पाहिजे. लग्न झाल्या दिवसापासून तो मरणापर्यंत हा अग्नि प्रत्येक गृह-स्थाच्या घरीं पिढीदरपिढीला जिवंत असावा लागतो. दुसरे; सर्व अग्निहोत्र-संबंधी किंवा इतर धार्मिक संबंधी संस्कारांस लागणारा अग्नि गार्हपत्य अग्नी-पासूनच घेत असतात. आहवनीय अग्नीचें कुंड पूर्वेकडे असतें व दक्षिणाग्नीचें कुंड दक्षिणेकडे असतें. दक्षिणाग्नीमध्यें दर्शकाळीं अथवा श्राद्धपक्षादिकाळीं द्यावे लागणारे पिंडाची आहुति देतात. याप्रमाणें तीन अग्नींची व्यवस्था सांगितली. पंचप्राण हे आपल्या शरीरांतील पंचाग्नि आहेत. त्यांतील अपान हा गार्हपत्याच्या स्थानीं आहे. या अपानवायपासूनच मुख–नासिकांच्या द्वारानें संचार करणारा प्राण ग्रहण केलेला असतो. व्यान हा हृदयाच्या दक्षिणनाडीनें बाहेर येतो व तो सर्व शरीरभर पसरतो, म्हणून त्याला दक्षिणाग्नीचें नांव दिलें आहे. वैदिक धर्मानें चालणाऱ्या आर्यांच्या घरीं अग्नि नित्य जागृत असतो. त्याप्रमाणें शरीर-नगरींतील अपान, व्यान, आणि प्राण हे नित्य जागृत असतात. समान व उदान हेही प्राण जागृत असतात; पण यांचें वर्णन पुढील मंत्रांत येणार आहे. असो; इंद्रियें निद्रित झालीं असतां जागें कोण राहतें, या प्रश्नाला प्राण जागृत राहतात हें उत्तर आहे. ॥ ३ ॥

## मंत्र चवथा.

**यदुच्छ्वासनिश्वासावेतावाहुती समं नयतीति स समानः । मनो ह वाव यजमान इष्टफलमेवोदानः स एनं यजमानमहरहर्ब्रह्म गमयति ॥ ४ ॥**

अन्वय व अर्थ—यत् उच्छ्वासनिश्वासौ एतौ आहुती समं नयति इति सः समानः (आपले उच्छ्वास आणि निश्वास या दोन आहुति आहेत. त्या दोन आहुती साम्य स्थितीला नेऊन जो शरीररक्षण करितो तो समानवायु होय.) मनः ह वाव यजमानः (मन खरोखर यजमान आहे.) उदानः इष्टफलं एव (उदान वायु हा इष्ट फल अथवा इष्ट फलाचा दाता आहे.) सः एनं यजमानं अहरहः ब्रह्म गमयति (हा उदान वायु यजमानाला प्रत्येक दिवशीं ब्रह्मस्वरूपाकडे नेतो.) ॥ ४ ॥

या मंत्रांत समान आणि उदान या दोन वायूंचा विचार केला आहे. आपण तिन्ही अवस्थांमध्ये बाहेर श्वास टाकणें व आंत श्वास घेणें यांची म्हणजे श्वासोच्छ्वासाची क्रिया करीत असतों. श्वासोच्छ्वास (श्वास व उच्छ्वास) हा दोन नित्य आहुति आहेत. या आहुति देणारा समानवायु आहे. समानवायु हा होता होय. स्वतः समान हा जरी अग्निरूप आहे तथापि तो श्वासोछ्वासरूपी आहुति देतो, म्हणून त्याच्याकडे होतृत्व येतें. उदानवायूच्या साहाय्यानें आपल्याला इष्टप्राप्ति होते, म्हणून त्याला फल असें म्हटलें. या अग्निहोत्राचा यजमान मन आहे. याप्रमाणें अपान, व्यान, आणि प्राण हे तीन अग्नि, समान हा होता, मन यजमान आणि उदान यज्ञ-फल-दाता आहे. असो; जसें ज्ञान किंवा जसें कर्म असेल त्याप्रमाणें उदानवायु फल देतो असें मागें सांगितलें आहे. असो; श्रुतींतील अग्निहोत्राची कल्पना येथें ठाकसेठीक बसली. अग्निहोत्रांतील अग्नि नेहमीं जिवंत असतो म्हणून प्राणाचेंही नित्य-जागृतत्व स्पष्ट होतें. आणि हें त्याचें जागरण म्हणजे एक नित्य सिद्ध होत असणारें अग्निहोत्र होय. ॥ ४ ॥

---

## मंत्र पांचवा.

**अत्रैष देवः स्वप्ने महिमानमनुभवति । यद् दृष्टं दृष्टमनुपश्यति श्रुतं श्रुतमेवार्थमनुशृणोति देशदिगन्तरैश्च प्रत्यनुभूतं पुनः पुनः प्रत्यनुभवति दृष्टं**

**चादृष्टं च श्रुतं चाश्रुतं चानुभूतं चाननुभूतं च सच्चासच्च सर्वं पश्यति सर्वः पश्यति ॥ ५ ॥**

अन्वय व अर्थ—अत्र एषः देवः स्वप्ने महिमानं अनुभवति (जागृत-स्थिति संपली असतां हा मनोदेव स्वप्नकाळीं आपल्या स्वतःच्या विभूतीचा पराक्रमाचा—ऐश्वर्याचा—अनुभव घेतो ) **यत् दृष्टं दृष्टं अनुपश्यति, श्रुतं श्रुतं एव अर्थं अनुशृणोति, देशदिगन्तरैः च प्रत्यनुभूतं पुनः पुनः प्रत्यनुभवति** (जें काय वारंवार पाहिलें असेल, ऐकलें असेल किंवा निर-निराळ्या देशीं किंवा निरनिराळ्या दिशेला ज्याचा अनुभव आला असेल तें हा मनोदेव स्वप्नामध्यें पुनः पाहतो,पुनः ऐकतो आणि पुनः त्याचा अनुभव घेतो ) **दृष्टं च अदृष्टं च, श्रुतं च अश्रुतं च, अनुभूतं च अननुभूतं च, सत च असत् च, सर्वं पश्यति सर्वः पश्यति** ( जें काय दृष्ट म्हणजे येथें पाहिलें असेल किंवा अदृष्ट या जन्मांत न पाहतां पूर्वजन्मांत पाहिलें असेल, या जन्मीं ऐकिलें असेल किंवा पूर्वजन्मीं ऐकिलें असेल, याजन्मीं किंवा देशदिगंतरीं अनुभव घेतला असेल किंवा पूर्वजन्मीं घेतला असेल, त्या सर्व पदार्थांचें दर्शन आणि जलासारख्या सद्वस्तु व मृगजलासारख्या असद्वस्तु, सारांश, सर्व वस्तु—पाहण्याला हें मन समर्थ आहे. कारण सर्व इंद्रियांचें नियंतृत्व मनाकडे आहे. ) ॥ ५ ॥

या मंत्रांत गार्ग्याच्या तिसऱ्या प्रश्नाचें उत्तर दिलें आहे. सर्व इंद्रियें निद्रा-वश झालीं असतां स्वप्नकाळीं द्रष्टा कोण असतो हा प्रश्न आहे. त्याचें उत्तर मन, द्रष्टा असतो हें आहे. स्वप्नकाळीं आपलीं सर्व कर्ण—नेत्रादि ज्ञानेंद्रियें व हस्तपादादि कर्मेंद्रियें स्तब्ध असतांही स्वप्नामध्यें अनेक वस्तु आपण पाहतों, अनेक वस्तूंचा दान—प्रतिग्रह करितों, याचें द्रष्टृत्व व कर्तृत्व मनाकडे असतें. जागृतकाळीं वस्तु पाहत असतां किंवा आपण कर्म करीत असतां मनावर कांहीं एक विशिष्ट संस्कार होत असतात व स्वप्नकाळीं ते ते संस्कार स्वबला-नुरूप कमी किंवा जास्ती प्रमाणानें मनःप्रेरणेमुळें जागृत होतात. आणि जीवाचे बाह्य व्यापार संपले म्हणजे कांहीं बलवान् संस्कार आपापलीं स्वरूपें प्रकट करितात. या स्वरूपांचा द्रष्टा मन आहे व त्या प्रमाणेंच आपण जें काय कर्म करितों त्याचाही कर्ता व द्रष्टा मन आहे. सामान्यतः स्वप्नामध्यें ज्या वस्तूंचा अनुभव आपल्यास येतो त्या वस्तु जागृतकाळीं आपण पाहिलेल्या ऐकलेल्या किंवा दिल्या घेतलेल्या असतात. केव्हां केव्हां आपण पाहिली नाहीं किंवा ऐकली नाहीं अशी वस्तु आपल्यास स्वप्नामध्यें दिसते, हें कसें ? याचा उलगडा श्रुति अशा करिते कीं, पूर्व जन्मीं आपण त्या गोष्टी पाहिलेल्या किंवा ऐकिलेल्या

असतात. उदाहरणार्थ मनुष्याला एखादे वेळीं आपणा स्वतःस फाशी दिल्याचें स्वप्न पडतें. आतां आपल्या स्वतःचा शिरश्छेद झाला, हें या जन्मांत पाहणें मनुष्यास शक्य नाहीं. पण तसें स्वप्न तर पडतें. तेव्हां या भानगडीचा श्रुति असा उलगडा करितात कीं, स्वप्नांत फाशी गेलेल्या मनुष्याचा लिंगदेह फाशी जाण्याचा विधि पाहतो, व हा संस्कार देहांतरीं ( स्थूल देहांत ) उद्भूत होऊन आपण फाशी गेलों असें मनुष्याला स्वप्न पडतें. ही मीमांसा संप्रदायसिद्ध आहे. पण मला असें वाटतें कीं, बाहेरून आलेल्या वस्तुज्ञानाचें ग्रहण करणें हें सामर्थ्य मनाला आहे, त्याप्रमाणेंच वस्तूंच्या स्वरूपाची विघटना करणें, विरोधी वस्तूंस एकत्र करणें किंवा सजातीय वस्तूंस भिन्न करणें इत्यादि कर्तृकत्व ही मनाकडे आहे. जागृत कालीं कवि, चित्रकार इत्यादि ललित-कलांचे पुरस्कर्ते, वस्तूंचें अथवा वस्तुसमहाचें स्वरूपांतर करितात, हें आपण पाहतों. हें सामर्थ्य त्यांस मनाच्या उत्कट कर्तृत्वानें प्राप्त होतें. जागृत कालीं जर मनाला हें सामर्थ्य असतें तर स्वप्न कालीं तरी तें कां नसावें ? असो; श्रुतीचा असा अर्थ करावा कीं जाग्रत कालीं न पाहिलेल्या वस्तु मनोदेव हा स्वप्नकालीं उत्पन्न करितो. सारांश, मनाकडे भोक्तृत्व आहे तसेंच कर्तृत्वही आहे. यामुळें त्यास सद्वस्तूचा व असद्वस्तूचा ( खऱ्या व खोट्या गोष्टींचा ) अनुभव घेतां घेतां म्हणजे तें सर्वज्ञ आहे व सर्वरूप आहे असें ठरतें. हा सर्व प्रकार मनाच्या वासनासामर्थ्यानें सिद्ध होतो. ॥ ५ ॥

---

## मंत्र सहावा.

**स यदा तेजसाऽभिभूतो भवति । अत्रैष देवः स्वप्नान्न पश्यत्यथ तदैतस्मिञ्शरीर एतत्सुखं भवति ॥ ६ ॥**

**अन्वय व अर्थ**—सः यदा तेजसा अभिभूतः भवति ( हा मनोदेव जेव्हां तेजानें वेष्टिला जातो ) अत्र ( तेव्हां ) एषः देवः स्वप्नान् न पश्यति ( हा मनोदेव स्वप्नें पाहण्यास असमर्थ होतो ) अथ तदा एतस्मिन् शरीरे एतत् सुखं भवति ( नंतर त्या वेळीं ह्या शरीरांत उत्तम प्रकारचें हें सुख होतें. ) ॥ ६ ॥

स्वप्नस्थिति संपून निद्राकाल प्राप्त झाला म्हणजे हा मनोदेव एका प्रकारच्या पित्तात्मक तेजानें वेष्टिला जातो. यावेळीं म्हणजे निद्राकालीं मनाला स्वप्नें दिसत नाहींत, म्हणजे मन ही यावेळीं व्यापारशून्य असतें. याप्रमाणें मन, बुद्धि, चित्त आणि अहंकार हीं सर्व व्यापारशून्य झालीं म्हणजे प्रत्यगात्मा ( जीवात्मा )

निरुपाधि होतो. त्याचें सर्व विशेष ज्ञान नाहींसें होतें. तो स्वस्वरूप होतो. स्वस्वरूप म्हणजे सुखरूप होय. जीवाला निद्राकालीं सुखानुभव येतो, तो जीव परमार्थतः आत्मरूप असतो म्हणन येतो. याप्रमाणें कोणाला सुख होतें ह्या गार्ग्याच्या चौथ्या प्रश्नाला असें उत्तर मिळालें कीं मनाच्या पलीकडे असणारा जो जीव किंवा आत्मा तो सुखी होतो. वास्तविक तो सुखरूपच आहे. मन आदि उपाधींनीं विशेष ज्ञान व विशेष कर्तृत्व उत्पन्न केलें असल्यामुळें जीवाला सुख-दुःखाचें किंवा शीतोष्णाचें भान होतें. इतकेंच कायतें. उपाधि संपल्या म्हणजे हें भान संपतें आणि तो जसा स्वरूपतःच सुखरूप असतो तसाच 'मी आहें, असें त्याला ज्ञान होतें म्हणजे अनुभव येतो, सुखरूप होतो. ॥ ६ ॥

---

## मंत्र सातवा.

**स यथा सोम्य वयांसि वासोवृक्षं संप्रतिष्ठन्ते।**
**एवं ह वै तत्सर्वं पर आत्मनि संप्रतिष्ठते ॥ ७ ॥**

अन्वय व अर्थ—यथा हे सोम्य! वयांसि वासोवृक्षं संप्रतिष्ठंते, एवं ह वै तत् सर्वं-च-सः परे आत्मनि संप्रतिष्ठते (हे सौम्य ज्याप्रमाणें पक्षी आपल्या आश्रय देणाऱ्या वृक्षावर जाऊन बसतात, त्याप्रमाणें हें सर्व विश्व आणि हा औपाधिक जीव परमात्म्याचा आश्रय करितात.) ॥७॥

याचा भावार्थ स्पष्ट आहे. संध्याकाळीं पक्षी जसे एखाद्या महावृक्षाचा आश्रय करून तेथें राहतात, त्या प्रमाणें हें सर्व विश्व व त्याचा द्रष्टा व भोक्ता जीव, सारांश सर्व चराचर वस्तु परमात्म-स्वरूपाच्या आश्रयाला जाऊन सुखरूप राहतात व शेवटीं तेथें लीन होतात. सूर्योदय झाल्यावर ज्याप्रमाणें पक्षी चोहोंकडे उड्डन जातात. त्याप्रमाणें व्यवहारकालीं, अज्ञानकालीं, हा सर्व प्रपंच आणि त्यांतील जीव 'आपण परमात्म्याच्या आश्रयाला आहोंत' हें विसरतात आणि विशेष सुख-दुःखांचीं कारणें आणि कार्यें पतकरून जीव सुख-दुःखाचा अनुभोक्ता होतो. ॥ ७ ॥

---

## मंत्र आठवा.

**पृथिवी च पृथिवीमात्रा चाऽऽपश्चाऽऽपोमात्रा च**
**तेजश्च तेजोमात्रा च वायुश्च वायुमात्रा चाऽऽका-**
१३॥

**शश्वाऽऽकाशमात्रा च चक्षुश्च द्रष्टव्यं च श्रोत्रं च श्रोतव्यं च घ्राणं च घ्रातव्यं च रसश्च रसयितव्यं च त्वक्च स्पर्शयितव्यं च वाक्च वक्तव्यं च हस्तौ चाऽऽदातव्यं चोपस्थश्चाऽऽनन्दयितव्यं च पायुश्च विसर्जयितव्यं च पादौ च गन्तव्यं च मनश्च मन्तव्यं च बुद्धिश्च बोद्धव्यं चाहंकारश्चाहंकर्तव्यं च चित्तं च चेतयितव्यं च तेजश्च विद्योतयितव्यं च प्राणश्च विधारयितव्यं च ॥ ८ ॥**

अन्वय व अर्थ—पृथिवी च पृथिवीमात्रा च, आपः च आपोमात्रा च, तेजः च तेजोमात्रा च, वायुः च वायुमात्रा च, आकाशः च आकाशमात्रा च, चक्षुः च द्रष्टव्यं च, श्रोत्रं च श्रोतव्यं च, घ्राणं च घ्रातव्यं च, रसश्च रसयितव्यं च, त्वक् च स्पर्शयितव्यं च, वाक् च वक्तव्यं च, हस्तौ च आदातव्यं च, उपस्थः च आनंदयितव्यं च, पायुः च विसर्जयितव्यं च, पादौ च गंतव्यं च, मनः च मंतव्यं च, बुद्धिः च बोद्धव्यं च, अहंकारः च अहंकर्तव्यं च, चित्तं च चेतयितव्यं च, तेजः च विद्योतयितव्यं च प्राणः च विधारयितव्यं च ( पृथ्वी आणि तिची गंधतन्मात्रा, जल आणि जलमात्रा, तेज आणि त्याची मात्रा, वायु आणि त्याची मात्रा, आकाश व आकाशमात्रा, नेत्र आणि द्रष्टव्य—पहावयाची वस्तु,—कर्ण आणि श्रोतव्य, घ्राण आणि घ्रातव्य, रस आणि रसयितव्य, त्वचा आणि स्पृश्य वस्तु वाणी आणि तिचा विषय, हस्त आणि ग्रहण करण्याचे विषय, उपस्थ आणि रतिविषय, पायु—गुदद्वार—आणि मल, चरण आणि गमन, मन आणि मननाचा विषय, बुद्धि आणि जाणण्याचा विषय, अहंकार आणि त्याचा विषय, चित्त आणि त्याचा विषय, तेज आणि त्याचा विषय, प्राण आणि प्राणाचा विषय, हीं सर्व परमात्म्याचा आश्रय घेणारीं आहेत.) ॥८॥

सातव्या मंत्रांत उल्लेखिलेल्या प्रपंचाचें विस्तृत वर्णन येथें केलें आहे. या वर्णनात पृथ्वीआदि पंच महाभूतें व त्यांच्या तन्मात्रा, ज्ञानेंद्रियें आणि त्यांचे विषय, कर्मेंद्रियें आणि त्यांचें विषय, मन, बुद्धि, चित्त आणि अहंकार व त्याचे विषय, या पलीकडे राहून मनादिकांस व्यापून टाकणारें तेज आणि प्राण या सर्वांचा निर्देश केला आहे. हा सर्व प्रपंच—विस्तार होय. परमात्म्याचें

स्वरूप या सर्व प्रपंचस्वरूपाहून निराळें असूनही तो परमात्मा या सर्वांस आश्रय देतो. सर्वांचा मूळ आधार परमात्मा असून तो सर्वव्यापी आहे हें येथें मुख्यत्वानें सांगावयाचें आहे. ॥ ८ ॥

---

## मंत्र नववा.

**एष हि द्रष्टा स्प्रष्टा श्रोता घ्राता रसयिता मन्ता बोद्धा कर्ता विज्ञानात्मा पुरुषः स परेऽक्षर आत्मनि संप्रतिष्ठते ॥ ९ ॥**

**अन्वय व अर्थ**—एषः हि द्रष्टा, स्प्रष्टा, श्रोता, घ्राता, रसयिता, मन्ता, बोद्धा, कर्ता, विज्ञानात्मा, पुरुषः, सः परे अक्षरे आत्मनि संप्रतिष्ठते ( आणि द्रष्टा—पाहणारा, स्प्रष्टा—स्पर्श करणारा,—श्रोता, घ्राता—वास घेणारा, रस चाखणारा, मनन करणारा, जाणणारा, कर्ता, असा हा विज्ञानात्मा पुरुष ( जीव ) असतो, तोही अक्षर—अविनाशी असा जो परमात्मा त्याच्या ठिकाणीं आश्रय घेतो. ) ॥ ९ ॥

या मंत्रांत प्रपंच पाहणाऱ्या जीवाचें वर्णन आहे. सातव्या मंत्रांत 'सः' या पदानें अभिप्रेत असणारा जो कर्ता भोक्ता जो जीव, त्याचें वर्णन येथें आहे; प्रापंचिक उपाधि जीवानें पतकरिलेल्या असल्या म्हणजे तो कर्ता, भोक्ता, व विषय पाहणारा असतो. पण हा प्रपंच निद्रेमध्यें जसा परमात्म स्वरूपांत विलीन होऊन एकरूप होतो, त्याच प्रमाणें निद्राकालीं जीवाच्या सर्व उपाधी नष्ट होऊन तो परमात्मस्वरूपी म्हणजे ज्ञानरूप अथवा सुखरूप होतो. याप्रमाणें गार्ग्याच्या पांचव्या म्हणजे शेवटच्या प्रश्नास पिप्पलादांनीं उत्तर दिलें आणि सांगितलें कीं प्रपंच आणि प्रपंच-द्रष्टा जीव हे उभयतां परमात्म-स्वरूपाचा आश्रय करून त्याच्या आधारानें स्थित होतात. असो; याप्रमाणें स्वप्नस्थितीचें व निद्रास्थितीचें वर्णन झालें. जागृत स्थितीचा विचार पहिल्या तीन शिष्यांच्या तीन निरनिराळ्या प्रश्नांत झाला आहे. आतां परमात्म-स्वरूप सांगून, ( सर्वांच्या आधाराचें स्वरूप सांगून ) या प्रश्नाची परिसमाप्ति पिप्पलादमुनि राहिलेल्या दोन मंत्रांत करतील. ॥ ९ ॥

---

## मंत्र दहावा.

**परमेवाक्षरं प्रतिपद्यते स यो ह वै तदच्छायमशरीरमलोहितं शुभ्रमक्षरं वेदयते यस्तु सोम्य। स सर्वज्ञः सर्वो भवति तदेष श्लोकः ॥ १० ॥**

अन्वय व अर्थ—तु यः ह वै तत् अच्छायं, अशरीरं, अलोहितं, शुभ्रं, अक्षरं, यः वेदयते, सोम्य ! सः परं एव अक्षरं प्रतिपद्यते ( पण ज्याला या अच्छाय—तमःशून्य, उपाधिरहित—शरीरशून्य, रूपशून्य, गुणशून्य, शुद्ध आणि अविनाशी स्वरूपाचें ज्ञान होतें, हे सौम्य ! तो पुरुष अविनाशी आणि अत्यंत श्रेष्ठ स्वरूप परमात्मस्वरूप प्राप्त करून घेतो. ( सः-सर्वज्ञः सर्वः भवति ( तो सर्वज्ञाता आणि सर्वरूप होतो.) तत् एषः श्लोकः ( याच अर्थाचा संग्रह करणारा पुढील श्लोक आहे. ) ॥ १० ॥

कोणत्याही प्रकारची छाया नसणाऱ्या, कोणतीही उपाधि नसणाऱ्या निर्गुण, शुद्ध, नित्य, अशा ज्ञानरूप परमात्म्याचें स्वरूप ज्याला समजतें तो पुरुष परमात्मस्वरूपाला जाऊन पोंचतो. सारांश, ब्रह्मवेत्ता ब्रह्म होतो म्हणजे तो सर्वज्ञ होतो, अथवा ज्ञानरूप होतो. तो सर्व होतो अथवा सर्वव्यापी होतो. तात्पर्य जीवाचें सर्व अज्ञान नाहींसें झालें व त्याला पूर्ण प्रपंचवैराग्य झालें, म्हणजे तो ब्रह्मरूप होतो. त्याला मग आशेचें किंवा भीतीचें कारण उरत नाहीं. हीच श्रुतीनें सांगितलेली तुर्यावस्था आहे. ही जागृत, स्वप्न, आणि सुषुप्ति यांच्या पलीकडील अवस्था आहे. या प्रमाणें येथें ब्रह्मस्वरूप कसें आहे व ब्रह्मज्ञानाचें फल काय आहे हें सांगितलें. अर्थातच येथें गार्ग्यकृत प्रश्नपंचकाची समाप्ति झाली. आतां ह्या मंत्रांत जें काय सांगितलें त्याचा अनुवाद करणारा श्रुतिमंत्र उद्धृत केला म्हणजे गार्ग्याच्या प्रश्नाची मीमांसा पूर्ण झाली. ॥ १० ॥

---

## मंत्र अकरावा.

**विज्ञानात्मा सह देवैश्च सर्वैः प्राणा भूतानि संप्रतिष्ठन्ति यत्र। तदक्षरं वेदयते यस्तु सोम्य स सर्वज्ञः सर्वमेवाविवेशेति ॥ ११ ॥**

अन्वय व अर्थ—सोम्य, यत्र सर्वैः देवैः सह विज्ञानात्मा च प्राणः च—भूतानि संप्रतिष्ठन्ति ( सर्व मन इंद्रियादि देवतांसह विज्ञानात्मा—सोपा-

धिक आत्मा, जीव–पंचप्राण आणि सर्व जड वस्तु हीं ज्याचा आश्रय घेतात ) **तत् अक्षरं यः वेदयते तु सः सर्वज्ञः सर्वं एव आविवेश** ( तें अक्षर स्वरूप ज्याला समजतें तो सर्वज्ञ पुरुष सर्वांमध्यें प्रवेश करितो. अथवा तो सर्वव्यापी आणि सर्वसाक्षी होतो. ॥ ११ ॥

पाठीमागील सात, आठ, नऊ, दहा या मंत्रांतील अर्थांचा संग्रह करणारा हा मंत्र आहे. येथें स्पष्ट असें सांगितलें आहे कीं, ज्या पुरुषाला ब्रह्माचें–म्हणजे सर्व इंद्रियें व त्यांच्या देवता यांच्यासह असणारा जो कर्ता भोक्ता जीव, त्यास व सर्व सामर्थ्यें आणि सर्व जड वस्तु यांस आधार देणाऱ्या (यांचें अधिष्ठान असणाऱ्या) अविनाशी ब्रह्माचें–ज्ञान होतें, तो सर्वज्ञ पुरुष सर्वसाक्षी आणि सर्व-व्यापी होतो. ॥ ११ ॥

चवथा प्रश्न समाप्त.

---

## प्रश्न पांचवा.

### मंत्र पहिला.

**अथ हैनं शैब्यः सत्यकामः पप्रच्छ ॥**

**अन्वय व अर्थ**––**अथ ह एनं शैब्यः सत्यकामः पप्रच्छ** ( नंतर सत्यकाम या नांवाच्या शैब्यानें प्रश्न केला. )

**स यो ह वै तद्भगवन्मनुष्येषु प्रायणान्तमों-कारमभिध्यायीत । कतमं वाव स तेन लोकं जयतीति तस्मै स होवाच ॥ १ ॥**

**अन्वय व अर्थ**––**भगवन्, सः यः ह वै मनुष्येषु प्रायणान्तं ॐकारं अभिध्यायीत** ( भगवन्, जो कोणी मनुष्यलोकांतील जीव मरणापर्यंत ॐकाराचें एकनिष्ठ ध्यान करील ) **तेन कतमं वाव लोकं सः जयति** ( ह्या ॐकाराच्या ध्यानानें तो कोणत्या लोकाची प्राप्ति करून घेतो. ) **इति** ( हा सत्यकामाचा प्रश्न होता. ) **तस्मै सः उवाच ह** ( त्याला पिप्पलाद मुनींनीं उत्तर दिलें. ) ॥ १ ॥

सर्वसंगपरित्याग करून ब्रह्मचर्यपुरःसर एकनिष्ठपणानें ध्यान करणें याचें नांव अभिध्यान आहे. असें ॐकाराचें एकनिष्ठ ध्यान जो पुरुष आम-

रणांत करितो त्याला फलप्राप्ति काय होते, एतद्विषयक हा प्रश्न आहे. ॐकार हें ब्रह्माचें एक नांव आहे, असें कठोपनिषदांत सांगितलें आहे. ॐकाराचें एकनिष्ठ ध्यान केलें असतां काय फल होतें हें आतां समजन घ्यावयाचें आहे. तसेंच प्रसंगतः हें ॐकारोपासन कसें करावें, याचाही विधि आचार्य सांगणार आहेत. १

## मंत्र दुसरा.

**एतद्वै सत्यकाम परं चापरं च ब्रह्म यदोंकारः ।**
**तस्माद्विद्वानेतेनैवाऽऽयतनेनैकतरमन्वेति ॥ २ ॥**

**अन्वय व अर्थ**—सत्यकाम, यत् ॐकारः एतत् वै परं च अपरं च ब्रह्म ( हा जो ॐकार आहे तो हे सत्यकाम, पर—सर्वश्रेष्ठ, निर्गुण, व अपर—गौण—सगुण—ब्रह्म आहे. ) तस्मात् एतेन एव आयतनेन एकतरं अन्वेति ( म्हणून या साधनानें ॐकाराचें ज्ञान असणारा पुरुष आपल्या ध्यानानुसार पर किंवा अपर ब्रह्माची प्राप्ति करून घेतो. ) ॥ २ ॥

या मंत्रांत ॐकाराच्या ध्यानानें ब्रह्मप्राप्ति होते असें सांगून आचार्यांनीं सत्यकामाच्या प्रश्नाचें उत्तर एकदम देऊन टाकलें. त्यांतच ब्रह्म हें पर आणि अपर असें दोन प्रकारचें आहे असेंही सांगितलें. परब्रह्म हें सत्यरूप आणि अविनाशी असतें व अपरब्रह्म हें सगुण उपासना करण्यास योग्य आणि भक्तांस प्रसन्न होणारें असें असतें. परब्रह्माचें प्रतीक ॐकार आहे व तें अपरब्रह्माचें वाचक आहे. प्रतीकरूपानें निर्गुणब्रह्माचें एकनिष्ठ ध्यान केलें म्हणजे ज्ञान होऊन मोक्ष मिळतो आणि उपासनापूर्वक ॐकाराचा जप करून अपरब्रह्माचें ध्यान केलें असतां अपरब्रह्माची प्राप्ति होते. असें फल येथें सांगितलें आहे. ॥ २ ॥

## मंत्र तिसरा.

**स यद्येकमात्रमभिध्यायीत स तेनैव संवेदित-**
**स्तूर्णमेव जगत्यामभिसंपद्यते । तमृचो मनुष्य-**
**लोकमुपनयन्ते स तत्र तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया**
**संपन्नो महिमानमनुभवति ॥ ३ ॥**

**अन्वय व अर्थ**—सः यदि एकमात्रं अभिध्यायीत सः तेन एव संवेदितः तूर्णं एव जगत्याम् अभिसंपद्यते ( जो कोणी त्रिमात्रक ॐकाराचें केवल एकमात्रेनेंच ध्यान करील तो त्या ध्यानानें ज्ञानी होऊन

भूलोकाची सत्वर प्राप्ति करून घेईल. ) तं ऋचः मनुष्यलोकं उपनयन्ते (या एकमात्रक ॐकाराचें ध्यान करणाराला ऋग्वेदांतील मंत्र मनुष्यलोकाला नेऊन पोंचवितात.) सः तत्र तपसा, ब्रह्मचर्येण, श्रद्धया संपन्नः महिमानं अनुभवति ( तो पुरुष मृत्युलोकीं तपःसंपन्न, ब्रह्मचर्यसंपन्न आणि श्रद्धा-संपन्न होऊन अतिश्रेष्ठ पदवीचा अनुभव घेतो. ) ॥ ३ ॥

अ, उ आणि म् अशा ॐकाराच्या तीन मात्रा आहेत. या मात्रांपैकीं ॐकार ह्मणून अकाराचें जो ध्यान करील, अकार ह्मणजेच ॐकार असें समजून जो पुरुष एकनिष्ठ ध्यान करितो, तो लवकरच मनुष्य लोकास जाऊन पोंचतो. हें त्याच्या ध्यानबलाचें फल होय. अकार हा ऋग्वेदाचा उल्लेख करितो. अकार ह्मणजे ऋग्वेद होय असें समजतात. ऋग्वेद-मंत्रपूर्वक ॐकारोपासना करणाऱ्याला मनुष्यलोकाची प्राप्ति होते. ऋग्वेद हा मनुष्य-लोकाचा दर्शक आहे असें समजतात, असो; तप, ब्रह्मचर्य आणि श्रद्धा यांच्या साहाय्यानें तो ध्यानी पुरुष संपन्न झाल्यामुळें अति श्रेष्ठ गोष्टींचा अनुभविता होतो. सारांश त्याचें मनुष्यलोकीं कल्याण होतें ॥ ३ ॥

---

## मंत्र चवथा.

**अथ यदि द्विमात्रेण मनसि संपद्यते सोऽन्तरिक्षं यजुर्भिरुन्नीयते सोमलोकं स सोमलोके विभूतिमनुभूय पुनरावर्तते ॥ ४ ॥**

अन्वय व अर्थ—अथ यदि द्विमात्रेण मनसि संपद्यते सः यजुर्भिः अंतरिक्षं सोमलोकं उन्नीयते ( पण जो कोणी ॐकार हा द्विमात्रक समजून—' अ ' आणि ' उ ' या दोन मात्रांवर ॐकार स्वरूपाची भावना धरून—ध्यान करितो तो यजुर्वेदाच्या साहाय्यानें अंतरिक्षांत असलेल्या सोम—लोकाची प्राप्ति करून घेतो. ) सोमलोके विभूतिं अनुभूय पुनः आवर्तते ( नंतर तो सोमलोकांतील सुखाची प्राप्ति करून घेऊन पुनः या मृत्युलोकीं अवतीर्ण होतो. ) ॥ ४ ॥

या मंत्रांत 'अ' सह उ या अक्षराचें ध्यान करून व तें ध्यान ॐकार स्वरू-पाचें आहे अशी भावना धरून जो व्रतस्थ राहतो त्याला सोमलोकाची प्राप्ति होते. हा सोमलोक अंतरिक्षांत आहे. तेव्हां या स्वरूपाचें ध्यान करणारा मनुष्य मेल्यानंतर सोमलोकास किंवा पितृलोकास जातो. आणि तेथील सुख अनु-भवून पुनः तो मनुष्यलोकीं येऊन पोंचतो. 'उ' हें अक्षर यजुर्वेदाचें दर्शक

आहे. ऋग्वेदानें मनुष्यलोकाची प्राप्ति होते ह्या प्रमाणें यजुर्वेदानें सोमलोकाची अथवा चंद्रलोकाची प्राप्ति होते. या मंत्रांतील द्विमात्र या पदाचा अर्थ दुसरी मात्रा असा श्रीमच्छंकराचार्यांनीं केला असा मला भास होत आहे; पण मला असें वाटतें कीं द्विमात्र या पदाचा अर्थ दोन मात्रा असा करावा. अ आणि उ ह्या त्या दोन मात्रा होत. असा अर्थ केला असतां मनुष्यलोकाहून श्रेष्ठ जो पितृलोक याची प्राप्ति द्विमात्राचें ध्यान करणारांस होते; हें म्हणणें नीट होईल. एकमात्रक ॐकाराचें ध्यान करणारापेक्षां द्विमात्रक (अ आणि उ) या स्वरूपांसह ॐकारध्यान करणारा पुरुष जास्त योग्यतेचा आहे, ही गोष्ट स्पष्ट होते. असो; उकारानें यजुर्वेदप्राप्ति होऊन सोमलोक मिळत असल्यास उत्तमच गोष्ट झाली. ऋग्वेद जागृतस्थानीं आहे आणि यजुर्वेद स्वप्नस्थानीं आहे अशी सांप्रदायिक कल्पना आहे. ॥ ४ ॥

## मंत्र पांचवा.

**यः पुनरेतं त्रिमात्रेणोमित्येतेनैवाक्षरेण परं पुरुषमभिध्यायीत स तेजसि सूर्ये संपन्नः। यथा पादोदरस्त्वचा विनिर्मुच्यत एवं ह वै स पाप्मना विनिर्मुक्तः स सामभिरुन्नीयते ब्रह्मलोकं स एतस्माज्जीवघनात्परात्परं पुरिशयं पुरुषमीक्षते तदेतौ श्लोकौ भवतः ॥ ५ ॥**

अन्वय व अर्थ—**यः पुनः त्रिमात्रेण ॐ इति एतेन एव अक्षरेण एतं परं पुरुषं अभिध्यायीत सः तेजसि सूर्ये संपन्नः** (जो कोणी त्रिमात्रक म्हणजे अ, उ आणि म् ह्या अक्षरांनीं सिद्ध झालेल्या ॐकाराच्या साहाय्यानें ह्या पुरुषोत्तमाचें एकनिष्ठ ध्यान करितो. तो तेजस्वी सूर्याशीं एकरूप होऊन जातो.) **यथा पादोदरः त्वचा विनिर्मुच्यते, एवं ह वै सः पाप्मना विनिर्मुक्तः; स सामभिः ब्रह्मलोकं उन्नीयते** (ज्याप्रमाणें सर्प हा आपल्या त्वचेपासून मुक्त होतो, त्याप्रमाणें ॐकाराचें ध्यान करणारा पुरुष पापापासून विनिर्मुक्त होतो आणि सामवेदाच्या साहाय्यानें तो ब्रह्मलोकीं जाऊन पोहोंचतों.) **सः एतस्मात् जीवघनात् परात्परं पुरिशयं पुरुषं ईक्षते** (त्याला ह्या जीवघन हिरण्यगर्भाहून अत्यंत श्रेष्ठ व सर्व चराचरांत राहून त्यांस अस्तित्व देणाऱ्या पुरुषोत्तमाचें दर्शन होतें.)

तत् एतौ श्लोकौ भवतः ( हाच अर्थ सांगणारे पुढील दोन मंत्र आहेत. ) ॥ ५ ॥

या मंत्रांत ॐकाराच्या संपूर्ण स्वरूपाचें एकनिष्ठ ध्यान करणाऱ्या पुरुषाला सूर्यलोकाची जणुं कांही स्थिति प्राप्त होते. साप कांत टाकून मोकळा होतो, त्याप्रमाणें ॐकाराचें ध्यान करणारा पुरुष पापापासून मोकळा होतो. नंतर तो ब्रह्मलोकाला जातो आणि तेथें गेल्यावर त्याला हिरण्यगर्भाच्याही पलीकडे असणाऱ्या परब्रह्माचें, पुरुषोत्तमाचें दर्शन होऊन, तो मुक्त होतो. येथें त्याचें जन्म–मरण संपतें. सामवेदाचा ॐकार हा दर्शक आहे. येथें सुषुप्तीची स्थिति असते. परम सुखाचाही लाभ येथेंच होतो. हा लाभ म्हणजे हिरण्यगर्भ लोकाची प्राप्ति झाल्यावर त्या पुरुषाला हळू हळू हिरण्यगर्भाहून श्रेष्ठ असणाऱ्या परब्रह्माची प्राप्ति होते आणि तो मुक्त होतो. ही तुर्यावस्था आहे. हीच शेवटची स्थिति होय. येथें जाण्यायेण्याची म्हणजे सर्व यातायातीची समाप्ति होते. या प्रमाणें ॐकाराचें एकनिष्ठ ध्यान करणाराला कोणतें फल प्राप्त होतें हें सांगितलें आणि ॐकाराचें ध्यान मुमुक्षूनें कसें केलें असतां परब्रह्मप्राप्ति होते, त्याचेंही निवेदन केलें. सारांश येथें फल आणि विधि या दोन्हीचेंही संकीर्तन केलें आहे. ॥ ५ ॥

---

## मंत्र सहावा.

**तिस्रो मात्रा मृत्युमत्यः प्रयुक्ता अन्योन्यसक्ता अनविप्रयुक्ताः। क्रियासु बाह्याभ्यन्तरमध्यमासु सम्यक्प्रयुक्तासुं न कम्पते ज्ञः ॥ ६ ॥**

अन्वय व अर्थ—तिस्रः मात्राः प्रयुक्ताः मृत्युमत्यः ( या ॐकाराच्या तीन मात्रा एकेक मात्रापरत्वानें प्रयुक्त केल्या असतां–एकेकच मात्रा घेऊन ध्यान केलें असतां–या ध्यानाचा परिणाम मृत्युमय होतो. ) बाह्याभ्यंतरमध्यमासु सम्यक्प्रयुक्तासु क्रियासु अन्योन्यसक्ताः अनविप्रयुक्ताः ज्ञः न कम्पते ( पण सर्वांतर्बाह्य आणि योग्य रीतीनें विनियोग केलेल्या ध्यान क्रियांमध्यें परस्पर संबंध करून आणि सर्वांस एकत्र करून जर या तीन मात्रांचा उपयोग केला व ॐकाराचें पूर्ण ध्यान केलें तर ज्ञानी पुरुषाला भय असण्याचें कारण राहात नाहीं. ) ॥ ६ ॥

---

या वेद मंत्रांत असें सांगितलें आहे कीं, तीन मात्रा असणाऱ्या ॐकाराचें ध्यान एक एक मात्रा घेऊन मात्र जर केलें म्हणजे अ हाच ॐकार आहें, उ हाच

ॐकार आहे मू हाच ॐकार आहे अशी भावना धरून जर ध्यान केलें तर हें सर्व ध्यान मृत्यु असणारें होतें. तात्पर्य, या ध्यानानें मृत्यु चुकत नाहीं. पण बाह्य ( जागृत स्थिति ) मध्य ( स्वप्न स्थिति ) अभ्यंतर ( सुषुप्ति स्थिति ) या सर्व स्थितींस योग्य असणाऱ्या ध्यानक्रियांमध्यें या तिन्ही मात्रांस एकत्र करून व त्यांचे परस्पर संबंध कायम ठेवून योग्य रीतीनें ध्यान केलें तर उत्तम प्रकारचें ज्ञान प्राप्त होतें. असें ज्ञान झालेल्या पुरुषाला कोणत्याही प्रकारचें भय असण्याचें कारण राहात नाहीं. खरेंच आहे—जीवाच्या तिन्ही अवस्थांमध्यें साक्षी असणाऱ्या पुरुषोत्तमाचें ध्यान जर सर्वसाक्षित्वाचा उपदेश करणाऱ्या ॐकार-स्वरूपानें झालें तर साक्षीचें ज्ञान निराबाध होऊन ध्यान करणारांच्या सर्व उपाधी नष्ट होतात आणि तो मुक्त होतो. एकेक मात्रेनें ध्यान केलें असतां मृत्यु येतो आणि ॐकाराचें सामग्र्यानें ध्यान केलें असतां जीव मुक्त होतो, हें श्रुतीला सांगावयाचें आहे. ॥ ६ ॥

## मंत्र सातवा.

**ऋग्भिरेतं यजुर्भिरन्तरिक्षं सामभिर्यत्तत्कवयो वेदयन्ते। तमोंकारेणैवाऽऽयतनेनान्वेति विद्वान्यत्तच्छान्तमजरममृतमभयं परं चेति ॥ ७ ॥**

अन्वय व अर्थ—ऋग्भिः एतं, यजुर्भिः अंतरिक्षं, ( ऋग्वेदांतील ऋचांनीं मनुष्यलोकाचा उल्लेख होतो, यजुर्वेदाच्या यजूंनीं अंतरिक्षाचा, चंद्रलोकाचा उल्लेख होतो ) यत् सामभिः तत् कवयः वेदयंते ( पण सामवेदाच्या सामांनीं ज्याचा उल्लेख व प्राप्ति होते तें अति विद्वान् पुरुषांस मात्र माहीत आहे. ) ॐकारेण एव आयतनेन तं अन्वेति ( ॐकाराच्या मात्र साहाय्यानें त्या परब्रह्मलोकांत प्रवेश करितां येतो. ) यत् तत् शांतं अजरं, अमृतं, अभयं, परं च, ( तो ब्रह्मलोक शांत आहे. जरामरण-रहित आहे, निर्भय आहे आणि सर्वश्रेष्ठ आहे. ) इति ( याप्रमाणें हे सत्यकाम, तुझ्या प्रश्नाचें हें उत्तर आहे. ) ॥ ७ ॥

या मंत्रांत पांचव्या प्रश्नाच्या उत्तरांचा सर्व संग्रह झाला आहे. समग्र ॐकाराच्या एकनिष्ठ ध्यानानें प्रथमतः अपर ब्रह्माची प्राप्ति होऊन नंतर मग जरामरणशून्य, निर्भय, शांत आणि सर्व-श्रेष्ठ अशा परब्रह्माची प्राप्ति होते, हें येथें सांगितलें आहे. तसेंच नुसत्या 'अ' च्या ध्यानानें ( ऋग्वेदानें ) मनुष्य लोकाची प्राप्ति होते व तेथें मृत्यूची भीति असते आणि नुसत्या 'उ' च्या ध्यानानें ( यजुर्वेदानें ) सोमलोकाची ( चंद्र लोकाची ) प्राप्ति होते, तथापि

त्याही लोकांत जरामरणाची भीति असते. पण समग्र ॐकाराचे अवयव-संबंध काय आहेत, हें समजून घेऊन व अवयवांची ताडातोड न करितां जर एकनिष्ठपणानें ॐकारध्यान केलें, तर प्रथमतः अपरब्रह्माची आणि नंतर पर-ब्रह्माची प्राप्ति होऊन जीव कृतार्थ होतो, असें सांगितलें ॥ ७ ॥

पाचवा प्रश्न समाप्त.

---

## प्रश्न सहावा.

### मंत्र पहिला.

**अथ हैनं सुकेशा भारद्वाजः पप्रच्छ ।**

अन्वय व अर्थ--अथ ह एनं सुकेशा भारद्वाजः पप्रच्छ ( नंतर भारद्वाज कुलोत्पन्न सुकेशा विचारिता झाला. )

**भगवन्हिरण्यनाभः कौसल्यो राजपुत्रो मामुपेत्यैतं प्रश्नमपृच्छत । षोडशकलं भारद्वाज पुरुषं वेत्थ तमहं कुमारमब्रुवं नाहमिमं वेद यद्यहमिममवेदिषं कथं ते नावक्ष्यमिति समूलो वा एष परिशुष्यति योऽनृतमभिवदति तस्मान्नार्हाम्यनृतं वक्तुं स तूष्णीं रथमारुह्य प्रवव्राज । तं त्वा पृच्छामि क्वासौ पुरुष इति ॥ १ ॥**

अन्वय व अर्थ--भगवन्, कौसल्यः राजपुत्रः हिरण्यनाभः मां उपेत्य प्रश्नं अपृच्छत ( हे भगवन्, हिरण्यनाभ नामक कोसलदेशचा राजपुत्र माझ्याकडे येऊन मला प्रश्न विचारिता झाला ) भारद्वाज, षोडश-कलं पुरुषं वेत्थ ( हे भारद्वाज, सोळा कलांचा पुरुष आपल्यास माहीत आहे काय ? ) तं अहं, कुमारं अब्रुवं ( मी त्या कुमाराला बोललों ) न अहं इमं वेद ( हा पुरुष मला ठाऊक नाहीं. ) यदि अहं इमं अवेदिषं कथं ते न अवक्ष्यं इति । समूलः वै एषः परिशुष्यति यः अनृतं अभिवदति, तस्मात् न अनृतं वक्तुं अर्हामि ( जर मला या पुरुषाचें ज्ञान असतें तर तें मी तुला कसें सांगितलें नसतें ? जो मनुष्य खोटें बोलतो, तो मूळासकट नष्ट होतो, हें मला ठाऊक आहे म्हणून मी केव्हांही खोटें बोलावयाचा नाहीं. ) सः रथं तूष्णीं आरुह्य प्रवव्राज ( तो निरुत्तर

होऊन व लज्जित होऊन स्थांत बसला आणि निघून गेला. ) क्व असौ पुरुषः इति तं त्वा पृच्छामि ( म्हणून आपल्यास विचारितों कीं तो कलात्मक पुरुष कोठें आहे ? ) ॥ १ ॥

या मंत्रांत सोळा कलांचा पुरुष कोण आहे व त्याचें स्वरूप काय, अशा अर्थांचा प्रश्न आहे. याचें उत्तर पिप्पलाद मुनि पुढील मंत्रांत देणार आहेत. प्रसंगप्राप्त ही गोष्ट वाचकांनीं लक्षांत ठेवावयाची कीं, पूर्वकाळीं क्षत्रिय लोक आणि त्यांतून राजपुत्रही ब्रह्मविचारासारख्या आत्मिक प्रश्नांची मीमांसा करीत असत आणि ब्रह्मज्ञान मिळविण्यासाठीं ते लागतील तितके प्रयत्न करण्यास व हाल सोसण्यास सिद्ध असत. तसेंच दुसरें हें लक्षांत ठेवावयाचें कीं कोणीही प्रश्न विचारला व त्याचें उत्तर आपल्यास ठाऊक असलें तर तें उत्तर देण्यास केव्हांही अनमान करावयाचा नाहीं, अशी त्या वेळची पद्धति होती. आणि तिसरी गोष्ट ही कीं असत्य भाषण करणें हें फार मोठें पापकृत्य आहे, अशी तत्कालीन समजूत असून असत्य भाषणाच्या संबंधानें तीव्र तिटकारा जागृत असे. तसेंच, विचारल्याशिवाय आत्मज्ञान किंवा इतर ज्ञान सांगत सुटावयाचें नाहीं, असा संप्रदाय त्यावेळीं असे; असें दिसतें. ॥ १ ॥

---

## मंत्र दुसरा.

**तस्मै स होवाच इहैवान्तःशरीरे सोम्य स पुरुषो यस्मिन्नेताः षोडश कलाः प्रभवन्तीति ॥ २ ॥**

अन्वय व अर्थ—तस्मै सः उवाच ( त्याला आचार्यांनीं उत्तर दिलें ) सोम्य, यस्मिन् एताः षोडश कलाः प्रभवन्ति, सः पुरुषः इह एव अन्तःशरीरे इति ( हे सौम्य, ज्याच्यामध्यें सोळा कलांचा उद्भव होतो, तो पुरुष येथेंच आपल्या अंतःकरणरूपी शरीरांत वास्तव्य करितो. समजलास? ) ॥२॥

ज्याच्यापासून सोळा कलांची उत्पत्ति होते तो पुरुष कोठें आहे ह्या प्रश्नाला हें उत्तर मिळालें कीं तो पुरुष जीवांच्या शरीरांतच वास्तव्य करीत असतो. सोळा कला कोणत्या तें चौथ्या मंत्रांत सांगणार आहेत. हा पुरुष म्हणजे, आत्मस्वरूप होय. सोळा कला ह्या पुरुषाचे ठिकाणीं असतात. किंवा हा पुरुष षोडशकलात्मक आहे, असें म्हणण्याचा श्रुतीचा अभिप्राय नाहीं. त्याच्यामध्यें सोळा कला निर्माण होतात हें खरें; तथापि तो स्वरूपतः निष्कल आहे, कलाशून्य आहे असें पुढें पांचव्या व सहाव्या मंत्रांत श्रुतिच स्वतः सांगणार आहे. या सोळा कला पुरुषामध्यें उत्पन्न होतात व अस्ताला जातात असें भासमात्रानें दिसतें, हें श्रुतीस सांगावयाचें आहे. पुरुषाचें स्वरूप निष्कल म्हणजे निर्गुण

आहे. या कला सूर्यावर येणाऱ्या अभ्रप्रमाणें क्षणभंगुर आहेत. अभ्रें येतात व जातात; तथापि सूर्यस्वरूपाला त्यापासून यत्किंचित्ही विकार उत्पन्न होत नाहीं. कला असल्या म्हणजे आत्मस्वरूप मोठें किंवा लहान होतें, सविकृत अथवा अविकृत होतें असा भाग नाहीं. तें निर्विकार अखंड, निर्गुण आणि एकस्वरूप असतें, असें विशेषत्वानें येथें सांगावयाचें आहे. या मंत्राच्या भाष्यामध्यें श्रीमच्छंकराचार्यांनीं बौद्धांच्या, नैयायिकांच्या व चार्वाकादि नास्तिकांच्या म्हणण्याचा विचार करून त्यांस उत्तर केलें आहे, तें जिज्ञासु वाचकांनीं काळजीपूर्वक वाचावें अशी माझी त्यांस आग्रहाची विनंति आहे. ॥ २ ॥

---

## मंत्र तिसरा.

**स ईक्षांचक्रे कस्मिन्नहमुत्क्रान्त उत्क्रान्तो भविष्यामि कस्मिन्वा प्रतिष्ठिते प्रतिष्ठास्यामीति ॥ ३ ॥**

अन्वय व अर्थ—सः ईक्षांचक्रे ( त्या पुरुषानें विचार केला ) कस्मिन् उत्क्रांते अहं उत्क्रांतः भविष्यामि, कस्मिन् वा प्रतिष्ठिते प्रतिष्ठास्यामि इति ( कोणती गोष्ट उत्क्रांत झाली असतां मी उत्क्रांत होईन व कोणती गोष्ट स्थित झाली असतां मी स्थित होईन, असा विचार आत्म्यानें केला) ॥३॥

येथें आत्मस्वरूपापासून सृष्टि-उद्भव कसा झाला याचा विचार केला आहे. कोणत्या गोष्टी आविर्भूत ( प्रकट ) झाल्या असतां आत्मस्वरूप प्रकट होईल व कोणत्या गोष्टी तिरोभूत ( अस्तंगत ) झाल्या असतां आत्मस्वरूप अदृश्य होईल, याची मीमांसा आत्म्यानें केली आणि तदनुसार सृष्टीची उत्पत्ति केली. या सृष्टीच्या उत्पत्तीनें आत्मस्वरूपांत कांहीं विकृति झाली असा मात्र भास नाहीं. सृष्टि उत्पन्न करणें किंवा ती लयाला नेणें हीं कार्यें झालीशीं आपल्यास दिसतात; परंतु वस्तुतः परमार्थामध्यें कांहीं उत्पन्न होत नाहीं किंवा लयासही जात नाहीं अशी स्थिति असते. मृगजल उत्पन्न होणें किंवा तें नाहींसें होणें इत्यादि कार्यांनीं सूर्यस्वरूपांत जसा कोणत्याही प्रकारचा विकार प्राप्त होत नाहीं, तो स्वतः अलिप्तच असतो, तशीच विश्वाच्या उत्पत्तीची, स्थितीची व लयाची गोष्ट आहे. जाबदृष्टीनें पाहिलें असतां ही सृष्टि ज्ञानपूर्वक झाली आहे असें दिसतें व व्यवहारांत ती तशी आहे ही. तथापि परमार्थदृष्टीनें आत्मस्वरूपाकडे सृष्टिकर्तृत्वाचा किंवा संहारकत्वाचा भाग येत नाहीं. व्यवहारांत परमेश्वर हा सृष्टीचा उत्पादक, संरक्षक आणि विनाशक आहे असेंच धरून चाललें पाहिजे. ज्ञानाच्या आणि ज्ञानपूर्वक प्रयोजनाच्या तंत्रानें उत्पत्ति-स्थिति-लयांचें कर्म चाललें आहे. हा सृष्टीचा नियंता सर्व मंगलगुणांनीं परिपूर्ण आहे, म्हणून

या सृष्टिनियंत्यांची आपण सर्वात्मना उपासना केली पाहिजे व त्यास प्रियें होईल असेंच कर्म केलें पाहिजे. हें सर्व नीट आहे; तथापि उपासनेनें व ईश्वरानुकूल कर्मानें परिशुद्ध होऊन जीव तत्त्वज्ञानाचें अध्ययन करण्यास योग्य झाला म्हणजे त्याला परमात्म्याचें व जीवात्म्याचें स्वरूप एकच असून तें निर्विकार, निर्गुण आणि निरामय आहे असेंच प्रत्ययास येईल. सारांश, व्यावहारिक सृष्टि परमेश्वरानें निर्माण केली, अन्य कोणी नाहीं, असें या श्रुतीनें सिद्ध होतें. म्हणन सांख्यादि वाद्यांचें म्हणणें ठीक नाहीं, असा निश्चय होतो. सारांश, सृष्टि उत्पन्न झाली म्हणजे परमेश्वरी स्वरूप प्रकट होतें; पण तें स्वरूप परमार्थतः अखंड आणि निरंजन आहे; हे जिज्ञासु पुरुषांनीं समजून घ्यावें. ॥ ३ ॥

## मंत्र चवथा.

**स प्राणमसृजत प्राणाच्छ्रद्धां खं वायुर्ज्योति-रापः पृथिवीन्द्रियं मनः । अन्नमन्नाद्वीर्यं तपो मन्त्राः कर्म लोका लोकेषु च नाम च ॥ ४ ॥**

**अन्वय व अर्थ— सः प्राणं असृजत** ( त्यानें प्राणाची म्हणजे हिरण्यगर्भाची—सर्व प्राणांच्या इंद्रियादिकांचा व प्राणांचा आधार असणाऱ्या पुरुषाची—उत्पत्ति केली ) **प्राणात् श्रद्धां, खं, वायुः, ज्योतिः, आपः, पृथिवी, इंद्रियं, मनः,** ( प्राणापासून शुभकर्मांची इच्छा देणारी श्रद्धा, आकाश, वायु, तेज, जल, पृथिवी, कर्मेंद्रियें, ज्ञानेंद्रियें आणि अंतःकरणचतुष्टय, ह्या वस्तु निर्माण केल्या. )—**सः**—**अन्नं असृजत** ( त्यानें अन्न म्हणजे उपभोगाचे पंचभूतात्मक पदार्थ उत्पन्न केले. ) **अन्नात् वीर्यं, तपः मन्त्राः कर्म, लोकाः, लोकेषु च नाम च** ( अन्नापासून वीर्य—सामर्थ्य—तप, मंत्र, भुवनें आणि भुवनांतील नामरूपें उत्पन्न केलीं. ) ॥ ४ ॥

परमेश्वरानें विचारपूर्वक प्राणाची व अन्नाची उत्पत्ति केली. पहिल्या प्रश्नांतील कबंधीच्या विनंतीला जें उत्तर मिळालें याचा हा अनुवाद आहे. येथें जास्ती हें सांगितलें आहे कीं, प्रत्येक प्राणी आपल्या पुरुषार्थासाठीं रात्रंदिवस प्रयत्न करीत असतो. आपलें कल्याण व्हावें व इष्ट हेतु साधावे या साठीं प्रत्येक प्राण्याची जी प्रयत्नसतति विचारपूर्वक सुरू असते तिला श्रद्धा असें ह्मणतात. यालाच ( Faith ) किंवा ( Will-Force ) असें ही म्हणावें. कांहीं तरी एक अत्युत्तम वस्तु आहे आणि तिची प्राप्ति आपल्यास करून घेतली पाहिजे असें ज्ञान व अशी कर्म-प्रेरणा यांचा श्रद्धेमध्यें अंतर्भाव होतो. मानवी विचाराच्याही

पलीकडे असन विचारांस आश्रय देणारी जी शास्त्रपरंपरा ती सत्य आहे, अशी भावना असणें याला श्रद्धा असें म्हणतात व ही श्रद्धा आपला इष्टतम पुरुषार्थ साध्य करून घेण्याविषयीं प्राण्यास प्रेरणा करीत असते. असो; या श्रद्धेनंतर पंचमहाभूतांची आपापल्या गुणांसह उत्पत्ति झाली. हीं पंचमहाभूतें जीवाला आपला इष्टतम पुरुषार्थ साध्य करण्याच्या कामीं साहाय्य करितात. या पंचमहाभूतांच्या साह्यानें जीवांच्या ज्ञानेंद्रियांचीं, कर्मेंद्रियांचीं तसेंच अंतःकरणचतुष्टयाचीं उपादान—कारणें सिद्ध होतात. असो; परमेश्वरानें प्राण्यांच्या भोगासाठीं अनेक पदार्थ उत्पन्न केले. त्या पदार्थांपासूनच वीर्य म्हणजे बल, तप, ऋग्वेदादिकांचे शोधक मंत्र, प्राण्यांचें कर्म, अनंतभुवनें आणि तेथील नामरूपें हीं उत्पन्न होतात. या संबंधानें उपसंहारांत विशेष विचार करावयाचा आहे. म्हणून हें प्रकरण येथेंच सोडून देतों. ॥ ४ ॥

---

## मंत्र पांचवा.

**स यथेमा नद्यः स्यन्दमानाः समुद्रायणाः समुद्रं प्राप्यास्तं गच्छन्ति भिद्येते तासां नामरूपे समुद्र इत्येवं प्रोच्यते। एवमेवास्य परिद्रष्टुरिमाः षोडश कलाः पुरुषायणाः पुरुषं प्राप्यास्तं गच्छन्ति भिद्येते चाऽऽसां नामरूपे पुरुष इत्येवं प्रोच्यते स एषोऽकलोऽमृतो भवति तदेषः श्लोकः ॥ ५ ॥**

**अन्वय व अर्थ—यथा इमाः स्यंदमानाः समुद्रायणाः नद्यः समुद्रं प्राप्य अस्तं गच्छन्ति, तासां नामरूपे भिद्येते, समुद्रः इति एवं प्रोच्यते** (नित्य वाहणाऱ्या व समुद्राकडे जाणाऱ्या ह्या नद्या समुद्रांत प्रवेश करितात, तेथें अस्ताला जातात, त्यांचीं नामरूपें नाहींशीं होतात व सर्वांस समुद्र असें नांव प्राप्त होतें.) **एवं एव अस्य परिद्रष्टुः इमाः पुरुषायणाः षोडश कलाः पुरुषं प्राप्य अस्तं गच्छन्ति, आसां नामरूपे भिद्येते, च पुरुषः इति एवं प्रोच्यते** (त्याचप्रमाणें ह्या सर्वज्ञ पुरुषाच्या सोळा कला पुरुषाकडे जाण्यास प्रवृत्त होतात, पुरुषाची गांठ पडल्यावर अस्ताला जातात; त्याचीं नामरूपें नाहींशीं होतात व त्यांस पुरुष अशी संज्ञा प्राप्त होते.) **सः एषः अकलः अमृतः भवति** (तो हा पुरुष निष्कल आणि मरणशून्य

असतो.) तत् एषः श्लोकः (हाच अर्थ समर्थन करणारा पुढील मंत्र आहे.) ॥ ५ ॥

या मंत्रांतील दृष्टांत तर स्पष्टच आहे. प्रत्येक अखंड नदीचा प्रवाह समुद्राकडे चाललेला आहे. समुद्राशीं संगम झाल्यावर प्रत्येक नदीचें नामरूप नष्ट होतें आणि त्या सर्व जल-संचयास समुद्र हें नांव प्राप्त होतें. हा आबालवृद्धांचा अनुभव सर्वप्रसिद्ध आहे. याच प्रमाणें श्रुति असें म्हणते कीं सर्वज्ञ व सर्वसाक्षी पुरुषापासून निघालेल्या सर्व कला, नित्यपुरुषप्राप्त्यर्थ म्हणजे आत्मस्वरूपाच्या प्राप्तीसाठीं प्रयत्न करीत असतात. इष्टार्थसिद्धि झाली म्हणजे त्यांचीं नामें आणि त्यांचीं रूपें नाहींशीं होतात आणि त्यांस आत्म्याचें नांव प्राप्त होतें. सारांश, ह्या सर्व कला आत्मरूप होतात. या प्रमाणें सर्वाधिष्ठान असणारा पुरुष कलाशून्य आहे, गुणधर्मशून्य आहे आणि जरामरणशून्य आहे, असें स्पष्ट होतें; समुद्रास मिळणाऱ्या नद्या आल्या काय किंवा गेल्या काय, त्याच्या योगानें समुद्र मोठा किंवा लहान होत नाहीं. येणाऱ्या नद्या त्यांत भर टाकीत नाहींत किंवा नद्या आल्या नाहींत तर त्याचा जलसंचय कमी होत नाहीं. सारांश, नद्यांच्या अपेक्षेनें समुद्र हा निर्गुण आणि अजरामर आहे. असा प्रकार पुरुषोत्तमाचा आहे. तो सोळा कला उत्पन्न करितोसा दिसतो, आत्मस्वरूपाच्या अधिष्ठानावर सोळा कलांची उत्पत्ति झालीशी दिसते, तसेंच ह्या सर्व कला म्हणजे विश्वांतील सर्व सामर्थ्यें व सर्व जड वस्तु आत्मस्वरूपांत लीन होतातसें दिसतें. तथापि विश्वाच्या उत्पत्तीनें किंवा लयानें आत्मस्वरूपांत कोणताही विघाड होत नाहीं. कारण तो स्वतः निर्गुण आहे. यावरून श्रुतीला आत्म्याचें निर्गुणस्वरूप अभिप्रेत आहे, उत्पत्तिस्थितिलयाचा प्रकार व्यावहारिक, तात्पुरता, क्षणभंगुर आहे असें म्हणावयाचें आहे, असें मला वाटतें. शिवाय वाचकांच्या लक्षांत हेंही येईल कीं येथें श्रुतीनें जीवाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें उल्लेख केला, तथापि श्रुतीनें जीवाच्या आत्म्याचा (Soul) उल्लेख कोठेंही केला नाहीं. मला असें वाटतें कीं, सोळा कला नाहींशा केल्या म्हणजे परमात्मस्वरूपांत व प्रत्यगात्म स्वरूपांत यत्किंचित्ही भेद राहावयाचा नाहीं. इतकेंच नव्हे तर तीं उभयताही एकच आहेत असें विचाराअंतीं ठरेल. श्रुतीला ही हें एकत्व इष्ट आहे असो. ॥ ५ ॥

---

## मंत्र सहावा.

**अरा इव रथनाभौ कला यस्मिन्प्रतिष्ठिताः । तं वेद्यं पुरुषं वेद यथा मा वो मृत्युः परिव्यथा इति ॥६॥**

अन्वय व अर्थ—रथनाभौ अराः इव यस्मिन् कलाः प्रतिष्ठिताः, तं वेद्यं पुरुषं वेद ( रथाच्या नाभीमध्यें जशा सर्व अरा प्रतिष्ठित होतात त्याप्रमाणें ज्याच्यामध्यें सोळा कलांचें प्रतिष्ठापन झालें आहे, त्या ज्ञेय पुरुषाचें ज्ञान करून घ्यावें. ) यथा वः मृत्युः मा परिव्यथाः (—असें ज्ञान करून घ्यावें—कीं ज्या योगानें तुम्हांला मृत्यूपासून पीडा होणार नाहीं. ) ॥ ६ ॥

याही मंत्रांत चाकांच्या अरांचा दृष्टांत देऊन असें दाखविलें आहे कीं, चाकाच्या अरा रथाच्या तुंब्यामध्यें जाऊन प्रतिष्ठित होतात, तथापि त्या अरा तुंब्याचें किंवा रथाचें स्वरूप ठरवित नाहींत. त्या प्रमाणेंच सर्व कला जरी परम पुरुषाच्या आधारावर राहतात; तथापि तो पुरुष स्वतः सर्वतः निरपेक्षच आहे. असो; जर आपल्यास जन्ममरणाची भीति नाहींशी करून घ्यावयाची असेल, जाणाऱ्या येणाऱ्या कलाचक्रांतून मुक्त व्हावयाचें असेल, तर जो ज्ञानस्वरूप आहे, जो ज्ञान्याला मात्र ज्ञानरूपानें प्रतीत होणार, त्या सच्चिदानंदैक पुरुषाचें ज्ञान करून घ्यावें म्हणजे कोणत्याही प्रकारें जन्ममृत्यूची पीडा होणार नाहीं. पुरुष या पदानें असा अर्थ व्यंजित होतो कीं, सर्व पदांस आश्रय देणारा, त्यांचें नियमन करणारा व त्यांस लयास नेणारा, आत्माराम स्वतः परिपूर्ण आहे, निरपेक्ष आहे आणि सत्स्वरूप आहे. ॥ ६ ॥

---

## मंत्र सातवा.

**तान्होवाचैतावदेवाहमेतत्परं ब्रह्म वेद ।**
**नातः परमस्तीति ॥ ७ ॥**

अन्वय व अर्थ—तान् ह उवाच ( पिप्पलाद मुनि पुढें म्हणाले, ) एतावत् एव अहं एतत् परं ब्रह्म वेद ) मला परब्रह्माचें स्वरूप येथपर्यंत मात्र ठाऊक आहे. ) न अतः परं अस्ति ( आतां याच्या पलीकडे सांगावयाचें किंवा जाणावयाचें असें कांहीं राहिलें नाहीं. )

सारांश, गुरूनें जितका उपदेश करणें शक्य आहे तितका उपदेश पिप्पलादाचार्यांनीं केला. आतां पुढें सांगावयाचा भाग राहिला नाहीं. एकनिष्ठ मनन आणि एकनिष्ठ चिंतन यांनीं सिद्ध होणारा जो साक्षात्कार तो ज्याचा त्यानेंच करून घेतला पाहिजे. उपदेशाचा भाग येथें संपला व उपनिषदाचीही परिसमाप्ति झाली ॥ ७ ॥

---

## मंत्र आठवा.

**ते तमर्चयन्तस्त्वं हि नः पिता योऽस्माकम-विद्यायाः परं पारं तारयसीति । नमः परम-ऋषिभ्यो नमः परमऋषिभ्यः ॥ ८ ॥**

या मंत्राचा अन्वय व अर्थ सरळ आहे व येथें विस्तारानें सांगण्यासारखें असेंही कांहीं नाहीं. विद्येचा उपदेश झाल्यावर गुरूची पूजा करणें हें योग्यच आहे. तसेंच अविद्येच्या समद्रांतून तारून नेऊन शिष्यांस मुक्त करणारा गुरु हा जन्म देणाऱ्या जनकाइतका थोर आहे असेंच नव्हे, तर त्याची योग्यता आईबापांपेक्षां व योगक्षेम चालविणाऱ्या यजमानापेक्षांही जास्त श्रेष्ठ आहे. ॥८॥

सहावा प्रश्न समाप्त.

याप्रमाणें प्रश्नोपनिषदाचें विवरण समाप्त झालें.

ॐ

# मुण्डकोपनिषत्

चिंतामण गंगाधर भानु

कृत

महाराष्ट्र विवरणम्

# मुण्डकोपनिषत्.

## संपादकाचें विवरण.

ॐ तत्सद्ब्रह्मणे नमः

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः ।
भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ॥
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवाꣳसस्तनूभिः ।
व्यशेम देवहितं यदायुः ॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।

### मंत्र पहिला.

**ॐ ब्रह्मा देवानां प्रथमः संबभूव विश्वस्य कर्ता भुवनस्य गोप्ता । स ब्रह्मविद्यां सर्वविद्याप्रतिष्ठामथर्वाय ज्येष्ठपुत्राय प्राह ॥ १ ॥**

अन्वय व अर्थ—विश्वस्य कर्ता, भुवनस्य गोप्ता, ब्रह्मा देवानां प्रथमः संबभूव ( सर्व अनंत ब्रह्मांडांचा कर्ता व त्यांचा पालक ब्रह्मदेव हा सर्व देवांच्या आधीं उत्पन्न झाला. ) सः ज्येष्ठपुत्राय अथर्वाय सर्वविद्याप्रतिष्ठाम् ब्रह्मविद्याम् प्राह ( आपला ज्येष्ठ पुत्र जो अथर्वा त्याला ब्रह्मदेवानें ब्रह्मविद्येचा स्पष्ट उपदेश केला. ही ब्रह्मविद्या इतर सर्वविद्यांची प्रतिष्ठा आहे. ) ॥ १ ॥

मंत्राचा अर्थ स्पष्ट आहे. सृष्टीची उत्पत्ति आणि स्थिति चालाविणें ज्या देवाचें काम आहे, तो ब्रह्मदेव सृष्टीमध्यें अंतःपाती असणाऱ्या इतर सर्व देवांच्या आधीं व सृष्टीपूर्वी उत्पन्न झाला असला पाहिजे. आणि सर्वांहून ज्येष्ठ म्हणून त्या सर्व इतर देवांच्याहून श्रेष्ठ आणि स्वतःच्या ज्ञानानें आणि कर्मानेंही श्रेष्ठ असा असला पाहिजे, हें उघड आहे. ज्या अलौकिक प्रेरणेनें ब्रह्मदेवाची उत्पत्ति झाली व त्याला विश्वकर्तृत्वाचें

आणि विश्वपालनाचें कर्तृत्वज्ञान, कर्तृत्वसामर्थ्य आणि कर्तृत्वाची इच्छा प्राप्त झाली, त्याच प्रेरणेनें ब्रह्मदेवाला ब्रह्मविद्येचेंही ज्ञानविज्ञान झालें असलें पाहिजे, हेंही उघड आहे. सारांश, ब्रह्मविद्या ही अपौरुषेय असली पाहिजे हें स्पष्ट आहे. ब्रह्म-स्वरूप सर्वज्ञानकर्मेंद्रियांस व मनोबुद्धींस अगोचर आहे. हें पुढें याच उपनिषदांत सांगितलें आहे. तेव्हां ब्रह्म-विद्येचें ज्ञानविज्ञान ब्रह्मदेवाला झालें असेल, तें केवळ ब्रह्म-प्रेरणेनें व तत्प्रसादानें मात्र झालें असलें पाहिजे. ब्रह्म प्रेरणेनें मात्र ज्या ज्ञान-विज्ञानाची प्रवृत्ति होते, ती ब्रह्म-विद्या होय. ही विद्या सर्वश्रेष्ठ आहे आणि इतर सर्व विद्यांचें आश्रय-स्थान असून ( माहेरघर असून ) त्या सर्वांची ती विद्या नियामक असली पाहिजे हेंही स्पष्ट आहे. सारांश, इतर सर्व विद्यांस अस्तित्व देऊन त्यांचें नियमन करणारी जी विद्या ती ब्रह्म-विद्या होय. या विद्येचा उपदेश ब्रह्मदेवानें आपला ज्येष्ठ पुत्र जो अथर्वा याला केला हेंही योग्य तेंच झालें. सामान्यतः ज्येष्ठ पुत्रावर पित्याचें निरतिशय प्रेम असतें, हा सर्वत्र अनुभव आहे आणि पित्याला जें ज्ञान-विज्ञान प्राप्त झालेलें असतें तें त्या पुत्राला प्रथमतः मिळण्याचा विशेष संभव असतो, तेव्हां हा येथील ब्रह्मोपदेश व्यवहारास्थितीस सर्वथा योग्यच आहे. ॥ १ ॥

---

## मंत्र दुसरा.

**अथर्वणे यां प्रवदेत ब्रह्माऽथर्वा तां पुरोवाचाङ्गिरे ब्रह्मविद्याम् । स भारद्वाजाय सत्यवहाय प्राह भारद्वाजोऽङ्गिरसे परावराम् ॥ २ ॥**

अन्वय व अर्थ—**यां अथर्वणे ब्रह्मा प्रवदेत, तां ब्रह्मविद्यां अथर्वा पुरा अङ्गिरे प्रोवाच** ( जी ब्रह्मविद्या ब्रह्मदेवानें अथर्वणाला सांगितली, ती अथर्वणानें अंगिरा नामक पुत्राला किंवा शिष्याला सांगितली ) **भारद्वाजाय सत्यवहाय सः परावराम् प्राह, भारद्वाजः अङ्गिरसे** ( अंगिरानें भारद्वाजकुलोत्पन्न सत्यवहाला ही परावर विद्या उपदेशिली आणि भारद्वाजानें अंगिरसाला सांगितली. ) ॥ २ ॥

या मंत्रांत शुद्ध संप्रदाय-परंपरा सांगितली आहे. ब्रह्म-विद्या काय किंवा इतर कोणतीही विद्या काय, संप्रदायपद्धतीनें पुत्रपरंपरेला किंवा शिष्यपरंपरेला प्राप्त झाली असतां तिचें शुद्ध स्वरूप कलुषित होण्याचा संभव फार कमी असतो. पिता अथवा गुरु यांचें अध्ययन पूर्ण असलें पाहिजे व त्याचप्रमाणें पुत्र किंवा शिष्य हे एकनिष्ठतेनें श्रवण मनन करणारे आणि श्रद्धेनें विद्या ग्रहण करणारे असले पाहिजेत. अध्ययनाची व अध्यापनाची परंपरा जितकी जास्त शुद्ध राहील तितक्या जास्त स्वच्छतेनें

कोणत्याही विद्येचा दानप्रतिग्रह होत असतो, हें सांगावयास नको. असो, मंत्रांत ब्रह्मविद्येला 'परावरा' हें विशेषण उपयोजिलें आहे, तें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ॥ २ ॥

## मंत्र तिसरा.

**शौनको ह वै महाशालोऽङ्गिरसं विधिवदुपसन्नः पप्रच्छ । कस्मिन्नु भगवो विज्ञाते सर्वमिदं विज्ञातं भवतीति ॥ ३ ॥**

**अन्वय व अर्थ—महाशालः शौनकः वै अङ्गिरसं विधिवत् उपसन्नः पप्रच्छ ह** ( महाशाल–आपला गृहस्थाश्रम उत्तमरीतीनें चालविणारा–शुनकपुत्र शौनक पूर्वोक्त अंगिरसनामक आचार्याकडे शास्त्रशुद्धपद्धतीनें गेला आणि त्यांस शरण जाऊन पुढील प्रश्न करिता झाला. ) **भगवः ! कस्मिन् नु विज्ञाते इदं सर्वं विज्ञातं भवति इति** ( हे भगवन्, कोणत्या वस्तूचें विज्ञान झालें असतां हें सर्व विज्ञात होतें ! शौनकानें हा प्रश्न अंगिरसाला केला आहे. ) ॥ ३ ॥

या मंत्रांत मुंडकोपनिषदाची उत्पत्ति मानवी जगांत कशी व केव्हां झाली, ब्रह्मविद्या सांगण्याचा प्रसंग केव्हां व कोठें उत्पन्न झाला, हें सांगितलें आहे. त्याचप्रमाणें येथें सहज ओघानें असें सुचविलें आहे कीं, ब्रह्मविद्येचें अध्ययन कोणत्याही वर्णातील कोणत्याही आश्रमीयाला करितां येतें. मात्र ब्रह्मविद्या अध्ययन करूं इच्छिणारा विद्यार्थी सदाचरणी असला पाहिजे आणि आचार्याकडे शिक्षणाप्रीत्यर्थ जातांना श्रुत्युक्त नियमांचें यथाशास्त्र अनुपालन करणाराही असला पाहिजे. सारांश, तो अधिकारसंपन्न असला पाहिजे. असो, येथें शौनकानें जो प्रश्न विचारला आहे तो सर्वप्रकारें संस्मरणीय आहे. ब्रह्मविद्या किंवा तत्त्वज्ञान म्हणजे काय! याचें स्पष्ट स्वरूप या शौनकप्रश्नांत अवतीर्ण झालें आहे. कोणत्या एका वस्तूचें ज्ञान-विज्ञान झालें असतां या दृश्य विश्वाचा, त्यांतील सामर्थ्याचा म्हणजे ज्ञानाचा व जीवानें या विश्वाशीं कोणत्या तऱ्हेनें वागलें असतां इष्टतम पुरुषार्थाची सिद्धि होईल, इत्यादि आचरणाचा उलगडा होतो. असा या प्रश्नाचा अर्थ आहे. या प्रश्नावरून दुसरी अशी एक गोष्ट अनुमानितां येते कीं, शौनकाला अंगिरस आचार्याकडे येण्यापूर्वीच नित्यानित्यविवेक प्राप्त झाला होता. त्याला या जगाचा जो शास्त्रशुद्ध अनुभव आला होता, त्यावरून त्याला असें स्पष्ट कळून चुकलें होतें कीं, सर्व ज्ञानांस आणि सर्वकर्मांस अंतर्भूत करून त्यांस अस्तित्व देणारी आणि सर्वांस नियमित करून त्या सर्वांची व्यवस्था लावणारी कांहीं एक सर्व–विलक्षण वस्तु अस्तित्वांत

असली पाहिजे. ह्या वस्तूचें ज्ञान-विज्ञान झालें असतां त्याच्या जोरावर इतर सर्व चवदा विद्या व चौसष्ट कला यांचें यथार्थ स्वरूप समजावयास पाहिजे, असा त्याचा आस्तिक्य-बुद्धीनें ग्रह झाला होता असें दिसतें आणि आणखी एक गोष्ट श्रीमच्छकराचार्यांनीं सांगितली आहे, तीही लक्षांत ठेवण्यासारखी आहे. शौनककालापर्यंत शिष्यांनीं गुरुजीकडे कसें जावें हें निश्चितपणानें ठरलें होतें, निदान ठरलेलें असल्यास इतर शिष्य ब्रह्मविद्येच्या अध्ययनाचे नियम स्पष्टरीतीनें पाळीत होते, असें या उपनिषदावरून तरी स्पष्ट दिसत नाहीं. तेव्हां असें एक अनुमान निघण्याचा संभव आहे कीं, शौनकाच्या कालापर्यंत हे नियम ठरले तरी नव्हतें, किंवा ठरले असल्यास त्यांची अम्मलबजावणी यथास्थित रीतीनें होत नव्हती; किंवा निदान ती अम्मलबजावणी होत असली तरी तिचा स्पष्ट उच्चार करण्याचें कारण यावेळेपर्यंत घडलें नव्हतें. असो; तात्पर्य हें आहे कीं, शौनकानें आत्मकल्याणार्थ अनुपालिलेले नियम जगत्कल्याणासाठीं प्रकट करण्याची यावेळीं आवश्यकता स्पष्ट झाली आणि श्रुतीनें ती नमूद करून ठेविली. पहिल्या मुंडकाच्या दुसऱ्या खंडांतील शेवटच्या दोन मंत्रांत मुमुक्षु-शिष्यानें कोणते नियम अवश्य पाळिले पाहिजेत, याचा स्पष्ट उच्चार झाला आहे. प्रत्येकानें हे नियम अवश्य पाळिले पाहिजेत, असा प्रस्तुत मंत्राचा आणि आतांच सांगितलेल्या दोन मंत्रांचा अभिप्राय आहे, हें मुख्य रहस्य होय. ॥ ३ ॥

---

## मंत्र चवथा.

**तस्मै स होवाच । द्वे विद्ये वेदितव्ये इति ह स्म यद्ब्रह्मविदो वदन्ति परा चैवापरा च ॥ ४ ॥**

**अन्वय व अर्थ—तस्मै सः उवाच ह** ( शौनकाला अंगिरस आचार्यांनीं हें उत्तर दिलें ) **द्वे विद्ये वेदितव्ये इति** ( कीं दोन प्रकारच्या विद्या जाणून घ्यावयाच्या आहेत. ) **परा च एव अपरा च इति ह यत् ब्रह्मविदः वदन्ति स्म** ( परविद्या आणि अपरविद्या अशीं ज्यांना ब्रह्मवेत्ते नांवें देतात. त्या ह्या दोन विद्या होत. ) ॥ ४ ॥

या मंत्रांत दोन विद्या समजून व संपादून घेतल्या पाहिजेत, असें मंत्रद्रष्ट्या आचार्यांनीं सांगितलें आहे. या दोन विद्या म्हणजे एक परविद्या आणि दुसरी अपरविद्या, या होत. यांचीं लक्षणें काय? स्वरूप कसें, इत्यादिकांचा विस्तार पुढें व्हावयाचा आहे. येथें मला 'वेदितव्य' या पदाचा अर्थ स्पष्ट करण्याची आवश्यकता वाटते. सर्व विश्वाचा उलगडा कोणत्या वस्तूच्या ज्ञानानें होईल असा प्रश्न आहे आणि त्याला उत्तर हें मिळालें आहे कीं, हा उलगडा होण्यासाठीं दोन प्रकारच्या विद्यांचें अध्ययन करून

त्या दोन्हीही विद्या यथार्थस्वरूपानें समजून घेतल्या पाहिजेत. परविद्येचें ज्ञान ज्या पुरुषार्थसिद्धीसाठीं अवश्य आहे, त्याच पुरुषार्थाच्या सिद्धीसाठीं अपरविद्येचें ज्ञानहि अत्यंत अवश्य आहे. अपरविद्येचे विषय, त्यांचें ज्ञान व त्यांसाठीं करावें लागणारें कर्म यांचा त्याग, मोक्षार्थ-पुरुषार्थ-सिद्धीसाठीं अवश्य आहे व असला पाहिजे, ही गोष्ट मलाही संमत आहे. तथापि ज्या वस्तूचा त्याग करावयाचा त्या वस्तूचें पूर्ण ज्ञान-विज्ञान आपल्यास झालें असलें पाहिजे, हें निर्विवाद आहे. शिवाय परावस्तचा विषय जें ब्रह्म त्यांचें पूर्ण ज्ञान झालें असलें तरी तें ज्ञान किंवा ती ज्ञानवस्तु ही अपरविद्येचा विषय जें व्यवहारज्ञान आणि व्यवहारसिद्धीसाठीं अवश्य करावें लागणारें जें कर्म त्या ज्ञानाचा व कर्माचा, या सर्वांचा अंतर्भाव कसा करते हें आपल्यास पूर्णपणें समजेल तर एक वस्तु विज्ञात झाली असतां हें सर्व विज्ञात होतें, हें जें तत्त्वज्ञानाचें किंवा ब्रह्मविद्येचें लक्षण आहे, त्याची पूर्ण सार्थकता होईल. ॥ ४ ॥

## मंत्र पांचवा.

**तत्रापरा ऋग्वेदो यजुर्वेदः सामवेदोऽथर्ववेदः शिक्षा कल्पो व्याकरणं निरुक्तं छन्दो ज्योतिषमिति । अथ परा यया तदक्षरमधिगम्यते ॥ ५ ॥**

**अन्वय व अर्थ—तत्र अपरा** ( अपरविद्येचे पुढील विषय आहेत. ) **ऋग्वेदः, यजुर्वेदः, सामवेदः, अथर्ववेदः, शिक्षा, कल्पः, व्याकरणं, निरुक्तं, छंदः, ज्योतिषं इति** ( ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद आणि ज्योतिष हे अपराविद्येचे विषय होत ) **अथ परा** ( नंतर परविद्येचें लक्षण सांगितलें आहे. ) **यया तत् अक्षरं अधिगम्यते** ( ज्या विद्येनें त्या अविनाशी वस्तूचें ज्ञान होतें व तिची प्राप्ति ही ज्या विद्येच्या साहाय्यानें होते तिला परविद्या असें म्हणावें. ) ॥ ५ ॥

या मंत्रांत अपर आणि परविद्येचे विषय सांगून त्यांचीं लक्षणेंही समजतील, असें त्यांचें वर्णन केलें आहे. अपरविद्येंत ऋग्वेदप्रमुख चारी वेद आणि शिक्षा-कल्पादि सहा अंगें, यांचा अंतर्भाव होतो. ऋग्वेदादिवेदांत सर्व प्रकारचे ऐहिक व स्वर्गीय ज्ञानांचीं व इहलोकसंबंधी व स्वर्गसंबंधी कल्याण करून घेण्यास साधनीभूत असणाऱ्या नीतीचीं आणि धर्माचीं तत्त्वें सांगितलेलीं असतात. शिक्षा-कल्पादि जीं सहा उपांगें आहेत, तीं वेद म्हणण्याच्या कामीं, त्याचा अर्थ करण्याच्या कामीं, यज्ञ कर-

ग्याच्या कामीं, इत्यादि वैदिक कर्मांस उपयोगी पडणारीं आहेत. तात्पर्य, विश्वाच्या संबंधानें आपण कसें वागावें? कसें वागलें असतां जीवाचें ऐहिय व स्वर्गीक दृष्टीनें कल्याण होईल, असा विचार वेद आणि ब्राह्मण यांत केलेला असावयाचा. तात्पर्य ज दिसत-भासत आहे, जें अपूर्व पण पुढें दृश्य व्हावयाचें आहे व जें विषयसुख देणारें आहे, त्याचा विचार ऋग्वेदादि अपरविद्येच्या विषयांत केला आहे. आणि परविद्येचा विषय अक्षर हा आहे. अक्षर या पदाचे अनेक अर्थ आहेत; त्यांत व्याकृत जगत्, अव्याकृत मूल-प्रकृति, हिरण्यगर्भ आणि या सर्वांचा आत्मा असून त्यांस नियमित करणारा नित्य, अविकारी, सर्वव्यापी परमात्मा हे चार अर्थ या उपनिष. दांतच प्राप्त झाले आहेत. या मंत्रांत मात्र शेवटीं सांगितलेला अर्थ इष्ट आहे. येथें अक्षर म्हणजे ब्रह्म होय. या ब्रह्माचें ज्ञान-विज्ञान करून देऊन म्हणजे सर्वत्र ब्रह्म आहे असा निश्चय करवून त्याची प्राप्ति होण्याचे श्रवण-मननादि उपाय सांगणें हें परविद्येचें काम आहे ॥ ५ ॥

---

## मंत्र सहावा.

**यत्तदद्रेश्यमग्राह्यमगोत्रमवर्णमचक्षुःश्रोत्रं तदपाणिपादम् । नित्यं विभुं सर्वगतं सुसूक्ष्मं तदव्ययं यद्भूतयोनिं परिपश्यन्ति धीराः ॥ ६ ॥**

**अन्वय व अर्थ—यत् अद्रेश्यं, अग्राह्यं, अगोत्रं, अवर्णं, अचक्षुःश्रोत्रं, अपाणिपादं, तत् नित्यं, विभुं, सर्वगतं, सुसूक्ष्मं** ( जें कर्ण-नेत्रादि इंद्रियांस पाहतां ऐकतां येत नाहीं; ज्याचें ग्रहण हस्तपादादिकांनीं करितां येत नाहीं; ज्याच्या उत्पत्तीला कारण असत नाहीं; जें स्वतः कोणत्याहीं दृष्टीनें कारण होत नाहीं, ज्याला नेत्रकर्णादि इंद्रियें नाहींत, हस्तपादादि अवयव नाहींत, जें स्वभावतः नित्य, सर्वगामी, सर्वव्यापी, सर्वसूक्ष्म आहे ) **यत् धीराः भूतयोनिं परिपश्यंति तत् अव्ययं** ( विद्वान्, बुद्धिवान्, आणि विवेकी लोक ज्याला भूतयोनि असें तात्त्विक दृष्टीनेंपाहतात तें अव्यय आहे. ) ॥ ६ ॥

या मंत्रांत ब्रह्मस्वरूपाचीं लक्षणें सांगून त्याचें वर्णन केलें आहे. हें ब्रह्म अद्रेश्य म्हणजे परिच्छिन्नजीवांच्या इंद्रियांचा विषय होणारें नाहीं, हें पाहतां-ऐकतां येण्यासारखें नाहीं. तसेंच इंद्रियांच्या साहाय्यानें प्राप्त होणाऱ्या ज्ञानावर संस्कार करून ज्ञानविषयास

नामरूप देणाऱ्या मनोबुद्धीलाही हें ब्रह्म अगोचर आहे. सारांश, परिच्छिन्न इंद्रियांचा व परिच्छिन्न मनोबुद्धींचा ज्ञानविषय होण्यासारखें हें नाहीं. विश्वाचें ज्ञान आपल्यास होतें, विश्व ज्ञेयवस्तु असते, त्याप्रमाणें हें ज्ञेयवस्तु नाहीं. याप्रमाणेंच अवयवांनीं ग्रहण करण्यासारखी किंवा मनोबुद्धींनीं ग्रहण करण्यास येणाऱ्या सुख-दुःखासारखी ही वस्तु नाहीं. ब्रह्मवस्तु ज्ञेय नाहीं व ग्राह्यही नाहीं. म्हणून, इंद्रियावयवांचे विकार ब्रह्मावर होत नाहींत; तें नित्य आहे व सर्वांचें नियामक आहे. ब्रह्म अगोत्र आहे म्हणजे कारणशून्य आहे, तें अवर्ण आहे म्हणजेही तें कार्यशून्य आहे. तें कार्य-कारणशून्य आहे, तें विकार्य नाहीं किंवा विकारीही नाहीं, म्हणून तें सर्वव्यापी असतें. गोत्र म्हणजे आपण ज्या ऋषि-वंशांत उत्पन्न झालों त्याचा मूळपुरुष होय. ब्रह्म केव्हांच उत्पन्न झालें नाहीं, म्हणून त्याला गोत्र नाहीं. याचप्रमाणें तें अवर्ण आहे, म्हणजे त्याला जाति नाहीं. व्यवहारांत आपण म्हणतों त्याप्रमाणें त्याला 'जात-गोत' कांहीं नाहीं; म्हणून तें अनादि आणि अनंत असें आहे. त्याला चक्षुःश्रोत्रादि इंद्रियें नाहींत किंवा हस्तपादादि अवयव नाहींत. दुसरा पदार्थ पहावयाचा असल्यास किंवा मिळवावयाचा असल्यास इंद्रियांची व अवयवांची आवश्यकता असते. ब्रह्माला इंद्रियावयव नाहींत, असें श्रुतीनें सांगितलें आहे. त्यावरून एक स्पष्ट असा ध्वनि निघतो कीं, ब्रह्माशिवाय परमार्थतः दुसरी वस्तुच नाहीं, हें तत्त्व सांगण्याचा श्रुतीचा अभिप्राय आहे. यावरून तें अत्यंत सूक्ष्म असलें पाहिजे, असें झालें. अत्यंत सूक्ष्मवस्तु इंद्रियशून्य व अवयवशून्य असते, हें प्रसिद्ध आहे. आकाशाला अवयव नाहींत हें कोणास ठाऊक नाहीं? तसेंच तें अव्ययही आहे; कारण अत्यंत सूक्ष्मवस्तूला विकार करणारी दुसरी वस्तूच नसते. यामुळें ब्रह्मासारखी सूक्ष्म वस्तु अव्यय अथवा विकारशून्य असते. तात्पर्य ब्रह्म ही वस्तु नित्य, अनायनंत, कार्य-कारणशून्य, सर्वव्यापी, एक आणि अव्यय अशी आहे. इच्यापासूनच सर्व भूतें उत्पन्न होतात म्हणजे आपल्यास दृश्यमान होणारें चराचर विश्व व त्यांतील सुख-दुःखें हीं सर्व ब्रह्माच्या अधिष्ठानावर दृश्य-भास्य होतात. सर्व विश्वाचें अधिष्ठान ब्रह्म आहे, आणि तें एक असून नित्य, एकरस, सर्वत्र घनदाट पसरलेलें, सर्व-स्वामी आणि विकारशून्य आहे, असें विद्वान् आणि विवेकी पुरुषांस समजतें. विवेकी पुरुषांस उपयोगी पडणारें हें ब्रह्मलक्षण आणि ब्रह्मवर्णन आहे. या ब्रह्माचें ज्ञान परविद्येनें मात्र होतें, असें मागच्या मंत्रांत सांगितलेंच आहे. ॥ ६ ॥

## मंत्र सातवा.

**यथोर्णनाभिः सृजते गृह्णते च यथा पृथिव्यामोषधयः संभवन्ति । यथा सतः पुरुषात्केशलोमानि तथाऽक्षरात्संभवतीह विश्वम् ॥ ७ ॥**

**अन्वय व अर्थ—यथा ऊर्णनाभिः सृजते गृह्णते च, यथा पृथिव्यां ओषधयः संभवन्ति, यथा सतः पुरुषात् केशलोमानि, तथा अक्षरात् विश्वं इह संभवति** ( ऊर्णनाभि म्हणजे कोळी जाळें निर्माणकरून त्याचा लय करितो, पृथ्वीमधून वृक्ष वनस्पती आदि स्थावरजंगम पदार्थ उत्पन्न होतात व तेथेंच लयाला जातात. आणि जिवंतपुरुषापासून केश, लोम, इत्यादि उत्पन्न होऊन नाहींशीं होतात, त्याप्रमाणेंच अक्षर जें परब्रह्म त्यापासून हें सर्व चराचर, मूर्तामूर्त, विश्व म्हणजे ब्रह्मांड उत्पन्न होतें आणि तेथेंच तें लयास ही जातें. ) ॥ ७ ॥

ब्रह्म–वस्तु एक आणि अव्यय आहे, तर सृष्टि कशी उत्पन्न झाली, सृष्टीचा कर्ता कोण, सारांश, सृष्टीची उपादान आणि निमित्त कारणें कोणतीं, अशी शंका येईल. तिचें उत्तर तीन दृष्टांत घेऊन या मंत्रांत दिलें आहे. कोणत्याही अन्य उपादान कारणाची अपेक्षा न करतां कोळी आपल्या शरीरांतून तंतु बाहेर काढून त्यांचें जाळें निर्माण करितो आणि इष्ट कार्य झालें म्हणजे ते आपल्या शरीरामध्यें ओढून घेतो, हें उदाहरण असें दर्शवितें कीं, अन्य उपादानकारण नसतांही कोळ्यांस एक लहानशी सृष्टि उत्पन्न करितां येऊन तिचा उपसंहारही करितां येतो. पृथ्वीच्या दृष्टांतांत निमित्तकारणाचा अभाव आहे. आणि तिसऱ्या दृष्टांतांत जीवासारख्या ज्ञानी पुरुषापासून केश–लोमादिकासारखे नित्य वाढणारे परंतु अज्ञानी असणारे पदार्थ उत्पन्न होतात व त्यांचें उपादानकारण व निमित्त-कारण तोच असतो असें सामान्य व्यवहारांत दिसतें. तात्पर्य निमित्त व उपादान कारणें नसतांही एका पदार्थाला दुसरे स्वविलक्षण पदार्थ निर्माण करितां येतात व त्यांचा लयही करितां येतो, असें सामान्य व्यवहारांत दिसतें. सर्वांस अनुभवही असाच आहे. तेव्हां एक आणि अव्यय ब्रह्माला अनेकरूपी व कमी–अधिक होणारी सृष्टि निर्माण करितां येणें अशक्य नाहीं, हें म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. वरील दृष्टांत हे केवळ दृष्टांतापुरतेच घ्यावयाचे आहेत. केवळ समजूत पडावी यासाठीं या दृष्टांतांचीं उपयोजना केलेली आहे. आपल्यास बोध घ्यावयाचा आहे, तो इतकाच कीं परमार्थ-दृष्टीनें एक असणारी वस्तु व्यवहारांत अनेक आणि स्वरूप–विलक्षण झाली आहे असें दिसतें. सृष्टि अनेकरूपी आहे आणि क्षय- वृद्धि पावणारी आहे; तेव्हां तिच्या उत्पत्ति–लयाला कांहींतरी एक आणि अव्यय असें कारण असलें पाहिजे, असें शास्त्रशुद्ध व्यावहारिक दृष्टीला वाटत असतें आणि व्यवहारांत हें वाटणें नीट आहे म्हणून व्यावहारिक दृष्टीची व्यावहारिक समजूत पडावी एतदर्थ मात्र हे व्यावहारिक दृष्टांत उपयोगी पडतात आणि एक वस्तु अनेकरूपी कशी होते, अव्यय वस्तूपासून विकारी पदार्थ कसे

उत्पन्न होतात, हें व्यावहारिक रीतीनें दाखविण्यासाठीं मात्र मंत्रांतील दृष्टांतांचा उपयोग होतो. या प्रश्नाची विशेष चर्चा मी उपसंहारांत करणार आहें. ॥ ७ ॥

---

## मंत्र आठवा.

**तपसा चीयते ब्रह्म ततोऽन्नमभिजायते । अन्नात्प्राणो मनः सत्यं लोकाः कर्मसु चामृतम् ॥ ८ ॥**

**अन्वय व अर्थ—ब्रह्म तपसा चीयते** ( ज्ञानरूपी तपानें ब्रह्म संपन्न होतें. ) **ततः अन्नं अभिजायते** ( त्यापासून अन्न—अव्यक्त मूळ प्रकृति—उत्पन्न होते. ) **अन्नात् प्राणः, मनः, सत्य, लोकाः, कर्मसु अमृतम् च** ( अन्नापासून प्राण, त्यापासून मन, सत्य, पंचमहाभूतें—सप्तभुवनें, कर्म आणि उपभोगाशिवाय विनाश न पावणारी कर्मफलें उत्पन्न होतात. ) ॥ ८ ॥

या मंत्रांत परब्रह्मापासून सृष्ट्युत्पत्तीचा क्रम कसा असतो तें सांगितलें आहे. प्रथमतः—सृष्टि उत्पन्न होण्याच्या पूर्वी,—परब्रह्म ज्ञानधारकाच्या रूपानें आविर्भूत होऊन सृष्टि उत्पन्न करण्याचा संकल्प ज्ञानरूपानें सिद्ध करितें. या संकल्पापासून अन्न म्हणजे मूल—प्रकृति ( चराचर सृष्टीचें उपादान—कारण ) उत्पन्न होते. मूल प्रकृतीपासून प्राण ( चेतनशक्ति ) प्रकट होतो. पुढें प्राणापासून संकल्प—विकल्प—निश्चयादि स्वरूपाचें मन, त्यापासून आकाश, वायु, आदि पंचमहाभूतें, त्यापासून भूर्भुवादि अनेक लोक, त्यांमध्यें कर्म आणि कर्मापासून उत्पन्न होणारें अमृत ( कर्मफल ) असा या विविधसृष्टीच्या उत्पत्तीचा क्रम आहे. ध्यानांत ठेवावयाचें हें आहे कीं, केवल ज्ञानरूपी ब्रह्म ज्ञानी होऊन नंतर सृष्टीच्या उत्पत्तीचा संकल्प पूर्वसृष्टींतील कर्मसंचयानुसार सिद्ध करितें. हा संकल्प ज्ञानी हिरण्यगर्भ करितो आणि तो सिद्ध करण्यासाठीं अनादि जी मूलप्रकृति तिला आविर्भूत करितो. इच्छापासूनच चराचर सृष्टि उत्पन्न होते. प्रथमतः प्राण, नंतर मन, या क्रमानें कर्मफलापर्यंतची सृष्टि ही हिरण्यगर्भ आणि मूल प्रकृति यांच्या द्वारासिद्ध होते. ॥ ८ ॥

---

## मंत्र नववा.

**यः सर्वज्ञः सर्ववित्यस्य ज्ञानमयं तपः । तस्मादेतद्ब्रह्म नाम रूपमन्नं च जायते ॥ ९ ॥**

**अन्वय व अर्थ—यः सर्वज्ञः, सर्ववित्, यस्य ज्ञानमयं तपः** (जो सर्वज्ञ आहे, ज्याला सर्वांचें विशेष ज्ञान आहे, ज्याची तपश्चर्या ज्ञानरूप असते,) **तस्मात् एतत् ब्रह्म, नाम, रूपं, अन्नं च जायते** (त्यापासून हें दृश्य ब्रह्म, नाम, रूप आणि अन्न यांची उत्पत्ति मागच्या मंत्रांत सांगितलेल्या क्रमाप्रमाणें होते.) ॥ ९ ॥

या मंत्रांत उत्पत्तीच्या क्रमाचा उपसंहार केला आहे. उत्पत्तीचा विस्तार पुढें दुसऱ्या मुंडकाच्या पहिल्या खंडांत सांगावयाचा आहे. येथें केवळ इतकेंच सांगितलें आहे कीं, मायेचा सत्त्व नामक विकार स्वीकृत करून ब्रह्म सगुण होतें. हें झाल्यानंतर त्याला पुढें जी काय सृष्टि करावयाची आहे, त्याचें सामान्य ज्ञान आणि सृष्टींतील प्रत्येक पदार्थाचें विशेषज्ञान संकल्परूपानें आविर्भूत होतें. आपल्या सत्त्वगुणात्मक ज्ञानाच्या सामर्थ्यानें हें सगुण ब्रह्म पुढें होणाऱ्या सृष्टीचा सर्व-सामान्य आणि विशेष नकाशा आपल्या संकल्पामध्यें अवतीर्ण करितें. आणि नंतर तेंच सगुण ब्रह्म विराट्-स्वरूप धारण करून नामरूप आणि अन्न असें दोन प्रकारानें सिद्ध होतें. अन्न म्हणजे सृष्टीचें मूल अथवा अव्यक्त आणि अव्याकृत स्वरूप होय. यालाच मूल प्रकृति असें म्हणतात. मंत्रोक्त नामरूप या पदांनीं मूल प्रकृतीचें सामान्य आणि विशेष ज्ञान हें समजावयाचें आहे. विराट्स्वरूपी ब्रह्म हा सगुणब्रह्माचा पहिला परिणाम आहे. ब्रह्मानें सगुणस्वरूपाचा स्वीकार करून संकल्प आणि संकल्पविषय सिद्ध केल्याबरोबर त्याचा पहिला परिणाम (सृष्टि आणि सृष्टिज्ञान) व्यक्त आणि व्याकृतस्वरूपामध्यें होतो. परमार्थतः एकच ब्रह्म सामान्य-निर्गुण-व विशेषस्वरूपांनीं विद्यमान असतें;पण व्यवहारतः सगुणस्वरूपानें (ज्ञानस्वरूपानें) आणि नंतर विराट्स्वरूपानें म्हणजे ज्ञाता आणि ज्ञेय या स्वरूपानें अवतीर्ण होतेंसें दिसतें. हा सृष्टीचा सूत्ररूप उत्पत्तिप्रकार या मंत्रांत सांगितला आहे. अशाच अर्थाचें वर्णन प्रश्न, ऐतरेय, छान्दोग्य, बृहदारण्यक इत्यादि उपनिषदांत अवतीर्ण झालें आहे. सारांश, वस्तुतः निर्गुण ब्रह्म एक-रस-स्वरूपाचें आहे. विचारानें याच स्वरूपाचा निश्चय व्हावयाचा आहे. पण व्यवहारांत निमग्न असलेल्या जीवांस ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान; कर्ता, कर्म व कार्य; भोक्ता, भोग्यवस्तु आणि भोग, इत्यादि प्रकारांनीं ही सृष्टि दिसत असते. व्यावहारिक शास्त्रदृष्टीनें या पूर्वोक्त त्रयीला कधीं ज्ञाता आणि ज्ञेय, कधीं ज्ञाता आणि ज्ञान आणि कधीं ज्ञान आणि ज्ञेय या द्वयीचा मात्र विचार करितां येतो; व शेवटीं या द्वयीचा विचार करितां करितां ती एकस्वरूपामध्यें म्हणजे ज्ञानस्वरूपामध्यें लीन होते. हें ज्ञान अपौरुषेय उपनिषदांच्या अध्ययनानें, गुरूच्या उपदेशानें आणि जीवाच्या श्रवण-मननादि साधनांनीं 'एकच ब्रह्मज्ञान—स्वरूपांत मात्र विद्यमान आहे' असा निश्चय होऊन 'ज्ञान-स्वरूप मी आहें.' असा साक्षात्कार होतो. याप्रमाणें

अविद्यामूलक संसाराची उन्नति व्यावहारिक ज्ञान आणि व्यावहारिक कर्म विहित करणाऱ्या ज्ञानशास्त्रांत व धर्मशास्त्रांत होते आणि पुनः या उभयतांची उन्नति वेदांतशास्त्रांत होते. हें शेवटचें शास्त्र जीवांस ज्ञानस्वरूप करून अखंड आणि अभंग शांति देतें. हा विचाराच्या दृष्टीनें सत्याचा भाग आहे. जीवांस पुरुषार्थाचा मार्ग दाखविण्याचा हा क्रम आहे. ब्रह्म सत्य आहे, हें जीवांस अनुभवदृष्टीनें सिद्ध करून ध्यावयाचें आहे आणि हें सिद्ध करण्यासाठीं सृष्टीचा व ज्ञानाचा उत्पत्तिस्थितिलयक्रम श्रुतीस येथें व अन्यत्र सांगावा लागला आहे. ॥ ९ ॥

**प्रथम खण्ड समाप्त.**

---

***यस्मात्परं नापरमस्ति किंचित् ।**
**यस्मान्नाणीयो न ज्यायोऽस्ति कश्चित् ॥**
**वृक्ष इव स्तब्धो दिवि तिष्ठत्येकः ।**
**तेनेदं पूर्णं पुरुषेण सर्वम् ॥ ७ ॥**

---

# प्रथम—मुंडक ।

## खंड दुसरें.

### मंत्र पहिला.

**तदेतत्सत्यं मन्त्रेषु कर्माणि कवयो यान्यपश्यंस्तानि त्रेतायां बहुधा संततानि । तान्याचरथ नियतं सत्यकामा एष वः पन्थाः सुकृतस्य लोके ॥ १ ॥**

अन्वय व अर्थ—तत् एतत् सत्यं (तें हें सत्य आहे. ब्रह्म मात्र सत्य आहे. जीवानें आपलें आत्यंतिक कल्याण करण्यासाठीं हें सत्य

---

* हा मंत्र रंगरामानुजानीं दिला आहे. पण हा क्षेपक असावा असें वाटतें. अर्थ मागें दिलाच आहे.

समजून घेतलें पाहिजे.) **मंत्रेषु यानि कर्माणि कवयः अपश्यन् तानि त्रेतायां बहुधा संततानि** (वेदमंत्रांमध्यें बुद्धिवान् पुरुषांनीं जीं कर्में पाहिलीं तीं त्रेतायुगामध्यें–किंवा तीन स्वरूपांनीं–अनेक प्रकारचीं झालीं) **सत्यकामाः तानि नियतं आचरथ** (सत्य वस्तु प्राप्त करून घेण्याची इच्छा धारण करणारे जीव हो, या कर्मांचें योग्य तऱ्हेनें अनुपालन करा.) **सुकृतस्य लोके एषः वः पन्थाः** (सुकृताच्या लोकाला नेणारा हाच मार्ग तुमच्यासाठीं निर्माण झाला आहे.) ॥ १ ॥

या मंत्राचा अर्थ उघड आहे. वेदमंत्रांमध्यें जीं जीं म्हणून विहित कर्में बुद्धिवान् पुरुषांस ज्ञानगोचर झालीं, त्यांचा विस्तार पुढें तीन रूपांनीं अनेकप्रकारचा झाला. हे तीन प्रकार म्हणजे होत्र, याजुष आणि औद्गात्र होत. मंत्रोक्त देवांस आहुति घेण्यासाठीं आवाहन करणें, त्यांस आहुति देणें आणि आहुति देत असतां गायन करणें, असें तीन प्रकारचें कर्म पुढें आविर्भूत झालें. आणि नंतर याच तीन कर्मांचा मोठा थोरला शाखावृक्ष सिद्ध झाला. येथें श्रुतीला सांगावयाचें आहे कीं, ज्या कोणाला व्यवहारतः कृतार्थ व्हावें अशी इच्छा असेल, त्यानें पूर्वीच्या ज्ञानवान् ऋषींस जीं कर्म ज्या मूल स्वरूपानें आविर्भूत झालीं, त्या कर्मांचें त्याच स्वरूपानें अनुष्ठान केलें पाहिजे. तात्पर्य, पूर्वीच्या ऋषींनीं जसें कर्म केलें तसें कर्म प्रत्येक ज्ञानी पुरुषानें केलें तर त्याचें ऐहिक आणि पारमार्थिक कल्याण होईल. हीं कर्में व्यवहारतः सत्य आहेतच. पण ज्याला ब्रह्मज्ञान संपादन करून ब्रह्म व्हावयाचें आहे त्यानें या 'सत्यरूपी' कर्मांचें निष्काम अनुष्ठान केलें तर हीं कर्में चित्तशुद्धीच्या कामीं उपयोगीं पडतील व त्याप्रमाणें त्यांस सत्यत्व येईल ॥ १ ॥

---

## मंत्र दुसरा.

**यदा लेलायते ह्यर्चिः समिद्धे हव्यवाहने।**
**तदाऽऽज्यभागावन्तरेणाऽऽहुतीः प्रतिपादयेत् ॥ २ ॥**

**अन्वय व अर्थ—हि यदा समिद्धे हव्यवाहने अर्चिः लेलायते** (होमकुंडांतील अग्नि प्रज्वलित झाला असतां जेव्हां जेव्हां त्याची ज्वाला होमकुंडामध्यें क्रीडाकरिते,) **तदा आज्यभागौ अन्तरेण आहुतीः प्रतिपादयेत** (त्यावेळीं दक्षिणोत्तरभागीं व पार्श्वभागीं ज्या आज्यभागांचें यजन होतें, त्या भागांतील स्थानावकाशामध्यें आहुतींचा प्रक्षेप करावा.) ॥ २ ॥

येथें अग्निहोत्राच्या आहुति केव्हां व कोठें द्याव्या, हें सांगितलें आहे. होमकुंडांतील अग्नि प्रज्वलित होऊन तो अमळसा शांत झाला, कुंडामध्येंच क्रीडा करूं लागला, बालकासारख्या आपल्या काली आदि जिह्वा बाहेर काढून त्या चालित आहे, असा जेव्हां समय येतो, तेव्हां दर्शपौर्णमास इष्टींच्या आहुतिस्थानांमध्यें जो स्थलावकाश असतो, त्या अवकाशांत अग्निहोत्राच्या आहुति ज्या स्थानीं द्यावयाच्या असतात, त्या स्थानीं दररोज दोन आहुति देवतांच्या उद्देशानें द्याव्या. सारांश, यथाविधि कर्म करावें म्हणजे तें सुकृत होतें. ॥ २ ॥

---

## मंत्र तिसरा.

**यस्याग्निहोत्रमदर्शमपौर्णमासमचातुर्मास्यमनाग्रयणमतिथिवर्जितं च । अहुतमवैश्वदेवमविधिना हुतमाससप्तमांस्तस्य लोकान्हिनस्ति ॥ ३ ॥**

**अन्वय व अर्थ—यस्य अग्निहोत्रं अदर्शं, अपौर्णमासं, अचातुर्मास्यं, अनाग्रयणं, अतिथिवर्जितं, अहुतं, अवैश्वदेवं, अविधिना हुतं च** ( ज्या अग्निहोत्र्याचें अग्निहोत्र, दर्शपौर्णमास, चातुर्मास्य, अग्रयण, इत्यादि कर्मांनीं वर्जित झालें आहे, ज्याचें अग्निहोत्र अतिथींचा सत्कार करणारें नाहीं, जो अग्निहोत्री वैश्वदेव करीत नाहीं आणि ज्याचें हवन अविधिपूर्वक होतें ) **तस्य आससप्तमान् लोकान् हिनस्ति** ( तें अग्निहोत्र, त्या अग्निहोत्र्याचे सप्तलोकापर्यंतच्या सर्व भूर्भुवादि लोकांचा नाश करितें. ) ॥ ३ ॥

या मंत्रांत अग्नींचें यजन करून अग्निहोत्र धारण करणाऱ्या पुरुषानें अग्निहोत्रास अवश्य असणारीं कर्मे केलीं नाहींत तर त्याचा सर्वस्वी घात होतो, असें सांगितलें आहे. दर्शपौर्णमास, चातुर्मास्य, अग्रयण इत्यादि अनेक प्रकारच्या इष्टि आहेत. प्रत्येक आमावास्येला पूर्णिमेला, प्रत्येक चातुर्मासाला आणि शरत्कालीं विशेष कर्म करून अग्नीचें यजन करावें लागतें. हें कर्म अवश्य आहे. याचप्रमाणें आपल्या घरीं यदृच्छेनें अतिथि प्राप्त झाला असतां त्याचा आदरसत्कार करणें व त्याला अन्नपानादिकांनीं तृप्त करणें हेंही अवश्य कर्म आहे. अग्निहोत्र ठेवून नित्य आहुति देणें, वैश्वदेव करणें आणि सर्व कर्मे विधिपूर्वक करणें याही गोष्टी अनिवार्य पक्षाच्या आहेत. वर सांगितलेलीं कर्मे अग्निहोत्र्यानें केलीं नाहींत तर त्याचा सर्वस्वी घात होतो. त्याला येथें किंवा इतरत्र कोठेंही जीवनसुख मिळत नाहीं, असें श्रुतीचें सांगणें आहे. प्रत्येक गृहस्थानें

गृह्याग्नीचें अनुष्ठान करावयाचें असतें. त्याप्रमाणेंच प्रत्येक अग्निहोत्र्यानें वर सांगितलेलीं सर्व कर्में विधिपूर्वक केलींच पाहिजेत. हीं केलीं असतां भूलोक, भुवर्लोक, स्वर्लोक, महर्लोक, जनलोक, तपोलोक, सत्यलोक, या सप्तलोकांचें सुख कर्मकर्त्यास प्राप्त होतें. अर्थातच हीं कर्में न करणारास किंवा अविधि-पूर्वक कर्में करणारास हें लोकोत्तर सुख मिळत नाहींच, पण उलट दुःखमात्र त्यांच्या पदरीं पडतें. तात्पर्य हें आहे कीं, अग्निहोत्र असो किंवा दुसरें कोणतेंही वैदिक कर्म असो, तें कर्म विधिपूर्वक केलें पाहिजे. याप्रमाणें कर्म केलें तर पुण्यलोकांची प्राप्ति होते. यथासांग कर्म करण्याच्या आड हीं असलीं अनेक विघ्नें येतात, तेव्हां फार सावधपणानें प्रत्येक जीवानें आपलें नियतकर्म करावें हा वेदमान्य मार्ग आहे. यानें कल्याण होणार आहे, हें प्रत्येक वेदनिष्ठ कल्याणेच्छूनें लक्षांत ठेवावें. ॥ ३ ॥

---

## मंत्र चवथा.

**काली कराली च मनोजवा च सुलोहिता या च सुधूम्रवर्णा । स्फुलिङ्गिनी विश्वरुची च देवी लेलायमाना इति सप्त जिह्वाः ॥ ४ ॥**

**अन्वय व अर्थ—काली, कराली च, मनोजवा च, सुलोहिता, या च सुधूम्रवर्णा, स्फुलिङ्गिनी, च, लेलायमाना विश्वरुची देवी, इति सप्त जिव्हाः** ( काली, कराली, मनोजवा, सुलोहिता, सुधूम्रवर्णा, स्फुलिंगिनी आणि स्पंदन करणारी विश्वरुची देवी या अग्नीच्या सात जिव्हा आहेत. ) ॥ ४ ॥

येथें अग्नीच्या प्रकाशनाचीं सात निरनिराळीं स्वरूपें सांगितलीं आहेत. कुंडामध्यें अग्नि घालून व कुंडस्थ अग्नीस गोमयाचे गोळे समर्पण केल्यानंतर अग्नीचीं जीं अनेक स्वरूपें दृष्टीस पडतात त्यांचें हें निदर्शन आहे. प्रथम कृष्ण वर्ण, नंतर तांबडसर वर्ण, पुढें धूमासह प्रकट होणारा अग्नि, नंतर ठिणग्यांच्या रूपानें प्रकट होणारा आणि शेवटीं चंचल व दिव्य असणारी सुंदर ज्वाला, अशा प्रकारचीं हीं अग्नीचीं स्वरूपें आहेत. अग्नि प्रकट होतो तो याच स्वरूपांनीं होत जातो. यांवरच रूपक करून वेदानें अग्नीच्या या सप्त जिह्वा आहेत असें म्हटलें आहे. सप्त लोकांस पोंचविणाऱ्या या अग्नीच्या सप्त जिह्वा होत. या प्रत्येक जिह्वेस आहुतिप्रदान करणें हा धर्म आहे. ॥ ४ ॥

## मंत्र पांचवा.

**एतेषु यश्चरते भ्राजमानेषु यथाकालं चाऽऽहुतयो ह्याददायन्। तं नयन्त्येताः सूर्यस्य रश्मयो यत्र देवानां पतिरेकोऽधिवासः॥ ५॥**

**अन्वय व अर्थ—यथाकालं आहुतयः आददायन् च यः एतेषु भ्राजमानेषु चरते** ( श्रुतीनें ज्या ज्या कालीं ज्या ज्या आहुती द्याव्या असें सांगितलें आहे, त्या त्या कालीं त्या त्या आहुती अग्नीला देऊन जो अग्निहोत्री या तेजस्वी असणाऱ्या अग्निस्वरूपांची यथासांग सेवा करितो. ) **यत्र देवानां एकः पतिः अधिवासः एताः सूर्यस्य रश्मयः तं नयन्ति** ( देवांचा अद्वितीय स्वामी जो इंद्र त्याचें जेथें वास्तव्य आहे, तेथें ह्या सप्तजिव्हात्मक सूर्यरश्मि–सूर्यकिरण–त्या अग्निहोत्र्याला घेऊन जातात. ) ॥ ५ ॥

ह्याही मंत्राचा अर्थ स्पष्ट आहे. अग्निसेवा विधिपूर्वक करणाऱ्याला कोणत्या फलाची प्राप्ति होते, हें येथें सांगितलें आहे. अग्नीच्या सात जिह्वा आहेत म्हणून वर सांगितलें त्यांनाच येथें सूर्यकिरणस्वरूप प्राप्त होतें असें म्हटलें आहे. 'स्वर्गकामो यजेत ' ' ज्या पुरुषाला स्वर्ग हवा असेल त्यानें यज्ञ करावा ' असें श्रुतीचें सांगणें आहे. यज्ञानें स्वर्ग मिळतो तेव्हां अर्थात् तेथें नित्य वास्तव्य करणारा, देवांचा स्वामी जो इंद्र त्याच्या संगतीचा लाभ होऊन स्वर्गस्थ अग्निहोत्र्यास सुख मिळतें. ॥ ५ ॥

---

## मंत्र सहावा.

**एह्येहीति तमाहुतयः सुवर्चसः सूर्यस्य रश्मिभिर्यजमानं वहन्ति। प्रिया वाचमभिवदन्त्योऽर्चयन्त्य एष वः पुण्यः सुकृतो ब्रह्मलोकः॥ ६॥**

**अन्वय व अर्थ—सुवर्चसः आहुतयः 'एहि एहि' इति, प्रियां वाचं अभिवदन्त्यः सूर्यस्य रश्मिभिः तं यजमानं वहन्ति एषः वः पुण्यः, सुकृतः, ब्रह्मलोकः, अर्चयन्त्यः** ( या तेजस्वी सूर्याच्या किरणांनीं सुशोभित झालेल्या आहुति त्या यजमानास 'यावें यावें '

असें आवाहान करून त्या यजमानाला घेऊन जातात व 'आपल्याला हा पुण्यकारक ब्रह्मलोक ( स्वर्गलोक ) आपल्या पुण्याईनें प्राप्त झाला आहे' अशा प्रकारचें सुखदायक स्तवन करून त्या यजमानाची पूजा करितात. ) ॥ ६ ॥

या मंत्रांत यजमानाचें स्वर्गलोकीं गमन कसें होतें, हें सांगितलें आहे. वेदानें सांगितलेलें यजन-याजनादि पुण्यकर्म केलें असतां इंद्रलोकाची प्राप्ति आहुति-द्वारानें होते. सर्व आहुति यजमानाची स्तुति करितात, त्याला प्रत्यक्ष स्वर्गलोक दाखवून तेथें नेतात आणि त्याची पूजा करितात, इत्यादि प्रकार येथें वर्णन केला आहे. येथें ब्रह्मलोक याचा अर्थ इंद्रलोक असाच केला पाहिजे. कारण, 'यज्ञानें स्वर्गलोक प्राप्त होतो' असें वेद म्हणतात. प्रकरणही स्वर्गाचें आहे आणि सत्कर्म केलें असतां त्या कर्माचें फल भोगण्यासाठीं स्वर्गलोकासारख्या श्रेष्ठ लोकाची प्राप्ति व्हावी हेंही न्याय्य आहे.

याप्रमाणें या खंडांतील पहिल्या मंत्रापासून तों सहाव्या मंत्रापर्यंत स्वर्ग-प्रापक विहित कर्म कोणतें ? करावें कसें ? विहित कर्म केलें नाहीं तर किंवा केलेलें कर्म अविधिपूर्वक झालें तर काय शिक्षा होते ? आणि विहित कर्म विधिपूर्वक केलें तर कोणतें फल प्राप्त होतें, हें सर्व विस्तारानें सांगून पहिल्या मंत्रांत "एषः वः सुकृतस्य पन्थाः ( सत्कर्माचा तुम्हांस योग्य असा हा मार्ग आहे ) " असें प्रतिज्ञारूपानें जें सांगितलें त्याचें श्रुतिबलानें समर्थन केलें आहे. सारांश, या सहा मंत्रांत सामान्यतः सकाम असणारा जो कर्ममार्ग त्याचें विस्तारपूर्वक वर्णन झालें. या मार्गांत ब्रह्मज्ञानाचा किंवा ब्रह्मात्मैकत्वज्ञानाचा मुळींच संबंध असत नाहीं, हें लक्षांत ठेवावयाचें आहे. ॥ ६ ॥

---

## मंत्र सातवा.

**प्लवा ह्येते अदृढा यज्ञरूपा अष्टादशोक्तमवरं येषु कर्म । एतच्छ्रेयो येऽभिनन्दन्ति मूढा जरामृत्युं ते पुनरेवापि यन्ति ॥ ७ ॥**

**अन्वय व अर्थ—येषु अष्टादशोक्तं अवरं कर्म, एते यज्ञरूपाः हि अदृढाः प्लवाः** ( ज्यांमध्यें अष्टादशांनीं उक्त केलेलें व अवर म्हणजे कमी योग्यतेचें कर्म आहे तें म्हणजे खरोखर अदृढ असणाऱ्या नावा-फळ्याचे ताफे-होत. ) **एतत् श्रेयः ये मूढाः अभिनन्दन्ति ते पुनः एव जरा-**

**मृत्युं अपि यन्ति** ( कर्म हेंच श्रेयस्कर आहे असें म्हणून जे मूर्ख लोक समाधान मानून घेतात व आपल्यास धन्य समजतात ते लोक पुनः पुनः जन्ममृत्यूच्या लोकांत–स्वर्गांत जाऊनही पुनः जन्ममृत्यूच्या लोकांत–परत येतात ). ॥ ७ ॥

येथें अज्ञानानें पूर्ण भरलेल्या कर्माची निंदा केली आहे. सकाम यज्ञादि कर्मसुद्धां वस्तुतः दुःखमूलक असतें. अविवेकाच्या साहाय्यानें वेदविहित कर्म केलें, तरी नित्य सुखाची प्राप्ति होत नाहीं, इतकेंच नव्हे, तर जन्म–मरणादि दुःखांची प्राप्ति होते, असें येथें सांगावयाचें आहे. भवसागर किंवा संसारसागर हा दुःखमूलक आहे आणि अज्ञानी स्थितींत असतां तो सुखरूप तरून जाणें केवळ अशक्य आहे. श्रुतीनें सांगितलेल्या यज्ञरूपी नौकांचा आश्रय केला तरी नित्य सुखाची प्राप्ति होत नाहीं. कारण या नौका किंवा फळ्याचे जोडून केलेले ताफे दृढ नसतात. हे ताफे केव्हां विस्कलित होतील, हें सांगतां येत नाहीं. उघडच आहे. सोळा ऋत्विज्, यजमान आणि यजमान-पत्नी यांच्याकडून झालेलें कर्म किंवा यांनीं म्हटलेलें मंत्र एकरूपाचें असणें केव्हांही शक्य नाहीं. ' यथासांग तें कर्म कांहीं घडेना ' अशा अर्थाची समर्थाची उक्ति आहे, ती सर्वथैव खरी आहे. यज्ञासारखे अनेकलोकांनीं अनेकवेळीं अनेक मनःसंस्कारांनीं घडवून आणलेलें कर्म अव्यंग होणें ( बिनचूक होणें ) सहसा शक्य नाहीं. शिवाय कर्मानें उत्पन्न केलेलें फल नियतकालपर्यंतच टिकावयाचें. कर्म सामान्यतः सुव्यवस्थितरीतीनें होत नाहीं आणि यथाकथंचित सुव्यवस्थित झालेंच तर त्याचें फल चिरकाल टिकत नाहीं. हें श्रुतीस मुख्यतः सांगावयाचें आहे. हें सांगणें युक्तीला व अनुभवाला पटण्या-सारखें आहे, हेंही कोणास नाकबूल करतां यावयाचें नाहीं. तात्पर्य सांगकर्म होणें अत्यंत दुर्घट म्हणून कर्माचें फल मिळणें शक्य नाहीं आणि मिळालें तरी तें फल कालभंगुर असावयाचें, हें स्पष्ट आहे. तेव्हां ओघानें असें म्हणणें प्राप्त होतें कीं, आत्मज्ञानाव्यतिरिक्त जें जें आपण कांहीं करितों तें अत्यंत निकृष्टप्रतीचें कर्म होतें. ही असली कर्माची गति ( मीमांसा ) असतांही ज्या अविवेकी लोकांस कर्म हेंच अत्यंत श्रेष्ठ आहे असें वाटतें, कर्मानें मात्र आपलें आत्यंतिक कल्याण होईलसें वाटतें, जे लोक कधींही आत्मज्ञानाचा विचार करीत नाहींत त्यांना यद्यपि कर्माचें फल जो स्वर्ग तो मिळाला, तरी कर्मफलाचा पुण्यकाल संपल्याबरोबर ह्या लोकांस जन्ममृत्यूच्या फेऱ्यांत पडावें लागतें. तात्पर्य दुःखाची स्थिति प्राप्त होते. हें कसें, तें पुढील दोन तीन मंत्रांत स्पष्ट करून सांगितलें आहे. ॥ ७ ॥

## मंत्र आठवा.

**अविद्यायामन्तरे वर्तमानाः स्वयं धीराः पण्डितं मन्यमानाः । जङ्घन्यमाना परियन्ति मूढा अन्धेनैव नीयमाना यथाऽन्धाः ॥ ८ ॥**

**अन्वय व अर्थ**—**अविद्यायां अंतरे वर्तमानाः, स्वयं धीराः, पंडितं मन्यमानाः, जङ्घन्यमानाः मुढाः परियन्ति; अन्धेन एव नीयमानाः अंधाः यथा** ( अविद्येमध्यें असणारे व कर्म करणारे, आपल्या स्वतांला आपण मोठे बुद्धिवान् आहों, असें समजणारे आणि आपल्यास जें विदित व्हावयास पाहिजे तें विदित आहे, असें मानून घेणारे स्वविघातकी मूर्ख लोक जन्ममरणामध्यें चक्राकार फिरत असतात. अंधळ्यानें अंधळ्यास न्यावें, याप्रमाणें अविद्या यांस फिरवित फिरवित जन्ममरणाच्या गर्तेमध्यें लोटून देत असते. ) ॥ ८ ॥

विवेकशून्य जी अविद्या तिच्यामध्यें राहून कर्मामध्यें गुरफटलेले विवेकशून्य लोक स्वतः आपल्यास आपण मोठे बुद्धिवान् आणि पंडित असें समजून घेत असतात. स्वतः बुद्धि नसूनही व कांहीं वाचलेलें किंवा ऐकलेलें नसूनही या लोकांस मोठा पण वृथा अभिमान असतो कीं आपली विवेकबुद्धि अत्यंत तीव्र आहे आणि आपल्यासारखी विद्वत्ता दुसऱ्या कोणासही नाहीं. स्वतः कांहीं समजत नाहीं. आणि दुसऱ्यानें कांहीं चार उपदेशाच्या गोष्टी सांगितल्या तरी हे ऐकून घ्यावयाचे नाहींत. विषयाच्या इच्छेनें कर्म करून तें पार पडलें असतां आपण मोठे सुखी होऊं, धन्य असूं आणि परमश्रेष्ठप्रतींचें भाग्य आपल्या चरणापाशीं येऊन आपली सेवा अखंड करीत राहील, अशा प्रकारचा लोभ यांस सुटलेला असतो. कर्मांचें फल नित्य सुख–दुःखात्मक असतें. विषयप्राप्ति झाल्यावर कांहीं वेळ सुख होतें हें ठीक. पण विषय प्राप्त होऊन तो नाहींसा झाला म्हणजे दुःखपूर्ण शोक आणि अप्राप्त विषय प्राप्त झाला नाहींतर तत्संबंधी चिंतापूर्ण निराशा उत्पन्न करणें हा प्रत्येक कर्मविपाकाचा इतिहास आहे. कर्मानें संपत्ति वाढेल व ऐश्वर्य येईल कदाचित्; परंतु चित्ताला जी अखंड शान्ति हवी असते ती विषयजनक कर्मानें किंवा विषयजन्यसुखानें केव्हांही मिळावयाची नाहीं. अविवेकी कर्मांचा विपाक म्हणजे जन्म, जरा; दुःख, शोक, चिंता, यांची मालिका, दत्त म्हणून अविद्येमध्यें काम करणाऱ्या माणसाच्या पाठीमागें लागते. सारांश, हे लोक केवळ अविद्येचे गुलाम बनतात आणि ती जिकडे ओढीत

नेईल तिकडे यांस जावें लागतें. अविद्या, अनात्मसंबंधी विद्या, कर्म करून विषयाचा उपभोग घेण्याची प्रेरणा करणारी अविद्या, ही स्वतः ज्ञानशून्य म्हणजे अंधळी आहे. आणि हिच्या नादाला लागलेले संसारी लोकही अंधळे असतात. मग काय विचारावें ही अंधळी अविद्या या अंधळ्या ज्ञानशून्य लोकांस जन्ममरणमूलक गर्तेमध्यें नेऊन अंधेरामध्यें या लोकांस गरगर फिरवीत राहते. सदैव चकाकार भ्रमण करणाऱ्या शुक-नलिकायंत्रावर बसविलेला राघु आपण पडूं की काय या भीतीनें जसजसा त्या फिरणाऱ्या यंत्राचा आधार घेतो, तसतसें तें यंत्र जास्त जोरानें फिरूं लागून त्या राघूची स्थिती दीनवाणी करित असतें, हें सर्वांस अनुभवानेंही ठाऊक आहे. असाच प्रकार संसारी पुरुषाचा आहे. अविवेकी संसार हें दुःखाचें आगर होय. यांत उत्पन्न होणाऱ्या दुःखांचें उपशमन करण्यासाठीं जों जों संसारी उपाय जीव करितो, तों तों या दुःखमूलक संसारांत जास्तच खोल पाय जाऊन जीव कायमचे संकटांत पडतात. हें चिखलांत पडलेल्या आणि त्यांतून निघण्याचा प्रयत्न करण्यासाठीं जास्त जोरानें पाय खालीं दडपणाऱ्या गाईला जसें जास्त खोलांत जाऊन पडावें लागतें, त्याचेंच हें प्रत्यंतर होय. असो; या विषयाविषाविषयीं जितकें लिहावें किंवा जितकें बोलावें तितकें थोडेंच आहे. ॥ ८ ॥

---

## मंत्र नववा.

**अविद्यायां बहुधा वर्तमाना वयं कृतार्था इत्य-भिमन्यन्ति बालाः । यत्कर्मिणो न प्रवेदयन्ति रागात्तेनाऽऽतुराः क्षीणलोकाश्च्यवन्ते ॥ ९ ॥**

**अन्वय व अर्थ—अविद्यायां बहुधा वर्तमानाः, वयं कृतार्थाः इति बालाः अभिमन्यन्ति** ( अविद्येमध्यें अनेक प्रकारचीं कर्मे करणारे व अनेक स्वरूपांनीं राहणारे बालिश लोक आपण धन्य आहों, असें समजतात, आणि त्यांतच अभिमान मानून घेत असतात. ) **यत् कर्मिणः रागात् न प्रवेदयन्ति, तेन आतुराः क्षीणलोकाः च्यवन्ते** ( कर्म मात्र करणाऱ्या लोकांस कामक्रोधादिकांमुळें आपल्या स्वतःचें कल्याण अकल्याण कळत नाहीं. म्हणून ते लोक लौकरच आपल्या स्थानापासून भ्रष्ट होऊन खालीं खालीं घसरत जातात. ) ॥ ९ ॥

ह्या मंत्र वरील मंत्राचा अनुवाद करित आहे. येथें केवळ कर्मठ लोकांस 'आपण धन्य आहों' असा अभिमान वाटतो हें जास्त सांगितलें आहे आणि कामक्रोधादि

विकारांमुळें त्यास आपलें कल्याण अकल्याण कळत नाहीं, ही एक गोष्ट जास्त सांगितली आहे. दोन्ही ही मंत्र केवळ संसारी पुरुषांचें चित्र स्पष्ट रेखाटणारे आहेत. येथें आत्मज्ञान नसतें, इतकेंच नव्हे तर वेदानें स्वर्गलोक मिळून देणारीं जीं कांहीं कर्में विहित केलीं आहेत, त्यांचेंही आचरण करण्याचें ज्ञान किंवा मनःसामर्थ्य या पुरुषांस नसत. स्वार्थी कर्म करावें, त्या पासून उत्पन्न होणाऱ्या फलांचा उपभोग घ्यावा आणि पूर्वसंचितानें जें काय सुख प्राप्त झालें असेल किंवा जी कोणती स्थिति प्राप्त झाली असेल त्यापासून भ्रष्ट व्हावें, हा त्यांचा नित्याचा रोजगार आहे. असो ॥९॥

## मंत्र दहावा.

**इष्टापूर्तं मन्यमाना वरिष्ठं नान्यच्छ्रेयो वेदयन्ते प्रमूढाः । नाकस्य पृष्ठे ते सुकृतेऽनुभूत्वेमं लोकं हीनतरं वा विशन्ति ॥ १० ॥**

**अन्वय व अर्थ—इष्टापूर्तं वरिष्ठं मन्यमानाः प्रमूढाः अन्यत् श्रेयः न वेदयन्ते** ( यज्ञयाग आणि वापीकूपादि सिद्ध करणें हेंच अत्यंत श्रेष्ठ कर्म आहे, असें मानणाऱ्या वेदमार्गी कर्मठांस अविवेकामुळें दुसरा जो कल्याणकर मार्ग आहे, तो कळत नाहीं.) **नाकस्य पृष्ठे सुकृते अनुभूत्वा ते इमं लोकं हीनतरं वा विशन्ति** ( पुण्यांशानें उत्पन्न होणारे कर्मफलाचा अनुभव स्वर्गपृष्ठावर कांहीं वेळ घेऊन हे वैदिक कर्मठ लोक पुनः मृत्युलोकीं जन्म घेण्यासाठीं येतात. किंवा भूलोकापेक्षांही जास्त कमी योग्यतेच्या लोकीं स्वकर्मानुसार या लोकांस जन्म घ्यावा लागतो. ) ॥ १० ॥

येथें वेदानें जें कर्म स्वर्ग मिळवून देणारें आहे म्हणून सांगितलें आहे, तें कर्म करणाऱ्या लोकांचा वृत्तांत सांगितला आहे. जन्माला येऊन इंद्रचन्द्रादि देवतांस प्रसन्न करणारे यज्ञयाग करावे किंवा येथेंच विहिरी, तळीं, घाट, इत्यादि बांधून लोकांकडून शाबासकी मिळवून घ्यावी, हें या कर्मठांस श्रेष्ठ प्रकारचें कर्म आहे, असें वाटतें. आत्मा म्हणून कांहीं एक पदार्थ आहे आणि त्याचें ज्ञान करून घेऊन जीवाचें कल्याण करणें हें आपलें कर्तव्य आहे, या ज्ञानाची या कर्मठ लोकांना ओळख किंवा खबरही नसते. वेदानें सांगितलेलीं कर्में केलीं म्हणजे आपण कृतार्थ झालों, या परतें आपल्यास कांहीं एक करावयाचें राहिलें नाहीं, असें या स्ववंचकांस वाटत असतें. यांच्या वेदविहित स्वार्थी कर्मामुळें कांहींकालपर्यंत या लोकांना स्वर्गसुखाचा आस्वाद मिळतो.

तथापि सत्कर्मानें उत्पन्न झालेल्या पुण्याचा क्षय झाल्याबरोबर मृत्युलोकांमध्यें किंवा त्याच्यापेक्षांही हीनतर लोकांमध्यें यांस जन्म घ्यावा लागतो. तात्पर्य हें आहे कीं, जावत्कालपर्यंत आत्मप्रकाशाचा किरण अंतःकरणामध्यें प्रविष्ट झाला नाहीं, तोंपर्यंत शरीरपुष्टि करणारें, ऐश्वर्य देणारें, कीर्ति पसरविणारें कर्म आपल्या हातून झालें, तरी जीवाला अखंड शान्तीचें सुखधाम प्राप्त व्हावयाचें नाहीं. तुम्ही संसारांत असा, नीतीनें वागा, समाजाचें कल्याण करा, राजनिष्ठ असा, धर्मानें वागून इंद्रादिदेवतांस प्रसन्न करा, कमी अधिक प्रमाणानें तुम्हांस सुखाचा वांटा मिळेल, हें खरें. पण आपण स्वरूपतः अमर आहों, सुखाचें आगर आहों, असें ज्ञान करून देऊन स्वरूपाचें आविष्करण करणारी ब्रह्मविद्या जोंपर्यंत तुम्हांस प्राप्त झाली नाहीं, तोंपर्यंत जन्ममरणाची भीति कायम राहणार, अज्ञानाचा सागर जास्त खोलावत जाणार आणि दुःखाचे पर्वत अधिक अधिक उंच होत जाणार, यांत शंका नाहीं. चक्रव्यूहांत सांपडलेला अभिमन्यु स्वस्थानीं परत येण्याचा मार्ग माहीत नसल्यामुळें जसा त्या द्रोणनिर्मित चक्रामध्यें गरगर फिरत राहिला आणि शेवटीं प्राणास मुकला, त्याप्रमाणें अज्ञानाच्या किंवा अनात्मज्ञानाच्या अंधमय प्रदेशांत जोंपर्यंत आपण वावरत आहों, तोपर्यंत आपण निराबाध शान्तीची अपेक्षा करणें हें मुंगीनें हत्ती गिळण्याची अपेक्षा करण्यासारखें व्यर्थ आहे. असो ॥ १० ॥

---

## मंत्र अकरावा.

**तपःश्रद्धे ये ह्युपवसन्त्यरण्ये शान्ता विद्वांसो भैक्ष्यचर्यां चरन्तः । सूर्यद्वारेण ते विरजाः प्रयान्ति यत्रामृतः स पुरुषो ह्यव्ययात्मा ॥ ११ ॥**

**अन्वय व अर्थ**—हि ये शान्ताः विद्वांसः भैक्ष्यचर्यां चरन्तः, अरण्ये तपःश्रद्धे उपवसन्ति ( इंद्रियदमन केलेले जे विद्वान् लोक भिक्षावृत्तीनें राहून अरण्यामध्यें तपश्चर्या करितात आणि आस्तिकवृत्तीनें राहतात ) यत्र सः अमृतः अव्ययात्मा हि पुरुषः, सूर्यद्वारेण ते विरजाः प्रयान्ति ( जेथें जन्ममरणशून्य असणारा अक्षयात्मा पुरुष राहतो तेथें देवयानमार्गानें ते पापपुण्यशून्य झालेले वानप्रस्थ अथवा तपस्वी लोक जातात )॥ ११॥

येथें वानप्रस्थ आणि संन्याशी लोकांचीं लक्षणें आणि या लोकांस तपश्चर्येनें आणि आस्तिकबुद्धीनें प्राप्त होणारें फल, यांचे निदर्शन केलें आहे. तथापि या वानप्रस्थांस

अथवा यतींस आत्मस्वरूपाची ओळख झालेली नसतें. हें 'आत्मज्ञान' या स्पष्ट शब्दाच्या अभावानें स्पष्ट होत आहे. संसारांतील सुखदुःखाचा कंटाळा आल्यामुळें किंवा संसारांत राहिलें असतां सांसारिक दुःखें अपरिहार्य स्वरूपाचीं आहेत, असें कळल्यामुळें हें लोक संसाराचे सर्व पाशबंध तोडून देऊन अरण्यामध्यें राहतात आणि तेथें भिक्षावृत्तीनें उदरंभरण करून आस्तिकबुद्धीनें तपश्चर्या करितात. संसाराच्या अथवा संसार उत्पन्न करणाऱ्या प्रमेयांच्या मूळाशीं कांहीं नित्य तत्त्वें आहेत, तीं शोधून काढणाच्या प्रयत्नांमध्यें यांच्या मनोबुद्धि गुंतून गेलेल्या असतात. माझ्या-समजुतीनें हे लोक कापिलसांख्यांतील विशिष्ट मताचे असावे. श्रुतींचा उदय झाल्यानंतर अनेक शतकांनीं सांख्यमतप्रवर्तक कपिलमहामुनींचा अवतार झाला, हें खरें; या महामुनींनीं वेदसंहितेंत ब्राह्मणांत व उपनिषदांत आढळणारीं विशकालित मतें एकत्र करून त्यांस सूत्रबद्ध केलें आणि आपल्या बुद्धीच्या जोरावर एक महाशास्त्र निर्माण करून सर्व जगास चकित केलें, हें ही खरें. पण तीं सूत्रें आणि तें शास्त्र ह्या उभयतांचा पाया या दृश्य जगतावर आणि जगतांत असणाऱ्या परंतु इंद्रियांत न दिसणाऱ्या अनेक सामर्थ्यांवर रचिलेला होता. या मतांत जीवस्वरू-पाची ओळख यांस झालेली दिसते; पण जीव हा स्वरूपतः आत्मा आहे, परमात्मा आहे, असें यांस ठाऊक तरी नव्हतें किंवा ठाऊक असून ब्रह्मसिद्धांतावर यांची श्रद्धा तरी बसलेली नव्हती, असें वाटतें. या दृश्यजगताचा छडा लावण्याचा प्रयत्न करून यांनीं परिणामवादाचा उद्घोष केला; असो; पण कापिलसांख्यांस मूळभूत असणारीं तत्त्वें वेदकालीं प्रचलित होतीं, हें विसरतां नये. सारांश, सापेक्ष तत्त्वज्ञानाचें हें सर्वमहत्कार्य या लोकांनीं व यांच्या आचार्यांनीं स्वबुद्धीच्या जोरावर केलें म्हणून असल्या जाड्या तपस्व्यांस व तीव्र आस्तिक्यबुद्धीच्या लोकांस जें कल्याणकारक यश प्राप्त व्हावयास पाहिजे होतें, तें मिळालें नाहीं म्हणजे यांस आत्मस्वरूपाची ओळख झाली नाहीं. असो, श्रुति म्हणते कीं, अशल्या शुद्ध आचरणाच्या आणि शुद्ध ज्ञानी लोकांच्या तपश्चर्येमुळें या लोकांस अमृत, अव्यय आणि सर्व जगांस पूर्णत्व देणारा जो हिरण्यगर्भ त्याच्या लोकीं वास्तव्य करावयास सांपडून एक कल्पपर्यंत मात्र यांस अमरत्व भोगावयास सांपडतें. येथें 'अमृत', 'अव्ययात्मा,' 'पुरुष,' अशीं पदें आहेत, या वरून कित्येक पंडितांस म्हणतां येईल कीं, या मंत्रांतील यतींस व वानप्रस्थांस श्रुतिमान्य असणारी मुक्ति मिळाली पाहिजे. परंतु हें म्हणणें श्रुतिसंमत होणार नाहीं. कारण पहिल्या मंत्रापासून तो ह्या मंत्रापर्यंत कर्मांचें प्रकरण चाललेलें आहे. बाराव्या मंत्रांत 'परीक्ष्य लोकान् कर्मचितान्' इत्यादि पदें स्पष्ट सूचविणार आहेत कीं मागील अकरा मंत्रांत सांगितलेलीं सर्व फलें कर्मांनें उत्पन्न झालेलीं आहेत, तीं नश्वर आहेत; आणि अभंग शान्ति देणारें व ज्ञानरूप करणारें नित्यसिद्ध जें आत्मस्वरूप तें अनित्य-कर्मांनें किंवा कर्मफलांनें किंवा अनित्यतपःश्रद्धेनें केव्हांही सिद्ध व्हावयाचें

नाहीं. ( २ ) तपःश्रद्धा आहे परंतु ज्ञान नाहीं, विशेषतः आत्मज्ञान नाहीं, अशी स्थिति असेल तोंपर्यंत कैवल्यसुखाची प्राप्ति होणें अशक्य आहे. ' ज्ञानेनैव तु कैवल्यं ' असें श्रुति म्हणते ' सर्व कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ' असें स्मृति ही म्हणते. अनुभवही असाच आहे. आत्मज्ञान झाल्याशिवाय चौकस जीवाला शान्ति मिळत नाहीं, असें कित्येक उदाहरणांनीं सिद्ध करून देतां येईल. म्हणून वरील शंका बरोबर नाहीं. ती बरोबर आहे असें म्हटलें तर प्रकरणविरोध, उपक्रमोपसंहारविरोध, श्रुतिस्मृतिविरोध आणि अनुभवविरोध येऊन पडतात. असा विरोध उत्पन्न करणारा उपदेश सर्व जीवांचें कल्याण करण्यासाठीं अवतीर्ण झालेली श्रुतिमाता केव्हांही करणार नाहीं.

याप्रमाणें येथपर्यंत श्रुतिविहित कर्म करणारे, शुद्ध सांसारिक पद्धतीनें वागणारे, इष्टापूर्तादिकर्में करणारे आणि विश्वज्ञानाचा शोध लावण्याचा प्रयत्न करणारे सर्व लोक आत्मज्ञानशून्य असल्यामुळें कोणी येथें, कोणी स्वर्गलोकीं, कोणी हिरण्यगर्भाच्या लोकीं विषयसुखें किंवा मानसिकसुखें भोगण्याचे अधिकारी होतात. पण हीं सुखें कालभंगुर आहेत, हीं सुखें जन्ममरण चुकवीत नाहींत, हीं सुखें जीवाला ज्ञानरूप करीत नाहींत, उपाधींपासून सोडवीत नाहींत, असें स्वानुभवावरून प्रत्येकास कळून चुकण्यासारखें आहे, आणि जीवास हें कळावें एतदर्थच श्रुतीनें या प्रकरणांत कर्माचें दुःसाध्यत्व, कर्मसुखाचें क्षणभंगुरत्व इत्यादिकांचें वर्णन केलें आहे. या प्रकारचा हा संसार आहे, असें प्रत्येक जीवास कळावें हें श्रुतीचें मनोगत आहे. असो. ॥ ११ ॥

---

## मंत्र बारावा.

**परीक्ष्य लोकान्कर्मचितान्ब्राह्मणो निर्वेदमायान्नास्त्यकृतः कृतेन । तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत्समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् ॥ १२ ॥**

**अन्वय व अर्थ—कर्मचितान् लोकान् परीक्ष्य ब्राह्मणः निर्वेदं आयात्** ( याप्रमाणें येथील सर्व दृश्यवस्तु आणि त्यापासून उत्पन्न होणारीं सुखें कर्मजन्य आणि क्षणभंगुर आहेत, असें विवेकानें समजून घेऊन ब्राह्मण म्हणजे नित्यानित्यविवेक करणारा पुरुष वैराग्यशील होतो ) **अकृतः कृतेन न अस्ति** ( अकृत म्हणजे नित्यसिद्ध आत्मस्वरूप कर्मानें केव्हांही प्राप्त व्हावयाचें नाहीं असा विवेक, विचारी पुरुषाला उत्पन्न होतो. ) **तद्विज्ञानार्थं समित्पाणिः स श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठं**

**गुरुं एव अभिगच्छेत्** ( त्या अकृत अथवा नित्यसिद्ध वस्तूच्या ज्ञान-विज्ञानासाठीं श्रुतिसंपन्न आणि अनुभवसाक्षात्कारी गुरुला मात्र या विवेकीपुरुषानें शरण जावें ). ॥ १२ ॥

मागील मंत्राच्या विवरणांत सांगितल्याप्रमाणें जो विवेकी पुरुष आहे, ज्याला अनुभवानें शहाणपण मिळविण्याचें सामर्थ्य आहे, तो येथें व अन्यत्र दिसणारें सर्व विश्व आणि त्यांतील सुखें आत्मबाह्य असून कर्मानें उत्पन्न केलेलीं आहेत, नित्य सिद्ध नाहींत, असें कळून घेतो. हें त्याचें कळणें निश्चयरूपाचें झालें म्हणजे त्याला या क्षणभंगुर बाह्यसुखांचा व शान्ति उत्पन्न न करणाऱ्या अज्ञानाचा वीट येतो व तिरस्कार उत्पन्न होतो. त्याला वैराग्य प्राप्त होतें आणि त्याला असें कळून चुकतें कीं, आपल्याला जी नित्य वस्तु हवी आहे तिचें स्वरूप अनित्यकर्मानें केव्हांही सिद्ध व्हावयाचें नाहीं. तात्पर्य त्याला नित्यानित्य विवेक यथार्थरीतीनें करितां येऊं लागतो. नित्याचें ग्रहण करावें अनित्याचा त्याग करावा, असेंही त्याला समजूं लागतें. हें समजल्यानंतर नित्य वस्तूचा अधिगम होण्यासाठीं तो वेदसंपन्न आणि साक्षात्कारी श्रीगुरूला नम्रपणानें शरण जातो.

प्रत्येक जीवाला नित्य वस्तु हवी असते आणि तिच्या प्राप्तीसाठीं अथवा ती मिळेल अशा आशेनें सर्व ज्ञानी व अज्ञानी पुरुषांची धडपड सारखी सुरू असते. अमुक मिळालें तर सुख मिळेल, तमुक केलें असतां माझें ऐश्वर्य वाढेल, ही गोष्ट केली असतां माझी कीर्ति अजरामर होईल, ती गोष्ट केली असतां माझे पुत्र, पौत्र, प्रपौत्र मला तर्पणोदक देतील, असें केलें असतां मला स्वर्ग मिळेल, तसें केलें असतां सर्व विश्वाचा उलगडा मला करितां येईल आणि मला नित्य वस्तु सांपडेल, अशा भरी भरून प्रत्येक जीव कर्माच्या पाठीमागें लागला आहे. पण अनुभवप्रकार वेगळा असतो. नित्य वस्तु कर्म करून उत्पन्न होत नाहीं किंवा मिळत नाहीं हें तत्त्व ज्ञानी तपस्व्यास सुद्धां समजण्यास फार काळ लागत असतो, आणि फार काळ गेला तरी तें तत्त्व एखाद्यासच समजतें. ' यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ' असें भगवंतांनीं श्रीमद्भगवद्गीतेमध्यें सांगितलें आहे, तें सर्वथा यथार्थ आहे. आपल्या चित्ताला शांति हवी असेल तर शांतीचें माहेरघर जें आत्मस्वरूप तें आपण स्वतः होऊं, तेव्हांच आपल्याला शांति मिळेल, इतकेंच नव्हे तर आपण शांतिस्वरूप होऊं. कर्मानें शांति मिळते; पण ती एक क्षण-मात्र जिवंत असते. हें तत्त्व कळत नाहीं म्हणून आम्ही जीव संसारामध्यें राहातों आणि सांसारिक सुखाच्या आशेनें कर्म करीत असतों. हा शुद्ध भ्रम आहे, पण हा भ्रम आहे ही गोष्ट सुद्धां आम्हांस समजत नाहीं. विवेकी पुरुषांस मात्र हें तत्त्व समजतें. आणि हें समजल्यानंतर त्या पुरुषाला सांसारिक सुखाचा आणि संसाराचा तिरस्कार उत्पन्न होतो. श्रुतीचा असा उपदेश आहे कीं, अशा विवेकी पुरुषानें योग्य अधिकारी पुरु-षाला शरण जावें आणि अध्ययन करण्याच्या बुद्धीनें आत्मस्वरूपाविषयीं प्रश्न करून आपली यथार्थ समजूत करून घ्यावी. ॥ १२ ॥

## मंत्र तेरावा.

**तस्मै स विद्वानुपसन्नाय सम्यक्प्रशान्तचित्ताय शमान्विताय । येनाक्षरं पुरुषं वेद सत्यं प्रोवाच तां तत्त्वतो ब्रह्मविद्याम् ॥ १३ ॥**

**अन्वय व अर्थ—तस्मै सम्यक्प्रशान्तचित्ताय शमान्विताय सः विद्वान् येन अक्षरं पुरुषं वेद सत्यं तां ब्रह्मविद्यां प्रोवाच** ( अशा प्रकारें, शास्त्रशुद्धरीतीनें रागद्वेषादिशून्य झालेला, इंद्रियनिग्रह केलेला, वैराग्यशील पुरुष शरण आला असतां आणि त्यानें ज्ञानभिक्षा मागितली तर त्याला ब्रह्मविद्येचा यथार्थ उपदेश करावा; तो असा कीं, ज्याच्या योगानें त्या वैराग्यशील शिष्याला अक्षर असें जें विश्वाचें अधिष्ठान असणारें आत्मस्वरूप तें समजून ' मी ही आत्मस्वरूपच आहें ' असा त्याचा निश्चय होईल. ) ॥ १३ ॥

मागील मंत्रांत गुरु वेदशास्त्रसंपन्न आणि आत्मसाक्षात्कारी असावा अशी जी लक्षणें सांगितली, त्यालाच आणखी एक विशेषण जोडून तो दयाशील आणि शिष्यकल्याणकर्ता असावा असें या मंत्रांत सुचविलें आहे. तसेंच मागील मंत्रांत नित्यानित्य विवेक संपन्न आणि विषयवैराग्यशील असा पुरुष मात्र ब्रह्मज्ञानाला अधिकारी होतो, असें सांगितलें, त्यांतच भर टाकून तो शमदमादिगुणांनीं युक्त असावा आणि मुक्त होण्याची तीव्र इच्छा त्यास असावी, असें येथें स्पष्ट सांगितलें आहे. ब्रह्मविद्येचें लक्षण ही थोडक्यांत दिलें आहे. तें असें कीं, ब्रह्मवस्तु अक्षर म्हणजे अविनाशी असून ती जशी आहे तशीच अनुभवाला येते. विश्वाप्रमाणें तिचा प्रकार नाहीं. विश्व दिसतें तसें असत नाहीं. आणि असतें तसें दिसत नाहीं. म्हणून तें परमार्थतः सत्य नव्हें. या साठीं सत्य या विशेषणाचा उच्चार श्रुतीनें येथें स्पष्ट केला आहे. 'तत्त्वतः' हें पदही ध्यानांत ठेवण्यासारखें आहे ' तत्त्वं असि ' ( तें तूं आहेस ) असा सर्व वेदांतशास्त्रांचा स्पष्ट उपदेश आहे. म्हणून आचार्यांनीं शिष्याचा असा निश्चय करून दिला पाहिजे कीं तोही स्वरूपतः ब्रह्मरूप आहे. सारांश ब्रह्म ही एकच अविनाशी सत्य वस्तु आहे आणि ती आपण आहों, असा उपदेश साक्षात्कारी गुरूनें अधिकारी मुमुक्षु शिष्यांस करावा, हें बाराव्या आणि तेराव्या मंत्रांचें तात्पर्य आहे. ॥ १३ ॥

**प्रथममुण्डक द्वितीयखण्ड समाप्त.**

प्रथम मुण्डक समाप्त.

# द्वितीय—मुण्डक.

## प्रथम—खण्ड.

### मंत्र पहिला.

**तदेतत्सत्यं यथा सुदीप्तात्पावकाद्विस्फुलिङ्गाः सहस्रशः प्रभवन्ते सरूपाः । तथाऽक्षराद्विविधाः सोम्य भावाः प्रजायन्ते तत्र चैवापि यन्ति ॥ १ ॥**

अन्वय व अर्थ—तत् एतत् सत्यं ( तें हेंही सत्य आहे. )

ज्याअर्थी ब्रह्म ही सत्यवस्तु आहे, त्याअर्थी त्याअधिष्ठानावर आश्रय घेऊन प्रकट झालेलें जीवस्वरूपही स्वभावतः सत्यच आहे. प्रकट होणें म्हणजे व्यवहारकक्षेंत येणें. हा व्यवहार होय. म्हणून व्यवहारांतील जीवही व्यवहारांत सत्य आहे. याच न्यायानें जड ही व्यवहारांत सत्य आहे. असोः—

**सोम्य, यथा सुदीप्तात् पावकात् सहस्रशः विस्फुलिङ्गाः प्रभवन्ते** ( हे सोम्य ! ज्याप्रमाणें उत्तमरीतीनें प्रदीप्त झालेल्या अग्नीपासून एकाच स्वरूपाच्या हजारों ठिणग्या उत्पन्न होतात. ) **तथा अक्षरात् विविधाः भावाः प्रजायन्ते** ( त्याप्रमाणें अक्षरापासून अनेक प्रकारचे भाव म्हणजे जीव उत्पन्न होतात. ) **तत्र च एव अपि यन्ति** ( आणि तेथें मात्र जाऊन ते लीन होतात. ॥ १ ॥

पहिल्या मंत्रांतील दृष्टांत अत्यंत समर्पक असून त्याचें तात्पर्यही उघड आहे. झगझगीत पेटलेला अग्नि हजारों ठिणग्या बाहेर टाकतो व त्या कमीजास्त लहानमोठ्या असतात, हें प्रत्येकानें पाहिलें आहे. तसेंच त्या ठिणग्या कांहींवेळ राहून पुनः आपल्या मूलकारणाकडे, अग्निस्वरूपाकडे, तेजाकडे जाऊन लीन होतात हेंही कित्येकांनीं निरीक्षित केलें असेल. हा दृष्टांत देऊन श्रुतीनें आणखी एक गोष्ट साधण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. तो हा कीं, या हजारों ठिणग्या बाहेर पडत असल्या तरी जेथून त्यांचा उद्भव झाला तेथील स्वरूपांत मुळींच फरक होत नाहीं. यांच रीतीनें अक्षर म्हणजे आत्मस्वरूपापासून विविध म्हणजे नानाप्रकारच्या उपाधी घेऊन अनंत जीव जन्मास येतात आणि पुनः देहांच्या आयुष्यांची स्वकर्मानुसार मर्यादा संपली म्हणजे ब्रह्मामध्यें जाऊन

लीन होतात, हें खरें; पण जीव सगुणब्रह्मापासून निर्माण झाले म्हणून ब्रह्माचें स्वरूप कांहीं कमी होते किंवा ते जीव तेथें जाऊन मिसळले म्हणून ब्रह्माचें स्वरूप मोठें होतें, अशांतला प्रकार नाहीं. दृष्टांतामध्यें दार्ष्टांतांतील सर्व प्रकार दिसत नाहींत म्हणून ब्रह्माला अग्नीची उपमा तंतोतंत लागत नाहीं. तथापि उत्पत्तीचा आणि लयाचा भाग दाखविण्याला वर सांगितल्याप्रमाणें ती उपमा अतिशय समर्पक आहे, हें मात्र प्रत्ययास येतें. ॥१॥

---

## मंत्र दुसरा.

**दिव्यो ह्यमूर्तः पुरुष सबाह्याभ्यन्तरो ह्यजः।**
**अप्राणो ह्यमनाः शुभ्रो ह्यक्षरात्परतः परः॥ २॥**

**अन्वय व अर्थः—हि पुरुषः दिव्यः अमूर्तः सबाह्याभ्यंतरः हि अजः, अप्राणः, हि अमनाः. शभ्रः, हि अक्षरात् परतः परः** ( परब्रह्म हें सर्व दृश्यादृश्य वस्तूंस पूर्णत्व देणारें आहे. कारण तें स्वयंप्रकाश व अमूर्त म्हणजे निराकार आहे. तें अंतर्बाह्यव्यापी आहे, तें अनादि आहे, तें प्राणशून्य, मनःशून्य, निर्मळ आणि सर्वव्यापी अव्यक्ताहून श्रेष्ठ असणाऱ्या सगुण ब्रह्माहून अत्यंत श्रेष्ठ आहे. ॥ २ ॥

येथें परब्रह्मस्वरूपाचें वर्णन आहे. ब्रह्माला पुरुष ही संज्ञा देण्याचें कारण हें आहे कीं तें यत्किंचित् वस्तूंना—भूत, भविष्य आणि वर्तमान दृष्टादृष्टपदार्थांना—अस्तित्व देणारें, ज्ञानस्वरूप देणारें आणि आनंदस्वरूप करणारें आहे. थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे तें सच्चिदानंद स्वरूप आहे. हें स्वरूपतः अस्तिरूप म्हणजे ज्ञानरूप म्हणजे आनंदरूप आहे. सर्वांस अस्तित्व प्राप्त होतें, कांहीं कालपर्यंत तरी 'पदार्थ आहे' असें आपल्यांस म्हणतां येतें; याचें कारण हें पदार्थांचें अस्तित्व तेथें ब्रह्म आहे म्हणून त्यांस प्राप्त होतें. कांहीं पदार्थ ज्ञेय स्वरूपाचे आणि कांहीं ज्ञातृस्वरूपाचे असतात. कांहीं पदार्थ आनंद देणारे आणि कांहीं आनंद घेणारे पदार्थ असतात. याचें कारण प्रत्येक पदार्थांत वियमान असणारें ब्रह्म ज्ञानरूप अथवा आनंदरूप आहे हें होय. हें कशावरून ? असें कोणी विचारील तर त्याच्या समाधानासाठीं श्रुति म्हणते कीं परब्रह्म हें स्वयंप्रकाश असून सर्वांस प्रकाशित करणारें; अंतर्बाह्य व्यापणारें असून सर्वांस बाह्य आणि आन्तरें ( आंतील भाग आणि बाहेरील भाग ) अशा स्वरूपाचे करणारें, स्वतः जन्मादि उपाधींनीं अव्याप्त असून तें प्राणशून्य व मनःशून्य; निर्मळ आहे म्हणून चराचर वस्तूंस जन्ममरणादि अवस्था ( जीवांत प्राण, मन, इत्यादि उपाधी आणि चराचरांत सत्यादि गुणत्रयांचे मल ) उत्पन्न होतात. परब्रह्म हें सर्वांहून विलक्षण,

सर्वांत राहून सर्वांच्या पलीकडे असणारें आहे म्हणून आब्रह्मस्तंबपर्यंतच्या सर्व पदार्थमात्रांना नामरूपादि उपाधी देणारें आहे. अर्थातच हें ब्रह्म स्वयंप्रकाश निराकार, अंतर्बाह्यव्यापी, अविकार्य, अविकारी, निरुपाधिक, निर्मळ आणि सर्व दृष्टादृष्ट वस्तूंहून विलक्षण या स्वरूपाचें आहे. तात्पर्य तें सर्वांस सत्ता देणारें, सर्वांस ज्ञानी किंवा ज्ञेय करणारें, सर्वांस–सर्व–परिच्छिन्न पदार्थांस–सोपाधिक करणारें, अशा स्वरूपाचें आहे. म्हणजे तें वस्तुतः सच्चिदानंदस्वरूप आहे. ॥ २ ॥

तिसऱ्या मंत्रापासून नवव्या मंत्रापर्यंतचे सर्व मंत्र सृष्टीच्या उत्पत्तीचा विचार करणारे आहेत.

---

## मंत्र तिसरा.

**एतस्माज्जायते प्राणो मनः सर्वेन्द्रियाणि च ।**
**खं वायुर्ज्योतिरापः पृथिवी विश्वस्य धारिणी ॥ ३ ॥**

**अन्वय व अर्थः—एतस्मात् प्राणः, मनः सर्वेन्द्रियाणि च, खं, वायुः, ज्योतिः, आपः, विश्वस्य धारिणी पृथिवी जायते** ( याच्यापासून प्राण, मनादि सर्वेंद्रियें, आकाश, वायु, तेज, जल आणि विश्वाचें धारण करणारी पृथ्वी हीं उत्पन्न होतात. ) ॥ ३ ॥

मागच्या मंत्रांत ज्या अक्षराचा उल्लेख आहे त्या ब्रह्मापासून प्राण मनादि अंतःसृष्टि आणि आकाश वायु आदि बाह्यसृष्टि उत्पन्न होतात. प्राण, मन, इत्यादि उत्पन्न होण्यापूर्वी ब्रह्माचें स्वरूप प्राणशून्य, मनःशून्य, असेंच असलें पाहिजे. परिच्छिन्नत्व, मर्यादित्व किंवा सगुणत्व प्राप्त झाल म्हणजे अद्वैतस्थिति जाऊन द्वैताची स्थिति प्राप्त होते; एकत्व जाऊन अनेकत्व येतें; यांचें कारण उपाधी होत. उपाधी असतात म्हणून सगुणत्व प्राप्त होते किंवा सगुणत्व असतें म्हणून उपाधी यतात, असा अन्योन्याश्रयाचा प्रकार येथें दिसतो. परंतु सगुणत्व म्हणजे उपाधि असा अर्थ केला म्हणजे हा दोष नाहींसा होतो. असो; ह्या सर्व सगुणत्व प्रकट करणाऱ्या उपाधी ब्रह्माच्या अधिष्ठानावर आविर्भूत होतात. यावरून ही एक वर नमूद केलेली गोष्ट सिद्ध होते कीं, ब्रह्मस्वरूपांत स्वरूपतः उपाधी नाहींत. तें निरुपाधिक म्हणून निर्गुण आहे.

आतां प्राण, मन, आदीकरून जी उत्पत्ति या मंत्रांत सांगितली आहे, ती हिरण्यगर्भस्वरूपाची आहे, असें मला वाटतें. हिरण्यगर्भांत प्रथमतः ज्ञानाचें स्फुरण होतांक्षणीं प्राण, मन इत्यादिकांचें आविर्भवन झालें. ही प्राणमनादि अव्यक्त सृष्टि होय. शुद्धज्ञानस्वरूपाला प्राणाच्या उपाधीची अपेक्षा नाहीं. पण विशेषज्ञानाला प्रथम प्राण, नंतर

मन, नंतर इंद्रियें आणि नतर पंचमहाभूतांच्या तन्मात्रा या क्रमानें हिरण्यगर्भाचें स्वरूप सिद्ध झालें. हें स्वरूप अथवा हा जगदात्मा किंवा सूत्रात्मा विराट्ब्रह्माच्या स्वरूपाचें मूल बीज होय. हिरण्यगर्भाच्या आविर्भवनाबरोबरच मूलप्रकृतीचें आविर्भवन होऊन विराट्स्वरूपाचें बीज तयार होतें व योग्य समयीं विराट्स्वरूप अथवा व्यक्तसृष्टीचें समष्टिस्वरूप प्रकट होतें. नंतर व्यक्तसृष्टीचें व्यष्टिरूप अथवा भिन्न चराचर सृष्टि परिणामरूपानें आविर्भूत होतें. हें वृत्त सांगण्याचा अभिप्राय श्रुतींतील मंत्रावरून सिद्ध होतोसें मला वाटतें. स्थूलापासून सूक्ष्म व्हावें, एकरसत्वापासून अनेकरसत्व उत्क्रांत व्हावें, निरिंद्रियापासून (अव्यक्तापासून) व्यक्त व्हावें, हा विसृष्टीचा नियम आहे; तदनुसार श्रुतीनें सृष्टीचा क्रम सांगितला आहे, हें या मंत्रापासून या प्रकरणाच्या शेवटपर्यंतचे सर्व मंत्र काळजीपूर्वक अवलोकिले, तर कोणाच्याही ध्यानांत सहज येईल. ॥ ३ ॥

## मंत्र चवथा.

**अग्निर्मूर्धा चक्षुषी चन्द्रसूर्यौ दिश श्रोत्रे वाग्विवृताश्च वेदाः । वायुः प्राणो हृदयं विश्वमस्य पद्भ्यां पृथिवी ह्येष सर्वभूतान्तरात्मा ॥ ४ ॥**

**अन्वय व अर्थः—अग्निः अस्य मर्धा, चन्द्रसूर्यौ अस्य चक्षुषी, दिशः अस्य श्रोत्रे, वेदाः वाग्विवृत्ताः, वायुः अस्य प्राणः, विश्वं, अस्य हृदयं** (अग्नि हा विराट् स्वरूपाचें मस्तक, चंद्र सूर्य हे ह्याचे दोन नेत्र, सर्व दिशा हे त्याचे दोन कान, वेद ही उद्घाटन करणारी त्याची वाणी, वायु हा त्याचा प्राण आणि हें सर्व विश्व त्याच्या मनांत असणारे सर्व संकल्प, विकल्प, निश्चय, इत्यादि मनोविकार होत) **पद्भ्यां पृथिवी** (याच्या दोन पायांपासून पृथ्वी उत्पन्न झाली) **हि एषः सर्वभूतान्तरात्मा** (कारण हा सर्व भूतांचा अंतर्यामी आहे.)॥ ४ ॥

ह्या मंत्रांत विराट् स्वरूपाचें वर्णन आहे. पुरुषसूक्तांत ज्या स्वरूपाचें वर्णन केलें आहे, तोच विराट् पुरुष येथें संकलितरीतीनें सांगितला आहे. विराटाच्या पायांपासून पृथ्वी झाली, असें म्हटलें आहे. यावरून मला असें वाटते कीं, याच्या मस्तकापासून अग्नि, डोळ्यांपासून चंद्रसूर्य, कर्णांपासून दिशा, वाणीपासून सर्व वेद, याच्या प्राणापासून वायु आणि याच्या हृदयांत उत्पन्न होणाऱ्या विकारांपासून हें सर्व विश्व उत्पन्न झालें आहे. असा अर्थ निघावा आणि निघतो; पुरुषसूक्तांतही अशाच तऱ्हेचें वर्णन आहे. हा विराट् पुरुष सर्व प्राण्यांचा अंतर्यामी आहे, याचा अर्थ सर्व चराचर सृष्टीचें अंतर्बाह्य नियमन करणारा तोच प्रभु नित्य आहे. ॥ ४ ॥

## मंत्र पांचवा.

**तस्मादग्निः समिधो यस्य सूर्यः सोमात्पर्जन्य ओषधयः पृथिव्याम् । पुमान्रेतः सिञ्चति योषितायां बह्वीः प्रजाः पुरुषात्संप्रसूताः ॥ ५ ॥**

अन्वय व अर्थ—तस्मात् अग्निः यस्य समिधः सूर्यः ( त्याच्या पासून अग्नि उत्पन्न झाला. या अग्नीची समिध सूर्य होय. ) सोमात् पर्जन्यः, पृथिव्यां ओषधयः, योषितायां पुमान् रेतः सिञ्चति ( सोमापासून पर्जन्य, त्यापासून पृथ्वीमध्यें ओषधी, ओषधींपासून स्त्रीशरीरांत पडणारें पुरुषांचें वीर्य असा ) पुरुषात् बह्वीः प्रजाः संप्रसूताः (महापुरुषापासून अनेक प्रकारच्या प्रजा उत्पन्न होण्याचा क्रम आहे ) ॥५॥

येथें अन्यश्रुतींमध्यें सांगितलेल्या पंचाग्नींच्या उत्पत्तीचा व स्वरूपाचा क्रम सांगितला आहे आणि सिद्धांत असा केला आहे कीं, सर्व प्रजांची उत्पत्ति पुरुषापासून, विराट्स्वरूपापासून होते. हा पुरुष प्रथमतः अग्नि उत्पन्न करितो. अग्नीची सूर्य ही एक समिध आहे. या समिधेनें द्युलोक प्रकाशित होतो. तेथून सोमाची उत्पत्ति होते आणि त्यापासून पर्जन्य होतो. हा दुसरा अग्नि होय. पर्जन्य पडला म्हणजे पृथ्वीवर अनेक प्रकारची वृक्षवनस्पतीसृष्टि उद्भून होते. हा तिसरा अग्नि. ओषधीपासून पुरुषरूपी चौथ्या अग्नीत पुरुषवीर्य उत्पन्न होतें आणि तें स्त्रीरूपी प्रजारूपानें अवतीर्ण होतें. स्त्री हा पांचवा अग्नि. याप्रमाणें पुरुषापासून अग्नि, त्यापासून परंपरेनें पर्जन्य, पृथिवी, नंतर पुरुष आणि नंतर स्त्रिया असें हें पांच अग्नि विराट्स्वरूपापासून उत्पन्न होऊन प्रजांची वृद्धि करितात. ॥ ५ ॥

---

## मंत्र सहावा.

**तस्मादृचः साम यजूंषि दीक्षा यज्ञाश्च सर्वे क्रतवो दक्षिणाश्च । संवत्सरश्च यजमानश्च लोकाः सोमो यत्र पवते यत्र सूर्यः ॥ ६ ॥**

अन्वय व अर्थ—तस्मात् सर्वे ऋचः, साम, यजूंषि, दीक्षा, यज्ञाः च, क्रतवः च, दक्षिणाः च, संवत्सरः च, यजमानः च, लोकाः ( त्या विराट्स्वरूपापासून ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद, सर्व संस्कार, सर्व यज्ञ, सर्व

क्रतु, सर्व दक्षिणा, काल, यजमान आणि सर्व भोग-भुवनें उत्पन्न होतात) **यत्र सोमः यत्र सूर्यः पवते** (या भुवनांत सोम आणि सूर्य राहत असून ते या भुवनांस पवित्र करितात.) ॥ ६ ॥

येथें वेदत्रयीचा उत्पति, दीक्षा, यज्ञ, ज्यांत पशु मारले जातात ते क्रतु, यज्ञांत दिल्या जाणाऱ्या निरनिराळ्या स्वरूपांची दक्षिणा, कर्म करण्याचे काल, नियम, कर्मकर्ता यजमान आणि कर्मापासून उत्पन्न होणारीं आणि जीवांस भोगभोगावयास लावणारीं सर्व प्रकरची भुवनें उत्पन्न होतात, असें सांगितलें आहे. सामान्यतः यज्ञकर्माचीं सर्व अंगें व उपांगें यांचा निर्देश येथें केलेला आहे. यज्ञांस अवश्य असणारे वेदमंत्र, यज्ञांतील दीक्षा घेण्याचा संस्कार, त्यांत दिली जाणारी दक्षिणा, त्यांस योग्य असणारा काल, त्यांचे यजमान (यज्ञदीक्षा घेतलेले कर्ते), जेथें भोग भोगले जातात, ते लोक-तीं भुवनें, या सर्वांचा निर्देश आहे. कर्म सकाम किंवा निष्काम असेल त्याच्या अनुसारानें यज्ञकर्त्यास दक्षिणायन किंवा उत्तरायण मार्गानें जावें लागते. असो; येथें यज्ञसंबंधी विचार आहे आणि याच्याच जोरावर अपरविद्या म्हणजे कर्मविद्या असें आचार्यांनीं म्हटलें आहे. ॥ ६ ॥

---

## मंत्र सातवा.

**तस्माच्च देवा बहुधा संप्रसूताः साध्या मनुष्याः पशवो वयांसि । प्राणापानौ व्रीहियवौ तपश्च श्रद्धा सत्यं ब्रह्मचर्यं विधिश्च ॥ ७ ॥**

**अन्वय व अर्थ-तस्मात् च बहुधा देवाः, साध्याः, मनुष्याः, पशवः, वयांसि, प्राणापानौ, व्रीहियवौ** (त्यापासून अनेक प्रकारचे-वेदांमध्यें सांगितलेले-देव, तसेंच साध्य, मनुष्य, पशु, पक्षी, प्राण आणि अपान वायु व सर्वप्रकारचीं धान्यें उत्पन्न होतात) **तपः श्रद्धा, सत्यं, ब्रह्मचर्यं, विधिः च** (त्या विराट्स्वरूपापासून तप, आस्तिक्यबुद्धि, सत्य, ब्रह्मचर्य आणि कर्तव्याविधि उत्पन्न होतात) ॥ ७ ॥

येथें यज्ञांत उपयोगी पडणारे देवांची व साध्यांची, तसेंच मनुष्य-पशुपक्ष्यांची, प्राणापानादि वायूंची व व्रीहीयवादि हविष्यान्नांची उत्पत्ति होते असें सांगितलें. प्राणादि वायु आणि हविष्यान्नें ही प्राण्याच्या जीवनांस उपयोगी पडणारीं जाहेत. नंतर तप, श्रद्धा, सदाचरण आणि कर्तव्यनिश्चित करणारे सर्व विधि यांचा उल्लेख श्रुतीनें केला आहे. आणि यज्ञास अवश्य असणारीं साधनें निर्दिष्ट केलीं आहेत. हें सर्व यज्ञप्रकरण चाललें आहे. आणि यज्ञापासून विश्वाची उत्पत्ति झाली व सर्व कर्में यज्ञांगद्वारा चालतात, असें येथें सांगावयाचें आहे. ॥ ७ ॥

---

## मंत्र आठवा.

**सप्त प्राणाः प्रभवन्ति तस्मात्सप्तार्चिषः समिधः सप्त होमाः । सप्त इमे लोका येषु चरन्ति प्राणा गुहाशया निहिताः सप्त सप्त ॥ ८ ॥**

अन्वय व अर्थः—तस्मात् सप्त प्राणाः सप्तार्चिषः, सप्त समिधः सप्त होमाः, इमे सप्त लोकाः प्रभवन्ति ( त्या विराट्स्वरूपापासून सप्त प्राण ( इंद्रियें ) सप्त विज्ञान–प्रकाश, सप्त विषय, सप्त विज्ञानें, सप्त इंद्रियगोलक हीं उत्पन्न होतात ) येषु गुहाशयाः निहिताः सप्त प्राणाः चरन्ति ( ज्या प्रत्येक निरनिराळ्या इंद्रियगोलकामध्यें गुप्तरीतीनें असलेले सातही प्राण संचार करीत असतात. ) ॥ ८ ॥

येथें सात इंद्रियें, बुद्धीनें पाडिलेला सात विषयांच्या विज्ञानावरील प्रकाश, सात प्रकारचे विषय, सात प्रकारचीं ज्ञानें, सात प्रकारचे इंद्रियगोलक आणि प्रत्येक इंद्रिय गोलकामध्यें राहणारा पण न दिसणारा सप्त प्राणांतील एक विशिष्ट प्राण, या सर्वांची उत्पत्ति विराट्स्वरूपापासून होते असें सांगितलें, आपल्यास विषयाचें ज्ञान होतें, तेव्हां पुढील भाग अत्यंत अवश्य असतात. आपण नेत्रानें पहातो; तेव्हां पाहण्याचें सामर्थ्य असणारा डोळा, त्या डोळ्यांतील विषयप्रकाशक प्रकाश, पदार्थांचें स्वरूप, पाहण्याचा विषय, विषय पाहिल्यानंतर पदार्थांचें झालेलें विषयज्ञान आणि डोळा राहण्याचें स्थान इतके भाग अवश्य आहेत. इंद्रियें, इंद्रियांच्या द्वारें झालेलें विषय–ज्ञान, प्रकाश्यविषय, विषयप्रकाश आणि इंद्रियांचीं स्थानें, हें आपल्या ज्ञानाचें पृथक्करण आहे. कोणतेंही ज्ञान होतें, तेव्हां इतक्या गोष्टी अवश्य असतात. मुख्य जो प्राण आहे, त्याचे सात विभाग होऊन ते मन, बुद्धि, आणि पांच इंद्रियें यांच्या ठिकाणीं निरनिराळेपणानें राहत असतात म्हणजे एकेक प्राण एकेक इंद्रियांच्या स्थानामध्यें वास्तव्य करितो. आपणांस जें ज्ञान होतें त्याचें हें केलेलें पृथक्करण चिंतनीय आहे. ॥ ८ ॥

---

## मंत्र नववा.

**अतः समुद्रा गिरयश्च सर्वेऽस्मात्स्यन्दन्ते सिन्धवः सर्वरूपाः । अतश्च सर्वा ओषधयो रसश्च येनैष भूतैस्तिष्ठते ह्यन्तरात्मा ॥ ९ ॥**

**अन्वय व अर्थ**—**अतः सर्वे समुद्राः गिरयः च** (येथूनच सप्त समुद्र आणि सप्त पर्वत उत्पन्न होतात) **अस्मात् सर्वरूपाः सिंधवः स्यंदन्ते** (या विराट्स्वरूपापासूनच निरनिराळ्या स्वरूपाच्या नद्या उत्पन्न होऊन वाहत असतात) **अतः च सर्वाः ओषधयः रसः च** (ह्या विराट्-पुरुषापासून सर्व वनस्पती आणि त्यांतील रसही उत्पन्न होतात) **येन एषः अन्तरात्मा भूतैः तिष्ठते** (या रसाच्या योगानें हा अंतरात्मा भूतांसहवर्तमान विद्यमान् होतो.) ॥ ९ ॥

येथें सांगितलें कीं, सात महासमुद्र, सात महापर्वत, आणि सात महानद्या यांची उत्पत्ति विराट्स्वरूपापासून होते. वनस्पतिसृष्टीचा वृत्तांत जो रस असतो त्याचा उत्पादक हा विराट्पुरुष आहे. या रसाच्या मुळें विराट्पुरुषाचें लिंगशरीर स्थापित होतें आणि पंचमहाभूतें याला स्थूलशरीर निर्माण करून देतात. रस हें सूक्ष्मशरीर आणि पंचमहाभूतेंही विराट्स्वरूपाचें स्थूल शरीर होतात. आणि ह्या उभयतांचेंही नियमन हा पुरुष करीत असतो ॥ ९ ॥

---

## मंत्र दहावा.

**पुरुष एवेदं विश्वं कर्म तपो ब्रह्म परामृतम् । एतद्यो वेद निहितं गुहायां सोऽविद्याग्रन्थिं विकिरतीह सोम्य ॥ १० ॥**

**अन्वय व अर्थ**—**पुरुषः एव इदं विश्वं, कर्म, तपः, परामृतं ब्रह्म,** (परमात्मा हाच हें सर्व विश्व, येथें होणारें सर्व कर्म, सर्व ज्ञान, तपश्चर्या आणि अत्यंत उत्तम जो परम पुरुषार्थ ब्रह्मज्ञान—आहे. सारांश, सर्वच ब्रह्म आहे आणि सर्व ब्रह्मच आहे.) **एतत् गुहायां निहितं यः वेद** (हें अंतःकरणांत गूढरीतीनें राहिलेलें तत्त्वज्ञान (ब्रह्म) ज्याला समजतें.) **सः सोम्य इह अविद्याग्रंथिं विकिरति** (हे सौम्य!—या गूढतत्त्वाचें ज्ञान ज्याला होतें तो अविद्येची ग्रंथि नाहींशी करून टाकतो.) ॥ १० ॥

हें दृश्य विश्व व त्यांतील सर्व सामर्थ्यें, विश्वांत होणारें सर्व कर्म, येथें होणारी सर्व ज्ञानतपश्चर्या आणि येथें प्राप्त होणारें अत्यंत उत्कृष्ट तत्त्वज्ञान—ब्रह्मज्ञान—आणि ब्रह्म हीं सर्व परमात्मस्वरूप आहेत. परमात्मा मात्र हें सर्व झाला आहे, असें दिसतें.

सारांश हें सर्व ब्रह्म आहे आणि ब्रह्म हें सर्व आहे, असा श्रुतीचा सिद्धांत आहे. आणि तो सिद्धांत या खंडांत स्पष्टरीतीनें सांगितला आहे. तिसऱ्या, चौथ्या व नवव्या मंत्रांत विश्ववर्णन, पांचव्यांत प्रजोत्पत्ति, सहाव्यांत कर्म, सातव्यांत तप, आठव्यांत ज्ञान, अशा क्रमानें या सिद्धांताचें वर्णन आहे. आणि नवव्यांत विराट्स्वरूपाच्या स्थूल, सूक्ष्म, आणि कारण शरीराचा उल्लेख करून पुनः ब्रह्माचा परोक्ष उल्लेख केला आहे. तात्पर्य एक ब्रह्म आहे, व व्यवहारांत या पासूनच सर्व उत्पन्न होऊन सर्वांचा लय येथें होतो, असें पहिल्या मंत्रांत सांगून दुसऱ्या मंत्रांत परमात्मस्वरूपाचें वर्णन केलें आहे. असो एकच ब्रह्म आहे असें गूढज्ञान झालें म्हणजे विश्वाच्या संबंधानें आणि जीवाच्या संबंधानें ज्या कांहीं अविवेकी समजुती असतात, जें अज्ञान असतें, तें सर्व नाहींसे होतें; ब्रह्मज्ञानानें अज्ञान नष्ट होतें आणि अज्ञान नष्ट झालें म्हणजे जीव ब्रह्मरूप होतो, असा सिद्धांत या प्रकरणांत स्थापित केला आहे. ॥ १० ॥

हें सृष्टिप्रकरण होय. ब्रह्मानें सगुण होऊन ( सत्त्वगुणाची उपाधि स्वीकारलीसें करून ) तप केलें. हें तप म्हणजे पाठीमागील कल्पांत झालेल्या कर्मानुसार पुढील सृष्टीचा स्पष्ट संकल्प होय. असो; या तपामुळें समष्टि व व्यष्टि या उभयसृष्टीच्या उद्भवाचें बीज उत्पन्न होऊन कर्म प्रादुर्भूत झालें. शेवटीं कर्मांचा विपाक म्हणजे हें चराचर विश्व होय. याप्रमाणें हा मंत्र या खंडांतील प्रकरणाचा उपसंहार करून 'एक ब्रह्म आहे' या सिद्धांताची प्रतिष्ठापना करितो. असो; सध्यां इतकेंच पुरे.

**द्वितीयमुण्डक प्रथमखंड समाप्त.**

---

# द्वितीय--मुण्डक.

## द्वितीय--खण्ड.

### मंत्र पहिला.

**आविः संनिहितं गुहाचरं नाम महत्पदमत्रैतत्समर्पितम् । एजत्प्राणन्निमिषच्च यदेतज्जानथ सदसद्वरेण्यं परं विज्ञानाद्यद्वरिष्ठं प्रजानाम् ॥ १ ॥**

**अन्वय व अर्थ**—आविः संनिहितं, गुहाचरं नाम महत्पदं ( हें प्रकाशरूप असणारें, हृदयाच्यामध्यें व्यवस्थितरीतीनें राहिलेलें, अंतःकर-

णामध्यें व्यापार करणारें आणि मोठ्या वस्तूंनींही ज्याचा आश्रय केला आहे असें, किंवा हें स्वतः अत्यंत मोठें आहे म्हणून ज्याचा सर्व वस्तूंनी आश्रय केला आहे, असें ) **अत्र एतत् समर्पितं** ( येथें या ब्रह्मामध्यें हें सर्व समर्पित झालें आहे.) **एजत्, प्राणत् निमिषत् च यत्** ( हालचाल करणारें, श्वासोच्छ्वास करणारें, डोळे मिटविणारें जें आहे ) **एतत सदसद्वरेण्यं, प्रजानां विज्ञानात् परं, यत् वरिष्ठं तत् जानथ** ( कार्यकारणरूपी, सर्व चराचरांनीं स्तुति करण्यास योग्य, जें सर्व लोकांच्या विज्ञानाहून अत्यंत श्रेष्ठ व जें श्रेष्ठतम आहे तें ज्ञात करून घ्या. ) ॥१॥

येथें पुनः निरतिशय परब्रह्माचें वर्णन आहे. आणि तसेंच त्याचें ज्ञान करून घ्यावयाचें तें कोणत्या स्वरूपानें घ्यावें, याचेंही वर्णन आहे. श्रुति म्हणतेः हें स्वयंप्रकाश आहे. जीवांच्या अंतःकरणांत हें राहणारें, आणि तेथें शब्दस्पर्शादिरूपांनीं प्रकट होणारें व सर्व पदार्थांचा अंतर्भाव करणारें असल्यामुळें सर्वांहून अत्यंत मोठें, जीवांच्या जागृति, स्वप्न व सुषुप्ति स्थितींत (तिन्ही अवस्थांत) नित्य असणारें, सर्व कारणें आणि कार्यें यांच्याहून विलक्षण असल्यामुळें ( सर्व-कार्य-कारणातीत असल्यामुळें ) सर्ववंद्य, जीवांस होणाऱ्या विषयज्ञानांहून विलक्षण आणि सर्व निर्दुष्ट वस्तूंहून अत्यंत श्रेष्ठ, अशा स्वरूपानें परमात्म्याचें ध्यान करीत जा. येथें ही परब्रह्माच्या सत्, चित् आणि आनंद स्वरूपाचा विस्तार आहे. स्वयंप्रकाशरूपानें तें स्वतंत्रतः सर्वांच्या अंतर्यामीं राहतें, म्हणून अतिसूक्ष्म ब्रह्म ज्ञानरूप आहे. सर्व मोठ्या वस्तूंस आश्रय देतें, म्हणून तें मोठें म्हणजे आनंदरूप आहे. आणि जीवांच्या तिन्ही अवस्थांत तें विद्यमान असतें, म्हणून तें सद्रूप आहे. असें सच्चिदानंद स्वरूप असून तें सर्वकार्यकारणातीत, सर्व ज्ञानविज्ञानातीत आणि सर्वशुद्ध आहे. तात्पर्य, दृश्य विश्वांत दिसणारे विकार येथें कोणत्याही प्रकारें विद्यमान असत नाहींत. आपलें जें आत्मस्वरूप आहे तेंही सच्चिदानंदस्वरूप आहे. तें तिन्ही अवस्थांत जागृत असतें, सर्व इंद्रियजन्यज्ञानांचा आश्रय असतें आणि सर्वांचें व्यापक म्हणून सर्वापेक्षां अतिशय मोठें असतें. यावरून परमार्थतः आपलें स्वरूप आणि ब्रह्मस्वरूप एक आहे, असें सिद्ध होतें. हेंच आपल्यास जाणून घ्यावयाचें आहे आणि तें जाणून घ्या असा श्रुतीचा उपदेश आहे. श्रवण, वेदांतश्रवण, त्याचें मनन आणि एकाग्रध्यान हा ब्रह्म जाणण्याचा मार्ग आहे. या मंत्रांत प्रथमचा उपाय म्हणजे जें श्रवण, त्याचा स्पष्ट उल्लेख आहे. ॥ १ ॥

---

## मंत्र दुसरा.

**यदर्चिमद्यदणुभ्योणु च यस्मिँल्लोका निहिता लोकिनश्च । तदेतदक्षरं ब्रह्म स प्राणस्तदु वाङ्मनः । तदेतत्सत्यं तदमृतं तद्वेद्धव्यं सोम्य विद्धि ॥ २ ॥**

अन्वय व अर्थ—यत् अर्चिमत्, यतत् अणुभ्यः अणुच, यस्मिन् लोकाः लोकिनः च निहिताः ( जें स्वयंप्रकाश आहे, जें लहानाहून लहान असतें आणि ज्यांमध्यें सर्व भुवनें आणि सर्व भुवनस्थ प्राणी राहतात. ) तत् एतत् अक्षरं ब्रह्म, सः प्राणः, तत् उ वाङ्मनः ( तें हें अक्षर ब्रह्म आहे, तें प्राण आहे, तें वाणी आहे. ) तत् एतत् सत्यं, तत् अमृतं, तत् वेद्धव्यं, सोम्य ! विद्धि (तें हें सत्य आहे, अमृत आहे, वेध करण्यास तेंच योग्य आहे, हे सौम्य, हें जाणून घे. ) ॥ २ ॥

येथें मननाचा विधि उपदेशिला आहे. मनन कसें करावयाचें तें सांगतात. हें ब्रह्म सर्वप्रकाशक आणि स्वयंप्रकाश, लहानाहून लहान असून सर्व चराचर विश्वास आपल्यामध्यें सामावणारें आहे. हें अविनाशी ब्रह्म निर्विकार असून तें प्राणाचा प्राण, वाणीची वाणी आणि मनाचें मन आहे. तें परमार्थतः सत्य असून अविनाशी आहे. अशा स्वरूपानें त्याचें एकाग्र मनन केलें असतां तें जाणतां येईल. मनन करणें ही दुसरी पायरी आहे. श्रवण झालेलें ब्रह्मस्वरूप मननांत जास्त परिचयाचें होतें आणि संभावनादि दोष नष्ट होतात ॥ २ ॥

## मंत्र तिसरा.

**धनुर्गृहीत्वौपनिषदं महास्त्रं शरं ह्युपासानिशितं संधयीत । आयम्य तद्भावगतेन चेतसा लक्ष्यं तदेवाक्षरं सोम्य विद्धि ॥ ३ ॥**

अन्वय व अर्थ—महास्त्रं औपनिषदं धनुः गृहीत्वा उपासानिशितं शरं संधयीत [ ज्याची फेंक अतीशय लांब असते, असें उपनिषदांत सांगितलेलें धनुष्य (ॐकाररूपी धनुष्य ) धारण करून त्यावर उपासनेनें तीक्ष्ण झालेल्या बाणाचें ( आत्मरूपी बाणाचें ) संधान करावें ] आ-

**यस्य तद्भावगतेन चेतसा लक्ष्यं** ( धनुष्याची प्रत्यंचा लांब ओढून ब्रह्मस्वरूपाशीं तादात्म्य झाला आहे भाव ज्याचा, अशा अंतःकरणानें अंतःकरणोपाधि–जीव–स्वरूपतः–तें ब्रह्म लक्षित करावें.) **सोम्य तत् एव अक्षरं विद्धि** ( हे सौम्य, हें अशा रीतीनें लक्षित केलेलें अविनाशी ब्रह्म जाणून घे ) ॥ २ ॥

अंतःकरण ही ज्याची उपाधि आहे, त्या मुमुक्षु जीवानें ब्रह्माचें अखंड ध्यान करावें हें वरील श्लोकाचें तात्पर्य आहे.

येथें ध्यानाचा प्रकार सांगितला आहे. उपनिषदांत ओंकाराचें किंवा प्रणवाचें माहात्म्य अनेक वेळ सांगितलें आहे. मुमुक्षूनें प्रणवरूपी धनुष्य सिद्ध करून त्यावर एकाग्र-ध्यानाचा बाण ( हा जीवस्वरूपी बाण असावा ) जोडावा. ओंकार या अक्षराचा आकार धनुष्यरूप आहे, हें कोणाही साधकास सहज समजणार आहे. असो; बाण लावून धनुष्याची दोरी इतकी लांब ओढावी कीं, चिदंशासह आपलें सर्व अंतःकरण ओंकार स्वरूप होईल, इतकेंच नव्हे, तर तें ब्रह्मस्वरूप होईल आणि याप्रमाणें चित्त ब्रह्मस्वरूपीं एकाग्र झाल्यानंतर लक्ष्य जें ब्रह्म त्यावर ध्यानाचा बाण सोडावा. तात्पर्य ओंकारस्वरूपाच्या साहाय्यानें आपण ब्रह्मस्वरूपाचें ध्यान करावें आणि हें ध्यान करतांना आपलें चित्त इतर सर्व विषयांपासून निवृत्त करून एक परमात्मस्वरूपीं मात्र तें लावावें. असें एकनिष्ठ ध्यान साधकांनीं केलें असतां त्याला ब्रह्मस्वरूपाचें ज्ञानविज्ञान होऊन ते ब्रह्मस्वरूप होतील, यांत संदेह नाहीं. येथें संप्रज्ञात ( सविकल्प ) व असंप्रज्ञात ( निर्विकल्प ) समाधींचा उल्लेख आहे. याप्रमाणें श्रवण, मनन आणि निदिध्यास हीं मुख्य साधनें सांगितलीं. ध्यानानें विपरीतभावनादि सर्व दोष निवारित होतात आणि ब्रह्मसाक्षात्कार होतो. ॥ ३ ॥

---

## मंत्र चवथा.

**प्रणवो धनुः शरो ह्यात्मा ब्रह्म तल्लक्ष्यमुच्यते ।**
**अप्रमत्तेन वेद्धव्यं शरवत्तन्मयो भवेत् ॥ ४ ॥**

**अन्वय व अर्थ**—**हि प्रणवः धनुः, आत्मा शरः, ब्रह्म तल्लक्ष्यं उच्यते** ( कारण प्रणव–ओंकार–याला धनुष्य म्हणतात; आत्मा–जीव–ह्याला बाण म्हणतात, आणि ज्याच्यावर आपल्यास नेम धरावयाचा आहे, त्याला ब्रह्म म्हणतात ) **अप्रमत्तेन वेद्धव्यं** ( या लक्ष्यरूपी परब्रह्मावर सावधानक नेम धरावा ) **शरवत् तन्मयः भवेत्** ( म्हणजे बाण

लक्ष्यामध्यें जसा घुसतो, त्याप्रमाणें आपला आत्मा ब्रह्मस्वरूपामध्यें शिरून त्याच्यामध्यें एकरूप होईल. ) ॥ ४ ॥

हा मंत्र पाठीमागील मंत्रानुसार निर्मळ जीवानें प्रणवाचा आधार घेऊन व ब्रह्माकडे एकाग्र दृष्टी ठेवून अवधानपूर्वक ध्यान केलें असतां, निर्मळ अंतःकरणाच्या जीवानें ध्यान केलें असतां, कोणतें फळ प्राप्त होईल हें स्पष्ट सांगितलें आहे. ब्रह्मस्वरूपाचें यथार्थ श्रवण करून एकाग्रमनन केलें आणि एकनिष्ठ अंतःकरणानें ब्रह्माचें मात्र ध्यान सावधतेनें केलें म्हणजे आत्मा ब्रह्म होतो. हें असें आत्मध्यानाचें फल आहे. येथें 'अप्रमत्त' हें पद ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. गाढ निद्रा आणि एकाग्रसमाधि यांत कोणताही विशेष नाहीं, असें कित्येक साधकांस वाटण्याचा संभव आहे. त्याचा निरास श्रुतीनें येथें केला आहे. गाढ निद्रेमध्यें आपला जीव सर्व उपाधींपासून निवृत्त होतो. या वेळीं मनबुद्धीसह सर्व ज्ञानेंद्रियें आणि कर्मेंद्रियें स्तब्ध राहतात. तशींच एकाग्र समाधीच्या वेळीं हीं सर्व इंद्रियें आपापल्या विषयांसह परावृत्त झालेलीं असतात. एक प्राणवायुमात्र दोन्ही स्थितींत आपलें कार्य करीत राहतो, तेव्हां दोन्ही स्थिती सारख्याच असें कोणास वाटण्याचा संभव आहे. पण अभंग समाधीस्थितीमध्यें शरीरांतील प्राणांचे ही व्यापार स्तब्ध होतात, हा एक भेद विसरतां कामा नये. त्याचप्रमाणें निद्राकाळीं आपला जीव आत्मसुखाचा अनुभव घेत असतो, तरी त्याला त्यावेळीं आपण अनुभव घेत आहों, असें भान नसतें. पण समाधिस्थितींत हें स्वरूपभान विद्यमान असतें, हा दुसरा विशेष आहे आणि हा विशेष विसरूं नये म्हणून अप्रमत्तता किंवा सावधानंपणा असणें जरूर आहे, असें श्रुतीनें 'अप्रमत्तेन' या पदानें स्पष्ट दाखविलें आहे. अत्यंत तीव्र ध्यानांत भानही असणें शक्य नाहीं. तथापि त्यावेळीं जीवाची ज्ञानपूर्ण आत्मस्थिति असते. पण निद्राकाळीं जीव हा सोपाधिक असतो, हें अनुभवसिद्ध आहे. आपण स्वभावतः जागें होतों तेव्हां व झोंपेपूर्वी सोपाधिकच असतो. पण समाधींतून उत्थान होतें, तें इतरांकडून होतें. म्हणून त्यावेळीं सर्व उपाधींचा नाश झालेला असतो. असो आत्मस्वरूपाचें एकाग्र चित्तानें ध्यान केलें म्हणजे आत्मप्राप्ति होते हा फलितार्थ आहे ॥ ४ ॥

---

## मंत्र पांचवा.

**यस्मिन्द्यौः पृथिवी चान्तरिक्षमोतं मनः सह प्राणैश्च सर्वैः । तमेवैकं जानथ आत्मनामन्या वाचो विमुञ्चथामृतस्यैष सेतुः ॥ ५ ॥**

**अन्वय व अर्थ—यस्मिन् द्यौः, पृथिवी च, अन्तरिक्षं सर्वैः प्राणैः सह मनः ओतं** ( ज्यामध्यें द्युलोक, पृथ्वीलोक आणि अंतरिक्षलोक,

व सर्व प्राणांसह मन हीं सर्व समर्पित झालीं आहेत ) **तं एव एकं आत्मानं जानथ** ( त्या एक आणि अद्वितीय आत्म्याचें ज्ञान करून घ्या ) **अन्याः वाचः विमुञ्चथ** ( अन्य सर्व वाणींचा, ज्ञानांचा त्याग करा ) **एषः अमृतस्य सेतुः** ( हा मोक्षपदास नेणारा सेतु आहे ) ॥ ५ ॥

आत्मस्वरूप समजणें परम कठिण आहे. म्हणून श्रुति पुनः पुनः त्याच स्वरूपाचें वर्णन करून साधकांस ब्रह्म-ज्ञान करून देण्याचा प्रयत्न करीत आहे. येथें सांगितलें आहे कीं, सर्व त्रैलोक्य आणि प्राणांसह मन हीं सर्व ब्रह्मस्वरूपांत अंतर्भूत होतात. म्हणून द्युलोकाचें, पृथ्वीचें व अंतरिक्षाचें, त्याचप्रमाणें प्राणांचे व अंतःकरण-चतुष्टयाचें ज्ञान देणाऱ्या ब्रह्माचें स्वरूप जें शास्त्र सांगतें त्या शास्त्रांपासून मात्र आपलें आत्यंतिक कल्याण होईल. अपरविद्येनें आपल्यांस सर्व उपाधींपासून मुक्त होतां येईल, अशी जर साधकांची कल्पना असेल तर ती कल्पना त्यांनी सोडून द्यावी आणि एक आत्मस्वरूप मात्र जपून जाणून घेण्याचा अखंड प्रयत्न करावा. संसारसागरांतून तरून पलीकडे नेण्याचें, मोक्ष मिळवून देण्याचें जर कांहीं साधन असेल तर तें एक आत्मज्ञान मात्र आहे, असें श्रुतीला येथें सांगावयाचें आहे ॥ ५ ॥

---

## मंत्र सहावा.

**अरा इव रथनाभौ संहता यत्र नाड्यः स एषोऽन्तश्चरते बहुधा जायमानः । ओमित्येवं ध्यायथ आत्मानं स्वस्ति वः पाराय तमसः परस्तात् ॥ ६ ॥**

**अन्वय व अर्थ—रथनाभौ अराः इव यत्र नाड्यः संहताः** ( रथाच्या नाभीमध्यें ज्याप्रमाणें चक्रांच्या सर्व अरा जाऊन मिळतात, त्याप्रमाणें जेथें सर्वशरीरव्यापी-सर्व शरीरांत संचार करणाऱ्या-नाड्या एकत्र होतात ) **सः एषः बहुधा जायमानः अंतः चरते** ( त्या नाड्या ज्या हृदयांत एकत्र होतात त्याच्या अंतर्यामी राहून अनेक प्रकारें प्रकट होणारा आत्मा सर्वत्र संचार करीत असतो ) **ॐ इति एवं आत्मानं ध्यायथ** ( पूर्वोक्त लक्षणांनें युक्त असणाऱ्या आत्म्याचें ॐस्वरूपानें ध्यान करा ) **तमसः परस्तात् पाराय स्वस्ति वः** ( अंधकाराच्या पलीकडे असणाऱ्या दुसऱ्या तीराकडे जात असतां तुमचें कल्याण असो ) ॥६॥

या मंत्रांत शरीरांतील सर्व देहव्यापी नाड्या हृदयांत एकत्र होऊन तेथें वास्तव्य करणाऱ्या अंतरात्म्याच्या नियंतृत्वाखालीं राहत असतात आणि तेथें राहून सर्व शरीरभर पसरणाऱ्या नाड्यांच्या विद्यमानें हा आत्मा आपल्यांस अनेक स्वरूपांनीं प्रकट करीत असतो, असें सांगितलें. जीवाच्या हातून होणाऱ्या सर्व क्रिया आणि त्याला होणारीं सर्व विज्ञानें हीं एका आत्म्याचीं निरनिराळीं दृश्यमान स्वरूपें प्रकट करीत असतात. रथनाभीचा ताबा घेतला म्हणजे त्या रथाच्या सर्व अरा ज्याप्रमाणें आपल्या ताब्यांत येतात, त्याप्रमाणें आत्मस्वरूप आपल्या हातीं आलें म्हणजे सर्व प्रकट होणारीं स्वरूपें आणि तीं प्रकट होण्याचीं द्वारें सहज आपल्या ताब्यांत येतात. सारांश एक आत्मशास्त्राचें ज्ञानविज्ञान झालें कीं सर्व अपरविद्येचें व तिचे विषय असणाऱ्या शास्त्रांचें ज्ञानविज्ञान तुम्हांस होईल. असें आहे म्हणून श्रुति म्हणते कीं आम्हीं आतांपर्यंत आत्मस्वरूपाचें जें वर्णन केलें आहे, त्याचें ध्यान ओंकारस्वरूपानें करा म्हणजे मोक्षमार्गाकडे जातांना तुम्हांस सर्वत्र प्रकाशाचें साम्राज्य मिळेल. आत्मज्ञानाव्यतिरिक्त हें सर्व विश्व आणि त्यांतील सर्व चराचर पदार्थ म्हणजे एक शुद्ध अंधकाराचा भयंकर प्रदेश आहे. पण या प्रदेशांत आत्मज्ञानाची दीपिका घेऊन व आत्मस्वरूपाचें अखंड ध्यान करून जर तुम्ही भवसागर तरून जाण्याचा उद्योग केला तर तुम्हांस कोठेंही अडचण न येतां तुमचें परम कल्याण होईल. आत्मस्वरूपाचें यथार्थ ध्यान करणें केवळ असाध्य आहे म्हणून वेदविर्गात जें ओंकारस्वरूप त्याचें ज्ञानपूर्वक ध्यान करा म्हणजे तुमचें सर्व प्रतिबंध नाहींतसे होऊन तुम्हांस आत्मज्ञानाची जोड मिळेल. ॥ ६ ॥

---

## मंत्र सातवा.

**यः सर्वज्ञः सर्ववित्यस्यैष महिमा भुवि । दिव्ये ब्रह्मपुरे ह्येष व्योम्न्यात्मा प्रतिष्ठितः । मनोमयः प्राणशरीरनेता प्रतिष्ठितोऽन्ने हृदयं संनिधाय । तद्विज्ञानेन परिपश्यन्ति धीरा आनन्दरूपममृतं यद्विभाति ॥ ७ ॥**

अन्वय व अर्थ—**यः सर्वज्ञः, सर्ववित्, यस्य एषः महिमा भुवि, दिव्ये ब्रह्मपुरे, हि एषः आत्मा व्योम्नि प्रतिष्ठितः** ( जो सर्वज्ञ आणि सर्ववेत्ता आहे, ज्याचा हा सर्व प्रसिद्ध महिमा भूलोकीं, द्युलोकीं व ब्रह्मपुरांत जगद्विश्रुत आहे तो हा आत्मा व्योमामध्यें प्रतिष्ठित झाला आहे ) **मनोमयः प्राणशरीरनेता अन्ने प्रतिष्ठितः** ( हा आत्मा मनोमय प्राण

आणि शरीर यांचा चालक असून अन्नामध्यें प्रतिष्ठित झाला आहे. ) **यत् आनंदरूपं अमृतं विभाति तत्—अमृतं आनंदरूपं—धीराः हृदयं संनिधाय परिपश्यंति** (तो सर्वप्रकाशक आत्मा, तसेंच, अमृतरूपी आणि आनंदरूपी आत्मा हृदयामध्यें ध्यानानें प्रतिष्ठित झाल्यामुळें त्याचें ज्ञान-विज्ञान होऊन तो विवेकीपुरुषांस स्वस्वरूपानें प्रकाशित होतो ) ॥ ७ ॥

येथें पूर्वी सांगितलेल्या सर्व विशेषणांचा उपसंहार करून आणखी कांहीं आत्मस्वरूपाचें वर्णन करणाऱ्या विशेषणांचा उल्लेख केला आहे. तो सर्वज्ञ आहे व प्रत्येक पदार्थाचें प्रत्येक स्वरूप जाणणारा आहे. त्याचा सर्वप्रसिद्ध महिमा सर्व त्रैलोक्यभर आणि सर्व अंतःसृष्टीमध्यें पसरलेला आहे. कारण तो हृदयाकाशामध्यें प्रतिष्ठित झाला आहे. तो मनाचा नियंता असून मनोद्वारानें प्रकट होतो. तो प्राणांचा व शरीरांचा, सारांश, जीवांचा चालक आत्मा अन्नामध्यें म्हणजे अव्याकृत जी मूल प्रकृति तिचे ठिकाणीं राहून तिचें नियमन करितो. अशा प्रकारचें परमात्म्याचें स्वरूप आहे. या स्वरूपाचें ज्ञान होऊन ज्या विवेकी पुरुषांस विज्ञान झालें, त्यांना सर्व प्रकाशक जो आपला आत्मा तोच परमात्मा असून तो अमर ( नित्य असणारा ) आनंदरूप आणि ज्ञानरूप आहे, असा स्पष्ट साक्षात्कार होतो. कारण उघड आहे कीं, हृदयांत राहणारा व आनंदरूप व अमृतस्वरूप असणारा जो आपला शुद्ध आत्मा, त्याचें एकनिष्ठ ध्यान करून जे नर त्याचें ज्ञानविज्ञान करून घेतात त्यांस परमात्मस्वरूपाचें ज्ञानविज्ञान पूर्ण होतें. आत्मा व परमात्मा एकच, तेव्हां एकाचें ज्ञान म्हणजे दुसऱ्याचें ही ज्ञान सहज होऊन त्या ज्ञानाला विज्ञानत्व येतें. सारांश, श्रवण मनन आणि ध्यान या साधनांनीं ज्या विवेकीपुरुषानें सर्व विषयांचा त्याग करून व सर्वेंद्रियांचा उपशम करून आत्मस्वरूपाचें ओंकारद्वारा मोक्षप्रीत्यर्थ अखंड ध्यान केलें, निर्विषय मन करून तें ज्यांनीं हृदयवासी परमात्मस्वरूपामध्यें मात्र समर्पित केलें, त्यांना आपलें स्वरूप सच्चिदानंदरूप आहे, असें साक्षात्कारी ज्ञान होतें. इतकेंच नव्हे, तर परमात्मा ही सच्चिदानंदस्वरूप असून आत्मा व परमात्मा एकच, असें अद्वितीय ब्रह्माचें ज्ञान होऊन साक्षात्कार होतो. येथें मीं अन्वय निराळ्या तऱ्हेनें लाविला आहे, त्याचा विचार विद्वान् लोक करोत ॥ ७ ॥

---

## मंत्र आठवा.

**भिद्यते हृदयग्रन्थिश्छिद्यन्ते सर्वसंशयाः । क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे ॥ ८ ॥**

**अन्वय व अर्थ**—तस्मिन् परावरे दृष्टे हृदयग्रंथिः भिद्यते, सर्वसंशयाः छिद्यन्ते, अस्य कर्माणि क्षीयंते च ( त्या परब्रह्माचें आणि अपर-

ब्रह्माचें ज्ञानविज्ञान ज्याला झालें, त्याच्या हृदयग्रंथीचा उच्छेद होतो, सर्व संशयांचें निराकरण होतें आणि त्यांचीं सर्व कर्में नाहींशीं होतात ) ॥ ८ ॥

मागच्या मंत्रांत सांगितल्याप्रमाणें आत्मस्वरूपाचा साक्षात्कार झाला व पर आणि अपर ब्रह्माच्या स्वरूपाची योग्यता ज्यास कळली, त्याच्या सर्व अविद्येनें उत्पन्न केलेल्या गांठी तुटून जातात. जीवाच्या हृदयामध्यें वास्तव्य करणाऱ्या अविद्याजनित वासनांचा समूह होऊन एक मोठें थोरलें गांठोडें बनलेलें असतें, या गांठोड्याला अविद्याग्रंथि असें नांव आहे. असो; विज्ञानी पुरुषाची अविद्याग्रंथि वर सांगितल्याप्रमाणें तुटते. त्याला जे संशय अथवा विपरीत भावना असतात, त्या सर्वांचें निराकरण होतें आणि त्यानें जीं जीं काय कर्में केलीं असतील त्या कर्मांपैकीं, जीं फलोन्मुख झालेलीं नसतात, तीं कर्में ( म्हणजे सर्व पूर्वसंचित ) यांचा नाश होतो. याचें कारण हें आहे कीं, त्याची अविद्या नाहींशी झालेली असते. आपण देह आहों; मन आहों; हा पुत्रमित्रकलत्रादि संसार आपल्या उपभोगासाठीं निर्माण झाला आहे, म्हणून तो माझा आहे, मला मरण येईल; इत्यादि प्रकारची जी भ्रांति अज्ञानामुळें जीवाला होत असते ती भ्रांति आत्मज्ञानाच्या परिपाकानें नाहींशी झाली; मी स्वरूपतः ब्रह्म आहें, असा निश्चय झाला; म्हणजे त्या पूर्णकामपुरुषाच्या विषयवासना विगलित होऊन जातात, यांत काय आश्चर्य आहे ? त्याचप्रमाणें मी ब्रह्म आहें, असा दृढनिश्चय झाल्यावर हें खरें किंवा तें खरें, इत्यादि प्रकारचें जें संशय असतात, ते सर्वच्या सर्व निराकृत होऊन जातात, हें सांगावयास पाहिजे काय ? शेवटीं मी कर्ता नव्हें, मी भोक्ता नव्हें, कर्म करून मला कांहीं मिळवावयाचें नाहीं, किंवा कर्म न केलें तर माझी कोणतीही हानि व्हावयाची नाहीं, कारण मी स्वरूपतः अकर्ता आहे, पूर्ण आहे, नित्य आहे, शुद्ध आहे, असें ज्ञान ज्यांस झालें त्याचें सर्व पूर्वसंचित दग्ध होऊन नाहींसे होतें, हें काय सांगावें ? शिवाय, मला असें वाटतें कीं पूर्वसंचित म्हणजे पूर्वकर्में फलोन्मुख होऊन भुक्त झाल्यानंतरच अज्ञानजन्य वासना आत्मज्ञानानें नष्ट होऊन क्रियमाण अर्थशून्य होतें व याप्रमाणें सर्व कर्माचा नाश होतो. याप्रमाणें आत्मस्वरूपाचा साक्षात्कार झाला असतां वासनेचा घट फुटतो, संशयाचें जाळें तुटतें आणि कर्मसंतति वासनेसह छिन्नविच्छिन्न होते, हें मुख्यतः श्रुतीस सांगावयाचें आहे. मंत्रांतील ' परावर ' हें पद अपरब्रह्म आणि परब्रह्म या उभयतांचा अंतर्भाव करणारें आहे. म्हणजे श्रुतीला अपर विद्येचें ज्ञान जीवांनीं प्रथम करून घ्यावें; नंतर अपर विद्या संशयाचा उच्छेद करीत नाहीं, असें विवेकानें ज्ञान होतें. अर्थातच तें टाकून देऊन परब्रह्मज्ञान करून घ्यावें म्हणजे श्रुतीनें सांगितलेलें तत्त्व गुरुद्वारां समजून घ्यावें, असा अर्थ इष्ट आहे, असें मला वाटतें. असो ॥ ८ ॥

## मंत्र नववा.

**हिरण्मये परे कोशे विरजं ब्रह्म निष्कलम् ।**
**तच्छुभ्रं ज्योतिषां ज्योतिस्तद्यदात्मविदो विदुः ॥ ९ ॥**

**अन्वय व अर्थ—निष्कलं विरजं ब्रह्म हिरण्मये परे कोशे** ( निष्कळ म्हणजे निरवयव आणि विरज म्हणजे शुद्ध ब्रह्म हें हिरण्मय म्हणजे जीवाचें जें प्रकाशात्मक ज्ञानविज्ञान त्याच्या श्रेष्ठ कोशांत—म्यानांत राहात असून ) **यत् आत्मविदः विदुः तत् शुभ्रं ज्योतिषां ज्योतिः** ( ज्याचें ज्ञान आत्मवेत्त्यांस होतें तें ब्रह्मतत्त्व शुभ्र आणि प्रकाशांचें प्रकाशक आहे ) ॥ ९ ॥

येथें आत्म्याच्या अंतर्यामीपणाचा स्पष्ट उल्लेख आहे. विषयांस प्रकाशित करणारा जो आपला विज्ञानमय कोश आहे तो इतर सर्व कोशांहून श्रेष्ठ आहे. अन्नमय कोश, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय असे पांच कोश श्रुतीला संमत आहेत. त्यां पैकीं शुद्ध आनंदमय कोश हेंच ब्रह्मस्वरूप आहे असें कोठें कोठें सांगितलेलें आहे. हा आनंदमय कोश विज्ञानमय कोशाच्या अंतर्यामी असून त्याचें नियमन करितों, म्हणून येथें विज्ञानमय कोशाला सर्वश्रेष्ठ कोश असें म्हटलें आहे. असो; या कोशांत अवयव-शून्य म्हणजे एकरस आणि विरज म्हणजे शुद्ध ( अथवा सत्त्वरजतमांनीं परिवेष्टित न झालेलें ) असणारें हें ब्रह्म आहे. तें स्वतः शुभ्र असून जेवढें म्हणून प्रकाशक पदार्थ या विश्वांत आहेत, त्या सर्वांस आपल्या स्वयंभु प्रकाशानें प्रकाशित करून त्यांना इतर विषय प्रकाशित करण्याचें सामर्थ्य देणारें आहे. सारांश, हें ब्रह्म स्वयंप्रकाश, निर्मळ, एकरस आणि निर्गुण अशा स्वरूपाचें आहे. हें विज्ञानमय-कोशांत राहतें. हा नववा मंत्र पहिल्या दोन मंत्राचा व मागील प्रकरणांत आलेल्या वर्णनाचा उपसंहार करितो. तसेंच, तीनपासून सातपर्यंतच्या सर्व मंत्रांत सांगितलेलें सिद्धांत एकवट करितो आणि ध्यानाचें फळ सांगतो ॥ ९ ॥

---

## मंत्र दहावा.

**न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकं नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः । तमेव भान्तमनुभाति सर्वं तस्य भासा सर्वमिदं विभाति ॥ १० ॥**

**अन्वय व अर्थ—तत्र सूर्यः न, चन्द्रतारकं न भाति, इमाः विद्युतः न भांति, अयं अग्नि कुतः** ( तेथें सूर्य आपला प्रकाश पाडूं शकत नाहीं,

चंद्रतारकांचे किरणांस तेथें जाण्याचें सामर्थ्य नाहीं, या अत्यंत तेजस्वी विद्युद्दीपिका तेथपर्यंत पोहचूं शकत नाहींत, मग आपल्यांस दिसणाऱ्या अग्नीची काय कथा सांगावी ? ) **तं एव भान्तं सर्वं अनुभाति, तस्य भासा इदं सर्वं विभाति** ( आत्मप्रकाश प्राप्तझाल्यानंतर मात्र सूर्य-चंद्रादि प्रकाशित होऊन ते इतर विषयांस प्रकाशित करतात. म्हणजे त्याच्या भासानें सूर्यचंद्रादि प्रकाशक पदार्थ आणि अप्रकाशक वस्तु प्रकाशित होतात ) ॥ १० ॥

या मंत्राचा कठोपनिषदांत विचार पूर्णपणें झाला आहे येथें इतकेंच सांगावयाचें कीं मागील मंत्रांत ब्रह्माला प्रकाशकाचें प्रकाशक म्हटलें आहे तें कां ? याचें स्पष्टीकरण या मंत्रांत आलेलें आहे. तात्पर्य हें आहे कीं ज्ञानरूप म्हणजे अस्तित्वरूप ब्रह्माचा जेव्हां स्वीकार करावा, तेव्हां चंद्रसूर्यादि प्रकाशक व इतर सर्व प्रकाश्य वस्तु ज्ञानरूप म्हणजे अस्तित्वरूप अशा इंद्रियोपहित (इंद्रियादि उपाधि असणाऱ्या) जीवाला भासतात व दिसतात. तात्पर्य ब्रह्माभाव झालाच ( होणें नाहींच म्हणा ! ) तर सर्व शून्याकारच होईल, असें ही म्हणतां यावयाचें नाहीं; कारण शून्य तरी ज्ञानरूप आणि **नाहींसे होणें** म्हणजे तरी अस्तित्त्वच ! एवंच ब्रह्माचें अस्तित्व केव्हांही नाकारतां येत नाहीं ॥ ०

---

## मंत्र अकरावा.

**ब्रह्मैवेदममृतं पुरस्ताद्ब्रह्म पश्चाद्ब्रह्म दक्षिणतश्चोत्तरेण । अधश्चोर्ध्वं च प्रसृतं ब्रह्मैवेदं विश्वमिदं वरिष्ठम् ॥ ११ ॥**

## इति द्वितीयमुण्डकं समाप्तम् ।

**अन्वय व अर्थ—अमृतं ब्रह्म एव इदं पुरस्तात्, ब्रह्म पश्चात्, ब्रह्म दक्षिणतः, च उत्तरेण, अधः च, ऊर्ध्वं च, प्रसृतं ब्रह्म एव इदं विश्वं, इदं वरिष्ठं** ( हें सर्व आपल्यापुढें जें विविधरूपी विश्व विस्तारलें आहे, जें आपल्या पाठीमागें आहे, आपल्या दक्षिणेला आणि उत्तरेला, आपल्या वरील लोकांत आणि आपल्या खालील लोकांत जें हें ब्रह्मांड जीव किंवा जीवेतर दृष्टीला प्रत्यक्ष होतें, तें सर्व अमृत ब्रह्म आहे. सर्व विश्व

ब्रह्म आणि जी जी कोणती श्रेष्ठ वस्तु आहे, तीही ब्रह्मच आहे; व श्रेष्ठ वस्तु सर्वाधार ब्रह्म आहे ) ॥ ११ ॥

हा सर्व प्रकरणाचा उपसंहार आहे. जीवांस व देवांस ज्या ज्या वस्तु दाही दिशांस सर्व विश्वभर पसरलेल्या दिसतात त्या त्या वस्तू परमार्थतः ब्रह्मरूप आहेत, असें येथें मागील मंत्रांवरून सिद्ध झालेल्या सिद्धांतांचें स्वरूप उपसंहाररूपानें सांगावयाचें आहे. आपल्यास आपल्या परिच्छिन्न इंद्रियांच्या द्वारानें ज्याचें ज्ञान होतें, तें हें विश्व परमार्थदृष्टीनें पाहिलें असतां ब्रह्मरूप आहे असा–आपला निश्चय होईल. त्याचप्रमाणें विश्वाला सत्त्वादिगुणात्मक मायेनें व्यापून टाकल्यामुळें त्यानें आपल्यास भिन्न भिन्न नामरूपांनीं दिसावें, अशी जी योजना तिनें केली आहे, ती क्षणभर एकीकडे ठेविली आणि आत्मस्वरूपानें–आपल्यास करतां आलाच तर–आपल्यास आंत बाहेर दिसणारें विश्व तेंही ब्रह्मरूप आहे आणि म्हणून आपणही ब्रह्मरूप आहों, असा आपला निश्चय होईल. या मंत्रांतील ' ब्रह्मैवेदं ' ' विश्वमिदं वरिष्ठं ' या पदांची जास्त चिकित्सा केली असतां मी म्हणतों तो अर्थ सिद्ध होईल असें मला वाटतें. ' ब्रह्म एव इदं विश्वं ' म्हणजे जे जे म्हणून ज्ञेय पदार्थ आपल्यास इंद्रियमनोबुद्धिद्वारां दिसतात, ते पदार्थ आपल्याला जीं परिच्छिन्न मनोबुद्धीसह ज्ञानेंद्रियें मिळालीं आहेत, ज्या उपाधी प्राप्त झाल्या आहेत, त्यामुळें तें विश्व व विश्वगत पदार्थ आपल्यांस कालस्थलांनीं मर्यादित झालेले, कार्यकारणरूपी आणि नामरूपान्वित आहेत असें दिसतें. कालस्थलाच्या मर्यादा घेऊन मन हें विश्वव्यवस्था लावण्याचा प्रयत्न करतें. कार्यकारणांच्या मर्यादा घेऊन आपली बुद्धि विश्वाची व्यवस्था निश्चित करिते आणि इंद्रियें विश्वांचें जडस्वरूप आपल्यांस दाखवितात. हा सर्व मनोबुद्धीचा आणि इंद्रियांचा व्यापार व झालेला ज्ञानविस्तार वर्ज केला म्हणजे बाकीं सत्तारूपात्मक ब्रह्म मात्र राहील, असें मला वाटतें. त्याच प्रमाणें जड विश्वापेक्षां वरिष्ठ असणारीं जीं आपलीं ज्ञानेंद्रियें त्यांस तमोगुणात्मक विश्व ज्या पद्धतीनें परिणत होत आहे तीच परिणति किंवा परिणाम परिच्छिन्न करीत असते. हा परिछिन्नत्वाचा भास सोडून दिला म्हणजे बाकी ब्रह्मच राहील. जीवानें अहंकाराचा, अंतःकरणचतुष्टयाचा, ज्ञानकर्मेंद्रियांचा, प्राणांचा आणि जड शरीरांचा परित्याग केला. सारांश, सर्व उपाधी टाकून दिल्या म्हणजे जीवाचें जीवत्व (परिच्छिन्नत्व) नाहींसें होऊन तो ब्रह्मरूप राहील आणि जगाच्याही सर्व उपाधी नष्ट झाल्या म्हणजे पुढें, पाठीमागें, दक्षिणेकडे, उत्तरेकडे, खालीं व वर, सर्वत्र कार्यकरण, नामरूप इत्यादि सर्व परिच्छिन्न परिकल्पितें, ( उपाधी ) नाहींशीं होऊन एक ब्रह्म मात्र घनदाट सर्वत्र एकरसानें ओतप्रोत भरलेलें आहे, येथें चराचर जडाजड, परापर, असा कोणताही एक भाग शिलक न राहतां एक ब्रह्म मात्र स्वसत्तेनें अवशिष्ट राहील, असें परोक्षज्ञान अधिकारी श्रवणकर्त्याला होईल आणि या श्रवणाला गुरूच्या साहाय्यानें मननाचे आणि ओंकारस्वरूपीं एकाग्र आणि एकनिष्ठ ध्यानाचे अखंड संस्कार झाले, म्हणजे

विवेकी मुमुक्षूला ब्रह्मसाक्षात्कार होऊन तो आपण ब्रह्मस्वरूप होईल. यापमाणें हा मंत्र 'एकमेवाद्वितीयं' या अन्य श्रुतीची सार्थकता करितो. असो; या प्रकरणांत ब्रह्मस्वरूप कसें जाणावें, हें व त्याला जाणण्याचीं श्रवण, मनन, निदिध्यास हीं तीन साधनें सांगून मुमुक्षूच्या सोईसाठीं पुनः पुनः ब्रह्मस्वरूपाचें वर्णन केलें आहे, तें आस्तिक्य बुद्धीच्या साधकाचा परमार्थ निश्चयपूर्ण करील, असें मला वाटतें ॥ ११ ॥

## द्वितीय मुण्डक समाप्त ।

# तृतीय-मुण्डक.

## खड पहिलें.

### मंत्र पहिला.

**द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते । तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्यो अभिचाकशीति ॥ १ ॥**

**अन्वय व अर्थ**—**द्वा सुपर्णा, सयुजा सखाया, समानं वृक्षं परिषस्वजाते** (दोन सुंदर पंख असणारे, सहचर स्नेही—पक्षी—एकाच वृक्षाचा आश्रय घेऊन राहिले आहेत) **तयोः अन्यः स्वादु पिप्पलं अत्ति, अन्यः अनश्नन् अभिचाकशीति** (त्या दोघांपैकीं एक जण गोड फलें खातो आणि दुसरा पक्षी कांहीं एक न खातां साक्षीस्वरूपानें मात्र असतो) ॥ १ ॥

जीव आणि शिव (जीव आणि परमात्मा) या उभयतांवर हें रूपक केलें आहे. तें उपनिषद्-गत मंत्राचें मनोगत उत्तम रीतीनें सिद्धीस नेतें. एकाच वृक्षाचा आश्रय घेऊन दोन सुंदर पक्षी अत्यंत स्नेहानें एकत्र राहतात हें रूपक आहे. जीव व शिव हे ते दोन पक्षी होत. एकाच वृक्षाचा म्हणजे शरीराचा आश्रय घेऊन जीव व शिव असतात. उभयतांचें ही वास्तव्य जीवांच्या हृदयामध्यें असतें. ते नित्य सहचर आहेत. जेथें जीव असतो तेथें शिव असावयाचा आणि जेथें शिव प्रकट होतो तेथें जीव असावयाचाच, असा त्यांचा संबंध आहे. त्यांचा विरह झालेला केव्हांही दिसत नाहीं. ते एक-

मेकांचे स्नेही आहेत. 'सखायौ' याचा स्नेही असा अर्थ करावा किंवा श्री शंकराचार्य म्हणतात त्याप्रमाणें उभयतांचीही अभिव्यक्ति (प्रकट न, प्रकट होणें) एकाच कारणानें होतेः म्हणून त्यांस एक अर्थाचें नांव आहे, असें म्हणावें. तसाच उभयतांचा जन्मवृत्तांत एकाच तऱ्हेचा असतो. जीव आणि शिव या उभयतांचा जन्म म्हणजे त्यांचें आविर्भूत होणें एकाच कारणानें म्हणजे अविद्येच्या योगानें होतें. ब्रह्म आविर्भूत व्हावयाचें म्हणजे तें जीव आणि शिव या ज्ञातृत्वरूपानें होतें. याप्रमाणें ज्ञानरूपी पक्ष (पंख) असणारे दोन सहचर पक्ष्यांचा जन्मवृत्तांत आहे. श्रीमध्वाचार्य म्हणतातः– त्याप्रमाणें शिव हा नित्य जीवावर उपकार करणारा असतो आणि जीव विवेकी असेल तर शिवाची आराधना करणारा असतो. कोणताही अर्थ घेतला तरी तात्पर्य हें आहे कीं, उभयतांमध्यें उत्तम प्रेम असण्याचा संभव आहे.

यांपैकीं एकजण गोड फलाचा आस्वाद घेतो. जें जें काय कर्म त्यानें केलें असेल, त्याचें फल भोगावें असा त्याचा स्वभाव असतो. 'स्वादु' म्हणजे गोड होय. कर्मफल प्राप्त व्हावें या साठीं जीव कर्म करितो आणि कर्म सिद्ध झालें म्हणजे आपल्यास कर्मजन्य सुखद फलें उपभोगावयास सांपडतील, अशी त्याची कल्पना असते. हीं कर्मफलें गोड असतातच असा नियम नाहीं. तथापि कर्मविपाकाच्या दुर्धर नियमांनीं जीवाला आपल्या कर्मांचें फल भोगावें लागतें. म्हणून 'स्वादु अत्ति' या पदांचा 'आस्वाद घेतो' इतकाच अर्थ करावा असें मला वाटतें. असो दुसरा शिवनामक पक्षी कर्मफलाचा उपभोग घेत नाहीं. तो साक्षीरूपानें आपल्या शांत स्वरूपामध्यें विद्यमान असतो. हें स्पष्ट समजण्यासारखें आहे. 'साक्षी चेता केवलो निर्गुणश्च' अशी श्रुति किंवा 'न मां कर्माणि लिंपंति' अशी स्मृति शिवाच्या किंवा परमात्माच्या साक्षित्वाला प्रमाण आहे.

याप्रमाणें एककालीं जन्मास आलेलें हें द्वय नित्य एकत्र सहवास करणारें व पुण्य ज्ञान–विज्ञानानें अलंकृत झालेलें असतें, हा या मंत्राच्या पहिल्या अर्धाचा अर्थ आहे. दुसरा अर्ध असें सांगतो कीं, जीव कर्मफलाचा उपभोग घेणारा आणि शिव साक्षीस्वरूपानें राहणारा आहे म्हणून या उभयतांमध्यें भेद आहे. असा या उभयतांच्या रूपाचा आणि कर्माचा इतिहास आहे ॥ १ ॥

---

## मंत्र दुसरा.

**समाने वृक्षे पुरुषो निमग्नोऽनीशया शोचति मुह्यमानः । जुष्टं यदा पश्यत्यन्यमीशमस्य महिमानमिति वीतशोकः ॥ २ ॥**

अन्वय व अर्थ--समाने वृक्षे ( एकाच वृक्षावर-शरीराचा आश्रय घेऊन-हृदयांत राहून- ) निमग्नः पुरुषः अनीशया मुह्यमानः शोचति ( सकाम कर्म करण्यामध्ये निमग्न झालेला जीव आपण कर्मफलाच्या संबंधें अत्यंत परतंत्र आहों, असें पाहून वेड्यासारखा शोक करीत बसतो ) यदा अन्यं जुष्टं ईशं पश्यति अस्य महिमानं इति वीतशोकः ( पण जेव्हां दुसरा प्रसन्न झालेला ईश म्हणजे स्वामी जो शिव त्याचें दर्शन होतें, तेव्हां त्याचा महिमा फारं मोठा आहे असें पाहतो व तो गतशोक होतो. ॥ २ ॥

या मंत्रांत कर्मफलाचा उपभोग घेणाऱ्या जीवाचें पारतंत्र्य त्यांस समजूं लागतें आणि आपल्या हातांत कर्मफलाच्या संबंधानें कोणतीही सत्ता नाहीं, असें पाहून अज्ञानी जीव शोकाकुल होतो. अर्थात् ज्या अनादिवासनेनें परिच्छिन्न झालेल्या जीवास कर्म करण्याची प्रेरणा केली ती अज्ञानजन्य वासना किंवा अविद्या, किंवा अविद्येचा स्वामी परमेश्वर कर्मफलाचें नियंत्रण करीत असतो, हें त्याला समजतें. उघड आहे कीं जीव परिच्छिन्न आहे, म्हणून तो कर्मफलाच्या कामांत सर्वथा परतंत्र आहे. असो, कर्म केलें असतांही कर्मफल आपल्याला हवें तसें मिळत नाहीं किंवा इच्छेच्या विपरीत फल मिळतें, असें पाहून आपल्या पारतंत्र्याची ओळख त्यास पटते आणि त्यामुळें तो शोक करावयास लागतो. ही संसारी जीवाची स्थिति आहे. पुढें त्याला विवेक प्राप्त झाल्यावर शरीरस्थ व शरीरस्वामी दुसरा पक्षी जो ईश तो आपल्याहून-अज्ञानत्वाहून-अति विलक्षण आहे, सदैव शांत आहे. असें जेव्हां-पाहतो, हा त्याचा किंबहुना, आपला महिमा जेव्हा विवेकी जीवास कळतो, तेव्हां कर्मफलाविषयीं, संसाराविषयीं, आपण उदासीन झालों तर आपलें हें अपरिच्छिन्न शिवस्वरूप आपल्यास दिसेल आणि प्राप्त होईल असें ज्ञान त्यास होतें आणि श्रवणादिकांनीं ज्ञानविज्ञान झालें म्हणजे शोकमोह नाहींसा होतो, असेंही त्याला समजतें व तो शोकशून्य होतो ॥ २ ॥

## मंत्र तिसरा.

**यदा पश्यः पश्यते रुक्मवर्णं कर्तारमीशं पुरुषं ब्रह्मयोनिम् । तदा विद्वान्पुण्यपापे विधूय निरञ्जनः परमं साम्यमुपैति ॥ ३ ॥**

अन्वय व अर्थ—यदा पश्यः रुक्मवर्णं, कर्तारं, ईशं, ब्रह्मयोनिं पुरुषं पश्यते (ज्यावेळीं विवेकी पुरुषाला सुंदरस्वरूपी, सर्वकर्त्या, सर्वस्वामी

आणि सर्वांची उत्पत्ति करणाऱ्या पुरुषाचें ज्ञान होतें) **तदा पुण्यपापे विधय विद्वान् निरञ्जनः परमं साम्यं उपैति** (त्यावेळीं आपलें सर्व पुण्यपाप आणि पुण्यपापाची वासना झाडून टाकून विद्वान् साधक निर्मळ होतो आणि शिवस्वरूपाशीं अतिश्रेष्ठ प्रकारची समता, तादात्म्य, प्राप्त करून घेतो) ॥ ३ ॥

मागच्या मंत्रामध्यें सांगितल्याप्रमाणें परमेश्वराचा महिमा अवगत होऊन दृढज्ञानानें आणि भक्तिपूर्वक आराधनेनें जेव्हां स्वयंप्रकाश, स्वतंत्र, जगत्स्वामी, जगत्कर्त्या पुरुषोत्तमाचें स्वरूप अधिगत होतें, सारांश, जेव्हां ज्ञानपूर्वक दृढभक्तीच्या योगानें आणि श्रवण, मनन, निदिध्यासानें आपल्या नित्य संनिध असणाऱ्या आत्मस्वरूपाचें ज्ञान होतें, तेव्हां पुण्यपापात्मक फल भोगण्याची किंवा धर्माधर्मात्मक कर्में करण्याची प्रवृत्ति नाहींशी होऊन हा विद्वान् साधक निरंजन होतो म्हणजे याचे सर्व चित्तदोष नाहींसे होऊन याला पूर्ण विज्ञान प्राप्त होतें. तात्पर्य तो ब्रह्मस्वरूप होतो.

याप्रमाणें दुसऱ्या मंत्रांत संसाराचा तिरस्कार प्राप्त होऊन जीव आत्मज्ञानाच्या प्राप्तीचा उद्योग करूं लागतो आणि तिसऱ्या मंत्रांत आपल्या निष्काम ज्ञानध्यानभक्तीच्या जोरावर निर्मलत्व प्राप्त करून घेऊन ज्ञानी होतो आणि पुढें ज्ञानरूप होतो, हें सांगितलें आहे. ईशस्वरूपाच्या ज्ञानाचा व सत्तेचा महिमा कळल्या नंतर तो साधक शोकमुक्त होत्साता ज्ञानमार्ग स्वीकृत करितो आणि शेवटीं ईशस्वरूप होतो. ईशस्वरूप लाभानंतर ब्रह्मस्वरूप प्राप्त करून घेण्यास काय उशीर आहे ? ॥ ३ ॥

---

## मंत्र चवथा.

**प्राणो ह्येष यः सर्वभूतैर्विभाति विजानन्विद्वान्भवते नातिवादी । आत्मक्रीड आत्मरतिः क्रियावानेष ब्रह्मविदां वरिष्ठः ॥ ४ ॥**

**अन्वय व अर्थ**—हि यः एषः प्राणः सर्वभूतैः विभाति (कारण हा जो प्राण—परमेश्वर—सर्वभूतांमध्यें प्रकाशमान होतो) **विजानन् विद्वान् अतिवादी न भवते** (हें जाणणारा ज्ञानी व साक्षात्कारी साधक वादविवादामध्यें कधींहि पडत नाहीं) **एषः आत्मक्रीडः, आत्मरतिः, क्रियावान् ब्रह्मविदां वरिष्ठः** (हा आत्मस्वरूपांत क्रीडा करणारा व आत्मस्वरूपीं प्रेम ठेवणारा विद्वान् मुमुक्षुला मात्र योग्य तीं कर्में करण्यास सिद्ध होऊन सर्व ब्रह्मवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ होतो) ॥ ४ ॥

हा जो प्राणाचा प्राण आहे, हा जो परमेश्वर आहे तो यच्च यावत् भूतांमध्यें राहून, त्यांस सत्ता देऊन, तेथें व त्यांसह प्रकाशित होतो; सारांश, सर्वत्र परमेश्वर भरला आहे, माझ्यामध्येंही तो आहे, किंबहुना मीं परमेश्वर आहें आणि मी हीं विश्वंभर आहें, असें पूर्णज्ञान ज्याला झालें, असा साक्षात्कार ज्याला झाला, तो धन्य पुरुष अतिवाद करीत नाहीं. त्याला वादविवाद करण्याचें कारण नसतें. लोक अतिवाद करतात तो आपल्या पक्षाची सत्यता स्थापित करण्याकरितां करीत असतात. वादानें सत्याचा शोध लागतो खरें, पण अतिवाद हा सामान्यतः आपल्या विरुद्ध पक्षावर जय मिळविण्यासाठीं होत असतो. पण आमच्या या साक्षात्कारी साधकाला वाद किंवा अतिवाद करण्याचें कारणच पडत नाहीं. सर्व ब्रह्म विश्व झालें, असा त्याचा अभंग निश्चय झाला असतां तो वाद करील कोणाशीं आणि करील कशा करितां ? तो नित्य आत्मस्वरूपामध्यें रममाण होऊन त्याच्याशींच ज्ञानध्यानादि क्रीडा करण्यामध्यें दंग होऊन गेलेला असतो. सर्वच विश्व ब्रह्म आहे अशी ज्याची दृष्टि झाली, सर्व ज्ञान हें ब्रह्म, सर्व वाणी ही ब्रह्म, सर्व विद्या ही ब्रह्म, सर्व ब्रह्म आहे, असें ज्याला कळूं लागलें त्याला कोठेंही सत्पक्ष किंवा खोटा पक्ष दिसत नाहीं. मग अशा पुरुषाला वादविवाद करण्याचें कारण काय ? 'ब्रह्ममय स्थिति झाली, आतां काय उणें । अहंकार दग्ध झाला, स्वातंत्र्याचें लेणें ॥' अशी त्याची स्थिति होते. याप्रमाणें आत्मस्वरूपाशीं एकतानता प्राप्त होऊन ब्रह्मस्वरूप झालेला पुरुष मौनव्रत स्वीकारून सर्व ब्रह्मवेत्यांमध्यें श्रेष्ठ होतो, हें सांगण्याची अपेक्षा राहत नाहीं. हा जीवन्मुक्ताच्या स्थितीचा विचार येथें झाला आणि याप्रमाणें अज्ञान, ज्ञान, साक्षात्कार, विज्ञान आणि जीवन्मुक्त-स्थिति यांचें पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या मंत्रांत वर्णन झालें. यानंतर श्रवणादिकांहून अन्य साधनें ज्ञानाच्या उपयोगीं पडतात. त्यांचें दिग्दर्शन पुढील दोन मंत्रांत करावयाचें आहे. ॥ ४ ॥

---

## मंत्र पांचवा.

**सत्येन लभ्यस्तपसा ह्येष आत्मा सम्यग्ज्ञानेन ब्रह्मचर्येण नित्यम् । अन्तःशरीरे ज्योतिर्मयो हि शुभ्रो यं पश्यन्ति यतयः क्षीणदोषाः ॥ ५ ॥**

**अन्वय व अर्थ—एषः आत्मा सत्येन, तपसा, सम्यग्ज्ञानेन, ब्रह्मचर्येण लभ्यः** ( हा शुद्ध आत्मा नित्य सत्यानें, नित्य तपानें, नित्य यथार्थ ज्ञानानें, आणि नित्य ब्रह्मचर्यानें प्राप्त व्हावयाचा असता. ) **यं क्षीणदोषाः यतयः पश्यन्ति अंतःशरीरे ज्योतिर्मयः शुभ्रः हि**

( ज्याला दोषक्षय झालेले संन्याशी साक्षात्कृत करतात, तो अन्तः शरीरांत–अंतःकरणांत–हृदयांत–कारणशरीरांत-स्वयंप्रकाश आणि सर्वथा निर्मळ असा असतो–म्हणून त्याची प्राप्ति सत्यादि साधनांनीं व्हावयाची असते ) ॥ ५ ॥

येथें सत्यादि जीं साधनें सांगितलीं आहेत, तीं विषयनिवृत्तिपर आहेत, विषयभोगांचा त्याग करण्यास प्रवृत्त करणारीं आहेत, निवृत्तिपर आहेत, किंवा निवृत्तिमूलक आणि निवृत्तिपरिणामी आहेत, हें समजून घ्यावयाचें आहे. ज्याला आत्मप्राप्ति करून घ्यावयाची आहे, त्यानें सत्य बोलण्याचा आणि सत्य शोधण्याचा अभ्यास नित्य केला पाहिजे. आपण संसारामध्यें सामान्यतः असत्य भाषण करितों, तें विषयाच्या प्राप्तीस्तव होय. असत्यभाषणानें कदाचित् विषयभोग मिळण्याचा संभव आहे, निदान असत्यभाषणानें संसाराचें वैभव वाढतें, असें केव्हां केव्हां दिसतें, तेव्हां असत्य भाषण हेंच श्रेयस्कर आहे, असें अज्ञानी जीवास वाटतें. पण सर्वसाक्षी आणि सर्वनियंत्या आत्म्याची प्राप्ति असत्यभाषणानें किंवा अनृताचरणानें केव्हांही व्हावयाची नाहीं. या कामीं आपण असत्य बोललों तर आपण स्वतः आपल्या आत्म्याची वंचना केल्यासारखी होईल. आणि आत्मप्राप्ति व्हावयाची नाहीं. याचप्रमाणें तपश्चर्येचीही गोष्ट आहे. विषयांची तपश्चर्या विषयप्राप्ति करून देईल, आत्मप्राप्ति करून देणार नाहीं. आत्मप्राप्तीसाठीं आत्मतपश्चर्या मात्र केली पाहिजे. म्हणजे विषयभोगाचा त्याग करून आत्मज्ञानध्यानाचा नित्य अभ्यास केला पाहिजे. ज्ञानाचीही हीच हकीकत आहे. विषयज्ञानानें विषय मिळतील, विषयात्मक विश्वाचें ज्ञानही होईल; पण तें ज्ञान केव्हांही यथार्थ असावयाचें नाहीं. कारण विषयाचें ज्ञान इन्द्रियांचे द्वारां होत असतें व असलें ज्ञान केव्हांही परमार्थतः सत्य असत नाहीं. यासाठीं इंद्रियांनीं मिळविलेल्या विषयभोगात्मक ज्ञानाचा त्याग करून नित्य आत्मज्ञानाचा मात्र अभ्यास केला पाहिजे. याप्रमाणें विषयभोगज्ञानाचा त्याग विहित होतो. ब्रह्मचर्याचीही अशीच कथा आहे. ब्रह्मचर्य याचा रूढ अर्थ घ्या किंवा 'वेदाध्ययन, आत्मभक्ति' हे यौगिक अर्थ घ्या, तात्पर्य एकच आहे आणि तें विषयोपभोगाची निवृत्ति सांगत आहे. असो, हा विषयोपभोगत्याग ज्यांनीं केला, ज्यांनीं विषयज्ञानास पाठीमागें टाकणाऱ्या व विश्वज्ञानाचा अंतर्भाव करणाऱ्या आत्मज्ञानाचा अभ्यास नित्य केला, ते सर्वतोपरि शुद्ध झालेले आत्मसंयमी यति ज्या पुरुषोत्तमाचें दर्शन साक्षात् घेतात, तो परमेश्वर जीवांच्या स्थूल शरीराच्या व सूक्ष्म शरीराच्या पलीकडे असणाऱ्या व या उभयतांचेंही नियमन करणाऱ्या कारणशरीरांत स्वयंप्रकाशत्वानें राहून आपल्या निर्मलत्वानें त्या कारणशरीराचेंही नियमन करितो. सारांश, तो ज्ञानरूप आणि शुद्ध आत्मरूप आहे; तेव्हां त्याचें दर्शन हवें असेल, तर आपण विषयनिवृत्ति करणाऱ्या सत्यादि पूर्वोक्त साधनांचा अवलंब केला पाहिजे. सारांश, विषयोपभोग

हाच पुरुषार्थ आहे, असें समजून विषयप्राप्तिसाठीं आपण जीं कर्में करितों, त्यांचा सर्वथैव त्याग करून आपण सत्याचरण, आत्मतपश्चर्या, आत्मज्ञान आणि संन्यास या साधनांचा अवलंब केला पाहिजे, हें श्रुतीस सांगावयाचें आहे. हा अवलंब नित्य हवा, अभंग हवा; एखादे वेळीं मात्र सत्य भाषण केलें, किंवा तपश्चर्या केली, तर आत्मलाभ व्हावयाचा नाहीं. हें स्पष्ट समजावून देण्यासाठीं मंत्रांत 'नित्य' या पदाची योजना केली आहे. हीं साधनें संसाराला उपयोगी पडतात, हें सांगावयास नकोच ॥ ५ ॥

---

## मंत्र सहावा.

**सत्यमेव जयति नानृतं सत्येन पन्था विततो देवयानः। येनाऽऽक्रमन्त्यृषयो ह्याप्तकामा यत्र तत्सत्यस्य परमं निधानम् ॥ ६ ॥**

**अन्वय व अर्थ—सत्यं एव जयति, अनृतं न** ( सत्याचा मात्र जय होतो; असत्याचा केव्हांही होत नाहीं ) **देवयानः पंथाः सत्येन विततः** ( देवयान नामक जो मार्ग आहे, तो सत्यानें सिद्ध झालेला आहे ) **आप्तकामाः ऋषयः येन यत्र आक्रमन्ति तत् सत्यस्य परमं निधानं** ( पूर्णकाम ऋषी ज्या मार्गानें देवयानास जातात तो मार्ग सत्यानें परिपूर्ण झाला आहे. या देवयानांत सत्याचें अतिश्रेष्ठ निधान—अति उंच प्रतीचा ठेवा म्हणजे परब्रह्म—राहत असतें ) ॥ ६ ॥

मागील मंत्रांत सांगितलेल्या सत्याची स्तुति करणारा हा मंत्र आहे. ही स्तुति यथार्थ आहे. कारण ज्या देवयानमार्गांत जीवाला आत्मप्राप्ति व्हावयाची आहे, तो मार्ग सत्यस्वरूपानें मात्र सिद्ध झाला आहे. सत्यान्वेषण आणि सत्यभाषण यांनीं देवयानाचा पंथ सिद्ध झाला आहे. या पंथांत सत्याव्यतिरिक्त दुसरें कांहीं नाहीं. चांगल्या मुरुमाची खडी घालून ज्याप्रमाणें आपण एखादा रस्ता तयार करितों, त्याप्रमाणें सत्याच्यानें मात्र देवयानपंथ सिद्ध झाला आहे. याच मार्गानें आप्तकाम ऋषि जातात; कारण येथें नित्य वास्तव्य करणारें सत्यनिधान जें परब्रह्म तें नित्य वास्तव्य करितें. म्हणून निष्कामपुरुषांनीं, विवेकीपुरुषांनीं, ज्या मार्गाचा अवलंब केला असतां आणि ज्या मार्गानें गेलें असतां सत्याचा निधि जो परमात्मा तो प्राप्त होतो. तो मार्ग सत्यान्वेषण आणि सत्यभाषण यांनीं मात्र सिद्ध होतो. म्हणून सत्यानें जय मिळतो किंवा सत्याचा जय होतो, असत्याचा जय होत नाहीं, असत्यानें पुरुषार्थ साधत नाहीं, असें श्रुतीनें सांगितलें आहे आणि हीच सत्याची स्तुति होय ॥ ६ ॥

---

## मंत्र सातवा.

**बृहच्च तद्दिव्यमचिन्त्यरूपं सूक्ष्माच्च तत्सूक्ष्मतरं विभाति । दूरात्सुदूरे तदिहान्तिके च पश्यत्स्विहैव निहितं गुहायाम् ॥ ७ ॥**

**अन्वय व अर्थ**—**तत् बृहत्, दिव्यं अचिंत्यरूपं** ( तें ब्रह्म किंवा आत्मस्वरूप सर्वांहून मोठें आहे, दिव्य आहे, स्वयंप्रकाश आहे आणि इंद्रियांस व मनोबुद्धींस अगोचर आहे ) **तत् सूक्ष्मात् सूक्ष्मतरं च विभाति** ( ते इंद्रियांस अगोचर ब्रह्मरूप अति सूक्ष्म वस्तूंहूनही अत्यंत सूक्ष्म असें प्रकाशमान होत असतें ) **तत् दूरात् सुदुरे इह अन्तिके च** ( तें अत्यंत दूर वस्तूंहून ही अतिशय दूर आहे आणि अत्यंत निकट वस्तूंहून अत्यंत निकट म्हणजे जीवांच्या अतिसंनिध, त्यांच्या अंतर्यामी असते ) **पश्यत्सु इह एव गुहायां निहितं** ( ज्यांना ज्यांना म्हणून चित्कला प्राप्त झाली आहे, त्यांच्या हृदयांतील गुहेंत—हृदयांत असणाऱ्या आकाशांत—दहराकाशांत—तें गूढरीतीनें वास्तव्य करीत असतें ) ॥ ७ ॥

येथें पुनः ब्रह्मस्वरूपाचें वर्णन करून ज्ञानीपुरुषांस व अज्ञानीपुरुषांस तें कोणत्या धर्मांनीं प्रकट होतें तें सांगितलें आहे. तें सर्वांत मोठ्या असणाऱ्या आकाशाहूनही अत्यंत मोठें असतें. तें दिव्य म्हणजे स्वयंप्रकाश असून सूर्य-चंद्रादि तेजोगोलांस प्रकाशित करतें; पण त्याचा प्रकाश इतका अलौकिक आहे कीं, सर्व विषयांचें ग्रहण करणारीं जीं बुद्धीत्यादि इंद्रियें त्यांनाही ग्रहण करितां येत नाहीं. तें जसें मोठ्याहून मोठें आहे तसेंच लहानाहूनही लहान आहे. तें अज्ञानीलोकांस अत्यंतात्यंत दूर असून ज्ञानीलोकांस अत्यंतात्यंत सन्निध आहे. अज्ञानीलोकांस जें मुळींच नाहीं असें भासतें, तेंच ज्ञानीलोकांचें आत्मस्वरूप होऊन बसतें. तें सर्व जीवमात्राच्या हृदयाकाशांत गूढ स्थितीनें राहिलें आहे, म्हणून तें अज्ञानीलोकांस दिसत नाहीं आणि ज्ञानीलोकांस स्वानुभवानें कळतें. बाह्यदृष्टीच्या लोकांस जें अचिंत्यरूप तेंच ज्ञानी लोकांचें स्वानुभवस्वरूप असतें. तें अज्ञानीलोकांना अत्यंत मोठ्या आकाशाहूनही मोठें असल्यामुळें व आकाशाचा अत्यंत सूक्ष्म असा जो अंश त्याच्याही पेक्षां सूक्ष्म असल्यामुळें दिसत नाहीं. परंतु ज्ञानीपुरुष स्वतःच ब्रह्मस्वरूप झाल्यामुळें तें त्याला नित्य अनुभवास येतें. तात्पर्य ज्ञानीलोक स्वतः ब्रह्म असतात, म्हणून त्यांना सहज लीलेनें साध्य असणारी ब्रह्मवस्तु अज्ञानीलोकांस अत्यंत कष्ट करूनही प्राप्त होत नाहीं ॥ ७ ॥

**न चक्षुषा गृह्यते नापि वाचा नान्यैर्देवैस्तपसा कर्मणा वा । ज्ञानप्रसादेन विशुद्धसत्त्वस्त तस्तु तं पश्यते निष्कलं ध्यायमानः ॥ ८ ॥**

अन्वय व अर्थ--चक्षुषा न गृह्यते, वाचा अपि न, अन्यैः देवैः तपसा वा कर्मणा न ( हें ब्रह्मतत्त्व चक्षूला दिसत नाहीं, वाणीला सांगतां येत नाहीं, इतर देवांना म्हणजे इंद्रियांना हें भासत नाहीं, तपश्चर्येनें किंवा कर्मानें साध्य होत नाहीं ) तु विशुद्धसत्वः ज्ञानप्रसादेन ( पण ज्याचें सत्त्व म्हणजे अंतःकरण अतिनिर्मळ झालें आहे, त्याच्यावर ज्ञानाचा प्रसाद होऊन त्याला तें साक्षात्कृत होतें. ) ततः ( म्हणून ) निष्कलं तं ध्यायमानः पश्यते ( त्या निर्गुण आणि निरवयव ब्रह्मस्वरूपाचें नित्य ध्यान करणाऱ्या पुरुषास तें स्पष्ट दिसूं लागतें किंवा शुद्धचित्तीपुरुषानें ब्रह्मविद्येचें श्रवण करून परोक्षज्ञानाचा प्रसाद करून घेतल्यानंतर निर्विकल्प समाधीमध्यें असणाऱ्या त्या पुरुषाला ब्रह्मस्वरूपाचा साक्षात्कार होतो. ) ॥ ८ ॥

मागच्या मंत्रांत ब्रह्मस्वरूप अचिंत्यरूप आहे म्हणून सांगितलें म्हणून तें नेत्रादि ज्ञानेंद्रियांस किंवा वाणी-आदि कर्मेंद्रियांस गोचर होत नाहीं. बाह्यज्ञान देणाऱ्या इंद्रियांच्या साहाय्यानें केलेली उग्र तपश्चर्या ब्रह्मस्वरूपापर्यंत पोंचत नाहीं किंवा कर्मेंद्रियांच्या साहाय्यानें केलेलें कर्म त्याला उत्पन्न करूं शकत नाहीं. सारांश, ब्रह्मस्वरूप साध्य होण्याला एकच उपाय आहे. तो उपाय म्हणजे निर्मल अंतःकरणाच्या सात्त्विक संन्याशानें गुरुप्रसादपूर्वक मिळविलेल्या ज्ञानासह एकरस ब्रह्माचें अखंड ध्यान हा होय. सारांश वृत्तीचा अखंड प्रवाह जेव्हां ब्रह्मरूप होईल, तेव्हांच ब्रह्मस्वरूपाची प्राप्ति होते. ८

---

## मंत्र नववा.

**एषोऽणुरात्मा चेतसा वेदितव्यो यस्मिन्प्राणः पञ्चधा संविवेश । प्राणैश्चित्तं सर्वमोतं प्रजानां यस्मिन्विशुद्धे विभवत्येष आत्मा ॥ ९ ॥**

**अन्वय व अर्थ—यस्मिन् प्राणः पञ्चधा संविवेश, चेतसा एषः अणुः आत्मा वेदितव्यः** ( ज्याच्यामध्यें प्राण पांच स्वरूपाचा होऊन प्रविष्ट झाला आहे, त्या शरीराच्या हृदयांत असणाऱ्या शुद्ध अंतःकरणानें मात्र हा सूक्ष्म आत्मा समजून घेतला पाहिजे. ) **प्रजानां सर्वं चित्तं प्राणैः ओतं** ( सर्व प्राण्यांचें संपूर्ण अंतःकरण संपूर्ण इंद्रियांसह प्राणांनीं अभिव्याप्त झालें आहे. ) **विशुद्धे यस्मिन् एषः आत्मा विभवति** ( या शुद्ध अंतःकरणांत हा आत्मा प्रकाशतो म्हणजे आपलें स्वरूप प्रकट करितो. ) ॥ ९ ॥

तात्पर्य, आपल्या अंतःकरणानें हा आत्मा शोधून काढावयाचा आहे. आपलें अंतःकरण हें पंचप्राण आणि सर्व इंद्रियें यांनीं व्याप्त झालेलें असतें. म्हणजे सर्व प्राण आणि सर्व इंद्रियें यांचें नियमन आपलें चित्त करीत असतें. हें चित्त जेव्हां शुद्ध होईल, म्हणजे आपल्या प्राणांचे व इंद्रियांचे व्यापार विषय-निर्माण करण्यांत आणि विषय-चिंतन करण्यांत दंग झालेले असतात, त्या वृत्ति जाऊन जेव्हां इंद्रियें सर्व अंतर्मुख झाल्यामुळें चित्त स्वच्छ होईल, तेव्हां या स्वच्छ झालेल्या अंतःकरणामध्यें आत्म-स्वरूपाचा प्रकाश स्पष्ट होईल, सारांश, आत्म-प्राप्ति होईल, एवंच आत्म-प्राप्ति होण्याला ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें, मन व बुद्धि, या सर्वांनीं आपले भोग्य विषय सोडून देऊन तीं निर्विषय झालीं, तीं स्तब्ध झालीं, शांत झालीं, निमालीं म्हणजे चित्ताला शुद्ध चैतन्यस्वरूप प्राप्त होतें आणि हें शुद्ध चैतन्य आत्म-स्वरूप पाहण्यास योग्य होतें ॥ ९ ॥

---

## मंत्र दाहावा.

**यं यं लोकं मनसा संविभाति विशुद्धसत्त्वः कामयते यांश्च कामान् । तं तं लोकं जयते तांश्च कामांस्तस्मादात्मज्ञं ह्यर्चयेद्भूतिकामः ॥ १० ॥**

**इत्यथर्ववेदीयमुण्डकोपनिषदि तृतीयमुण्डके प्रथमः खण्डः**

**अन्वय व अर्थ—विशुद्धसत्त्वः यं यं लोकं मनसा संविभाति यान् च कामान् कामयते** ( शुद्ध झालेला जीवन्मुक्त ज्या ज्या भुवनामध्यें जाण्याचा संकल्प करितो, किंवा ज्या ज्या वासना त्याच्या अंतःकरणांत

उत्पन्न होतात ) **तं तं लोकं तान् च कामान् जयते** ( तीं तीं भुवनें आणि त्या त्या त्याच्या वासना पूर्ण होतात ) **तस्मात् भूतिकामः आत्मज्ञं हि अर्चयेत्** ( म्हणून आत्मकल्याण करणाऱ्या पुरुषानें आत्मज्ञानी साधूची मात्र आराधना करावी ) ॥ १० ॥

या मंत्रांत फलश्रुति सांगितली आहे. जीवन्मुक्त पुरुषाला जेथें जावेंसें वाटतें तेथें त्यास अति लीलेनें जातां येतें, किंवा त्याला ज्या वासना उत्पन्न होतात, त्या सर्वच्या सर्व परिपूर्ण होतात. पण हें ध्यानांत ठेवावयाचें कीं, जीवन्मुक्ताचे सर्व संकल्प आणि सर्व वासना सात्त्विक स्वरूपाच्या मात्र असतात. शिवाय, तो ब्रह्मरूप झाला असल्यामुळें तो सर्व विश्व नटलेला नटनाटकी विद्वान् सर्व ठिकाणीं राहूं लागतो व सर्व वासनाहीं तोच होतो. असो, ज्याला आपलें कल्याण करून घ्यावयाचें आहे, त्यानें ह्या परमेश्वरतुल्य पुरुषाची सेवा करावी, हें योग्य आहे. तात्पर्य, जीवन्मुक्ताला सर्वकर्तृत्व आणि सर्ववंद्यत्व प्राप्त होतें. त्याच्या स्वाधीन सर्व विश्व होतें आणि सर्व कल्याणेच्छु त्याचे दास होतात अथवा सर्व चराचर विश्व त्याच्या भजनीं लागतें. हें आत्मज्ञानाचें मात्र फल होय ॥ १० ॥

**तृतीय मुण्डक प्रथम खण्ड समाप्त.**

---

# तृतीय—मुण्डक ।

## खंड दुसरें.

### मंत्र पहिला.

**स वेदैतत्परमं ब्रह्म धाम यत्र विश्वं निहितं भाति शुभ्रम् । उपासते पुरुषं ये ह्यकामास्ते शुक्रमेतदतिवर्तन्ति धीराः ॥ १ ॥**

अन्वय व अर्थ—**यत्र निहितं विश्वं शुभ्रं भाति, सः एतत् परमं ब्रह्म धाम वेद** ( येथें सामाऊन गेलेलें सर्व विश्व ब्रह्मतेजानें प्रकाशूं लागतें, तें ब्रह्म धाम ज्या ब्रह्मज्ञ पुरुषाला ठाऊक असतें ) **ये अकामाः पुरुषं उपासते** ( अशा ब्रह्मज्ञ पुरुषाची जे निष्काम साधक सेवा करि-

तात ) ते धीराः एतत् शुक्रं अतिवर्तंति ( ते विवेकी पुरुष या शुक्राचें म्हणजे तेजाचें अथवा जन्माचें आतिक्रमण करितात ) ॥ १ ॥

या मंत्राचा अर्थ स्पष्ट आहे. ब्रह्मामध्यें विश्व राहत असल्याकारणानें ज्ञानी पुरुषाला हें विश्व ब्रह्मतेजानें प्रकाशत आहे, असें दिसूं लागतें. हा साक्षात्कार ज्याला होऊं लागतो, त्यालाच सर्वश्रेष्ठ ब्रह्म समजलें आहे, असें समजावें. अशा ब्रह्मज्ञ पुरुषाची निष्कामबुद्धीनें जे उपासना करितात; तेही इतर सर्व तेजांपेक्षां अत्यंत श्रेष्ठ असणाऱ्या ब्रह्मतेजानें अलंकृत होतात, असा अर्थ घ्यावा किंवा हे ब्रह्मज्ञोपासक-पुरुष शुक्र म्हणजे नृबीज त्याचें, जन्ममरणाचें अतिक्रमण करितात, जन्ममरणाचा त्रास त्यांना होत नाहीं, असा अर्थ घ्यावा; तात्पर्य एकच आहे. ' ब्रह्मधाम ' ब्रह्म हेंच धाम=ब्रह्म हेंच आहे सर्व वासनांचें आश्रयपद, असें ब्रह्म. सारांश, सर्व वासनांचा आश्रय असणारें जें ब्रह्म तें ब्रह्मज्ञ पुरुषाला उत्तम प्रकारें ठाऊक असतें, म्हणून साधकानें त्याची आराधना करावी. मंत्रांतील ' ब्रह्म ' आणि ' धाम ' हीं पदें समस्त न करितां निरनिराळीं घेतलीं तरी अर्थ तात्पर्य एकच निष्पन्न होत आहे. ' पुरुष ' या पदाचा ' ब्रह्मज्ञ पुरुष ' असा अर्थ न करितां ' ब्रह्म ' असा अर्थ केला तरी तात्पर्य एकच आहे ॥१॥

---

## मंत्र दुसरा.

**कामान्यः कामयते मन्यमानः स कामभिर्जायते तत्रतत्र । पर्याप्तकामस्य कृतात्मनस्त्विहैव सर्वे प्रविलीयन्ति कामाः ॥ २ ॥**

**अन्वय व अर्थ—यः मन्यमानः कामान् कामयते** (जो विषयगुण मात्र चिंतन करणारा पुरुष विषयांची प्रार्थना करीत असतो ) **सः तत्रतत्र कामभिः जायते** ( तो पुरुष चिंतिलेले इष्ट विषय जेथें असतील तेथें जन्म पावतो ) **कृतात्मनः पर्याप्तकामस्य तु इह एव सर्वे कामाः प्रविलीयन्ति** ( परंतु ज्यानें आत्मस्वरूप आपलेसें केलें आहे, ज्याला ब्रह्मस्वरूपाचें उत्तम ज्ञानविज्ञान झालें आहे, त्या पुरुषाच्या सर्व विषयेच्छा ब्रह्मप्राप्तीनेंच परिपूर्ण झाल्या असल्यामुळें त्याचे सर्व वासनामय मनोविकार ह्या लोकींच लय पावतात. सारांश, त्याचे सर्व काम ( इच्छा ) नष्ट झाल्यामुळें त्याला पुनर्जन्म घ्यावा लागत नाहीं ) ॥ २ ॥

ज्या विषयाचें अखंड चिंतन जीव करीत असतो, तो विषय या जन्मीं प्राप्त झाला नाहीं, तर जीवाला त्या त्या वासनातृप्तीसाठीं दुसरा जन्म घ्यावा लागतो आणि जितक्या जितक्या वासना अतृप्त राहिल्या असतील तितका वेळ त्याला जन्म घ्यावा लागतो, असें श्रुतीचें म्हणणें आहे. मी परिच्छिन्न आहें म्हणजे देहादि आहें, असें ज्याच्या सत्तेनें वाटतें तो अहंकार व या अहंकारामुळें 'मला हें हवें, तें हवें' अशी नित्य प्रज्वलित होणारी वासना, ह्या अज्ञानजन्य मलाचें जोंपर्यंत निष्कासन झालें नाहीं, सारांश, अज्ञान नष्ट झालें नाहीं, तोंपर्यंत पुनःपुनः जन्म घ्यावा लागणें हें नीट आहे. पण ज्ञानप्रकाशानें जेव्हां सर्व अज्ञान नाहींसें होऊन मनाला उन्मनीस्थिति प्राप्त होते, तेव्हां उपाधि संपतात व उपाधि नष्ट झालेल्या पुरुषाचें जन्ममरण संपतें. असो; अर्थात् ब्रह्मस्वरूपाचें ज्ञानविज्ञान झाल्यामुळें, ज्याच्या सर्व विषयवासना ब्रह्मप्राप्ति झाल्यामुळें—मागच्या मंत्रांत सांगितल्याप्रमाणें सर्व विश्व ब्रह्मस्वरूपांत सामावून जातें, म्हणून ब्रह्मप्राप्ति झाल्यानें सर्व विषयांची प्राप्ति होऊन वासनांची तृप्ति झाल्यामुळें—सारांश, तो पूर्णकाम झाल्यामुळें, त्याच्या सर्व आशा व मनीषा ह्या लोकींच विलय पावतात. तात्पर्य त्याला पुनः जन्म घेण्याचें कारण पडत नाहीं. ॥ २ ॥

---

## मंत्र तिसरा.

**नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुना श्रुतेन । यमेवैष वृणुते तेन लभ्यस्तस्यैष आत्मा विवृणुते तनुं स्वाम् ॥ ३ ॥**

**अन्वय व अर्थ**—**अयं आत्मा प्रवचनेन न लभ्यः, न मेधया, न बहुना श्रुतेन** (आत्मस्वरूप मिळावयाचें तें ब्रह्ममीमांसेसंबंधानें पुष्कळ चर्चा जिव्हेनें मात्र केली म्हणून मिळत नाहीं, केवळ अलौकिक बुद्धि असेल तरी मिळत नाहीं किंवा वेदाचें केवळ सांगोपांग अध्ययन केलें असलें म्हणूनही मिळत नाहीं) **एषः यं वृणुते तेन लभ्यः** (ज्याला परमात्म्यानें प्रेमपुरःसर निवडून घेतला आहे त्याला मात्र आत्मस्वरूपाची प्राप्ती होते) **तस्य एषः आत्मा स्वां तनुं विवृणुते** (त्याला मात्र परमात्मा आपलें स्वरूप निराच्छादित करितो—स्पष्ट करून दाखवितो—त्याला मात्र आत्मस्वरूपाचा पूर्ण प्रकाश प्राप्त होतो; किंवा आत्म्यानें ज्या साधकाला निवडून घेतलें, त्याला तो प्राप्त होतो म्हणजे त्या साधकाचें शरीर आत्मस्वरूपमय होतें) ॥ ३ ॥

येथें या मंत्रांत आत्मस्वरूपाच्या प्राप्तीला कुशाग्रबुद्धि किंवा अपरंपार वेदाध्ययन किंवा वेदाध्यापन, अथवा वेदविषयाची आणि वेदांतविषयाची मीमांसा हीं साधनें आत्मज्ञान व्यतिरिक्त असतील तर त्यांचा कांहीं एक उपयोग होत नाहीं, हें सांगितलें आहे. आत्मप्राप्तीला आत्मज्ञान हेंच मुख्य साधन आहे. आत्मज्ञानाची दृष्टि प्राप्त होऊन तिच्या साहाय्यानें आपण आपल्या कुशाग्रबुद्धीचा किंवा अध्ययनाचा अथवा अध्यापनाचा अगर या सर्व साधनांचा एकसमयावच्छेदेकरून अवलंब केला, तर मात्र परमात्म्याचा ज्ञानप्रसाद होतो; आणि प्रसाद झाल्यावर मात्र आत्मरूपा होऊन आत्मप्राप्ति होते; तीं इतकी कीं परमात्मा आपलें सर्व अचिंत्यस्वरूप आत्मभक्ताला प्रकाशित करून दाखवितो. फार काय सांगावें ? त्या साधकाच्या शरीरादि सर्व उपाधी ब्रह्ममय होऊन त्याला सर्वत्र परमात्मस्वरूप दिसूं लागतें. तात्पर्य, ब्रह्मज्ञान ब्रह्माच्या रूपेनें (grace) मात्र मिळावयाचें आहे. भक्तांची मात्र इतकी तयारी पाहिजे कीं त्यांनीं आपलें अंतःकरण वासना-शून्य आणि अभिमान-शून्य केलें पाहिजे. आणि आत्मप्राप्तीची इच्छा धारण करून श्रवणादि साधनत्रयीचा दृढ अवलंब केला पाहिजे. विषयात्मकवृत्तीची पूर्ण निवृत्ति आणि ज्ञानप्राप्तीची पूर्ण इच्छा हीं दोन साधनें आत्मप्राप्तीला सवघड करितात. वरवरचें अध्ययन किंवा अध्यापन किंवा ग्रंथधारण यांचा येथें कांहीं एक उपयोग होत नाहीं ॥ ३ ॥

---

## मंत्र चवथा.

**नायमात्मा बलहीनेन लभ्यो न च प्रमादात्तपसो वाऽप्यलिङ्गात् एतैरुपायैर्यतते यस्तु विद्वांस्तस्यैष आत्मा विशते ब्रह्मधाम ॥ ४ ॥**

अन्वय व अर्थ--अयं आत्मा बलहीनेन न लभ्यः ( ज्याला सामर्थ्य नाहीं त्याला हा आत्मा मिळावयाचा नाहीं ) न च प्रमादात् ( चित्त चांचल्य असेल तर, अंतःकरण एकाग्र नसेल तर, विचारामध्यें धांदल असेल तर आत्मप्राप्ति व्हावयाची नाहीं ) वा तपसः अलिंगात् ( किंवा ज्या तपाला कोणत्याही प्रकारचें लिंग नाहीं, कोणत्याही प्रकारचें इष्ट ध्येय नाहीं त्यालाही आत्मप्राप्ति देववत नाहीं ) यः विद्वान तु एतैः उपायैः यतते तस्य ब्रह्मधाम एषः आत्मा विशते ( पण जो विद्वान् पुरुष बल, अप्रमाद आणि इष्टकार्यार्थी तपश्चर्या करितो, त्याच्या ब्रह्मधामांत म्हणजे हृदयपुंडरीकांत हा सर्वव्यापी आत्मा प्रवेश करितो ) ॥४॥

येथें पुनः आत्म-प्राप्तीचा करणाऱ्या साधकाला उपयोगी पडणारीं साधनें सांगितलीं आहेत. साधकाचें शरीर आणि मन हीं दोन्हींही खंबीर असलीं पाहिजेत. तसेंच विषयांच्या अनेकत्वामुळें त्याचें चित्त चंचल होणारें नसलें पाहिजे आणि तो जी ज्ञानपूर्वक तपश्चर्या करीत असेल ती कांहीं तरी ध्येय ठेवून चालविली असली पाहिजे. शारीरिक आणि मानसिक बल कोणत्याही विषयाच्या प्राप्तीला अवश्य असतें. आत्मप्राप्तिही इतर सर्वविषयांच्या प्राप्तीहून अत्यंत श्रेष्ठ आहे खरी, पण त्याचप्रमाणें ती अतिशय अवघडही आहे. म्हणून सुदृढ शरीर आणि दृढनिश्चयी मन यांची आवश्यकता आहे. याचप्रमाणें साधकाच्या मनांत अनेक विषयांचा ध्यास असतां उपयोगी नाहीं. विषयाच्या अनेकत्वामुळें एकाच विषयाकडे एकाग्र अवधान लागत नाहीं. चित्ताची धांदल होते, मन गोंधळून जातें. आणि ज्या चूका होऊं नयेत त्या सहज होतात. यासाठीं प्रमाद म्हणजे गोंधळ किंवा अनवधानता इचा रिघाव ब्रह्म-साधकाच्या मनांत होणें हें अत्यंत अनिष्ट आहे. त्याचप्रमाणें आपण जी ज्ञानाची आराधना करितों तिला ब्रह्मेष्टाप्ति हेंच ध्येय असलें पाहिजे. ब्रह्म-व्यतिरिक्त दुसऱ्याच कांहीं विषयाचें ध्यान आपण करूं लागलों, तर ब्रह्म-प्राप्ति हा जो आपला मुख्य हेतु तो साध्य व्हावयाचा नाहीं. असो, तेव्हां शरीर-मन-सुदृढता, सावधानता आणि ब्रह्म-विषय-ध्यान हें उपाय साधकाजवळ असले म्हणजे त्याच्या अंतःकरणांत सर्वव्यापी आत्मा प्रवेश करितो. म्हणजे आत्मस्वरूप आत्मसाधकाला आपल्या हृदयांत पूर्ण तेजानें प्रकाशत आहे, असें कळूं लागतें. मंत्रांतील 'ब्रह्मधाम' =ब्रह्मपुर म्हणजे दहराकाश. येथें ब्रह्माचें नित्य वास्तव्य असतें. ॥ ४ ॥

---

## मंत्र पांचवा.

**संप्राप्यैनमृषयो ज्ञानतृप्ताः कृतात्मानो वीतरागाः प्रशान्ताः । ते सर्वगं सर्वतः प्राप्य धीरा युक्तात्मानः सर्वमेवाऽऽविशन्ति ॥ ५ ॥**

**अन्वय व अर्थ**—एनं संप्राप्य ज्ञानतृप्ताः कृतात्मानः वीतरागाः प्रशान्ताः ऋषयः ( ज्ञानानें तृप्त झालेले, कृतकृत्य झालेले, सर्वरागद्वेषादिकांचा निरास केलेले, शांत वृत्तीचे ऋषींना ब्रह्मप्राप्ति झाल्यानंतर ) सर्वगं सर्वतः प्राप्य ते धीराः युक्तात्मानः सर्वं एव आविशंति (सर्वव्यापी ब्रह्मस्वरूपाची प्राप्ति सर्व दिशांकडून होऊन पूर्वोक्त ऋषी विवेकवंत आणि आत्मनिष्ठ होत्साते ब्रह्मस्वरूपामध्यें प्रवेश करितात ) ५

येथें पुनः, ज्या पुरुषांना ब्रह्मप्राप्ति होते, त्यांची लक्षणें सांगून तें ब्रह्मामध्यें कसा प्रवेश करितात, तेंही वृत्त सांगितलें आहे. ही साधनें म्हणजे पूर्णज्ञान आणि या ज्ञानानें प्राप्त झालेली तृप्ति, कृतकृत्यता, रागद्वेषादि विकारांचा व हर्षखेदादिकांचा सर्वथा त्याग आणि या सर्वांमुळें आलेली शांतवृत्ति हीं सिद्ध झालीं, सारांश–ज्ञान–स्वरूपानें प्राप्त झालेलें समाधान, आत्मस्वरूपाच्या ज्ञानानें 'आपणही ब्रह्म आहों' असा निश्चय, विकारशून्यता आणि समाधानवृत्ति इतकीं साधनें एकत्र सालीं म्हणजे आत्मनिष्ठ विवेकी पुरुषांना सर्वत्र ब्रह्म आहे असें दिसूं लागतें आणि ते स्वभावतः आणि स्वरूपतः ब्रह्मस्वरूपांत प्रवेश करून ब्रह्म होतात. सारांश, अंतर्बाह्य विषयोपभोगांची पूर्णनिवृत्ति ही रागद्वेषादिकांचा उच्छेद करिते, चित्त प्रशांत होतें, आत्मस्वरूपाचें परोक्ष ज्ञान झाल्यामुळें ज्ञान हेंच समाधानाचें कारण आहे, असें कळूं लागते, आणि मग विवेकानें आत्मनिष्ठ पुरुषाला सर्व ब्रह्मरूप आहे, आपणही ब्रह्मरूप आहों असा साक्षात्कार होतो. शेवटीं 'ब्रह्म जाणतो तो ब्रह्म होतो' या न्यायानें हा साधकही ब्रह्मरूप होतो अथवा ब्रह्म होतो ॥ ५ ॥

---

## मंत्र सहावा.

**वेदान्तविज्ञानसुनिश्चितार्थाः संन्यासयोगाद्यतयः शुद्धसत्त्वाः । ते ब्रह्मलोकेषु परान्तकाले परामृताः परिमुच्यन्ति सर्वे ॥ ६ ॥**

**अन्वय व अर्थ—वेदान्त–विज्ञान–सुनिश्चितार्थाः, यतयः संन्यास–योगात् शुद्धसत्वाः** ( वेदान्ताचें म्हणजे तत्त्वज्ञानाचें ज्ञानविज्ञान झाल्यामुळें सत्य ब्रह्मस्वरूपासंबंधानें ज्यांचा पूर्ण निश्चय यथाशास्त्र झाला आहे, संन्यासयोगाचें अनुष्ठान केल्यामुळें जे यति निर्मळ अंतःकरणाचे झाले आहेत ) **ते ब्रह्मलोकेषु परांतकाले परामृताः सर्वे परिमुच्यंति** ( ते देहाच्या अंतकाळीं ब्रह्मस्वरूपीं मिसळून जाऊन उत्कृष्ट जें अमृत तें जिवंतपणींच प्राप्त करून घेतात आणि सर्वथा मुक्त होतात ) ६

याचा अर्थ स्पष्ट आहे. वेदांताच्या श्रवणादिकांनीं ब्रह्मज्ञानविज्ञान होऊन ब्रह्मस्वरूपाविषयीं ज्यांचा निश्चय ठाम होतो आणि सर्वविषयभोगांचा परित्याग केल्यामुळें ज्यांचें अंतःकरण शुद्ध होतें, ते जिवंत असतात तरी–देहधारी असतात तरी–ब्रह्मलोकीं ( ब्रह्मचिंतनांत ) अखंड राहून ब्रह्मस्वरूप होतात आणि सर्वथा मुक्त होतात. तात्पर्य, ब्रह्मप्राप्ति होण्याला ब्रह्मस्वरूपाविषयीं ज्ञानपूर्वक दृढनिश्चय आणि विषयोप

भोगांच्या संबंधानें पूर्ण वैराग्य प्राप्त झाल्यामुळें चित्तमालिन्य उत्पन्न करणाऱ्या राग-द्वेषादिविकारांचा पूर्ण अभाव हीं साध्य झालीं, ब्रह्मनिष्ठा कायम असली म्हणजे देह-धाऱ्यालाही जीवन्मुक्ति मिळते. मुक्ति मिळविण्यासाठीं त्याला लोकांतर करावें लागत नाहीं. कोठें जावेंयावें लागत नाहीं. याचें देहांत राहूनही विश्वांतर होते आणि संसारांत वागत असतांही तो संन्याशी असतो. देहादि उपाधि आहेत, हा ध्यास सुटणें म्हणजे खरें देहावसान होय. संसाऱ्यांचें देहावसान मरणसमयीं होतेसें दिसतें, पण हें देहावसान खरें नाहीं. कारण, हा वर्तमान देह सुटला तरी वासना व अहंकार जिवंत असतात व ही जिवंत जोडी पुनः देह उत्पन्न करिते. वासनादिकांच्या चक्रांत सांपडलेल्या जीवाचें देहावसान अथवा उपाधिनाश होणें शक्य नाहीं. तेव्हां लौकिक मरण चेणें हें संसाऱ्याचें खरें मरण नव्हें. खरें मरण उपाधिनाशानंतर येतें. उपाधि-नाश हेंच खरें मरण होय. असें जिवंतपणींच मरण प्राप्त झालेला पुरुष अमृत-सर्वश्रेष्ठ अमृत-प्राप्त करून घेतो आणि ब्रह्मचिंतनांत राहिल्यामुळें सर्वथा मुक्त होतो ॥६॥

---

## मंत्र सातवा.

**गताः कलाः पञ्चदश प्रतिष्ठा देवाश्च सर्वे प्रति देवतासु । कर्माणि विज्ञानमयश्च आत्मा परेऽव्यये सर्वे एकीभवन्ति ॥ ७ ॥**

**अन्वय व अर्थ**—पंचदश* कलाः प्रतिष्ठाः (प्रतिष्ठां ?) गताः, सर्वे देवाः च प्रतिदेवतासु, कर्माणि विज्ञानमयः च आत्मा सर्वे अव्यये परे एकीभवन्ति ( पंधरा प्राणादि कला आपापल्या मूळकारणांमध्यें लीन होतात, सर्व इंद्रियें आपापल्या आधिदैविक देवतांकडे परत जातात. संचित आणि क्रियमाणादि कर्में व विज्ञानमय आत्मा हीं सर्वच्या सर्वजण त्या अव्यय असून सर्वव्यापी असणाऱ्या सर्वश्रेष्ठ आत्मस्वरूपांत एकरूप होतात ) ॥ ७ ॥

येथें उपाधींची व्यवस्था काय होतें, हें सांगितलें. प्रश्नोपनिषदाच्या सहाव्या प्रश्नांत सोळा कला कोणकोणत्या आहेत हें सांगितलें आहे. या कला म्हणजे जीवाच्या सर्भो-वार असणाऱ्या सोळा उपाधी होत. तेथें सोळा उपाधी सांगितल्या असतां या उपनि-

---

* प्राण, श्रद्धा, पंचमहाभूतें, इंद्रिय, मन, अन्न, वीर्य, तप, मंत्र, कर्म, लोक, आणि नाम. याप्रश्नोपनिषदांत सांगितलेल्या कला आहेत.

षदांत ' पंधरा प्राणादि कलांचा ' मात्र निर्देष कां केला असा प्रश्न उत्पन्न होण्याचें कारण नाहीं. कां तर तेथील सोळा कलांत अंतर्गत झालेल्या ' कर्म ' वस्तूची व्यवस्था काय होते तें या मंत्रांत निराळें सांगितलें आहे. कर्म वजा केलें म्हणजे बाकी पंधरा कला मात्र अवशिष्ट राहतात. या उपनिषदाचें असें सांगणें आहे कीं मुक्त झालेल्या पुरुषांचे प्राणादि सर्व कलात्मकभाग आपापल्या मूळकारणांमध्यें जाऊन लय पावतात. त्याच प्रमाणें जीवाच्या इंद्रियावर स्वामित्व चालविणारे सर्व देव आपापल्या मूळस्वरूपांत परत जातात. याप्रमाणें सर्वकलांचा म्हणजे जीवाच्या उपाधींचा ( पंचभूतात्मक शरीर, पंचज्ञानेंद्रियें, मन, श्रद्धा, प्राण, इत्यादि कर्मेतर सर्व उपाधींचा ) निरास झाल्यावर कर्म आणि विज्ञानमय आत्मा हीं मात्र शिलक राहतात. पैकीं कर्म ( पूर्वसंचित आणि क्रियमाण ) हें आत्मज्ञान होऊन नष्ट झालें, आणि विज्ञानमय आत्मा म्हणजे जीव याच्या प्राणादि सर्व उपाधि नाहींशा झाल्या, म्हणजे तो उपाधिशून्य होतो, कर्मशून्य होतो, ज्ञानरूप होतो, सारांश सर्वव्यापी आणि सर्व-श्रेष्ठ होतो, ब्रह्मरूप होतो. मुक्त झालेल्या पुरुषाच्या दृष्टीनें सर्व ब्रह्मरूप होतें. आपल्या जीवांच्या दृष्टीनें प्राणादि सर्व कला आपल्या मूळ कारणांत (अव्यक्तांत) लीन होतात. असो; कर्में नष्ट होतात आणि जीव ज्ञानरूप होतो. तात्पर्य उपाधिशून्य झालेला पुरुष मुक्त होतो ॥ ७ ॥

---

## मंत्र आठवा.

**यथा नद्यः स्यन्दमानाः समुद्रेऽस्तं गच्छन्ति नामरूपे विहाय । तथा विद्वान्नामरूपाद्विमुक्तः परात्परं पुरुषमुपैति दिव्यम् ॥ ८ ॥**

**अन्वय व अर्थ—स्यंदमानाः नद्यः यथा समुद्रे नामरूपे विहाय अस्तं गच्छंति, तथा नामरूपात् विमुक्तः विद्वान् परात्परं दिव्यं पुरुषं उपैति** ( वाहणाऱ्या नद्या आपलीं नामरूपें सोडून देऊन ज्याप्रमाणें समुद्रांत शिरून एकरूप होतात त्याप्रमाणें नामरूपादि उपाधींचा त्याग केलेला ज्ञानी पुरुष दिव्य आणि परात्पर—श्रेष्ठापेक्षांही श्रेष्ठ-जो पुरुषोत्तम त्याप्रत जाऊन एकरूप होतात ) ॥ ८ ॥

हा मंत्र प्रश्नोपनिषदांत आला आहे तेव्हां त्याची चर्चा पुनः येथें करण्याचें कारण दिसत नाहीं ॥ ८ ॥

---

## मंत्र नववा.

**स यो ह वै तत्परमं ब्रह्म वेद ब्रह्मैव भवति नास्याब्रह्मवित्कुले भवति । तरति शोकं तरति पाप्मानं गुहाग्रन्थिभ्यो विमुक्तोऽमृतो भवति ॥ ९ ॥**

**अन्वय व अर्थ—यः ह वै तत् परमं ब्रह्म वेद, सः ब्रह्म एव भवति** ( ज्या कोणाला या परमश्रेष्ठ ब्रह्माचें ज्ञान विज्ञान झालें तो ब्रह्मच होतो ) **अस्य कुले अब्रह्मवित् न भवति** ( त्याच्या कुलामध्यें ब्रह्मसंबंधानें अज्ञानी पुरुष उत्पन्न होत नाहीं ) **शोकं तरति, पाप्मानं तरति, गुहाग्रंथिभ्यः विमुक्तः अमृतः भवति** ( तो ब्रह्मवेत्ता शोकपार होतो, पापसमुद्र तरून जातो आणि अंतःकरणांत ज्या वासनादि ग्रंथि असतात त्यांपासून मुक्त होतो. आणि शेवटीं तो अमर होतो, अमृतरूपी होतो, ब्रह्म होतो ) ॥ ९ ॥

या मंत्रांत ब्रह्मविद्येचें फल सांगितलें आहे. ज्या पुरुषाला सर्वश्रेष्ठ व सर्वविलक्षण ब्रह्मस्वरूप समजतें आणि त्याचा साक्षात्कार होतो, तो प्रत्यक्ष ब्रह्म होतो. ' ब्रह्म वेद ब्रह्मैव भवति ' अशी अन्य श्रुति आहे. ब्रह्मज्ञानविज्ञानाचें हें फल आहे. स्वतःच्या संबंधानें ही गोष्ट झाली पण ब्रह्मज्ञ पुरुषाचा संसारही सुखमय होतो, हें सांगण्यासाठीं श्रुतीचा सिद्धांत असा आहे कीं, त्याच्या वंशांत ब्रह्मज्ञान नाहीं असा जीव उत्पन्न होत नाहीं. सर्वच ब्रह्ममय झाल्यावर ब्रह्मवेत्त्याच्या कुलांतील मंडळीही ब्रह्मरूप व्हावी हें योग्यच आहे. ' आपणासारिखे करिती तात्काळ । नाहीं काळ वेळ तया लागीं ' असें साधुपुरुष म्हणतात, तें खोटें नाहीं. ब्रह्मवेत्त्याच्या उपदेशाचें, आचरणाचें आणि ज्ञानाचें सामर्थ्यच असें असतें कीं, त्याच्या तेजानें ब्रह्मज्ञ पुरुषाजवळ येणारे सर्व जीव ब्रह्मरूप व्हावे. याचप्रमाणें या संसारांत राहूनही त्याला शोक मोह होण्याची स्थानें व कारणें नाहींशी होतात. त्याची स्वार्थबुद्धि नष्ट झाल्यामुळें त्याच्या हातून कोणतेंही पुण्य किंवा पापकर्म होत नाहीं. म्हणजे इतरांचें नुकसान करणारें कर्म त्याच्या हातून केव्हांही होत नाहीं. ऐहिक किंवा पारत्रिक भोगांची वासना, कर्म—कर्तृत्वाचा अभिमान व अहंकार हीं दोन्हींही रसातळास गेलीं असल्यामुळें त्याच्या हातून परोपकारी कर्म मात्र घडत असतें. तथापि अहंकर्तृत्व आणि अहंभोक्तृत्व सर्वथा निमाल्यामुळें त्याला पुण्यपापाची वार्ताही नसते. परमार्थदृष्टीनें पाहिलें तर पुण्यसुद्धां पापरूप असतें. कारण तेथें स्वतःला स्वर्गलोकीं सुख मिळावें अशी आशा असते. वैषयिक सुखाची गोष्ट आली कीं, त्यांत जेथें एकाचा फायदा, तेथें दुसऱ्याचें नुकसान

व्हावयाचें, हा सिद्धांतच आहे. मग तें स्वतःस सुख देणारें पुण्य कां असेना? आता व्यावहारिक पापापेक्षां व्यावहारिक पुण्य अत्यंत श्रेष्ठ खरें, पण परमार्थाचा विचार करतांना पुण्य आणि पाप हा दोन्ही वृत्ती स्वतःपर असल्यामुळें पापरूपच होतात. असो,असल्या पापरूप सागराला तरून तो चालतो आणि याच उपनिषदांत ( २।२।८ पहा! ) सांगितल्याप्रमाणें त्याच्या सर्व हृदयग्रंथींचा भेद होतो, तो निरुपाधि होतो आणि ब्रह्मरूप होतो. प्रथम अर्धांत ब्रह्म होतो असें जें सांगितलें आहे, त्याचें विस्तृत वर्णन या मंत्राच्या उत्तर भागांत आहे ॥ ९ ॥

**तदेतदृचाऽभ्युक्तम्–**

**अन्वय व अर्थ—तत् एतत् ऋचा अभ्युक्तम्** ( तें हें ऋग्वेदमंत्रानें स्पष्ट केलें आहे. )

तें हें म्हणजे ब्रह्मविद्येचा उपदेश कोणास करावा याचा नियम होय. हा नियम ऋग्वेदामध्यें पठित झाला आहे.

---

## मंत्र दहावा.

**क्रियावन्तः श्रोत्रिया ब्रह्मनिष्ठाः स्वयं जुह्वत एकर्षिं श्रद्धयन्तः । तेषामेवैतां ब्रह्मविद्यां वदेत शिरोव्रतं विधिवद्यैस्तु चीर्णम् ॥ १० ॥**

**अन्वय व अर्थ–क्रियावन्तः, श्रोत्रियाः ब्रह्मनिष्ठाः, स्वयं एकर्षिं जुह्वतः श्रद्धयन्तः** ( वेदविहित कर्में करणारे, वेदाध्ययन केलेले, अगर ब्रह्माचें ज्ञान करून घेऊन परब्रह्माचें ज्ञान प्रसृत व्हावें, एतदर्थ एकनिष्ठेनें प्रयत्न करणारे, स्वतः एकर्षि नामक अग्नीला हवनानें तृप्त करणारे व शुद्ध आस्तिक्य बुद्धि असलेले ) **तेषां यैः शिरोव्रतं चीर्णं एतां ब्रह्मविद्यां वदेत** ( त्यांपैकीं ज्यांनीं विधिपूर्वक शिरोव्रताचें अनुष्ठान केलें आहे, त्यांना मात्र ब्रह्मविद्येचा उपदेश करावा ) ॥ १० ॥

ऋग्वेदमंत्रानें ब्रह्मविद्या शिकण्याचा अधिकार कोणास असतो तें सांगितलें आहे. वेदाध्ययन, विहितकर्मांचें अनुष्ठान अग्निहोत्रधारण (यांतच शमदमदिमनःसंयमाचा भाग होतो . ब्रह्मनिष्ठा, आस्तिक्यबुद्धि ज्या ब्रह्मसाधकांस आहे, त्यांपैकीं ज्यांनीं शिरोव्रताचें अनुष्ठान केलेलें असेल त्यांस मात्र ब्रह्मविद्येचा उपदेश करावा. वेदव्रताचें अनुष्ठान कसें करावें, शिरावर अग्निधारण कसें करावें, इत्यादिकांचें वर्णन अथर्ववेदामध्यें

सांपडेल. तात्पर्य मुमुक्षूनें जें अवश्य केलें पाहिजे, विवेक, वैराग्य, मनःसंयमन आणि मुमुक्षा हीं साध्य करून घेतलीं पाहिजेत, असें जे नियम ब्रह्मविद्येंत सांगितलें आहेत, तें सर्व केवळ ऋग्वेदांत सांगितलेल्या ह्या मंत्रांचा शुद्ध अनुवाद आहे. ॥ १० ॥

---

## मंत्र अकरावा.

**तदेतत्सत्यमृषिरङ्गिराः पुरोवाच नैतदचीर्णव्रतोऽधीते । नमः परमऋषिभ्यो नमः परमऋषिभ्यः॥११॥**

**इति तृतीयमुण्डके द्वितीयः खण्डः ॥ २ ॥**

**अन्वय व अर्थ**—**तत् एतत् सत्यं अङ्गिराः ऋषिः पुरा उवाच** ( तें हें सत्य पूर्वीं अङ्गिराऋषी शौनकाप्रत उपदेशिता झाला ) **एतत् अचीर्णव्रतः न अधीते** ( ज्यानें येथें सांगितलेल्या व्रतांचें अनुष्ठान केलें नाहीं तो या उपनिषदाचें पठण करीत नाहीं ) **परमऋषिभ्यो नमः, नमः** परमऋषिभ्यः ( श्रेष्ठ ऋषींना नमस्कार असो; श्रेष्ठ मुनींना नमस्कार असो ) ॥ ११ ॥

याप्रमाणें ही ब्रह्मविद्या पूर्वी अंगिराऋषीनें शौनकास उपदेशिली. ही विद्या ज्यानें विहितव्रताचें अनुष्ठान केलें नाहीं, त्याला अधीत करतां येत नाहीं. कारण त्याला समजून घेण्याचा अधिकार प्राप्त होत नाहीं. व त्यानें अध्ययन केलें तरी त्यांस ती समजावयाची नाहीं. ज्या महाभागऋषींनीं ब्रह्मविद्येच्या संप्रदायाची परंपरा चालू ठेविली, त्या थोर आणि जगकल्याणकारी ऋषींस नमस्कार करितों. येथें दोन वेळ नमस्काराचा उच्चार आहे, तो ब्रह्मविद्येविषयीं आदर दाखविण्यासाठीं आणि मुण्डक उपनिषत् समाप्त झालें, हें कळविण्यासाठीं झाला आहे ॥ ११ ॥

**तृतीय मुण्डकांतील द्वितीयखंडाचें विवरण समाप्त झालें.**

**ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः ।**
**भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ॥**
**स्थिरैरङ्गैस्तुष्टुवाꣳसस्तनूभिः ।**
**व्यशेम देवहितं यदायुः ॥**

**ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।**

**अथर्ववेदीय मुण्डकोपनिषदाचें विवरण संपलें.**

ॐ शांतिः शांतिः शांतिः

---

ॐ

# माण्डूक्योपनिषत्

गौडपादीयकारिकासु आगमाख्यप्रथमप्रकरणसहिता

चिंतामण गंगाधर भानु

कृत

महाराष्ट्र विवरणम्

# माण्डूक्योपनिषत्.

## संपादकाचें विवरण.

—०*०—

ॐ तत्सद्ब्रह्मणे नमः

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः ।
भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ॥
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवाꣳसस्तनूभिः ।
व्यशेम देवहितं यदायुः ॥
भद्रं नो अपि वातय मनः ॥

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।

### मंत्र पहिला.

हरिः ॐ । ओमित्येतदक्षरमिद ꣳ सर्वं तस्योप-व्याख्यानं भूतं भवद्भविष्यदिति सर्वमोंकार एव । यच्चान्यत्त्रिकालातीतं तदप्योंकार एव ॥ १ ॥

अन्वय व अर्थः—ॐ इति एतत् अक्षरं (ॐकार हा त्या अक्षर म्हणजे अविनाशी ब्रह्माचा वाचक शब्द आहे) भूतं, भवत्, भविष्यत् इति इदं सर्वं तस्य उपव्याख्यानं (हें जें भूतकालीन, वर्तमानकालीन व भविष्यकालीन सर्व दृश्य विश्व आहे, तें त्याचें उपव्याख्यान म्हणजे विस्तृत स्पष्टीकरण होय) सर्व ॐकारः एव (सर्व भूतकालीन, वर्तमानकालीन व भविष्यकालीन दृश्य वस्तु व कल्पित भावना ओंकारस्वरूपी आहेत) यत् च अन्यत् त्रिकालातीतं तत् अपि ओंकारः एव (तिन्ही

कालाच्याही पलीकडे असणारें अन्य जें कांहीं आहे, तेंही ओंकारस्वरूपच आहे ). सारांश, अक्षर परब्रह्म, त्रिकालातीत असणारें अपरब्रह्म, प्रधान, काळ इत्यादि आणि भूतभविष्यादि कालांत अंतःपाती असणारें सर्व दृश्य व अदृश्य विश्व ॐकार होय ॥ १ ॥

या मंत्राचा अर्थ स्पष्ट आहे. श्रुतीनें या मंत्रांत असें विधान केलें आहे कीं, यच्चावत् सर्व वस्तु, सर्व वस्तूंचे वाचक शब्द व तद्विषयक कल्पना, वस्तूंचें आधारद्रव्य जें पुरुषप्रकृतिरूपी मिथून, आणि या सर्वांचें पारमार्थिक अधिष्ठान जें अक्षरपरब्रह्म तें सुद्धां ओंकाररूप आहे. ॐकार शब्द परब्रह्माचा अत्यंत निकटवर्ती वाचक आहे, हें सर्व श्रुतिस्मृतींस मान्य आहे. तसेंच ब्रह्माच्या अधिष्ठानावर ज्या अज्ञानाचा विवर्त होऊन माया व अपरब्रह्म स्वरूपांचा आविर्भाव होतो व तसेंच पुढें सर्व दृश्य विश्वाचें व विश्वाच्या परिच्छिन्न द्रष्ट्यांचे विवर्त होतात, ते सर्वच्या सर्व ॐकारापासून निर्माण होणाऱ्या वाणीचे विलास आहेत. तात्पर्य ॐकार आणि परब्रह्म यांचा जसा वाचकवाच्य संबंध लक्षणेनें नित्य असतो, तसाच ओंकाराच्या प्रस्ताराचा व परब्रह्माच्या विसृष्टीचाही वाचकवाच्यसंबंध आहे. तात्पर्य परब्रह्माला ॐकार हें नांव दिलें म्हणजे तदाश्रयानें असणाऱ्या सर्व दृश्य व कल्प्य वस्तूंचें ॐकारापासून विस्तृत झालेली वाणी नामकरण करिते, आणि एवंच सर्वत्र ॐकारस्वरूप पूर्ण भरलें आहे, असा निश्चय होतो. कारण वाचक आणि वाच्य यांचें व्यवहारतः तादात्म्य असतें. आतां ॐकार हें ब्रह्माचें अभिधान कां असतें, याचा विचार करणें इष्ट आहे. पण हें दुष्कर कार्य उपसंहारामध्यें करावयाचें ठरवून सध्यां श्रुतीच्या वचनावरच भिस्त ठेवितों, आणि या मंत्राचें आविष्करण पूर्ण करितों ॥ १ ॥

---

## मंत्र दुसरा.

**सर्वं ह्येतद्ब्रह्मायमात्मा ब्रह्म सोऽयमात्मा चतुष्पात् ॥ २ ॥**

**अन्वय व अर्थः—हि सर्वं एतत् ब्रह्म, अयं आत्मा ब्रह्म (कारण हें सर्व दृश्य विश्व ब्रह्म आहे आणि हा जीवात्माही ब्रह्म आहे.) सः अयं आत्मा चतुष्पात् ( या आत्म्याला—प्रत्यगात्म्यालाही—चार चरण असतात. ) ॥२॥**

या मंत्राचा अर्थ स्पष्ट आहे. जीवात्म्या सह जें सर्व दृश्य विश्व ब्रह्मरूप आहे, तें वस्तुतः ॐकारस्वरूप आहे. म्हणून ॐकारही ब्रह्म आहे, हें सिद्ध होतें. आतां, सर्व दृश्य ब्रह्म आहे व प्रत्यगात्माही ब्रह्म आहे, असें सांगितलें—ह्या प्रत्यगा-

स्थाला चार चरण असतात. किंवा तो चार अवस्थांमध्यें प्रकट होतो. या अवस्थांचें वर्णन पुढें यथाक्रम येणारच आहे. येथें एकच गोष्ट आधीं सांगून ठेवतों कीं, प्रत्यगात्म्याच्या ज्या चार व्यावहारिक अवस्था सांगितल्या आहेत, त्याच अवस्थांमध्यें परब्रह्मही अति विस्तीर्ण प्रमाणावर प्रकट होऊन भासत असतें, हें लक्षांत ठेऊन पुढील सर्व मंत्र वाचणेंचे आहेत ॥ २ ॥

---

## मंत्र तिसरा.

**जागरितस्थानो बहिष्प्रज्ञः सप्ताङ्ग एकोनविंश-तिमुखः स्थूलभुग्वैश्वानरः प्रथमः पादः ॥ ३ ॥**

**अन्वय व अर्थः—जागरितस्थानः, बहिष्प्रज्ञः, सप्तांगः, एकोनविंशतिमुखः, स्थूलभुक् वैश्वानरः, प्रथमः पादः** ( जागरितस्थानीं म्हणजें नेत्राचे ठिकाणीं राहणारा, बाह्य विषयांचें मात्र ज्ञान असणारा, सप्त अवयवात्मक, एकोणीस मुखांचा व स्थूलविषयांचा उपभोग घेणारा वैश्वानर किंवा विश्व हा पहिला पाद आहे. ) ॥ ३ ॥

चार अवस्थांतील वैश्वानर ही प्रत्यगात्म्याची दृश्य म्हणून प्रथम अवस्था आहे. या अवस्थेंत जीव जागा असतो, पण तो सामन्यतः व विशेषतः बाहेरच्या विषयांचें मात्र ज्ञान करून घेतो. याला सात अंगें आहेत व ती श्रुतिपठितही आहेत. हीं सप्त अंगें म्हणजे ( १ ) मस्तक, ( २ ) नेत्रद्वय, ( ३ )प्राण, ( ४ ) हृदयांतील आकाश, ( ५ ) मल मूत्रस्थान आणि ( ६।७ ) हस्तपाद मिळून ही सात अंगें होतात. विराट् आत्म्याचें ही असेंच सप्तांगी स्वरूप आहे, आणि तें आचार्यांच्या भाष्यांत स्पष्ट झालें आहे. जीवाचीं हीं अंगें म्हणजे त्याचे घटकावयव होत. मस्तक हें सर्व विचार–विकारांचें केंद्रस्थान, नेत्रादि विषय ग्रहण करण्याचें स्थान, प्राण कर्म करण्याचें साधन, हृदयांतील आकाश हें सर्व रक्तवाहिनी नाड्यांचें केंद्रस्थान, बस्ति हें मलमूत्रविसर्जनस्थान, आणि हस्तचरणद्वय हे कार्याकार्याचें व गमनागमनाचें स्थान होय. असे जागृत जीवाचे सात निरनिराळे अवयव आहेत. जीवाचें प्रकटन १९ द्वारांनीं होते. १० ज्ञानकर्मेंद्रियें, पंच प्राण, मन, बुद्धि, चित्त आणि अहंकार मिळून १९ द्वारांनीं जीव प्रकट होत असतो. हा स्थूलभुक् म्हणजे नामरूपात्मक विषयांचा उपभोक्ता आहे. याला वैश्वानर असें म्हणतात. वैश्वानर म्हणण्याचें कारण सर्व जीवांचा समावेश एका पदानें व्हावा म्हणून विश्वद्रष्ट्या जीवाचा बोध करण्यासाठीं हें पद उपयोजिलें आहे. ही जागृत् अवस्था होय. या मंत्रांतील दोन विशेषणें मुख्यतः लक्षांत ठेवावयाचीं

आहेत. जागृत जीव ( वैश्वानर ) हा बहिर्मुख असतो, म्हणजे इंद्रियांनीं बाह्य विषयांचें मात्र ज्ञान करून घेतो. याचें मन, याची बुद्धि इत्यादि अंतरिंद्रियें सुद्धां बाह्य विषयाचें मननध्यान करीत असतात. तसेंच हा स्थूलभुक् म्हणजे नाम रूप असणाऱ्या स्थूल-विषयांचा मात्र उपभोग घेतो. आपण सामान्यतः जागृत स्थानावर असतो म्हणजे बाह्य-विषय पाहणारे ( इंद्रियगम्य अथवा इंद्रियानुसारी मनोबुद्धिगम्य विषयांचे ज्ञान करून घेणारे ) असतों. तसेच आपले भोज्य किंवा भोग्य विषयही नामरूपात्मक म्हणजे स्थूल असतात. या स्थितींत अंतर्मुखता कोणत्याही प्रकारची नसते. ही सर्व सामान्य अवस्था सर्व जीवांची आहे. येथें मनुष्यापासून तो पिपीलिकेपर्यंतच्या कोणत्याही प्राण्यांत भेद नाहीं. कांहीं प्राण्यांस प्रमुखत्वानें उपजत बुद्धि (Instinct)व कांहींस विचारपूर्वक ठरणारी निश्चयात्मक बुद्धि (Intelligence) असते. पहिली बुद्धि जन्मतः प्राप्त झालेली असे. आणि दुसरी बुद्धि विकसित व्हावी लागते. हा विशेष सोडून दिला म्हणजे प्राणिमात्रांत उपभोगाच्या संबंधानें कोणताही भेद असतो असें दिसत नाहीं. असो; आत्म्याच्या प्रकट होण्याची ही प्रथम अवस्था आहे.

जीवात्म्याची ही प्रथम अवस्था आहे, त्याचप्रमाणें विराट् ही परब्रह्माची प्रथम म्हणजे सहज लक्षांत येणारी अवस्था आहे. जीवात्म्याचा जसा जागरितस्थानीं विश्व तसा परब्रह्माचा विश्व म्हणजे विराट् होय. आत्मा सदैव जागृत असतो. पण तो व्यवहारदशेंत जीवस्वरूपानें प्रकट झाला म्हणजे, त्याला जागृति,स्वप्न, सुषुप्ति व तुरीया या चार अवस्था प्राप्त होतात; अथवा ह्या चार अवस्थांतरांतून त्याला प्रकट व्हावें लागतें. व त्याच्या अवस्थांत जीवाळा अनुक्रमें विश्व, तैजस, प्राज्ञ आणि तुरीय अशीं नांवें प्राप्त होतात. मात्र तुरीया ही जीवाची पारमार्थिक नित्य अवस्था आहे. ह्याचप्रमाणें परब्रह्मालाही विराट्, हिरण्यगर्भ, अविकृत आणि परब्रह्म अशा चार नांवांनीं जागृत्यादि व्यावहारिक अवस्थांतरांत ओळखितात. आत्म्याचीं म्हणजे परमात्म्याचीं हीं दृश्य अव-स्थांतरें म्हणजे मायेचा विलास होय. पण या विलासांत ही एक अद्वितीय ब्रह्म सर्वत्र अनुस्यूत आहे, हें स्पष्ट दाखविण्यासाठीं या चार अवस्थांचा ( पादांचा ) विस्तार करून ह्या विस्तारानुसार ॐकाराच्या चार मात्रा अवस्थांतरांचा कसा बोध करितात, हें सांगण्यामध्यें श्रुतीचें मनोगत समर्पित झालें आहे. असो; ॥ ३ ॥

---

## मंत्र चवथा.

**स्वप्नस्थानोऽन्तःप्रज्ञः सप्ताङ्ग एकोनविंशतिमुखः**
**प्रविविक्तभुक्तैजसो द्वितीयः पादः ॥ ४ ॥**

**अन्वय व अर्थः—स्वप्नस्थानः, अंतःप्रज्ञः, सप्तांगः, एकोनविंशति-मुखः, प्रविविक्तभुक्, तैजसः द्वितीयः पादः ( स्वप्न हेंच आहे वसति-**

**स्थान ज्याचें असा, पंचज्ञानेंद्रियव्यतिरिक्त केवळ मनानें अंतःस्थिति पाहणारा, सप्तांग, एकोनविंशति मुख, प्रत्यक्ष स्थूलविषय नसतांही त्यांच्या कल्पनांचा मात्र उपभोग घेणारा तैजस ही द्वितीय अवस्था होय) ॥ ४ ॥**

आपलीं बाह्येंद्रियें विश्रांति घेऊं लागलीं, पण मन जागृत असलें, म्हणजे आपल्यांस स्वप्नें पडतात. हें आपण नित्य पाहतों, आणि या नित्य अनुभवाचा प्रश्नोपनिषदामध्यें स्पष्ट उल्लेखही आला आहे. म्हणून तैजस स्वप्नस्थानीं असतो असें येथें म्हटलें. आणि स्वप्नकाळीं तो तैजस सर्व विषयांचें ज्ञान इंद्रियविरहित मनोद्वारा करून घेत असतो. वैश्वानराप्रमाणेंच याला सप्तांगें व एकोनविंशतिमुखें असतात. हा विषयांचा उपभोग घेतो. पण ते सर्व सूक्ष्म विषय मनोवासनेनें उत्पन्न केलेलें असतात. देह अंथरुणावर पडला, इंद्रियें स्तब्ध झालीं, तरी मन स्तब्ध होत नाहीं. तेव्हां जीवाच्या ज्या वासना असतात, त्यांचें वास्तव्य मनोमंदिरांत असतें. त्यांपैकीं कांहीं प्रबल वासना नामरूपाला येऊन निराबाधपणें प्रकट होत असतात. आतां, रामास जें स्वप्न पडतें तें कृष्णादि इतरांस समजणें जर शक्य असतें, तर आपल्या वासनांचा उत्तम चित्रपट तयार करितां येता; व मनुष्याचें शील, त्याचें ध्येय कशाप्रकारचें असतें हें उत्कृष्टरीतीनें समजतें. पण–सुदैवानें किंवा दुर्दैवानें वासनांचें अंतस्थ स्वरूप स्वेतरांस कळत नाहीं; म्हणून कित्येक वेळां आपली अब्रू बचावते किंवा कित्येक वेळीं दुसऱ्याचें मन आपल्यास समजत नाहीं म्हणून आपलें कल्याण होतें. असो; पण जी वस्तु नाहीं किंवा असणें शक्य नाहीं. तिच्याविषयीं हर्ष खेद मानण्यांत काय तात्पर्य आहे ! दुसऱ्याचें स्वप्न तिसऱ्यास कळत नाहीं, हें बरीक खरें. असो मला येथें आणखी असें म्हणावेसें वाटतें. जे कित्येक बुद्धिवान् पुरुष आपल्या शुद्ध कल्पनाप्रतिभेच्या सामर्थ्यानें विश्वनिरीक्षण किंवा आत्मनिरीक्षण करून अपूर्व शोध करितात, काव्यें लिहितात, मनोहर चित्रें तयार करितात, विश्वांतील सामर्थ्याचे शोध लावितात आणि श्रुतिसहाय नसतांही तत्त्वज्ञानाचा–मानवी बुद्धीस शक्य तितका–पल्ला गांठितात ते खरोखरच अंतःप्रज्ञ होत. आपण सामान्यतः बहिष्प्रज्ञ आणि हे महात्मे अंतःप्रज्ञ होत. असो; तैजस आत्मा आपल्या वासनेनें निर्माण केलेल्या वस्तुकल्पनांचा उपभोग घेऊन त्यांतच आनंद मानितो. स्वप्नांतील वस्तु प्रत्यक्ष नसून ही प्रत्यक्षशा भासतात आणि त्यांचा आपण उपभोग घेतों म्हणून या भोगवस्तूंस प्रविविक्त (सूक्ष्म) असें म्हटलें आहे. या अवस्थेंतील आत्म्याला तैजस हें नांव दिलें आहे, कारण सूर्यादि कोणतेही प्रकाशक नसतां स्वप्नप्रकाशानें हा कल्पित वस्तूंस स्वतःच्या कार्यासाठीं प्रकाशित करितो.

स्वप्नस्थिति हें काय गूढ आहे, हें अद्यापिही मानवी शास्त्रांस समजलें नाहीं. श्रुतीनें मात्र असा निष्कर्ष वेळोवेळीं काढला आहे कीं, जागृत अवस्थेमध्यें ज्या ज्या वासनांनीं मनुष्य कर्म करण्यास प्रवृत्त होतो, त्यांपैकीं कांहीं स्वप्नकाळीं अंतःकरणामध्यें स्पष्ट

उद्भूत होतात. आणि जीवानें ज्या पदार्थांचा उपभोग ह्याकिंवा पूर्वजन्मीं घेतला असेल किंवा त्याला जें काय ज्ञान ह्याजन्मीं किंवा पूर्वजन्मीं झालें असेल,ते ते पदार्थ व उपभोग व तें तें ज्ञान स्वप्नास्थितीमध्यें वासना उत्पन्न करितात. तसेंच, जे पदार्थ जीवांस हवें असतील किंवा जशी वस्तुस्थिति व्हावी असें त्यांस वाटत असेल, तशा अर्थाची स्वप्नें त्यास पडतात. या विषयावर वैद्यकशास्त्र्यांना व मानसिक शास्त्र्यांना पुष्कळ लिहितां येण्यासारखें आहे. हा माझा अधिकार नव्हे. म्हणून सध्यां या प्रश्नाची चर्चा न करितां येथेंच थांबतों ॥ ४ ॥

---

## मंत्र पांचवा.

**यत्र सुप्तो न कंचन कामं कामयते न कंचन स्वप्नं पश्यति तत्सुषुप्तम् । सुषुप्तस्थान एकीभूतः प्रज्ञानघन एवाऽऽनन्दमयो ह्यानन्दभुक्चेतोमुखः प्राज्ञस्तृतीयः पादः ॥ ५ ॥**

**अन्वय व अर्थः—यत्र सुप्तः न कंचन कामं कामयते, न कंचन स्वप्नं पश्यति, तत् सुषुप्तं** ( ज्या अवस्थेंत जीवास कोणतीही इच्छा उत्पन्न होत नाहीं, व कसलेंही स्वप्न पडत नाहीं, त्या स्थितीला सुषुप्त असें म्हणतात ) **सुषुप्तस्थाने एकीभूतः प्रज्ञानघनः एव, आनन्दमयः हि आनन्दभुक्, चेतोमुखः प्राज्ञः तृतीयः पादः** ( सुषुप्तस्थानीं असणारा, एकरूप झालेला, प्रज्ञानघनस्वरूप मात्र, आनंदमय, आनंदाचा भोक्ता, चेतोमुख जो प्राज्ञ तो तिसरा चरण होय. आत्म्याची ही तिसरी अवस्था आहे. ) ॥ ५ ॥

हा मंत्र शुद्ध गद्यपर आहे म्हणून विरामचिन्हांशिवाय अन्वयांत कोणतेंहीं रूपांतर करावें लागत नाहीं. असो;

या स्थितींत मनही जागृत नसतें व इंद्रियें झोंपीं गेलेलीं असतात. म्हणून ही सुषुप्तस्थिति होय. त्या स्थितात निजलेल्या जीवांस कोणतेंही स्वप्न पडत नाहीं किंवा कोणत्याही दृश्य विषयाचें इंद्रियद्वारा दर्शन किंवा तत्संबंधी वासना उत्पन्न होत नाहीं. त्याचप्रमाणें स्वप्नांतील प्रविविक्त विषयांची किंवा वासनांची उपाधिही नसते. ही स्थिती सुषुप्तीची ( गाढ झोंपेची ) असते. चांगली झोंप ( सु+सुप्ति ) म्हणजे स्वप्नशून्य झोंप होय. चांगल्या प्रकृतीच्या व मनःस्वस्थ जीवांस स्वप्नें पडत नाहींत, असें म्हणतात. ही

अवस्था काय आहे ? सर्व ज्ञानकर्मेंद्रियें मनोबुद्धींसह गाढ विश्रांति घेत असतां आणि एक प्राणमात्र स्वव्यापार करीत असतां जी स्थिति प्राप्त होते तिला गाढ निद्रा असें आम्हीं म्हणतों. यावेळीं सर्व विषयज्ञान वासनांसह लुप्त झालेलेंअसतें तात्पर्य, सर्व अंतर्बाह्य जगताचा निद्रिताला प्रलय होतो. जीव मात्र प्राणांसह तेथें असतो व प्राणांचे व्यापार सुव्यस्थित रीतीनें चालत असतात. असो, या स्थानावर जीव असला व त्याच्या वासनादि उपाधी निद्राकाळीं वियमान नसल्या, म्हणजे तो एकीभूत म्हणजे एकटा एक व सर्वथा एकरूप असतो. तो उपाधिशून्य असतो. म्हणून कोणास वाटेल कीं यावेळीं ज्ञानरूपी जीवाचें ज्ञान प्रकट व्हावें व शुद्ध ब्रह्मस्थितीचा अनुभव जीवास व्हावा, तो ब्रह्म व्हावा, पण तसें वाटणें योग्य नाहीं. कारण श्रुति म्हणते कीं, तो यावेळीं कारणदेहांत असल्यामुळें त्याला अविद्येनें वेष्टिलेलें असतें, तो प्रज्ञानघन असतो, म्हणजे त्याला जागृतावस्थेंत व स्वप्नस्थितींत होणारीं मिथ्याज्ञानें होत नाहींत, तीं जणूं कांहीं घन (घट्ट) होतात आणि एक अज्ञान मात्र जिवंत असतें. याप्रमाणें सर्व बाह्य विषय अस्तंगत झाल्यामुळें ज्ञानरूप अज्ञानी जीव आपल्या आनंदरूपाचा उपभोग मात्र घेत असतो. हें कशावरून ? जागा झाल्यावर तो म्हणतो कीं 'मी सुखरूप निजलों होतों, मला कांहीं एक ज्ञान नव्हतें.' हें म्हणणें स्मरणात्मक आहे. अनुभवाशिवाय स्मरण होणें अशक्य आहे. यावरून गाढानिद्राप्रसंगीं तो सुखाचा आस्वाद घेत होता, हें स्पष्ट आहे. म्हणून 'आनंद-भुक्' असें श्रुतीनें विशेषण दिलें. पण अज्ञानाचें घन दाट वेष्टण होतें म्हणून त्याला 'आपण आनंदाचा उपभोग घेत आहों,' हें भान निद्राकाळीं असत नाहीं हें स्पष्ट करण्यासाठीं श्रुतीनें जीवाला 'आनंदमय' असें म्हटलें आहे. निद्राकाळीं जीव 'आनंदमय' असतो, पूर्णानंदी नसतो, कारण आनंदाच्या उपभोगाची जाणीव त्याला निद्राकाळीं नसते. असो; या वेळीं जीवाचें जाणण्याचें साधन एक 'चेत' मात्र असतें. अतएव त्याला चेतोमुख' असें म्हटलें. स्वप्न-जागृत-स्थितींत जाण्याला किंवा त्यांतून निद्रास्थितींत येण्याला 'चेत' हें द्वार (साधन) आहे हें दाखविण्यासाठीं 'चेतोमुख' विशेषण श्रुतीनें उपयोजिलें आहे. शिवाय स्वप्नजागृतींत विषयदर्शनांची अनेक द्वारें (मुखें) असतात, तसें येथें नसून एक चेत मात्र अनावृत (उघडें) असतें म्हणून त्याला चेतोमुख म्हटलें. अशा या निद्रास्थितींत असणाऱ्या जीवाला (आत्म्याला) प्राज्ञ म्हणजे सर्वज्ञ असें म्हणतात. कारण याला पाठीमागील, पुढील व सद्यःप्रसंगीचें ज्ञान असतें. निद्राकालच्या पूर्वीचें स्थितींत जो स्वरूपानुभव येत नाहीं, तो उपभोगिण्याचें सामर्थ्य असणें इत्यादि प्रकारांवरून 'प्राज्ञ' हें विशेषण निद्रित जीवाला उत्तम शोभतें.

याप्रमाणें एकस्वरूप, बाह्यविषयज्ञानशून्य, आनंदी, आनंदमात्र भोगणारा ज्ञानैकसाधन जो जीवात्मा हा आत्म्याचा तृतीयचरण होय असें ठरलें. जागृत-स्थिति, स्वप्नस्थिति आणि निद्रास्थिति (यांतच मूर्च्छा इत्यादिकांचा अंतर्भाव होतो)

या जीवाच्या तीन अवस्था आहेत व त्या उत्तरोत्तर सूक्ष्म अवस्था आहेत, असें दिसतें. विश्व, तैजस आणि प्राज्ञ, असे या तीन अवस्थांचे अधिष्ठाते आहेत.

जीवाच्या तीन अवस्था.

| स्थान | ज्ञानविषय | अंगें | मुखें | भोग | नांव | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | व्यष्टि | समष्टि |
| जागरित | बाह्य ( शब्दादि ) | बाह्य ७ मस्तकादि | बाह्य १९ इंद्रियादि | स्थूळ | वैश्वानर ( विश्व ) | विराट् |
| स्वप्न | आंतर ( वासना इत्यादि ) | आंतर (मस्तकादि) | आंतर (इंद्रियादि) | सूक्ष्म ( प्रविविक्त ) | तैजस | हिरण्यगर्भ |
| सुषुप्ति | ज्ञानघन बाह्य(ज्ञान नाहीं,वासना नाहीं) | आनंदमय व एकरूप (अंग नाहीं) | चेतः | आनंद | प्राज्ञ | शबल ब्रह्म |

वरील कोष्टकावरून प्रत्येक चरणाचें स्वरूप व तदितरभेद लवकर लक्ष्यांत येतील, असें वाटतें. परमार्थाच्या दृष्टीनें निद्रास्थिति पुष्कळ सूक्ष्म पण व्यावहारिक दृष्टीनें अज्ञानमय आहे. परमार्थाला जावयाचें तें विषयनिवृत्ति करून जावयाचें आहे. या दृष्टीनें जागृति, स्वप्न व सुषुप्ति, ह्या अवस्था अनुक्रमें सूक्ष्म, सूक्ष्मतर आणि सूक्ष्मतम आहेत. पण या अवस्था जीवाच्या किंवा सोपाधिक आत्म्याच्या आहेत. म्हणून पुढचा मंत्र म्हणतो कीं:— ॥ ५ ॥

## मंत्र सहावा.

**एष सर्वेश्वर एष सर्वज्ञ एषोऽन्तर्याम्येषयोनिः**
**सर्वस्य प्रभवाप्ययौ हि भूतानाम् ॥ ६ ॥**

**अन्वय व अर्थः—एष सर्वेश्वरः, एषः सर्वज्ञः, एषः अंतर्यामी, एषः सर्वस्य योनिः ( हा सर्वस्वामी, सर्वज्ञ, अंतर्यामी आणि सर्वांचें आदिकारण आहे ) हि भतानां प्रभावाप्ययौ ( कारण सर्वांची उत्पत्ति व लय येथूनच होतात. ) ॥ ६ ॥**

वर कोष्टकांत समष्टि व व्यष्टि असे नांवाच्या सदरांत दोन विभाग दाखविले आहेत' त्यावरून विश्व असो किंवा विराट् असो, हे उभयतांही एकस्वरूपच आहेत, हें स्पष्ट दिसतें. अर्थात् प्राज्ञ हा व्यष्टीचा अंतर्यामी आणि 'शबल ब्रह्म' हें समष्टीचा अंतर्यामी, हेही अभिन्नच असले पाहिजेत! एक व्यक्तीचा अधिष्ठाता व दुसरा समष्टीचा नियामक इतकाच कायतो भेद, पण हा भेद गुणदृष्टींत नाहीं. उभयतांचे गुण समसमान आहेत. प्राज्ञ हा व्यष्टिदेहाचा स्वामी, व्यष्टिदेहाचा ज्ञानी, अंतर्यामी आणि इतर जागृत्यादि अवस्थांचें व जन्ममरणाचें कारण आहे. तसाच सगुण परमात्मा (ईश्वर) हा ब्रह्मांडाचा सर्वश्रेष्ठ स्वामी, सर्वदिशांनीं विश्वाला जाणणारा, त्याचा नियामक आणि त्याचीं उत्पत्तिस्थितिलयादि अवस्थांतरें करणारा आहे.

'पिंडीं तें ब्रह्मांडीं' असा पौरस्त्य आर्यांचा विसर्गसंबंधी सिद्धांत आहे. ब्रह्मांडाचीं उत्पत्त्यादि कार्यें होतात, तीं पिंडाच्या उत्पत्तिलयादि कार्यासारखीं असतात, असें आमचें 'सृष्टिशास्त्र' आम्हांस सांगतें. हल्लींचा उत्क्रांतिवाद घेतला तरी तो ह्याच सिद्धांताचें स्पष्टीकरण करील. पण ह्या सर्व प्रश्नाचा विचार उपसंहारप्रकरणीं करूं ॥ ६ ॥

---

* श्रीमद्गौडपादाचार्यकारिकाः—

## श्लोक पहिला.

**बहिष्प्रज्ञो विभुर्विश्वो ह्यन्तः प्रज्ञस्तु तैजसः।**
**घनप्रज्ञस्तथा प्राज्ञ एक एव त्रिधा स्मृतः ॥ १ ॥**

अन्वय व अर्थः—विभुः एकः एव त्रिधा स्मृतः; बहिष्प्रज्ञः विश्वः, तु अंतःप्रज्ञः तैजसः, तथा घनप्रज्ञः प्राज्ञः (एक श्रीपरमात्मा एकरूप असतांही तीन प्रकारांनीं दिसतो, असें श्रुतिस्मृती म्हणतात. पहा कीं, तो बाह्य विषयज्ञाता असला म्हणजे 'विश्व' असें नांव घेतो, तोच वासनादिकांचा मात्र ज्ञाता असला म्हणजे त्याला 'तैजस' असें नांव मिळतें आणि अंतर्बाह्य विषयाचें ज्ञान होत नसतें, तेव्हां त्यालाच 'प्राज्ञ' अशा संबोधनाचा लाभ होतो) ॥ १ ॥

---

* या उपनिषदावर श्रीमद्गौडपादाचार्यांच्या कारिका आहेत. प्रस्तुत उपनिषद् समजण्यास या अत्यंत उपयोगी आहेत. श्रीमदाचार्यांचें या कारिकेवर भाष्य आहे हें वाचकांस समजलेंच आहे.

अर्थ स्पष्ट आहे. एका आत्म्याच्या ह्या तीन अवस्था उपाधिपरत्वें होतात. हें ध्यानांत ठेवलें म्हणजे भिन्न ज्ञानसाधनांनीं त्याला तीन नांवें कां प्राप्त झालीं याची उपपत्ति समजते. इंद्रियांच्या साहाय्यानें विश्व पाहणारा तो विश्व, केवळ मनस्तेजानें वासनानिर्मित (कल्पनाजन्य) वस्तूंचें दर्शन घेणारा तैजस आणि ज्ञानरूपानें मात्र असून अज्ञान वेष्टित असणारा तो प्राज्ञ अशा आत्म्याच्या ज्ञान-प्राप्ति साधनांवरून तीन अवस्था होतात ॥ १ ॥

---

## श्लोक दुसरा.

**दक्षिणाक्षिमुखे विश्वो मनस्यन्तस्तु तैजसः ।**
**आकाशे च हृदि प्राज्ञस्त्रिधा देहे व्यवस्थितः ॥ २ ॥**

**अन्वय व अर्थः**—दक्षिणाक्षिमुखे विश्वः, तु मनसि अंतः तैजसः च हृदि आकाशे प्राज्ञः ( उजव्या डोळ्याच्या तोंडाशीं राहणारा तो विश्व, मनाच्या आंत राहणारा तो तैजस आणि हृदयांतील आकाशांत राहणारा तो प्राज्ञ होय ) त्रिधा देहे व्यवस्थितः ( या प्रमाणें शरीरांत हा आत्मा तीन अवस्थांत तीन ठिकाणीं तीन प्रकारांनीं असतो ) ॥ २ ॥

जागृतावस्थेतेंत उजव्या डोळ्यांत जीव राहतो, असें श्रुतीचें सांगणें आहे. डोळ्यांतील पाण्यावरून प्रथमतः जीवाची परिक्षा करितात, हें सर्वप्रसिद्ध आहे, असो; विश्व तेथें असतो. तैजसाची वसति मनांतील आंतल्या भागीं असते व प्राज्ञ हृदयाकाशांत असतो. याला हल्लींच्या शारीरशास्त्रांचा किती पाठपुरावा मिळतो, हें पाहणें हा मौजेचा विषय आहे. ॥ २ ॥

---

## श्लोक तिसरा.

**विश्वो हि स्थूलभुङ्नित्यं तैजसः प्रविविक्तभुक् ।**
**आनन्दभुक्तथा प्राज्ञस्त्रिधा भोगं निबोधत ॥ ३ ॥**

**अन्वय व अर्थः**—हि नित्यं विश्वः स्थूलभुक्, तैजसः प्रविविक्तभुक् तथा प्राज्ञः आनंदभुक् ( तसेंच विश्व हा नित्य बाह्य विषयभोक्ता, तैजस नित्य सूक्ष्मविषयभोक्ता आणि प्राज्ञ हा नित्य आनंदभोक्ता आहे ) त्रिधा

भोगं निबोधत ( याप्रमाणें तीन अवस्थांतील तीन निरनिराळे भोगविषय आहेत, असें जाणा ) ॥ ३ ॥

मनोबुद्धींसह इंद्रियशून्य जीव झाला म्हणजे तो शुद्ध आनंदाचा उपभोग घेत असतो, हें श्रुतिवचन श्रीमद्गौडपादाचार्यांनीं आपल्या कारिकेंत स्पष्ट केलें आहे ॥ ३ ॥

---

## श्लोक चवथा.

**स्थूलं तर्पयते विश्वं प्रविविक्तं तु तैजसम् ।**
**आनन्दश्च तथा प्राज्ञं त्रिधा तृप्तिं निबोधत ॥ ४ ॥**

अन्वय व अर्थः—स्थूलं विश्वं तर्पयते, तु प्रविविक्तं तैजसं, तथा आनन्दः प्राज्ञं ( स्थूलविषय ' विश्वाला ' तृप्त करितात; ' तैजसा'ला समाधान देणारे मनःकाल्पित सूक्ष्म विषय होत; आणि प्राज्ञाला समाहित करणारा शुद्धानंद आहे ) त्रिधा तृप्तिं निबाधत ( याप्रमाणें तृप्ति तीन अवस्थांत तीन प्रकारची असते ) ॥ ४ ॥

मागच्या कारिकेंत भोक्तृत्वाच्या दृष्टीनें भोग सांगितले, व या कारिकेंत भोगांच्या दृष्टीनें भोक्त्यांचा निर्देश केला. तात्पर्य एकच आहे ॥ ४ ॥

---

## श्लोक पांचवा.

**त्रिषु धामसु यद्भोज्यं भोक्ता यश्च प्रकीर्तितः ।**
**वेदैतदुभयं यस्तु स भुञ्जानो न लिप्यते ॥ ५ ॥**

अन्वय व अर्थः—त्रिषु धामसु यत् भोज्यं, यः च भोक्ता प्रकीर्तितः ( पूर्वोक्त तीन स्थानामध्यें ज्या भोज्यवस्तु—भक्षणवस्तु—सांगितल्या व जे भोक्ते सांगितले ) एतत् उभयं यः वेद, सः भुञ्जानः न लिप्यते ( त्या भोक्तृभोज्यांचें स्वरूप ज्याला स्पष्ट समजलें, तो भोग भोगित असला तरी त्याला त्या भोगांचा कसलाही लेप होत नाहीं )

सारांश तो लिप्त होत नाहीं ॥५॥

अवस्थांतरानें एकच आत्मा तीन प्रकारचा ज्ञाता व भोक्ता होतो, व तिन्ही प्रसंगीं तीन निरनिराळे भोग्य विषय घेतो, हें ज्ञान ज्याला होतें, उपाधिवशांत् भोक्तृत्व प्राप्त होतें, हें ज्याला समजतें, सारांश, भोक्तृत्व, भोज्यत्व, ज्ञातृत्व इत्यादि विकृति मूळ स्वरूपांत नसून केवळ त्या उपाधींच्या अनुषंगानें प्राप्त होतात, असें ज्ञानविज्ञान ज्याला होतें, तो पुरुष कसल्याही भोगानें लिप्त होत नाहीं, हें सांगण्याचें तात्पर्य आहे. आत्मा करीत नाहीं व भोगीत नाहीं, तो केवळ ज्ञानरूप आहे, हें त्याचें अखंड स्वरूप ध्यानांत असल्यामुळें तो ज्ञानी अलिप्त रहातो, हें उघड आहे. 'उत्क्रामन्तं स्थितं वा पि'चा भगवदुक्त श्लोकांत हाच अभिप्राय आहे, हें तज्ज्ञांस सांगणें नलगे ॥ ५ ॥

---

## श्लोक सहावा.

**प्रभवः सर्वभावानां सतामिति विनिश्चयः।**
**सर्वं जनयति प्राणश्चेतोऽशून्पुरुषः पृथक् ॥ ६ ॥**

**अन्वय व अर्थः—सतां सर्वभावानां प्रभवः इति विनिश्चयः** ( सर्व जें कांहीं दृश्य आहे, जे जे भिन्न पदार्थ दिसतात, ते उत्पन्न झालेले असतात, असा सिद्धांत आहे ) **प्राणः सर्वं जनयति** ( प्राण—परमेश्वर—हें सर्व उत्पन्न करितो ) **चेतोऽशून्** ( हे सर्व भाव—पदार्थ—म्हणजे ज्ञानसूर्याचे किरण होत ) **पुरुषः पृथक्** ( पुरुष जो आत्माराम हा प्रभवकर्ता नव्हे व विलयकर्ता नव्हे, तो शुद्ध पृथक् म्हणजे निराळा आहे ) ॥६॥

वरील अन्वयार्थ संप्रदायपद्धतीहून भिन्न पण तात्पर्यांत एक आहे, असें मला वाटतें. जें कांहीं दिसतें, भासतें, तें सर्व जन्ममरणाच्या स्वाधीन असतें. मात्र येथें मायाविकृत मायिक वस्तूचाच नव्हे, तर खपुष्प, शशशृंग वंध्यापुत्र इत्यादि असत् व असंभाव्य वस्तूचाही विचार कर्तव्य नाहीं. मायिक वस्तु मायेंत तरी उत्पन्न होतात, असें दिसतें. पण शशविषाणादि पदार्थ उत्पन्न होणें शक्यच नाहीं, तेव्हां त्यांस जन्ममरण आहे, नाहीं, हें सांगण्याचें ही कारण नाहीं. ब्रह्मवस्तु दिसत भासत नाहीं म्हणून, तिला जन्ममरण नाहीं,हें तर खरेंच; पण ती वस्तु असत् नाहीं,सर्व दृश्य भास्यजातीला सत्ता देणारी वस्तु स्वतः असत् आहे, असें मोठ्या नास्तिक तर्कवाचस्पतीलाही म्हणतां येणें शक्य नाहीं. असो; ब्रह्म व अशक्य वस्तु शिवाय करून इतर सर्व पदार्थ उत्पन्न होतात, असा **शहाणे** पुरुषांचा सिद्धांत आहे, असा ही अन्वयार्थ होऊं शकेल. पण जेथें श्रुतिस्मृतींचा अवतार होऊन सत्य सिद्धांताचा निश्चय होतो, तेथें अनिश्चयात्मक शिष्टाभिप्रायाचे मुळींच महत्त्व नाहीं, असें मी म्हणतों. असो

तात्पर्य हें कीं दृश्यभास्य वस्तु उत्पत्तिमरणाधीन आहे, यांची उत्पत्ति करितो कोण ? प्राण सर्वोत्पादक आहे, हें ह्या प्रश्नाला उत्तर आहे. हें सर्व चराचर ( सजीव निर्जीव; आधिदैविक, आध्यात्मिक आणि आधिभौतिक ) म्हणजे ज्ञानरवीचे किरण होत. सत्ता ( अस्तित्व ) म्हणजे ज्ञान होय, असें आपण अनेक वेळ समजून घेतलें आहे. तेव्हां ज्ञानरूप परमात्म्याच्या आड अविद्या आली, जीवांचें कर्मवासनाजन्य अज्ञानाचा ( मग हें अज्ञान ज्ञानरूपाला आवृत करो किंवा अन्यथाज्ञान उत्पन्न करो ) पडदा जीवांच्या व परमात्म्याच्या मध्यें व्यवहारकाळीं येतो. तो असला म्हणजे त्या ज्ञानरूप रवीचे किरण या पडद्यांतून बाहेर येतात आणि जीवांस चराचर विश्व दृश्यभास्य किंवा कल्पनागम्य होतें. हीच पदार्थांची उत्पत्ति होय. असो; या उत्पत्तीला किंवा विलयाला प्राण ( हिरण्यगर्भ ) कारण आहे. त्याच्या सत्तेनें हें सर्व होतें. अर्थात् सत्स्वरूप जो शुद्ध आत्माराम तो आपल्या निर्विकार स्थितींत सहजस्वरूपानें असतो, आणि हें त्याचें दृश्यविलक्षण स्वरूप निराळें असतें, हें स्पष्टपणें सांगण्याचें आतां कारणही नाहीं. संप्रदाय पद्धतीनें केलेल्या अर्थांत व या अर्थांत तात्पर्यदृष्टीनें भेद नाहीं, हें तज्ज्ञांस सांगणें नलगे ॥ ६ ॥

---

## श्लोक सातवा.

**विभूतिं प्रसवं त्वन्ये मन्यन्ते सृष्टिचिन्तकाः ।**
**स्वप्नमायासरूपेति सृष्टिरन्यैर्विकल्पिता ॥ ७ ॥**

अन्वय व अर्थः—अन्ये सृष्टिचिंतकाः तु विभूतिं प्रसवं मन्यन्ते ( सृष्टीच्या उत्पत्तीसंबंधानें तर्कान्वित विचार करणारे दुसरे कोणी विद्वान् मानितात कीं, परमेश्वर आपल्या विभूतींच्या द्वारां ही सर्व सृष्टि उत्पन्न करितो ) सृष्टिः स्वप्नमायासरूपा इति अन्यैः विकल्पिता (दुसरे कांहीं शोधक म्हणतात कीं, ही सृष्ट म्हणजे स्वप्न किंवा माया होय. स्वप्नांतील पदार्थ मिथ्या किंवा माया-मंत्रानें किंवा हात चलाखीनें दिसूं भासूं लागणें हें मिथ्या, त्याप्रमाणें ही सृष्टि मिथ्या, असत् आहे)॥ ७ ॥

पहिले शोधक आस्तिक आहेत व परमेश्वरी ऐश्वर्यानें ही सृष्टि उत्पन्न होते, सृष्टि म्हणजे परमेश्वराच्या विभूतींपैकीं एक विभूति आहे, असें म्हणतात. दुसरे शोधकांस वाटतें कीं, ही सृष्टि परमार्थतः सत्य नाहीं, इतकेंच नव्हे, तर व्यवहारांतसुद्धां सत्य नाहीं ! हा सर्व जीवाच्या कल्पनांचा विलास आहे. बौद्धांचा एक पंथ बाह्यसृष्टि नाहीं असें म्हणतो. या पंथाला ' विज्ञानवादी ' पंथ म्हणतात.

ह्या कल्पना श्रीगौडपादाचार्यांस मान्य नाहींत, हें स्पष्ट आहे. आणखी च कल्पनांचा उल्लेख भगवान् गौडपाद करणारच आहेत ॥ ७ ॥

---

## श्लोक आठवा.

**इच्छामात्रं प्रभोः सृष्टिरिति सृष्टौ विनिश्चिताः ।**
**कालात्प्रसूतिं भूतानां मन्यन्ते कालचिन्तकाः ॥८॥**

अन्वय व अर्थः—प्रभोः सृष्टिः इच्छामात्रं इति सृष्टौ विनिश्चिताः ( प्रभूची ही सृष्टि त्याच्या संकल्पानेंच उत्पन्न झाली, असा कांहीं एकांगी तत्त्ववेत्त्यांनीं सिद्धांत केला आहे ) कालचिंतकाः भूतानां कालात्, प्रसूतिं मन्यंते ( कालाचे अभिमानी ही सृष्टि कालनिर्मित आहे, असें म्हणतात ) ॥८॥

प्रभूनें इच्छा केली आणि तदनुसार ही सृष्टि झाली, असें कांहीं म्हणतात व कांहींचें असें मत आहे कीं, कालाच्या सामर्थ्यानें ह्या सृष्टीचा उदय झाला आहे. बहुतेक द्वैताभिमानी धार्मिक तत्त्ववेत्ते पहिल्या वर्गांत म्हणजे 'प्रभु-संकल्पा' च्या वर्गांत येतात व दुसरे म्हणतातः सृष्टि उत्पन्न होण्याची वेळ आली आणि ती झाली. 'कालाय तस्मै नमः' असे म्हणणारे लोक पहिल्यापासून आहेतच 'कालोऽस्मि लोक-क्षयकृत् प्रवृद्धः' असें श्रीकृष्ण भगवान्ही गीतेंत म्हणून गेले आहेत ॥ ८ ॥

---

## श्लोक नववा.

**भोगार्थं सृष्टिरित्यन्ये क्रीडार्थमिति चापरे ।**
**देवस्यैष स्वभावोऽयमाप्तकामस्य का स्पृहा ॥ ९ ॥**

अन्वय व अर्थः—अन्ये भोगार्थं सृष्टिः इति, अपरे क्रीडार्थं इति, ( कांहीं म्हणतात, ही सृष्टि केवळ भोग भोगावे एतदर्थ आहे, कोणी म्हणतात, ही परमेश्वरी लीला आहे ) एषः अयं देवस्य स्वभावः ( हा सृष्ट्युत्पत्तीचा प्रकार म्हणजे देवाचा—परमात्म्या ।—स्वभाव आहे ) आप्त-कामस्य स्पृहा का ( ज्याचे सर्व काम पूर्ण झाले आहेत, त्याला इच्छा इत्यादि कोठून असणार ? ) ॥ ९ ॥

आणखी, ' भोगप्राप्त्यर्थ सृष्टि आहे ' असें मीमांसक म्हणतात ' व ही सृष्टि म्हणजे भगवंताची लीला आहे ' असे कित्येक भक्त म्हणतात. पण या सर्वांस भगवान् गौडपादाचार्यांचें एकच उत्तर आहे, तें हेः जो परमेश्वर स्वतः पूर्णकाम आहे, पूर्ण आहे, त्याला विभूती दाखविण्याची हौस, जादुगारी करण्याची हांव, उत्पन्न करण्याची इच्छा, तटस्थ राहून कालद्वारा घडामोड करण्याची आवड, भोग भोगण्याची किंवा खेळ खेळण्याची मनीषा असणें शक्य नाहीं. तेव्हां सृष्टि उत्पन्न करणें किंवा नाहींशी करणें, हा सर्व त्याच्या स्वभावाचा म्हणजे मायेचा विलास आहे, हें तात्पर्य आहे ॥६॥

---

## मंत्र सातवा.

**नान्तःप्रज्ञं न बहिष्प्रज्ञं नोभयतः प्रज्ञं न प्रज्ञानघनं न प्रज्ञं नाप्रज्ञम् । अदृष्टमव्यवहार्यमग्राह्यमलक्षण-मचिन्त्यमव्यपदेश्यमेकात्मप्रत्ययसारं प्रपञ्चोपशमं शान्तं शिवमद्वैतं चतुर्थं मन्यन्ते स आत्मा स विज्ञेयः ॥ ७ ॥**

**अन्वय व अर्थः—न अन्तःप्रज्ञं, न बहिष्प्रज्ञं, न उभयतः प्रज्ञं, न प्रज्ञानघनं, न प्रज्ञं, न अप्रज्ञं, ( तो अन्तःप्रज्ञ नाहीं, बाह्यप्रज्ञ नाहीं, तो अंतर्बाह्यप्रज्ञ नाहीं, तो प्रज्ञानघन नाहीं, तो प्रज्ञ नाहीं व अप्रज्ञही नाहीं ) अदृष्टं, अव्यवहार्यं, अग्राह्यं, अलक्षणं, अचिंत्यं, अव्यपदेश्यं, एकात्म-प्रत्ययसारं, प्रपञ्चोपशमं, शांतं, शिवं, अद्वैतं चतुर्थं मन्यन्ते ( ज्ञान—विज्ञानी जीवन्मुक्त असें निश्चयानें मानितात कीं, तो अदृष्ट, अशब्दगोचर अचिंत्य, विलक्षण, नामशून्य, एकात्मत्वाच्या प्रत्ययाचें सार, प्रपंचविना-शक, शांत, मंगलकारी आणि अद्वितीय, असा चतुर्थावस्थेंत राहणारा आहे ) सः आत्मा; सः विज्ञेयः ( तोच आत्मा होय; त्याचेंच विज्ञान करून घेतलें पाहिजे ) ॥७॥**

या मंत्रांत नित्य आत्म्याची जी सहजावस्था, तिचें वर्णन केलें आहे. तो ज्ञान-रूप, अद्वितीय, सर्वज्ञानांचें अधिष्ठान असून प्रपंचशून्य आहे. सर्व प्रपंचाचा म्हणजे संसारात्मक जीवनमरणाचा नाश करणारा असून तो शांत ( सुखदुःखशून्य, निर्विकार ) मंगल आणि मंगलास्पद आहे. अर्थातच हा एकरस आत्मा मानसिक ( काल्पनिक )

विज्ञानांचा किंवा आधिभौतिक विज्ञानांचा (शब्दस्पर्शादिस्थूल विषयाचा) ग्राहक नाहीं. किंवा तो उभयविज्ञानें मिळून होणाऱ्या संघाचाही ग्राहक नाहीं. तो निद्रावस्थेतील प्रज्ञानघन (अज्ञानी) अथवा सर्व विशेष ज्ञानाचा ग्राहक नाहीं,तो प्रज्ञ नाहीं, व अप्रज्ञ ही नाहीं, म्हणजे तो विषयज्ञाता नाहीं व विषय ज्ञाता नाहीं, असें ही नाहीं. सारांश, हीं जीं निषेधात्मक विशेषणें श्रुतीनें उल्लेखित केलीं आहेत, त्यावरून आपण असा बोध व्यावयाचा आहे, कीं कोणत्याही अंतर्बाह्य साधनांच्या द्वारें या ज्ञानरूपी आत्म्याला अंतर्बाह्य ज्ञानविज्ञान होतें असें नाहीं. तो जागृतादि तिन्ही अवस्थांच्या पलीकडे असून ज्ञानरूप आहे. म्हणून त्या त्या अवस्थांत उपलब्ध होणाऱ्या ज्ञानसाधनांची किंवा भोगसाधनांची त्याला उपयुक्तता किंवा अपेक्षा नसते. तसेंच,त्याच्याशिवाय दुसरी वस्तुच नाहीं, म्हणून तो सर्वज्ञ आहे असें ही म्हणतां येत नाहीं व तो स्वरूपतः ज्ञानरूप आहे म्हणून तो सर्वज्ञ नाहीं, असें ही म्हणतां नये. हें त्याचें स्वरूपवर्णन झालें व तो ज्ञाता नाहीं, असें ठरलें.

आतां त्याचें ज्ञान-विज्ञानाला कांहीं साधनें आहेत काय ? तो ज्ञेय आहे काय ? असें पाहूं गेलें असतां काय निष्पन्न होतें, पहाः तो इंद्रियांनीं गोचर होत नाहीं, तो कर्मेंद्रियांस अप्राप्य आहे, त्याला कांहीं लक्षण ( चिन्ह ) नाहीं कीं, त्यायोगें त्याचें अनुमान करितां येईल, किंवा त्याला कांहीं तरी नाम आहे काय ? कीं, ज्या नांवानें त्याला संबोधितां येईल, किंवा त्या विषयीं कांहीं बोलतां येईल ? एवंच सर्व ज्ञानकर्मेंद्रियांस तो अगोचर आहे व प्रमाणांस अगोचर आहे, असें झालें. बरें, मनोबुद्धीत्यादिकांच्या द्वारें त्याचें चिंतन करावें म्हटलें तरी साधत नाहीं. कारण तो मनादिकांच्या पलीकडे असून त्यांसच अस्तित्व देणारा आहे. अनुभव येईल म्हणावें, तर तसेंही नाहीं; कारण तो सर्व अनुभवांचा अधिष्ठाता आहे. सारांश, सर्वांच्या पलीकडचा तो आहे. अशी कोणतीही वस्तु नाहीं कीं, जी त्याच्याहून भिन्न असून त्यांच्या पलीकडे राहील आणि त्याचें ज्ञान करून घेईल. खरेंच आहे, कोणत्याही वस्तूचें सर्व बाजूंनीं ज्ञान करून घ्यावयाचें म्हणजे ज्ञात्यानें व ज्ञानसाधनांनीं ज्ञेयवस्तूच्या पलीकडे जाऊन त्याचें निरीक्षण केलें पाहिजे. पण असा संबंधच येथें उत्पन्न होत नाहीं. फार फार झालें तर तो स्वसंवेद्य आहे, ज्ञात्यानें सर्व उपाधींचा परित्याग करून 'मी' ( त्यागकर्ता ) चा ही परित्याग करावा, तेव्हां ज्ञात्याचें ज्ञातृत्व नष्ट होऊन तो ज्ञानरूप ( ब्रह्म ) होतो. येथें आत्मरूप समजेल. पण 'समजते' असें मुद्दां म्हणतां नये ! 'समजले' म्हणजे आत्मरूप ज्ञेय होईल !! तात्पर्य ज्ञानरूपावर 'ज्ञेयत्वाचा' आरोप केव्हांही किंवा कसाही करितां येत नाहीं. एवंच, तो ज्ञेय नाहीं, असें ठरलें.

वस्तु ही ज्ञाता किंवा ज्ञेय, या कोणत्यातरी स्वरूपांत असली पाहिजे. आत्मवस्तु ज्ञाती नाहीं, ज्ञेय नाहीं, किंवा जीवासारखी कांहीं ज्ञातृ किंवा ज्ञेय अशी नाहीं. म्हणन

ती वस्तु नाहीं, खपुष्पाप्रमाणें ती असत् आहे, हें ही पण म्हणतां नये. कारण ती अस्ति-भातिप्रियरूप आहे, व ती आहे म्हणून, सर्व व्यवहार होतात व तिचा उपयोग होतो, म्हणजे तिच्या ध्यानानें तत्त्वज्ञजीवाचा दुःखोपशम होऊन त्याला मंगलास्पद शांति मिळते. ही तुरीयावस्था म्हणजे सहज आत्मरूप-होय ॥ ७ ॥

---

श्री गौडपादकृत कारिका.

## श्लोक दहावा.

**निवृत्तेः सर्वदुःखानामीशानः प्रभुरव्ययः ।**
**अद्वैतः सर्वभावानां देवस्तुर्यो विभुः स्मृतः ॥ १० ॥**

अन्वय व अर्थः-सर्वदुःखानां निवृत्तेः ईशानः, प्रभुः अव्ययः, सर्वभावानां अद्वैतः; देवः तुर्यः विभुः स्मृतः ( विद्वान् तत्त्ववेत्यांचा असा निश्चय आहे कीं, सर्व द्वैतात्मक दुःखांच्या निवृत्तीचा अधिपति जो प्रभु आत्मा, तो निर्विकार आहे व सर्व दृश्यभास्यांस अद्वैतत्व देणारा हा ज्ञानभास्कर सर्वव्यापी आहे ) ॥ १० ॥

उपनिषद्-मंत्रांत ' प्रपंचोपशम, शिव, शांत, इत्यादि मंगलास्पद एकरस विशेषणें आत्म्यास दिलीं आहेत, त्यांचे स्पष्टीकरण करणारी ही कारिका आहे. शुद्ध ज्ञानरवि असणारा आत्मा हा निर्विकार व अक्षर आहे व तो जागृतादि अवस्थांत प्राप्त होणाऱ्या दुःखांची निवृत्ति करणारा स्वामी आहे. हा आत्मा आपलें स्वरूप होय, असा निश्चय झाला म्हणजे, तिन्ही अवस्थांत प्राप्त होणाऱ्या सुखदुःखांविषयीं आपण उदासीन होतो. ममत्व सुटलें म्हणजे आपण दिलेल्या किंवा विकलेल्या वस्तूविषयीं आपल्यास हर्षखेद होत नाहींत. आपलें बसावयाचें घोडें आपण विकलें म्हणजे त्या घोड्यावर एकजण स्वार होवो किंवा दोन बसोत, आपण निर्धास्त असतो व हा अनुभव प्रत्यक्ष येतो. असो; हें आत्मस्वरूप समजलें म्हणजे सर्व दृश्याचा अस्त होतो. मग अस्तंगत झालेले पदार्थ काय सुखदुःख देणार ! ही तुरीयावस्था होय ॥ १० ॥

---

## श्लोक अकरावा.

**कार्यकारणबद्धौ तावित्येते विश्वतैजसौ ।**
**प्राज्ञः कारणबद्धस्तु द्वौ तौ तुर्ये न सिध्यतः ॥११॥**

**अन्वय व अर्थः**—**तौ विश्वतैजसौ कार्यकारणबद्धौ इष्येते** ( विश्व व तैजस हे दोन्ही पाद कार्यकारणबद्ध आहेत असें ठरतें ) **प्राज्ञः तु कारणबद्धः** ( आणि प्राज्ञ हा कारणबद्ध आहे ) **तौ द्वौ तुर्ये न सिध्यतः** ( ते विश्वतैजस व प्राज्ञ हे उभयता किंवा कार्यकारणबद्धता व कारणबद्धता ही तुर्यावस्थेंत आहेत, असें ह्मणणे किंवा असणें संभवनीय नाहीं ) ॥ ११ ॥

या कारिकेंत आत्मा स्वरूपतः कार्यकारणबद्ध नाहीं, तसाच कारणबद्ध नाहीं, असें सांगितलें. जीवाला निद्रा येतें याचें कारण अविद्या होय. आपल्या ज्ञानस्वरूपाचें भान आपल्यास नसणें व 'आपल्यास कांहीं कळत नव्हतें' असें स्मरण असणें, हा सर्व अविद्येचा, मायेचा, खेळ आहे. सारांश प्राज्ञ हा अविद्येनें बद्ध झालेला आहे. अविद्या ज्ञानाला आवृत करिते ( झांकून टाकिते. ) 'अज्ञानेनावृतं ज्ञानं' असें भगवान्ही म्हणतात. असो; ही कारणरूप अविद्या जीवाच्या ज्ञानस्वरूपाला आवृत्त करून थांबत नाहीं, ती अन्यथाज्ञान उत्पन्न करिते. जागृतींत काय, स्वप्नांत काय, आपल्याला विषयज्ञान होऊन 'आपण **देहादि** आहों, **आपलीं** मुलेंबाळें आहेत' हें विपरीत ज्ञान, हा विक्षेप म्हणजे अविद्येचें कार्य होय. याप्रमाणें अविद्याजन्य विक्षेपानें जागृतस्वप्नावस्था बद्ध आहेत, कार्याकारण बद्ध आहेत, असें ठरलें. अर्थातच ज्ञानरूपाला अविद्या आवृत करूं शकत नाहीं ह्मणून, विक्षेप तेथें नसतात. तसेंच, ज्ञानरूपांत किंवा तुर्यावस्थेंत अज्ञान कारण नसतें. त्याचीं कार्येंही नसतात. एवंच तो, कारण अज्ञानानें व कार्य जो विक्षप त्यानें बद्ध नसल्यामुळें सर्वतः मुक्त आहे व अवस्थात्रयातीत आहे, हें ठरलें ॥ ११ ॥

---

## श्लोक बारावा.

**नाऽत्मानं न परांश्चैव न सत्यं नापि चानृतम् ॥**
**प्राज्ञः किंचन संवेत्ति तुर्यं तत्सर्वदृक्सदा ॥ १२ ॥**

**अन्वय व अर्थः**—**प्राज्ञः न आत्मानं, न परान्, न सत्यं, न अनृतं, किंचन संवेत्ति** ( निद्रावस्थेंतील प्राज्ञाला कोणतेंच ज्ञान असत नाहीं; त्याला स्वज्ञान नसतें, स्वेतर ज्ञान नसतें, त्याला सत्यही समजत नाहीं व असत्य ही समजत नाहीं, सारांश कांहीं समजत नाहीं. ) **तुर्यं सदा तत् सर्वदृक्** ( पण तुर्य हा सदैव सर्वज्ञ असतो. ) ॥ १२ ॥

या कारिकेचा अर्थ स्पष्ट आहे. गाढ झोपी गेलेल्याला आपपर भान नसतें, सत्यासत्याची जाणीव नसतें, सारांश कांहीं न समजण्याची ही प्राज्ञस्थिति असते. कारण या वेळीं आंतबाहेर सर्वत्र अज्ञान पसरलेलें असतें. हें अज्ञान म्हणजे विशेषज्ञानाची जाणीव करून घेण्याची असमर्थता होय. पण या वेळीं सामान्यज्ञान (आत्मज्ञान, स्वरूपज्ञान) असून ही नसल्यासारखें असतें. म्हणून आत्मरूपाचा आनंद उपभोगित असतांहीं प्राज्ञाला स्वरूपाचें किंवा आनंदोपभोगाचें भान नसतें. मात्र जागा झाल्यावर 'मी सुखानें निजलों होतों. मला कांहीं कळत नव्हतें' असें स्मरण असतें. यावरून निद्रास्थिति तुर्यहून भिन्न आहे, हें स्पष्ट आहे. तुर्या ही सर्वदृक् म्हणजे आत्मरूप असणारी म्हणजे जाणणारी व सर्वत्र आत्मरूपाचा अनुभव घेणारी आहे. हा विशेष विसरूं नये ॥ १२ ॥

---

## श्लोक तेरावा.

**द्वैतस्याग्रहणं तुल्यमुभयोः प्राज्ञतुर्ययोः।**
**बीजनिद्रायुतः प्राज्ञः सा च तुर्ये न विद्यते ॥ १३ ॥**

**अन्वय व अर्थः**—उभयोः प्राज्ञतुर्ययोः द्वैतस्य अग्रहणं तुल्यं (प्राज्ञ आणि तुर्या यांस एक गोष्ट साधारण आहे; म्हणजे उभयस्थितींत द्वैताचें, भिन्नत्वाचें, विषयविषयींचें ग्रहण होत नाहीं) प्राज्ञः बीजनिद्रायुतः (पण प्राज्ञ हा बीजनिद्रेनें, द्वैत उत्पन्न करणाऱ्या अविद्येनें, युक्त असतो) सा च तुर्ये न विद्यते (ही निद्रा म्हणजे अज्ञानोत्पादी व द्वैताचें कारण असणारी तुर्यमध्यें नसते) ॥ १३ ॥

येथील भावार्थही स्पष्ट आहे. स्थूल किंवा सूक्ष्म अंतर्बाह्य विश्वाचें ग्रहण निद्रेंत किंवा तुर्यावस्थेंत होत नाहीं. कारण द्वैताचें ग्रहण करणारीं मनबुद्ध्यादि ज्ञानकर्मेंद्रियें येथें नसतात. म्हणून द्वैताग्रहणाच्या संबंधानें उभयतांत समानता आहे. पण प्राज्ञ हा अविद्येनें, तत्त्वज्ञानग्रहणाच्या अभावानें युक्त असतो; म्हणून त्याला आत्मस्वरूपाचेंही भान नसतें. आतां हें अज्ञान तुर्यंत असणें शक्य नाहीं. म्हणून तुर्यंत आत्मस्वरूपाची जाणीव स्पष्ट असते. अविद्या ही ज्ञानावर झांकण घालणारी व अयथार्थ ज्ञानाचें बीज असणारी आहे, म्हणून निद्रावश पुरुषही मायेच्या साम्राज्यांत असतो. ज्ञानरूप तुर्या मायातीत आहे. ॥ १३ ॥

---

## श्लोक चवदावा.

**स्वप्ननिद्रायुतावाद्यौ प्राज्ञस्त्वस्वप्ननिद्रया ।**
**न निद्रां नैव च स्वप्नं तुर्ये पश्यन्ति निश्चिताः ॥ १४ ॥**

**अन्वय व अर्थः—आद्यौ स्वप्ननिद्रायुतौ** ( विश्व आणि तैजस हे स्वप्न आणि निद्रा यांनीं संवलित असतात ) **प्राज्ञः तु अस्वप्ननिद्रया** ( पण प्राज्ञ हा निःस्वप्ननिद्रेनें घेरलेला असतो ) **तुर्ये निश्चिताः निद्रां न, स्वप्नं एव च न, पश्यंति** ( म्हणतां तुर्यमध्यें ज्यांचा निश्चय झाला, आत्मस्वरूपाची ओळखण समाधीमध्यें ज्या जीवन्मुक्तांस निश्चितस्वरूपानें झाली, त्यांस अज्ञाननिद्रा पीडा देत नाहीं किंवा द्वैतदर्शनरूपी स्वप्नही बाधा करीत नाहीं. त्यांचा ध्यास ब्रह्मपर असल्यामुळें निद्रेंत ते सावध असतात व जागृतिस्वप्नांतही त्यांस आत्मरूप दिसत असतें ) ॥ १४ ॥

जागृतीमध्यें आपण मूर्तामूर्त विश्व पाहतों, पण वस्तुतः तें स्वप्नच असतें. कारण मनोबुद्ध्यादिकांनीं **दाखविल्याप्रमाणें** तें विश्व व त्यांतील पदार्थ **आहेत**, असें आपण समजतों; पण वास्तविक तशी स्थिति नसते. अनेक कारणांनीं वस्तु आहे, तशी आपल्यास दिसत नाहीं, परिस्थिति, इंद्रियरचना, मनोघटना, बुद्धिविकास, अहंवृत्ति इत्यादि-अनेक कारणें दृश्य वस्तूंचें स्वरूप अन्यथा करीत असतात; पण आपण मात्र मनानें कल्पितों कीं, जशी वस्तु दिसते, तशीच आहे. ही मनःकल्पित सृष्टि आपण निर्मूळ निर्माण करितों म्हणून, तिला स्वप्न म्हटलें. निद्रेपूर्वीच्या स्वप्नाची हीच हकीकत आहे, हें सांगावयास मुद्दां नको. असो; इंद्रियांनीं पाहून त्यावर अंतःकरणानें आपले शिक्कामोर्तब केलेले पदार्थ असोत किंवा मनानें ते वासनेच्या साहाय्यानें कल्पिलेले असोत, ते सर्व मनःकल्पित म्हणून स्वप्नवत् होत. ही स्वप्नस्थिति किंवा जागृत्स्वप्नस्थिति अविद्येचें कार्य आहे. जेथें कार्य असतें, तेथें उपादान कारणाचें वास्तव्य असलेंच पाहिजे. म्हणून जागृतीचा अधिष्ठाता विश्व व स्वप्नाचा अधिष्ठाता तैजस, हे उभयताही 'स्वप्ननिद्रायुत' आहेत, असें श्रीगौडपादाचार्य म्हणतात. गाढ निद्रेंत मात्र निःस्वप्नस्थिति असते. हा प्राज्ञ आणि विश्वतैजसांमध्यें विशेष आहे. तिन्ही अवस्थांत निद्रेचें म्हणजे अज्ञानाचें वास्तव्य आहे; पण जागृत्स्वप्नस्थितींत निद्रा असून पुनः विपरीत भावना आहे. जागृतींतील स्वप्न मूर्तविषयात्मक असतें व व्यवहारांत त्याला सत्यपणा असतो पण स्वप्नांतील विश्व केव्हां दृश्यविश्वाचें प्रतिबिंब किंवा केव्हां मनोमात्र-निर्मित कल्पनास्वरूप असते, जागृतींत त्याचा बाध होतो. इतकाच

काय तो या उभयतांत फरक आहे. ही संसारी पुरुषांच्या जीवस्वरूपाची काहणी झाली. आतां, जो जीवन्मुक्त असतो, त्याचें अज्ञान सर्वतोपरी विनष्ट झालें असल्यामुळें त्याला अविद्येची निद्रा लागत नाहीं किंवा इतर दोन्ही अवस्थांतील स्वप्नस्थितीचा म्हणजे विपरीतज्ञानाचाही अनुभव येत नाहीं. असा हा चार अवस्थांचा विवेक आहे ॥ १४ ॥

( जागृति, स्वप्न, गाढनिद्रा व तुर्या, या चार अवस्थांचें स्वरूप येथपर्यंत सविस्तर वर्णिलें आहे. जागृति, स्वप्न व सुषुप्ति या अवस्था मायेच्या म्हणजे अज्ञानाच्या साम्राज्यांत असतात. ह्या तिन्ही अवस्थांत स्वरूपाचें आवरण करणारें अज्ञान विद्यमान असतें. तात्पर्य हीं सर्व कारण-बद्ध असतात. पण जागृति व स्वप्न या अवस्थांत मन सदैव जागृत असून व्यापारयुक्त असतें व अज्ञान कारणाच्या साहाय्यानें तें स्वरूपाज्ञानाला विक्षिप्त करून अन्यथाज्ञान उत्पन्न करितें. म्हणून या दोन्ही अवस्था कारणबद्ध व कार्यबद्ध असतात. निद्रास्थितींत मन लीन झालें असतें म्हणून, तेथें विक्षेपकार्यें होत नाहींत व तेथें शुद्ध अज्ञान असतें. निद्रा ही कारणमात्र बद्ध आहे म्हणून तेथें ज्ञान नाहीं. तुर्यावस्थेंत अज्ञानाचा व विक्षेपाचा अभाव असल्याकारणानें तेथें शुद्ध अद्वितीय ज्ञान मात्र असून तुर्या ही सर्वज्ञ, सुखदुःखशून्य आणि पूर्ण समाधानी असते. हें सर्व संस्मरणीय नाहीं असें कोण म्हणेल ! )

---

## श्लोक पंधरावा.

**अन्यथा गृह्णतः स्वप्नो निद्रा तत्त्वमजानतः ।**
**विपर्यासे तयोः क्षीणे तुरीयं पदमश्नुते ॥ १५ ॥**

**अन्वय व अर्थः—अन्यथा गृह्णतः स्वप्नः** ( अन्यथा ज्ञान करून घेणाऱ्याचें साधन म्हणजे स्वप्न ) **तत्त्वं अजानतः निद्रा** ( ज्यांस तत्त्वरूप समजलें नाहीं, त्या निद्रितांची निद्रा ) **विपर्यासे** ( निद्रा व स्वप्न ह्या दोन्ही अवस्था म्हणजे वस्तुविपर्यास करणाऱ्या अवस्था आहेत ) **तयोः क्षीणे तुरीयं पदं अश्नुते** ( निद्रा संपली, स्वप्नाचा विलय झाला म्हणजे तुरीया स्थिति प्राप्त होते ) ॥ १५ ॥

तुरीयपद केव्हां प्राप्त होतें, त्याचें लक्षण सांगतात. निद्रा व स्वप्न यांचा अवतार संपला म्हणजे तुरीयपद मिळतें. तुरीयाशिवाय बाकीच्या तिन्ही अवस्थांत निद्रा ( अविद्या, ब्रह्मवस्तूचें अज्ञान ) विद्यमान असतें आणि जागृतींत व स्वप्नांत अज्ञानासह

अविद्येचें कार्य म्हणजे स्वप्न किंवा अयथार्थज्ञान असतें. मिळून निद्रा व स्वप्न विपर्यासच; निद्रेंत विशेषज्ञानांचा अभाव असतो आणि स्वप्नांत विशेष ज्ञान असतें; पण तें विपर्यस्त असतें. तुर्या सामान्यज्ञानविज्ञानरूप आहे. निद्रा ही शुद्ध तमोवस्था, स्वप्न (जागृत्स्वप्न) ही राजसी अवस्था आणि तुर्या ही शुद्ध सात्त्विक अवस्था होय. जागृति व स्वप्न या उभयतांचा अंतर्भाव स्वप्नांत केला आहे, कारण उभयतांही विपरीत ज्ञान देणारीं आहेत, हें विसरूं नये ॥ १५ ॥

---

## श्लोक सोळावा.

**अनादिमायया सुप्तो यदा जीवः प्रबुध्यते ।**
**अजमनिद्रमस्वप्नमद्वैतं बुध्यते तदा ॥ १६ ॥**

**अन्वय व अर्थः—अनादिमायया सुप्तः जीवः यदा प्रबुध्यते** (अनादि मायेनें निर्माण केलेल्या झोंपेमधून जेव्हां जीव खडखडीत जागा होतो) **तदा अजं, अनिद्रं, अस्वप्नं, अद्वैतं, बुध्यते** (तेव्हां जन्मादिविकारशून्य, स्वप्ननिद्राशून्य, असें जें अद्वैत आहे, तें त्याला समजतें अथवा प्राप्त होतें) ॥ १६ ॥

अज्ञानरूपी माया ही अनादि आहे. अहंकार व त्याची बुद्ध्यादि प्रजा याचा अवतार होण्याच्या आधीं अज्ञानाचें अस्तित्व असतें. अज्ञानाचा जन्म केव्हां झाला, हें सांगतां यावयाचें नाहीं. कारण त्याची जन्मकुंडली मांडणारा जोशी हा स्वतः अज्ञानी म्हणजे विशेष ज्ञानी अथवा इंद्रियसाहाय्यानें पाहणारा असतो. तेव्हां पाहणारा परिच्छिन्न ज्ञानी, त्याचीं साधनें अज्ञानोत्पन्न व त्याचा निश्चय ही तसाच! अहो! अज्ञानाच्या मुलानें अज्ञानाच्या जन्मकाळीं विद्यमान असणें शक्य नाहीं. असो; ह्या प्रमाणें अनादि असणाऱ्या अज्ञानानें घातलेली झोंपेची झडप ब्रह्मज्ञानानें नाहींशी होऊन जीवाला उजाडतें, तेव्हां आपलें स्वरूप अद्वय, विकारातीत व अवस्थात्रयातीत आहे, असें त्याला स्वानुभवानें समजतें. हें ब्रह्मज्ञान श्रुति, श्रीगुरु इत्यादिकांच्या प्रसादानें मिळतें ॥ १६ ॥

---

## श्लोक सतरावा.

**प्रपञ्चो यदि विद्येत निवर्तेत न संशयः ।**
**मायामात्रमिदं द्वैतमद्वैतं परमार्थतः ॥ १७ ॥**

**अन्वय व अर्थः**—यदि प्रपंचः विद्येत, निवर्तेत, न संशयः (प्रपंच जर वस्तुतः असेल तर, तो निवृत्त होईल, यांत शंका नाहीं) **मायामात्रं इदं द्वैतं, परमार्थतः अद्वैतं** (हें जें द्वैत दृश्यभास्य आहे, तें सर्व मायेचा, अज्ञानाचा, अज्ञानजन्य कल्पनांचा विलास आहे. पण खरोखर पाहतां अद्वैत मात्र सत्य आहे) ॥ १७ ॥

आतां, कदाचित् कोणीं शंका घेईल कीं, एकाला ज्ञान होऊन तो ब्रह्मरूप झाला, तरी बाकीच्यांस प्रपंचाचें भान असतेंच कीं नाहीं? तेव्हां वस्तुतः अद्वैत असणें शक्य नाहीं. या शंकेचें समाधान असें आहे, सर्व प्रपंच चोलून चालून अज्ञानजन्य कल्पनांचें विजृंभण आहे. दृश्य व दिसणारा सर्व व्यक्ताव्यक्त प्रपंच मुळीं मनःकल्पित आहे. तेव्हां तो जर वस्तुतः नाहीं, परमार्थतः त्याचें अस्तित्व असणें जर शक्य नाहीं, तर त्याच्या विनाशाची गोष्ट कशाला बोलावी? वंध्यापुत्र केव्हां मेला, ह्याला उत्तर देण्याचा प्रयत्न करणें जसें हास्यास्पद, तसेंच मुक्तेतरांच्या अविद्यमान प्रपंचनाशाची वार्ता सांगणें होय. तात्पर्य सर्व व्यवहारांत दिसणारें द्वैत परमार्थदृष्टीनें असत् व असत्य असून कल्पनाजन्य आहे. परमार्थी अद्वैत ही मात्र सत्य वस्तु आहे. तेव्हां एकाचें अज्ञान नाहींसे झालें म्हणजे सर्व अज्ञानप्रपंच नाहींसा होईल, असें मानणें व्यर्थ आहे. शिवाय जें वस्तुतः नाहीं, त्याचा नाश कसा व्हावयाचा? प्रपंच म्हणजे कल्पनांचा विलास. कल्पक जीव संपतील, तेव्हां प्रपंचकल्पना अस्तंगत होतील, इतरथा नाहीं) ॥ १७ ॥

---

## श्लोक अठरावा.

**विकल्पो विनिवर्तेत कल्पितो यदि केनचित् ।**
**उपदेशादयं वादो ज्ञाते द्वैतं न विद्यते ॥ १८ ॥**

**अन्वय व अर्थः**—यदि केनचित् विकल्पः कल्पितः विनिवर्तेत (ह्या द्वैतविकल्पाची जर कोणीं परमार्थतः कल्पना केली असेल, तर तो विकल्प नाहींसा होईल) **उपदेशात् अयं वादः** (उपदेश करावयाचा आहे, ह्मणून हा वाद आहे) **ज्ञाते द्वैतं न विद्यते** (परमार्थ ज्ञान झालें ह्मणजे द्वैताला अस्तित्व नसतें) ॥ १८ ॥

'हा जो मायेचा विकल्प आहे. मनःकल्पना आहे, ती कल्पना करणारा व ती कल्पना मात्र आहे, असें सांगणारा तरी कोणी वस्तुतः असलाच पाहिजे,' अशी शंकाही

योग्य नाहीं. कारण प्रपंचकल्पना काय किंवा प्रपंचनिवर्तक शास्त्रकल्पना काय, दोन्ही कल्पना व्यवहारांत उत्पन्न होणाऱ्या आहेत. परमार्थांत कोणीं कल्पना करणारा असणें शक्य नाहीं. तेव्हां तेथें कल्पनेचें होणें, जाणें म्हणजे, खपुष्प विकसित होणें किंवा कोमेजणें यासारखेंच अशक्य आहे. आतां श्रुति, शास्त्रें, गुरु इत्यादि परमार्थाची वाट मात्र दाखविणाऱ्या वस्तु व्यवहारांत असतात. कोठपर्यंत ? आत्मसाक्षात्कार होईपर्यंत. आत्मसाक्षात्कार होऊन मोक्षप्राप्ति झाली कीं, यांचें राज्य संपलें. तेथें द्वैत नाहीं. व्यवहारांत तरी व्यावहारिकदृष्टीनें आहे इतकेंच. वस्तुतः परमार्थांत प्रपंच नाहीं व उपदेशकही नाहींत ॥ १८ ॥

---

## मंत्र आठवा.

**सोऽयमात्माऽध्यक्षरमोंकारोऽधिमात्रं पादा मात्राः । मात्राश्च पादा अकार उकारो मकार इति ॥ ८ ॥**

**अन्वय व अर्थः**—**सः अयं आत्मा अध्यक्षरं** ( तो हा आत्मा अध्यक्षर म्हणजे अक्षरांचा—अविनाशी वस्तूंचा नियामक आहे, स्वामी आहे ) **ओंकारः अधिमात्रं** ( ओंकार हा अधिमात्र म्हणजे मोजतां न येण्यासारखा असून सर्व मेयवस्तुंचा नियामक आहे ) **पादाः मात्राः मात्राः पादाः च** ( आत्म्याचे पाद म्हणजे ओंकाराच्या मात्रा व ओंकारमात्रा म्हणजे आत्मपाद होत ) **अकारः उकारः मकारः इति** ( अ, उ आणि म या ॐकाराच्या मात्रा आहेत ) ॥ ८ ॥

येथें या उपनिषदांत आत्मा आणि ॐ यामध्यें तादात्म्य सांगितलें आहे, ते सामान्य लोकांस ब्रह्मध्यान करितां यावें म्हणून होय. ॐ कार हें प्रधान अक्षर आहे. त्याचप्रमाणें ॐ हें अक्षर अमेय ( न मोजतां येणारें ) व अविनाशी आहे. ज्यांचें चित्त विषयविनिवृत्त होऊन परब्रह्माशीं एकाग्रतेनें संलग्न होतें, त्यांस ॐकारनाद ( अनाहत ध्वनि ) अखंड ऐकूं येत असतो, हा अनुभव आहे. असें हें अविनाशी अक्षर आत्मरूप आहे. हें रूपक श्रुतीनें मध्यमबुद्धी लोकांच्या सोईसाठीं केलें आहे. आत्मा अमेय, तसाच ॐ ही अमेय आहे. आत्म्याच्या चार अवस्था जीवदृष्टीनें आहेत, तशाच ॐ काराच्या चार मात्रा आहेत. 'अ, उ, म, आणि अर्धमात्रा, हा ओंकाराच्या होत. पण अर्धमात्रेचा उल्लेख येथें नाहीं. पण त्याचा विचार पुढें करूं. तसेंच, विश्व, तैजस, प्राज्ञ आणि तुर्या हे आत्म्याचे चरण आहेत. ॐकाराच्या मात्रा म्हणजे

आत्म्याचे चरण होत. म्हणून आत्मा व ॐकार याचें तादात्म्य आहे. तात्पर्य आत्म्याचें ध्यान करण्यास ॐ हें उत्तम साधन आहे. परमेश्वरध्यानाला त्याची मूर्ति किंवा पृथ्वीची समजूत करून घेण्यास भूगोल किंवा विद्या शिकण्यास अ, आ इत्यादि अक्षरें त्याप्रमाणें परमात्मचिंतनाला ॐकार उपयोगी आहे ॥ ८ ॥

---

## मंत्र नववा

**जागरितस्थानो वैश्वानरोऽकारः प्रथमा मात्राऽऽप्तेरादिमत्त्वाद्वाऽऽप्नोति ह वै सर्वान्कामानादिश्च भवति य एवं वेद ॥ ९ ॥**

**अन्वय व अर्थः—जागरितस्थानः वैश्वानरः अकारः प्रथमा मात्रा** ( जागरितस्थानावर वास्तव्य करणारा जो वैश्वानर—विश्व—तो पहिली 'अ' कार ही मात्रा होय ) **आप्तेः, आदिमत्त्वात् वा** ( विश्वाप्रमाणें 'अ' हा सर्व व्यापक आहे म्हणून व विश्वाचें दर्शन प्रथम होतें, तसेंच अ हें अक्षर प्रथम आहे म्हणून, विश्व हा अकार आहे, असें समजावें ) **यः एवं वेद, सर्वान् कामान् आप्नोति ह वै आदिः च भवति** ( ज्याला विश्व आणि अ हीं एकच आहेत, असें ज्ञान होतें, त्याच्या सर्व मनःकामना पूर्ण होतात व तो सर्वश्रेष्ठ होतो, हें सुप्रसिद्ध आहे ) ॥ ९ ॥

विश्वाप्रमाणें अकार सर्वव्यापी आहे. विश्व प्रथम चरण आहे, त्याप्रमाणें अ हा सर्व अक्षरांत प्रथम आहे. कोणती ही अभियुक्त अक्षरवाटिका पहा, तींत 'अ' लीं अग्रिमस्थान दिलेलें आढळतें. हें अक्षर उच्चाराला सहज आहे व वरिष्ठ जीव जातींतील अर्भकें प्रथम 'अ' काराचा उच्चार करितात. 'अक्षराणां अकारोऽस्मि' 'अकारो वै सर्वा वाक्' अशी प्रमाणें अकाराच्या प्राथम्याचें, सर्वव्यापित्वाचें अनुभवानें समर्थन करितात. असो; येथें 'विश्व व अकार हे उभयता एक आहेत,' असें ज्ञान झाल्यास फल काय मिळतें तें सांगितलें आहे, तें भाविकांनीं तसेंच श्रद्धेय व विचारी पुरुषांनीं चिंतनीय आहे. ॥ ९ ॥

---

## मंत्र दहावा.

**स्वप्नस्थानस्तैजस उकारो द्वितीया मात्रोत्कर्षा-दुभयत्वाद्वोत्कर्षति ह वै ज्ञानसंततिं समानश्च भवति नास्याब्रह्मवित्कुले भवति य एवं वेद ॥ १० ॥**

अन्वय व अर्थः—स्वप्नस्थानः तैजसः उकारः द्वितीया मात्रा (स्वप्नस्थानीं वास्तव्य करणारा तैजस हा उकार म्हणजे ॐ काराची दुसरी मात्रा होय). उत्कर्षात्, उभयत्वात् वा (दोन्ही उत्कर्षात्मक व मध्यस्थित्यवलंबी आहेत म्हणून, तैजस व उ एकात्मक होत) यः एवं वेद, ज्ञानसंततिं उत्कर्षति, समानः च भवति; न अस्य कुले अब्रह्मवित् भवति (हें तादात्म्यज्ञान संपादणारा पुरुष ज्ञानपरंपरेचा अभ्युदय करितो व तो सर्वांशीं मैत्रीनें वागतो; तसेंच, त्याच्या कुलांत अब्रह्मवेत्ता उत्पन्न होत नाहीं.) ॥ १० ॥

कल्पनेच्या साम्राज्याचें आधिपत्य असणारा तैजस आपल्या कल्पनांच्या भराऱ्या अत्युच्च ध्येयाकडे वळवीत असतो. अर्थात् त्याचें ज्ञान दृश्यामध्यें वावरणाऱ्या संसाऱ्यापेक्षां जास्त योग्यतेचें असतें. पण कल्पना झाल्या तरी त्या दृश्यभास्यांचा संबंध सर्वस्वी तोडतात, असें नाहीं. म्हणजे, कल्पना ह्या अंतिम ध्येय आणि दृश्य वस्तुस्थिति या उभयतांच्यामध्यें राहून विचारदृष्टीनें दृश्याला ध्येयाकडे व आचरणदृष्टीनें ध्येयाला दृश्याकडे आणणाऱ्या असतात. वधुवरांचा संगम घडवून आणणाऱ्या ह्या उपाध्यायिणीच होत. 'उ' कार ही अ आणि म यांच्या मध्यें सौजन्य उत्पन्न करणारें अक्षर आहे. 'अ' चें स्वरत्व 'उ' मध्यें आहे व 'म' चा ओष्ठस्थानीय सहवास याला आहे. उच्चाराच्या दृष्टीनें उ हें अक्षर 'अ' च्या पुढचें आहे, हें निर्विवाद आहे. व्यंजनाकडे उचा ओढा जास्त व व्यंजनाव्यतिरिक्त वाणीचा व्यापार चालणें प्रायः अशक्य ही आहे. तथापि 'उ' हा स्वर आहेच. यज्ञयागांतही अध्वर्युत्व यजुर्वेदाकडे असतें, व 'यजुः' मध्यें उकार हा मुख्य स्वर आहे. उ हा अध्वर्यु होय. असो; कल्पनेच्या साम्राज्यांत वावरणारा तैजस व वाणीला उत्तेजित करणारा उ त्याचप्रमाणें दृश्यध्येयांमध्यें सांखळीचा दुवा असणारा तैजस आणि अ आणि म् यांस साधणारा उ हे एकात्मक आहेत, असें ज्ञान ज्याला होतें, तो ज्ञानपरंपरेचें भांडागार वृद्धिंगत करितो, हें व्हावयाचें तसेंच होतें. दृश्यवस्तुस्थितीच्या ज्ञानाला उन्नतकारी कल्पनाप्रतिभेचें साहाय्य मिळेल तरच,

ज्ञानसीमा वृद्धिंगत होण्याचा संभव असतो. अच्या पुढचा उ, तसेंच विश्वाच्या पुढील तेजस आहे. पुनः; कल्पनाप्रतिभा उज्ज्वल असली म्हणजे दुराग्रह कमी होऊन शत्रुमित्र सारखे होतात, हेंही ठीक आहे. शेवटची फलश्रुति मनोहर म्हणून चिंतनीय आहे ॥ १० ॥

---

## मंत्र अकरावा.

**सुषुप्तस्थानः प्राज्ञो मकारस्तृतीया मात्रा मितेरपीतेर्वा मिनोति ह वा इदꣳ सर्वमपीतिश्च भवति य एवं वेद ॥ ११ ॥**

**अन्वय व अर्थः—सुषुप्तस्थानः प्राज्ञः मकारः तृतीया मात्रा** (गाढ निद्रेचा अधिपति जो प्राज्ञ हा 'म'कार ह्मणजे ॐकाराची तिसरी मात्रा आहे) **मितेः; अपीतेः वा** (कारण उभयतांही मापक व आदिस्थितींत प्रवेश करविणारे आहेत) **यः एवं वेद, इदं सर्वं मिनोति अपीतिः च भवति** (प्राज्ञ व 'म' मात्रा एकात्मक आहेत, असें ज्ञान होणारा मुमुक्षु सर्वज्ञ व कारणात्मक होतो) ॥ ११ ॥

प्राज्ञ आणि 'म'कार यांचें ऐकात्म्य आहे. कारण विश्वतैजसांच्या मर्यादा मोजणारा जसा प्राज्ञ असतो, त्याचप्रमाणें 'अ, उ' च्या सीमा मोजणारा 'म' कार आहे. ॐकाराचा अखंड उच्चार ध्यानांत करितांना 'म' पर्यंत आपण आलों म्हणजे पुनः अकार उकार येतात व त्याप्रमाणें त्याचा हिशेब लागतो. तसेंच या जपांत 'म' पाठीमागून 'अ' येतो, त्याप्रमाणें गाढनिद्रेनंतर जागृति येते किंवा प्रलय झाला कीं मागून उत्पत्ति होते. हें प्राज्ञ-मकाराचें ऐकात्म्य ज्ञान असणारा सर्वज्ञ होऊन सर्वकारणात्मक जो हिरण्यगर्भ त्याच्याशीं एकात्मक होतो. तिन्ही मंत्रांतील फलश्रुतीकडे श्रुतीचें तात्पर्य नाहीं. ॐकार मात्रा व आत्मपाद यांत साम्य आहे, तें दाखविण्याकडे श्रुतीची दृष्टि आहे ॥ ११ ॥

---

**अत्रैते श्लोका भवन्ति ।**

## श्लोक एकोणिसावा.

**विश्वस्यात्वविवक्षायामादिसामान्यमुत्कटम् ।**
**मात्रासंप्रतिपत्तौ स्यादादिसामान्यमेव च ॥ १९ ॥**

अन्वय व अर्थः—विश्वस्य अत्वविवक्षायां, मात्रासंप्रतिपत्तौ आदि-सामान्यं आप्तिसामान्यं एव च उत्कटं स्यात् ( मात्रांचें रुपक स्वीकारल्या नंतर व विश्व हा अकारमात्रात्मक आहे, असें म्हणावयाचें असलें, म्हणजे उभयतांमध्यें आदित्व व व्यापकत्व हे दोन गुण सामान्य आहेत, उभय-ठिकाणीं हे गुण आहेत, असें उत्कटत्वानें दिसतें किंवा दिसेल ) ॥१९॥

ध्यानकर्मासाठीं ॐ कार हा आत्मा होय असें ठरविलें, आत्मस्वरूपावर ॐ काराचें रूपक केलें, म्हणजे सर्वांच्या प्रारंभीं असणारे विश्व व अकार यांमधील साम्य उत्कट-त्वानें स्पष्ट होतें. मंत्रांत या कारिकेंतील अर्थाचें विवेचन झालें आहे. ॥ १९ ॥

---

## श्लोक विसावा.

**तैजसस्योत्वविज्ञान उत्कर्षो दृश्यते स्फुटम् ।**
**मात्रासंप्रतिपत्तौ स्यादुभयत्वं तथाविधम् ॥ २० ॥**

अन्वय व अर्थः—मात्रासंप्रतिपत्तौ तैजसस्य उत्त्वविज्ञाने उत्कर्षः स्फुटं दृश्यते, तथाविधं उभयत्वं स्यात् ( मात्रारूपक सिद्ध केलें म्हणजे तैजस हा उ आहे, हें उत्कर्ष व उभयत्व या सामान्यगुणांनीं स्पष्ट दृग्गोचर होतें ) ॥ २० ॥

याचें विवेचन मागें १० व्या मंत्रांत झालें आहे ॥ २० ॥

---

## श्लोक एकविसावा.

**मकारभावे प्राज्ञस्य मानसामान्यमुत्कटम् ।**
**मात्रासंप्रतिपत्तौ तु लयसामान्यमेव च ॥ २१ ॥**

अन्वय व अर्थः—मात्रासंप्रतिपत्तौ प्राज्ञस्य मकारभावे मानसामान्यं लयसामान्यं एव च उत्कटं ( रूपक ठरविल्यावर प्राज्ञ हा मकार होतो. कारण उभयत्र मापकत्व व लयत्व हीं दोन्हीं समसमान दिसतात) ॥ २१ ॥

श्रुतीच्या ११ व्या मंत्रांत याचें स्पष्टीकरण झालें आहे ॥ २१ ॥

## श्लोक बाविसावा.

**त्रिषु धामसु यत्तुल्यं सामान्यं वेत्ति निश्चितः ।**
**स पूज्यः सर्वभूतानां वन्द्यश्चैव महामुनिः ॥ २२ ॥**

अन्वय व अर्थः--त्रिषु धामसु यत् तुल्यं सामान्यं निश्चितः वेत्ति, सः महामुनिः सर्वभूतानां पूज्यः वंद्यः च एव ( या प्रमाणें तिन्ही स्थानांचे व तिन्ही मात्रांचे परस्पर सामान्यगुण ज्याला निश्चितपद्धतीनें समजतात, तो श्रेष्ठ मुनि सर्वभूतांस पूज्य व वंद्य होतो. ) ॥ २२ ॥

### समजुतीसाठीं कोष्टक.

| आत्मपाद, | ॐकारमात्रा | सामान्यगुण | फलश्रुति |
|---|---|---|---|
| विश्व | अ | प्रथमता, सर्वव्यापकत्व | प्राथम्य, सर्वकामावाप्ति |
| तैजस | उ | उत्कृष्टता व मध्यस्थित्यवलंबित्व | ज्ञानविस्तार व शत्रुमित्रसमभाव |
| प्राज्ञ | म् | मापकता व लयकारणता | सर्वज्ञता व सर्वकारणता |

अर्थातच प्राथम्य, पूर्णकामता, ज्ञानविस्तार, सर्वात्मभाव, सर्वज्ञता व सर्वशक्तिमत्त्व प्राप्त होऊन निश्चित तुल्यज्ञानी सर्ववंद्य होतो यांत काय आश्चर्य आहे ? ॥ २२ ॥

---

## श्लोक तेविसावा.

**अकारो नयते विश्वमुकारश्चापि तैजसम् ।**
**मकारश्च पुनः प्राज्ञं नामात्रे विद्यते गतिः ॥२३॥**

अन्वय व अर्थः--अकारः विश्वं, उकारः च अपि तैजसं पुनः मकारः च प्राज्ञं, नयति; अमात्रे गतिः न विद्यते ( याप्रमाणें परस्पर तत्तदात्मक

असणाऱ्या पाद व मात्रा एकच आहेत, असें समजून जो अकाराचें अखंड ध्यान करितो, तो विश्वाकडे ध्यानसामर्थ्यानें जातो, विराट्स्वरूपांत जाऊन मिसळतो, उकारध्याता तैजसांत (हिरण्यगर्भांत) जाऊन एक होतो आणि मकार ध्याता अव्याकृतांत जाऊन सामावतो. पण अमात्रक जो तुर्य, त्याचें ध्यान करणाराला कोठें जावें यावें लागत नाहीं ) ॥ २३ ॥

येथें अकारादि मात्राध्यानाचें फल सांगून पाठीमागील कारिकांचें समर्थन केलें आहे. जागृतस्थानाचा अधिष्ठाता जो विश्व किंवा विराट् त्याचें ध्यान अखंड व एकाग्र केलें तर ध्याता विराट्स्वरूपांत जाऊन मिसळतो. ज्याचें ध्यान एकाग्र होतें, तो ध्याता ध्येयस्वरूप होतो, हें आर्यमानसशास्त्राचें सांगणें आहे. असेंच इतर ध्यानांचें फल आहे. मात्र अमात्रक जो आत्मा त्याचें ध्यान करणाराला मात्र जागच्या जागीं आत्मरूप मिळतें. विराटादि एकदेशी आहेत, म्हणून तिकडे जावें लागतें. आत्मा सर्वव्यापी आहे, म्हणून आत्मप्राप्तीसाठीं यातायात करावी लागत नाहीं ॥२३॥

---

## ० मंत्र बारावा.

**अमात्रश्चतुर्थोऽव्यवहार्यः प्रपञ्चोपशमः शिवोऽद्वैत एवमोंकार आत्मैव संविशत्यात्मनाऽऽत्मानं य एवं वेद ॥ १२ ॥**

मांडूक्योपनिषत्समाप्ता ।

अन्वय व अर्थः—अमात्रः चतुर्थः अव्यवहार्यः प्रपञ्चोपशमः शिवः अद्वैतः, एवं ओंकारः आत्मा एव ( पण अमात्र, वाणीमनाला अगोचर, प्रपंचविनाशक, मंगलरूप, अद्वितीय, तुर्य आत्मा आहे, तोच ॐ कार आहे ) यः एवं वेद, आत्मना आत्मानं संविशति ( हें ज्ञान झालेला पुरुष आत्मरूपानें आत्म्यांत जागच्याजागीं प्रवेश करितो) ॥ १२ ॥

मागें ॐकार हा मात्रात्मक आहे, असें समजून त्याच्या तीन मात्रा ह्या आत्म्याचे तीन पाद् होत, अशा निश्चयानें ध्यान करणाराला मिळणारी फलश्रुति सांगितली. या मंत्रांत निमात्रक ॐ म्हणजेच आत्मा आहे व आत्मस्वरूपाप्रमाणें तो मात्राशून्यादि

लक्षणान्वित आहे, असें ध्यान करणारा ( अखंड ज्ञान असणारा ) आत्मरूप होतो असें सांगितलें. सारांश, निर्विकल्प ध्यानस्थिति व तिचें फल यांचें संकीर्तन केलें आहे. ॥ १२ ॥

---

## पूर्ववत् अत्रैते श्लोका भवन्ति—

पूर्वीच्या क्रमाप्रमाणें येथें ह्या श्लोकांचा श्री गौडपाद अवतार करितात—

### श्लोक चोविसावा.

**ओंकारं पादशो विद्यात्पादा मात्रा न संशयः ।**
**ओंकारं पादशो ज्ञात्वा न किंचिदपि चिन्तयेत् ॥ २४ ॥**

**अन्वय व अर्थः—ओंकारं पादशः विद्यात्** ( ओंकाराच्या तीन मात्रा म्हणजे आत्मपाद आहेत व ते यथोक्तक्रमानुसार आहेत, हें जाणून घ्यावें ) **पादाः मात्राः** ( आत्मपाद हे ओंकारमात्रा आहेत ) **संशयः न** ( यांत संदेह नाहीं ) **ओंकारं पादशः ज्ञात्वा न किंचित् अपि चिंतयेत्** ( ओंकाराचें आत्मपादात्मक ज्ञान करून घ्यावें आणि इतर कशाचेंही चिंतन करूं नये. आत्मरूप ॐकाराचें एकाग्रचिंतन करावें ) ॥ २४ ॥

अर्थ स्पष्ट आहे. चिंतन एकाग्र असावें, ही अट अखंड पाळिली पाहिजे ॥ २४ ॥

---

### श्लोक पंचविसावा.

**युञ्जीत प्रणवे चेतः प्रणवो ब्रह्म निर्भयम् ।**
**प्रणवे नित्ययुक्तस्य न भयं विद्यते क्वचित् ॥ २५ ॥**

**अन्वय व अर्थः—प्रणवे चेतः युञ्जीत** ( प्रणवाचे ठिकाणीं मन एकाग्र करावें ) **प्रणवः निर्भयं ब्रह्म** ( प्रणव, ॐ, हें भयाला आश्रय न देणारें ब्रह्म आहे ) **प्रणवे नित्ययुक्तस्य भयं न क्वचित् विद्यते** ( प्रणवयोगाचा अखंड अभ्यास लाधलेल्या पुरुषाला कोठेंही भय असत नाहीं ) ॥ २५ ॥

'प्रणव ब्रह्म आहे' अशी श्रुति आहे व 'ब्रह्म निर्भय आहे' असेंही ती सांगते अर्थात् प्रणव ही भयविघातक आहे, हें ठरलें. म्हणून हेंही स्पष्ट झालें कीं. प्रणवाचें अखंड व अभंग ध्यान करणारा पुरुष भीतिशून्य होतो. भीतीमध्येंही ब्रह्माचें वास्तव्य व नियामकत्व असतें. प्रणवयुक्त योगी ब्रह्म होतो, म्हणून तो भीतीचा आत्मा व नियामक होतो. मग त्याला भीति काय करणार ? ॥ २५ ॥

---

## श्लोक सव्विसावा.

**प्रणवो ह्यपरं ब्रह्म प्रणवश्च परः स्मृतः ।**
**अपूर्वोऽनन्तरोऽबाह्योऽनपरः प्रणवोऽव्ययः ॥ २६ ॥**

अन्वय व अर्थः—प्रणवः हि अपरं ब्रह्म ( प्रणव, ॐ, हा मागें सांगितल्याप्रमाणें अपरब्रह्म—सगुणब्रह्म—आहे ) प्रणवः च परः स्मृतः ( त्याचप्रमाणें ॐ हा परब्रह्म आहे, असें म्हटलें आहे ) तो कसा ?—पहा कीं—प्रणवः अपूर्वः, अनन्तरः, अबाह्यः, अनपरः, अव्ययः ( प्रणव हा कारणशून्य, सर्वव्यापी, एकरस, कार्यशून्य आणि अव्यय असा आहे ॥ २६ ॥

मात्रा व पाद आहेत, अशा दृष्टीनें प्रणवाचा विचार केला म्हणजे तो सगुण ब्रह्म होतो. पण आत्म्याला पाद नाहींत व ॐकाराला मात्रा नाहींत, असें निश्चित समजलें म्हणजे तो परमात्माच आहे, असें ठरतें. कारण निर्मात्रक ॐ हा कार्यकारणशून्य, विकारशून्य आणि अंतर्बाह्य एकरसात्मक आहे. आत्मरूप असेंच आहे ॥ २६ ॥

---

## श्लोक सत्ताविसावा.

**सर्वस्य प्रणवो ह्यादिर्मध्यमन्तस्तथैव च ।**
**एवं हि प्रणवं ज्ञात्वा व्यश्नुते तदनन्तरम् ॥ २७ ॥**

अन्वय व अर्थः—प्रणवः सर्वस्य आदिः, मध्यं, तथा एव च अन्तः ( प्रणव हा सर्वांचा आदि, मध्य आणि अंत आहे ) एवं हि प्रणवं ज्ञात्वा तत् अनंतरं व्यश्नुते ( प्रणवाचें हें स्वरूप ठीक समजलें कीं, त्यामुळेंच प्रणवतादात्म्याची प्राप्ति होते ) ॥ २७ ॥